उ

उ मराठी वर्णमालेतील पाचवा वर्ण व स्वरमालेतील पाचवा स्वर. स्थानपरत्वे ऱ्हस्व किंवा दीर्घ जसे -मुळा, शुल्क इ. मध्ये ऱ्हस्व; किंतु, परंतु इ. मध्ये दीर्घ.

उ उपसर्ग उलट क्रिया, विरोध, अभाव, अपकर्ष इ. अर्थी क्रियापदांना लागणारा एक उपसर्ग. उदा. उसवणे, उवळणे, उलगडणे इ.

उ पु. शिव; विष्णू (ओम्‌मधील दुसरा घटक उ म्हणजे विष्णू) : 'उकार विष्णुरव्यक्त.' – गुच २.१३०.

उं उद्गा. अँ :; 'काय' या अर्थी आश्चर्यार्थक किंवा प्रश्नार्थक उद्गार; बेपर्वाई, नाखुषी इ. व्यक्त करणारा शब्द. उच्चार अतिऱ्हस्व आणि अनुनासिक.

उइला वि. उवांनी भरलेला.

उक स्त्री. १. झळ : 'माझिया विरहाग्नीची उक तूं कैसेनि साहसी.' – भाए ७०. २. उकळी; उठावा. [का. उक्कु = ऊत येणे, कढ येणे.]

उकट पहा : **उकड**

उकटणे उक्रि. १. जात्याला टाका देणे. २. (ल.) तोंडावर देवीचे वण उठणे-पडणे. [सं. उत् + कृत् = फाडणे, तुकडे करणे.]

उकटणे उक्रि.१. उलथणे (तव्यावरील पोळी वगैरे.) २. पहा : **उचकटणे** (राजा) [सं. उत्कथन]

उकटाई स्त्री. १. जात्याला टाकी देण्याची मजुरी. २. टाकी देण्याचे काम.

उकटी स्त्री. १. जात्याला टाकी दिल्यावर (जात्याची रेव जावी म्हणून) दळण्यात येणारे मूठभर धान्य २. टाकी देण्याचे हत्यार; टाकी. ३. नवीन टाकी दिलेल्या जात्यावर दळलेल्या धान्याच्या रस्त्यावर घातलेल्या फुल्या, वर्तुळे : 'कल्पतरू तळवटीं असें सूर्यकरांची उकटी.' – उगी ६१३. ४. टाकी दिल्यावर दळलेल्या रेवेच्या पिठाच्या फुल्या ओलांडल्यामुळे टाचेस अगर तळव्यास येणारे फोड, गळवे.

उकटी पु. दाह, उष्णता : 'कल्पतरू तळवटीं । असें सूर्यकरांची उकटी'– उगी ६१३.

उकटीव वि. टाकी दिलेले; नवे केलेले; दुरुस्त केलेले (जाते).

उकड स्त्री. १. मोदक वगैरे करण्याकरिता शिजवून केलेले तांदूळ वगैरेंचे पीठ. (क्रि. तिंबणे.)
वि. उकडलेला; शिजवलेला. [सं. उत्क्वथ्]

उकड क्रिवि. उकिडवा; चवड्यावर, मांडी न घालता (बसणे.) : 'म्हणोनि उकड बैसोनि.' – पंच १.११.

उकडआंबा, उकडांबा पु. पाडाचा आंबा उकडून तोंडी लावण्यासाठी करतात तो. तो बरेच दिवस टिकावा म्हणून पाणखारात घालून ठेवतात.

उकडगरे पु. गरे शिजवून उकडून केलेली भाजी. फणस जून असला म्हणजे त्याची अशी भाजी करतात.

उकडणे उक्रि. १. शिजवणे; उष्णता लावून पदार्थ मऊ करणे : 'तेणें सर्वही उकडती । अस्तिमांस ।।' – दास ३.१.३०. २. हवेत उष्णता भासणे; गुदमरणे. ३. (सोनारी.) (कढवलेल्या तेलाने) मळ किंवा घाण काढून टाकणे. [सं. उत्+क्वथ्]

उकडपीठ न. तांदळाचे वगैरे उकडलेले पीठ.

उकडपेंडी स्त्री. रव्याला फोडणी देऊन तयार केलेले एक रुचकर खाद्य.

उकडपोळी स्त्री. उकडीत गव्हाच्या सांजाचे पुरण घालून केलेली पोळी.

उकडरस्सा पु. मांस, हाडे यांपासून केलेला रस्ता.

उकडलोणचे न. उकडलेल्या लिंबांचे किंवा मिरच्यांचे लोणचे.

उकडवा, उकडा क्रिवि. उकिडवा; चवड्यावर बसलेला. (गो.)

उकडहंडी स्त्री १. मडक्यात वाल, भुईमूग व इतर काही फळभाज्या घालून, ते बंद करून, भुईवर पालथे ठेवून आणि वर विस्तव ठेवून त्यातील पदार्थ शिजवण्याची पद्धत. २. अतिशय उकाड्याची जागा.

उकडा वि. मीठ, मिरची, मसाला न घालता केवळ उकडून काढलेला (भाजी इ. पदार्थ).
पु. पहा : **उकाडा**

उकडातांदूळ पु. भात (साळी) प्रथम उकडून मग कांडून तयार केलेले तांदूळ.

उकडीचे मोदक नारळाचे सारण तांदळाच्या उकडीत घालून वाफेवर उकडलेले मोदक.

उकडीव वि. १. उकडलेले; शिजवलेले. २. पाण्यात घालून थोडी आच दिलेले (तांदूळ).

उकढणे क्रि. शिजणे, त्रस्त होणे : 'गाभिणी उकढली पुटांमाझि ।'– ज्ञा १३.२२७.

उकणे क्रि. ओकणे : 'काळीया विष उकुनि दवडिला ।' – गरा ७३.

उकर, उकरी पु. उकरून काढलेली माती. पहा : **उकीर**[सं. उत् + कृ]

उकरड स्त्री. नासाडी; खराबी; उकरडा. (कु.) [सं. उत् +कृ]

उकरडा पु. कचऱ्याची रास; घाण, गदळ वगैरे टाकण्याची जागा : 'जें क्लेशगांवींचा उकरडा ।' –ज्ञा १६.४०५. पहा : **उकिरडा** (वा.)
उकरडा फुंकणे – उनाडक्या करीत फिरणे; निरुद्योगी असणे; अत्यंत दारिद्र्यावस्था प्राप्त होणे. **उकरड्याची दैना फिटणे** – क्षुल्लक वस्तूचाही केव्हाना केव्हा तरी उत्कर्ष होणे. **उकरड्याची धन करणे**–चांगल्या वस्तूंचाही नाश, दुरुपयोग करणे. **उकरड्यासारखा वाढणे** – बेसुमार वाढ होणे (संकटे, कर्ज, मूल, दुःख, रोपटे वगैरेंची.)

उकरणे उक्रि. १. खरवडणे; कोरणे; खणणे; पोखरणे; खवणे (उंदीर, घुशी वगैरे जमीन कोरून काढतात त्याप्रमाणे.). २. जमीन किंवा एखाद्या वस्तूवर खोदणे, कोरणे; (नख, दात, शस्त्र इ. च्या टोकाने) कोरून काढणे; खाचा पाडणे. ३. एखादी गोष्ट मुद्दाम पुन्हा उपस्थित करणे; कलह उपस्थित करणे; भांडणाचे मूळ पुन्हा वर काढणे. ४. खुबीदार प्रश्नाने खरी हकीगत एखाद्याच्या तोंडून वदविणे.
अक्रि. भिंतीचा गिलावा, भांड्याचे कीट वगैरे सुटून येणे; भांड्यांना लागलेले अन्न भिजून निघण्याजोगे सैल होणे. [सं. उत्+कृ]
उकरमणे अक्रि. तवा वगैरेवरील खरवड, जळका अंश, खपल्या वगैरे दूर होणे; भांडे, वस्त्र वगैरेचे पापुद्रे, मळ, वगैरे सुटून येणे.

उकराई स्त्री. खोदकाम करण्यास लागलेला खर्च; खोदकाम.

उकरी, उकरीड पहा : **उकरडा, उकिरडा**

उकरीव वि. उकरून काढलेला; ओरखडलेला; कोरलेला; पोखरलेला; खवलेला.

उकल, उकला स्त्री. पु. १. उलगडा, गुंतागुंत सोडवणे; एकमेकांत अडकलेले धागे वेगळे करणे; गूढ गोष्टींचे स्पष्टीकरण : 'या सोपिया योगस्थिती । उकलु देखिला गा बहुतीं ।' – ज्ञा ६.३८७. २. उमज; खुलासा; बोध; संदिग्ध असे सर्व मुद्दे स्पष्ट करणे : 'कर्माचा उकल । होय ऐसें बोलों पाहतो बोल ।' – यथा ४.४१६. [सं. उत्कल्]

उकलणे न. (विणकाम.) रेशीम वगैरे उकलण्याची आटणी.

उकलणे उक्रि. १. सैल करणे; उलगडा करणे; गुंतागुंत काढणे; मोकळा करणे: 'देव्हूडियां वेणिआं उकलैलियां । उधवटां गांठीं सूटलियां ।' – शिव ७१६. २. फोडून निराळे करणे; दुफळी करणे; फोडणे; चिरणे; निराळा करणे.(गो.) पहा : **उकलास** ३. (ल.) विवरण करणे; स्पष्ट करणे; फोड करून सांगणे : 'उकलूं जाणे अंतर । प्राणीमात्राचें ।'–दास १४.७.१२. ४. सुटका करणें; मुक्त करणे : 'संसारी गुंतोन काये । उकलवीं ऐसें हृदयें । तो सत्त्वगुण ।'–दास २.७.४३.

अक्रि. १. स्पष्ट होणे; उघडणे; मोकळी होणे; सुटणे: 'अंगीं उटी दिसे सुढाळ । कीं इंदुबिंब उकललें निर्मळ ।'– हरि ७.११. २. उलणे; विकास पावणे; उमलणें (जमीन, फूल, कळी, दात वगैरे) : 'उकळतेनि उन्मेखें । प्रज्ञाकुशलतेचीं तिखें ।' – ज्ञा १५.१८५. [सं. उत्+कल]

उकलाउकल स्त्री. १.पुन:पुन्हा सोडबांध. २. घडामोड; विचार न करता करणे व पुन्हा मोडणे. [उकलचे द्वि.]

उकलास पु. देवाच्या नावे निराळा राखून ठेवलेला भाग; संकल्प.(गो.) [उकलणे]

उकलीव वि. १. सुटलेला; उलगडलेला; सोडवलेला; मोकळा केलेला. २. उमललेला; विकास पावलेला. ३. तडकलेला; उलटलेला; उललेला. ४. स्पष्ट, साफ केलेला. ५. घडी मोडलेले (कापड वगैरे.)

उकवण, उकवीण न. १. जखमेतील कीड (किवण) नाहीशी करणारा मंत्र. (को.) २. तो मंत्र म्हणण्याचा विधी, प्रयोग.(उ+किवण) [सं. कृमि+व्रण]

उकवणे पहा : **उकावणे**

उकशी एक लहान रानझुडूप.

उकसणे क्रि. १. अस्ताव्यस्त करणे. (राजा.) पहा : **उसकटणे** २.खरचटणे. (ना.) [सं. उत्+कृष]

उकसवाकस स्त्री. विस्कटणे; उसकाउसक : 'कोठ्यातल्या कुटारात भीमा उकसवाकस करीत होता.' – बाविबु २५०.

उकळ स्त्री. १. कढ. पहा : **उकळी** २. काढा. पहा : **उकाळा**

उकळ बिंदु पु. उष्णतामानाच्या ज्या अंशावर एखादा द्रव पदार्थ उकळू लागतो तो अंश.

उकळणी स्त्री. १.वसुली. २. लुबाडणूक : 'म्हणून त्यांनी ही उकळणी चालविली आहे.' – स्मृचि ७४.

उकळणे अक्रि. द्रवपदार्थ वाफ येईपर्यंत, उकळी फुटेपर्यंत तापवणे; रटरटा शिजणे; आधण येणे; बुडबुडे उत्पन्न होणे; खदखदणे; उसळणे; सळसळणे; कढणे; कढ येणे.

उक्रि. शिजवणे; कढवणे; काढा करणे; अर्क काढणे; उकाळा काढणे.

उकळणे उक्रि. इच्छा नसताना देणे भाग पाडणे; (पैसा, अन्न, भिक्षा वगैरे) वसूल करणे; जबरदस्तीने घेणे; गोळा करणे; लुबाडणे; उपटणे; 'कवडें उकळीं भूतळीं ।' – शिव १६२.

उकळा पु. १.लोकांकडून हक्कदाराने किंवा कुळांकडून सावकाराने गोळा केलेली बाकी, वसुली; उगरण. २. भीक मागून जमा केलेला संग्रह. ३. दुसऱ्याकडून उपटलेला जिन्नस; वस्तू.

उकळी स्त्री. १. उकळण्याची क्रिया; कढ; आधण. (क्रि. फुटणे, येणे.). २. उमाळा; उत्कट इच्छा; उत्कंठा; आच: 'ब्रह्मा उपजला नाभिकमळीं । त्याच्या मनीं सृष्टीची उकळी ।' – यथादी १०.१५७. ३. प्रेम, दु:ख, राग इ. मनोविकारांचा उद्रेक किंवा भरते येणे; उमाळा (क्रि. फुटणे, येणे.) : 'रामकृष्णरंगीं रसना रंगली । अमृत उकळीं नाम तुझें ।' –तुगा २५०२. ४. वाहणारे पाणी अडले असता होणारी अवस्था; लाटा; पाण्याची खळबळ : 'वळणें वांकणे भोंवरे । उकळ्या तरंग झरे ।' – दास ११.७.३.[सं. उत् + कल्] (वा.) **उकळी फुटणे** – १. आधण येणे. २. अनावर हसू येणे.

उकळीत स्त्री. १. येणे असलेल्या पैशांची वसुली; उकळणी. २. भीक मागून मिळवलेला जिन्नस. ३. विकण्याकरिता आणलेल्या बागाईत किंवा किराणा मालावर ऐनमालाच्या रूपाने वसूल केलेली (शेखदाराने) रक्कम; करवसुली. ४. पाटलाने रयतेकडून वसूल केलेला सरकारी सारा. ५. प्रत्येक हप्त्याची जी येणे रक्कम असेल त्या बाबतीत धारेकऱ्यांना पाठवलेला फिरता हुकूम, याद, हिशेबाचा कागद अगर स्मरणपत्र. [सं. उत्कल्.]

उकळेगिरी स्त्री. लुटालूट; लुबाडणे; दरोडा.

उकळ्या वि. धान्य, पैसा वगैरे बिगरहक्काने घेणारा; लुबाडणारा.

उकंडा पु. उकिरडा. [सं. उत्+कृ]

उका स्त्री. १. उल्का; तुटणारा तारा. २. ठिणगी : 'नीगती अग्नीचिया उका.' – उषा ११२५. [सं. उल्का]

उकाइती स्त्री. उकळीत; लुटालूट : 'ह्या मुलखांत आपली उकाइती किफायतशीर होईल असें त्यास वाटलें.' – कोकि १३४.

उकाडा पु. १. रतीब; (दूध, भाजी, पाव, अंडी असे) पदार्थ रोज नियमितपणे घेण्यादेण्याची पद्धत, रीत. २. नियमित वेळी रकमा देणे, हप्ते देणे.

उकाडा पु. १. अतिशय उष्मा, गर्मी. २. (सोनारी धंदा) भांड्यांना, अलंकारांना उजळा देण्याकरिता चिंच, लिंबाचा रस, ॲसिड (तेजाब) किंवा इतर अम्ल पदार्थ आणि मीठ वगैरे कढवून तयार केलेले मिश्रण. (क्रि. देणे, करणे.)

उकाड्याचे तेल (सोनारी.) सल्फ्युरिक ॲसिड उकाड्यासाठी वापरतात म्हणून त्याचा पर्यायवाचक शब्द.

उकार पु. वर्णमालेतील 'उ' हे अक्षर; ॐकाराची (अ, उ, म, यांपैकी) दुसरी मात्रा : 'उकार उदर विशाल ।' – ज्ञा १.१९.

उकाल पु. १. निवाडा. २. सुटका; वेगळे होणे; निसटणे; मुक्तता. ३. स्पष्टपणे दिसून येणे; बाहेर पडणे. ४. (प्र.) उकाला. आजारातून

उठणे; आराम वाटणे.(क्रि. पडणे, होणे.)

उकाल पु. हट्ट; नाद: 'परंतु यांनीं उकालच घेतला. शेवट आम्हास येऊन बाजीरावांनीं पुसिलें.' – पेद ६.८६.

उकाल स्त्री. ओकारी; उबळ; पोटातील मळमळ.

उकाल वि. क्रिवि. अवचित; अनपेक्षित; आकस्मिक; बेअंदाजी; निशाणावर न बसता पलीकडे गेलेला (तोफेचा गोळा) : 'तेथें खंडोजी निंबाळकर यांस दूर उभे होतो तेथें उकाल गोळी येऊन गुढघ्यावर लागली.' – पेद २८.१६२. [सं. अव+काल]

उकालगोळा पु. डोक्यावरून जाणारा गोळा : 'साही तोफा मिळून ३२ वार केले. वरून उकाल व दोही बाजूने चार पाच हाताचे अंतराने गोळे जात....' – नाग २.१७२.

उकावणे क्रि. १. वर येणे; चढणे; उंच होणे : 'मग मनीं उगलाचि उकावसी ।' – दावि १३२. २. इरेस पेटणे; भरीस पडणे : 'वदे भट नृपापुढें उकावला चढोवढें ।'– बसवकृत महाबळचरित्र ६. [सं. उत्+क्रम् = वर चढणे.]

उकाशी वि. १. उपरी (कूळ); स्थायिक नसलेला. २. काही शिल्लक न टाकणारा; उधळ्या. (गो.)

उकासु प्रवासी. [सं.उत्क्रम्]

उकाळ पु. काढा.

उकाळ पु. नेम चुकून फुकट गेलेले तोफेचा गोळा.

उकाळ पु. १. निवाडा; निकाल. २. पहा : **उखाळ**

उकाळा पु. १. उकळी. २.काढा. ३. काही अम्ल पदार्थ, क्षार किंवा मीठ, तांब्याचा तुकडा वगैरे घालून उकळलेले पाणी. विष खाल्लेल्या माणसाला हे मिश्रण उलटी होण्यासाठी देतात.

उकाळा पु. १. गावातील हक्कदाराचा हक्क वसूल करणे; खेड्यातील बाजारात येणाऱ्या जिनसांवर हक्कदारांचा (बचकभर घेण्याचा) हक्क. २.येणे असलेल्या पैशांची वसुली.

उकिडवा वि. गुडघे पोटाशी येतील अशाप्रकारे जमिनीवर पावले टेकून बसलेला (माणूस). [सं. उत्कटक]

उकिरडा पु. १. केर टाकण्याची जागा; केराचा ढीग. २. उकिरड्यावरची राख (बागेच्या खतासाठी).[सं. उत्+ कृ. उत्किर] (वा.) **उकिरडा फुंकणे–** १. दारिद्र्यामुळे, बेकारीमुळे, निरुद्योगीपणामुळे, आळसामुळे भटकणे; क्षुद्र लाभासाठी भटकणे; नको तेथे रिकामे हिंडत राहणे. २. वेश्यागमन करणे; बाहेरख्यालीपणा करणे; व्यसनी लोकांच्या अड्ड्यात जाणे. : 'बाहेर जाऊन दहा उकिरडे फुंकून येतील.' – बाय २.१.

उकिरड्यावरचा शेणगोटा कुचकामाचा; निरुपयोगी : 'आम्ही काय उकिरड्यावरचा शेणगोटा ।' – इंप ६१.

उकिरड्यावरचे रत्न १. हीन कुळात जन्मलेले गुणी मूल. २. गलिच्छ, घाणेरड्या ठिकाणी मिळालेली मौल्यवान वस्तू.

उकिरडी भाजी हलक्या प्रतीची (उकिरड्यावर उगवणारी) माठाच्या जातीची भाजी.

उकिरवळी स्त्री. पोपडा. पहा : **उकीर** : 'जमिनीच्या उकिरवळ्या...' – सूर्योदय १८४. पहा : **उखरवळी**

उकीर पु. १. उकरून काढलेली माती (घूस, उंदीर इ.नी); उकरलेल्या मातीचा ढीग : 'घुसी उंदरांसी ठेउनी मंचकीं । काय उकीर शेखी काढितीना ।' – बगाथा ५३८. २. ओल्या जमिनीवर शेण वगैरे पडून त्याचे निघणारे पोपडे; उखळलेली जमीन : 'उकीर तर जागोजाग दिसत होते.' – माचु २७. ३. डोळ्यांतील चिकट स्राव. ४. (सामा.) उकिरडा; कचरा : 'उत्पात विविध होती मणिकांचनमय सभेंतही उकीर ।' – मोमौसल १.२६. [सं.उत्+कृ ; उत्किर]

उकुडवा उक्कड वि. उकिडवा. (तंजा.)

उक्त वि. १.बोललेले; म्हटलेले; सांगितलेले. सामा. शब्द – तदुक्त, मदुक्त, ईश्वरोक्त : 'तरीं आतां जाणें म्यांचि उक्त दोन्हीं ।।'– ज्ञा ३.३४. २. प्रकट; व्यक्त. [सं.]

उक्तनिर्वाह पु. बोललेले करणे; वचन पाळणे; आपले शब्द कायम ठेवणे. [सं.]

उक्तनिर्वाही वि. बोललेले करणारा; वचन पाळणारा; आपले बोलणे खरे करून दाखवणारा.

उक्ता वि. तयार. उदा. 'उक्ता कपडा.'

उक्ता, उक्ती, उक्ते क्रिवि. वि. १. वजन, माप न करता राशीवारी (केलेली खरेदी किंवा विक्री); घाऊक ठोकळ; मोघम (आकार). २. मक्त्याने अगर खेपेवारी अगर केलेल्या कामाप्रमाणे (दिलेली मजुरी); खंडाने (दिलेली जमीन). ३. सरसकट; सगळे; मोजके; एकंदर कामाची किंवा वस्तूची किंमत ठरवून करायचा (व्यवहार) : 'उक्तं काम घेतलंय् मी हे नंबर छापण्याचं.' – व्यंमाक ६९.

उक्ता दर (अर्थ.) अंगावर दिलेल्या कामाचे स्वरूप पाहून दिला जाणारा ठरावीक दर.

उक्ति–क्ती स्त्री. १. भाषण; वचन; वाक्य; बोलणे : 'तैसें व्यासोक्तितेजें धवळत ।' –ज्ञा १.४१ २. वचनरूप प्रमाण; म्हण; सुभाषित.[सं.]

उक्ती स्त्री. युक्ती : 'आपण होता तेथें । नेऊनि त्या प्रेमळांते । उक्ति प्रयुक्ति त्यांतें । प्रेमसंलुप्त करोनी ।' – रास १.३७.[युक्ति अप.]

उक्ती, ओक्ती स्त्री. एका लांब काठीस एका बाजूस जड दगड व दुसऱ्या बाजूस भांडे लावून विहिरीतून पाणी काढण्यासाठी केलेले साधन. (को.) [सं. उत्क्षिप्त]

उक्ते वि. १. उघडे; रिकामे. २.कापलेले. (गो.) [सं. उत्कृत्त]

उक्ते भाडे न. उक्ता खंड.

उक्ते माप ठोकळ, अंदाजी माप.

उक्थ, उक्थ्य न.१. ईश्वरस्तुतिपर सूक्त. यज्ञाच्या वेळी आहुती देताना जे मंत्र म्हणतात त्यांत परमेश्वराची स्तुती असते. ते ॐसहित म्हटले म्हणजे मननपर होतात.२. सोमयागाचा एक प्रकार; एक सोमसंस्था. [सं.]

उक्रंडा पहा : **उकिरडा** (व.)

उक्साबुक्शी, उक्शाबोक्शी पहा : **ओक्साबोक्सी**

उखई स्त्री. १. फजिती; उपहास; थट्टा; चेष्टा झालेली स्थिती. २. उघडकीस येणे; बाहेर येणे. [सं. उत्त+खिद्]

उखका पु. भावार्थ; कर्तव्यार्थ.

उखटणे सक्रि. ढलपे काढणे; उखडणे.(माण)[सं. उत्+कृत् = कापणे]

उखड स्त्री. हिसका : 'पठाणाने मला दिलेल्या उखडीमुळे मी जो उडालो...' –गुमा ६३.

उखडणे उक्रि. १. उखणणे; खणून काढणे; उस्कटणे; उखळणे; मुळासकट उपटून काढणे : 'नटाचा एक हातच उखडला.' – सासं १०५. २. जमिनीचे सारवण, लाकडाचे पॉलिश, वर्ख इ. निघून येणे, काढून टाकणे किंवा खराब करणे. ३. (ल.) काढून देणे; घालवून देणे; उच्चाटन करणे (कामावरून, जागेवरून). ४. रागावणे; एकदम संतापणे; भडकणे. [सं. उत् + खन्]

उखडंपट्टी स्त्री. १. उचलबांगडी; हकालपट्टी. २. ताशेरा; भोसडपट्टी; हजेरी; रागावून बोलणे; निर्भर्त्सना. (व.)

उखड्या पु. माशाची एक जात. याचे शरीर लहान व डोके मोठे असते. हा मासा नदी, ओढ्यात सापडतो. (जुन्नरी)

उखणणे सक्रि. पोपडे निघणे; खळगे पडणे: 'तिथल्या उखणून गेलेल्या खळग्याच्या जमिनीवर...'– डोह १९७.; (तक्तपोशी, गच्ची, इ.) खणून काढणे; उखळणे. [सं. उत् + खन्]

उखणी स्त्री.भाषा. तेथें नाही उखणी । एकला एकपणी ।'–ज्ञागा ५००.

उखता, उखते वि. सर्व. पहा : **उक्ता** : 'भक्तीची जोडी ते उखत्याचिसाठी । उणें पुरें तुटी तेथें नाहीं ।' –तुगा २०९८.

उखर वि. लागवड होत नाही अशी माळवट नापीक जमीन; रेताड, डोंगराळ जमीन; बरड : 'कृषीवल पेरणी करीं । भूमीपाडें पिकती घुमरी । अंकुरेना क्षितितळीं उखरीं । तें बीज निर्धारी अतिशुद्ध।' – एभा ११.१०३१. [सं. ऊषर]

उखर वि. फटकळ, कठोर : 'असतां आहाच उखर । अन्यथा होए आणिकांचे आंतर ।'–मूप्र २४५.

उखरड स्त्री. खडबडीत जागा :'पाळणां लेकरूं उखरडीं निजविलें ।' – स्मृस्थ ११२.

उखरडणे सक्रि. खरवडणे; घासून काढणे : 'सूतारु चुना उखरडीत असति ।'– लीच १.३९.

उखरडा पु. १. स्वार : 'मळ्यानिळाचे उखरडे । आसुडीति वैराग्याचीं दींडें ।'–उगी ४३६. २. शत्रूची बातमी आणणारा आघाडीचा सैनिक : 'उखरडां धागाईले : मंडळीक निगाले ।'– शिव ५०३.

उखरडे न. १. समुदाय; सैन्य : 'तें देखौनि पातलें उखरडें यादवांचें ।' – शिव ९६५. [सं. उत्कर]

उखरवळी पापुद्रा; ढलपा; पोपडा; खपली. पहा : **उकीर** [सं. उत्+कॄ]

उखरवाखर, उखरापाखर, उखरपाखर, उखरवखर वि. १. खालवर; खडबडीत; उंचसखल; खोल खड्डे असलेली (जमीन, पृष्ठभाग वगैरे). २. अस्ताव्यस्त ; न लावलेले; चिवडलेले (कागद, अन्न इ.).

उखरी स्त्री. १. पहा : **उखरवळी** २. निखाऱ्यावर भाजलेली पोळी.

उखरे न. लेणें; गुहा : 'वनें तपोवनें जें जें उखरें ।।' – भारा बाल ७.२५. [सं. उत् + कृ]

उखरेव स्त्री. गुंताडा :'परि आधीनु कां नांगवे । हेंचि कैसेनि जाणावें। गुणाचिये उखरेवे । माजि असता ।'–ज्ञा १४.३२५.

उखलणी पहा : **वखरणी** : 'सेताचें उखलणीस नांगर.' –मसाप २.६६.

उखलणे सक्रि. वर उचलणे. (खा.)

अक्रि. उठणे : 'जाधवरायास उखलू दिले नवतेच.' – पेद १.१.

उखलाड स्त्री. उचलणे आणि ठेवणे; हलवाहलव; काढघाल; हलवणे आणि ठेवणे; अस्ताव्यस्त करणे. (को.)

उखलाशी वि. हंगामी; कायम न टिकणारा; काढून टाकता येण्याजोगा. तात्पुरता. (कर.)

उखळ न. १. कांडण्या-सडण्यासाठी दगड खोदून अगर लाकडाचा ओंडका पोखरून केलेला खोलगट भाग : 'उखळांत घालून करी कांडण । आपुल्या करें मज देखतां ।' – मुरंशु ४१३. २. दारू उडविण्यासाठी टोकाला वाकडी असलेली धातूची नळी. (वा.) **उखळ काढणे –** दोषांचा पाढा वाचणे; मागील सर्व गुन्हे, चुका वगैरे उकरून काढून पुढे मांडणे; फटफजिती करणे. **उखळ पांढरे होणे –** वैभव प्राप्त होणे; नशीब उघडणे; अमाप द्रव्य मिळणे (गरिबाच्या घरी उखळाला काही काम नसते तेव्हा ते पांढरे असत नाही यावरून.) **(एखाद्याच्या) बेंबीचे उखळ होणें –** चमचमीत खाद्यपेये मिळाल्यामुळे दोंद सुटणे. (बेंबी उखळासारखी खोल होणे); शरीर पुष्ट होणे. **उखळामुसळाशी गाठ पडणे –** भांडणाऱ्या व झगडणाऱ्या माणसाचा सहवास घडणे. **उखळात घातला असता सतरा घाव चुकविणारा –** घालमेल, अफरातफर करणारा; कोणाच्या तावडीत न सापडणारा अर्थात द्वाड माणूस. **उखळात डोके घालणे –** जीव अतिशय धोक्यात घालणे; संकट, अनर्थ गुदरण्याच्या स्थितीत असणे, जाणे.

उखळ न. मुलींचा एक खेळ.

उखळ, उखळणी स्त्री. जमिनीची पहिली नांगरणी; फाळणी : 'उखळ, दूड नि तास अशा तीन नांगरटी झाल्याशिवाय...' तोरण १८. [सं. उत्खनन, उत्खलन]

उखळण स्त्री. १. फार वापरल्यामुळे खडबडीत झालेला जमिनीचा किंवा इतर कोणत्याही वस्तूचा पृष्ठभाग. २. पहिली नांगरणी : 'पावसाळ्यात आपण जी उखळण काढतो...' –आआशे २८७. [सं. उत्स्खलनी]

उखळणी स्त्री. (जमीन) उकरणे; उखळणे; खणून काढणे; मोडणे; तोडणे; तुकडे करणे : 'ही खननयष्टी शेतजमिनीच्या उखळणीसाठी वापरात असे.' – पुराको ३९.

उखळणे उक्रि. १. पहिल्याने शेत नांगरणे; (जमीन) फाळणे; उकरणे; खणणे : 'जमीन उखळून ठेवावी लागेल.'– शेलूक १११. २. उलगडणे; काढणे; मोडणे; निखळून टाकणे; (स्क्रू, खिळे, अडसर, पाय, हात, यंत्राचे भाग इ.) उपटून काढणे : 'तों रावणाचा उखळला हस्त । शस्त्र पडिलें धरणीवरि ।।' – मोउद्योग ११.११७. ३. (ल.) स्थान, नोकरी यावरून उच्चाटण करणे; निर्मूलन करणे; हाकलणे; ढळणे; नाहीसे करणे : 'उखळा धर्मासि म्हणसि तरि म्हणसिल बालिशा नभा उखळा ।' – मोभीष्म ७.४३. ४. (ल.) उधळणे; पराभव करणे. ५. फोडणे; फाडणे; सुटणे; विलग करणे : 'तयानें लाखोटा

उखळुनि असें जें उकलिलें ।' – सारुह ५.८३.
अक्रि. सैल होणे; तुकडे पडणे. (यंत्र वगैरेचा भाग) वेगळे होणे. [सं. उत् + स्खलन]

उखळधुणी स्त्री. उखळबेऱ्या किंवा शिवीगाळ करणे : 'माझा दाद्या तोही बोलला की तुझा दादला माझी उखळधुणी करतो.'– पेद १०९.

उखळबेर, उखळाबेर, उखळबेरी, उखळाबेरी स्त्री. १. पहिली व दुसरी नांगरणी; एकदा आडवे व एकदा उभे नांगरणे. २. उखाळ्यापाखाळ्या; उखळबेरीज : 'या उखळबेऱ्या काढीत बसण्यात काही अर्थ नाही.' – लोटिकेले १.४१५.

उखळबेरीज स्त्री. एखाद्याचे दुष्कृत्य उजेडात आणणे; एखाद्याचे दोषाविष्करण; टवाळकी करणे; टोमणे मारणे; उखाळी.(क्रि. काढणे.)

उखळाउखळ स्त्री. (एखाद्या यंत्राचे अवयव) विस्कटणे; उलगडून टाकणे; मोकळे करणे; काढघाल करणे; मोडतोड, तुकडे करणे.[उखळ्चे द्वि.]

उखळापाखळ पहा : **उखळबेरीज**

उखळी स्त्री. १. धान्य कांडावयाचे पात्र; डमरूच्या आकाराचे लाकडी, दगडी उखळ. २. भोवरा; आवर्त; गरगर फिरणारे पाणी. ३. उसाच्या चरकाच्या खुंटाचे आख ज्यात फिरतात ती पोकळी; (ओतकाम) चरकातील नराच्या डोक्यावरील खोबळा बसविण्याचे साधन. ४. दाराची कुसू फिरविण्यासाठी केलेली खोबण. (व.) ५. दारू गजाने ठोसून बार उडविण्यासाठी बनविलेला ठोकळा किंवा नळी.

उखळीतोफ स्त्री. मोठ्या कोनातून गोळे फेकणारी एक आखूड तोफ : 'बाजूला शत्रूनें उखळीतोफा व बंदुका सज्ज केलेल्या आहेत.' – माक्रांचि ३०७.

उखळीबार पु. धातूच्या नळीत ठेवलेल्या कोरड्या दारूवर लोखंडी सळई मारून केलेला बार : 'डुकरांना भीति दाखविण्याकरिता शेतातून उखळीबार होत होते.' – सराई.

उखळी व लाटसांधा खोबण व आत फिरणारी लाट, अशा तऱ्हेचा सांधा. उदा. खांद्याचे पोकळ हाड व त्यात दंडाचे हाड यांचा सांधा.

उखळी सांधा पु. (वै.) उखळामध्ये मुसळ ठेवल्याप्रमाणे रचना आणि आकार असलेला सांधा. हा सांध्याचा प्रकार खांद्याच्या व जांघेच्या सांध्यामध्ये आढळून येतो.

उखळ्या वि. (मधला टवका निघून उखळाप्रमाणे) खडबडीत झालेला, खाचा पडलेला (नाणे, पैसा, रुपया).

उखंडा वि. उघडा; अनाच्छादित. (व.)

उखा स्त्री. १.प्रात: काळ; पहाट; सकाळ; उष:काल : 'करीं साधुहृदय– राऊळीं । मंगळउखा ।।' – ज्ञा ५.१४२. २. उषा; बाणासुरकन्या : 'उखाहरण पुण्यपावना ऐकावें चित्त देऊन ।' – गाणे.[सं. उषस्]

उखाडपछाड स्त्री. पराकाष्ठेचे श्रम; अति कष्ट; मेहनत; उपद्व्याप; यातायात; दगदग.

उखाडे चारणे सक्रि. बडवणे; ठोकणे : 'पोतदारानें आपल्या मंडळींस त्यांना धरण्यास सांगितलें, दोघादोघांनी एकेकास धरून उखाडे चारलें.' – व्यामा १५.१.२३. [हिं.]

उखाणा पु. पहा : **आहणा** १. कोडे; कूटप्रश्न. उदा. परडीभर फुले तुझ्याने मोजवेनात माझ्याने मोजवेनात. उत्तर– तारे. २. गुप्त, गूढ अर्थाचे वचन. ३. बायकोचे किंवा नवऱ्याचे नाव घेताना योजण्याचा काव्यमय प्रकार; पद्यात्मक नाव घेणे : 'सोन्याच्या ताटात चांदीची वाटी, चंद्रभागा झुरते गणपतरावासाठी.' – असामी १४. ४. लग्नात वधूवरांकडील बायकांनी परस्परांना उपरोधाने गमतीदार यमकात्मक वाक्ये रचून म्हणण्याचा एक प्रकार; (सामा.) यमकयुक्त टोमणे मारणे. (वा.) **उखाणा घालणे** – कूट प्रश्न टाकणे; कोडे सांगणे. **उखाणा घेणे** – पतीचे नाव घेताना त्या नावाभोवती काव्यमय शब्दांची सजावट करणे. **उखाणा सांगणे** – उखाणा ओळखणे; जिंकणे.

उखाणा पोटरा, उखाण्या पोटऱ्यात येणे कणसाची पोटे फुगून कणसे बाहेर पडण्याच्या पूर्वीची स्थिती; कणसे येण्याची वेळ.

उखाणी वि. कूट; कल्पित.

उखार वि. उथळ; माळवट (जमीन). पहा : **उखर**; बिनपाण्याचे थापडवट (शेत); वरकस (जमीन).

उखार पु. कच्च्या, कोऱ्या रेशमाच्या अंगची खळ.

उखार काढणे (जरतारी धंदा) कच्च्या रेशमाचा कडकपणा (ते पापडखारात भिजवून) काढून टाकणे.

उखारणे अक्रि. खळ किंवा खार निघून जाणे; खरबरीतपणा नाहीसा होणे; स्वच्छ निघणे : 'नातरी सादनिये भीतरी । वस्त्र चूरिजे पायावरी । उखारेना तया बाहेरी । या हेतू ।।' – ज्ञाप्र ८४९.

उखारी स्त्री. १. उसाचा मळा. २. दुकान.

उखाळ न. ओकारी, वांतीचे औषध; काढा : 'ढाळ आणि उखाळ देती ।' –दास ३.७.३३. (कों.)[सं. उत्स्खलन]

उखाळी, उखाळीपावाखाळी, स्त्री. वर्म; वैगुण्य; दोष; व्यंग; कमीपणा बाहेर काढणे; वैगुण्य काढून केलेले भांडण. (क्रि. काढणे) : 'कडमड्याचे जोशी एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत.' – असामी १०. [उखळणेचे द्वि.]

उखि, उखी वि. मिथ्या; खोटा; वृथा : 'अरिसा आणि मुखीं । मी दिसें हें उखी ।।' –अमृ २.६५.
पु. स्त्री. मिथ्याभास : 'जो भवरुख जाणे । उखि ऐसा ।।' –ज्ञा १५.१४३.

उखित, उखिता वि. १. आगंतुक; उपरा; परका : अहो जीक एथ उखिता । वस्ती करुं वाटें जातां ।' – ज्ञा १३.३४.
२. उदासीन. : 'हेतू ठेवूनि परमार्था । देहीं वस्ती करूं जेवीं उखितां ।' – एभा ९.२५५. [सं. उषित]

उखिता, उखिते क्रिवि. (प्र.) उक्ता. १. एकंदर; सगळे; पूर्णपणे; अवघे; सर्व : 'तेणें मज आपुलें पोसणें केलें । कीं विकत घेतलें उखितेंचि ।' – एभा २३.७०८. २. उचित : 'दासीचा पाहुणेर उखीतें। धणी देईल आपुल्या हातें ।'– तुगा ७००. [सं. उक्त]

उखितिक्रिया स्त्री. उदासीनपणे (ब्रह्मार्पण बुद्धीने) केलेली क्रिया.

उखिरवाखिर, उखीरवाखीर पहा : **उखरवाखर**

उखिविखी स्त्री. चर्चा; वादविवाद; घडामोड; आस्था; तर्कवितर्क; वाटाघाट; ऊहापोह : 'नाग वायु राहोनि मस्तकीं । अनाहतध्वनीची करी उखिविखी । कूर्म वायु श्रोत्रीं राहोनि सम्यकीं । करी

शब्दाधिकरण।' – स्वादि ९.३.४३. [सं. ऊह् = चर्चा करणे]

उखी स्त्री. १. उठवणी; मरगळ; निर्जीवपणा. २. (ल.) हकालपट्टी; लोप; नाश; अनित्य : 'जेथ अहंकारा उखीं जाहली ।' – ज्ञा १३.५३१. [सं. उत् + खिद्] (वा.) **उखी होणे** – थकणे; मरगळणे. **उखी करणे** –निंदा करणे; बोजवारा उडविणे. (व.)

उखी वि. खोटे; मिथ्या. पहा : **उखि** : 'जैं भवरुखु हा जाणें । उखी ऐसी ।'– ज्ञा १५.१४२.

उखी स्त्री. भाषा; बोलणे : 'येणेहिं बोले जाणावी । अज्ञान उखी ।'– अमृ ४४२.

उखीर वि. बरड; नापीक. पहा : **उखर** : 'जिकडील अत्यंत सुपीक देश सरासरी इकडच्या उखीर जमिनीबरोबर ....आहे !'– निमा ५८६.

उखेकाळ पु. उषःकाल : 'की उखेकाळीं बाळार्क बिंब एकी कोडी । उगवली दीसती थोब' – रुस्व ९३४.

उखेड पु. (कुस्ती.) जोडीवाल्याच्या चड्डीत जांघाड्याजवळ किंवा मांडीवर धरून आपल्या दुसऱ्या हाताने जोडीदाराची मुंडी वर धरून आपल्या छातीच्या झोकाने जोडीदाराला वर उचलून खाली चीत पाडणे. (कुस्तीतला एक डाव.)

उखेडी स्त्री. कमीपणा : 'आपणेया उखेंडी न पडें । जीतु शिशुपाळु हातां चढें ।' – शिव ४८९. [सं. उत्+खिद्]

उखेडी क्रिवि. सहज; थोड्यावेळ्यात : 'मी उखेडीं जाए अळग । तरि मागां नहीं शृंगार वोगळा ।' –उगी १४०.
पु. श्रम (शिव ४०९ उखेंडी) [सं. उत्+खिद्]

उखेविखी स्त्री. ऊहापोह; चर्चा : 'हे बहु उखेविखी । रिखी केलीं नैमिषीं । ' –ज्ञा १३.६७.

उख्खड स्त्री. कुस्तीगिराने प्रतिस्पर्ध्यास वर अलगद उचलून खाली पाडणे.
वि. १. चटकन रागावणारा; कोपिष्ट. २. बेपर्वा; कोणाचा मुलाहिजा न ठेवणारा.

उख्त न. भाईपण.

उख्ता, उख्ते पहा : **उक्ता, उक्ते**

उख्तीपाख्ती स्त्री. सबंध खेड्यावर आकारलेली एकूण वसुलाची रक्कम. हा वसूल शेतकऱ्यांकडून मान्य करून घेऊन त्यांना काही वर्षांच्या मुदतीपुरती जमीन लागवडीस देण्यात येत असे : '... उख्तीपाख्ती लावून, उगवणींकरितां गावाची तुटी येऊं लागली.' – मदरु ३.३४.

उगऊन देणे सक्रि. स्पष्ट करून सांगणे : 'घ्यां, काय, मातें उगउन द्यावें ।' –सारुह ७.१७२. [सं. उद्गम्]

उगटिले वि. नीट उघडलेले; (साल जाऊन) स्वच्छ झालेले (धान्य इ.) : 'सुपीं तोचिं पाहें धड उगटिलें । नव्हता नासिलें जग झोडी ।' – तुगा २६१. [सं. उद् + घट्]

उगटिले वि. वाईट.

उगड, उगंड, उगंडा पु. उद्धार; विसावा; सुटका : 'जयाचेनि संगे जन्मशतें उगंडुचिं नव्हे गा ।' – रास ३.४६०; 'तदपि अझुणि तूझा होत नाहीं उगंडा ।'– सारुह ४.८४ [सं. उद्गम्]

उगडणे उक्रि. विसरणे.

उगडपे क्रिवि. प्रसिद्धपणे; उघडपणे : 'आपण क्रिस्तु तारकु म्हणऊन उगडपें सांगितलें.' – ख्रि २.३६ चा मथळा.

उगडास स्त्री. आठवण : 'तुवें काम सांगितल्याचो उगडास ना.'(= तुला काम सांगितल्याची आठवण नाही.) (गो.) [सं. उद् + ग्रह]

उगण स्त्री. उगवण; फुटणे; देवी, गोवर इ. बाहेर निघणे, पडणे.

उगणणे सक्रि. हिशेब देणे; झाडा देणे; अर्पण करणे :'तें उगणिलें मज कर्म ।' – ज्ञा ९.४००.

उगणे अक्रि. उगी राहणे : 'तेथें कांत नसे म्हणोनि उगली पावोनिया विस्मया ।' – विठ्ठलकृत २. (रसमंजरी ५४.)

उगणे अक्रि. उगवणे; उमलणें : 'दिनमणिकिरणस्पर्शित, पंकज उगतीं स्वयेंच हों जैशीं ।' – माअक १७२. [सं. उद्गम]

उगतभान्या पु. कानबाई देवीच्या रोटाचा एक प्रकार. (खा.)

उगम पु. १. एखादी गोष्ट सुरू होते ते ठिकाण; उत्पत्तिस्थान; जन्म; उत्पत्ती; बीज; मूळ. २.(शब्दशः व लक्षणेने) ब्रह्म; आदितत्त्व : 'येक बळाचे निवडलें । ते पोहतचि उगमास गेले ।' – मइसा ११.७.१०. ३. नदी निघते ते ठिकाण; झरा. [सं. उद्गम]
क्रिवि. उगा, शांत; स्तब्ध; स्वस्थ; हालचाल न करता : 'उद्‌वास दोन महिने उगमच ठेवाल आणि पुढे साहित्य कराल तरी परिणाम लागेल.' –पेद २६.७५.

उगमगणे, उगमणे अक्रि. उगम पावणे : 'तेजापासून आप आपापून वर पृथ्वी उगमगी ।' –पला ८.

उगमभाषा स्त्री. (भाषा.) १. मूळ भाषा; ज्यापासून इतर भाषा निर्माण होतात ती भाषा. उदा. इण्डोयुरोपियन या भाषेपासून युरोप व आशियात बोलल्या जाणाऱ्या अनेक भाषा निर्माण झाल्या. २. लक्ष्य भाषा शिकणाऱ्याची मूळ भाषा. द्विभाषिक कोशात शब्दाची नोंद ज्या भाषेतील असते ती लक्ष्य भाषा व तिचे स्पष्टीकरण ज्या भाषेत असते ती उगमभाषा.

उगमस्थान न. एखादी गोष्ट सुरू होण्याचे मूळ कारण, ठिकाण स्थान.

उगमक्षेत्र न. नदीचे पाणी डोंगरातून बाहेर पडून वाहते होते ते ठिकाण.

उगमा क्रिवि. उगा; स्वस्थपणाने; गुपचूप; शांतपणे; काही एक न बोलता : 'पुढें चाले मागे उगमा । नाथ जातसे सवें सवें ।' – नव ९.६९.

उगरण, उगरणी, उग्राणी स्त्री. उगवणी; पैसे वसुली; उधारी गोळा करणे. [सं. उद् + ग्रहण]

उगराबागरा वि. उग्र; क्रूर; रानटी; भयानक; अक्राळविक्राळ; खवळलेला; आवेशलेला; भयंकर. [सं. उग्रचे द्वि.]

उगरावणे, उगराविणे सक्रि. (विरू.) उगारणे (काठी, छडी) पुढे करणे, दाखवणे. पहा : **उगारणे** (राजा.)

उगरीने क्रिवि. जारीने; कडकपणे : 'अंमलबजावणीला अगदी उगरीने सुरुवात झाली.' – रूरा १९३.

उगर्मुणे अक्रि. फूल अर्धवट फुलणे, उमलणे, उघडणे, मिटणे. (गो.) [सं. उद्+गम्]

उगलणे सक्रि. बाहेर टाकणे; ओकणे : 'उधविचें तोंड । उगलीत धूमाचे उभड ।' – ज्ञा १६.२९२.

उगलमगल क्रिवि. अत्यंत उग्र : अलोटां देवां अति उग्रु : 'उगलमुगला।' मूप्र. २५८६.

उगला वि. क्रिवि. १. स्तब्ध; मुकाट्याने; उगीच; निमूट; गप्प; गुपचूप; निवांत; निमुटपणे; तटस्थपणे : 'आनंदें फुगला नसेचि उगला; गाधेय गर्जे सभे ।' – आसी ५५. २. व्यर्थ; विनाकारण; निरर्थक : 'जन्मुनी उगले कां मरती?' – आप ३८.

पु. नेट, निकड; तसदी; ससेमिरा; सूत्र : हे इकडे आले तरी तुमचा उगला तिकडे असावा म्हणजे सुजाउतदौला तुम्हासीं नीट बोलतील.' – मइसा. १.२००. [उद् + गॄ]

उगलेच क्रिवि. उगेच : 'माहीमचा मोर्चा उठलीयावर तुम्ही सिरगांवास उगलेच बसावें यैसे आमच्या मतें नाहीं.' – पेद ३४.१११

उगव पु. १. मूळ; आरंभ; उगम : 'वृथाचि झाला जीव । तयासी त्याचा उगव ।' विपू ७.१४३. २. उलगडा; निकाल; फडशा : 'मुख्य बिंब तो मी शिवू । विशद उगवू हा जाण ।' – एभा ११.१३८.[सं. उद्गमन]

उगवण स्त्री. १. पेरलेले धान्य रुजून वर येणे; अंकुरणे; उगण; जोराने (देवी, गोवर वगैरे) बाहेर निघणे; उफणणे; उतणे. २. ग्रहादिकांचा उदय; उगवणे. ३.नवरात्रात देवापुढे रुजत घातलेले धान्य. [सं. उद् + गम् ; उद्गमन.]

उगवण स्त्री. गुंतागुंत सोडवणे; उलगडा; फोड.

उगवण, उगवणी, उगवणूक स्त्री. १. दिलेले पैसे गोळा करणे; वसुली; उगराणी. २. वसूल; गोळा केलेले पैसे.[सं. उद् + ग्रहण]

उगवणे उक्रि. १.ग्रह, नक्षत्रे, वगैरे क्षितिजावर येणे; उदय होणे. २. बीजापासून रोप वर येणे; अंकुर फुटणे; प्रादुर्भूत होणे. ३. गोवर, देवी वगैरे दिसू लागणे; उफणणे; उतणे. ४. नजरेस येणे; प्रकाशणे (बुद्धी, सद्गुण); कला, विद्या, व्यवहार इत्यादीमध्ये निष्णात होणे. ५. उमटणे; दृष्टीस पडणे. ६.प्रकट होणे; उत्पन्न होणे : 'नाना सर्पे उगवले काळ कर्कोट चालिलें ।' –दावि ५०१. (उप.) वाट पहायला लावणारास, उशीरा येणारास म्हणतात. जसे – उगवलात शेवटी. पहा : **उगविणे** [सं. उदगमन]

उगवणे उक्रि. १. उलगडणे; सुटणे; फोड होणे; (गुंतावळ, गुंतलेला दोरा) उकलणे; समजाविणे; ओळखणे : 'एकाच्या कैवाडें उगवे बहुतांचें कोडें ।' –तुगा २७४. २. अडचणीतून मोकळे करणे; संकटातून सोडविणे : 'वाचे मंत्रजप कां अध्ययन करणें । अथवा गुंतलियासी शब्दें उगवणें ।'– स्वादि ४.३.९५. ३. (ल.) हिशेबात जमेच्या व खर्चाच्या रकमांची बरोबरी होणे; तोंडमिळवणी होणे.

उगवणे उक्रि. उपयोग करून घेणे :'कित्तेक खलक उगवावें । राजकारणामध्ये ।' – दास १९.९.१८.

उगवणे सक्रि. गंध उगाळणे : 'केशर कस्तुरी चंदन उगवा ।' – पला १०७.

उगवणे अक्रि. स्तब्ध होणे. 'परी बोलोनि पार्थ उगवला तेथें ।'– गीताचंद्रिका ९.

उगवणे अक्रि. स्पष्ट होणे; स्पष्ट उल्लेख असणे; प्रकट होणे : 'याउपर जैसी मर्जी आसल तैसी आज्ञा उगऊन आल्यास आज्ञेप्रमाणे होईल म्हणोन विनंती लिहिली होती...' –पेद ३९.७३. [सं. उद्+गम]

उगवणे अक्रि. १. (केस) विंचरणे; सोडवणे; मोकळे करणे : 'कव्हणिं मनुष्य उगवीं तेव्हळी (केस उगवति)' – लीच १.५. २. राग काढणे; रागावणे; शिवीगाळ करणे, मारणे, कुदलणे. ३. डोंगर चढणे.

उगवणे अक्रि. सुटणे; मोकळे होणे : 'ते (केस) वारेनि उगवति' – लीच १.५.

उगवणे सक्रि. करून घेणे, मिळवणे : 'राजेश्री पंत मशारनिलेकडे पाठवितील तेणेप्रमाणे सनदपत्र उगवणे ते राजश्री शंकराजीपंत उगऊन देतील.' – शिचसाखं ५.१०१.

उगवणे उक्रि. १. आदा होणे; वसूल होणे; वसूल करणे : 'मासअखेर रक्कम जवाहीरखान्यातून उगवून घ्यावी ।' – गोप्रदाननियम (बडोदे) ४. २. वसूल करणे : 'कर्ज उगवण्यासाठी सावकाराला ती (मिरास जमीन) विक्रीस काढता येत नाही.' – गांगा ८.

उगवत, उगवती स्त्री. पूर्व दिशा; प्राची; पूर्व: 'उगवत लाल झाली होती.' – रथ २५७; 'त्याच्या आणि उगवतीच्या डोंगराच्या दरम्यान...' – डाली ३.

क्रिवि. पूर्वेकडे.

उगवतामावळता पु. (उगवणारा आणि मावळणारा) सूर्य.

क्रिवि. सकाळपासून संध्याकाळपर्यंत; दिवसभर.

उगवला क्रिवि. उगला; उगी; स्तब्ध : 'मग देव म्हणे राहा उगवले । या बाळें प्राण वांचविले ।' – जै ८२.७९.

उगवा, उगवील स्त्री. १. दिलेले पैसे गोळा करणे; उगराणी. २. वसूल केलेले पैसे; वसूल.

उगवान स्त्री.(नाविक.) पूर्वदिशा; उगवत.

उगविणे सक्रि. १. गुंत्यातून मोकळे करणे; स्पष्ट करणे; फोड करणे. 'सांगितलें संतीं तुम्हां उगवुनी । गर्भासी येऊनी यमदंडा ।'–तुगा १५. २. उल्लेखून दाखवणे. ३. संकट निवारणे : 'उगवावया हंसगीत । सुनिश्चित सांगितलें ।' –एभा १६.४२. ४. केस विंचरणे; गुंता काढणे. (गो.) [सं. उद् + गम्]

उगविणे सक्रि. (सूड) घेणे. (को. गो.)

उगविणे सक्रि. वसूल करणे.

उगविणे अक्रि. (ल.) चढून वर येणे. [सं. उद् + गम्]

उगवितपागवीत क्रिवि. थोड्या थोड्या प्रमाणात; बेताबेताने; सोईसोईने, थोडेथोडे (दिलेले पैसे हप्त्याने गोळा करणे.).

उगवी स्त्री. उगी करणे; समजूत : 'येक सांगतां एकचि भावी । उगीच करी गथागोवी । तया वेड्याची उगवी । कोणें करावी ।' – दास ९.६.२९.

उगवील पहा : **उगवणी**

उगळ पु. पुरळ; उगवण. [सं. उद् + गॄ]

उगळ स्त्री. १. तोंडातून टाकलेला पदार्थ; वमन; ओक. (क्रि. टाकणे): 'म्हणतां यमासि गिळिल्या उगळ प्रभु तो कपीश्वर करी सुगळ ।' – मोवरदरामायण ३२. २. रवंथ करण्याकरिता गुरे पुन्हा बाहेर काढतात तो चारा; पायाखाली मळलेला, खराब झालेला चारा, वैरण. ३. उसाच्या अथवा धांड्याच्या गंडेऱ्यातील रस चोखून घेतल्यानंतर शिल्लक राहिलेला (तोंडातील थुंकून टाकला जाणारा) चोथा, चोयटी. (व.) [सं. उद् + गॄ; का, उगि]

उगळ वि. मोठा; ढगळ. (कर.) [सं. उद् + गल्]

उगळणे सक्रि. १. शिस्तीत, ताब्यात ठेवणे. २. शिस्तीने मऊ करणे, नम्र करणे; ताळ्यावर आणणे. ३. चांगल्या रीतीने प्रवृत्त होणे; सचोटीच्या मार्गावर येणे; सुधारणे; ताळ्यावर येणे; मार्गावर येणे; वाईट नाद सुटणे : 'उगळला तर परमेश्वर खटला तर शनैश्वर.' ४. मूळची शक्ती परत येणे (नवीन बडविलेल्या बैलाच्या वृषणाच्या शिरा पुरतेपणी न मळल्या गेल्यामुळे); पूर्वावस्था प्राप्त होणे. ५. अनुकूल होणे; वश होणे; दया येणे : 'बहु दासी दासशतें देताहि न विप्र तो वचे नुगळे ।' -मोकर्ण २९.२९. [सं. उद्+गल्]

उगळणे उक्रि. १. उगाळणे; घोटणे. २. (ल.) झिजणे : 'ते मार्गी देह जरी उगळे ।' - पला २४. ३. चारा पायाखाली तुडवणे (जनावराने); (घासण्याने, उगाळण्याने) नरम होणे; फुटून जाणे. ४. चुरा होणे. [सं. उद् + गल्]

उगळणे उक्रि. १. थुंकणे; ओकणे; बाहेर टाकणे; ओकून टाकणे : 'कीं मी तोंड करून कानवडे । उगळौनि घाली ।।'- ज्ञाप्र ९६४. २. टाकणे; त्यागणे; सोडणे : 'उगळिसील अरुणानुजा । तरीच देह परतेल माझा ।' - मुआदि ५.८५. ३. (ल.) चोरलेली, दाबलेली, अपहार केलेली, मालमत्ता परत करणे. ४. गुप्त गोष्ट फोडणे; प्रकट करणे : 'दोन्ही विशेष गिळी । ना निर्विशेषातें उगळीं ।।'- अमृ ७. १८३. ५. रवंथ करणे; चर्वण करणे. [सं. उद् + गृ]

उगळणे अक्रि. रडू कोसळणे; द्रवणे. [सं. उद्+ गल्]

उगळणे अक्रि. १. पीळ निघून पदर सुटणे; उलगडणे (दोर, वेणी इ.) २. शिवणीतून कापड सुटणे, उसवणे. ३. उडवणे; उधळणे.[सं. उद् + गल्]

उगळलेला गडी ब्रह्मचर्यव्रतापासून ढळलेला मनुष्य. (माण.)

उगळवणी न. पाझरून निघालेले पाणी : ' चांदिणे याच्या पाण्हावनी । चंद्रकांत दुभती अदुभणी । तैसे भूमी निगे उगळवणी । तें आणिती सखियां ।।'- रुस्व ५६९. [सं. उद्+गल्]

उगळसैल वि. मोठा; सैल (अंगरखा).

उगळा पु. १. त्रास; चुराडा; नाश; नासधूस : 'गनिमी तऱ्हेनें उगळा लावावा ।'- मइसा १.३६५७. २. नेट; निकड; ससेमिरा; सूत्र.

उगळा पहा **: उगला**

उगळीक स्त्री. गौप्यस्फोट; चवचव; बभ्रा; बोभाटा.

उगंडणे अक्रि. सुटणे; मुक्त होणे : 'ऐसा आडकलों त्रिशुद्धी । जनार्दनू उगंडू नेदी ।'- एभा ९.४५६.

उगंत स्त्री. उत्पत्ती. [सं. उद्गम]

उगा क्रिवि. १. न बोलता, हालता, काम करता; स्वस्थ; शांत; गप्प; उगीच; मुकाट्याने : 'आतां नाइकें न पाहें । म्हणोनि मी उगा राहे ।' -एभा ९.४५५. २. खटपट न करता; विना धंदा किंवा उद्योग. ३. अकारण; अनिमित्त; निष्कारण; जरुरी नसता : 'उगा लोळसा घोळ मोठा करीतो.' - राक ३६. ४. व्यर्थ; निरर्थक; बेकायदा : 'उगा भ्रमसि वाउगा कशाला युगांत खळ हा कली.'- राला १०६.

उगी पहा : **उगला** [ह. का. उगि=भिणे, उके = गप्प.]

उगा पु. समजूत; समाधान : 'तिसा लाखांचे माल जयेद आहेत ते आम्हांस सनद करून द्या. येथे तनखादारांचा उगा करून.'- हिंदखं १.७२.

उगाई पहा : **उगराणी** : 'जीवराव व्यंकटेश व सरकारी घेणें असलेमुळें त्या दुकानची उगाई सक्तीनें वसूल होईल.'- विक्षिप्त ३.९३.

उगाउगी क्रिवि. निष्कारण : 'गरिबावर उगाउगी बला आली.'- हात ३.

उगाच, उगीचचे उगीच, उगीचे उगीच क्रिवि. १. निष्कारण; जरूर नसता; विनाकारण; व्यर्थ; निरर्थक : 'सत्य धनंजय कर्मे रूपें दिसतो उगाचि वरि नरसा ।' - मोभीष्म ११.७२. २. निमूटपणे : 'घेणार तो न समजोनि उगाच घेतो ।' - नल ८७.

उगाण पु. स्पष्टीकरण; अनुभव; खुलासा; उलगडा. [सं. उद्गमन]

उगाणणे सक्रि. फोड करून सांगणे; स्पष्ट करणे; उपदेश करणे : 'शास्त्रसिद्धांतु आघवा उगाणिला ।'- ज्ञा१६.४१. [सं. उद्गमन]

उगाणणे सक्रि. १. हिशेब देणे; झाडा देणे : 'परी परमात्मया चक्रवर्ती उगाणिती जंव हातीं ।'-ज्ञा १८.७४३. २. अर्पण करणे; आणून देणे; हवाली करणे : 'ती गोपवत्सें उगाणलीं । गोपनाथासीं ।' - कथा ४.३.२६५. ३. मुक्त करणे; सोडविणे (पाप इत्यादिकांपासून) : 'उगाणिलीं जन्ममरणें' [सं. उद्+ ग्रहण]

उगाणणे सक्रि. उपटून नेणे; लुटणे; अर्पण करणे; लांबविणे; नागविणे; प्रकट होणे : 'सभेसि राजा उगाणवी । तै मृत्यूची पदवी मस्तका आली ।'- एभा १. २११. [सं. उद्+ ग्रहण]

उगाणणे अक्रि. शून्य होणे; नाहीसा होणे; नष्ट होणे : 'तेथ उगाणले क्रियाकर्म । लाजा विराले धर्माधर्म ।' - एभा २३.७००. [सं. उद् + ग्रहण]

उगाणवा पु. लूट; नागवण. [सं. उद्ग्रहण]

उगाणा, उगाना पु. १. दातव्य; बयाणा; विसार : 'आचाराचा उगाणा जी कवणासि दिधला ।' -उगी १०९. २. गणना; झाडा; परीक्षा; हिशोब : 'तेथे फलहेतूचा उगाणा ।' - ज्ञा ७.१२९. ३. मुक्तता; सोडवणूक : 'तुवावीण योगिया उगानावेढा कवण करील ।' - उगी १०५. ४. कर्जाऊ रकमेची फेड; तोंडमिळवणी : 'बहिणी म्हणे मना हेतूंचा उगाणा । करूनि निर्वाण पहातसे ।'- बगाथा १२९. ५. समृद्धी (या काम)(वा.) **उगाणा काढणे** (बायकी) धान्य कांडताना अगर कुटताना उखळात खाली राहिलेला जिन्नस वरचेवर खालचा वर व वरचा खाली करणे. [सं. उद्+ ग्रहण]

उगाणा, उगाना पु. चव; रुची; अनुभव : 'रसवृत्तीसी उगाणे । घेऊनि जिव्हाग्र शहाणें ।' - अमृ ६.९०. [सं. उद्+ ग्रहण]

उगाणा पु. नाश; निराकरण; नागवण : 'कोप येतांच जाणा । करी उगाणा तपाचा ।'- एभा ४.७८. [सं. उद्+ ग्रहण]

उगाणा पु. उपदेशपर भाषण; उलगडा; स्पष्टीकरण : 'नाना प्रमेयांचे उगाणे । काय श्रवणाचेनि आंगणें । बोलों लाहाती ।।'-ज्ञा ७.१९८.

उगाणा पु. परिवार : 'रिधीसिधीचा उगाणा : सवें चाले' - साप्र ८३७.

उगाणा पु. कारकून; हिशेबनीस; उग्राणी करणारा : 'सरिसा उगाणा कोठी, चाटे बडुवे तैसे निगाले ।'- ऋ १३२. [सं. उद्ग्रहण]

उगाणा पु. सामान : '(सहकुटुंबी नीगाला) सवें उगाणयाचा बैलु'- गोप्र ९६.

उगाणी स्त्री. ओवाळून टाकलेली वस्तू : 'देह उगाणी केली ।' -ज्ञागा ३०५.

उगानिगा स्त्री. निरवानिरव.

उगामुगा क्रिवि. स्वस्थ; बोलल्यावाचून; हालचाल केल्यावाचून; गुपचूप; न

बोलता : 'बोंबलू नोको कमिनावानाच्या ! चाल उगामुगा ।'– धग ८.
उगारणी, उग्राणी पहा : **उगराणी**
उगारणे उक्रि. १. एखाद्यास मारण्याकरिता शस्त्र, काठी, हात वगैरे उचलणे; मारण्याचे भय दाखविणे; धमकावणे. २. पैसे वसूल करणे. ३. फेकणे; झोकणे; मारणे. ४. चाल करून जाणे : 'त्या पौरवासि सोडून सौभद्र जयद्रथावरि उगारे ।' – मोद्रोण १.८५. [सं. उद्+ ग्रहण]
उगालदान, उगाळदान तस्त किंवा पिकदाणी.
उगालदान बार्दार पु. तस्त किंवा पिकदाणी धरणारा नोकर; कलाचीधारक.
उगावगा पु. उगवणी; वसूल : 'तरी गोपाळ संभाजी यासी तुम्ही लिहून तेथील उगावगा जेथवर होईल तेथवर करून घेणे म्हणोन स्वामीजी आज्ञा जाली.'– ऐलेपाम्युप्र १६६.
उगावगा गयावया : 'रयत उगावगा करून पळावयास सिद्ध राहिली.'– पेद.
उगावा, उगावो पु. १. पूर्तता; समाप्ती (कामाची) होणे, पडणे. २. वसूल (योग्यादेण्याचा). पहा : **उगवणी**
उगावागा पु. १. स्पष्टीकरण; सोडवणूक; निकाल; तंटा सोडवणे; मोकळीक; तड. २. वसूल : 'एक म्हणती व्यवहारिलें धन । त्याचा उगावागा करून येईन ।'– मक ३१.५४.
उगाळ पु. १. तोंडातून टाकलेला पदार्थ; वमन; थुंकी; पिंक : 'हडप मी वोळगेन । मीचि उगाळु घेईन ।' – ज्ञा १३.४२०. २. (ल.) सरभेसळ; काला; चिवडा; खिचडी (कागद, पैसे, कपडे वगैरेंची). ३. अव्यवस्थित स्थिती; पसारा. ४. (अलंकारिक) जाळे. [का. उगुळु][सं. उद्+ गॄ]
उगाळ स्त्री. खडी; दगडाचे बारीक तुकडे (रस्ता करण्याकरिता, गच्ची करण्याकरिता, घराच्या पायात भरण्याकरिता).
उगाळणे सक्रि. १. (चंदन वगैरे) घोटणे; घासणे; बारीक पूड करणे; वाटणे : 'परम सुवास जो मनशीळ । तो स्वकरें उगाळोनि तात्काळ । निढळीं टिळक रेखिला ।' २.(ल.) देह झिजवणे (सेवेत, नोकरीत); कष्ट सोसणे. ३. फिरून फिरून करणे (ठराव वगैरे); पुनरुच्चार करणे; तेच तेच करीत, घोकत राहणे. ४. बिंबविणे; भरविणे; मनावर ठसवणे. ५. परत परत तेच बोलणे; एकाच गोष्टीचा सारखा विचार करीत राहणे : 'आत्तापर्यंत मी तुला वेडं वाकडं बोलल्यें तेच जन्मभर उगाळीत बसू नकोस.' – रथ १५१. [सं. उद्+ गल्]
उगाळणे सक्रि. शिक्षेत धरणे; शिस्तीत, शिकवणीत ठेवणे; काचात ठेवणे. [सं. उद्+गल्]
उगाळणे अक्रि. वांती होणे; ओकणे; थुंकणे : 'तो पुन्हां उगाळी सावकाश । जैसा होता तैसाचि ।' –शनि ३६२. [सं. उद्गीरण]
उगाळदान न. पिकदाणी. [फा.]
उगाळा, उगाळू पु. थुंकी; पिंक; चावून टाकलेला विडा : 'तांबुळांचे उगाळु पडिलें । मलपावरी ।'– शिव ७१७; 'उगाळा हातीं झेली ।'– गीता २.२१६२. [सं. उद्गीरण]
उगाळा पु. घोटलेला, वाटलेला, उगाळलेला पदार्थ किंवा त्याचे कण : 'तो उगाळा सरूकडून चोळवला.'– पधौ १३४.
उगाळी स्त्री. फोडलेली खडी.
उगिया वि. व्यर्थ; रिकामा; फुकटचा; उगा. पहा : **उगीच**
उगिली वि. निरपेक्ष 'उगिली निष्ठा धरितां बरी ।'– ज्ञागा १५५.
उगी क्रिवि. शांत; गुपचूप; उगला. पहा **: उगा** : 'वयनीसाहेब, असें उगी बसून आम्ही सोडणार नाहीं.'–रत्नकांता ५.४. (गाणे) : 'उगीउगी, चोळी शिवीन मुगी, लुगडं घेईन लाल, सासुऱ्या जाल.' (रडत असलेल्या मुलीस थट्टेने म्हणतात). (वा.) **उगी करणे, उगी होणे –** रडायचे थांबविणे; शांत करणे; गप्प करणे; होणे : 'काय झालें सुशिलेला ? असें म्हणून तिला त्यांनी युक्तीनें क्षणार्धांत उगी केलें.' –सुदे ७. **उगी राहणे–** शांत होणे : 'उगी राहें आतां बहुत वदता ओष्ठ सुकले ।'– सारुह ७.९९. **उगी बसणे** – काही न बोलणे, गप्प राहणे. [का. उके = गप्प]
उगीच क्रिवि. १. गुपचूप; गप्प; मुकाट्याने : 'गुरुजींनी याप्रमाणे सांगितल्यावर चंद्र उगीच बसला.' – कालकूट १६. २. विनाकारण; प्रयोजनाशिवाय; व्यर्थ.
उगीदुगी स्त्री. पहा : **आगीदगी** (वा.) **उगीदुगीला येणे–** चिरडीला येणे. (कर.) **उगीदुगी करणे–** १. (बायकी) दुसऱ्याच्या बोलण्यात मध्ये तोंड घालणे; रिकाम्या गप्पा मारणे; बाता मारणे. २. चहाडी, चुगली करणे.
उगीर वि.१. उद्धट; रागीट; उग्र; गर्विष्ठ; मग्रूर; दिमाखाचा. पहा : **उगरा–बागरा**. २. उग्र वासाचा; दु:सह; कडक. [सं. उग्र]
उगुमुगू क्रिवि. गुपचूप रीतीने; न बोलताच; निमुटपणे : 'इंद्रेया आपुली उडी : उगुमुगु कां सारानां.'– लीच ४.४३.
उगुला वि. शांत; गुपचूप : 'तरि सहजें मन कोंडलें । हृदयींचि असेल उगलें ।'– ज्ञा ८.११३.
उगूम पु. उत्पत्ती; बीज; मूळ; उद्भवस्थान. [सं. उद्गम]
उगे, उगेच क्रिवि. १. निमूटपणे; मुकाटपणाने; गप्प : 'फुन तुमचेनि रागें । जरी असोचि उगें । तरी आमुचें पोटु फुगें । न बोलतां ।'– शिव १२८. २. व्यर्थ; विनाकारण : 'उगेचिं खावें उगेचि असावें ।'– दास २.६.२७.
उगेपण न. स्तब्धता : 'म्हणौनि करूं लाहे खंती । उगेपणाची ।' – ज्ञा १८.८०.
उगेयां क्रिवि. काहीं न बोलता. 'गोसावीं उगयांचि आइकिलें ।' – लीचउ २२६; 'उगेयाचि माथा ठेविजे चरणीं । हेचि भलें ।' – ज्ञा १०.१५.
उगेले क्रिवि. १. निवांत; शांतपणे; आवाज, गडबड न करता. २. आपोआप; सहज; अनायासे : 'जैसें उंचीं उदक पडिलें । ते तळवटवरी ये उगेलें ।' – ज्ञा ९.२२४.
उग्र पु. १. शिव; रुद्र : 'अतिदु:सह उग्राचें तेज सकल दु:सहीहि मदनीं कीं ।' – मोभीष्म ३.२. २. मिश्र जात; मिश्र जातीतील व्यक्ती; क्षत्रिय बाप व शूद्र आईपासून झालेली प्रजा; संकर जात.
वि. १. भयानक; भीतीदायक (मनुष्य, वस्तू, स्थिती); अक्राळविक्राळ (चेहरा); भेसूर; भयंकर; कर्कश; कठोर (आवाज, बोलणे); घोर; राक्षसी; क्रूर; अतिदुष्ट (कृत्य); तामसी; रागीट (स्वभाव).

२. प्रखर : 'उग्र सोडिले बाण ।'- मोकर्ण ८.२५. ३. उग्रट; तीव्र; अतिशय दु:सह (वास); डोक्यात भरून त्रास होतो असा (वास). [सं. उग्र]

उग्रगंध वि. ज्याचा वास उग्रट आहे असे.

उग्रट वि. तीव्र. त्रास होईल असा (वास).

उग्रटाण-न, उग्रष्ठाण स्त्री. दुर्गंधी; दु:सह वास; घाण.

उग्रदंड पु. कडक शिक्षा. [सं.]

उग्रम पु. आरंभ; सुरुवात; उत्पत्ती; बीज [सं. उद्‌गम]

उग्रम पु. जोर; उठाव; झपाटा; वेग; तडाखा; (रोग, पाऊस, वारे वगैरे संबंधाचा); आवेश. [सं. उग्र]

उग्रमणे अक्रि. दिसू लागणे; प्रादुर्भुत होणे; सुचणे; मनात येणे. [सं. उद्+ गम्]

उग्रवासा वि. भयंकर; क्रूर; तापट.

उग्रस पहा : **उग्रट**

उग्रा स्त्री. (संगीत.) एकविसाव्या श्रुतीचे नाव. [सं.]

उग्राणी पु. खेडेगावातील एक विशिष्ट सरकारी नोकर; पाटील. [का . उग्राण= सरकारी कोठार]

उग्रादित्य न. सूर्याचे देऊळ; सूर्यप्रतिमा : 'उग्रादित्यी अवस्थान.'- श्रीकृच.

उग्रासणी पहा : **उगराणी**

उग्रासन न. योगाशास्त्रातील एक आसन; पश्चिमोत्तानासना-प्रमाणे डोके ढोपरावर न टेकता ढोपरात भरून शक्य तितके जमिनीजवळ लावणे, अशा प्रकारचे आसन. [सं.]

उघ पु. ओघ, प्रवाह.

उघटणे उक्रि. प्रत्यक्ष मांडले जाणे; उघड्यावर येणे. पहा : **उघडणे** : 'इयां पाटणीं जें केणें उघटें ।'- प्रामकोले. [सं. उद्+ घट्]

उघटा वि.पहा : **उघडा.** उक्तास माल घेऊन किरकोळीने विकणारा : 'भवर परिमळाचे उघटे ।'-रुस्व ८३९. (गो.)

उघड वि. १. स्पष्ट; व्यक्त; उकलेला : 'मनीं आहे तें उघड । बोल पां सुखें ।' - ज्ञा ११.४४२. २. स्वच्छ; ढळढळीत; जाहीर; प्रकट; सार्वजनिक; महशूर; गुप्तवेषरहित. ३. दुलौकिक झालेले.

स्त्री. १. निरभ्र आकाश; हवा स्वच्छ असणे; उघाडी; उघडीक; पाऊस थांबणे.

क्रिवि. प्रसिद्धपणाने; जाहीर रीतीने (फिरणे, सांगणे, बोलणे.) [सं. उद्+घट्]

उघड स्त्री. फूट; बेबनाव : 'कसेंही झालें तरी उघड पडली नाही...'- ऐलेसं ३००८.

उघडउघड वि. स्पष्टपणे दिसणारा.

उघडगांड, उघडगांड्या वि. नेहमी शेपटी हालविणारा; घोड्याचे एक अशुभ लक्षण.

उघड जमाबंदी स्त्री. कायमधाऱ्याची पद्धती.

उघडझाक, उघडझाप स्त्री. वारंवार उघडणे- झाकणे (दार, पेटी, डोळे, पंख वगैरे); उघडण्या-झाकण्याची क्रिया; आकाशात ढग येणे- नाहीसे होणे; काढणे, घालणे (पडदा वगैरे).

उघडणे उक्रि.१. आच्छादन काढणे; खुले, मोकळे करणे (पेटी, दार); उकलणे. २. उघडकीला आणणे; गुप्त गोष्ट फोडणे; प्रगट करणे; प्रसिद्ध करणे : 'ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ।।'- ज्ञा ६.१८.

अक्रि. १. मोकळे-खुले होणे. २. (पाऊस) थांबणे; ढग नाहीसे होणे; आकाश निरभ्र होणे; (हवा, पाऊस) स्वच्छ होणे. ३. उत्कर्ष होणे; उदयाला येणे (दैव); ऊर्जितदशा येणे. [सं. उद्‌घाटन]

उघडदोरा पु. बटवा, कसा इ. उघडण्यासाठी व बंद करण्यासाठी दोन्ही बाजूंना लावलेल्या दोऱ्यांपैकी प्रत्येक; ओढदोरा.

उघडपणा पु. मोकळेपणा; काही लपवून न ठेवण्याची वृत्ती : 'दादाच्या स्वभावाचा तो मूळचा उघडपणा....' - पलको २१२.

उघडभावई स्त्री. १. उघडपणा; काही प्रतिबंध, आडोसा नाही अशी स्थिती. (व.) २. (ल.) स्वैर स्त्री; वेश्या; निर्लज्ज स्त्री.

उघडमराठी पहा : **उघडीमराठी**

उघडमाथा क्रिवि. १. उघडपणे; प्रसिद्धपणे; उघडउघड; नि:शंकपणे; राजरोस. २.(उप.) निर्लज्जपणे (फसविणे, उघडकीला आणणे इत्यादी.).

उघडमाथ्याने क्रिवि. न कचरता; न लाजता; धीटपणाने; प्रकटपणे.

उघडमीट स्त्री. पुन:पुन्हा उघडणे, मिटणे (डोळे, ओठ, फुले इ.) पहा : **उघडझाक**

उघडवाघड क्रिवि. उघडपणे; प्रसिद्धपणे; स्पष्टपणे. [उघडचे द्वि.]

उघडवासरा पु. उघडी, मोकळी जागा; निष्प्रतिबंध जागा किंवा स्थिती.

उघडवासऱ्यात क्रिवि. उघड्या-मोकळ्या जागेत (मैदानात, पटांगणात); चवाठ्यावर; खुल्या हवेत; हमरस्त्यावर.

उघडा वि. १. मोकळा; खुला; न झाकलेला; अनाच्छादित. २. स्पष्ट; प्रगट; व्यक्त; विशद; आविर्भूत; स्वत:सिद्ध; ढळढळीत;गूढ, गुप्त नव्हे असा. ३. लोकविख्यात; प्रसिद्ध; महशूर; जगजाहीर; सर्व लोकांना माहीत असणारा. ४. ज्याला सांभाळ करणारा कोणी नाही असा (पोर, राज्य इ.); अरक्षित; निराश्रित (स्थळ, प्रदेश, माणूस). (क्रि पडणे.). ५. मोकळी; स्वच्छ (हवा.) ६. अंगात कपडा न घातलेला; नग्न (कमरेच्या वर); पोशाख नसलेला; फक्त धोतर नेसलेला; केवळ मध्यवेष्टित. ७. सबंध नग्न; नागवा; अगदी वस्त्रहीन : 'बा ! ढळतां तिळहि पदर भावी व्यजनासि सांग रामाजी । ती खळसभेंत उघडी पडत्ये न पडोनि सागरामाजीं ।' - मोसभा ५.७७. ८. अनाच्छादित; बोडका; बुच्चा; ओका. ९. निर्भीड; स्वैर; दाही दिशा मोकळ्या असलेला. (वा.) **उघडा करणे-** १. निराश्रित करणे. २. पहा : **उघडा पाडणे. उघडा पडणे-** निराश्रित, अनाथ होणे : 'अर्थातच हरणाबाई आपल्या दोन मुलींसह उघडी पडली.'- स्वप ६५. **उघडा पाडणे, उघड्यावर आणणे-** निंदेस, उपहासास पात्र करणे, एखाद्याला चव्हाट्यावर आणणे; गुप्त गोष्ट फोडणे; जाहीर करणे; बोभाटा करणे. **उघड्या डोळ्यांनी -** जाणूनबुजून; कळूनसवरून; मुकाट्याने; प्रतिकार न करता.

उघडाउघडी क्रिवि.उघडउघड; स्पष्टपणे : 'तिला अतोनात वाईट वाटले हे उघडाउघडी दिसत होतें.' - मी ४०२.

उघडानागडा, उघडाधोत, उघडाबंब, उघडाबागडा, उघडाबापडा, उघडाबागड, उघडाबाघड, उघडासोट वि. १. विवस्त्र; वस्त्रहीन; नग्न; अंगावर मुळीच काही नसलेला. २. आडोसा नसलेली (जागा). ३. आच्छादनरहित; न झाकलेला (पदार्थ, अन्न).

उघडा बाळसंतोष सडा; फटिंग.

उघडाबोडका वि. १. अंगात व डोक्याला काही न घातलेला. २. निराश्रित; निराधार. ३. कुटुंब, काळजी, धंदा नसलेला, घरदार नसलेला; ना घर ना दार असा.

उघडा माथा १. धाक, लाज नाही असा मनुष्य; नि:शंक, निर्भय, निर्भीड माणूस (चांगल्या व वाईट अर्थी). २. (ल.) दोषविमोचन, निरसन; उजळमाथा-तोंड असणे; निरपराधित्व; आरोपनिराकरण (होणे). ३. बोल, निंदा, दोष, ठपका यापासून अलिप्तता, मुक्तता (असणे).

उघडा हिशोब सरळ, स्वच्छ, हिशेब, लवकर समजणारा हिशेब; पाहिल्याबरोबर डोळ्यांत भरणारा, पटणारा जमाखर्च.

उघडी स्त्री. फांजास लावलेले दार; कालव्यातून पाणी बाहेर सोडण्यासाठी ठेवलेले झापड : 'आम्हांस अकरा उघड्या ओलांडाव्या लागल्या.' - राणीचे पुस्तक ५९. बांधाच्या दाराकरिता ठेवण्यात येणारे उघडझापीचे दरवाजे; पाणी घेण्या-सोडण्यासाठी केलेला दरवाजा. (कों.)

उघडीक, उघडीप स्त्री. १. प्रसिद्धी; जाहीर माहिती; परिस्फुटता : 'आपलीं शास्त्रें लोकांस ठाऊक व्हावीं, कारण तेणेंकरून आपली उघडीक होते.'- नि १०१६. २. उघाड; उघाडी; पाऊस थांबून आकाश स्वच्छ होणे; उघडावा : 'श्रावण महिन्यात आमच्याकडे बरीच उघडीप असे.' - माआ ९०. (वा.) **उघडीक पाडणे –** अब्रू बाहेर काढणे : 'स्नेह्याची अशी उघडीक पाडण्याचं आमचं ब्रीद नाही.'- भदि ४९.**उघडीक होणे–** उजेडात येणे : 'परंतु आजचा काळ असा आहे की संस्कृताची उघडीक होऊन पंडितांचे सर्व ज्ञान बाहेर पडले आहे.'- लोश ७३. **उघडकीस आणणे** - जगजाहीर करणे. **उघडकीस येणे** - जाहीर होणे.

उघडीनागवी वि. अर्धवस्त्राच्छादित : 'ऐसीं उघडींनागवीं असति ।' - लीचउ ९.

उघडीमराठी, उघडीमऱ्हाटी स्त्री. सरळ मोकळ्या मनाने केलेले भाषण; प्रामाणिक व्यवहार; सरळ वागणूक; स्पष्टपणा; स्पष्टवक्तेपणा.

उघडी मांडी करणे (मांडी उघडी ठेवणे हे शिष्टाचारास सोडून आहे यावरून)(ल.) निर्लज्जपणाचे आचरण करणे; बेशरमपणाने वागणे; अश्लील प्रकार करणे; अनुचित, असभ्य आचरण करणे.

उघडे परब्रह्म अगदी स्पष्ट, उघडउघड दिसणारी गोष्ट, बाब, वस्तू. (अशा उघडपणाबद्दल जेव्हा आश्चर्य वाटते त्या वेळी हा शब्द वापरतात.)

उघडेयां क्रिवि. उघड्या अंगाने; असंरक्षित : 'कैसेनि उघडेया असावें । शस्त्रवर्षी ।'- ज्ञा ९.४८६.

उघड्यावर क्रिवि. १. मोकळ्या जागी; सर्वांना दिसेल अशा बेताने; उघड्या जागेत; अंगणात; चव्हाट्यावर; राबत्याच्या जागी. २. जाहीरपणे; प्रसिद्धपणे.

उघराणी पहा : **उगराणी** : 'उघराण्या वगैरे करून रक्कम वसूल करविण्याची योग्य ती तजवीज करतील.'-स्वारी नियम ३८.

उघल स्त्री. पहिली नांगरट; उखळ : 'जमीन उघल घ्यावयास नागर सुमार २।। येकूण.' - मसाप २.१८०. (कों.)

उघळ स्त्री. १. उगळ; जात्यात दाणे दळून झाल्यावर दळले न गेल्यामुळे खुंट्याच्या मुळाशी राहिलेले धान्य, घास. २. नवीन जात्यामध्ये प्रथम दळलेले मूठभर धान्य. [सं. उद् + ग्रह]

उघळणे उक्रि. १. जात्यात राहिलेला घास, उघळ काढणे. २. नवीन जात्यात मूठभर धान्य दळणे. [सं. उद्+ ग्रह]

उघळणे उक्रि. उगावणे; अतिशय बारीक पूड करणे. पहा : **उगळणे**

उघाइणे सक्रि. १. गाणे; उघडणे : 'कोणी गे नि:परंवसा । उघाइली वसंताची दिशा ।'- शिव ८३६. [सं. उद्+ घट्]

उघाड, उघाडी स्त्री. १. पर्जन्यकाळात काही काळ पर्जन्य पडून थोडा वेळ तो थांबला आहे अशी स्थिती; उघडीक. २. उघडी जागा : 'परातीसारखें उथळ भांडें घेऊन त्यांत चुन्याचें पाणी घालून उघाडीवर ठेवावें.'- मराठी ६ वे पुस्तक १६६. ३. परिस्फुटता; प्रगटपणा : 'मुलीला... कांहीं खोड होती आणि ती मग उघाडीस आली.'- मोर २०.

उघाडणे सक्रि. शृंगारणे; सजविणे.
अक्रि. उडी घेणे : 'आपण अंगे उघाडी' - नाम १३५८.

उघाणी स्त्री. चर्चा; वादविवाद : 'गावीं एकी संन्यासी दोघीं उघाणी करूं आदरीती.'-लीच १.३६.

उघारणी, उघ्राणी पहा : **उगराणी** : 'जीं पत्रें येत नसतील त्याजविषयीं उघ्राणी करावी.'- राजमहाल कारकून नियम ३.

उघाळणे स्त्री. चर्वितचर्वण करणे.

उघ्राण स्त्री. कोठी; सामानसुमान ठेवण्याची जागा. (तंजा.)

उच वि. उंच (शेव.) पहा : **उंच** : 'असं झालंया, कैलासावानी उच पहाडाच्या डोक्यावर पुरूस बसत्याती व्हयना ?'- बाय २.२.

उचक वि. तपशीलवार नसलेला; ठोक; उक्ती; ठरावीक; उचलून दिलेली (रक्कम) : 'जमादारास दरमहा योग्य ती उचक रक्कम बांधून देण्याचें करावें.'- चित्त्याची माहिती २७. (बडोदे)

उचकटणे उक्रि. १. जोराने बाहेर काढणे; उपटून काढणे; ओढणे; उसकटणे (खिळा, झाकण इ.) २. नखाने वगैरे उकरणे; कुरतडणे; सोडवणे. ३. बरी झालेली जखम पुन्हा उघडी करणे; जखमेची खपली काढणे. ४. सारखी बसलेली (जमीन, केस, वस्त्राच्या चुण्या, तृणसमुदाय) उखळणे, विस्कटणे, अस्ताव्यस्त करणे; जमीन, छप्पर उसकटणे.५. (ल.) मिटलेला व्यवहार पुन्हा उपस्थित करणे; विसरलेली गोष्ट पुन्हा उकरून काढणे. [सं. उच्चाटन]

उचकटाउचकट स्त्री. घाईघाईने ओढणे; ओरबडणे; उलगडणे; विसकटणे.

उचकणे उक्रि. १. उपटणे; चोरणे; उचलेगिरी करणे; फसवून घेणे : 'स्त्रीसुत बंधु पैका उचकी।'– अमृत ११२. पहा : **उचकटणे**. २. उचलणे : 'नाहीं म्हणौनि उचकीन करें फुलाला.'– आक २५.

उचकणे सक्रि. १. उपटून काढणे; समूळ वर काढणे. २. (ल.) उच्चाटन करणे; हाकून, फेकून देणे. [सं. उत्खनन]

उचकणे अक्रि. बुडवण्याच्या उद्देशाने दुसऱ्याजवळून कर्ज अथवा उधार माल घेणे; वाईट उद्देशाने उधारी करणे.

उचकणे अक्रि. दचकणे : 'गोपाळाला पाहून ती उचकली.'– झाकोळ १०३.

उचकणे अक्रि. रागाने ओरडणे.

उचकणे, उचकने न. १. दाखला; उदाहरण. (व.) २. टोमणा; छद्मी भाषण; हिणवणे. (क्रि. देणे).

उचकवाचक करणे पहा : **उचकटणे**

उचकळ्याबुचकळ्या क्रिवि. बुडत्या माणसाच्या पाण्यातल्या गटंगळ्या. (क्रि. देणे).

स्त्री. (ल.) उपजीविकेसाठी धडपड; संसारातील अडीअडचणी; नशिबाचा बरावाईट फेरा. (क्रि. देणे). . [बुचकळ्याचे द्वि.]

उचका पु. १. काळजी, ध्यास, वेध यामुळे होणारा भास; स्वप्न; हुसका : 'दुखणाइताशेजारी झोपच येत नाही. उचका असतो.'– माजी १४६. (क्रि. येणे, असणे, लागणे, पडणे). २. एखाद्या गोष्टीचे औत्सुक्य, कुतूहल; मनात पक्के बसलेले भय किंवा धाक; चिंता; घोर; धोसरा. (क्रि. धरणे, लागणे, बसणे).

उचका स्त्री. पैसे वगैरे लाटण्याचा उद्योग; फसवेगिरी; खिसेकातरूपणा; उचलेगिरी; भामटेगिरी; दुकानचोरपणा; उचापत; उधारी; उसना, उधार माल. (क्रि. घेणे, काढणे, करणे.) उचका या शब्दाने नेहमी लबाडी ध्वनित होते.

उचकाउचक स्त्री. १. घाईने, उतावीळपणाने ओढणे, हिसकणे. २. फसवणूक; द्रव्यादिक उपटणे; उचलेगिरी; लपवालपव. पहा : **उचका** (क्रि. करणे, काढणे).

उचकाना वि. उंच कान असलेला : 'उचकाना फणेंद्रु ।'– उगी ९.

उचकी स्त्री. कंठामध्ये सशब्द असा आचका बसणे; श्वासोच्छ्वासातील अडथळ्यामुळे निर्माण होणारा ध्वनी; गुचकी; आचकी; उंडकी; हिक्का. (क्रि. लागणे, येणे) : 'उचकी उदानलिंगापासून येतसे जाणा ।' [ध्व.] (वा.) **उचकी लागणे–** १. (आजारी मनुष्य) अत्यवस्थ होणे; शेवटच्या स्थितीत येणे; मरणोन्मुख होणे : 'उचकी लागली उसित गेला । पीत उसळलें उलाट आला ।' – दास ३.६.३३. २. आठवण काढणे.

उचक्या वि. १. उचल्या; चोरट्या; भामटा; खिसेकापू; उपट्या; दुकानचोर. २. आपले बळ, शक्ती, ऐपत न पाहता हवे तसे, पाहिजे त्या अटीवर पैसे काढणारा; माल उधार खरेदी करणारा.

उचगा पु. गटांगळी : 'नबाब मशारनुलेची अवस्ता पाहता नदीमध्ये उचगे खात माणूस कैसे श्रम पावते तेणेपरी विचार.'– ईएमपी १६४.

उचट पहा : **उचाट**

उचटणे उक्रि. चिकटलेला, जोडलेला पदार्थ वर उचलून काढणे (तव्यावरील भाकरी, खिळे मारलेले झाकण). पहा : **उचकटणे** : 'पत्र उचटिलें प्रयत्नें । ग्वाही करायाकारणें ।।' – तुगा ४१०४. [सं. उच्चाटन]

उचटणे सक्रि . १. पहा : **उचाटणे**. २. उपटणे : 'जन्ममरणाचिया उचटूनि पेडी । मग तये बिंवडी ज्ञान पिके ।' – ज्ञागा २१३.

उचटणे न. उलथणे; कलथा; उचटण्याचे साधन. [सं. उच्चाटन]

उचडणे पहा : **उचटणे** : 'धीडरें घातलें तें उचडुं बैसलीं । तवं मोडलें.'– लीच ४.४८.

उचपण न. मोठेपणा : 'सांडूनि कुळाचें उचपण ।' –एभा १२.२३७.

उचमपचम न. १. विनाकारण दुसऱ्याच्या भानगडीत पडणे; लुडबूड करणे; उठाठेव; उपद्व्याप; उचापत. (क्रि करणे, उरकणे, पाहणे). २. रिकामे दोष काढणे; दुसऱ्याला नावे ठेवणे; कुटाळी; कुचेष्टा. ३. खोट्या सबबी; टाळाटाळ; उडवाउडव.(ध्व.)

क्रिवि. उठाठेव, उपद्व्याप करून; टाळाटाळीने; आढेवेढे घेऊन.

उचल स्त्री. १. चाल; हल्ला; उठाव; उत्थान; घाला. (क्रि करणे). २. पुन्हा वर डोके काढणे; पुन्हा जोरावणे; बळावणे (आजार, शत्रू, गोंधळ इ.) (क्रि. खाणे). ३. उत्तेजन देणे; प्रवृत्त करणे; प्रोत्साहन देणे; मागे लागणे (क्रि. देणे). ४. पुन्हा उभे राहणे; जोडणे; स्थापना करणे; (कर्जबाजारी किंवा नादार इसम) स्थिरस्थावर होणे (क्रि. घेणे). ५. (प्रयत्नपूर्वक) एखाद्याला वर उचलणे, आणणे. ६. जागृती; चळवळ; उठावणी : 'सर्व प्रांतात एकदम उचल झाली.'– टिळकचरित्र ३.६.३. [सं. उत् + चल्]

उचल स्त्री. (वाटपामध्ये) एखाद्याच्या हिश्शाला आलेल्या (विहीर किंवा एखादा हक्क) मालमत्तेचा मोबदला म्हणून दिलेला जमिनीचा विशिष्ट तुकडा. [सं. उत् + चल्]

उचल स्त्री. १. आपल्या सावकाराकडून –पेढीकडून किंवा इतर कोणाकडून वेळोवेळी काढलेल्या, उचललेल्या रकमा. (क्रि. उचलणे, फेडणे). २. अशा रकमा उसन्या घेणे; उधारी. (क्रि. करणे). ३. पैशाबद्दल तगादा लावणे, करणे; छळणे; नड लावणे. ४. पगाराचा, मजुरीचा आगाऊ मिळणारा भाग : 'फारच अडचण असेल तर त्यांना उचल मिळत असे.' – अशीही.

उचलचावडा, उचलचावरा वि. बेछूट, बेलगाम; उच्छृंखल; अविचारी; धंद्यात मन नसलेला; लहरी; हुक्कीबाज; अस्थिर; चंचल; तऱ्हेवाईक; छांदिष्ट.

उचलजागता ताजेतवाने होण्या–करण्यासाठी तयार; हुशारी आणणारा : 'उभीं झोंपतीं झाडें, त्यांचा उचलजागता चाळा ।' – कृष्णाकाठीं कुंडल (गोविंदाग्रज).

उचलटप्पू वि. १. उडाणटप्पू; भटकणारा; कोठेही स्थिर नसणारा. २. वाटसरू; उपऱ्या; कायम वस्ती न करणारा (फिरस्ता); खुंटावरचा कावळा.

उचलणी स्त्री. उठाव; उचल; वर करणे; उचलणे. [सं. उत्+चलन]

उचलणी स्त्री. उचला; कौल घेण्याचा दगड (कौल इष्ट असल्यास हलका व अनिष्ट असल्यास जड जाणवतो, असे म्हणतात).

उचलणे सक्रि. खालची किंवा खाली पडलेली वस्तू वर घेणे : 'हें असो पावो उचलिला ।' – ज्ञा १८.७३६.

उचलणे अक्रि. १. वर येणे; वर येण्याचे प्रकार – (अ) पित्त, पुरळ, फोड, गळवे वगैरे शरीरावर उठणे, उत्पन्न होणे. (आ) पाण्यावर लाटा, बुडबुडे उत्पन्न होणे : 'जैशा उचलती लहरीवरी लहरी ।'– दास ११.९.१७. (इ) जमिनीवर वारुळे, भौमे, उंचवटे तयार होणे. (ई) सारवलेल्या जागेवर खरपुड्या, पोपडे येणे. (उ) आकाशात ढग येणे : 'तेथें प्रळये मेघ उचलले । कठिण घोषें गर्जिन्नले ।'– दास १३.४.१४. २. वाढणे; लठ्ठ होणे; मोठे होणे. ३. उठावणी करणे : 'म्हणे पांडवसैन्य उचललें ।'– ज्ञा १.८८. ४. उंच होणे; वाढणे; अंकुर फुटून वर येणे. ५. उचलून येणे; पोटात अस्वस्थता वाटणे; ढवळणे; पित्त वर येणे; ओकारी येणे; मळमळणे. [सं. उच्चलन] (वा.) **उचलून जाणे, येणे** – वादविषयी, युद्धसंबंधी आव्हान देणे; वाद उत्पन्न करणे, ओढून आणणे, सुरुवात करणे; चढाई करणे : 'जे जुंझावया उचलोनि आले असती.'– गीताचंद्रिका १.२२. **उचलून जाणे**– १. लग्नाला, विवाहाला वरपक्षाच्या ठिकाणी वधूपक्षाने इष्टमित्र आणि सामान यांसह जाणे. २. टेकीला येणे; हैराण होणे : 'घरच्या गरिबीमुळे तो उचलून गेला आहे.'– गार १७१. **उचलून बोलणे, उचलून गोष्ट सांगणे** – १. बढाई बाता झोकणे, मारणे. २. ताठ्याने उठून बोलणे. ३. आपला दर्जा न ओळखता बोलणे. ४. विरोध दर्शविणे; उर्मटपणा करणे : 'रायदुर्ग, चित्रदुर्ग वगैरे लहानमोठी संस्थानें आपोआप येऊन भेटोन खंडण्या दिल्या. कोणी उचलून गोष्ट सांगितली नाही.'– पेद २८.१७६.

उचलणे सक्रि. १. वर करणे, धरणे; उठावणे; अंगीकारणे; स्वीकारणे; पत्करणे (काम, भाग, भूमिका, प्रांत). २. हाती घेणे : 'पुढें मूर्तिपूजा हळुहळु आर्यांनीहि उचलली असें दिसतें.' – मसाप २.२.११६. ३. उत्तेजन देणे; उभा करणे; मनात भरवणे; चेतविणे; चेव आणणे; इरेस पेटवणे (वाद, मूल इ. विषयी). ४. लांबविणे; चोरणे. ५. उचल करणे; रक्कम घेणे. ६. सोलून निघणे : 'उपचारें आंगिची त्वचा उचलली ।' – रुस्व ५६१. (वा.) **उचलून आपटणे**– वर उचलून खाली टाकणे; मोठ्या जोराने आपटणे; आदळणे. **उचलून देणे**– १. (तुळशी, बेलपत्रे वगैरे वस्तू हातात घेऊन) शपथ घेणे; (कोणाच्या नावाने) संकल्प करणे. २. स्वसंतोषाने उक्ती रक्कम कोणा एकास देणे. ३. वेगळे काढून देणे. ४. आपणहून देणे; स्वखुषीने देणे. **उचलून धरणे–** १. पाठिंबा देणे; मन:पूर्वक स्वीकारणे. २. सतावून सोडणे; धरणे घेऊन बसणे; खनपटीस बसणे; तगादा लावणे; ओढून धरणे (भिक्षेकरी वगैरेंनी). ३. भारी अटी लादणे; जबर किंमत, व्याज मागणे (सावकार वगैरेंनी). ४. एखाद्याचा विशिष्ट पक्ष स्वीकारणे; जबाबदारी पत्करणे; अभिमान बाळगणे; समर्थन करणे; आधार देणे. ५. एखाद्याचा मुद्दा, म्हणणे इ. बरोबर आहे असे म्हणणे; पाठिंबा देणे.

उचलता पाई, उचलत्या पाई अति त्वरेने : 'तैसियां उचलतां पायीं धावती ।' – शिव ६८२; 'जावया निघाला । लवलाही । तंव शकुन जाहले दोही बाही । म्हणौनि आला उचलत्या पाई । द्वारकेसी ।।' – कथा ४.१६.२२.

उचलते दार न. (स्था.) वर उचलून घेता येण्यासारखे दार.

उचलदडप स्त्री. धावपळ : 'दिवसभराच्या उचलदडपेने वामन खूप थकला होता.'– बाविबु १५९.

उचलद्वार न. (स्था.) द्वाररक्षणार्थ दरवाजाला अडकवलेली व खालीवर करता येणारी लोखंडी सुळक्यांची चौकट.

उचलनी स्त्री. विकास; उत्थान : 'करी कमलांची उचलनी'– दाव १७९.

उचलपाखल क्रिवि. वरखाली; ढवळाढवळ.

उचलपाचल स्त्री. हालवाहालव : 'आपल्या सामानाची उचलपाचलसुद्धा तेच करीत....'– बहुरूपी २५.

उचलपांगडी, उचलबांगडी स्त्री. १. अर्धचंद्र देणे; डिच्चू देणे; हातपाय धरून उचलणे; जबरदस्तीने नेणे. २. जबदरस्तीने घालवून देणे; हकालपट्टी करणे; उच्चाटन : 'मुधोजीची उचलबांगडी होण्याचा वेळ आला होता.' – विवि ८.६.१११. ३. (ल.) पदच्युती.

उचलपीक न. (कृषि.) १. भातशेतीमध्ये पेरणी व पुनर्रोपणी यामधील सहा आठवड्यांच्या कालावधीमध्ये बरीचशी शेतजमीन मोकळी असते. ह्या कालावधीत लवकर येणारे एखादे भाजीपाल्यासारखे पीक. अशा पिकांना खते व पाणी भरपूर प्रमाणात लागतात. २. उसामध्ये अथवा हळदीच्या पिकामध्ये प्रथमावस्थेत दुसरे लवकर येणारे पीक. उदा. उसाच्या दोन ओळीत लावलेला उपट्या भुईमूग, हळदीच्या पिकात लावलेला मका इ.

उचलपुची वि. एक शिवी. ज्याची बृहती उचललेली आहे असा : 'येसूचे छंद कशी उचलपुच्चाला ठुशी.' – पला ८०.

उचलमावंदे न. उच्चाट; हकालपट्टी. (व.)

उचलला वि. १. वर आलेला; निघालेला; सोडून चाललेला : 'उचललेया प्राणासरिसीं । इंद्रियेंही निगती जैसीं ।'–ज्ञा १२.१०१. २. मर्जीनुरूप, इच्छेप्रमाणे मंजूर केलेला; नेमून दिलेला.

उचलला संसार तुटपुंज्या प्राप्तीवर चाललेला संसार, कामधंदा, व्यापार.

उचलला हात स्वेच्छेने देण्यासाठी पुढे केलेला हात; स्वसंतोषाने देणे.

उचललेले काम स्वखुषीने पत्करलेले, झेपेलसे पाहून घेतलेले काम.

उचलवाखल क्रिवि. ढवळाढवळ.

उचलसाचल पहा : **उचलाउचल**

उचला पु. देवीच्या किंवा इतर ग्रामदेवतेच्या देवळात देवाजवळ ठेवलेला एक दगड. काही गोष्टीविषयी देवाला प्रश्न करून तो उचलला असता केव्हा जड वाटतो तर केव्हा हलका वाटतो. त्यावरून त्या प्रश्नाचे उत्तर समजते. देवळातील कौल लावण्याचा दगड. (कों.)

उचलाउचल स्त्री. १. प्रापंचिक बिऱ्हाड वगैरेंचे स्थलांतर २. अस्ताव्यस्त फेकाफेक; घाईने जिनसा शोधणे, उलगडणे वगैरे; कोणी काही उचलण्याचा व्यापार.

उचलाडेवर स्त्री. काढणे–घालणे; उचलणे व ठेवणे; पुन्हा पुन्हा उचलणे; उचलाउचल. (कों.)

उचलाव पु. उठाव. पहा : **उचल**

उचलून पाणी उसाला किंवा एखाद्या पिकाला दुसऱ्या ठिकाणाहून वरून पाणी देण्याचा प्रकार.

उचले वि. उचलल्यासारखे; साहित्याशिवाय; सडे : 'येथून समुद्रासह वर्तमान स्वार होऊन येथून उचले तेथे येऊं....' - पेद ३४.११३.

उचलेगिरी स्त्री. १. भामटेगिरी; कोणाचे लक्ष नसताना बारीकसारीक वस्तू पटकन पळवणे, खिशात घालणे : ' उचलेगिरीतले प्राथमिक शिक्षण मिळवण्याला आडवळणी गावातल्या यात्रेसारखी शाळा क्वचितच आढळेल.'- गांगा १०६. २. दुसऱ्याच्या वाङ्मयातील काही भाग स्वत:च्या नावावर खपविणे; वाङ्मयचौर्य : 'मराठी वाङ्मयात उचलेगिरी वाढीस लागली आहे.'- न्यूनगंड १७०.

उचल्या पु. भामटा; खिसेकापू; चोरांचा एक प्रकार; किरकोळ चोरी करणारा : 'मैंद उचले खाणोरी । सुवर्णपंथी भुरेकरी ।'-दास ३.७.४९.

उचल्या वि. थोडा काळ एके ठिकाणी राहणारा; उपरा. पहा : **उचलटप्पू**

उचल्या हाते वाटेल तसा उचलून : 'ते उचल्या हातें याजकडे पैका देतात म्हणून विदित झाले.' - ऐसंसाखं ४.१००.

उचलौनि क्रिवि. आपणहून होऊन : हे उचलौनि तुमचेया ठायासि आले.' - लीचपू ५.

उचवटणे अक्रि. उंच होणे; उंच होत जाणे : 'जैसी जैसी भूमि उचवटे । तेणेंचि आधारें तो कळसोत्तर कामवटा कीं ।'- विद.

उचवड उंच वि. उच्च प्रतीचा : 'ते वारू उचवडे । काइ वानूं ।'- शिव ९३३.

उचंगणे अक्रि.झपाट्याने, जोराने वाढणे; फोफावणे; लवकर वाढणे; पुष्ट होणे (मूल, रोगी, जनावर). (को.)[सं. उच्च+ अंग]

उचंडळणे उक्रि. हिसळणे; सांडणे; पातळ प्रवाही पदार्थ हलण्याने ढवळून बाहेर पडणे, सांडणे. [सं. उच्च+ आंदोलन]

उचंबळ स्त्री. १. आतील चलनवलनामुळे काठोकाठ भरून वाहणे, भरून येणे; नवी, तळी इत्यादी काठोकाठ भरून येण्याची स्थिती; भांड्याबाहेर सांडेल इतकी भर, वाढ, फूग, आवेग : 'कवित्वाची उचंबळ अनेक ठिकाणी...' - श्रीए ५६. २. तारांबळ.(गो.) (वा.) **उचंबळ खाणे –** उठून चळचळ करणे; पुन:पुन्हा उठून गडबड करणे; एखादे काम अस्थिर वृत्तीने चालू ठेवणे; विशेषत : पराभूत प्रतिपक्षाने पुन्हा वर डोके काढणे या अर्थी योजतात. याच्या विरुद्ध पड खाणे.

उचंबळणे, उचमळणे, उचमणे अक्रि. १. वर येणे; भरून वाहण्याच्या स्थितीला येणे (नद्या वगैरे); डळमळणे; हेलकावणे : 'घडघडीत अंबर । उचंबळत सागर ।'- ज्ञा १.१२९. (सामा.) वाढणे; माजणे : 'रिता कुंभ समुद्रीं रिगे । तो उचंबळत भरोनि निगे ।'- ज्ञा १७.१९. २. आनंद वगैरे विकार मनात न मावता बाहेर पडणे : 'मीही तैसेंचि म्हणें । उचंबळला सांता ।।'-ज्ञा ७.११७. ३. जोर करणे; उसळून वर येणे; पित्ताने मळमळणे; ओकारी वाटणे.

उचंबळा पु. १. उचंबळ; भरती; उकळी (हर्ष, आनंद यांची). २. (ल.) हर्ष; आनंद.

उचाट पु. कंटाळा; उद्वेग; नाखुषी; नाराजी; तिटकारा (क्रि. घेणे, खाणे). [सं. उच्चाटन]

उचाट पु. ध्यास; नाद; उत्कंठा; घाई; अधिरेपणा; अत्यौत्सुक्य; एखादी गोष्ट करण्याच्या कामी भर. (क्रि. भरणे, खाणे).

उचाट पु. खाजगी लिलावाने विक्री. [सं. उच्चाटन]

उचाटणे सक्रि. तिरस्कार, वीट येणे; कंटाळा येणे; तिटकारा येणे; मन उडणे. [सं. उच्चाटन]

उचाटा पु. १. (नाट्य) मुखवटे तयार करण्याकरिता केलेला ठसा, आकृती; पौराणिक नाटकातील गणपती आदीकरून मुखवट्यांसाठी मातीची आकृती प्रथम करून तिच्यावर कागदाचे थर चिकटवून तयार करण्यात येणारी आकृती. जसे : - गणपतीचा, नरसिंहाचा उचाटा. २. (मुद्रण) ज्यातून ठसे (टाईप) गाळले जातात तो साचा. [सं. उच्चट]

उचाटी स्त्री. एखाद्या वस्तूचा किंवा कामाचा आलेला कंटाळा.

उचाडपछाड स्त्री. उलथापालथ; भानगड; घोटाळा : 'विलायत सरकारचे सपाट्यांत आमचे सरंजाम बहाल होऊन माघारे आले तस्मात् आता आमचे उचाडपछाड होणार नाही.'- इना ४४.

उचापत स्त्री. १. माल उधार विकत घेणे; उधारी; उसणवट : 'वाण्याची उचापत देऊं कशानें मी आतां ।'- पला ८०. २. उधार माल; पतीवर आणलेला माल : 'उसिणें उचापत कां देतील'- दावि ३०१. ३. कोणाकडून वेळोवेळी काढलेली रक्कम. ४. (सामा.) कर्ज : 'झाली शुद्ध उचापत प्रभुवरें केली बिदागी दहा ।'- राला १४. ५. उठाठेव; नसती उलाढाल; भानगड; विकत भांडण : 'त्या उचापतीत स्वत:जवळ असलेली सारी पुंजी संपवून टाकली.'- उद्र १५.[सं. उद्+ आपत्](वा.) **उचापत खाणे–** १. चांगली गोष्ट घडून येईल- पुढे काहीतरी मिळेल या आशेवर चैन करणे. २. दुसऱ्याचे भांडण विकत घेणे; भांडण ओढून घेणे; विकत श्राद्ध घेणे; लष्कराच्या भाकरी भाजणे.

उचापत स्त्री. एखाद्या कामासाठी वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या खर्चाची जबाबदारी : 'नाशकांत श्रीसुंदरनारायणाच्या देवालयास काम लाविले आहे. त्यास श्रीमंतास विनंति करून कारखान्याचे उचापत आपल्याकडे लाविली आहे.'- चंचूद ४२.

उचापतखाऊ वि. उधारीवर, आडमार्गाने जाऊन उठाठेवीने उपजीविका करणारा.

उचापतखोर वि. नसत्या उठाठेवी करणारा : 'नाना हा निरुद्योगी असल्यामुळे उचापतखोर होता.'- मिरास ११२.

उचापतविचापत पहा : **उचापत**

उचापती, उचापत्या वि. १. उठाठेवी करणारा; नसते उद्योग करणारा. २. उधार घेणारा व देणारा. ३. भानगडी करणारा : 'माझी बेफिकीरी, आळस आणि उचापती स्वभाव यामुळे...'- वाघसिंह ५.

उचापतीचा रोजगार, उचापतीचा व्यवहार पु. उधारीचा, उसनवटीचा, केवळ पतीवर उठाठेवीचा व्यवहार. याच्या उलट रोकडीचा व्यवहार.

उचारापाचार पु. दृष्ट लागून येणारे, नवीन किंवा उलटणारे दुखणे. (क्रि. करणे, होणे).

उचारापाचार पु. दुसऱ्याच्या खाजगी गोष्टी लोकांत सांगणे; बकणे; मुखरस पाघळणे (क्रि. करणे). [सं. उच्चारणे द्वि.]

उचाल, उचाल जाणे पहा : **उच्छाल, उच्छाल जाणे**

उचावणे अक्रि. उंच होणे : 'उचावले दोंद दीसे।' – सव ९२.

उचासीरी क्रिवि. वरपर्यंत : खांब उभितातिं, उचासीरी । सोल वोढितातीं – रुस्व. १७१५.

उचित वि. १. देशकाल, लोक, शास्त्र, रीती इत्यादिकांना अनुसरून केलेले; योग्य; लायक; जुळणारे; साजणारे; बरोबर; चांगले : 'प्रमाण न म्हणों जरी उचित माझिया नीचते ।'– केका ३. २. सवयीचे; अभ्यासातले.

न. १. योग्यपणा; योग्यता : 'देवाचें जें मनोगत । तेंचि आपलें उचित ।'– दास ४.८.२२. [सं. वच्] (वा.) **उचितास येणे–** योग्यतेनुरूप उचित वाटणे; पसंत पडणे; योग्य दिसणे; बरोबर वाटणे; मानवणे; आवडते.

उचित पु. पारितोषिक; देणगी :' विजयादशमीस पंतप्रधान यांणीं पदरचे मंडळीस उचित द्यावयाचा करून वस्त्रें दिलीं...' – ऐलेसं ६७९३.

उचित अपूर्णांक पु. (ग.) छेदापेक्षा अंश लहान असणारा अपूर्णांक.

उचितज्ञ वि. उचित किंवा अनुचित ज्यास समजते तो; व्यवहारज्ञ; शहाणा; चतुर; माहीतगार.

उचित्त न. सन्मान. पहा **: उचित** : 'मग राजा याणी (राजानें) आपले हातीं सर्वांस भूषणें वस्त्रें वाहिलीं (दिली, अर्पण केलीं) मग भोजने झालीं. मग उचित्तें व वृत्ति दिधली ऐसी वाणीं दिधली.'– बिंब ३.

उचिष्ट पहा : **उच्छिष्ट** : 'बहुतांचें उचिष्ट अंगीकारी ।'– दास २.१.६०.

उचीसीर पु. सर्वांत उंच डोके असलेला : 'भूतळिचिया देवा भूपाळ उचींसिरू ।'– मूप्र २५.७५.

उचेट स्त्री. कोंदणातून खडा काढल्यानंतर उचकटून काढलेले सोने, रूपे इ. [सं. उच्चाटन]

उचोटा पहा : **उंचवटा**

उच्च न. १. केंद्रस्थ सूर्यापासून अति दूर असणारा ग्रहकक्षेतील बिंदू; सूर्योच्च. २. ज्या राशीमध्ये विशिष्ट ग्रह बलवान असतो ती रास. जसे : – सूर्य मेष राशीत, चंद्र वृषभ राशीत, बुध कन्या राशीत, शुक्र तूळ राशीत असल्यास त्यास उच्च मानतात.

वि. उंच; भव्य; श्रेष्ठ; उच्च प्रदेशावरील; उच्च जातीय; उच्चासनास्थित इ. : 'उच्चा तेआं खर्जुरी पोफळी ।'– वछा १३५.

उच्चतर आरंभिक वेतन (शाव्य.) सेवेच्या सुरुवातीलाच वेतनश्रेणीतील वरच्या टप्प्यावरचा पगार देणे.

उच्चतागंड पु. (मानस.) आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत ही भावना; स्वतःच्या तथाकथित मोठेपणाची फाजील अथवा अतिशयोक्त जाणीव. [सं.]

उच्चतामापी न. (भूशा.) समुद्राच्या पृष्ठभागापासून वरची एकंदर उंची मोजण्याचे यंत्र; उंचीमापी.

उच्चदिवाण वि. (ल.) खुळा; मूर्ख; दीड शहाणा. (गो.)

उच्चनीचभाव पु. एक मोठा व एक लहान अशी भावना; द्वैतभाव.

उच्च न्यायालय राज्यस्तरावरील सर्वात वरिष्ठ न्यायालय. जिल्हा न्यायालयातील खटले अपिलात या न्यायालयात जातात.

उच्चपदस्थ वि. मोठ्या अधिकाराच्या, सन्मानाच्या जागी असलेला : 'उच्च पदस्थांचे संदेश...'– वावारु २५८. [सं.]

उच्चभ्रू वि. स्वतःला इतरांपेक्षा सुसंस्कृत व बुद्धिमान समजणारा किंवा इतर ज्याला असा मानतात तो : 'बरेच उच्चभ्रू लोक जुनं मराठी वाङ्मय जुनं म्हणून वाचीत नाहीत.'– पासंग १२०.

उच्चभ्रूसमाज पु. १. समाजात वरचे स्थान असणारा वर्ग. २. (उप.) विद्वत्तेची व व्यासंगाची ऐट व प्रतिष्ठा असणारा समाज; पोकळ व दिखाऊ पांडित्य असलेला समाज. [सं.]

उच्च माध्यमिक शाळा स्त्री. (शिक्षण.) इयत्ता आठवीपासून शालान्त परीक्षेपर्यंतचे शिक्षण देणारी संस्था.

उच्चलन, उच्चालन न. १. उंच करणे, धरणे; उचलणे. २. उच्चाटन; हकालपट्टी. ३. यंत्राच्या साहाय्याने वर उचलणे; उंच उचलणे. ४. सामान वर उचलण्याचे यंत्र. [सं.]

उच्चवर्णीय वि. ब्राह्मण, मराठा इ. वरच्या समजल्या जाणाऱ्या जातीचा.

उच्च वेतनाची आर्थिक लाभप्रदता (अर्थ.) ठरलेल्या दराहून अधिक वेतन दिले तर कामगारांचा उत्साह, त्यांची कामाविषयी आस्था, कामाची प्रेरणा यात वाढ होऊन उत्पादनात प्रमाणतः अधिक वाढ होते. एकूण उद्योग आर्थिकदृष्ट्या लाभप्रद होतो–हे उद्योगधंद्यातील एक तत्त्व.

उच्च शिक्षण न. शालान्त परीक्षेनंतर विद्यापीठीय स्तरावरचे शिक्षण.

उच्चस्वर पु. चढा आवाज; मोठा, स्पष्ट आवाज; तीव्र स्वर; वरचा सूर; तार सप्तकातील आवाज. [सं.]

उच्चलन उचार्तन न. उंच करणे; हकालपट्टी.

उच्च व्यवसाय संघटना स्त्री. वाणिज्य– मोठ्या उद्योजकांची संघटना.

उच्चाट पु. ध्यास; आतुरता; उत्कंठा. पहा : **उचाट** २ : 'माझिया हा मनें घेतला उच्चाट । पहावें वैकुंठ पंढरी हे ।।'– बगाथा ३४६.

उच्चाट पु. उचल्या; भामटा. [सं. उच्चाटन]

उच्चाटण, उच्चाटन न. १. हकालपट्टी; उचलबांगडी; उखडणे; घालवून देणे; उलथून पाडणे; दूर करणे. २. मंत्राच्या साहाय्याने मनुष्याला स्वतःचे घरदार, नोकरी, उद्योग याविषयी तिटकारा उत्पन्न करून त्याला ते सोडायला लावणे; जादूटोणा करून वेडापिसा करणे. ३. जादूटोणा; मंत्रप्रयोग. [सं. उच्चाटन]

उच्चाटणे सक्रि. उच्चाटन करणे.

उच्चातिउच्च वि. सर्वश्रेष्ठ; श्रेष्ठांत श्रेष्ठ : 'तुमच्या मतें तुमची अनन्योपभोग्य सुधारणेचीं उच्चातिउच्च जी तत्त्वें' – लोटिकेले ४.७९. [सं.]

उच्चाधिकार पु. वरच्या दर्जाचा अधिकार.

वि. वरिष्ठ प्रतीचे अधिकार दिलेले; वरच्या दर्जाचे अधिकार असलेले (आयोग, समिती वगैरे).

उच्चार, उच्चारण पु. न. वाणीपासून वर्णात्मक शब्दाची होणारी स्पष्टता किंवा त्याला अनुकूल असा व्यापार; बोलण्याची क्रिया, पद्धती; बोलणे; बोलून दाखवणे; भाषा; बोल : 'उच्चारेंही व्यक्ती । आणिती पुढती ।'– ज्ञा १७.३७०. [सं. उत्+चर्]

उच्चारचिन्ह पहा : **उच्चारभेददर्शक**

उच्चारण न. १. स्पष्ट बोलणे; स्पष्ट शब्दोच्चार. २. मुखातून होणारी

उच्चारप्रक्रिया. [सं.]

उच्चारणकेंद्र न. (भाषा.) एखाद्या स्वनाचा उच्चार करताना जीभ ज्या ठिकाणी स्पर्श करते तो बिंदू; उच्चारणअवयवाच्या वर असलेला तोंडामधील भाग. [सं.]

उच्चारणीय वि. सांगण्याजोगा; बोलून दाखवण्याजोगा.

उच्चारणे उक्रि. उच्चार करणे; तोंडातून ध्वनी काढणे; बोलणे; बोलून दाखवणे; स्पष्ट सांगणे. [सं. उत्+चर्]

उच्चारणेंद्रिय न. (भाषा.) स्वनाचा उच्चार करण्यासाठी आवश्यक असणारे तोंडातील ओठ, जीभ, तालू, स्वरनलिका इत्यादी अवयव.

उच्चारदर्शक (भाषा.) ध्वनिउच्चारातील फरक दाखवणाऱ्या (खुणा).

उच्चारदोष पु. मध्यवर्ती चेतासंस्थेच्या विशिष्ट दोषांमुळे शब्दाच्या उच्चारणात दोष निर्माण होणे; शब्दोच्चारण न होणे. [सं.]

उच्चारपूरक स्वर (भाषा.) स्पष्ट उच्चार येण्यासाठी मदत करणारा स्वर. उदा. 'क' या अक्षराचा पूर्ण उच्चार करताना 'क्' या व्यंजनाला 'अ' या स्वराची मदत घ्यावी लागते.

उच्चारभेददर्शक पु. (भाषा.) अक्षराच्या खाली किंवा वर त्या अक्षराचा भिन्न ध्वनी, आघात इ. दर्शवण्यासाठी वापरली जाणारी (चिन्हे.).[सं.]

उच्चारसर्पण न. (संगीत.) आवाज किंवा स्वर किंवा वाद्य न बदलता पाठोपाठ येणारे सूर. [सं.]

उच्चारसंसर्पण न. (भाषा.) उच्चारातील बदल. [सं.]

उच्चारित वि. उच्चारलेले; बोललेले; सांगितलेले; उद्गारलेले.

उच्चार्य वि. उच्चारता येण्यासारखा; बोलण्यालायक; सांगण्याजोगे.[सं.]

उच्चार्यमाण वि. उच्चार होत असलेला. [सं.]

उच्चालक पु. (यंत्र.) तरफ; जड पदार्थ उचलण्याकरिता योजलेला लांब दांडा. [सं. उत्+चल्]

उच्चालन उंच करणे; उंच धरणे.

उच्चावच वि. लहानमोठा; श्रेष्ठकनिष्ठ; उच्चनीच : 'ये लोकीं उच्चावचें जाण । देवासि समान निजभावें ।'– एभा २७.३४०. [सं.]

उच्चावचन न. तेजी–मंदी; अधिक–उणा होणे. (वा)

उच्चावणे अक्रि. मोठा होणे. पहा : **उंचावणे** : 'तपस्तेजें बहू तोचि उच्चावला ।'– उचिशु ४. [सं. उच्च]

उच्चासन न. इतरांच्या मानाने अधिक उंचावर ठेवलेली मानाची बैठक. [सं.]

उच्चांक पु. इतरांपेक्षा वरचढ गुण; पूर्वीच्या सर्वांत उत्तम कामापेक्षा अधिक चांगले काम. [सं.]

उच्ची स्त्री. एखाद्याला वर चढवून त्याची केलेली फजिती. (ना.) (वा.) **उच्चीत येणे–** (स्तुती केल्यामुळे) चढून जाणे; बनणे. [का. हुच्चु = मूर्खपणा]

उच्चीपट्टी स्त्री. फजिती.

उच्चीत येणे अक्रि.चढून जाणे.

उच्चैर्घोष पु. मोठ्याने जयघोष; आकांडतांडव; उदोउदो : 'स्त्रीसुधारणा व स्त्रीशिक्षण यांच्या महातत्त्वांचा उच्चैर्घोष करणारांनीं ही गोष्ट अवश्य ध्यानांत ठेविली पाहिजे...'–लोटिकेले ४.८१.

उच्चै:श्रवा पु.१. कमी ऐकू येणारा; समुद्रमंथनातून निघालेल्या चौदा रत्नांपैकी एक– इंद्राला मिळालेला घोडा : 'तुरंगजातां प्रसिद्धां । आंत उच्चै:श्रवा मी ।।'– ज्ञा १०.२३७. [सं.]

उच्छलन न. १. पहा : **उच्चलन;** २. उसळी. [सं.]

उच्छ्वास पु. (वै.) अशुद्ध रक्तातील कर्बद्विप्राणिल (कर्बाम्ल) वायू आणि पाण्याची वाफ नाकातून बाहेर सोडण्याची क्रिया; श्वास बाहेर टाकणे.

उच्छलिंध्र न. भूमिछत्र. पहा : **अळंबे** : 'उच्छलिंध्र आणि पूर्णचंद्र । वत्सपदके समुद्र ।'– ऋ ४७. [सं. उच्छिलींध्र]

उच्छाई उत्साही : 'सांगतो सत्कारूनियां मन उच्छाई ।'– होला ४०.

उच्छाद पु. १. उपद्रव; त्रास; पीडा; सतावणूक; गांजणूक; पुरेपुरेसे करणे. (क्रि. देणे.). २. लुटालूट; जुलूम (चोर, दरोडेखोरांचा); खोड्या (मुलांच्या). (क्रि. आणणे, देणे, मांडणे). ३. उपद्रव झालेली स्थिती; त्रस्तता.[सं. उत्सादन] (वा.) **उच्छाद काढणे**– त्रास सोसणे. **उच्छाद येणे**–त्रासणे; कंटाळणे; पीडित होणे. **उच्छाद मांडणे**–सतावून सोडणे.

उच्छाप पु. शापाचे निवारण; शापावर तोड, उपाय, इलाज याकरिता असणारा वर. [सं. उत्+शाप]

उच्छाल पु. वाढ; चढ; बढती; उत्कर्ष. (वा.) **उच्छाल जाणे–** १. संतापणे; एखाद्यावर रागावून उठणे. २. उडी मारणे (घोडा वगैरेंनी). [सं. उत्+चल्]

उच्छाव पहा : **उत्सव** : 'मंगळोत्छाव वाग्देवते । तां वदावें रसाल कथे । श्रोतया वक्तयाचे माथे । आनंदें डोलवी ।'– वेसीस्व १.६.

उच्छास्त्र वि. शास्त्रविरुद्ध; शास्त्र सोडून (भाषण, वर्तन). [सं. उत्+शास्त्र]

उच्छिन्न वि. पूर्णपणे नाश पावलेले; नष्ट झालेले. [सं. उत्+छिद्]

उच्छिष्ट वि. १. अवशेष राहिलेले; उरलेले (पदार्थ); उष्टे : 'पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें ।'– तुगा ६३२. २. (ल.) उपभुक्त; वापरलेले (वस्त्र, पुष्प, स्त्री इ.). ३. उष्टे; शिळे; नवीन नसणारे; उसने घेतलेले. न. उष्टी पात्रे; उच्छिष्टान्न : 'उच्छिष्टें काढी धर्माघरीं । ब्राह्मणाची भीड थोरी ।'– एरुस्व २.२६. [सं. उत्+शिष्ट]

उच्छिष्ट कल्पना दुसऱ्याने अगोदर व्यक्त केलेली कल्पना; शिळा, नावीन्य नसलेला विचार.

उच्छिष्ट चांडाळी एक क्षुद्र देवता. हिला प्रसन्न करण्याकरिता दोन जेवणाच्या मधील काळात भाकरीचा तुकडा दाढेत ठेवण्याचा एक विधी : 'कर्णपिशाच भगलिनी । उच्छिष्टचांडाळी रानसटवी जखणी । वेताळ मुंज्या काळरजनी । भजिजे जनीं अतिप्रीती ।' – हरि १३.६८.

उच्छिष्टणे उक्रि. उष्टे करणे; अर्धवट– काही काळ– भोगून टाकून देणे; जुने–शिळे करून टाकणे : 'येरू म्हणे गा उच्छिष्टलें । होमद्रव्य नेणती ।।'

उच्छिष्ट भाषण, उच्छिष्ट श्लोक, उच्छिष्ट वाक्य पूर्वी दुसऱ्याने म्हटलेले कवन अगर भाषण; वाङ्मयचौर्य.

उच्छृंखल वि. १. ताबा, दाब नसलेला; उतावळा; अविचारी; अविवेकी; अनियमित; गैरशिस्त : 'हे उच्छृंखल बोलणें कायसें ।'– ज्ञा ६.१६२. २. शास्त्र, राजा, वडील इत्यादिकांस न मानता वागणारा; उद्दाम;

स्वच्छंद; स्वैर; स्वेच्छाचारी : 'राहाटे उच्छृंखळु । तयापरी ।।'- ज्ञा १८.६६९. [सं.]

उच्छृंखल चलनफुगवटा पहा : **उत्प्लवी चलनफुगवटा**

उच्छेद पु. १. समूळ नाश; पूर्ण नाश; नायनाट; विध्वंस; खंड : 'कुरुवंशाचा उच्छेद होऊ नये म्हणून...'- युगान्त ३८. २. त्रासदायक कृत्य (शैथिल्याने उच्छाद बद्दल) : 'उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठ्ठला परचक्र ।'- तुगा ६४७. सामा. शब्द- धर्मोच्छेद, वंशोच्छेद, वृत्त्युच्छेद, वनोच्छेद, कुलोच्छेद, [सं. उत्+छिद्] (वा.) **उच्छेद आणणे, उच्छेद मांडणे**- त्रास देणे.

उच्छेदक वि. नाहीसे करणारा; नायनाट करणारा; त्रास देणारा; बुडविणारा; निर्दालन करणारा.

उच्छेदणे उक्रि. नाश करणे; नाहीसे करणे; उद्ध्वस्त करणे; फडशा, सप्पा, नायनाट करणे.

उच्छेदन पु. १. (वै.) शरीराच्या कोणत्याही भागाचा अभ्यास करण्याकरिता तो भाग पूर्ण किंवा अंशत: काढून घेणे. २. शरीरातील अवयव किंवा त्यांचे भाग, टोके वगैरे कापून काढणे. [सं.]

उच्छेदित वि. नाश केलेला; उध्वस्त केलेला. [सं.]

उच्छ्रय पु. उंची : 'त्या तबकडीवर उच्छ्रयदर्शक आकडे घातलेले असतात.'- ज्ञाको २१.२७२. [सं.]

उच्छ्वास पु. १. नाकातून आत घेतलेली हवा पुन्हा बाहेर सोडणे; बाहेर सोडलेला श्वास; (विशेषत:) जोराने श्वास टाकणे; सुस्कारा. २. हवा जाण्याकरिता ठेवलेले भोक; वायुमार्ग; श्वासरंध्र.३ पाण्याचा नहर; नळ; उश्वास. ४. (विरू.) उस्वास. उंचावरून आणलेल्या पाण्याची उंची कायम राहावी व पाणी दूर अंतरावर नेता यावे व आतील दूषित पाणी बाहेर जावे म्हणून बांधलेला हौद : 'नाना फडणिसांनी बांधलेले पुष्कळ उच्छ्वास आहेत.'- अस्तंभा [सं.]

उच्छ्वासन न. श्वास सोडणे; श्वासोच्छ्वास करण्याची क्रिया. पहा : **उच्छ्वास १** [सं.]

उछक वि. स्वैर : 'उछक आणि सहिष्ण । तोचि आत्मा ।'- दास १३.१.१७ पहा : **उच्छृंखल**

उछह उत्सव; सण : 'समर्थे रामनौमी उछह केले ।' - सप्र ४.९

उछळिंद्र भुईछत्री : 'उछळिंद्र कें पूर्णचंद्र'- ऋव २८८.

उछंखळ वि. पहा : **उच्छृंखल**

उछाडपछाड पहा : **उखाडपछाड**

उछाय पु. उत्साह : 'सभा देखोनिया बहु उछावे मनी'- मध.

उछाव, उछाह पहा : **उत्साह** : 'वेणीस्वामी रघुनंदन । ताटिका मारिती उछाहे ।'- वेसीस्व ११९.

उछिष्ट पहा : **उच्छिष्ट** : 'पुढे न शिवावें म्हणोनि उछिष्टा ।।' - दावि २०.

उछेदणे पहा : **उच्छेदणे** : 'मत्सरें यासी मिथ्या म्हणती । तरी अवघेचि ग्रंथ उछेदती । नाना ग्रंथांच्या संमती । भगवद्‌वाक्यें ।।'- दास १.१.१७.

उजकरणी स्त्री. उपक्रम; उठाव; उठावणी : 'आवघी काम करावयाची व घ्यावयाची उजकरणी वेदमूर्तींनी केली असे.'–पेद २२.३७८.

उजखुरा, उजखोरा वि. उजव्या हाताने काम करणारा. [सं. ऋजु]

उजगर पु. फुरसत : 'घरच्या माणसांनाही भेटायला त्याला उजगर मिळाला नाही.'- माजी ११५.

उजगरा, उजगारा, उजगिरा पु. १. (प्र.) उजागरा; जागरण; निजावयास उशीर : 'आझ्ढ़ई उजगरा किती । कराल तुम्हीं ।।'- शिव २२२. २. (ल.) दु:ख; श्रम; त्रास; कंटाळा : 'आपुला घेवोनिया चारा । मग पेटती महामारा । तेणें होतसे उजगरा । ऋषीश्वरासी ।।'- कथा ४.१४.१२५. सामान्यत: पहा : **उजागरा** ३. जागृती आठवण. (क्रि. करणे, देणे.) [सं. उत्+ जागृ] (वा.) **उजगऱ्यास येणे**- १. प्रसिद्ध होणे. २. शुद्धीवर येणे : '.. मग आपणच उजगऱ्यास येईल.'- ऐलेसं ६६२०.

उजगार, उजगारी स्त्री. उत्कर्ष; प्रसिद्धी; लौकिक; भरभराट; वाढ. पहा : **उजागरी** : 'तितक्या उजगारीस ती (आमची भाषा) कधीतरी पोचेल की नाही याचा संशय आहे.' - निमा २०१. [सं. उत्+जागृ]

उजड, उजडणी, उजडणे, उजडता पहा : **उजेड**

उजडा वि. तुळतुळीत : 'गोसावीयाचा श्रीमुगुट उजडा होता.'- लीचउ १८३.

उजदार न. प्रवेशद्वार; पुढचे दार; पुढचा दरवाजा : 'निरविल तैं मग निजात्म स्वसुखे येशिल उजदारा ।' - देप ६५.[सं. ऋजु+द्वार]

उजदार वि. चकाकित, प्रकाशमान : 'उजदार दिसत अशें कर ।' (गो.) [सं. उद्योत]

उजनिर्मळ वि. लखलखीत : 'तियें जालीं उजनिर्मळें ।'- ऋव ८९.

उजम, उज्म पु. थोरवी; गर्व; अभिमान; श्रेष्ठता : 'हे आपले सर्कारच्या गोष्टी उजमाच्या सांगतात.'- दिमरा १.१७. [फा. अजमत]

उजर पु. उत्कर्ष. [सं. ऊर्ज्]

उजर पु. शोभा.

उजर्, उजरा पु. तक्रार; हरकत;आक्षेप; बचाव : 'त्यांची स्थावर जंगम इस्टेट इन्साफावांचून त्यांचा उजरा ऐकल्यावांचून, महाराजांच्या हुकमानें सरकारांत घेतली.'- विक्षिप्त ३.१०२. [फा.]

उजरणी स्त्री. शुद्धी : 'उजरणी सहज गरती जाली ।' - ज्ञागा ५१७.

उजरणे उक्रि. १. दुरुस्त, डागडुजी करणे. २. मारलेले खिळे नीट करणे, सरळ बसविणे, करणे; पोचे आलेले भांडे नीट करणे; गोलाकार घडणे (लोखंडी काम) : 'मी भक्तिवश न चुकलों त्या कुब्जेच्याहि वपुसि उजराया ।'- मोशांति ७.४७. [सं. ऋजु+कृ]

उजरणे अक्रि. १. उत्कर्ष होणे. २. शक्ती परत येणे, सुधारणे; मूळच्या स्थितीवर परत येणे; हुषारी, तजेला येणे; टवटवीत होणे : (प्रकृती सुधारून) 'तेंहीं तैसा पाननायकु उजरिला : ' - लीच ३.८०. ३. मंद बुद्धीच्या मनुष्याची प्रगती होणे; बुद्धीचा विकास होणे; जास्त कळू लागणे : 'सांग हित सुज्ञ गुरू तूं आहेशि समर्थ याशि उजराया ।'- मोवन १.५२. [सं. उर्ज्]

उजरणे उक्रि. १. चकाकित करणे; स्पष्ट, प्रकाशित करणे; उठावदार करणे; स्वच्छ करणे; ठळक करणे (रेषा, आकृती, खूण, छाप) : 'तावी : पीटी : उजरी : तेणेकरूनी एक खते झाडी : '- दृपा १८.१९. २. पुन्हा उच्चारून पक्के करणे; उजळणी करणे; दृढ

करणे. [सं. उज्ज्वलन]

उजरा पु. १. प्रकट मार्ग; रीत : 'अनादि सिद्ध उजरा ।'– ज्ञा १६.२७१. २. प्रसिद्धी; उत्कर्ष. पहा : **उजगरा** [सं. उत्+जागृ]

उजरावणे उक्रि. स्वच्छ करणे (मासळी). पहा : **उजरणे** (गो.)

उजरावा पु. प्रसिद्धी; लौकिक; कीर्ती; बोलबाला : 'येणेकरून सरकारची किफायेत असे व दिगांतर कीर्त उजरावा प्रांती होऊन येईल.' – पेद २४.१८३. [सं. उत्+जागृ]

उजरिसी स्त्री. व्यवस्था; बंदोबस्त; लौकिक : '... माहादजी गदाधर यांणी दरखाची उजरिसी राखिली नाही, याजमुले पायमली आहे...'– पेद ४०.२५.

उजरी स्त्री. १. तेज; प्रकाश; प्रभा : 'प्रभेची जैसी उजरी । ते सोहंवृत्ती अवधारीं ।'– ज्ञा १४.३९१. २. स्पष्टपणा; स्वच्छता; निर्मळता; उपपत्ती विवरण : 'परी प्रमेयाची उजरी ।'– ज्ञा १८.५५. ३. उत्कर्ष; उजळा : 'तुका म्हणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ।'– तुगा ५५८. ४. व्यवस्थितपणा : 'तैसी आहारनिद्रेची उजरी ।'–ज्ञा १३.७६८.
वि. स्पष्ट; उघड : 'जालया कामा नाहीं चोरी । तें कळसें होय उजरी ।'– ज्ञा १८.४३. [सं. उज्ज्वलन]

उजरी वि. सरळ : 'परि ते भजती उजरी नव्हे । विषम पडे ।।'– ज्ञा ९.३४५. [सं. ऋजु]

उजरी स्त्री. साहाय्य; सामर्थ्य; आश्रय : 'वल्लभाचिया उजरिया । आपणयाप्रति कुस्त्रिया । जोडोनि तोषिती जैसिया । अहेवपणें ।।'– ज्ञा १६.३७७. [सं. उर्ज]

उजरून क्रिवि. उघडून, उलगडून : '...त्यास कोणकोणते हिशोब देऊन पाठवावें ऐसें उजरून लिहिलें नाही.'– ऐलेसं ८४८.

उजरे क्रिवि. प्रकटपणे; उजळमाथ्याने; उघडपणे : '...आम्ही तेथे जाऊन उजरें रहावे, बरे–वाईट म्हणावे ते सारे जन आम्हांस हासेल.'– पेद २३.

उजवट वि. उजळ; गोरा. [सं. उज्ज्वल]

उजवट, उजवड, उजवाड पु. उजेड; प्रकाश : 'करतेल्याच्या तोंडाक उजवाड पडलो'=करणाऱ्याच्या तोंडाचा प्रकाश पडला. (गो.) [सं. उज्ज्वल]

उजवण स्त्री. १. समाप्ती; शेवट; अखेर; सार्थक; बोळवण : 'जेथे कृष्णकीर्तिकीर्तन । तेथें कर्माकर्माची उजवण । होय संसाराची बोळवण । जन्ममरण समवेत ।'– एभा ३०.४०. २. साफल्य : 'आजि आयुष्या उजवण जाहली ।'– ज्ञा १०.१४७. ३. लग्न, मुंज इत्यादी संस्कार, अवश्य ते धार्मिक विधी; (विशेषत:) विवाह : 'पुत्रांस नोवऱ्या आल्या । आतां उजवणा केल्या । पाहिजेत कीं ।' – दास ३.४.७. [सं. उद्यापन]

उजवण, उजवणी, उजवणूक स्त्री. ऊर्जित दशा (भूमी, शस्त्र, मनुष्य इत्यादिकांना); उत्कर्ष. [सं. ऊर्ज्]

उजवणे अक्रि. १. विहित क्रमाप्रमाणे समाप्त होणे; पार पडणे; यथासांग तडीस जाणे (नेम, विधी, धर्मकृत्य); सफल होणे; सुपरिणाम होणे : 'मग म्हणे गा प्रज्ञाकांता । उजवली आजि वक्तृत्वता ।'– ज्ञा १४.६३. २. विवाह होणे : 'नुजवेचि कव्हणें बोलें । आंगा आठुवर पण आलें ।'– शिव २०८. [सं. उद्यापन]

उजवणे अक्रि. १. आपत्ती, रोग इत्यादींतून निभावून जाणे, पार पडणे. २. चांगला निघणे; निवळणे. [सं. ऊर्ज्]

उजवणे सक्रि. तेजस्वी करणे; प्रकाशित करणे; तेवणे : 'शेणवी मोगरकर तीन साली त्रिपुर ऊजवूं देत नाहीं.'– आडिमहा १४४.

उजवरा पु. स्पष्टार्थ. पहा : **उजरी** : 'तये नामाचा उजवरा । धुंडूनि भक्षी चराचरा । म्हणोनिया गा नरेंद्रा । ढुंढानामा ।'– कथा ६.१९.१३.

उजवा वि. १. दक्षिण दिशेचा; उजवीकडचा; डावा याच्या उलट; दक्षिण; सव्य. २. सरस; गुणात वरचढ. ३. सरळ. (वा.) **उजवी गुढी देणे–** संमती देणे; कबूल करणे; होकार देणे; परवानगी देणे. **गुढी उजवी घालणे–** उजवीकडे राहील अशा तऱ्हेने भोवती फिरणे प्रदक्षिणा करणे : 'विनये पुसोनि उजवें घालुनि तें त्या सुरापगातनया ।'– मोशांति ७.८१. **उजवी डावी देणे–** होय नाही स्पष्ट म्हणणे; होकार किंवा नकार देणे. **उजवी देणे–** १. उजव्या बाजूकडे जाऊ देणे. २. मूर्तीच्या अंगाला लावलेले तांदूळ, फुले वगैरेपैकी उजव्या बाजूकडील खाली पडणे; अनुकूल कौल देणे. ३. संमती, होकार देणे. **उजवा जाणे, उजवी जाणे, उजवे जाणे –** उजवीकडून जाणे.

उजवाडणे अक्रि. सूर्योदय होणे : 'उजवाडले आतां गोरांक पसरीक सोड.' (कों. गो.) [सं. उज्ज्वलन]

उजवात स्त्री. उदबत्ती. (गो.)

उजवा पक्ष १. सरळ पक्ष; शुक्ल पक्ष. २. सामान्यत: अधिकारातील पक्ष; परंपरावादी पक्ष; सनदशीर पक्ष, विधिमंडळात अधिकारारूढ पक्ष अध्यक्षाच्या उजव्या हातास बसतो, यावरून अधिकारारूढ अथवा सरकारी पक्ष.

उजवारणे अक्रि. रोगातून बरे होणे; पहा : **उजवण** (राजा.) [सं. उर्जन]

उजवा हात ज्याच्यापासून काम अडते असा, पूर्ण विश्वासातला मनुष्य; अव्वल मदतनीस; निकट सहकारी : 'इतके झाल्यावर सोकरजी ऑलवॉश साहेबांचा अगदी उजवा हात बनला.'– भदि.

उजविणे सक्रि. १. समाप्त करणे; उद्यापन करणे; पार पाडणे; पुरे करणे; संपविणे : 'अविनय रुचिप्रतिज्ञा उजवुनि गुरुभक्तीचा रस त्यजुनि ।'– मोकर्ण १.१७. २. सुपरिणामी करणे : 'धन्य इहीं उजविला धनुर्वेद ।'– मोकर्ण १०.१२. ३. विवाहादी संस्कार करणे : 'उजवूं किती होतील पोरें ।'– तुगा २९४९.[सं. उद्यापन] (वा.) **उजवून घेणे–** लग्न लावून घेणे : 'कन्या नृपाची उजवून घ्यावी ।'– सारुह ७.९१. **दोहो अंगी उजविणे–** लग्नामध्ये दोन्ही पक्षाकडील खर्च करून लग्नकार्य पार पाडणे.

उजविणे सक्रि. १. व्यवस्थितपणे करणे; उत्कर्ष, प्रगती करणे : 'ती आपला संसार उजवीत नाही हे तर ठरले.'– निचं ९.५६. २. सजविणे; विभूषित करणे : 'चित्रे काढून चौक उजविले.'–ऐपो २११. [सं. ऊर्ज्]

उजवी बाजू १. राजसभेत उजव्या बाजूला बसलेली मंडळी; मोठे मानकरी लोक. २. (ल.) विश्वासू व अतिशय उपयुक्त राजेलोकांचा उजवा हात असलेला माणूस. ३. सरस, वरचढ बाजू.

उजवे पृष्ठ पुस्तक, ग्रंथ, वही उघडल्यानंतर दिसणारे उजव्या बाजूचे पृष्ठ. ह्या पृष्ठाचा क्रमांक नेहमी विषम असतो. उदा.१,३,५,७ इत्यादी.

उजळ वि. १. चकचकीत; सतेज; जिल्हई दिलेला (धातू); स्वच्छ; पांढरा; निर्मळ. २. गोरा; सुंदर; सतेज (चेहरा). ३. फळ पिकताना रंग बदलून जी सतेजता येते तशा प्रकारचे (पेरू, केळे इ. फळ). ४. शुद्ध वर्तनाचे; राबत्यात येण्याजोगे : 'उजळ लोकांपैकी निवडण्याचे धोरण असावें.'– जव्हेरखानानियम ९. [सं. उज्ज्वल] (वा.) **उजळतोंड होणे,उजळमाथा होणे–** आरोपातून मुक्त होणे; दोषमुक्त होणे; काळिमा जाणे. **उजळमाथ्याने हिंडणे** – राजरोसपणे वावरणे, वागणे; न लाजता वागणे; अपराधीपणाचा लवलेश न बाळगता वावरणे.

उजळटिक्या वि. फासोळीवर पांढरे ठिपके असणारा (घोडा).

उजळठक पु. १. संभावित भामटा; राजरोस भामटेगिरी करणारा. २. बाहेरून भपकेदार परंतु कवडीमोल वस्तू; आतून सरळपणा नाही असा माणूस.

उजळण स्त्री. झगझगाट; प्रकाश : 'मग मला हवाना बंदरातील उजळण दिसेल.'– एको १३८.

उजळणी, उजळणूक स्त्री. १. चकचकीत करणे ; स्वच्छ करणे; उजळा, जिल्हई देणे; पाणी देणे. २. (ल.) खूप शिव्या देणे. (क्रि. करणे.). [सं. उज्ज्वलन]

उजळणी स्त्री. १. आवृत्ती; धुळाक्षरांचे लेखन व पाठांतर. २. (गणित) पाढे, सवायकी, दिडकी, अडीचकी, औटकी वगैरे हिशेबाचा भाग. [सं. उज्ज्वलन]

उजळणे सक्रि. १. चकचकीत करणे; जिल्हई देणे; घासणे; निर्मळ, स्वच्छ करणे. २. दिवे लावणे; मशाल पेटवणे; प्रकाश करणे; पेटविणे; पेट देणे : 'जैसा मालवलिया दिवा । प्रभेसिं जाय पांडवा । मग उजळिजे तेथ तेधवां । तैसाचि फांके ।।'– ज्ञा १५.३६९. ३. प्रकाशित करणे : 'दंततेजें उजळोनि दिशा । हांसोनि म्हणे ।'– मुआदि २२.८८. ४. स्पष्ट करणे : सुलभ करणे; 'विरक्तें परमार्थ उजळावा ।'–दास २.९.१२. ५. उजळणी; आवृत्ती करणे : 'पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजळीत जावें ।'– दास १८.३.१९.

अक्रि १. गोरे होणे; सतेज होणे; सुंदर होणे : 'क्रमेंच तीचीं उजळेच अंगे'– सारुह २.५३. २. (पाडाला आलेले आंबे इ.) सुंदर रंगयुक्त होणे, उजळ होणे : 'कापुरवेलीची चोखडी । उजळिली परीवडी ।'–ऋ ८४. ३. (उष्णादि विकाराने लाल झालेला डोळा, अंधारी रात्र) निवळणे. ४. प्रकाशित होणे : 'जैसे त्रैलोक्य दिसे उजळिलें ।'– ज्ञा १.३९. [सं. उज्ज्वलन]

उजळता स्त्री. उजळपणा; हुषारी.

उजळपाजळ वि. स्वच्छ; सतेज; चकचकीत; लखलखीत; तेजदार; तजेलदार (वस्त्र, पात्र इ.). [उजळचे द्वि.]

उजळा पु. १. तकाकी; चकाकी; लकाकी (घासून, पुसून येणारी). २. जिल्हई; मुलामा (सोन्याचांदीचा). (क्रि. देणे) : 'तैसीं चंपककुसुमें उजळा दिधलें तसेंचि गे स्वर्ण ।'– कमं ९२. ३. जिल्हई देण्याचा पदार्थ. उदा. वाळू, तुरटी, सोरा इ. ४. (सोनारी.) सोरमीठ, नवसागर, मोरचूद, पोटॅशियम सायनाईड यांचे मिश्रण. (हे मिश्रण डाग लावलेल्या जिनसास तो डाग सोन्यासारखा पिवळा दिसावा म्हणून उजळा देण्यासाठी तयार करतात.).

वि. चकचकीत; शुद्ध पांढरा. पहा : **उजळ** [सं. उज्ज्वल]

उजळाई स्त्री. जिल्हई देण्याची अगर घासण्याची क्रिया किंवा तिची मजुरी, मोबदला.

उजंग पु. सुस्थिती; सुखाचा काळ. [सं. ऋजु+अंग]

उजा वि. पांढरा. (खा.)[सं. उज्ज्वल]

उजाई स्त्री. हठयोगातील एक क्रिया : 'देव उजाई करीत असति ।'– लीचपू ३०२.

उजागर, उजागरा क्रिवि. उघडपणे; सर्व समाजासमोर; जगासमोर; अगदी प्रसिद्धपणे : 'त्यांना असला माल उजागरा विकण्याची पंचाईत असते.'–भागा ९०.

वि. १. निर्भय; धीट. २. (उप.) संभावित; एखादे काम करून न केले असे दाखविणारा. (व.)

पु. १. जाग्रण; जागेपणा; जागृतावस्था (क्रि. घडणे, पडणे.) : 'ती रात्र उजागऱ्यातच गेली.'– स्फुगो १.४३. २. उजळमाथा; निर्भयता; धीटपणा; शूरपणा; धिटाई; धडाडी. ३. आठवण. ४. सावधपणा. सावधानता. [सं. उत्+जागृ; उज्जागर]

उजागरी, उजागिरी स्त्री. निर्भयता; मोकळीक; उघडीक; उघडपणे एखादी गोष्ट करण्यास मोकळीक; उघड व्यवहार : 'तो तुमचा दबेल होऊन तुम्हास पाहील तेव्हा त्याला मेल्याचा पाड चढेल आणि तुम्हाला उजागरी होईल.'– बाळ २.१८९. [सं. ऊर्ज्]

उजागरी स्त्री. १. निर्लज्जपणा; धीटपणा; धृष्टता (तृतीया विभक्तीत प्रयोग) : 'नित्य पतिदेखता, भोगिता उजागरीने मजा ।' – प्रला २२५. २. प्रसिद्धी; षट्कर्णी होणे. ३. दुर्लौकिक; बोभाटा. ४. उत्कर्ष [सं. उज्जागर]

उजागरीस आणणे सक्रि. परिस्फुटता करणे; उघडकीला आणणे; प्रसिद्धीला आणणे.

उजागरीस येणे अक्रि. उघड होणे; उघडकीला येणे.

उजागीर वि. १. निर्लज्ज; बेशरम; जनलज्जा नसलेला. २. धीट, निर्भय. ३. ज्यास विवक्षित कर्म प्रसिद्धपणे करण्यास मोकळीक झाली आहे असा; उजळमाथ्याचा. ४. उघड; जाहीर. [सं. उत्+जागृ]

उजाड वि. भकास; निर्जन; ओसाड; वस्तीविरहित; निर्मनुष्य; उध्वस्त; वैराण (गाव, मुलूख इ.) : 'व्यापाराच्या उत्कर्षामुळे कित्येक शहरात लोकसंख्या अतिशय वाढली होती, तर उलट कित्येक गावांतून वस्ती अजिबात उठल्यासारखी होऊन ते गाव उजाड झाले होते.' – पार्लमेंट ३४.

उजाडणे अक्रि. रात्रीचा काळोख संपून दिसायला लागणे. पहा : **उजेडणे**

उजाडताक्षणी, उजेडताक्षणी क्रिवि. अगदी पहाटे; दिसू लागताच.
उजाडी स्त्री. ओसाडपणा; उध्वस्तता; निर्जनस्थिती; उजाडपणा.
उजान क्रिवि. पुन्हा; आणखी. (व.)
उजाऱ्याला येणे अक्रि. वर डोके काढणे; सांपत्तिक स्थिती सुधारणे : 'पांडू चिल्यापिल्याच्या संसारातून उजाऱ्याला येईना.'– वाव १०८.
उजाला पु. चकचकाट; प्रकाश; दिवा : 'चवतर्फा लाविले गलासे जिकडे तिकडे उजाले ।'– पला २७. (हिं)[सं. उज्ज्वल]
उजाळ, उजाळे पु. न. १. तेज; प्रकाश; उजेड : 'उजाळु चंद्रादित्यमंडळा ।।'– ज्ञा ११.२१२; 'बालसूर्याचेनि उजाळें । तैसी कवळें टाचांची ।।'– एरुस्व १.३१. २. पांढरेपणा; स्वच्छपणा; उजळपणा. ३. शुद्धता; कीर्ती; नावलौकिक : 'माझिया कुळाचा उजाळु ।'– ज्ञा १६.३५८. [सं. उज्ज्वल]
वि. पांढरे; स्वच्छ; पहा : **उजळ** : 'उजाळ द्रुति मार्दव ।'–अमृ ५.३
उजाळा पहा : **उजळा**
उजाळी स्त्री. विद्युत विलेपनाचे किंवा पृष्ठभागास चकाकी आणण्याचे खास तंत्र.
उजिगरा पु. कष्ट; श्रम : 'येउनि संसारा वायाचि उजिगरा ।'– ज्ञागा ८७५.
उजिडणे अक्रि. वेगळे होणे : 'जीवु प्रकृतीपासोनि उजिडें । जेणे भवबंध बिघडे ।'– वछा ३३८. [सं. उज्झ्=टाकून देणे]
उजिते न. आगीचा भडका; ज्वलन; पेट; पेटण्याची क्रिया : 'तैं विझोनि जाय उजितें । अग्नीचे तें ।।' – ज्ञा ८.२१३. [सं. उद्योत]
उजियड, उजियेडा पहा : **उजेड** 'परी श्रीनिवृत्तिकृपादीपउजियेडें । देखैन मी ।।'– ज्ञा ६.३२.
उजियेरी स्त्री. साम्य; सादृश्य : 'जरि पाहतां उजियेरी न जोडे । तेव्हेळि मांडिएली ।'– ऋ ३९. [सं. ऋजु]
उजिरा पु. प्रकाश; तेज; उदय. पहा : **उजरा** [सं. उत्+ज्वल्]
उजिरी स्त्री. भरपूर असणे; वैपुल्य : 'तैसी आहारनिद्रेची उजिरी । रोग निवांत जवंवेऱ्ही ।'– राज्ञा १३.७६६.
उजिवड, उजिवडे पहा : **उजेड** : 'ऐसेनि येणे निवाडें । जयाच्या जीवी उजिवडे ।'– ज्ञा १३.१०८३.
उजिवडणे अक्रि. १. उजाडणे; प्रकाशमान होणे. २. (ल.) भासणे : 'तैसे लटिकें येणें रूढे । जड येणें उजिवडे ।'– अमृ२.३५.
उजिवण स्त्री. साफल्य; सार्थक. पहा : **उजवण**
उजीयाळी योगशास्त्रातील एक चक्र : 'आगीयाळी ना उजीयाळी ।'– विसिं ८.६१.
उजीर वि. सरळ. पहा : **उजू** [सं. ऋजु]
उजीरपण न, सरलत्व; सरळपणा.
उजु, उजू वि. १. सरळ; वाकडे नव्हे असे; समसूत्रानुवर्ती (रेषा, मार्ग इ.) : 'तो उजु हातिएरू । धरों नेणें ।।'– शिव ८९५. २. नीट; योग्य; अनुकूल; सीधा (स्वभावाचा) : 'किंवा जैसें ते चातक । मेघा उजु करितां द्योक ।'– स्वादि १.२.८२. ३. सरळ; चांगले; सन्मार्गवर्ती : 'ऋषीश्वरासिं पडलें सांकडें । कीं उजू करितां जाहले वांकडें ।'– कथा ६.५.६९. ४. बरोबर; प्रमाणशीर; सरळ येणारे; योग्य; यथान्याय्य : 'उजु हिशेबाचे जे पैसे ते आम्ही देऊं.'– कोरकि २८०. ५. छक्केपंजे, ध्वन्यर्थ, वक्रोक्ती वगैरे नसलेले; सहज; सोपे; सुबोध; सहज समजण्यासारखे (भाषण, वाक्य, कविता इ.). ६. प्रामाणिक; न्याय; नि:पक्षपाती.[सं. ऋजु] (वा.) **उजू करणे**– बडवून कामाला योग्य करणे; पेटवणे (बैल).
शअ. समोर; कडे : 'मग आवेशें पसरी मुख । उर्ध्वा उजू ।।'– ज्ञा ६.२२८; 'वीर पाहाती आकाश उजु । तों येतां देखिला तेज:पुंजु । जो ब्रह्मयाचा आत्मजु । नामें विख्यात नारद ।।'– जै ५१.१५.
क्रिवि. १. सरळपणे; बरोबर; नीट रीतीने. २. योग्य बाजूला, दिशेला.
उजु, उजू, उजूक क्रिवि. अजून; पुन्हा; आणखी. पहा : **उजान** (कु.)
उजुकार पु. सरळ रीत, मार्ग; सीधा मार्ग; सरळपणा : 'एकु षट्चक्राचेनि उजुकारें ।'– वछा १५१. [सं. ऋजु+ कृ]
उजुवाट स्त्री. सरळ, लांब रस्ता; उजुकार : 'घाटु टेंकुळिआं तेंचि दशन । उजुवाट तेंचि रसना ।।'– वछा ९७.[सं. ऋजु+वर्ति]
उजुवाड पु. उजेड; प्रकाश : 'सरैल उपरा प्रतिरात्री दिनु । सकलै दिशा उजुवाडु होउनु ।'– क्रिपु २.४४.१९४. [सं. उज्ज्वल]
उजू न. (नमाजापूर्वी) हात, पाय व तोंड धुणे. हस्तपादप्रक्षालन (क्रि. करणे.). [फा. वुजू]
उजू, उजूबुजू स्त्री. आदर; मान; मर्यादा; सन्मान. (क्रि. ठेवणे, राहणे, उडणे.). [फा. वुझू]
उजूतवाजू स्त्री. नमाज; प्रार्थना : 'तों अब्दुल अल्ली दुराणी जुमा मशिदीस येऊन आपला स्वधर्म उजू-तवाजू करीत होता.'– भाब २७.५२. [फा.]
उजूतवाजू करणे, ठेवणे – १. प्रार्थना; २. समाचार, मानमर्यादा, बडदास्त ठेवणे : '.... फत्तेसिंगानें घोरपड्यांची उजू-तवाजू उत्तम प्रकारची ठेवून जखमांचा जावता (निगा) करून वस्त्रे देऊन रवाना केले.'– होकै १५८.
उजून क्रिवि. परत, पुन्हा.
उजूनमाज पु. प्रार्थना : 'याजबद्दल पाच वख्त उजूनमाज करून इलाही नजीक रावसाहेबांचे हकामध्यें दुवा याद करीत आहों.'– मइसा १.६३.
उजूबाईगजू मुलींचा एक खेळ.
उजूम पु. प्रतिष्ठा; थोरवी; अब्रू : 'आपल्या मक्कलाचा उजूम ठेविला पाहिजे...'– हिंदख २.२४.
उजूर पु. पहा : **अरुता, आक्षेप.** १. सबब; सबब सांगण्याचा हक्क; विरोध : 'देव मजूर देव मजूर । नाहीं उजूर सेवेपुढें ।।'–तुगा ३७००. २. तक्रार; आक्षेप : 'उजूर असेल तरी हुजूर एणें.'–मइसा १५.१५९. ३. अडथळा; उपसर्ग; हरकत; विलंब : 'सेवकास आज्ञा होईल त्या आज्ञेस उजूर नाहीं.'– मइसा १०.२२६. ४. हक्क; अधिकार; वाजवी काम. ५. खोळंबून राहणे; विचार करणे; वर पाहणे. ६. अपेक्षा : 'परंतु पट्टणाहून दुसरे परवाना यावयाचे उजूर करून ठेविले आहे' – ऐलेसं ३९८१.
उजूर ठेवणे निमित्ताची सोय करून ठेवणे : '...पुढां आणखी पुरंदरास उजूर ठेविला आहे.'– ऐलेसं २३६०. [फा. उजर्]

उजूरुजू क्रिवि. रुजवात करून; बजावून : 'त्येकां पैशे उजुरुजु करून दिले.' (गो.)[उजूचे द्वि.]

उजूहात वजा करावयास योग्य अशा गोष्टी.

उजूहाती क्रिवि. सरळपणाने; भानगड न करता; ऐनजिनसी.

उजेड पु. १. ज्यामुळे बाह्य जगातील वस्तू दिसतात असे निसर्गतत्त्व; प्रकाश : 'दाही दिशा उजेड ।'– मुआदि १९.१९४.२. प्रकाश देणारी, पाडणारी वस्तू; दिवा. [सं. उद्योत] (वा.) **उजेड करणे, उजेड पाडणे, उजेड लावणे**–१. (उप.) अपयशी होणे; काहीच कर्तृत्व न दाखविणे; दिवे लावणे; अपकीर्तिरूप कृत्ये करणे : 'म्हणती भावाने उजेड केला । कीर्तिध्वज उभारिला ।'– नव १८.३९. २. शतकृत्य करणे. काही समानार्थी वाक्प्रचार **–मशाल पाजळणे, लावणे; टेंभा पाजळणे; नगाऱ्यावर टिपरू टाकणे, वाजवणे, दिवसा मशाल लावणे; बेचाळीस पिढ्या अथवा कुळे उद्धरणे; वडिलांचे नाव गाजवणे. उजेड पडणे, उजेड होणे.** १. प्रकाश पडणे; स्पष्ट होणे.२. (उप.) अपकीर्ती होणे; छीः थू होणे.

उजेडणी स्त्री. चूड; ताड, माड वगैरेच्या झावळ्या एकत्र करून सैलशा बांधून उजेडासाठी पेटवतात ती; टेंभा. (को.)

उजेडणे, उजाडणे अक्रि. १. प्रभात होणे; सूर्योदय होणे. २. कार्यारंभ होणे. ३. अनुकूल काळ प्राप्त होणे; वेळ येणे; सुयोग येणे. ४. स्पष्ट होणे : 'म्हणोनि हें उजेडे ।'– दास ६.६.२२. [सं. उद्योतन]

उजेडता काळ पु.१. उजाडायची वेळ; संधिप्रकाशाचा समय. २. (ल.) भावी भाग्याची प्रभात; चांगले दिवस येण्याचा समय.

उजेडाचा माणूस (उप.) चलाख, पराक्रमी माणूस हा शब्दश: अर्थ. परंतु ध्वनी उलट होतो.

उजेरणे उक्रि. १. साफ करणे; गाळ, घाण वगैरे काढणे (पाटातील). २. एखाद्याच्या विद्येत प्रवेश करून देणे; शिक्षित करणे. ३. चकचकीत करणे; उठावदार करणे. ४. (सामा.) पहा **: उजरणे** (राजा.)

उजो पु. विस्तव; आग. (गो.) [सं. उद्योत]

उज्, उज्जन पु. (शाप.) उज्जन वायू; वातावरणातील एक वायू. हा अतिशय हलका व त्वरित पेट घेणारा आहे. हा वायू पाण्यातील मुख्य घटक आहे. (इं. हायड्रोजन.) [सं.]

उज्जगंधकिद पु. एक दुर्गंधीयुक्त वायू.

उज्जनचलनी वि. उज्जैन येथे चालणारे; शिंदेशाही (नाणे).

उज्जीवन न. १. जागृती; प्रगटता; प्रगट होणे : 'जे उज्जीवन जाहले ज्ञानाग्नीचें ।।'– ज्ञा ४.१३२. २. नवचैतन्य; चेतना; उत्तेजन : 'तैसे राज्यभोगसमृद्धी । उज्जीवन नोहे जीवबुद्धी ।'– ज्ञा २.६८. ३. भोगसाधन. [सं.]

उज्ज्वल, उज्वल वि. १. सतेज; चकचकीत; प्रकाशमान. २. स्वच्छ; शुद्ध; पवित्र. पहा **: उजळ** [सं. उत्+ज्वल्]

उज्ज्वलन न. १. जळण्याची, प्रकाशित होण्याची क्रिया; पेटवणे; २. तजेला, जिल्हई देण्याची, स्वच्छ करण्याची क्रिया; चकचकीत करणे. [सं.]

उज्ज्वलित वि. १. पेटवलेला. २. प्रकाशित केलेला; जिल्हई दिलेला. ३. प्रकाशमान; तेज:पुंज. [सं.]

उज्झड वि. उद्धट; दांडगेश्वर; उर्मट. [सं. उत्+झट्]

उज्झित वि. टाकलेले; सोडलेले; त्यक्त. [सं. उज्झ्]

उज्म पहा **: उजम** : 'इंद्रसेनाने सरकारांत येऊन श्रीमंताशी भेटून जाण्यांत उज्म राहतो.'– मशियांका ५३४.

उज्मा वि. भव्य.

उज्र पु. अडथळा. पहा **: उजूर** [फा.]

उज्रंभ पु. प्रकटन; विकसन : 'रजिं उज्रंभु सत्वाचा ।'– ऋव ४६०.

उज्रंभणे अक्रि. प्रोत्साहन देणे : 'भक्तिभावातें उज्रंभिति श्रवणमात्रें ।' मूप्र ९६.

उज्लत स्त्री. घाई. [फा.]

उज्वड पहा **: उजवाड**

उज्वाड्यार क्रिवि. पहाटेस. (गो.)

उज्वाड पु. उजेड; प्रकाश : 'उज्वाडाक हडप'= प्रकाशात आणणे; प्रसिद्ध करणे. (गो.)

उझड वि. वेडगळ; अक्षरशत्रू; विदूषक : '... इस्माइलखान अक्षरशत्रू व उझड यैसा प्रकार झाला आहे.'– हिंदेभा २.९६.

उझहलज स्त्री.बाहेरील दरवाजाला लागून आतील दोन बाजूंना असलेली बैठक; देवडी. (चंद्रपुरी)

उझ्म पु. १. इरादा; हेतू. २. थोरवी. [फा.]

उट स्त्री. हुटहुट; कटकट : 'माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ।'– तुगा १.२१. [ध्व.]

उट स्त्री. चाकाला प्रतिबंध करण्यासाठी लावलेली उटी; टेकू; दगड.

उट पहा **: ऊत** (वा.) **उट उतरणे–** रग जिरवणे; नक्षा उतरणे.

उटउट स्त्री. १. रुखरुख. २. किंतू : 'त्यास राव शिंदे तर गेले; परंतु माझ्या मनांतील उटउट गेली नाही.'– मइसा ७.१९७. [ध्व.]

उटक वि. उथळ, उंचवट्याची, खडकाळ.
न. उंच खडक.

उटकटारी, उंटकटारी स्त्री. एक वनस्पती; उताटी; काटे चुबुक. हिची पाने कोपरे कातरल्यासारखी असून पृष्ठभागी सफेत रंगाचे काटे असतात. डांग्या खोकल्यावर हिची मुळी लहान मुलांच्या गळ्यात बांधतात. सर्प, विंचू यांच्या विषावर हिचे मूळ उगाळून लेप देतात. मुळाला ब्रह्मदंडी म्हणतात. ही उंटाला प्रिय असते. [सं. उत्कट]

उटकण न. १. दूर होणे. २. अवर्षण.

उटकणे उक्रि. उच्चाटन होणे; वेगळे पाहणे, होणे; दूर करणे : 'सर्वारंभा उटकलें ।'–ज्ञा १४.३६६. [सं. उत्+टंक्]

उटकर, उटकळ स्त्री. पहा : **उठकळ**
वि. हलणारा; डळमळणारा; सैल; खिळखिळीत झालेला (दगड). [सं. उत्थ+कृ]

उटकळी स्त्री. तोंड येणे; तोंडात खरे, पुटकळ्या येणे. (राजा.)

उटक्कर वि. उर्मट; मग्रूर; उद्धट. (क्रि. येणे.) [सं.उठ् = पाडणे]

उटज न. पर्णकुटी; झोपडी; पर्णशाळा. [सं.]

उटणी स्त्री. पायरी, आधार.

उटणे न. १. अंगाला लावण्यासाठी सुंगधी द्रव्ये घालून तयार केलेली पूड; उटी; लेप लावणे : 'सूर्याचिया आंगा उटणे । लागत असे ।।' – ज्ञा १०.१०. २. उटणे अंगाला लावणे, माखणे; मर्दन.[का.ऊटणे] [सं.उद्वर्तन]

उटणे उक्रि. १. माखणे; चोपडणे; लावणे; चर्चिणे : 'श्रीमहादेवो कापुरें उटिला ।'–ज्ञा ११.२२२. २. (राख, माती इत्यादींनी भांडे वगैरे) पुसून साफ करणे : 'हां हो उटोनियां आरिसा ।'–ज्ञा ११.१५७. ३. धुणे : 'वृद्धपरंपरा ऐसी आहे । वरचरण उटी वोहमाये ।'– एरुस्व १४.८९. [का. उटणी]

उटन न. घासण्याची क्रिया.

उटपटांग वि. बेजबाबदार; टारगट : 'पण त्यांनाहि आमच्या उटपटांग गटाविषयी...'–खर्डे १४.

उटंक वि. उतरणीची; उंचवट्याची; खडकाळ (जमीन) : 'स्थिर होय सखोल भूमिके । थेंबु न राहे उटंके ।' – विसिंपू १.८२. [सं. उत्+टंक]

उटंगणी स्त्री. एक वनस्पती.

उटंगर, उटंबर, उटंबरा, उटंगळ न. १. उंचवटा; लहान टेकडी; टेंब. २. शरीरावर असलेले आवाळू; गलंड; टेंगूळ. ३. एखादी जड वस्तू लोटून नेताना खाली जो दगड लावतात तो.
वि. १. वरखाली झालेला; उंच सखल; उच्चनीच; खडबडीत; डळमळीत. २. उटंगळे असणारा (प्राणी, जमीन). [सं. उत्+स्था+गल्]

उटा पु. चाकाची गती खुंटवण्यासाठी चाकाखाली ठेवलेला दगड; अटकण. (क्रि. देणे.) पहा : **ऊट**

उटाउटी क्रिवि. (प्र.) उठाउठी; तत्काल : 'गौरजानु पयोधरकटी । अवलोकितां उटाउटीं । धैर्य पळालें बारा वाटीं । नाहींच झाला विचारू ।।'– मुआदि १५.१४३. [सं. उत्+स्था द्वि.]

उटाड, उटांड वि. कुरूप वाटण्याइतपत उंच; उंटासारखा (उंच).

उटाणटेंगळा पहा : **उटंगळ**

उटारेट पहा **उटारेटा** :'उटारेटीतून फावल्या क्षणी' – अंधार २०२.

उटारेटा, उटारेठा, उटारेटी, उटारेठी पु. स्त्री. (प्र.) उठारेटा. १. उठाठेव; ढवळाढवळ; उपद्व्याप; नसता उद्योग, भानगडी, लुडबूड. २. (लहान मुलांची) चुळबूळ; चळवळ; वळवळ; नाचरेपणा. ३. उडवाउडव; चिवड (अन्नाची भूक नसता केलेली.). ४. थापेबाजी; गप्पा. (क्रि. करणे).

उटारेटी, उठारेठा, उठारेठी क्रिवि. १. नसत्या उठाठेवीत; आळसात; टिवल्याबावल्या करण्यात (कालाचा अपव्यय करणे). २. चिवडीत, उडवीत (जेवणे).

उटारेटीस येणे उटारेटा करणे.

उटाळणी स्त्री. १. उठावणी; प्रोत्साहन; उत्तेजन; प्रवर्तन; भरीला घालणे; चेव आणणे. २. उटाळण्याची क्रिया.

उटाळणे उक्रि. १. स्पष्ट उच्चारला जाणे; लिहिलेले अक्षर स्पष्ट उमगले जाणे. (व.) २. अर्थ, हेतू, भाव स्पष्ट होणे, करणे. ३. उठवणे; उत्पन्न करणे; उच्चारणे :'इला कसें नाम तुझे उटाळे ।।' – सारुह १.२८. [सं. उत्+ताल्]

उटाळा पु. उथळे; इमारतीच्या खांबाला तळात दिलेला दगड; तळखडा.(व.) [सं. उत्+तल]

उटाळा पु. १.(वागिंद्रियापासून होणारा अक्षरांचा) स्पष्टोच्चार. २. स्पष्टीकरण; विशदीकरण; फोड; किल्ली (लिहिलेले गूढ, श्लोक इत्यादिकांची), : 'माझे या स्मरणाचे उटाळे वांचूनि आन नाहीं.' – उगी ६८३. ३. चेतना देणे; प्रवृत्त करणे. [सं. उत्+तल]

उटाळा, उटाळी पु. स्त्री. १. तरफ; जड पदार्थ उचलून फेकण्यासाठी त्याखाली पहार वगैरे घालतात ती. (क्रि. देणे). २. अशी उचलण्याची, तरफेची क्रिया (क्रि. करणे). ३. ढकलणे; जोर लावणे; धक्का देणे (पुढे ढकलण्यासाठी); खांदा देणे. (क्रि. देणे).
[सं.उत्+तल=स्थापन करणे]

उटाळे न. १. गाडीचे चाक जागेवरून ढळू नये म्हणून त्याखाली ठेवलेला दगड, उट. २. खांबाच्या खाली व वर द्यायचा धिरा, टेकण; खालचा दगड व वरचे टेकूचे आडवे लाकूड. ३. गुरांचे तोंड उघडून जाभाडांमध्ये ठेवायचे, हात जाण्याजोगे भोक असलेले आडवे नळकांडे.

उटाळे न. दरवाजावरील पुढे आलेला बांधकामाचा भाग. (हैद्रा.)

उटाळे न. १. किल्ली :'फेडावया गुणचित्ताचे टाळे । माझे या स्मरणाचे उटाळें ।' – उगी ६८३.२. स्पष्टीकरण; खुलासा.

उटिंगण न. आधार; टेकू.

उटिंगळ पहा : **उटंगर** (कों.)

उटिंबर, उटिंबरा न. पु. टेगूळ; मातीचा ढीग; गाठ.

उटी स्त्री. पहा : **उटणे.** १. सुवासिक द्रव्यापासून तयार केलेला पदार्थ (चंदनादिक).(क्रि. करणे). २. उटण्याचा लेप. (क्रि. लावणे) :'तो जैसा काळलोहें डवरिला । नातरि प्रलयांधकार उटी ओळघैला ।' – शिव ९९९. [का. उटणी]

उटी स्त्री. उडवी; एक खांब रोवून त्याच्या भोवती गवत रचून ठेवणे; गवताची गंजी. (कु.) [सं. उट= गवत]

उटी स्त्री. १. चाकाची गती बंद करण्यासाठी, चाक जागेवरून हलू नये म्हणून लावण्यात येणारा दगड. २. (ल.) अडथळा :'जातींच्या मार्गातील स्पर्शास्पर्शतेची उटी काढून टाकून ..' –गांगा १६५. पहा : **उटा, उट**

उटी स्त्री. तेज; माहात्म्य; मोठेपणा (क्रि. उतरणे) :'सर्वेचि इंद्रपणाची उटी उतरे ।' –ज्ञा ९.३२८. पहा : **ऊत** (वा.) **उटी उतरणे –** महत्पदापासून भ्रष्ट होणे.

उटीजणे, उटिजणे सक्रि. १. उटी लावणे; माखणे :'कापुराचेनि परागें उटीजती । मोतियांचेनि रसें न्हाणीजेती ।' – शिव २८१. २. घासून स्वच्छ करणे :'न घडितांचि आरिसा । उटिजे काई ।।' –अमृ ७.६२.

उटीव वि. खरवडून काढलेले; घासलेले; घासून स्वच्छ केलेले.

उटुट, उटूट पु. ध्यास; नाद.

उटुट, उटूट न. उट्टे; सूड. (वा.) **उटुट काढणे, उटूट उगवणे** – सूड उगवणे; उट्टे काढणे; बदला घेणे.

उटे न. (विरू.) पहा : **ऊट्टे;** वाईट कर्माचे प्रायश्चित्त; सूडाचे कृत्य; पारिपत्य :'बहुत लोकांस तुवां पीडिलें । त्याचे उटे आज निघालें ।' – हरि ९.८१.

उटेंरेटे न. उठाठेव; उपद्व्याप. पहा : **उटारेटा** :'आतां सांडिलें उटेंरेटें ।' – शिव १३६.

उट्टे मोबदला; वचपा; भरपाई; तोडीस तोड; सूड; खरडपट्टी :'पण आज येऊं दे तरी, म्हणजे त्याचं सगळं उट्टं काढतें.' – तोबं अं. २ प्र. १ [सं. आ+वृत्त] (वा.) **उट्टे काढणे, उट्टे उगवणे, उट्टे येणे, उट्टे फेडणे** – जशास तसे करणे; खोड मोडणे :'आठवुन सगुण तिळतिळ काढीन उटें तें ।' – प्रला १५७.

उठकट, उठकर स्त्री. हकालपट्टी. पहा : **उठकळ**

उठकळ, उठकळा स्त्री. १. उठण्यास होणारे कारण; उठण्याची निकड, गरज. (क्रि. आणणे, लावणे, येणे). २. उठण्याची बुद्धी; हुटुटी; सुरसुरी (मनातून किंवा बाहेरच्या काही कारणाने येणे). (क्रि. लागणे, येणे). ३. हकालपट्टी; पराभव. ४. (गाव, कुटुंब इत्यादिकांचे) स्थलांतर; बारा वाटा होणे; एखाद्याने उठून जावे म्हणून लावलेला तगादा. (वा.) **उठकळ येणे–** दुसरीकडे जाण्याचा हुकूम होणे, भाग पडणे; स्थलांतराचा हुकूम.

उठकळ, उठकळा स्त्री. कंटाळा; त्रास; दगदग; टेकीला येणे; मेटाकुटीला येणे.

उठकळणे अक्रि. एकसारखे काम करून अंग खुडकणे; थकवा येणे, वाटणे; दमणे; कंटाळणे.

उठकळे, उठकले न. हकालपट्टी; पराभव :'मारौनि गजरथांची दळें । वीराचें उठकळें केले ।' – शिव१०६१.

उठणे अक्रि. १. उभे राहणे; बसणे याच्या उलट. २. (ल.) वर येणे; आकाशात वर जाणे (धूर, धुरळा). ३. जागे होणे; शुद्धीवर येणे (झोपेतून, मूर्च्छेतून). ४. स्पष्ट दिसणे; उमटणे (ठसा, रंग, छाप वगैरे) :'उत्तम गुण तत्काळ उठे ।' – दास १९.६.२०. ५. वर येणे; दिसायला लागणे; बाहेर पडणे; उद्भवणे (पुरळ, साथ, संकट, बातमी वगैरे). ६. ताजेतवाने होणे; फुलणे; टवटवीत होणे; आनंदित होणे (मनुष्य, प्राणी, वनस्पती वगैर); खुलून दिसणे (रंग वगैरे). ७. खुणा पडणे; उठून दिसायला लागणे (वण, वळ, चाबकाचा मार, दातांचा चावा). ८. उत्पन्न होणे : 'उठति घनपटलें ।'– ज्ञा ८.२०. ९. पूर येणे :'जसें महाप्रळयीं जळ । उठलिया भरे ब्रम्हगोळ ।' – विसिंउ ११.८६. १०. वाढणे. ११. क्षोभ होणे (पित्तादिकांचा). १२. नवीनच गोष्ट प्रसिद्ध होणे; प्रचारात येणे. १३. उभे होणे; ताठ होणे; तयार होणे (इमारत वगैरे) :'तैं राजवाडा उठे ।' – विक ११. (वा.) **उठून जाणे** – परवानगीशिवाय निघून जाणे; पळून जाणे; रागाने चालते होणे. **माणसातून उठून जाणे** – १. रीतभात सोडणे; अनीतीच्या मार्गाला लागणे. २. परपुरुषाबरोबर निघून जाणे (स्त्रियांच्या बाबतीत) :'खरेंच का रूपमाया सेनापती उठून गेल्या.' – बाय ४.३. **उठून दिसणे** – स्पष्टपणे नजरेला येणे. **उठला ठाव देववत नाही** – उठून जेवायचे पानही मांडता येत नाही, इतक्या निर्बलतेचे द्योतक. **नित्य उठून, रोज उठून –** दररोज नेमाने; नित्य. [सं. उत्+स्था]

उठणे अक्रि. एखाद्याने मर्यादा सोडून आचार वर्तन करणे. उदा. माणसातून उठणे.

उठणे उक्रि. वस्ती वगैरे उठून जाणे; ओसाड पडणे. उदा. गाव उठणे.

उठणे अक्रि. खर्च होणे; खलास होणे; संपून जाणे. (व.)

उठणे उक्रि. १. करवणे; उरकणे; पार पडणे (काम वगैरे) :'माझ्याच्यानें पहिल्यासारखे कामही उठत नाही.' – विवि ८.८.१५३. २. प्रवृत्त होणे (वाईट करण्यास). ३. वाटणे; मनात येणे :'झोंबी घ्यावी ऐसे उठे ।' – दास २.६.१५.

उठणे अक्रि. १. बरखास्त होणे; संपणे (सभा, बैठक वगैरे). २. उडून जाणे (एखाद्यावरील मन); उद्विग्न होणे; त्रासणे; कंटाळणे.

उठणे अक्रि. १. (सैन्य वगैरे) चालू लागणे; बाहेर पडणे; सज्ज होणे; हल्ला करणे :'भट दशसहस्र उठले जे आज्ञाकर सुयोधनाचे हो ।' – मोभीष्म ६.६१. २. बंड करणे (एखाद्याविरुद्ध); सामना देण्यास तयार होणे.

उठणे अक्रि. १. दुखायला लागणे (डोके, कपाळ, मस्तक, शीर इ.). [सं. उत्+स्था]

उठणे सक्रि. आकसाने आळ येणे; कुभांड रचणे (मनुष्यावर, घराण्यावर, वाईटावर उठणे वगैरे).

उठतबसत क्रिवि. खुरडत; कसेबसे; मोठ्या कष्टाने; थोडे चालत व थोडी विश्रांती घेत; थांबून थांबून; धीरे धीरे (काम करणे, जाणे). अति अशक्ततेचे द्योतक.

उठताबसता, उठतापडल्या, उठल्याबसल्या, उठल्यासुटल्या क्रिवि. क्षणोक्षणी; हरघडी; सदासर्वदा; जेव्हा पहावे तेव्हा; एकसारखे.

उठताबसता उपवास, निराहार, उठताबसता नवरात्र नवरात्रीतील घटस्थापनेच्या दिवशी व शेवटच्या उपास दिवशी करण्याची पद्धत.

उठतीबसती सुवासिनी – नवरात्रात घट बसतात त्या दिवशी व नवरात्र उठते त्या दिवशी सांगायची सुवासिनी.

उठपळ स्त्री. १. उठसूट, एकसारखे पळून जाणे (असंतोषी नोकर किंवा सून वगैरेंनी). (क्रि. लावणे). २. (ल.) त्रासदायक; जुलमी वागणूक; गांजवणूक (पळून जायला लावण्याइतकी); हाल करणे; छळ करणे. (क्रि. लावणे). ३. अस्थिरता; असंबद्ध वागणूक; चंचलता; उतावळी. (क्रि. करणे, लावणे, मांडणे). ४. जायला निघणे. (क्रि. करणे). क्रिवि. एकसारखा; पुन्हापुन्हा; मध्ये न थांबता; उतावीळपणाने.

उठपाय क्रिवि. एकसारखे; पुन्हापुन्हा. पहा : **ऊठपाय**

उठबशी, उठबसी, उठबैस स्त्री. १. उठण्याबसण्याची मेहनत; पुनः पुन्हा उठणे व बसणे. २. खळबळ; चळवळ (अस्थिरताद्योतक). ३. नसता खटाटोप, उठाठेव. ४. बैठका (व्यायामाचा एक प्रकार). (वा.) **उठबस करणे** – आदरातिथ्य करणे.

उठवण स्त्री. कुणबी समाजातील देवकृत्य; देवक उठवणे.

उठवण स्त्री. तोटा; आपत्ती; चणचण. :'.... खाण्यापिण्यची वगैरे सरंजामाची उठवण मोडली.' – पाणिबख १५.

उठवण, उठवणूक, उठवळ स्त्री. बसले असता स्वतः उठवत नाही, दुसऱ्याने उठवायला लागावे अशी अवस्था (गुरे, घोडे इत्यादीची); उठून उभे राहण्याची सुद्धा शक्ती नसणे :'आतां सर्वथा उठवण्या ।' – एभा ११.१२०९. (क्रि. घेणे). २. (ल.) आपत्ती; दारिद्र्य; दैन्य;

दुर्बल दशा. (वा.) **उठवण मोडणे, उठवणूक मोडणे** – १. शक्ती परत येणे. २. दारिद्र्य, निराशा यापासून सुटका होणे. **उठवणीस येणे** – अतिशय अशक्त होणे; मरायला टेकणे. **उठवण घेणे** – दुसऱ्यांनी उठवावे लागणे; (सामा.) अतिशय दमणे; थकणे :'वैरणचारा महाग याजकरितां घोडी व उंटे उठवणीस येऊन, अस्थिचर्मे जाहालीं.' – भाब ५६.

उठवणकर, उठवणकरी, उठवणकरू, उठवणेकर, उठवणेकरी, उठवणेकरू वि. उठवणीस आलेला (मनुष्य, बैल); बिछान्याला खिळलेला (रोगाने, वार्धक्याने).

उठवणी स्त्री. हकालपट्टी :'इथून तुमची उठवणी होऊ नये एवढ्याकरिता एक युक्ति सांगतो.' – कदिगे ३.

उठवळ स्त्री. हकालपट्टी; उच्चाटन; अवनती (वा.) **उठवळ येणे, उठवळ लागणे** – उच्चाटनाची वेळ :'फीमेल ट्रेनिंग कॉलेजला उठवळ आली आहे.' – केले १.५१.

उठवळ वि. १. आळशी; कामचुकार (उठवणकऱ्याप्रमाणे वागणारा). २. चळवळ्या; उच्छृंखल. ३. बेफिकीर; छचोर :'दोघींपैकी एक बाई उठवळ आहे म्हणून तिला औषध देण्याचे ते नाकारतील की काय?' – खपा १७६.

उठविणे, उठवणे उक्रि. उठणे यांचे प्रयोजक. १. उचलणे; वर करणे; उच्च स्थितीला नेणे; उंच करणे; उभे करणे. २. जागृत करणे; जागे करणे; उठायला लावणे. ३. चेतना देणे; प्रवृत्त करणे; क्षोभविणे; उठावणी करणे. ४. दुखायला लावणे (डोके). ५. (कंडी) पिकवणे; जाहीर करणे (बातमी, गोष्ट). ६. उत्पन्न करणे; काढणे :'जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार ।' – दास १.३.२. ७. पार पाडणे; बजावणे :'सूचना होतील त्याप्रमाणे नोकरी उठविण्याची आहे.' – स्वारीनियम (बडोदे) २४. ८. चोरणे; लांबवणे :'चोरट्यांनीं स्वयंपाकाचीं दोन भांडीं उठविलीं.' – विवि ८.११.२०८. ९. रक्कम कर्ज काढणे; उचल करणे; खर्च करणे. [सं. उत्थापन] (वा.) **घरातून उठविणे** – नादी लावून पळविणे :'ह्या स्वतंत्र बायका केव्हा कोणच्या म्हाताऱ्याला घरांतून उठवतील कांहीं नेम नाहीं.' – बाय २.१. **जन्मातून उठविणे** – आयुष्याचे मातेरे करणे (जार कर्मामुळे) :'माझ्या पोरीला अशी जन्मांतनं उठवलीन्.' – निचं १२५.

उठसूट पहा : **उठता बसता; उठल्यासुटल्या**

उठळ वि. निरुपयोगी; आळशी. पहा : **उठवळ**

उठंगार, उटंगार पु. महापूर. (गो.)

उठाउठी क्रिवि. ताबडतोब; त्वरेने; लवकर; तत्काळ; लागलीच; झटकन; त्वरित; एकदम; जलदीने :'आतां उठाउठी । असकेयां ब्रम्हगोळकां देइनु मोठी ।' – शिव ९२१. [उठणेचे द्वि.]

उठागीर वि. १. (निंदाव्यंजक) प्रवासी; मुशाफिर; उपऱ्या; भटक्या; तात्पुरती वस्ती करणारा. २. उचल्या.

उठाठेव स्त्री. १. रिकामी लुडबूड, खटपट; पंचाईत; दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ. (क्रि. करणे) :'यांना काय करायची आहे साऱ्या साखरपेंडीची उठाठेव?' – एल्गार ४४. २. बरदास्त; सरबराई; व्यवस्था :'घायाळ समशेर बहादूर कुंभेरीस आला, तिथे सुरजमल्ल जाट याणे त्याची बहुत उठाठेव करून घोडी व पालखी देऊन वाटेस लाविला.' – भाब १६२. ३. कामाची दगदग; खटाटोप; खटपट. ४. इकडच्या तिकडच्या कुचाळक्या करणे; भलतेसलते, बऱ्या वाईट अफवा उठविणे.

उठाण न. गडबड; दंगा :' ... ते प्रसंगी ताम्राचे उठाण विशेष देखोन तुम्हांस या प्रांतीच्या राज्यरक्षणास ठेवून आपण स्वार होऊन कर्नाटक प्रांतीं गेले.' – मासपमा १८८.

उठाण, उठाणे न. १.उठावणी; उसळी; उमेद; तीव्र प्रवृत्ती :'कीं ते समयीं मनाचें उठाण ।'– यथादी १०.२५८. २. उन्नतता; उठावरदारपणा (स्तनांचा) :'उठेत वक्षोरुह हे उठाणें ।' –सारुह २.५६.[सं. उत्थान्]

उठाण, उठाणे न. सूचक लक्षण, चिन्ह :'तों देवकीस वरिती विरश्री उठाणें ।' – कृष्णजन्म (देवनाथ) २३.

उठाणू न. गळू; बेंड (शरीरावर उठणारे) :'हे हेंगाडं उठाणू' – काढा १६.

उठापटक स्त्री. उठणेबसणे; एकत्र व्यवहार करणे; धडपड :'ज्या सहजपणानं तो शाळेतल्या बरोबरीच्या पोरांसोबत उठापठक करीत होता...' –धग ३२.

उठापायी, उठोपायी पहा : **ऊठपाय**

उठाबशी पहा : **उठबशी** (वा.) **उठाबशा करणे** – अनेक उठाबशा लागोपाठ काढणे; बैठका मारणे :'कान पकडून उठाबश्या काढणे ही सामान्य शिक्षा होती.' – माजी २९. **उठाबस करणे** – पहा : **उठबस करणे** :'त्यांच्यापैकी कुणी आला की त्याची उठाबस करायला गावातील शिष्ट मंडळी एका पायावर तयार.' – पापू २३.

उठारेठा, उठारेठ, उठारेठी पहा : **उटारेटा**

उठाव पु. १. वर आलेला भाग. २. शरीराची ठेवण, स्वरूप; ठसठशीतपणा :'आणा धरोनि मृग हा, कैसा दिसतो मनोरम उठावें ।' – मोवन ११.१९. ३. उचल; सरसावणे :'किंवा अमृत क्षीरसागरी । येती लहरींवरी लहरी । तैसी द्रौपदी राजकुमरी । उठाव करी दुसरेने ।।' – हरि ३४.२८. ४. (शिल्प) उठावाची नक्षी; उचलून दिसणारे काम; वर दिसणारी, कोरलेली आकृती. उदा. उठावाचा नकाशा.

उठाव पु. १. खर्च. २. ग्राहकाने नेणे; विक्री. उदा. मालाचा उठाव.

उठाव पु. पदांमध्ये बदललेल्या चालीवरून पुन्हा मूळच्या चालीवर व ध्रुवपदावर येणे. (वणी येथील गोविंद कवीच्या पदांतून असे उठाव आढळतात.)

उठाव पु. हकालपट्टी :'कुमकेचा विचार घडल्यास रास्ते यांचा उठाव करितील.' – ऐलेसं ६०२४.

उठाव पु. जागृती; बंड :'पूर्वबंगालमधील उठावाचे मूळ' – अबांदे १०.

उठाव पु. प्रसिद्धी :'नोबेल पारितोषिकांनी यांपैकी काहींना अधिक उठाव मिळाला इतकेच.' – छांदसी ९६.

उठावण स्त्री. आक्रमक किंवा जोरदार कृती :'ऐसी उठावण चमत्कारिक केली की, साध्या तिय्यात अमीरबक्षाला खाल्ला.' –व्यव ११९.

उठावणी स्त्री. पहा : **उठविणे.** १. उत्तेजन; प्रोत्साहन; प्रेरणा; पुढाकार :'देवळात काकडआरती आमच्या बाबांच्याच उठावणीने

होत असे.' – माजी २१. २. जोराने पुढे सरसावणे; उचल करणे. ३. बंडखोरी; डोके वर काढणे; हल्ला करणे; स्वारी करणे :'इंग्रज लोक जितक्या वेळा उठावणी करतील तितक्या वेळा त्यांना चोपून काढायचे.' – इंप १४४. ४. उद्युक्त होणे; पुढे होणे. ५. जागृती. ६. उभारणी; सजावट; रचना; बांधणी :'शिवापूरच्या बागायतीसाठी दुसऱ्या धरणाची उठावणी केली.' – श्रीयो १४३. ७. तळ हलविणे; निघण्याची तयारी करणे; कूच करणे. ८. उठवणे; दारिद्र्य, संकटे यातून वर काढणे. ९. उचलणे (ओझे). [सं. उत्थापन]

उठावणी स्त्री. शिफारस; स्तुती; प्रशंसा. (को.)

उठावणी स्त्री. जैन किंवा वैष्णव यांच्यामध्ये मृताच्या तिसऱ्या दिवशी करण्याचा विधी.

उठावणे अक्रि. १. पुढे होणे; उद्युक्त होणे; तयार होणे; सरसावणे; एखाद्या उद्योगासाठी आवेशाने लागणे; मनापासून कामाला लागणे :'पत्रिका वाचितांचि गोपाळा । पुढें भीमकी देखे डोळां । बाह्या पसरूनि उतावेळा । आलिंगना उठावला ।।' – एरुस्व ४.६२. २. हल्ला करणे; छापा घालणे; स्वारी करणे; युद्धार्थ चाल करून जाणे :'काळरात्रीचीं कटकें। उठावलीं जैसी ।।' – ज्ञा ११.१९९. [सं. उत्थापन]

उठावणे सक्रि. नक्कल करणे; उतरून घेणे. (गो.)

उठावदार वि. डोळ्यांत भरणारा; लक्ष वेधून घेणारा; चांगला उठाव असलेला; आकर्षक; ठळक.

उठावदार चित्र पृष्ठभागाच्या वर आलेले चित्र; उठावाचे चित्र.

उठावरेघ स्त्री. (भूशा.) नकाशामध्ये उंचसखलपणा दाखविण्यासाठी वापरण्यात येणारी छोटी रेघ.

उठावा पु. पहा : **उठाव, उठावणी.** १. निघून जाण्याकरिता उठणे; सैन्याचा तळ हलवणे; कूच करणे; बाहेर पडणे :'आता उठावा करी ताता । नातरी त्यजीन मी जिविता ।' – कथा १.५.११२. २. शत्रूविरूद्ध उठणे; हल्ला; चढाई :'दीधला वीरभद्रें उठावा ।' – उषा ११५२. ३. (अज्ञात स्थितीतून, दुखण्यातून) बाहेर येणे. ४. बहार; उत्कर्ष :'फुन वसंताचा उठावा । तो आनूंचि दिसें ।।' – शिव २५९. ५. विस्तार; वाढ :'तैसें जेथूनि हा आघवा । संसारतरूचा उठावा ।' – ज्ञा १५.२०२. ६. प्रोत्साहन; उत्तेजन :'उल्हासु वीरांचिया चित्तां । उठावा दीधला मागुता ।' – एभा ९.१३२. ७. आवेश; वेग :'ऐसा दृढ वैराग्यउठावा । तेणें विहिताग्नि बोळवावा ।।' – एभा १८.६५. [सं. उत्+स्थापय्]

उठावाचा नकाशा ज्या नकाशात डोंगर, नद्या, पर्वत इ. भाग पृष्ठभागापासून उंचसखल दिसतील असे कोरले आहेत असा नकाशा.

उठाळणी पहा : **उत्तेजन, उठावणी** :'चाळीस हजार घोडा मर्द दिली उठाळणी ।' – ऐपो ८५.

उठाळणे प्रोत्साहन; आवेशाने पुढे होणे; चढाई करणे; दु:स्थितीतून डोके वर काढणे. पहा : **उठावणी** (व.)

उठाळून बोलणे मोठ्याने बोलणे. (माण.)

उठित वि. मशागत केलेली; लागवडीला आणलेली, वहित (जमीन). (व.) [सं. उत्थित]

उठिंगण न. आधार.

उठिंगर–ळ न. आपटल्याने आलेली सूज; टेंगूळ; गळू.

उठी स्त्री. उठायला लावायाची निकड; उठण्याची, निघून जाण्याची निकड :'तुझे स्वरूप पाहतां दृष्टी । भयातें उठी उठावें ।' – नव १४.७२.

उठी का बठी मुलींचा एक खेळ.

उठीनिलिया क्रिवि. उठले असता; उठल्याने :'एकी प्रेमें उत्कंठिता । पहाविया उठीनिलियां असांसिता ।' – शिव ६००.

उठू स्त्री. कामाची सक्ती, निकड, तगादा, लकडा. (क्रि लावणे, मांडणे, करणे). [उठचे द्वि.]

उड न. नक्षत्र. पहा : **उडुगण** :'शशी पोळला शाम काया उडें ... जेवि लाह्यात ।' –मुरासुंकां ५८.

उडकी, उंडकी स्त्री. उचकी; हुंदका (क्रि. येणे) :'डोळे झांकले जिव्हा आड पडली । नेदी हुंकारा वोळखी मोडली । उडकी हृदयांतु प्रवेसली । प्राणु सांडी वेळोवळां ।।' – त्रिपु. २.२४.८४.

उडकी स्त्री. लहान उडी : 'उडकिया देऊ लागला' – क्रि. २.६.२१

उडकी स्त्री. पाट; विधवाविवाह.

उडगण स्त्री. गोगलगाय :'उडगण घडों जाय भिन्ती । तृणें लोटितां पडे पुढती ।।' – मुविराट ५.३०.

उडगण पु. न. नक्षत्रे; चांदण्या. [सं. उडुगण]

उडगणे उक्रि. झाडणे; केर काढणे. [का. उडगु=झाडणे]

उडगा पु. समुद्रकाठी उथळ पाण्यात खडकात राहणारा खेकडा.

उडणारा रंग उजेडात ठेवला असता कमी, नाहीसा होणारा, विटणारा रंग.

उडणारी शाई (हवेच्या परिणामामुळे) पुसट, नाहीशी होणारी शाई.

उडणे अक्रि. १. भरारी मारणे; आकाशमार्गे गमन, संचार करणे (पक्षी वगैरेंनी) :'हें विपायें आगींत पडे । तरी भस्म होऊनि उडे ।' –ज्ञा १३.११०५. २. आघात प्रत्याघातादी कारणाने स्थान सोडणे; मूळ स्थानापासून अन्यत्र जाणे; वर बाजूला उडी मारणे. ३. उल्लंघन करणे; ओलांडून जाणे; वरून उडी मारून जाणे :'आडमार्गें उडोनि भिंती ।' – मुविराट ४.२४. ४. उंचावरून खाली उडी मारणे. ५. झडप, झेप घालणे; तुटून पडणे; रागाने, आवेशाने चालून जाणे. ६. संभोगार्थ उडी मारणे–चढणे (पशु वगैरेंच्या बाबतीत – पशूनरांनी माद्यांवर). ७. (ल.) गर्व करणे; मद येणे; ताठा चढणे :'ज्यांच्या बळें उडसि तें तिकडेचि मनेंहि तुजकडे देहें ।' – मोउद्योग ४.१०९. ८. (ल.) वर मान करणे; भरभराटणे :'सत्कीर्ति न दे उडों नवसुचेतें ।' – मोमंभा २.४०. ९. भरधाव पळणे (घोडा वगैरे); वेगाने जाणे. [सं. उड्डान]

उडणे अक्रि. १. नाहीसे होणे; निघून जाणे; संपणे :'ते रात्री येतां सूर्यापुढें । स्वकार्येसी सगळी उडे ।' – एभा २०.२८१. २. एकदम अदृश्य होणे; दिसेनासे होणे. ३. कोमेजणे; निस्तेज होणे; रंग विटणे; अस्पष्ट होणे; फिक्का होणे. ४. खपणे; खलास होणे; खर्च होणे (द्रव्य, जिन्नस); झपाट्यात संपणे :'तिच्या दोन हजार प्रती दोन दिवसांत उडाल्या.' – दुर्दम्य १६२. (धैर्य, धीर) खुंटणे, सुटणे; (पाणी वगैर) आटणे. ५. मन विटणे; तिटकारा येणे; प्रेम नाहीसे होणे :'तिचा आज जीवच उडून गेला होता.' – अस्तंभा १८८. ६. दुभते जनावर दूध देत नाहीसे होणे; कोरडे पडणे; भाकड होणे :'दुभतीया दोनि

गाइ : तीया दुभेति जव उडेति तव असेति' : – गोप्र ८७. ७. एखाद्याची चाकरी, रोजगार सुटणे. ८. दोष, विरोध वगैरे दूर होणे; मावळणे; आरोप नाहीसा होणे (शास्त्रादी विषयांवरील). ९. निसटून जाणे; पळून जाणे :'पुढें धरितां मागें पेंचला । मागे धरितां पुढे उडाला । ऐसा सांपडतचि गेला । ठाइंठाइं ।।' – दास १७.४.३. १०. (शाप.) वाफ होऊन जाणे; बाष्पीभवन होणे.[सं. उड्डान] (वा.) **उडत जाणे** – (ल.) खिजगणतीत नसणे; महत्त्व न देणे; न मानणे.

उडणे अक्रि. १. बंदूक, तोफ पेटणे; गोळी सुटणे; स्फोट होणे; फुटणे. २. युद्ध, भांडण वगैरे जुंपणे.

उडणे अक्रि. १. मजा, गंमत, भांडणतंटा, अव्यवस्था वगैरे उत्पन्न होणे. २. सुरू होणे, वाढणे, माजणे :'चालिले उडत गर्जत ।' – दावि २६८.

उडणे अक्रि. बळावर, आशेवर काम करणे; अवलंबून कार्य करणे (द्रव्य, सत्ता, वचन वगैरेवर).

उडणे अक्रि. नापास होणे; स्पर्धेत पराभूत होणे :'मुलगा गणितात कधीकधी उडतो.' – खेकडा १३७.

उडतउडत क्रिवि. १. उड्या मारीत; नाचतबागडत; एकाच क्रमाने; वेगाने नाही अशा प्रकारे (जाणे, येणे). २. अनिश्चितपणे; अनिर्धारकपणे; संदिग्धपणे; अस्पष्टपणे (सांगणे, बोलणे, ऐकणे). ३. कर्णोपकर्णी (एकाकडून दुसऱ्याला अशी बातमी इ. येणे). ४. संक्षेपाने, सारांशरूपाने; अधूनमधून :'तिने उडत उडत जबाब दिला.' – विवि ८.३.८२.

उडतक न. घोड्याच्या अंगावरील गाशाखालील वस्त्र.

उडत कोंबडा पु. मुलींचा एक खेळ.

उडतघुमा वि. (भोवऱ्याच्या खेळात) दूर उडून तेथे फिरत राहील अशा तऱ्हेने टाकलेला; उडून घुमतो असा टाकलेला (भोवरा).

उडतपगडा पु. मुलींचा एक खेळ.

उडतपगडे न. सोंगट्याच्या खेळातील एक डाव (क्रि. करणे)

उडतबातमी स्त्री. बाजारबातमी; गप्प; भुमका; सहज समजलेले पण संशयित वर्तमान; कर्णोपकर्णी ऐकलेली वार्ता.

उडतरुमाल पु. १. मर्दुमकी करणाऱ्या कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीच्या लोकांसाठी योजिलेला किताब.२.लढाई थांबवण्याची खूण.

उडत हत्यार न. तोफांची मारगिरी; गोलंदाजी.

उडता नाच गोव्यातील कलावंतिणीचा नाच.

उडता पील उफाड्याने वाढणारे मूल; थोराड मुलगा; धडाडीचा, पुढे नावारूपास चढेल अशी चिन्हे दाखवणारा तरुण; हुषार, मुलगा.

उडती पाटी १. बलुत्यांपैकी एक हक्क; धान्य उफणताना महार जी पाटी घेत असत तिला उडती पाटी म्हणत. धान्य उफणणाऱ्या महाराला त्या पाटीभर धान्य दिले जात असे. २. चांभारपाटी.

उडती वार्ता पहा : **उडत बातमी** :'उडति वार्ता हे निजकथा ।'– दावि २८७.

उडते ऊन कोवळे ऊन; सकाळचे ऊन.

उडते पाखरू १. उडणारा पक्षी. २. (ल.) चंचल, अस्थिर माणूस; हंगामी. (वा.) **उडत्या पाखराची पिसे मोजणारा, उडत्या पाखराची मेज करणारा** – फार चलाख, हुषार मनुष्य; पाताळयंत्री मनुष्य; नुसत्या तर्काने एखादी गोष्ट अचूक ओळखणारा : 'उडत्या पाखरांची शेटां मोजप.' (गो.)

उडते वेतन चौरी किंवा रुमाल उडविण्याच्या मानाबद्दल सरकारातून मिळत असणारे वेतन :'... भिकाजी केशव यास उडतें वेतन पावावयाची नेमणूक आहे ...' – पेदभा ४५.६५.

उडते साल एक वर्षाआडचे वर्ष.

उडदण, उडदाण न. उडदाची मळणी झाडल्यावर राहिलेला भुसा, भुसकट.

उडदणी, उडदाणी वि. उडदाच्या रंगाचे, काळसर.

उडदळ स्त्री. उडीद पेरण्यास योग्य अशी जमीन; जेथे उडीद पेरला आहे अशी जमीन.

उडदा बेगम, उडदा बेगण – (बुद्धिबळ खेळ) मोगली संप्रदायी बुद्धिबळातील एक मोहरे. यात घोड्याच्या ऐवजी उडदाबेगम हे मोहरे असून त्याची गती ३।। घरे असते. या उडदाबेगणीच्या खेळात पटावर १०० घरे असतात.

उडदा बेगमी, उडदा बेगी हत्यारबंद स्त्री; उडदाबेगणी. (हिं.)

उडदा मुहूर्त लग्न, मुंज वगैरे समारंभास आरंभी सुवासिनी उडीद दळण्याचा जो समारंभ करतात तो; उडीद भरडण्याचा मुहूर्त, काळ.

उडदावळ स्त्री.१. उडीद पेरलेली जमीन; उडदाचे शेत. पहा : **उडदळ.** २. उडदी रंगाचे लुगडे (काळ्या अंगावर पांढऱ्या चौकटी असणारे).

उडदी स्त्री. वर्दी किंवा ताकीद :'तो यांनी महालांत गावगन्ना द्वाही घराघरात उडद्या फिरविल्या होत्या ....' – होकै ९९.

उडदी वि. उडदाच्या रंगाचे.

उडदी लुगडे; पांढऱ्या चौकटी असलेले काळे लुगडे.

उडदे पु. उडदाच्या दाण्यासारखे कीटक. (व.)

उडद्या मुरूम उडदासारखा बारीक, काळा मुरूम.

उडप न. वाघाला मारण्याकरिता एखादे मेलेले किंवा त्याने मारलेले जनावर ठेवून त्याभोवती केलेले काट्यांचे कुंपण. (गो.)

उडपाल न. मोठ्या तंबू शेजारी स्नान, स्वयंपाक वगैरे करण्याकरिता ठोकलेला लहान तंबू.

उडपाल न. कांबळ्याच्या खोळीवर (पर्जन्यनिवारणार्थ) जे दुसरे वस्त्र घेतात ते. [सं. उर्ध्व+पल्लव]

उडया, उडये पु. पहा : **उडवा, उडवी, उडवे**

उडलटप्पू वि. निरुद्योगी. पहा : **उडाणटप्पू**

उडली, उंडी, उलडी उलांडी स्त्री. (नाविक) होडी उलटू नये म्हणून तोल सांभाळण्यासाठी तिच्या बाहेरील बाजूला दोन वाकडी लाकडे जोडून त्यांच्या शेवटाला जोडलेले एक आडवे लाकूड. हे नेहमी पाण्यात असते.

उडवणी स्त्री. १. पसरणे; फेकून देणे; उधळणे. २. दुसऱ्याने सांगितलेली गोष्ट उडवून देणे; अवहेलना करणे; अव्हेर करणे; हेटाळणी. ३. निरास :'ये विषयीं उडवणी पंचकोस । बोलिलेली दासानी अभंगषट्क ते ।' – दावि ३१३. ४. टाळाटाळ.

उडवणे, उडविणे उक्रि. १. **उडणे** याचे प्रयोजक. पहा : **उडणे** २. **दूर फेकणे;** अस्ताव्यस्त करणे; विस्कळीत करणे; चारी दिशांना उधळून लावणे; पळवून लावणे :'मुकूट शिरींचा उडविला ।' – मोदोहारामायण ६९. ३. उधळपट्टी करणे; बेसुमार खर्च करणे :'आपल्या नादीं लागून हवा तेवढा पैसा उडवील असें तिला वाटलें.' – विवि १०.५–७.१२३. ४. टाळणे; अव्हेरणे; सोडणे; टाकून देणे. ५. हेटाळणे; अव्हेर करणे; झिडकारणे. ६. चोरणे; लांबविणे; नाहीसे करणे :'हातवह्या फिर्यादीने उडविल्या.' –विक्षिप्त ३.९५. ७. मारणे (फटके इ.); आघात करणे :'निर्गुणास जन्म कल्पिला । अथवा निर्गुण उडविला ।।' – दास ९.३.२६. चाबूक उडवणे; चाबकाचे फटके मारणे. ८. चोरून नेणे; पळवून नेणे :'तिला उडवून नेण्याचा प्रयत्न करणे ही गोष्ट श्लाघ्य आहे.' – विवि १०.५.–७.१२३. ९. आटोपणे; जलद काम करणे; त्वरित संपवणे :'लॅटिन भाषांतर विद्यार्थ्यास दिले असतां ते जॉन्सनने कसें उडवून दिले याविषयीं मागे सांगितलेंच आहे.' – निमा ६५६. १०. फजीत करणे :'नका आमची जास्त उडवू.' – चंद्रग्रहण ४०. ११. पदभ्रष्ट करणे; काढून, हाकून लावणे :'आपण स्वत : टोळीचा नायक होऊन तुम्हांस उडवून देणार नाहीं.' – कोरकि २७८. १२.स्फोट करणे; उडविणे (शोभेची व सुरुंगाची दारू इ.) १३. नष्ट करणे; ठार मारणे :'शत्रूवर नेम धरून सोजीर उडवितां येतील.' – इंप १५०.[सं. उड्डायन] (वा.) **उडवून घेणे** – भिल्ल जमातीतील वाङ्निश्चयानंतरचा एक विधी. या विधीत नवरानवरीला एका कमरेइतक्या उंच धरलेल्या अधांतरी फळीवर बसवून गाणे गात तालावर वर उडवतात व पुन्हा फळीवर झेलतात. **उडवून देणे, लावणे** १. ठार मारणे :'पहारेकऱ्यांना आणि शिपाईबंदीला उडवून दिले की...' – केस्व ४८. २. दुर्लक्ष करणे; हेटाळणे.

उडवलाउडवला, उडविलाउडविला वि. दूरदूर; इकडेतिकडे; मधूनमधून; विलग; तुरळकतुरळक. (को.) [उडविणेचे द्वि.]

उडवा, उडवी, उडवे पु. स्त्री. न. १. ढीग; रास; गंजी (पिकांची, गोवऱ्यांची) :'नाना निधानचि निदैवा । होये कोळसयाचा उडवा ।' – ज्ञा १८.७२५; 'भाताचे भारे आंब्याच्या खळ्यावर रचून त्याच्यावर उडव्या लावल्या.' – आआशे १३६. २. (गोवऱ्या वगैरेंची) रास ठेवण्यासाठी केलेले कूड. (व.) ३. कोणत्याही धान्याच्या वाळलेल्या ताटांचा (झोडपणीसाठी) रचलेला ढीग, बुचाड :'आच्च्या तीन वझ्यानं आपला उडवा भरते.' – धग ५८. [का. उड्डी=ढीग]

उडवाउडव, उडवाउडवी स्त्री. १. टाळाटाळी; कोलवाकोलव. २. हेटाळणी; अवमान. ३. उधळपट्टी; अव्यवस्थित खर्च. ४. अस्ताव्यस्त करणे (ठेवलेला जिन्नस); अस्ताव्यस्तपणा; अव्यवस्था; विस्कळीत रीतीने केलेली फेकाफेकी. ५. निरास करणे; लागू होऊ न देणे (दोष).[उडविणेचे द्वि.] (वा.) **उडवाउडवी करणे** – मूळ मुद्दा सोडून भलतेच उत्तर देणे; खरे माहीत असून ते सांगण्याची टाळाटाळ करणे :'पण त्यानं अशीच उडवाउडवी करून मला वाटेला लावावं.' – पलको ३९२.

उडवागी स्त्री. तिरस्काराने वागवणे; अवहेलना करणे; अनादर करणे (एखाद्या माणसाचा किंवा त्याच्या भाषणाचा). (क्रि. करणे)

उडवार्ता स्त्री. उडत बातमी; अफवा; उडत उडत आलेली हकीगत; जनवार्ता :'दुसरी उडवार्ता ऐकली की, राजश्री मल्हारबा होळकर फौजसुद्धा झांसीस दाखल जाले.' – मइसा १.८.

उडव्या वि. १. उधळपट्टी करणारा; खर्चिक; अतिव्ययी. २. चुकारपणा करणारा; टाळाटाळ करणारा.

उडंग, उंडिगू पु. त्रास. [क. उंडिग]

उडंत स्त्री. वानराची लढाई.

उडंत्री स्त्री. सुताचा ताणा मागावर चढवण्यापूर्वी पाजणी (उकी) करण्याकरता लागणारे लाकडी घोडे; बैली. [कर्ना.]

उडाउडी क्रिवि. चढाओढीने; घाईघाईने; उड्या पडून; चुरशीने.[उडीचे द्वि.]

उडाऊ वि. अतिशय खर्चिक; उधळ्या. पहा : **उडव्या**

उडाऊछप्पी, उडाऊछप्पू वि. टाळाटाळी करणारा; चुकारतट्टू.

उडाण स्त्री. उडी; धाव. (ना.) [सं. उड्डान]

उडाण न. १. उठाणू; गळू. २. (ल.) बंड; उठवलेले काहूर: 'रोज उठवण्या आणावे म्हणजे या मावल्याचें उडाण फुटेल.' – पेद ६.१४७.

उडाण पु. शेताचा, जमिनीचा एकीकडचा, विलग असलेला तुकडा.

उडाणखटोले (उडाण्खटोले) न. विमान. [हिं. उडनखटोला]

उडाणटप्पू वि. १. एकाच ठिकाणी, कामात फार वेळ न टिकणारा; भटक्या; अस्थिर; चंचल वृत्तीचा. २. खुशालचंद; रिकामा; बेजबाबदारीने भटकणारा. ३. चालचलाऊ; हंगामी (उद्योग, नोकरी).

उडाणवीर पु. कोणत्याही अवघड कामात बेधडक उडी घालणारा माणूस. (को.)

उडापी वि. तात्पुरता; हंगामी.

उडाफा पु. १. एका ठिकाणी थोडे, त्यापुढे काही अंतरावर थोडे असे असण्याची स्थिती (विशेषत : जमिनीसंबंधी); निरनिराळ्या ठिकाणी एकाच मालकाची असलेली जमीन; अंतराअंतरावर असलेले जमिनीचे लहान लहान तुकडे; काही जमीन एका गावात व त्याच खातेदाराची किंवा इनामदारांची दुसऱ्या गावात असलेली काही जमीन. २. पंक्तीत पाने वगळून बसणे; अधेमधे बसणे (बैठकीत वगैरे). ३. कळपातील गुरे इकडेतिकडे पुंजक्यानी पसरलेली असणे.

उडाफी वि. उर्मट.

उडाफू वि. १. तात्पुरते; हंगामी; क्षणिक (काम, स्थिती). २. अस्थिर; चंचल मनाचा, वृत्तीचा; बेभरवशाचा (माणूस).

उडाले न. उडत बातमी; अफवा; ऐकीव बातमी :'परंतु उडालें आहे की खंडागळा मोडून सुटला – दोघे लेक धरले ऐसे वर्तमान उडालें आहे.' – पेद ३८.१८५.

उडावणी पहा : **उडवणी**

उडाळ वि. १. अस्थिर; चंचल. २. लक्ष उडालेला, मनातून, लोभातून गेलेला; मन विटलेला; पराङ्मुख. (राजा.)

उडिया, उरिया वि. ओरिसा प्रांतातील (व्यक्ती, भाषा. इ.).

उडी स्त्री. १. एका जागेवरून, मधे पाय न टेकता दुसऱ्या जागी वेगाने जाणे; झेप; उडणे; (क्रि. घालणे, मारणे, टाकणे). २. (ल.) संकल्प; इच्छेची मर्यादा. ३.(ल.) आटोका; आवाका; पल्ला; कार्यक्षमता; आकांक्षा; उमेद. (वा.) **उड्या पडणे –** झटून, तुटून पडणे (मला पाहिजे, मी करतो म्हणून); गर्दी होणे; जोराची चढाओढ लागणे; चुरस लागणे (एखाद्या गोष्टीबद्दल) : 'उंच वस्त तात्काळ विके । जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती ।' – दास १२.७.२५. **उड्या मारणे –** १. गर्व वाहणे; ऐट करणे; फुशारकी मारणे; बढाई मारणे; उद्दामपणे वागणे. २. उनाडक्या करणे. ३. चैन करणे. ४. विवक्षित मर्यादा ओलांडून, उल्लंघून जाणे. ५. गाळणे (मुद्याचा भाग, नाटकातील भाग, ग्रंथातील विशिष्ट भाग). **(बळावर, जिवावर) उड्या मारणे –** दुसऱ्याच्या आश्रयावर, आधारावर, अवलंबून मोठमोठ्या गोष्टी करणे; गर्व वाहणे; मोठमोठ्या कार्याला हात घालणे. **उडी घेणे** – बेधडक भाग घेणे; सर्वस्वानिशी आणि परिणामाची पर्वा न करता स्वत:ला झोकून देणे (एखाद्या कार्यात) : 'आर्यसमाजाने या आंदोलनात उडी घेण्याचे ठरविले.' – हैस्वाआ १०५.

उडी स्त्री. दुसऱ्याचा बैल कामाकरिता आणल्याबद्दल धान्याच्या किंवा पैशाच्या रूपाने द्यायचे मूल्य; भाड्याने जनावरे आणून शेती करणे. (राजा.)

उडीद पु. एक द्विदल धान्य. याचे झुडूप अथवा वेल हात दीड हात उंच वाढते. उडदाचा रंग काळा असून डाळ पांढरी असते : 'उडदांमाजी काळे गोरे । काय निवडावे निवडणारें ।' – व्यं १४.

उडीद पु. नेम धरण्यासाठी बंदुकीच्या नळीवर असलेली माशी. लहान उंचवटा.

उडीदमुहूर्त पु. १. विवाहाच्या आदल्या दिवशी करायचे एक देवकार्य. यावेळी गणपती प्रीत्यर्थ उडीद दळण्यात येतात. २. (ल.) विवाहसमारंभाचा आरंभ.

उडीदान न. पु. उडीदाचे केलेले खाद्य पदार्थ. : 'मज उडीदान न साहे ।' – लीचपू ४६४.

उडीव पहा : **उडवा** २ : 'गोसावियासि तीकोपाध्यांचीय उडीवां बारा वरिखेपर्यंत अवस्थान.' – गोप्र ६.

उडुकदुडूक क्रिवि. उडतउडत; अव्यवस्थित : 'आम्ही उडुकदुडूक लेहून दिल्हे आहे ते कोणास न दाखविणे.' – पुरंद ३.१७८.

उडुगण पु. तारकापुंज; नक्षत्रांचा समूह. [सं.]

उडुप पु. १. चंद्र. २. नौका. [सं. उडु+प]

उडुपति, उडुराज पु. चंद्र : 'तंव उडुराज उदेला गगनीं ।' – रास १.१००. [सं.]

उडेलटप्पू पहा : **उडाणटप्पू**

उड्डाण न. लाठीच्या खेळातील घोट्यावरील वार चुकविण्याकरिता बचावाची पद्धत.

उड्डाण न. आकाशात घेतलेली झेप. पहा : **उडी** : 'एकेंचि उड्डाणें सातांहि सागरां । प्रदक्षिणा कीजें ।' –ज्ञा १०.२५०. [सं. उड्डयन]

उड्डाण पट्टी विमान अवकाशात झेपवण्यासाठी व उतरवण्यासाठीचा मार्ग.

उड्डाणबैठक स्त्री. (व्याया.) बैठक मारून वर उठताना उडी मारणे व नंतर पुन्हा खाली बसणे.

उड्डियान न. हृदयस्थान; अनाहतचक्र. [सं.]

उड्डियानबंध पु. योगातील एक बंध; हठयोगात मूल, उड्डियान व जालंदर असे बंधाचे तीन प्रकार आहेत.

उड्या वि. १. उडी मारणारा. २. धमक असलेला; हुषार; चलाख.

उढणे पहा : **उडणे** ५. : '... देशमुख त्यापासून द्वाही देत असतां उढोन जिवे मारला.' – शिचसाखं २.११६.

उढा पु. बांबूची एक जात.

उणखुण, उणखूण स्त्री. १. हेतू; मनोगत; कामना : 'नायट्यांभेण । न मोडिजे नागांची आण । तैसी पाळी उणखुण । स्त्रियेची जो ।।' –ज्ञा १३.८०१. २. वर्म; रहस्य : 'म्हणोनि एक एकाधीन । जाणती उणखूण येरयेरां ।' – निगा १७७. ३. प्रत्यय; अनुभव : 'तें शोधित सत्त्वाचें लक्षण । हे मी जाणें उणखूण ।' – एभा ११.७२५. ४. ओळखण्याचे लक्षण; चिन्ह; खाणाखुणा : 'एकोनियां उणखुणेसी । चरफडी जैसी विव्हळ ।' – एभा २३.९७३.

उणवट वि. अल्प मोलाचे; कमी किंमतीचा. [सं. ऊन+वत्]

उणवाई स्त्री. कमतरता; कमीपणा; तोटा; टंचाई. (को.) [सं. ऊन]

उणा वि. १. कमी; अपुरा; नेहमीपेक्षा कमी; विवक्षित परिमाणापेक्षा कमी : 'काय उणें कां करितोसि चोरी ।' – तुगा ११९. २. अपुरा; अपूर्ण; सदोष (कार्य, सामग्री); अपुरी असलेली (गोष्ट). ३. हलका; कमी योग्यतेचा, प्रतीचा : 'म्हणौनि आसुरी उणी । संपदा नव्हे ।।' – ज्ञा १६.२५६. ४. मानहानिकारक; अयोग्य; एखाद्याचे व्यंगदर्शक (शब्द, भाषण इ.) : 'बोले शब्द उणा विदेह पिसुणामध्यें तदा त्या गुणा ।।' – आसी ५१. ५. नपुंसक : 'वडील बाईल म्हणे उण्या । धाकटी बाईल म्हणे सुन्या ।।' – नामदेवनाटक १९. ६. गैरहजर; अविद्यमान. [सं. ऊन]

उणाअधिक वि. अयोग्य; गैर : 'गावात काही उणाअधिक प्रकार झाला म्हणजे अण्णा खवळत.' – एल्गार ४४.

उणाअप्रा वि. अपुरा; विवक्षित मापाहून कमी (कापड). पहा : **उणा**.

उणाक, उणाख वि. हलक्या प्रतीचे; कमी किंमतीचे (हलके, विटणारे वस्त्र, माल वगैरे) : 'त्याप्रमाणे उणाख आणि मध्यम शालजोड्या पाहून पाठवून देणे.' – पेद १८.७२.

उणाके, उणाखे न. हलके वस्त्र : 'बाजी नारायण पुरंदरे यांना उणाखीं मिळाली होतीं.' – भात्रै १०.३.१२७.

उणाखट वि. हलका (भारी नव्हे असा); हलक्या किंमतीचा : 'त्यास बंगाल्यापैकी रेशमी जिन्नस उणाखट, तापते, मुगठे, गुदर, कचे रेशीम बहुत करून येत असते ...' – नाग १.२०५.

उणादुणा वि. १. अपमानकारक; कमीअधिक; तिरस्कारदर्शक; मर्मभेदक (शब्द, बोलणे). २. सरासरी. पहा : **उणापुरा** [सं. ऊन+द्विगुण.]

उणारणे सक्रि. पेरणे; वर फेकणे; उधळणे : 'रामाची राणी सीता । कशी रावणानं नेली । गळ्यात रत्नहार । मोती उणारीत गेली ।।' – वलो. (व.)

उणाव पु. कमीपणा. पहा : **उणवाई**

उणावणे अक्रि. १. कमी होणे; कमीपणा, उणीव, न्यूनता येणे; पूर्व

स्थितीपेक्षा ऊणा होणे (पर्जन्य, रोग इ.) :'ज्येष्ठ अंधत्वे उणाविला ॥' – मुआदि २५.८६. २. तीव्रता कमी होणे; शिथिल होणे. ३. उतरणे; खालावणे; अवनती होणे; क्षीण होणे. [सं. ऊन]

उणावळ स्त्री. उणीव; सूट; कमीपणा; टंचाई; कमतरता.

उणावा पहा : **उणावळ** :'का अजून काही उणावा आहे?' – जैत ४९.

उणांग वि. कमी; हलका; हलक्या दर्जाचा. (गो.) [सं. ऊन+अंग]

उणीदुणी–री काढणे दोष, उणिवा काढणे :'एकमेकांची उणीदुरी काढू लागते.' – युगान्त १३२.

उणीव स्त्री. १. कमीपणा; उणेपणा. २. दोष; व्यंग. [सं. ऊन]

उणुखुणु पु. लहानशा इच्छेचे संकेत :'उणुखुणु पुसीलेया न बने । तेथ दुखकरी ।' – ज्ञाप्र ९९०.

उणे न. १.कमीपणा; कमतरता; दोष; व्यंग; अपुरेपणा; वैगुण्य :'दैत्यीं देवां आणिलें उणें ॥' – ज्ञा ९.४५०.

शअ. वाचून; शिवाय; वीण :'जीव घेतलिया उणें चालों नेणसी साजणें ॥' – अमृ २.३९. [सं. ऊन] (वा.)**उणे आणणे** – दोष लावणे; कमीपणा आणणे; लाजविणे :'वरि झळकति दिव्य कळस । उणे आणति उडुगणास ।' **उणे घेणे –** आपल्या कमीपणाबद्दल मनास लावून घेणे; दुःख पावणे; स्वतःला कमी समजणे. **उणे पाहणे, उणे काढणे** – दोष पाहणे; व्यंग काढणे; नावे ठेवणे.

उणे वि. वजा करायचा, कमी करायचा (भाग, अंश); ऋण (अंश).

उणेउत्तर, उणेभाषण न. अपमानकारक, तिरस्कारव्यंजक, मानभंग करणारे उत्तर.

उणेचिन्ह न. एका संख्येतून दुसरी संख्या वजा करायची असता या दुसऱ्या संख्येमागे करावयाचे आडव्या रेषेचे (–) ऋणचिन्ह.

उणुदुणे, उणेदुरे वि. अपमानकारक; निंदाव्यंजक; कमीअधिक; पाणउतारा करणारी (भाषण); घालूनपाडून बोललेले. दोष. पहा : **उणादुणा** :'भाऊसाहेब काका साहेबांना उणुदुरे बोलत असलेले पाहून नमूताईंना जरा राग आला.' – हाच का धर्म ३३.[उणेचे द्वि.] (वा.) **उणुदुणे काढणे** – पहा : **उणीदुरी काढणे** :'स्वतः करणे टाकून दुसऱ्याच्या करण्यात उणेदुणे काढत बसतील.' – कोउ ८३. **उणेदुरे बोलणे** – अपमानकारक बोलणे :'नवरा मारतो व सासू सारखी उणेदुरे बोलते असे ती सांगत होती.' – परिपूर्ती ३१.

उणेपणा पु. दोष; कमीपणा.

उणेपाणे, उणे, पाताळे न. दोष :'एकमेकांची उणीपाणी काढण्यांतच जर आपला असा वेळ जायचा तर उद्या रणागणांवर काय होणार?' – डाव जिंकला. 'त्यांचे कशाला उणेंपाताळें काढतेस?' – नामदेव नाटक ७६.

उणेवाईट न. दोष :'काय उणेवाईट आहे तुझ्यात?' – व्यंमाक ४.

उत् अ. एक उपसर्ग. वर, उंच, बाहेर, श्रेष्ठ या अर्थी शब्दास जोडतात. उदा. – उत्क्रांती, उत्तीर्ण इ. [सं.]

उत उअ. अथवा :'अर्जुन म्हणे उभार रे सिंहत्व त्यजुनियां न कुतरा हो । उत राहो, क्षण पाहो, जा यमभट हो । तळीं न उतरा हो ॥' – मोवन ९.४३. [सं.]

उतक स्त्री. चूल.

उतकटित वि. कोरलेले.

उतकड न. पेंडस; फुळका; सुखडी सोलण्याचे कोकणातील हत्यार. मुसळापेक्षा थोड्या जाड अशा तीन फूट लांबीच्या मुठीवर पंजासारखा फाळ बसवलेला असतो. ही मूठ जमिनीत दीड फूट खोल पुरतात. या फाळावर तीन धावांत नारळ सुखडीतून बाहेर येतो :'गोठ्यातल्या उतकडावर तो सुखडी सोलीत होता.' – रथ २.

उतकवळी स्त्री. उत्कट आलिंगन :'घेताय उतकवळी ।' – शिव ५९६.

उतटणे अक्रि. १. तडकणे; उकलणे; उलणे; उसवणे; ताणून फाटणे; फुटणे; तटतटणे (ताणल्याने, आतून जोर झाल्याने बंद इत्यादी) :'मग शिवणी जैशी उतटे ॥' –ज्ञा ६.२६६. २. घट्ट होणे; दाटणे; अतिशय ताण बसून तुटणे :'हे चोळी गेली उतटौनि । तेचि जाणिलें मियां ॥' – शिव २२५.

सक्रि. उकलणे; फाडणे; ताणून तोडणे इ. [सं. उत्+तन्]

उतटणे अक्रि. उचंबळणे; ओथंबणे; भरून येणे; विदीर्ण होणे :'कीं हे सुखाचीं तारूवें लोटलीं । आक्षे आनंदे उतटलीं ।' –दास १.७.३१. [सं. उत्+तट= वर येणे]

उतणणे उक्रि. गवत काढून टाकणे; गवत, झाप इत्यादिकांनी आच्छादिलेल्या घरावरील तण किंवा झाप काढून टाकणे. [सं. उत्+तृण]

उतणणे अक्रि. गर्वाने फुगून जाणे; ताणणे. [सं.उत्+तन्]

उतणे अक्रि. १. उकलून वर येणे (दूध, कढी वगैरे) :'जैसे उतलें आगीं पडे । ते नलगेचि होमा ॥' – ज्ञा १८.१९३. २. पू वगैरे येणे (डोळ्यांतून). ३. ओठादी अंगावर पुटकुळ्या, फोड येणे (तापामुळे, वस्तरा लागून). ४. बिब्बा वगैरे लागल्यामुळे चिघळणे; फुगून वर येणे :'कोणे सवतीनें भरला भिलावा उतला ।' – निर्गुणाचा पाळणा १२. ५. खतखतणे; खदखद होणे (आगीवाचून शिजल्याप्रमाणे); (काही चूर्णांवर लिंबाचा रस घातला असता होते तसे) फेस येणे. ६. भरून वाहणे :'कोपावेशें झाले कल्पांतीचे समुद्रसें उततें ॥' – मोभीष्म ९.२६. ७.(ल.) गर्वाने फुगून जाणे :'किंबहुना ऐसेसें । उतणें जें संपत्तिमिसें ।' – ज्ञा १६.२२९. ८. उसळणे; उचंबळून वर येणे :'कल्पांतींचे जसे जलचि उतते ।' – मोवन १०.३९. ९. माजणे; फुगणे; ताठणे; जोराने वाढणे (पीक, गवत, भाजी वगैरे). १०. अतिशय समृद्ध होणे; कल्पनेबाहेर बहर येणे (धान्य, फळ वगैरेस).[सं. उत्+तन्] (वा.) **उतू जाणे** – खर्च होणे, नुकसान होणे; दूध वर येऊन वाया जाणे. उतास येणे; वर येणे (दूध इ.); फेस येणे; (ल.) रहस्य असणे; आटोकाट; अतिशय प्रेम असणे.

उतणेमातणे अक्रि. उन्मत्त होणे; वाटेल तसे वागणे :'उतले, मातले माडी प्यालेल्या कुळवाड्यासारखे.' – पडघ २७.

उततणे अक्रि. उचंबळणे. पहा : **उतणे** ८. [सं. उत्+तन्]

उतती स्त्री. खारीक :'बादामे आकरोटे खिसमिस । उतत्या आणवील्या सवंगा ॥' – सारुह ३.४८. [का. उत्तुते=खारीक]

उतप वि. (प्र.) उताप; उघडे; ज्यावर चांगले ऊन येत आहे असे; छायारहित. [सं. उत्+तप्]

उतफती वि. उत्पाती; दगेखोर; पेंढारा :' ... रावसाहेबांकडील लोकांनी

उतफती कांटेगारीस उठले.' – ऐलेसं ८०५. [सं. उत्पात]

उतफाळणे सक्रि. फाडून टाकणे; फाडून तुकडे तुकडे करणे; चिंध्या करणे; वाभाडे काढणे. [सं. उत्फालन]

उतमाच, उतमाज, उतमात पु. स्त्री. १. उच्छाद; उपद्रव; उच्छृंखळपणा. (ना.व.) २. माजोरीपणा; गर्व; मस्तवालपणा : 'नसती उतमात करायला काही ना काही क्षुल्लक कारण हवं असतं यांना.' – पैआ १८.

उतरचट वि. वारंवार चढण किंवा उतरण असलेले; उंचसखल; स्त्री. चढण्याउतण्याची क्रिया.

उतरट वि. उतार असलेला; उतरता. [सं. उत्+तॄ]

उतरड स्त्री. १. ढाळ; उतार. २. उसाच्या लाकडी चरकातील नराचा आस ज्यात फिरतो तो आडवा दांडा; अडवट. [सं. उत्+तृ]

उतरड, उतरंड स्त्री. निवडुंगावर वाढणारा एक तऱ्हेचा वेल. ह्याच्या रसाने अगर चूर्णाने चामड्यावरील केस निघून जातात. [का. उतरणी]

उतरड, उतरंड, उतरण स्त्री. १. खाली मोठे व वर लहान अशा रीतीने एकावर एक भांडी, गाडगी ठेवून केलेली रचना : 'मनोरथांच्या उतरंडी । उतरी रची ।।' – ज्ञा १३.११४. २. घोड्याचे एक वाईट लक्षण (कपाळावर एकावर एक असे तीन उलटे भोवरे असणे) [सं. उत्+तृ.] (वा.) **उतरंडीचा वाघ –** घरात शौर्य दाखविणारा भेकड मनुष्य. **उतरंडी उतरणे –** दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करणे.

उतरण स्त्री. १. उतार असलेली जमीन; उतरड; ढाळ. २. उतार; उतरता रस्ता. ३. (उत्तरायणातील) उत्तरेकडून वाहणारा वारा. ४. वय, संपत्ती वगैरेस लागलेली ओहोटी; कमी होत जाणे; अवनती; हीन स्थिती. ५. (यंत्र) क्षितिजपातळीशी कलती अशी पातळी; ६. पिकविण्याकरिता झाडावरून आंबे उतरवणे.

न. ज्या ठिकाणी नदीतून पायाने चालत जाता येते अशी जागा; उतार.

उतरण स्त्री. पानवेलीचे वेल जोमाने चढावेत म्हणून वर्षातून एकदा पुन्हा गुंडाळून पुरतात ती क्रिया.

उतरण स्त्री. बरीच वर्षे जगणारी एक औषधी वेल. हिला जोडफळे येतात. त्यात रेशमासारखा कापूस असतो. हिच्या पानांचा रस खोकल्यास देतात.

उतरणावळ स्त्री. १. नक्कल करण्याची मजुरी. २. गलबत, होडी, गाडी वगैरेतून ओझे उतरून दुसरीकडे नेऊन ठेवल्याबद्दल द्यायची मजुरी. ३. नावेतून पलीकडे नेण्याबद्दलचे भाडे. ४. मुक्काम केल्याबद्दलचे भाडे. ५. झाडावरून फळे अलगद काढण्याबद्दल द्यायची मजुरी.

उतरणे सक्रि. १. जमिनीवर ठेवणे; वरचा पदार्थ खाली आणणे, ठेवणे. २. मुक्कामावर ओझे वगैरे ठेवणे; खाली, रिकामे करणे; माल काढून ठेवणे (गाडीतून, गलबतातून). ३. खाली आणणे; खाली येण्यास मदत करणे. ४. उंची कमी करणे; ठेंगणे करणे. ५. पलीकडे नेणे; पार करणे (नदीतून वगैरे) ६. उतरून घेणे; पाहून काढणे; चित्र काढणे; छबी काढणे; प्रतिमा काढणे; नमुन्याबरहुकूम करणे; कृती, हावभाव वगैरेची नक्कल करणे. ७. धारा, भाव, मागणी वगैरे कमी करणे; प्रमाण अल्प करणे. ८. अपकर्म करणे; दर्जा, हुद्दा, योग्यता कमी करणे; गर्व नाहीसा करणे. (ताशेरा इत्यादिद्वारा). ९. तीव्रता कमी करणे; शांत करणे (विष, मादक पदार्थ वगैरेंची). १०. नारळ, मीठ, मोहऱ्या वगैरे पदार्थ अंगावरून ओवाळून टाकणे : 'ज्यासी हृदयीं ध्याती पद्मजधूर्जटी । त्यावरोनि यशोदा उतरी दृष्टी ।' – हरि. १३.१६१. ११. नाक, कान, जीभ वगैरे अवयव कापून टाकणे : 'या खड्गें हें शिर उतरीं हा देह पडूं दे रणीं ।' – विक २९. १२. (नदी, समुद्र इ.) पार जाणे; पलीकडे जाणे : 'बहु दुस्तर विपदंबुराशि उतराया ।' – मोकर्ण ७.२३. १३. अंगावरून काढणे (कपडे, दागिने वगैरे). १४. (उतरते, छप्पर, पडवी, सोपा वगैरे) तयार करणे; बांधून सिद्ध करणे. १५. काढून टाकणे (घराचा वरील भाग इ.) १६. कापून टाकणे, साफ करणे (दाढी, मिशा वगैरे). १७. (पत्त्याच्या खेळात) पान टाकणे. १८. झाडावरून फळे वगैरे काढणे. १९. वरून खाली येणे (घाट, जिना वगैरे). [सं. उत्+तृ]

उतरणे अक्रि. १. (जिना, घाट, पर्वत वगैरेवरून) खाली येणे : 'उतरलें उदक पर्वत वळघे ।' – ज्ञा १०.६९. २. मुक्काम करणे; थांबणे; वाहनातून खाली येणे. ३. व्याधी, रोग वगैरेतून पार पडणे. ४. परीक्षेत यश मिळविणे; उत्तीर्ण होणे; पास होणे. ५. संकटातून पार पडणे : 'तुम्हां जड भवार्णवीं उतरिता न दासा पडे ।' – केका १२१. ६. विशिष्ट दिशेकडे वळणे. ७. गरोदर स्त्री प्रसूतीपासून मोकळी होणे, हातीपायी सुटणे. ८. (लहान मुलींच्या खेळाच्या प्रारंभी) चकून पार पडणे. (वा.) **उतरून टाकणे –** १. तबल्यावरील वाद्या, साज वगैरे काढून टाकणे. २. ओवाळून टाकणे (आजारी माणसावरून खाद्य पदार्थ, प्राणी वगैरे). ३. (सामा.) खाली काढणे.

उतरणे अक्रि. (संगीत) ध्वनी विशिष्ट पट्टीच्या (पातळीच्या) खाली येणे. (तबला, तंबोरा, सतार, सारंगी इ.).

उतरणे अक्रि. लागणे; उत्पन्न होणे : 'जयाचिया दृष्टी उतरे' – विसिंपू २.१६.

उतरणे अक्रि. अपमानास्पद वागणूक देण्यासाठी किंवा पैज इ. हरण्याचा परिणाम म्हणून मिशा, कल्ले काढून टाकणे.

उतरणे अक्रि. पान्हवणे; पान्हा सोडणे : 'आमच्या म्हशीला कोंडा पुढे ठेवावा लागतो. त्याशिवाय ती उतरत नाहीं.' – खेस्व १७१.

उतरणे अक्रि. हिशेब, माप, भविष्य इत्यादी बरोबर जमणे, पटणे; ताळा पडणे; मुळाबरहुकूम नक्कल तयार होणे : 'आता ग्रंथकारांच्या म्हणण्याप्रमाणे भाषांतर उतरले आहे.' – विवि ८.८.८४.

उतरणे अक्रि. १. धैर्य, राग, भीती, ज्वर, दर, भाव इत्यादी कमी होणे. २. कोमेजणे, निर्जीव होणे; निकृष्टावस्थेप्रत जाणे; म्लान होणे, सुकणे (चेहरा) : 'करितां अधर्म सद्यः स्वपितृसुहृज्जन मुखप्रभा उतरे ।' – मोआदि ९.५७. ३. प्रकृती खालावणे; वस्त्र जीर्ण होणे; शरीर, मासे, मोत्ये वगैरेंचा तजेला नाहीसा होणे. ४. फळ वगैरे अधिक पिकणे.

उतरणे अक्रि. १. अढी वगैरे बरोबर पिकून तयार होणे. २. योग्य रीतीने बनणे, तयार होणे.

उतरणे अक्रि. मर्जीतून जाणे; नाखुषी होणे.

उतरणे अक्रि. मनाला पटणे; योग्य वाटणे; पसंत होणे : 'हें नाटक लोकांच्या पसंतीस उतरले.' विवि ९.८.१७५.

उतरणे अक्रि. मोती वगैरेचे छिद्र मोठे होणे; वेजी उतरणे.

उतरणे अक्रि. नाहीसे होणे; फिटणे : 'तें सुतकें सूतक उतरें' – एभा. २१.१२५.

उतरता वि. १. उतरण असलेला; उताराचा.२. क्षीण होत चाललेला; अधोगतीस गेलेला; खाली येणारा. ३. अदृश्य होत असलेला; मावळता. ४. क्रमाने खाली येणारा. ५. (गंजिफा, पत्ते इ. खेळात) दहिल्याच्या मागे नवल्याने त्याच्या मागे अठ्ठ्याने हुकूम व्हावे अशी उतरती पाने. (वा.) **उतरत्या पायरीस लागणे** – ऱ्हास होत जाणे. **उतरती कळा लागणे** – ऱ्हास होणे. **उतरता काळ** सामर्थ्य, सत्ता कमी होत जातात असा काळ. **उतरता पाया** अवनत स्थिती; अवनती; अधोगती; हीन स्थिती. **उतरती कमान** निकृष्टावस्था; अपकर्ष; वाईट दिवस; क्षय; ऱ्हास. **उतरती कळा, उतरती दशा, उतरती पायरी** विपन्नावस्था; ऱ्हास; खालावलेली स्थिती : 'उच्चावस्था प्राप्त झाली कीं त्याबरोबरच उतरती कळा लागावयाची.' – विवि. ८.९.१६१.

उतरती बाजू १. उतरण; उतरत येणारी बाजू, याच्या उलट चढती बाजू. २. दशावतारी गंजिफांतील परशरामापासून पुढील पाच बाजू.

उतरती भाजणी (ग.) भारी परिणामाच्या अंकास हलक्या परिमाणाचे रूप देणे. जसे : – रुपयाचे पैसे करणे, किलोमीटरचे मीटर करणे.

उतरती वेळ १. खाली जाणारा दिवस; दोन प्रहर टळल्यानंतर सायंकाळपर्यंतचा काळ. २. खालावलेली स्थिती; वार्धक्याचा काळ.

उतरती श्रेढी (ग.) पदांची एक मालिका. यामध्ये संख्या क्रमाक्रमाने लहान होत जातात.

उतरती सीमान्त उपयोगिता स्त्री. विशिष्ट मर्यादेनंतर घेतलेल्या प्रत्येक शेवट नगाची कमी होत जाणारी उपयुक्तता.

उतरत्या प्रत्ययाचा सिद्धान्त पु. विशिष्ट मर्यादेनंतर दिलेल्या प्रत्येक मात्रेपासून क्रमाने कमी होणाऱ्या परिणामांचा नियम.

उतरपराई (प्र.) उत्तरपराई. तारुण्यानंतरचा काळ; आयुष्याचा उत्तरार्ध; उतरती कळा. [सं. उत्तर + परार्ध.]

उतरपेठ उतारपेठ; मोंढा; मुख्य व्यापारी ठिकाण; व्यापाराचे जिन्नस ज्या ठिकाणी अनेक ठिकाणाहून येऊन पुन्हा निरनिराळ्या ठिकाणी पाठविले जातात अशी व्यापाराची जागा.

उतरल, उतरला पु. दाराच्या चौकटीवरील कोनाडा.

उतरवट वि. १.किंचित उतार असलेला; उतरण; उतरता (भूमिभाग). २. अधोगतीला लागलेला.

उतरवटा पु. उतार असलेली जमीन; उतरण; उतार.

उतरवण न. उतार; उतरण; सखलपणा.

उतरवणी भाताची पेज; कांजी.

उतरवा पु. उत्तरेचा; उत्तरवा; 'उत्तरवा वारा फार, याकरितां वरत्या येत नाही...' –पेद ३३.१५३.

उतरवाट उतार असलेली वाट.

उतरविणे सक्रि. उतरणे प्रयोजक. १.खाली आणणे, काढणे; खाली यायला लावणे. पहा : **उतरणे** : 'तिरंदाजानें गलबताचें निशाण उतरावयाचा व किनाऱ्याकडे जावयाचा हुकूम सोडला.' – कोरकि ९. २. तयार करून घेणे. कातरणे; कमी करणे; नाहीसा करणे. (बडोदे)

उतरवेठ : स्त्री. मालाची उतारपेठ : 'की धर्माची उतरवेठ ।' ऋव. ५१.

उतरंग न. दरवाजाच्या चौकटीवरील लाकूड. (को.)[सं. उत्तर + अंग.]

उतरा पु. पडण्याची, उतरण्याची क्रिया; पडणे : 'नसतां अधिमधिं उतरा । नसतींच विघ्नें येती घरा । – नव १४.१२६.

उतराई वि. (कृपा, कर्ज, वचन इ.) उपकारांची फेड केलेला; ऋणमुक्त; कर्जफेड केली आहे असा : 'होऊनियां उतराई । लया जाय ।।' ज्ञा १५.५८६.[सं. उत्तीर्ण] (वा.) **उतराई होणे** – उपकार फेडणे : 'गुरुसी उतराई होतां । न देखों कवणियाही पदार्थां ।' –एरुस्व ५.९५.

उतराई स्त्री. १.गाडीतून माल उतरण्यास पडलेली मजुरी. २. नावेची जकात, भाडे. [हिं.] ३. उतरून काढण्याची (नक्कल, चित्र, आंबे वगैरेंची) मजुरी. ४. उतार वयाचे दिवस. (क्रि. लागणे, जडणे.) (राजा.)

उतराण स्त्री. (नाविक) उत्तरेकडून वाहणारा वारा. पहा : **उतरण** [सं. उत्तरायण.]

उतराणवारा, उतरावारा पहा : **उतराण** : '....वारासुद्धा न लागे. उतराण वारा. मुंबईकडे जाणे न होय.' – ऐलेसं २६६७.

उतरी स्त्री. अंगवस्त्र; उपरणे; उत्तरीय : 'बरवा मिरवे उतरी जोडा ।।' उषा १८४६. [सं. उत्तरीय.]

उतरीव वि. खाली पडू न देता काढलेली. (आंबे वगैरे फळे).

उतरून घेणे नक्कलणे; मुळाबरहुकूम लिहून घेणे.

उतरूनसर क्रिवि. आपणाजवळ हुकूम असून त्या खालील एक पान नसता त्या खालचे एक अगर अनेक पाने हुकूम करण्याकरिता हुकूम व त्याच रंगाचे दुसरे कोणतेतरी पान अशी दोन पाने उतरणे.

उतल वि. उथळ : 'अमृतसिंधु खोलु । उतलु कायसा ।।' –राज्ञा १८.१६.

उतली मूस : 'तें ऐक्याची आहे उतली ।' – राज्ञा ८.६३. भरून वाहणारी : 'माजि उतलिये बोडी ।' –ज्ञाप्र ७०७.

उतव पु. नदीला येणारा पहिला पूर; उथव.

उतव पु. १. कांबळे वगैरे सुकत घालण्यासाठी लहान मंडपीसारख्या तीन चार काठ्या बांधून तयार केलेली चौकट; भाळी; मंडपी. (को.) २. चुलीच्या वरच्या बाजूला स्वयंपाकाच्या वस्तू ठेवण्याची जागा. (हेट.)

उतव पहा : **ऊत** १. कढ; फसफस; उकळी; फसफसून बाहेर येणे (दूध, कढी, भात, आमटी इ.) २. ऊत; चेव; उन्माद; भर.

उतवडा पु. (कृषि.) एकाच सरीत बाजरीबरोबर अंबाडी तूर, मूग, मटकी वगैरे धान्य मिसळून पेरणे. [क. उतू = नांगरणे.]

उतवणी, उतवणे स्त्री. न. आधणाचे पाणी; उकळी आलेले पाणी.

उतवणे अक्रि. १. आधण; कढ येणे; उकळी येऊन बाहेर पडणे (दूध वगैरे.). २. उड्या मारणे; चेवणे; उन्मादणे. [सं. उत्तपन]

उतवल वि. उतावीळ.

उतविणे उक्रि. रेशमी वस्त्र, तापता वगैरे तापलेल्या खापरावर पसरून सळईने विवक्षित घड्या पाडणे. पहा : **उतू** [हिं. उतू = कापडाच्या घड्या, चूण.]

उतळ, उतळवट पहा : **उथळ, उथळवट** : 'लक्षानलक्ष कनक पात्रें।

उतळें विस्तीर्णें चित्रविचित्रें । – वेसीस्व ११.७८ [सं. उत् + तल]

उतळणे अक्रि. गदरणे; पिकण्याची लक्षणे दिसू लागणे; उजळणे (पाडाचा आंबा वगैरे.) (को.)[सं. उत् + तल.]

उतळताप पु. तापाने होणारा भडका; दाह; संताप. (गो.) [सं. उत् + तल + ताप.]

उतळपातळ स्त्री. गप्पा; फालतू बडबड; बाता; प्रौढी.

वि. अपुरे; थोडे; विरळ; तुरळक (पाऊस, पिके, इमारती, झाडे वगैरे). [पातळचे द्वि.]

उतळवाइ क्रिवि. उतावीळपणे : 'ना आइ : गोसावीयांचेया दर्शना तैसें सीणभाग फेडूनि जावें : गोसावीयांचेया दर्शना उतळवाइ जावें.' – लीचउ १८५.

उतळी स्त्री. शिबडे; शिप्तर.

उताट, उताटकी स्त्री. १. फुटायला, बाहेर पडायला होणे. २. (ल.) उतावळी; अविचार; अस्थिरता; हावरेपणा; वळवळ; चळवळ; चूळबूळ. (क्रि. येणे). [सं. उत्+तट्.]

उताटणे अक्रि. १. तटकन फुटणे (फळ); आतून भरून आल्यामुळे फळाच्या बाहेरची साल फाटणे; तटतटून येणे; भरगच्च होणे. (को.) २. (ल.) अतिशय औत्सुक्यपूर्ण होणे; प्रबल इच्छा होणे. ३. गर्वाने ताठणे.

उताडा पु. पक्वावस्था; पूर्णावस्था; तयार होणे : 'उताडा पिकाचा आलियावरी ।' – यथादी १८.३०६७.

उताणखाट स्त्री. १. उताणी पडलेली खाट. २. (ल.) तापट, उर्मट, माजोरी माणूस. [सं. उत्तान.]

उताणणे अक्रि. वर्णन करणे; जाहीर, प्रसिद्ध करणे : 'उताणितां तुझी कीर्ति । उणाव नसें आम्हातें ।' [सं. उत्+तन्]

उताणा वि. १. वर तोंड केलेला; जमिनीला पाठ लावलेला; उलथापालथा, उपडा याच्या उलट (चीत मनुष्य, पात्र, पान इ.). २. (ल.) सुस्त निरुद्योगी; ढिला. [सं. उत्तान.] (वा.) **उताणा चालणे** – गर्वाने फुगणे; ताठणे; छाती काढून प्रौढीने, आढ्यतेने चालणे : 'तैसा विद्यावयसा माजें । उताणा चालें ।।' – ज्ञा. १३.७१ **उताणा पडणे – १**. उताणा होऊन पडणे; तोंडघशी पडणे; खाली येणे. (श्रीमंत सावकार इत्यादींनी दिवाळे काढले असता असे म्हणतात.) : 'हे जुनें लोक गेले म्हणजे पंडित उताणे पडतील.' – लोश २०१. २. दरिद्री होणे : हीन स्थितीस येणे. ३. आजारी होणे. ४. रिकामे पडणे; निरुपयोगी होणे. ५. अपयश पावणे; पराभूत होणे; कोणतेही काम अंगावर येणे.

उताणापाताणा क्रिवि. खालीवर, उलथेपालथे; पोटावरून पाठीवर; गडबडा फिरवून अगदी चीत. (क्रि. करणे, पाडणे, होणे.). [उताणाचे द्वि.]

उताणे रांगा स्काऊटच्या मुलांचा एक खेळ.

उतान, उत्तान वि. १. उताणा : 'महींस पाडिला करींद्र तो उतान कौतुकें ।' – गजगौरी ५९. २. आढ्यतेचा; गर्विष्ठ : 'बहु फुरकटलासे बोल बोले उताने ।' –कृष्णकौतुक १५. [सं. उत्तान.]

उतानी, उतान्ही स्त्री. इच्छा; आवड : 'ऐंसीं जियें ज्ञानी । मुनीश्वरांची उतान्हीं ।' –ज्ञा १३.१६६. [सं. उत्+तृष्णा]

उताप वि. उन्हातील; सावली नसलेला; उघडा. [सं. उत् + तप्.]

उतापती स्त्री. उलटून हल्ला; फेरहल्ला. [सं. उत् + तप्]

उतापती काटेमारी लांडगेतोड; कत्तल; ससेहोलपट.

उतार पु. पलिकडील तीरास चालत जाता येण्यासारखी पाण्यामधील वाट : 'तो पव्हण्याहूनि पायउतारा. ।' – ज्ञा ५.१६५.

उतार पु. १. एखाद्या औषधाची तीव्रता, जोर कमी करण्याकरिता दिलेले औषध. २. विषावरील वगैरे औषध, मंत्र, उपाय, इलाज, प्रतिकार 'जेणें विष पाजिलें दुर्धर । तोचिं करूं धांवे उतार ।' –हरि १४.१६२.

उतार पु. संतोष दाखविण्याच्या वेळी अंगावरील पोशाख अथवा दागिने बक्षीस देणे.

उतार पु. १. कमी होणे; ओसरणे (नदीचा पूर, रोगाची तीव्रता, दु : ख, वैभव, कीर्ती, संपत्ती वगैरे.) ऱ्हास; शांती; शमन. २. पालट होणे; बदलणे; तीव्रता कमी होणे : 'परंतु जनकोजी शिंदे यांचे बुद्धीस उतार पडेना.' – भाब ९५. [सं. उत्+तॄ – उत्तार]

उतार पु. १. जमिनीचा उतरतेपणा; ढाळ; उतरण : 'सपाटीवरून चाललेल्या प्रवाहाला अकस्मात उतार लाभावा तसं झालं माझ्या आयुष्याचं.' – एल्गार २६. (वा.) उ**तार खाली असणे, उतार पडणे** – १. अपकर्षास लागणे; निकृष्ट स्थिती प्राप्त होत जाणे; ओहोटी लागणे; उतरती कळा लागणे; मंदी येणे. २. कमी होणे : 'काल दिलेल्या औषधानं काही उतार पडलेला नाही.' – दुर्दम्य २.६३. ३. सरासरी पीक मिळणे : 'लागणीच्या बटाट्यांना पोत्यास तीनचार पोती उतार पडला.' – गार ६०. **उतार खाली चालणे** – गती कमी करणे.

उतार पु. चौघड्याच्या अखेरीस वाजविण्याची जलद गती, बाजा.

उतार पु. होडीचे , तरीचे भाडे; होडीतून पलीकडे जाण्याचे भाडे; नोर.

उतार वि. १. वृद्धत्व आलेला; उतार वय होण्याच्या मार्गाला लागलेला. २. हीण; हिणकस; दुय्यम प्रतीचा. ३. नाशाच्या पंथाला लागलेला, मोडकळीला आलेला; ऱ्हास होण्याच्या मार्गाला लागलेला; मंदीचा; तोट्यात चाललेला. सामा. शब्द. – उतार खर्च – पत्र – पान – औषध – गोळी – पुडी – मात्रा – मोल – मोली – डाव – वाट – रंग – काळ – चावडी – मंत्र – मार्ग – मसलत – बेत.

उतार १. नक्कल : 'उतार ग्रंथाचा असे लिहिवणें ।।' दावि – २५०. २. उतारा; एका ग्रंथातील दुसऱ्या ग्रंथात घेतलेला भाग : 'त्याचि कथेचा आला कांहींसा या उतार कवनांत ।' – मोअनुशासन ८.९८.

उतार न. १. पहा : **उत्तर** (गो.) २. प्रतिध्वनी. ३. उत्तर; वचन.

उतार पु. प्रवास; प्रवासखर्च : 'उताराला पैसे पाठविलेस तर मुंबईला येईन.' – रथ २७६.

उतारकरी, उतारकरु पु. १. मुशाफिर; प्रवासी; पांथस्थ; तात्पुरता मुक्काम करणारा – केलेला. २. द्रव्य वगैरे देऊन नदीपार जाणारा.

उतारकाळ पु. म्हातारपण : 'केदाराश्रमस्वामीचा उतारकाळ झालेला.'– दहिंदू २३८.

उतारघाट पु. नदीच्या पात्रात जाण्यासाठी बांधलेल्या पायऱ्या.

उतारघात पु. विश्वासघात. (गो.)

उतारचढ स्त्री. १. तीव्रता कमी अधिक होणे; प्रमाण कमी अधिक होण्याची क्रिया (आजार, रुग्ण वगैरेंची); क्षय आणि वृद्धी; उत्कर्षापकर्ष. २. एखाद्या प्रदेशाचा उंचसखलपणा. ३. किमती कमीजास्त होणे; भावात बदल. ४. ताप कमीअधिक होणे.

उतारचावडी स्त्री. १. खेड्यातील पांथस्थ वगैरे ज्या जागेत उतरतात ते ठिकाण; चावडी; डाकबंगला; धर्मशाळा. २. (ल.) पाहुणे उतरण्याची जागा; अतिथिघर.

उतारचिठी स्त्री. १. जलमार्गावरून प्रवास करण्याचा परवाना. २. नक्कल; रद्द केलेले पत्र (पूर्वी वरील श्रीकार खोडून, फोडून पत्र रद्द करण्याची पद्धत असे.). ३. विष वगैरे उतरावे म्हणून बांधलेली, मंतरलेली चिठ्ठी, कागद. ४. कोणत्याही लेखाची नक्कल. ५. (उप.) कामावरून काढून टाकल्याचा आदेश.

उतारजमीन स्त्री. सखल होत जाणारी जमीन; उतरण.

उतारडी स्त्री. उतरंड : 'एक अमुकीए उतारडी अमुकीए मडकां असें ।' – लीचउ १४०.

उतार तसरीफ एखाद्याचा सन्मान करण्याकरिता स्वत:च्या अंगावरून काढून दिलेली वस्त्रे. पहा : **उतार** ३

उतारतळ पु. माणसे, गाड्या उतरण्याची गावाबाहेरील जागा; अड्डा; गाडीतळ; वाटेतील मुक्कामाची जागा.

उतारतेज वि. १. ज्याचे तेज कमी झाले आहे असा. २. क्षीण; निस्तेज.

उतारतोंड न. घाट उतरण्यास सुरुवात होते ती जागा; उतरणीचा आरंभ.

उतारदिवस पु. १. आयुष्याचे अखेरचे दिवस; वार्धक्य. २. आपत्काळ.

उतारपातार, उतारवितार पु. १. सर्वसामान्य प्रवासखर्च. २. तरीचे भाडे; वाहनाचे भाडे; उतार. ३. मार्गावरील कर, जकात वगैरे.

उतारपान न. १. (गंजीफा पत्त्यातील खेळात) खेळलेले, खेळायचे पान. २.हिशेब पुढे चालू केलेले, करायचे पान.

उतारपेठ स्त्री. १. निरनिराळ्या ठिकाणचा माल विकण्यासाठी येतो व खरेदी केला जातो असे बंदर, व्यापारी शहर : 'आचाराचें मूळपीठ । वेदांची उतारपेठ ।' – ज्ञा १७.२७४. २. पहा : **उतारतळ**

उतारपोशाख पु. १. अंगावरून उतरून बक्षीस दिलेली वस्त्रे. २. अंगावरून काढून टाकलेली जुनी वस्त्रे. पहा : **उतार** ३

उतारबंद पु. कोणत्याही गोष्टीची नक्कल काढली आहे असा कागद. वि. १. उतारावर असलेली; उताराची. २. अपकर्षाप्रत जाणारी.

उतारबंदर न. १. जलमार्गावरील प्रवासी व माल उतरण्याचे ठिकाण. २. जलमार्गावरील ओरवा करण्याचे, नांगर टाकण्याचे स्थळ. पहा : **बंदर**

उतारबाजी स्त्री. १. पत्त्याच्या डावातील दहिल्यापासून खालचे पत्ते. २. अंगावर येणारा, हार येत असलेला खेळ. ३. चौघड्याच्या अखेरी जलद वाजविण्याची गत; बाजा. पहा : **उतार ६**

उतारबाजू स्त्री. (पत्त्याच्या खेळात) प्रथम पान खाली टाकणारी, उतरविणारी बाजू.

उतारमणी, उतारमोहरा पु. विष उतरविणारें रत्न.

उतारमान पु. १. पाणउतारा; अपमान; अप्रतिष्ठा, अवहेलना. २.वृद्धावस्था; आयुष्याची उत्तरावस्था. वि. (व्यापक) अवमानित; अपमानित; मानखंडना केलेला.

उतारमाल पु. होडीतून पलीकडे पाठवण्याचा माल.

उतार मोडणे पहा : **उतार (न) राहणे** : 'अलीकडील मुख्याचा उतार मोडला परंतु नेहमी सूचनेस असता आपलेविशी अंत:करणापासून आहेत.' – ऐसंसाख ११.६२.

उतार न राहणे अक्रि. राबता बंद असणे; जाऊन भेटण्याची सुगमता नसणे : '... अशाश्वती आणि उतार राहिला नाही अशी गोष्ट आहे.' – ऐसंसाख ११.६२.

उतारवय न. म्हातारपण; वृद्धावस्था. [सं. उत्तरवय]

उतारवस्त्र न. १. जीर्णवस्त्र; फाटलेले कपडे. २. दुसऱ्याने अंगावरून काढलेली किंवा टाकून दिलेली वस्त्रे : 'उमदीं तरीं ते उतार वस्त्रें । घालूं नये रे अंगावर ।' –दावि ४३९.

उतारवेळ स्त्री. दोन प्रहर दिवस टळल्यावरची वेळ; संध्यासमय.

उतारा पु. उतरण्याची जागा; जानोसा; 'जुन्या सरकार वाड्यासमोरील वाड्यात खानदेशाच्या मंडळींना उतारा दिला होता.' – सयाजी १.१५७.

उतारा पु. अंगावरून ओवाळून टाकण्याचा पदार्थ (भूतबाधानिवारणार्थ) व ती क्रिया : 'ज्या महद्भूत संचरले अंगीं । त्यासि पंचाक्षरी नसे जगीं । भगवंत भेटीवाचून वेगीं । उतारा त्यासि असेचिना ।।'–जै ८१.५८.

उतारा पु. विष वगैरेवरील औषध, उपाय, इलाज.

उतारा पु. एखादा उखाणा, कोडे यांचे उत्तर, किल्ली.

उतारा पु. रचना, धाटी व सदृश शब्द असलेले परंतु विरुद्ध अर्थी श्लोक, पद्य वगैरे; किंवा समानार्थक परंतु भिन्न शब्द व रचना असलेले पद्य.

उतारा पु. १. नक्कल; प्रत; प्रतिमा; उतरून घेतलेला ग्रंथाचा किंवा भाषणाचा भाग. (क्रि. करणे). २. हुंडी वगैरे कागदपत्रांची नक्कल उतरून घ्यायची वही.

उतारा पु. नावेचे भाडे.

उतारा पु. नदी वगैरेतून पार जाण्याजोगा रस्ता. पहा : **उतार १**

उतारा पु. पाणउतारा याचा संक्षेप; अपमान; अप्रतिष्ठा; मानहानी

उतारा पु. अंगावरून काढून टाकलेली वस्त्रे, जीर्ण वस्त्रे अगर सन्मानाकरिता अंगावरून काढून दिलेली वस्त्रे.

उतारा पु. झाडावरील फळे उतरण्याकरिता द्यायची मजुरी; उतरणावळ.

उतारा पु. बडतर्फी.

उताराखाली पडणे कमी होऊ लागणे; हटणे : 'श्रीकृपेनें व्यथा उताराखाली पडली...'– ऐलेसं ८३७.

उताराबाग क्रिवि. उताराच्या अनुरोधाने. (व.)

उतारी स्त्री. १. (गंजिफांचा खेळ) आपले सर्व हुकूम एकदम लागोपाठ खेळून घेणे; देणीघेणी संपल्यावर जर तिगस्त झाली नसेल किंवा तिगस्त होऊनही खेळण्यास वाट नसेल तर उतारी करावी लागते. (क्रि. करणे.); पान टाकण्याची क्रिया. उतरणे; उतरायचे, उतरलेले पान. २. (ल.) उतरती कळा.

उतारी स्त्री. उतारू; प्रवासी; तात्पुरता मुक्काम करणारा. पु. होडीवाला; तरीवाला; नावाडी.

उतारी पु. सर्प; विंचू यांच्या विषावर उपाय करणारा; मांत्रिक.

उतारी वि. प्रत्युत्तर करणारा. (गो.)[सं. उत्तर]

उतारू वि. उतारकरी; प्रवासी; तात्पुरती वस्ती करणारा. (वा.) **उतारू होणे –** उद्युक्त होणे; तयार होणे. (माळवी)

उतारूपातारू पु. प्रवासी; वाटसरू. [उतारूचे द्वि.]

उताऱ्या वि. १. नदीवरून लोकांना उतरून नेणारा; नावाडी; होडीवाला २. झाडावरून आंबा इ. फळे उतरविणारा.

उतावळ, उतावळी स्त्री. १. घाई; गडबड; आतुरता; अति उत्कंठा; त्वरा; अधीरपणा. २. (विशेषत :) उतावळी नावाची हळव्या जोंधळ्याची एक जात; हुलगे.

उतावळा, उताविळा, उतावीळ, उतावेळ वि. अधीर; बडबड्या; घाई करणारा; उत्सुक; उत्कंठित; विलंब न खपणारा : 'नगरा आला श्रीकृष्ण । नगरनागरिक जन । उतावेळ कृष्णदर्शन । करावया धाविन्नले ।।' – एरुस्व ६.१६; 'म्हणा मज उताविळा गुणचि घेतला धावरें ।' – केका ४५; 'मदन जाहला उतावीळ' –कथा १.४.४०. [देशी–हेमचंद्र, सं. उत्ताप]

उताळे न. तलावाला घातलेल्या बांधाला पाणी कमी करता यावे म्हणून दारे ठेवलेली असतात. एरवी पाण्याची पातळी कायम ठेवण्यासाठी फळकुटांची जी दारे लावतात ती : 'खोऱ्यांनी माती दूर सारली जाऊ लागली. उताळी काढण्यात आली.' – शेलूक ९५.

उतांबणे अक्रि. साठणे : 'एकेकाजवळनी पैसे इतका उतंबलाय्....' – रैत १३७.

उती स्त्री. उद्भव; उठाण. पहा : **ऊत** : 'ऐसा न घटे विषयाची उती ।' – भाए ७३३.

उती स्त्री. उक्ती; वचन ए : 'ऐसी वसिष्ठादिकांची उती ।' – भारा बाल २.१०४. [सं. उक्ति]

उतीव वि. उकळणारे; उकळून वर येणारे पहा : **उतणे**

उतीव, उतव पु. जाळामुळे भांड्यातील पदार्थाला धुरासारखा येणारा वास. (गो.)

उतुतणे अक्रि. १. अंगावर पुरळ उठणे. २. (ल.) घाईत असणे.

उतू पु. शिवणीनुसार घडी घालून मोड पाडण्याची क्रिया.

उते न. जमीन भाजल्याशिवाय तिच्यात भाताचा रोह टाकून काढलेले पीक. नुसती नांगरट करून भाताचे केलेले रोप. (को.)

उतो अ. आणखी. [सं. उत]

उतोटी भाताची रोपे उगवलेली उतार जमीन; ज्या जमिनीवर उते करतात ती जमीन.

उतोति – ती स्त्री. खारीक. पहा : **उतती** : 'अशोक वृक्ष उतोतिया ।' –हरि १०.१५७. [का. उत्तुत्ते, उत्तोत्ते = खारीक.]

उत्कट वि. १. प्रचंड; जोरदार; अधिक; पुष्कळ. २. चांगले; सुरेख; उत्कृष्ट : 'उत्कट भव्य तेंचि घ्यावें'– दास १९.६.१५. ३. भावना चेतविणारे.

उत्कटासन न. १. योगासनाचा एक प्रकार. पायांच्या बोटांवर भार सांभाळून दोन्ही टाचांवर दोन्ही कुल्ले ठेवून बसणे व दोन्ही हात जोडणे. २. (मल्लखांब) बोंडावर ढुंगण ठेवून पाय मल्लखांबाच्या बाजूस लावून केलेले आसन. [सं.]

उत्कड पु. कुदळीचे पाते (फाळ) पुढे बसविलेले मुसळासारखे हत्यार. याचा उपयोग जमिनीत खड्डा करण्याकरिता, खोदण्याकरिता किंवा उलटे पुरून नारळ सोलण्याकरिता करतात. (को.)[सं.]

उत्कथित वि. शिजवलेले; उकडलेले; कढवलेले. [सं. उत्क्वथित.]

उत्कर पु. १.ढीग. २. केरकचरा.

उत्कर्ष पु. भरभराट; चलती; वाढ; भर; समृद्धी : 'भक्तीच्या उत्कर्षे मुक्तीचें तें पिसें ।।'– तुगा ५४७. [सं.]

उत्कर्षण न. (तत्त्व.) अव्यवहित निगामी अनुमानाचा आधारविधानापासून त्यात अनुस्यूत असलेला निष्कर्ष फलद्रूप करण्याचा एक प्रकार.[सं.]

उत्कर्षबिंदू पु. (सास.) एखाद्या घटनेचा, घटनामालिकेचा किंवा अनुभवाचा तीव्रतर किंवा उच्चतम बिंदू; नाटकातील निर्णायक क्षण; क्रमाक्रमाने चढतवाढत जाऊन शेवटी लाभलेला उत्कट क्षण. [सं.]

उत्कर्षसीमा स्त्री. (सास.) वाङ्मयात ज्या भावनेचा आविष्कार करायचा असेल तिची जास्तीतजास्त पराकाष्ठा. हा कळस गाठणारा प्रसंग.

उत्कलन न. उकळणे; उकळी.

उत्कलनांक पु. (भौ.) एखादा द्रव उकळण्याच्या वेळचे त्याचे तपमान; ज्या तपमानास एखाद्या द्रवाचा बाष्पदाब त्याच्या सभोवतीच्या वातावरणाच्या दाबाइतका असतो ते तपमान. [सं.]

उत्कलिका स्त्री. १. उकळी; एकाएकी उत्पन्न होणारी तीव्र इच्छा. [सं.]

उत्कळ स्त्री. उत्कंठा; उतावीळपणा; अधीरपणा; औत्सुक्य; घाई. पहा : **उत्कलिका** [सं. उत् + कल्]

उत्कळित न. युद्ध; कलह : 'उदयलेंसे जें उत्कळित ।'– ज्ञा. १८.१६२८. [सं. उत् + कल्.]

उत्कंठा स्त्री. उत्कट इच्छा; आशा; उत्सुकता; अधीरता; आतुरता.

उत्काडे क्रिवि. परसाकडे. [का. उक्कड = गावाची कड]

उत्कीरक पु. ओरखडणाऱ्या पक्ष्यांचा एक वर्ग. या पक्ष्यांना तीक्ष्ण नख्या असतात व त्यायोगे त्यांना ओरखडता येते. [सं. उत्+कॄ.]

उत्कीर्णक अणी स्त्री. (पुरा.) छिन्नी.

उत्कीर्ण कदलिका स्त्री. (पुरा.) भिंतीत कोरलेले दगडी किंवा लाकडी घोडे.

उत्कीर्णलेख पु. (पुरा.) कोरीव लेख. [सं.]

उत्कीलन न. १. गुंतागुंत सोडवणे; मोकळे करणे. २. (बंधनापासून) मोकळे करणे; सोडविणे, सोडणे. ३. फुलणे; उमलणे; पसरणे; उघडणे; विस्तृत करणे. [सं. उत् + कील्]

उत्कुण पु. ढेकूण. [सं. मत्कुण.]

उत्कृष्ट वि. १. अत्यंत सुंदर; चांगले; फार उत्तम; नामी. २. अत्युत्कट. [सं.]

उत्कृष्ट मुद्रा (अर्थ.) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पत असलेले चलन.

उत्केंद्र कोन (ग.) केंद्रापासून बाजूला वळलेला, दूर सरकलेला कोन.

उत्केंद्रता स्त्री. (शाप.) केंद्रापासून सरकणे, दूर होणे. [सं.]

उत्क्रम पु. १. उलटी व्यवस्था, क्रम, पद्धत; व्युत्क्रम. २. (ल.) अव्यवस्था; अनियमितता; पद्धतशीरपणाचा अभाव. [सं.]

उत्क्रमण न. (न्याय.) कायद्याचे उल्लंघन; हुकमाचे, आज्ञेचे अतिक्रमण. [सं.]

उत्क्रमण न. खालून वर जाणे; बाहेर निघणे, पडणे; उडणे; वर चढणे; निघून जाणे. उदा. प्राणोत्क्रमण = मरण : 'कीं बिंबीं ऐक्यपण । तेंचि ज्ञानियाच्या चिदंशाचे उत्क्रमण ।' – यथादी ३.७६०. [सं.]

उत्क्रामी भ्रंश (भूशा.) ज्यामध्ये खडकांची फारकन क्षितिजसमांतर झाली आहे असा स्तरभंग. हा दक्षिणगामी अथवा वामगामी असू शकतो.

उत्क्रांत वि. १. बदलाच्या परिवर्तनाच्या ओघात एका विशिष्ट अवस्थेला आलेला. २. उत्क्रमण केलेला; वर किंवा बाहेर चाललेला; निघून गेलेला; वर उडून चाललेला. [सं. उत्+क्रम्–कान्त]

उत्क्रांतमति–ती वि. व्यापक बुद्धीचा; ज्ञानी.
स्त्री. व्यापक, अफाट बुद्धी : 'नाहीं पारु गुरुभक्ती । परी गा उत्क्रांतमती ।' – ज्ञा १३.४५२.

उत्क्रांति–ती स्त्री. १. हळूहळू होणारा बदल, परिवर्तन; निसर्गक्रमानुसार टप्प्याटप्प्याने होणारा बदल, विकास, वाढ; क्रमाक्रमाने विकसित होणे. २. (समाज.) मानवी समाज आणि संस्कृती यात अश्मयुगापासून अंतराळयुगापर्यंत झालेला विकास, परिवर्तन, स्थित्यंतर.[सं. उत्+क्रम]

उत्क्रांति–ती स्त्री. १. निसर्गक्रमामध्ये जीवसृष्टीचा प्रगत टप्प्यापर्यंत होणारा विकास. २. हळूहळू कालानुक्रमे होणारी प्रगती. [सं.]

उत्क्रांति–ती स्त्री. १. बदल. २.(उप.) अपकर्ष :'श्रीमंतीतून गरिबींत जेव्हा उत्क्रांति होते तेव्हा प्रथम दागिने नाहीसे होतात.' – मानाप ५.[सं.]

उत्क्रांति–ती स्त्री. ऊर्ध्वगती; मरण. [सं.]

उत्क्रांतिक्रम युक्ति–क्ती (ग्रंथ) ग्रंथवर्गीकरणात एखाद्या विषयाचा विकासक्रम दाखविण्यासाठी योजलेली क्लृप्ती.

उत्क्रांतिधेनु–नू स्त्री. मरणसमयी सुखाने मृत्यू यावा, पापक्षालन व्हावे म्हणून ब्राम्हणाला अर्पण केलेली गाय. [सं.]

उत्क्रांतिवाद पु. १. विकासवाद; मूळ द्रव्यातील शक्तीची क्रमाक्रमाने वाढ झालेली आहे व हा पूर्वापार क्रम किंवा सरणी सोडून मध्येच उपटसुळासारखे काही निर्माण झाले नाही असे मत. २. नैसर्गिक घडामोडींमध्ये त्यांना तोंड देऊ शकणारे वनस्पती व प्राणी टिकून राहतात. त्यांतील समर्थ घटकांचे पुढच्या पिढीमध्ये आपोआप संक्रमण होते व मागच्यांपेक्षा प्रगत पिढी निर्माण होते. अशा तऱ्हेने एकाच घटकांनी बनलेल्या पूर्वजांपासून एकमेकांपासून सर्व बाबतीत अगदी निराळे असणारे जीव जन्माला येतात, हे तत्त्व. [सं.]

उत्क्वथनांक पु. (शाप.) द्रवरूप पदार्थांचे वायूत रूपांतर होण्याचे उष्णतामान. [सं.]

उत्खनक पु. (पुरा.) १. उत्खननासाठी उपयोगी पडणारी साधने, उपकरण इ. २. उत्खनन चालू करणारा मनुष्य. [सं.]

उत्खनन न. १. जमिनीतील पूर्वसंस्कृतीचे अवशेष शोधून काढण्यासाठी केलेले खोदकाम. २. खणणे; उकरणे. [सं.]

उत्खननशास्त्र न. (पुरा.) पुरातत्त्वविद्येची एक शाखा. उत्खनन करताना लागणाऱ्या अवशेषांच्या थरांवरून त्या ठिकाणी पूर्वी नांदत असलेल्या संस्कृतीचा काल ठरवण्यात येतो.

उत्खनित अवशेष (पुरा.) उत्खननातून सापडलेले प्राचीन संस्कृतीचे अवशेष. यात मानवाने बनवलेली दगडाची धातूची हत्यारे, घरेदारे, भांडीकुंडी, अलंकार, दफनपद्धती, आहार–पद्धती, मूर्ती, खेळणी, नाणी इत्यादींचा समावेश होतो.

उत्खात वि. उखडलेला; नष्ट केलेला; नायनाट केलेला; मुळासकट उपटलेला; खणलेला. [सं. उत् + खन्]

उत्छाह समारंभ; सोहळा; उत्सव : 'श्री रामनौमी' उत्साछ आला' – दावि १४ [सं. उत्सव]

उत्तती स्त्री. खारीक. पहा : **उतती** (तंजा.)[क.]

उत्तप वि. उघडा; प्रकाश असलेला; मोकळा; छायारहित; सर्वदा सूर्यकिरणांनी तापत असणारा.
न. उघडी व पूर्ण प्रकाश असणारी अशी जागा. [सं. उत्+तप्]

उत्तपा पु. तांदूळ व उडीद यांच्या आंबवलेल्या पिठाचे जाड धिरडे.

उत्तप्त वि. अतिशय तापलेले. [सं.]

उत्तम वि. १. अतिशय चांगले; उत्कृष्ट. २. प्रथम; मुख्य; वरिष्ठ. [सं.]

उत्तमखर्ग हातघाई; निकर. (व.)

उत्तमगति–ती स्त्री. १. मोक्ष; निर्वाणपदप्राप्ती. २. चांगले मरण (क्षेत्र, तीर्थ वगैरे ठिकाणी); शुभकाळी मरण येणे. ३. चांगली प्रगती (शास्त्र वगैरे मध्ये). [सं.]

उत्तमद्रव्य १. (धर्मशास्त्र) उच्च वर्णाचे (चोरलेले) धन, संपत्ती, २. सुवासिक औषधी पदार्थ. [सं.]

उत्तमपुरुष पु. १. चांगला, श्रेष्ठ पुरुष; परमेश्वर; पुरुषोत्तम. २. (व्या.) प्रथम पुरुष. [सं.]

उत्तमर्ण पु. १. धनको; सावकार. याच्या उलट अधमर्ण. २. पेढीवाला हुंडीवाला. [सं. उत्तम+ऋण]

उत्तमश्लोक वि. पुण्यकीर्ती; विख्यात; कीर्तिमान; कीर्ती पसरलेली आहे असा; पुण्यश्लोक. [सं.]

उत्तमसाहस न. (धर्मशास्त्र) १.सर्वात मोठा दंड; १००० किंवा १०८० पण. (नाणे). २. देहान्तशिक्षा; सर्वांत मोठी शिक्षा (डाग देणे, हद्दपारी, मालमत्तेची जप्ती, अवयवच्छेदन व मृत्यू या मुख्य शिक्षा होत). ३. देहांत शासनार्ह गुन्हा; सर्वात मोठा गुन्हा. ४. अतिशय कष्टाचे कार्य; अत्यंत धाडसाचे काम.

उत्तमांग न. डोके; मस्तक :'इयें उत्तमांगें होतीं फुडीं ।' – ज्ञा ११.४१८.

उत्तमोत्तम वि. अतिशय उत्तम; उत्कृष्ट; फारच चांगला.[सं.उत्तमचे द्वि.]

उत्तर न. १. जबाब; विचारलेल्या गोष्टीबाबत आपले म्हणणे सांगणे :'तो किमपि न दे उत्तर उत्तरदिशेसी सोडूनी ।' – मोविराट ३.५९. २. वाक्यरूप, पदरूप शब्द; भाषण. ३. (बायकी) गाणे किंवा एखादा हलका प्रबंध यातील एकेकवार धोकण्याजोगे लहान लहान विभाग असतात त्यापैकी प्रत्येक :'साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरीं सुफळ संप्रूण.' ४. (ग.) गणितश्रेढीत ज्या अंतराने संख्या एकापुढे एक चढत किंवा उतरत जातात ते अंतर; दोन पदांतील अंतर; उदाहरणाचे इष्टफल. ५. (कायदा) प्रतिवादीचा वादीस जबाब; समर्थन, साक्षी वगैरेचा जबाब. ६. उलट जबाब; हाजीर जबाब. [सं.]

उत्तर वि. १. पेक्षा अधिक, जास्त या अर्थी : एकोत्तर, एकोत्रा, त्रिहोत्रा, चोहोत्रा, पंचहोत्रा पंचोत्तरशत, क्रोशोत्तर योजन, अंगुलोत्तर हस्त. २. पुढील; नंतरचा; दुसरा; पूर्वच्या उलट; दूरचा याअर्थी – उत्तरार्ध, उत्तरश्लोक, उत्तररात्र. ३. श्रेष्ठ; वरचढ; अधिक चांगला याअर्थी : राजोत्तरप्रधान, नरोत्तर नारी, गुरूत्तर शिष्य, स्वाम्युत्तर सेवक, शास्त्रोत्तर वेद, ज्ञानोत्तर भक्ती. ४. नंतरचा याअर्थी – उत्तर काळ, उत्तरव्यथा – यातना, व्यय, आयुष्य, वय.
शअ. नंतर; मागाहून. उदा. इतउत्तर; तदुत्तर. [सं.]

उत्तर स्त्री. दक्षिणेच्या समोरची दिशा; पूर्वेकडे तोंड करून उभे राहिले असता डाव्या हाताला येणारी दिशा. [सं.]

उत्तर पु. एक अलंकार. जेव्हा वक्ता प्रश्नोत्तरासह आपल्या मनातील भाव, वृत्ती व्यक्त करतो तेव्हा हा अलंकार होतो. यात विचारलेले प्रश्न किंवा उत्तरे अनुमानिता येतात. उदा. 'हस्तिदंत व्याघ्रचर्म कैसे येथ मिळे तुला । सुनेचे जोंवरी रम्य विलास दिसती मुला ।।' – यावरून प्रश्न तर्किता येतो; व 'काय कठिन? दैवगती, सुख काय? प्रेमळा अशी पत्नी ।।' यात प्रश्न आणि उत्तर ही दोन्ही आहेत. [सं.]

उत्तर पु. उंबरठा : 'कांतान्यें कांतीला । उत्तर जडीला ।' – स्त्रीगीतमाला २०.

उत्तर न. १. इनाम जमीन; मालकीची जमीन. २. समासात उत्तरपदी, जसे : – देवोत्तर, ब्रह्मोत्तर : 'ब्रह्मोत्तरतें ब्राह्मणीं दिन्हलें' – शके ११२८चा पाटणशिलालेख.

उत्तर अक्षांश जी स्थळे विषुववृत्ताच्या उत्तरेस असतात त्यांचे अक्षांश.

उत्तरकथा, उत्तरभाग स्त्री. पु. एखाद्या गोष्टीचा, व्याख्यानाचा शेवटचा भाग; उपसंहार. [सं.]

उत्तरकदंब न. (ज्यो.) क्रांतिवृत्ताचे उत्तरेकडील केंद्र.

उत्तरकर्म, उत्तरकार्य, उत्तरक्रिया न. स्त्री. और्ध्वदेहिक; प्रेतसंस्कार : 'माझे उत्तरकार्य मी आपल्या हातून आटोपणार.' – विवि १४.१०.२१९. [सं.]

उत्तरकाल पु. १. भविष्यकाळ. २. मृत्युकाळ; अखेरचे दिवस; वृद्धावस्था. २. नंतरचा, मागाहूनचा, पुढील काळ. [सं.]

उत्तरकुरू पु. १. पृथ्वीच्या नवखंडांपैकी एक खंड; उत्तरेकडील, उत्तरध्रुवाजवळचा प्रदेश. २. उत्तरध्रुववृत्त.

उत्तरकोन पु. उत्तरेकडील कोपरा, दिशा. [सं.]

उत्तरखंड न. १. आर्यावर्त. पहा : **उत्तरदेश.** २. पुढील, उत्तर भाग (ग्रंथ, प्रदेश, शहर वगैरेचा). [सं.]

उत्तरगति–ती स्त्री. १. सुटका; मुक्तता. २. मोक्ष [सं.]

उत्तरगोल पु. क्रांतिवृत्ताचा उत्तरेकडील भाग. यात मेषेपासून कन्येपर्यंतच्या राशींचा अंतर्भाव होतो. [सं.]

उत्तर गोलार्ध भूमध्यवृत्ताने पृथ्वीचे दोन भाग पडतात. त्यापैकी उत्तरेकडील भाग. [सं.]

उत्तरजीवित्व न. १. नैसर्गिक परिस्थितीला तोंड देऊन सगळ्यांच्यापेक्षा जास्त जगणे, टिकाव धरणे. २. (समाज.) संस्कृती, समाज, अर्थव्यवहार यांत सबल असेल तोच टिकतो. दुर्बलांना हा अधिकार नाही. [सं.]

उत्तरजीवित्वाधिकार पु. (न्याय.) भागीदाराच्या मृत्यूनंतर मागे हयात असणाऱ्याचा संबंधित मालमत्तेवरील मालकीहक्क.

उत्तरजीवी वि. मागे जिवंत राहणारी (व्यक्ती); पश्चात जगणारा; अनुजीवी. [सं.]

उत्तरज्या स्त्री. (ग.) त्रिज्येतून भुजज्या वजा केली असता येणारे अंतर; धनु व ज्या यांची मध्यरेषा.

उत्तरडी स्त्री. १. उतरंड. २. धान्य ठेवण्याची खोली; कोठी. (तंजा.)

उत्तरण न. १. उतरणे; वरून खाली येणे. २. नदीच्या पलीकडे जाणे; नदी ओलांडणे; पैलतीरी जाणे. [सं.]

उत्तरणे अक्रि. जबाब देणे; उत्तर देणे : 'चंद्रिका खालच्या मानेने उत्तरली.' – निचं ९.

उत्तरत्र क्रिवि. १. नंतर; मागाहून; पुढे. २. पलीकडे. ३. भविष्यकाळात. [सं.]

उत्तरदशा स्त्री. १. पुढे येणारी, नंतरची स्थिती. २. उतार वय; वार्धक्य. [सं.]

उत्तरदायित्व न. जबाबदारी; 'पुस्तकात ज्या उणिवा राहून गेल्या असतील त्यांचे उत्तरदायित्व माझ्याकडेच आहे.' – लोस. [सं.]

उत्तरदायी वि. १. जबाबदार; जिम्मेदार. २. उत्तर देणारा; जाब देणारा.

उत्तरदिनांकित वि. नंतरची, पुढील तारीख घातलेला (धनादेश).[सं.]

उत्तरदिनांकित धनादेश (अर्थ.) पुढची तारीख घातलेला धनादेश. बँकेत आपल्या खात्यावर अजून रक्कम जमा व्हायची असेल तर असा चेक देण्याची पद्धत आहे.

उत्तरदिवस पु. १. पुढील दिवस; नंतरचा दिवस. २. उद्याचा दिवस; भविष्यकाळ. [सं.]

उत्तरदेश पु. आर्यावर्त; उत्तरेस हिमालयापर्यंत व दक्षिणेस विंध्य पर्वतापर्यंत आणि पूर्वपश्चिम दिशांना समुद्रांनी मर्यादित असलेला प्रदेश.

उत्तरध्रुव पु. १. उत्तरध्रुवाचा तारा. २. पृथ्वीचा सर्वात उत्तरेकडील बिंदू. [सं.]

उत्तरध्रुववृत्त न. उत्तरध्रुवबिंदूपासून २३ ।। अंशावरून जाणारे अक्षवृत्त.

उत्तरपत्र न. उत्तरासाठी पत्र; जोडपत्र; जोडकार्ड.

उत्तरपत्रिका स्त्री. परीक्षेतील प्रश्नांना दिलेली लेखी उत्तरे एकत्र असणारी वही. [सं.]

उत्तरपद न. (व्या.) समासातील दुसरे, शेवटचे पद. [सं.]

उत्तरपराई, उत्तरपऱ्हाई स्त्री. उतारवय; वृद्धावस्था.

उत्तरपक्ष पु. (कायदा) १. प्रतिवादी; त्याची बाजू. २. (भांडणतंट्यात) विरुद्ध बाजू व तिचे जबाब – समर्थन, आरोपांचे निरसन, खंडन. पूर्वपक्ष यांच्या उलट. ३. (न्यायतर्क.) उपप्रमेय; गौणप्रमेय; उपनय (प्रतिज्ञा, हेतू, उदाहरण, उपनय व निगमन या न्यायशास्त्राच्या पाच अंगांपैकी चौथे). ४. चांद्रमासातील दुसरा पंधरवडा; कृष्णपक्ष; वद्यपक्ष. ५. (सामा.) प्रत्युत्तर; पूर्वपक्षखंडन; शंकांचे समाधान. [सं.]

उत्तरपंथ पु. १. संसारापासून विरक्त होऊन परलोकसाधनार्थ तीर्थयात्रा, अरण्यवास, तपश्चर्या इत्यादी करावे म्हणून अवलंब करायचा मार्ग : 'श्रीपाद श्रीवल्लभ नाम ऐसें । झाले त्रिमूर्ति कैसे । पितयातें

म्हणतसे । जाऊ उत्तरपंथासि ।।' – गुच ५.५६. २. हिमालयात बद्रिकाश्रमाजवळ असलेले स्थान. हा मार्ग स्वर्गाकडे जातो व मानवाला तो दुर्लंघ्य आहे अशी समजूत आहे. (वा.) **उत्तरपंथास लागणे –** मरणोन्मुख होणे. [सं.]

उत्तरपंथी सरदार शिंदे – होळकर हे सरदार. पेशवाईत हे उत्तरेकडे असत.

उत्तरपालवी स्त्री. ज्या ठिकाणाहून उत्तरेकडील भाग दूरवर दिसत आहे व दक्षिणेकडील बाजू टेकडी झाडे वगैरेंनी संरक्षित आहे अशी जागा; उत्तराभिमुख अशी. दक्षिण पालवीच्या उलट. (को.)

उत्तरपाषाण युग न. (इति.) पाषाणयुगांच्या नंतरचा, पुढचा भाग.

उत्तरपूजा स्त्री. १. पूजेचा शेवटचा भाग. २. एखाद्या तात्पुरत्या स्थापन केलेल्या देवतेचे विसर्जन करतेवेळी करायची पूजा; विसर्जनविधी. [सं.]

उत्तरप्रत्युत्तर न. उत्तरावर पुन्हा उत्तर, जबाब याप्रमाणे चाललेला वाद; वादप्रतिवाद. [सं.]

उत्तरबस्ती स्त्री. १. ओटीपोट. २. मूत्रमार्गात बस्ती देण्याची नलिका.

उत्तरभाग पु. पुढील, दुसरा भाग. [सं.]

उत्तरभोजन न. रात्रीचे जेवण :'उत्तर भोजन अगत्य करावे.' – सप्र १५.२.

उत्तरमात्रा, उत्तरमात्री क्रिवि. प्रत्येक शब्दागणिक; प्रतिक्षणी; प्रतिव्यवहारी : 'तुला उत्तरमात्रां शिकविलें पाहिजे.' – शाको.

उत्तरमूलोद्योगशाला स्त्री. मूलोद्योगशाळेतील वर्गाच्या पुढील वर्ग असलेली शाळा.

उत्तरमीमांसा स्त्री. ब्रह्मसूत्रे; षड्दर्शनांतील एक दर्शन; वेदान्त. [सं.]

उत्तरराग, उत्तररागिणी पु. स्त्री. उत्तररात्री (रात्र संपायच्या वेळी) गायचे मालकंस, वसंत, सोहनी इत्यादी राग, रागिणी. [सं.]

उत्तररात्र स्त्री. मध्यरात्रीनंतरचा काल, विभाग; पहाटेचा कालभाग; मध्यरात्र व सूर्योदय यांमधील वेळ. [सं.]

उत्तरलेखापरीक्षा (शाव्य.) एखादा व्यवहार किंवा व्यवहाराची मालिका पूर्ण झाल्यानंतर लगेच किंवा काही कालानंतर त्यासंबंधीचा हिशेब.

उत्तरलोक पु. वरचा लोक; देव, ऋषी व साधू यांचे निवासस्थान.[सं.]

उत्तरवय न. वृद्धावस्था; म्हातारपण; उत्तरपराई. [सं.]

उत्तरवयस्क वि. वृद्ध; म्हातारा; वयातीत.

उत्तरवर्ती वि. १. वारस म्हणून येणारा; मागून पदावर, गादीवर बसणारा. २. पाठीमागून येणारा; नंतर असणारा; लगेच पुढे असणारा.

उत्तरवादी पु. (कायदा) प्रतिवादी.

उत्तरविधान न. उत्तरक्रिया; और्ध्वदेहिक :'तिघांसी देवोनि दहन । उत्तरविधान करविलें रायें ।' – भाराबाल १.७०. [सं.]

उत्तरवेठ पहा : **उतारपेठ** :'कीं धर्माची उत्तरवेंठ की सिद्धीची ओळगवट' – ऋ ११.

उत्तरवेदी स्त्री. यज्ञामध्ये ज्या वेदीवर मुख्य सोमादी द्रव्यांचे हवन होते ती.

उत्तरव्यवस्था स्त्री. १. भविष्यकाळची तजवीज; पुढील तरतूद. २. मृत्युपत्र. ३. उत्तरक्रिया; और्ध्वदेहिक किंवा त्यासंबंधी तजवीज.

उत्तरसंगीतपद्धति–ती स्त्री. हिंदुस्थानी संगीतपद्धती. [सं.]

उत्तरसाक्षी पु. प्रतिवादी पक्षातर्फे आलेला साक्षीदार.

उत्तरहीन वि. निरुत्तर; उत्तर देता येत नाही असा.

उत्तरक्षम वि. (ग.) सोडवता येण्यासारखा; ज्याचे बरोबर उत्तर मिळू शकेल असा.

उत्तरा स्त्री. १. नक्षत्रमालिकेतील बारावे नक्षत्र; उत्तराफाल्गुनी. २. उत्तरदिशा. [सं.]

उत्तराकांक्षी वाक्य (भाषा.) ज्यातून उत्तराची अपेक्षा आहे असे वाक्य.

उत्तराण पहा :**उतरण, उतराण**

उत्तराणी पु. आघाडा. [क. उत्तरणी]

उत्तराधिकार पु. वारसाहक्क, मनुष्याच्या मृत्युनंतर त्यांच्या मालमत्तेच्या स्वामित्वाचा, मालकीचा हक्क. [सं.]

उत्तराफाल्गुनी स्त्री. नक्षत्रमालेतील बारावे नक्षत्र; उत्तरा. [सं.]

उत्तराभाद्रपदा स्त्री. नक्षत्रमालेतील सव्वीसावे नक्षत्र. [सं.]

उत्तराभास पु. (कायदा) अप्रस्तुत; असंबद्ध; टाळाटाळीने दिलेले उत्तर; खोटा जाब. [सं.]

उत्तराभिमुख वि. ज्याचे तोंड किंवा दर्शनी भाग उत्तरेकडे आहे असा :'बाहेरी पद्मासन रचुनी । उत्तराभिमुख बैसोनि ।' – ज्ञा ८.९२. [सं.]

उत्तरायण न. (ज्यो.) सूर्य किंवा इतर ग्रहनक्षत्रे यांचे उत्तरेकडे जाणे; दुसरे अयन; हा अयनकाल; मकरवृत्तापासून कर्कवृत्तापर्यंत सूर्याच्या क्रांतीस लागणारा सहा महिन्यांचा काळ. (डिसेंबर २२ ते जून २२ किंवा माघ ते आषाढ). [सं.]

उत्तरायणपात, उत्तरायणबिंदु–दू पु. क्रांतिवृत्तापासून फिरणारा सूर्य ज्या संपातातून विषुवाचे उत्तरेस जातो तो पात किंवा बिंदू : वसंतारंभपात. [सं.]

उत्तरायणमार्ग पु. १. सूर्य मकरवृत्तापासून कर्कवृत्ताकडे जातो तो मार्ग. २. ब्रह्मलोकाचा मार्ग पहा : **अर्चिरादि मार्ग** [सं.]

उत्तरारणी स्त्री. अग्निमंथन करण्याची वरची अरणी. खालची अधरारणी.

उत्तराराधना न. स्त्री. मुख्य पूजेनंतरची पुन्हा करायची पूजा, प्रार्थना.

उत्तरार्ध पु. दोन अर्धांपैकी दुसरा अर्ध; ग्रंथादिकांचे जे दोन भागांतील त्यातील दुसरा भाग. [सं.]

उत्तरावस्था स्त्री. अखेरची अवस्था; वार्धक्य; ऱ्हास; नाश :'क्षीणपणाचा सुमुहूर्त । काळ आरंभ करी जेथ । ते हे उत्तरावस्था येथ ।' – एभा २२.५२४. [सं.]

उत्तराशा स्त्री. उत्तरदिशा :'जन कथिति, धेनु कुरूंनी वळिल्या येऊनि उत्तराशेला ।' – मोविराट नव ३०५. [सं.]

उत्तराषाढा स्त्री. नक्षत्रमालिकेतील एकविसावे नक्षत्र. [सं.]

उत्तरांग न. १. शेवटचा भाग; अंग; उपसंहार; कोणत्याही कामाच्या प्रधानभागानंतरचा भाग. २. (संगीत.) रागाच्या प,ध,नी, सा ह्या चार स्वरांचा समुदाय. ३. (तत्त्व.) एखाद्या गोष्टींची नंतरची बाजू; जर .... तर ..... प्रकारच्या विधानातील तर .... नंतरचा भाग; ज्या दोन संख्यांचे गुणोत्तर सांगितले जाते त्यातील दुसरी संख्या. [सं.]

उत्तरांगवादी राग (संगीत) ज्या रागाचा वादी स्वर त्याच्या उत्तरांगामध्ये असतो असा राग. ह्या वर्गात येणाऱ्या रागांचा गानसमय रात्री १२ वाजल्यापासून दिवसाच्या १२ वाजेपर्यंत असतो.

उत्तरी स्त्री. १. उत्तरक्रिया करते समयी गळ्यात जानव्यासारखे बांधण्यात

येणारे एक फडके. २. अंगवस्त्र; उपरणे; ओढणी; उत्तरीय. ३. स्नानसंध्यादी कर्मसमयी रामनामांकित पट्ट्यासारखे गळ्यात घालावयाचे वस्त्र. [सं. उत्तरीय]

उत्तरीय न. १. उपरणे; ओढणी; शेला; उपवस्त्र; अंगवस्र : 'बहुविस्मित नृपमुनि सुर म्हणती उडवूनि उत्तरीयांतें ।।' – मोभीष्म १२.१४. २. पहा : **उत्तरी.** ३. विशिष्ट प्रकारचा झगा; रोमन रहिवाशांचा सैल झगा; लोकरी उपरणे; टोगा. [सं.]

उत्तरीय तपासणी व्यक्तीला अनैसर्गिक किंवा संशयास्पद मरण आल्यास त्याचे कारण ठरविण्यासाठी होणारी प्रेताची तपासणी : 'उत्तरीय तपासणीपूर्वी प्रेताची ओळख पटवून घेणे आवश्यक असते.' – गुमा ४३.

उत्तरेकडील ढोंग (इति.) तोतयांचे सांकेतिक नाव.

उत्तरोत्तर क्रिवि. १. हळूहळू; दिवसानुदिवस; क्रमाक्रमाने; पुढेपुढे. २. अधिकाधिक : 'ऐसा हा उत्तरोत्तरु । ज्ञानबीजाचा विस्तारु ।' – ज्ञा ४.१९१. [सं. उत्तरचे द्वि.]

उत्तल उंची (स्था.) घराच्या पायापासून गच्चीपर्यंतची उंची.

उत्तलीय पु. (भू.) समुद्रकिनाऱ्यालगतचा उथळ पाण्याचा पट्टा. हा सर्वसाधारणपणे ओहोटीच्या खुणेपासून ते समुद्रात १०० पुरुष अथवा ६०० फूट खोल असतो. [सं.]

उत्तंभित वि. १. वर उचललेले; सरळ उभे केलेले. २. पुढे आलेले; उन्नत (स्त्रियांचे स्तन). ३. उभारलेले, वर केलेले (कान). [सं.]

उत्तंस वि. भूषण; अलंकार; तुरा. सामा. शब्द – कुलोत्तंस = कुळाला भूषण; राजोत्तंस = राजश्रेष्ठ. [सं.]

उत्तान वि. भडक; भावना उद्दीपित करणारा; अश्लील. [सं.]

उत्तान वि. १. उताणा; तोंड वर केलेला. २. उथळ. ३. सरळ; स्पष्ट; गूढ नव्हे असा (श्लोकार्थ, अभिप्राय इ.). [सं.]

उत्तानकूर्मासन न. कुक्कुटासन घालून दोन्ही हातांची मिठी मानेत घातली असता होणारे आसन. [सं.]

उत्तानमंडूकासन न. बेडकाप्रमाणे केलेले आसन. [सं.]

उत्तानवंचित संयुक्त हस्त (नृत्य.) कोपरे व खांदे वाकडे करून दोन्ही हात त्रिपताक करणे, मग त्यांचे तळहात तिरकस दिसतील असे ते ठेवणे.

उत्तानार्थ पु. सरळ, सहज समजणारा अर्थ; सोपा, उघड अर्थ.
वि. गूढ नसलेला; उघड; स्पष्ट (अर्थ इ.). [सं.]

उत्ताप न. उजेडाची व उघडी जागा.
वि. उघडी; उजेडाची; छायारहित; मोकळी; उन्हाची (जागा).[सं.]

उत्तीर्ण वि. १. (नदी, घाट, संकट इ.) उतरून पार गेलेला; कार्यातून पार पडलेला : 'जें शतमखोत्तीर्ण करा । आरूढोनि असे ।।' – ज्ञा १०.२४०. २. परीक्षेत पास झालेला; जय मिळालेला; विजयी. ३. उतराई; ऋणमुक्त : 'देऊनि मज उत्तीर्णे । जालीं आजी ।।' – ज्ञा १६.३३.[सं.] (वा.) **उत्तीर्ण होणे –** १. विजयी होणे; पास होणे. २. मरणे : 'तेथ उत्तीर्ण होईल प्राणें ।' – ज्ञा १.२०२. ३. उतराई होणे : 'उपासनेचे उत्तीर्ण व्हावे ।' – दास १५.१०.३३.

उत्तुंग वि. अतिशय उंच; (ल.) अलौकिक कर्तबगारीचा (माणूस).[सं.]

उत्तुंगता भीति–ती उंच जागी जाण्यास वाटणाऱ्या भीतीची मानसिक विकृती.

उत्तू पु. पहा : **उतू**

उत्तेजक वि. चेतना, उत्तेजन देणारे; हुरूप आणणारे; प्रोत्साहक; चेव, क्षोभ, कोप आणणारे; हुशारी, तरतरी देणारे (भाषण, पेय, प्रसंग इ.).
न. उद्दीपित करणारे, उत्साह देणारे पेय, औषध वगैरे. [सं.]

उत्तेजन न. १. जागृती; चेतना; प्रोत्साहन; उद्दीपन; स्फूर्ती; आवेश, चेव, क्षोभ येणे. २. प्रलोभन; आकर्षण. (क्रि. देणे). [सं.]

उत्तेजनात्मक नियोजन न. उत्तेजित करण्यासाठी, प्रोत्साहनाच्या हेतूने आखलेली कार्याची रूपरेषा.

उत्तेजनार्थ वि. प्रोत्साहन देण्यासाठी दिलेले. (पारितोषिक).

उत्तेजनक्षमता स्त्री. उत्तेजकाला प्रतिसाद देण्याची शक्ती, सामर्थ्य.

उत्तेजित वि. १. उत्तेजन दिलेला; उत्साही; आवेश, चेतना आणलेला; हुरूप, स्फूर्ती मिळालेला. २. प्रवर्तित; प्रवर्धित; गती वाढवणारा. ३. क्षुब्ध; उद्दीप्त. [सं.]

उत्तोल पु. शरीराचा हातावर वगैरे सांभाळलेला तोल : 'उत्तोल सांभाळण्याची क्रिया जर चांगली साधली तरच त्याचे हातून कामें होण्याची आशा असते.' – व्याज्ञा ३.२८१.

उत्था स्त्री. उत्पत्ती; जन्म; उठावणी. समासात उपयोग. उदा. मायोत्थसंसार (मायेपासून ज्याची उत्था झाली आहे तो); ज्वरोत्थ; अज्ञानोत्थ. [सं. उत्+स्था; उत्थ=उत्पन्न]

उत्थान न. १. उभे राहणे; उठणे. २. उदय. जसे :– पुनरुत्थान = पुन्हा उठणे. ३.प्रेरणा : 'मनाचं उत्थान धर्मानं करायला पाहिजे.' – पुत्र १५. ४. जागृती; प्रबोधन. [सं.]

उत्थापक वि. १. उभा करणारा; प्रवृत्त करणारा; संस्थापक; उत्पादक. २. उठविणारा. [सं.]

उत्थापणे उक्रि. १. स्थानभ्रष्ट करणे; उठवून लावणे. या व इतर अर्थी पहा :**उत्थापन** : 'असुर सुरां ते उत्थापिती । ते गाऱ्हाणें हरिशीं देती । इंद्र चंद्र प्रजापती । तेही चरफडती हरिपदा ।' – एरुस्व १.७९. २. जागेवरून काढणे, हलविणे. ३. मोठेपणा आणणे. ४. उत्तेजना देणे. [सं. उत्थापय]

उत्थापन न. १. उठवणे; उभे करणे. २. मोठेपणाला आणणे; वर आणणे : 'संस्कृत भाषेला उत्थापन देण्याच्या उद्योगास ...' – निअ ८६. ३. देव, मूर्ती इत्यादींचे विसर्जन करणे; देवकोत्थापन. ४. उत्तेजन; उठावणी. ५. खडी ताजीम; स्वागतार्थ उभे राहणे, सामोरे जाणे. (क्रि. देणे, घेणे). ६. उठवणे; अभ्युत्थान; स्थानभ्रष्ट करणे; काढून टाकणे (राज्य, नोकरी इत्यादिकांवरून). पहा : **उत्थापणे.** ७. (ग.) एका पदाऐवजी दुसरे पद, अंकाबद्दल अक्षर घालणे; बदली ठेवणे, आणणे. [सं.]

उत्थापित वि. १. उभा राहिलेला; उभारलेला; उठवलेला; स्थापलेला; कायम केलेला. २. काढून टाकलेला; दूर केलेला. [सं.]

उत्थापी चेता (वै.) उद्दीपित करणारा ज्ञानतंतू; हर्षणी चेता.

उत्थापी पेच ज्यामुळे पेच जागेवर फिरून बसविलेली वस्तू वरखाली होऊ शकते असे पेच. उदा. मोटार गाडी उचलण्यासाठी वापरलेला पेच.

उत्थित वि. उठलेला; उभा राहिलेला; वर आलेला. [सं.]

उत्थित पद्मासन पद्मासन घालून नंतर दोन्ही हात व हाताची बोटे साफ उघडून जमिनीवर टेकून, हाताच्या बोटांवर व तळहातावर सर्व भार देऊन आसन उचलून धरण्याची क्रिया. [सं.]

उत्थिति–ती स्त्री. १. उत्थान; उभे राहणे; वर येणे. २. उभे राहण्याची, वर येण्याची स्थिती. [सं.]

उत्थितोर्ध्वपद्मासन शीर्षासन करून उभ्या पायांची हळूहळू एकेक मांडी घालून तशाच स्थितीत पद्मासन करणे. याने मान, डोके, कोपर यांवर ताण बसतो व डोक्याचे पांढरे झालेले केस काळे होतात.

उत्पत्ति–त्ती स्त्री. १. जन्म; संभव; उद्भव; अस्तित्वात येणे; निर्माण होणे :'जे वेळीं ही लागे उत्पत्ती । ते वेळीं स्थिति प्रळयो हारपती ।' – ज्ञा. ११.४९६. २. प्रादुर्भाव; उत्थान; उदय. सामा. शब्द – बीजोत्पत्ती, रोगोत्पत्ती. ३. उत्पत्ती, स्थिती व संहार (लय) या तीन अवस्था प्रत्येक प्राण्याला असतात. ब्रह्मा, विष्णू व महेश (शिव) या अनुक्रमे वरील तीन अवस्थांच्या अधिष्ठात्री देवता आहेत. [सं.]

उत्पथ पु. वाईट मार्ग :'जो न मानी वेदशास्त्रार्थ । तो उत्पथामाजीं पडे ।' – एभा १९.५२७. [सं.]

उत्पथी झडप (यंत्र.) एखाद्या यंत्रव्यवस्थेमध्ये द्रव किंवा वायूचा दाब पाहिजे तेवढा ठेवण्यासाठी असलेली झडप.

उत्पन्न वि. जन्मलेले; उत्पत्ती पावलेले; उद्भूत; तयार झालेले.
न. १. फल; मिळकत; प्राप्ती (शेतकी, नोकरी, धंदा, व्यवसाय या पासून). २. नफा; खर्च वजा जाऊन शिल्लक; लाभ. ३. मूळ ठिकाण; मूळ कारण.[सं.] (वा.) **उत्पन्नास येणे –** प्राप्ती होण्याच्या अवस्थेस पोचणे; नफा, फायदा मिळू लागणे; फलदायक होणे.

उत्पन्नणे अक्रि. उत्पन्न होणे; उदय पावणे.

उत्पन्नजन्य वि. कमी अधिक उत्पन्नामुळे होणारी (लवचिकता).

उत्पन्न परिणाम पु. (अर्थ.) प्राप्तीमुळे होणारा लाभ.

उत्पन्नभक्षी वि. हातातोंडाशी गाठ असलेला; रोजच्या रोज मिळवून खाणारा; आलेले उत्पन्न लागलीच खाणारा; काही शिल्लक न टाकणारा किंवा टाकण्यास असमर्थ.

उत्पन्नभोक्ता वि. १. वडिलोपार्जित संपत्तीवर निर्वाह करणारा. २. हातातोंडाशी गाठ असलेला; उत्पन्नभक्षी.

उत्पन्नविनष्ट, विनाशी वि. १. उत्पन्न झाल्याबरोबर नष्ट होणारा; लागलीच नाश, मृत्यू पावणारा. २. क्षणभंगुर; अल्पायुषी. ३. निर्जीव.

उत्पल, उत्पळ न. १. कमळ; राजीव; पंकज :'पूजीसी नीलोत्पलीं । जीवभृंगांच्या ।।' – ज्ञा १७.६. २. एक उपरत्न. हे नील वर्णाचे असून सुंदर, स्वच्छ, पारदर्शक आणि कठीण असते.

उत्पवन न. हवेत उडणे :'घुटिका तोंडी घालीति आणि उत्पवन करीति ।' – लीच १.३४.

उत्पाटणे सक्रि. नाहीसे करणे; नाश करणे; उपटून टाकणे :'जे येवढें झाड उत्पाटी । ऐसे कायि असे ।।' – ज्ञा १५.२१०. [सं. उत्+पट्]

उत्पाटन न. उच्चाटन; उपटणे; खणून काढणे; निर्मूलन करणे. सामा. शब्द – वृक्षोत्पाटन, केशोत्पाटन. [सं.]

उत्पाटित वि. उपटलेले; नाहीसे केलेले; उखडून टाकलेले.

उत्पात न. १. भयसूचक चिन्ह, खूण; अपशकुन; भावी अरिष्टांचे सूचक चिन्ह :'झाले उत्पात बहुल तेव्हां चळचळ वसुंधरा हाले ।' – मोभीष्म १०.३८. उत्पातांचे काही प्रकार – भूकंप, उल्कापात, तडित्पतन, वृक्षोन्मूलन वगैरे. २. अनर्थ; संकट :'एका क्षुद्र आयुष्यात केवढाले उत्पात.' – रथ २७७. ३. खोड्या; दंगे; पीडा; त्रास (राजा, चोर, बंड इत्यादींचा). [सं. उत्+पत्]

उत्पातप्रलय पु. प्रलयकालचा, जगाच्या अखेरीचा अनर्थ; भयंकर, सर्वव्यापी संकट. [सं.]

उत्पातित जल उर्ध्वपातन करून शुद्ध केलेले पाणी.

उत्पाती वि. १. व्रात्य; खोडकर; द्वाड (मूल). २. साहसी; मोठा उद्योगी; हिय्येदार. ३. विध्वंसक :'१९४२ ची उत्पाती चळवळ गांधीजींना मान्य नव्हती.' – माजी ५०९. [सं. उत्पात]

उत्पाद पु. १. उत्पन्न केलेला माल, वस्तू. २. उत्पन्न करणे.

उत्पादक पु. १. पिता; निर्माणकर्ता; वस्तू निर्माण करणारा :'भारतात उत्पादक श्रम करणाऱ्या लोकांच्या संख्येपैकी ७२ टक्के लोक शेतीत राबतात.' – लोस ६९. २. संस्थापक; काही कार्य, मूळ गोष्ट काढणारा, आरंभ करणारा.
१. वि. फलदायक. २. (अर्थ.) उत्पन्न करणारा; उत्पादनक्षम; विक्रीसाठी माल तयार करणारा; धनोत्पादक. [सं. उत्+पद्]

उत्पादककाल पु. एखाद्या उत्पादनाला प्रत्यक्ष लागणारा कालावधी.

उत्पादकता स्त्री. (अर्थ.) ज्याला विनिमयमूल्य आहे असा माल किंवा सेवा उत्पादन करण्याची क्षमता.

उत्पादक वस्तु (अर्थ.) वस्तूच्या उत्पादनासाठी आवश्यक दुसरी उत्पादित वस्तू.

उत्पादकारक पु. उत्पादक साधक.

उत्पादगणना, गणति–ती उत्पादन केलेल्या मालाची मोजणी.

उत्पादणे सक्रि. १. घडवणे; जन्मास आणणे; निर्माण करणे; तयार करणे; बनवणे. २. प्रकट करणे :'शिकल्या शब्दांचे उत्पादितों ज्ञान । दर्पणींचे धन उपखायां ।' – तुगा १५५९. [सं. उत्पादन]

उत्पादन न. १. उत्पत्ती; उत्पन्न करण्याचा व्यापार, क्रिया; निर्माण करणे. २. (अर्थ.) उत्पन्न केलेला माल (कारखाने, व्यापार, शेतकी यांपासून). ३. सर्जन; उत्पन्न; उपज; पैदास; तयार माल. [सं.]

उत्पादित वि. उत्पन्न केलेला; जन्माला आणलेला. [सं.]

उत्पादितभाव पु. प्रेरणा केलेली भावना.

उत्पाद्य वि. उत्पन्न करण्यास योग्य; उत्पन्न करायचे ते.

उत्प्रणोद पु. १. ऊर्ध्वगामी, वर उचलणारा रेटा अथवा जोर. २. (भूशा.) भूकवचाचा, भूपृष्ठाचा वर आलेला भाग.

उत्प्रवासन न. परदेशात रहावयास जाणे.

उत्प्रवासी पु. (कायदा.) स्वदेश सोडून इतरत्र कायम वास्तव्य करण्याचा इरादा असलेली व्यक्ती. [सं.]

उत्प्रवाह बाहेर वाहणारा ओघ; निर्गत प्रवाह. [सं.]

उत्प्राणिद न. उज्ज व प्राण यांचा संयोग.

उत्प्रेरण न. (शाप.) वितंचक किंवा त्यासारख्या पदार्थाच्या साहाय्याने दुसऱ्या पदार्थात रासायनिक बदल होण्याची प्रक्रिया; निदेशन. उदा. डायजेस्टने तवकिराची साखर बनणे. यामध्ये निदेशक स्वत : बदलत नाही.

उत्प्रेषण लेख (शाव्य.) वरच्या न्यायालयाने खालच्या न्यायालयाला आवश्यक ते अभिलेख पाठविण्यासंबंधी दिलेला आदेश. [सं.]

उत्प्रेक्षण न. दृष्टान्त, उदाहरण देणे; दाखला देणे. [सं.]

उत्प्रेक्षणे सक्रि. (काही एक गोष्ट) उत्प्रेक्षाविषय करणे; एखाद्या गोष्टीचा दाखला, उदाहरण देणे. [सं. उत्प्रेक्षा]

उत्प्रेक्षा स्त्री. १.(सास.) एक अर्थालंकार. उपमेयावर जणू हे उपमानच आहे अशी संभावना ज्यात केलेली असते तो अलंकार. स्वरूप (उत्प्रेक्षित वस्तू पदार्थ असेल तर), हेतू (क्रियेचे कारण असेल तर), व फळ (क्रियेचे फळ असेल तर) असे उत्प्रेक्षेचे तीन प्रकार आहेत. उदा.– असें बोलोनी नळें रंजवीला । अंजुळीमाजी हंस बैसवीला । गमे चंपककुसुमौघ हार झेला । पाठवाया युवतीस सिद्ध केला ।।' – नल ८१. २. कल्पना; तर्क; युक्ती :'आइकतयां उत्प्रेक्षे सळु चढे ।' – ज्ञा १०.२६८. [सं.]

उत्प्रेक्षित वि. उत्प्रेक्षा दिलेले; तुलना केलेले; दाखला देऊन स्पष्ट केलेले. [सं.]

उत्प्लवन न. उड्डाण; उडी; भरारी :'देखें उत्प्लवनासरिसां । पक्षी फळासि झोंबे जैसा ।' – ज्ञा ३.४१. [सं.]

उत्प्लवबांध पहा : **उत्प्लवमार्ग**

उत्प्लवमार्ग पु. धरणातील जादा पाणी काढून टाकण्यासाठी केलेला पाट, मार्ग; सांडवा. [सं.]

उत्प्लवी चलनफुगवटा (अर्थ.) चलनविस्तार अमर्याद होऊन किंमतीचे मान निरंकुश वाढत राहते. चलनाची क्रयशक्ती क्षीण होत जाते. तशाही परिस्थितीत चलनविस्तार चालू राहून वास्तव व्यवहारात चलन पूर्णत : निष्प्रभ होते अशी चलनफुगवट्याची स्थिती.

उत्फती उत्पाती, दंगेखोर, पेंढारा.

उत्फालन न. उड्या मारण्याची क्रिया :'मारी मूषक थोर कोण कुहरी राहोन तें मांजरी । उत्फालेन करी करून मजला पीडा शरीरी करी ।।' – विठ्ठलकृत रसमंजरी. [सं. उत्फाल]

उत्फुल्ल, उत्फुल्लित वि. उलगडलेले; प्रसन्न; विस्तारलेले; उघडलेले; विकासलेले; उमललेले (पुष्प, नेत्र) :'अनावर आनंदाने उत्फुल्ल होण्याऐवजी..' – विजी ९६. [सं.]

उत्फुल्लिका स्त्री. मुलींचा एक प्रकारचा खेळ; बसफुगडी. [सं.]

उत्याचे भात जमीन भाजल्याशिवाय नुसती नांगरट करून त्या जमिनीत काढलेले भात. [क. उतू]

उत्रवाट पु. उत्तरीय :'बांधिलें गुंफामठ । वस्त्रें कमंडलू योगवट । पाटसूताचे उत्रवाट ।सामग्री देतसे ।।'–कालिका १७.७९. [सं. उत्तरीय+पट]

उत्रात स्त्री. संक्रांत :'आवतनी उत्रात गधडावर बसेलशे – यंदाची संक्रांत गाढवावर बसली आहे.' – संशोधन ऐलेच २५६, २६६. (खा.) [सं. उत्तरायण]

उत्रापावलाक क्रिवि. प्रत्येक शब्दागणिक व पावलाबरोबर; हरघडी. (गो.) [सं. उतर+पाद]

उत्सन्न वि. मृत; नष्ट :'कुलघातकांच्या या वर्णसंकरकारक दोषांनीं पुरातन ज्ञातिधर्म व कुलधर्म उत्सन्न होतात.' – गीर ६१०. [सं. उत्+सद्]

उत्सर्ग पु. (वै.) शरीरातून बाहेर टाकलेली वस्तू; विष्ठा; मळ. [सं.]

उत्सर्ग पु. १. बाहेर टाकणे; टाकून देणे; त्याग; दान; अर्पण. सामा. शब्द – मलात्सर्ग, मूत्रोत्सर्ग, वृषोत्सर्ग वगैरे :'संक्रमण उत्सर्ग । विण्मूत्राचा ।।' –ज्ञा १३.११९. २. नियम; विधी; रीत. उदा. उत्सर्गशास्त्र. ३. धर्म करणे; विहीर, धर्मशाळा इ. देवाला अर्पण करणे. [सं. उत्+सृज्=टाकणे]

उत्सर्गत: क्रिवि. १. सामान्यत: ; साधारण, ढोबळ मानाने. २. नियमानुसार. [सं.]

उत्सर्गव्यूह, उत्सर्जक संस्था (वै.) प्राण्यांच्या शरीरातील नको असलेले मलमूत्रादी पदार्थ बाहेर टाकण्याची क्रिया करणाऱ्या अवयवांचा समूह किंवा अवयवांची संस्था.

उत्सर्जन न. १. टाकणे; त्याग करणे; सोडून देणे. पहा : **उत्सर्ग** २. वेदाध्ययन थांबविण्याच्या वेळी करायचे कर्म; यज्ञोपवीत धारण करणारांचे एक प्रतिवार्षिक कर्म; श्रावणीतील एक कर्म. [सं.]

उत्सर्जन तंत्र बाहेर टाकण्यासाठी, उत्सर्जनासाठी उपयुक्त अशी संरचना व कार्यक्षम अवयव. [सं.]

उत्सर्जित वि. उत्सर्जन केलेला; त्याग केलेला. [सं.]

उत्सव, उत्साव पु. १. आनंद; आल्हाद; उत्साह :'या ब्राम्हणांसि आम्हा सुहृदांसि पदीं बसोनि उत्सव दे ।' – मोशांति ४.६६. २. आनंदाचा दिवस; समारंभ; सण. पहा : **उत्साह** :'आणिखी होतसे रिणदार तंटा । उत्साव भारी कारणें ।' – दावि ४९४. ३. नाचरंग; खेळ; विलास. ४. धार्मिक, सामाजिक इ. मंगल प्रसंग. [सं.]

उत्सवमूर्ति–र्ती स्त्री. १. मिरवणुकीत न्यायची देवाची प्रतिमा; भोगमूर्ती. २. केवळ शोभेचा, दिखाऊ माणूस, वस्तू :'राष्ट्रपतीला उत्सवमूर्ती करून ठेवण्याची पद्धत पडत आहे.' – लोका ४९. ३. (ल.) सभासमारंभात जिचा सत्कार करण्यात येतो ती व्यक्ती. [सं.] वि. (थट्टेने) नेहमी नटूनथटून असणारा; उत्सवाला, मानाला मात्र पुढे असणारा.

उत्संक, उत्संकल, उत्संखळ, उत्संगळ वि. अनिर्बंध; उच्छृंखल; उतावळा; अमर्याद; अप्रतिबद्ध; स्वैरवर्तनी (पोर, सासुरवाशीण इ) :'तंव श्रीकृष्ण म्हणती ऐसें । हे उत्सृंखळ बोलणें कायसें ।' – ज्ञा ६.१६२. [सं. उत्+शृंखला]

उत्संग पु. १. मांडी; जवळचे स्थान :'संतोषा उत्संगी । दिधलें घर ।।' – ज्ञा १२.१५०. २. सान्निध्य; सहवास :'जयांचियें दिठीचिया उत्संगीं ।' – ज्ञा ९.४७७. [सं.]

उत्संगसंयुक्तहस्त (नृत्य.) अराल हात उताणे करून बाहू वाकविणे व उजवा अराल हात डावीकडे व डावा हात उजवीकडे ठेवणे.

उत्संस्करण न. (पुरा.) एका समाजाने दुसऱ्या समाजाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये उचलल्यामुळे त्यांच्या प्रसाराची होणारी प्रक्रिया.

उत्सादन न. १. पतंग उडवणे (६४ कलांपैकी एक). २. नाश करणे. ३. वर जाणे, चढणे. ४. खोल नांगरणे. [सं. उत्+सद्]

उत्सादित वि. नाहीसे केलेले, नष्ट, रद्द केलेले.

उत्सार, उत्सारण पु. न. भाज्य संख्येपैकी जेथपर्यंत भागाकार झालेला आहे त्यापुढील आकडे; पुढे भागायचा प्रत्येक आकडा, पद. [सं. उत्+सृ]

उत्सारण न. (एखादा पदार्थ) बाहेर काढून टाकणे; बहिर्निष्कासन.[सं.]

उत्साह पु. १. अनुकूल भाव; उल्हास; उत्सुकता. २. आनंद; संतोष; समाधान. ३. सण; सोहळा; आनंदाचा समारंभ; मंगलप्रसंग; उत्सव; आनंददायक कार्यक्रम. वसंतोत्सव :'असो गोकुळी झाला आनंद । उत्साह करिती परमानंद ।'–हरि १२.१४४. ४. उमेद; हिंमत; नेट; निकर; धैर्य :'धर्म म्हणे, आजोबा उत्साहें कौरवार्थ भांडावें ।' – मोभीष्म १.७४. ५. वेग; जोर; आवेश :'तो उत्साहो न संवरे । इंद्रिय ओघां ।' – ऋ ६३. [सं. उत्+सह]

उत्साहबुद्धि–द्धी स्त्री. मनाची उमेद, ईर्षा; उत्सुकता; तत्परता; काम करण्याची आवड :'उत्साहबुद्धि न मनाप्रति दे उठाया ।' [सं.]

उत्साहभंग, उत्साहनाश पु. १. आनंदाचा विरस; निराशा. २. आनंददायक कार्यक्रमाचा बिघाड; त्यात आलेले विघ्न.

उत्साहमूर्ति–र्ती पु. पहा : **उत्सवमूर्ति**. १. व्यवहारात पुढे असणारा, ज्याला नेहमी पुढे करण्यात येते असा माणूस; कारभारी; फिरता व्यापारी; प्रचारक; प्रतिनिधी; आनंदाने पुढे होऊन काम करणारा; कामात इतरांना उत्साह वाटेल असे वागणारा. [सं.]

उत्साहवान, उत्साही वि. १. उमेद असलेला; आनंदी; उत्साहाने काम करणारा. २. तत्पर; उत्सुक; दीर्घोद्योगी. [सं.]

उत्साहशक्ति–क्ती स्त्री. उमेद; आत्मविश्वास; धमक; जयाबद्दलची खात्री; युद्धोपयोगी तीन शक्तींपैकी एक. दुसऱ्या दोन म्हणजे प्रभुशक्ती आणि मंत्रशक्ती. [सं.]

उत्साहित वि. १. उत्साही; आनंदित; प्रमुदित; उत्साह पावलेला, आणलेला. २. संतोषित; खूष झालेला; समाधान पावलेला.

उत्सिक्त वि. उतू गेलेला; वाहून गेलेला; भरून गेलेला.[सं. उत्+सिच्]

उत्सुक वि. १. उत्कंठित; आतुर. २. अधीर; उतावीळ; मनापासून तयार. तत्पर; राजी; सज्ज; सिद्ध; जिज्ञासू. [सं.]

उत्सुकता स्त्री. उत्कट इच्छा; तीव्र इच्छा; उतावीळपणा.

उत्सृत विहीर (स्था.) कूपनलिका; जमिनीत पाण्याचा झरा सापडेपर्यंत यंत्राने छिद्र पाडून वर आणलेल्या झऱ्याच्या पाण्याची विहीर; हापसा.

उत्सृष्ट वि. टाकलेले; सोडून दिलेले; त्यक्त; उत्सर्जन केलेले. [सं.]

उत्सृष्टपशु–शू पु. देवतेसाठी सोडलेला, अर्पण केलेला बैल, पशू.[सं.]

उत्सेक पु. १. उकळून वर येणे; ऊत. २. भर; वाढ. ३. गर्व; ताठा. [सं. उत्+सिच्]

उत्सेदणे सक्रि. नाश करणे; मोडणे; विध्वंस करणे :'कोणी एक ज्ञानी म्हणविती । अहंब्रह्म पूर्ण जाणती । आणि सगुणभक्ती उत्सेदिती । ते तरलेचि न तरती अभिमानें ।।' – संवि २२.७८. [सं. उत्सादन]

उत्सेध वि. उंच; श्रेष्ठ :'सप्त निगूढे रक्तवर्णे । उत्सेध नेटकीं साही स्थानें ।' – मुआदि १६.१८.

उत्सेध पु. (वै.) सूज आल्यामुळे, रक्तस्राव झाल्यामुळे किंवा इतर कारणांनी उंचावलेला शरीराचा भाग, उंचवटा; टेंगूळ. [सं.]

उत्स्थलांतर न. विशेषतः स्वतःचा देश सोडून दुसऱ्या देशात कायमचे राहण्याच्या दृष्टीने केलेली वसाहत, व्यवस्था.

उत्स्फूर्त वि. मनातून आलेला; स्वतःला सुचलेला; आयत्यावेळी सुचलेला; सहजस्फूर्त. [सं. उद्+स्फूर्त]

उत्क्षेप पु. बाहेर टाकणे; वर फेकणे; बाहेर घालवणे. [सं.]

उत्क्षेपण न. वर उडविण्याची क्रिया. [सं. उत्+क्षिप्]

उत्क्षेपक पु. एखादी वस्तू हलविण्यासाठी किंवा उचलण्यासाठी जोर, ताकद किंवा दाब वाढवणारे उपकरण, साधन.

उत्क्षेपणी जलसेतू (स्था.) वक्रनलिकेच्या आकाराचा कालवा, नहर.

उत्क्षेपणे उक्रि. दूर फेकून देणे; वर उडविणे. [सं. उत्+क्षिप्]

उत्क्षेपभुवई स्त्री. नृत्यात एकाच वेळी एक किंवा दोन्हीही भुवया वर चढविणे; रागावणे, तर्क करणे, पाहणे. हेला–लीला वगैरेंच्या वेळी हा अभिनय करतात.

उत्क्षोभ पु. राजकारणात अथवा सामाजिक परिस्थितीत प्रचंड, अचानक आणि हिंसक उलथापालथ.

उथव स्त्री. भरती; पूर :'आतां उथव आल्यामुळे एक होऊं पहात नाहीं काय?' – सुदे ८४. [सं. उत्+स्था]

उथळ वि. १. साधारण सखल; कमी खोल; फार खोल नसलेले (पात्र, नदी, तळे इ.). २. (ल.) साधाभोळा; मोकळ्या मनाचा; निष्कपटी; भाबडा. ३. वरवरचे ज्ञान असलेला; ज्याने नीट अभ्यास केलेला नाही असा. [सं. उत्स्थल]

उथळणे अक्रि. उसळणे; उचंबळून येणे; जोराने वर येणे; उत्पन्न होणे :'उथळोनि प्रेमा । कृष्णिं मिळाल्या त्या रामा ।' – रास १.१२२७.

उथळपातळ क्रिवि. किंचित; थोडेथोडे; विरळविरळ.

उथळबुडाचा वि. १. अल्पज्ञानी; खोल विचार न करणारा. २. हुरळून जाणारा; अल्पसंतुष्ट; भोळसर :'आमच्यातहि उथळ बुडाची कांही मंडळीं आहे.' – लोटिकेले १.३९७.

उथळवट वि. साधारण उथळ, सखल; फार खोल नसलेले.

उथळा पु. वृक्षावर पाऊस पडल्यानंतर खाली पडणारे पावसाचे थेंब.(को.)

उथळा, उथळी, उथळे पु. स्त्री. न. १. खांबाच्या वर व खाली बसवण्याकरिता तयार केलेला चौकोनी लहान व उंच दगड किंवा लाकूड; खांबाचा तळखडा, बैठक :'टेबलात बसविलेल्या उभ्या फिरत्या दांड्याच्या खालच्या बाजूस टोक असून ते उथळ्यांत फिरते.' – पदार्थविज्ञान १.४३. २. (बांधकाम.) दगडी किंवा काँक्रीटचा चाफा.

उथळापाठ वि. उथळी किंवा गोडी भातजमीन जेथे आहे असे (खेडे).

उथळी स्त्री. विशिष्ट प्रकारचे भात पिकणारी गोडी जमीन. (को.)

उथाण न. १. हवेचा कोंदटपणा ; अभ्रें आली असता होणारी हवा; गदमद; उकाडा. (क्रि. येणे). २. भाद्रपद महिन्यातील ऊन.[सं. उत्+स्थान]

उथारा पु. त्रास; कटकट :‘तूं आठवे अवतारीं । घेणे पळसी समुद्रमाझारीं । दैत्यांचिया उथाराथरी । सीणसी तुं ।।’ – कालिका ४.१३१.

उथाळा, उथाळी, उथाळे पु. स्त्री. न. पहा : **उथळा.** खांबाच्या खालचा व वरचा दगड, लाकूड; खांबाची बैठक; तोळंबा :‘पद्मरागाचे तोळंबे स्वयंभ । वरी दिव्य हिऱ्यांचे खांब । निळ्यांची उथाळीं सुप्रभ । उपमा नाहीं तयातें ।।’ – हरि २.१७. [सं. उत्+तल]

उथाळी स्त्री. खोलगट भाग; टोपण :‘माणिकांची उथाळी दोहीं सेवटीं ।’ – रुस्व १७३.

उद्, उत् अ. एक उपसर्ग. १. वरचढपणा; श्रेष्ठत्व; वर्चस्व. उदा. उत्तर, उद्वाहन, उद्गार, उद्दिष्ट. २. वियोग; विभाजन; बिघाड; दूरीकरण; अपसारण (पासून–मधून). उदा. उत्सर्जन, उत्क्षेपण. ३. वर; ऊर्ध्व; उंच. उदा. उत्थान, उत्तिष्ठ. [सं. उद्]

उद न. पाणी (फक्त समासाच्या आरंभी). [सं.]

उदईक क्रिवि. उद्या. [सं. उदय]

उदईक न. उदक घालून दिलेले दान :‘अकलेकर २५, परंचेकर २५ व दुसरे १०; येणेप्रमाणे ६० रूपये उदईक घातले.’ – ब्रच ३५.

उदक् क्रिवि. उत्तरेकडे. उदा. उदङ्मुख. ज्याचे तोंड उत्तरेकडे आहे असा. [सं.]

उदक न. पाणी; जळ; नीर; अंबू :‘करूं जातां उदकपान । घोटासवें आठवे कृष्ण ।’ – एरुस्व ५.६२. [सं. उद्=वर येणे, ओले करणे] (वा.) **उदक येणे –** (डोळ्यात, नेत्रांत, नयनांत) दु :ख होणे; वाईट वाटून रडणे; अश्रू येणे. **उदक सोडणे, उदक घेणे** – १. मालकी सोडणे; त्याग करणे; सोडून देणे; टाकून देणे :‘गोप्रदानांबद्दल सोळा रुपयांच्या रकमेचे उदक सोडले जाईल.’ – गोप्रदानाचे नियम (बडोदेर) २. २. कोणत्याही गोष्टीचा संकल्प केल्याचे द्योतक म्हणून मंत्रपूर्वक पाणी सोडणे; संकल्प करणे. ३. संकल्पाचे उदक सोडून जेवण्यास आरंभ करणे. **उदक हातावर घालणे** – एखाद्याला दान करणे; अर्पण करणे; दुसऱ्याला देऊन टाकणे. **उदकापाण्याने करून टाकणे –** एखादे कार्य, समारंभ, उत्तरक्रिया अतिशय थोड्या खर्चात व गाजावाजा न करता फक्त विधीस बाध येऊ न देता उरकून टाकणे.

उदक न. उदकदत्त जमीन :‘या दिवसांत कितेक इनाम व उदक माधवसिंगजीही दिधले होते ....’ – हिंगणे दभा २.३०.

उदकक्रिया स्त्री. उत्तरक्रिया; तिलांजली; तर्पण.

उदकघात पु. बंधारे घालून पाणी अडवणे व अशा रीतीने जोर उत्पन्न करून योग्य वेळी योग्य प्रमाणात वाटेल तेथे पाणी सोडणे यासंबंधीचे ज्ञान, विद्या; ६४ कलांतील एक कला.

उदक घेऊन वचप निघून जाणे. (गो.)

उदकदान न. १. उत्तरक्रिया; तिलांजली; तर्पण; उदकक्रिया. २. पाण्याची सोय करणे (विहीर, तळे इ. बांधून).

उदकप्रक्रिया स्त्री. (शाप.) पाण्याच्या साहाय्याने विशिष्ट संयुक्त द्रव्यातील मूलद्रव्ये वेगळी करणे. [सं.]

उदकमेह पु. एक रोग. यात पाण्यासारखी पुष्कळ लघवी होते.

उदकवाद्य न. १. जलतरंग; जलतरंगाकरिता वापरायची भांडी. २. जलतरंग तयार करणे किंवा ते वाजविण्याची कला.

उदकशांत, उदकशांति–ती स्त्री. घरात कोणी आजारी असल्यास अथवा काही अरिष्ट घडल्यास त्याच्या शांत्यर्थ चार ब्राह्मण बोलावून त्यांच्याकरवी काही विशिष्ट (बौधायन सूत्रात सांगितल्याप्रमाणे) सूक्ते पठण करायचा व जलसिंचन करायचा विधी. [सं.]

उदकाकडे, उदवाडे उदवाडे–उत्काडे क्रिवि. बर्हिदिशेकडे; शौचास, परसाकडे. (गो.)

उदकाडी स्त्री. उदबत्ती; अगरबत्ती.

उदकील वि. पूर्व दिशा.

उदकुंभ पु. पाणी भरलेला घट; पाण्याचा घडा, कळशी (धार्मिक विधीत उपयोग) : आली घरासि युवती उदकुंभ ठेवी.– आकू १०. २. (चुकीने मृत्कुंभाबद्दल) मातीचा घट; मडके; पाण्याचा घट : ‘त्याणीं उदकुंभाची प्रार्थना केली आहे.’– पेद ३८.९८. [सं.]

उदकुंभदान, उदकुंभश्राद्ध न. मृताच्या अकराव्या दिवसापासून एक संवत्सरपर्यंत (अब्दपूरित श्राद्धापर्यंत) मृताला उद्देशून दररोज करायचे श्राद्ध. यात ब्राह्मणास उदकुंभाचे दान करतात. ते श्राद्ध रोज करणे शक्य नसल्यास एकच दिवस श्राद्ध करून दररोज नुसते उदकदान व आमान्न दान करतात अथवा वर्षाचे धान्य एकदमच देतात.

उदगयन न. सूर्याचे उत्तर दिशेकडे जाणे. पहा : **उत्तरायण** : ‘उदगयन होय तोंवरि मी शरतल्पीं असाचि राहेन ।’ – मोभीष्म ११.१२४. [सं.]

उदगा, उदगामादगा वि. रागीट; उद्धट; माजोरी.

उदगिरी स्त्री. एक क्षुद्र देवता : ‘उदगिरि देवी म्हणे स्वामीसी । देवा तूं उदयगिरिवरी पावलासी । आमुचा पूजामान चालवी जनासी । तुझ्या भजनासी विश्व लाऊं ।’– सप्र ५.२२.

उदग्गोल पु. क्रांतिवृत्ताचा उत्तरेकडील अर्धा भाग. [सं.]

उदग्र वि. १. ऊर्ध्व; सरळ उभा. २. क्षितिजरेषेशी काटकोनात असलेला. ३. (समाज.) समाजातले वर्ग, गट यांचा दर्जा, सत्ता, स्थान यांना सरळ रेषेत वर नेणारी किंवा खालच्या पातळीवर आणणारी प्रक्रिया.

उदघाट पु. उपक्रम; सुरुवात : ‘यंदा सारेच गोष्टीचा उद्घाट चिरंजीव बाजी राऊ उत्तरप्रांती गेले असता करावयाचा नव्हता.’– पेद ३३.३२७.

उदटणे अक्रि. पसरणे.

उदधि–धी पु. समुद्र; सागर : ‘जैसा गंगेसी उदधि । निरंतर ।।’ – ज्ञा २.२४१. [सं.]

उदनी स्त्री. उडवीमध्ये पाणी जाऊ नये म्हणून ती वर निमुळती करीत नेतात आणि गवत किंवा पेंढा यांनी ती शिवतात, असा केलेला उडवीचा निमुळता भाग. (गो.) [सं.]

उदप पु. पाण्यातील जीवजंतू; पाण्यात वास करणारा प्राणी : ‘मग उदपासि म्हणे उदधी । तुम्ही सीत कोरावें स्वबुद्धी ।।’– कंथा २.१४.११६. [सं.]

उदफाळणे उक्रि. फाडून तुकडे करणे; चिरून, फाडून टाकणे; धुव्वा उडवणे. [सं. उत्स्फालन]

उदफूल न. उदाचे फूल; उदाची लाही; लोखंडी तव्यावर लोह उदाला आच देऊन त्याची पंचपात्रात धरलेली वाफ. ही वाफ तुंब्याच्या

फुलासारखी व शुभ्र असते. [फा.]

उदबत्ती स्त्री. उदकाडी; अगरबत्ती; ऊद, धूप व इतर काही सुगंधी पदार्थ वाटून त्यांचा लेप एका काडीस देतात. ही पेटवली म्हणजे सुगंधी धूर हवेत पसरतो.

उदमस्त, उदमात वि. उन्मत्त; बेफिकीर; गर्व अवहेलना करणारा; माजोरी. (को.)[सं. उन्मत्त]

उदमी पु. १. उदीम करणारा; व्यापारी; क्रयविक्रय करणारा; दुकानदार. २. उद्यमी; उद्योगी; पुढारी : 'ब्राह्मणांनींच उदमी व्हावें असें आम्हीं म्हणत नाहीं.'– लोटिकेले ४.२२८. [सं. उद्यम]

उदमीचाल स्त्री. १. व्यापारी पद्धती. २. व्यापारी लोकांची राहणी, चालीरीती वगैरे. ३. व्यापारी लोकांचा डाव.

उदमेख पु. उद्योगीपणा; आवड; हौस; तत्परता; उत्सुकता; आतुरता. (क्रि. करणे.) (को.) [सं. उन्मेष]

उदमेखी वि. उत्सुक; आतुर; आवड असलेला वगैरे.

उदमेखून क्रिवि. १. मुद्दाम; निक्षून; आवर्जून. २. मनाचा पूर्ण निश्चय करून; स्वत:च्या आवडीने; पूर्ण कल्पना येऊन. सहज किंवा यदृच्छेने याच्या उलट.

उदम्ल न. (शाप.) प्राणवायू नसलेले आम्ल. [सं.]

उदय पु. १. उगवणे; क्षितिजावर येणे; दिसणे (सूर्य, तारे इ.) : 'पूर्व दिशे उदयाला भानू आला उदयाचला ।'– पला २२. २. दृश्य होणे; दिसू लागणे (शुक्र, बुध इत्यादी ग्रह सूर्यापासून दूर झाल्यामुळे.). ३. उत्पन्न होणे; प्रादुर्भाव ; उद्भव; वर येणे; फुटणे (फुले, अंकुर, विकार वगैरे. जसे : पुष्पोदय, कामोदय, क्रोधोदय इ.). ४. उठणे; बाहेर येणे; फुटणे (केस, घाम, इत्यादी शरीरावर जसे :– घर्मोदय). ५. उत्कर्ष; भरभराट; महत्पद प्राप्त होणे; वर डोके काढणे. [सं.] (वा.) **उदयास येणे–** प्रसिद्धीला येणे; अभ्युदय होणे.

उदयगिरि–री, उदयाचल–ळ ज्या पर्वताच्या आडून सूर्यचंद्राचा उदय झालेला दिसतो तो (काल्पनिक) पर्वत; ज्या भागातून उदय होतो तो भाग : 'उठि लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ।'– होला १६. [सं.]

उदयलग्न न. (ज्यो.) उदय पावत असलेली रास; राशीचा उदय. [सं.]

उदयांसी क्रिवि. दुसऱ्या दिवशी : 'उदयांसीं फीटे तवं तेथें असति :' – लीच १.१०.

उदयोन्मुख वि. १. दिसू लागणारी; प्रथम प्रादुर्भूत होणारी : 'उदयोन्मुख परमसहिष्णुतेत व कार्यदृष्टित्वांतच पंडितजींच्या भावी यशाचे बीज आहे.'– स्वभा २८. २. (ल.) ज्याच्यामध्ये भावी विकासाची चिन्हे दिसतात असा; ज्याच्या उदयाची चाहूल लागली आहे असा (लेखक); प्रकाशात येऊ लागलेला (कवी इ.). [सं.]

उदर न. १. पोट; कोठा; जठर : 'उकार उदर विशाल ।'– ज्ञा १.१९. २. पोटफुगी; विकाराने फुगलेले पोट; पोटातील एक रोग. उदा. जलोदर, वातोदर, सर्पोदर वगैरे. ३. (कृषि.) (पाण्याचे अजीर्ण) कांदे, बटाटे इत्यादी भूमिगत पिकांना पाणी फार झाले तर सूज येते व तो भाग कुजतो त्याला म्हणतात. ४. गर्भाशय; कूस; कुक्षी : 'अगा वासुदेवाचिये तपप्राप्तीं । श्रीकृष्ण देवकी उदरा येती ।' – एरुस्व १.१०. [सं.] (वा.) **उदरी येणे–** एखादा ग्रह जन्मराशीस येणे; यथेच्छ खायलाप्यायला, उपभोग घ्यायला मिळण्याजोगी दशा येणे (निंदाबोधक). **उदरी शनी, शनैश्वर येणे–** (ज्यो.) शनी जन्मराशीस येणे, चांगली दशा प्राप्त होणे; ऐश्वर्य मिळणे.

उदर स्त्री. (नाविक.) उत्तर दिशा; धुरू दिशा. [सं. उत्तर]

उदर न. (नृत्य.) पोटाने केलेले निरनिराळे अभिनय. नृत्यामध्ये उदराच्या चार प्रकारच्या अवस्था होतात– क्षाम, खल्ल, पूर्ण व सम. [सं.]

उदरणे अक्रि. ओकणे : 'दुदाची बालकें मारिती । तीं रक्तासवें दुद उदरती ।' – ख्रिपु २.१३.३०. [सं. उद्+गृ]

उदरतलपाद वि. (प्राणि.) गोगलगाय इत्यादी पोटाने सरपटणारे (प्राणी).

उदरदरी स्त्री. पोट; पोटाची खाच.

उदरनिर्वाह, उदरपूर्ती, उदरपोषण, उदरप्रवृत्ति, उदरवृत्ति पु. स्त्री. न. १. चरितार्थ; उपजीविका; पोषण; उदरंभरण; क्षुधाशांती : 'भिक्षा मागुनी क्षेत्राभीतरीं । उदरनिर्वाह करितसे ।।' – नव १३.६०; 'उदरप्रवृत्तिकारणें । मोळ्या आणून विकीतसे ।।' – संवि २१.१४. २. उपजीविकेचे, चरितार्थाचे साधन; जीवन; पोटापाण्याची सोय. ३. पोट भरणे; केवळ जगणे; जीव जगविणे; पोट चालविणे.

उदरपिशाच्च पु. अतिशय खादाड; आधाशी; खाबू.

उदरभरण न. १. अन्न सेवन करणे, खाणे, जेवणे; भोजन. पहा : **उदरनिर्वाह** : 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ।' २. कसातरी निर्वाह करणे.

उदरसूत्र न. (ग.) (वर्तुळाचा) व्यास; वर्तुळाच्या मध्यबिंदूतून जाणारी परिघमर्यादित रेषा. [सं.]

उदरंभर, उदरंभरी वि. १. भोजन भाऊ; पोटभरू; पोटार्थी; खादाड : 'पीतां मरंद उदरंभर बंभराचे ।' – नल ३८. २. स्वार्थसाधू; आपमतलबी : ' बरेच प्रोफेसर... उदरंभरी लोक आहेत.'– लोटिकेले २.५१४. ३. पोट भरण्याखेरीज काही न करणारा; स्वत :च्या निर्वाहाखेरीज अन्यत्र न पाहणारा (देश–समाज–सेवा इ. इतर काही न करणाऱ्याला म्हणतात).

उदराची खाच पोटाची खाळगी 'आपुली खांच उदराची'– संग्रामगीते १३३.

उदराडकान स्त्री. वनस्पतीविशेष. पहा : **उंदीरकानी** (गो.)

उदरी वि. १. ज्याला उदररोग झाला आहे असा; पोट फुगलेला. २. अतिशय लठ्ठ; दोंदील; पोट पुढे आलेला. ३. उदराचा; उदरा–पोटासंबंधीचा.[सं.]

उदर्क न. परिणाम; शेवट.

उदर्क पु. वाढ; उत्कर्ष.

उदर्क पु. पुढे होणारी गोष्ट; भवितव्य; भविष्य. [सं. उद+ अर्क= सूर्य]

उदर्ककाळ पु. भविष्यकाळ.

उदर्कचिंतन न. पुढे होणाऱ्या गोष्टीबद्दलचा विचार.

उदर्कफल न. परिणाम; पर्यवसान; निष्पत्ती; शेवट.

उदर्गत स्त्री. उपाय; इलाज. (गो.) [सं. उद्धार +गति]

उदव उद्गा. उदय असो. पहा : **उदो** १. देवीचे भक्त भिक्षेला निघाले म्हणजे देवीपुढे 'उठ ! तुझा जय होवो' अशा अर्थाचा हा शब्द उच्चारतात. उदयोस्तु (देवीला नैवेद्य दाखवताना म्हणतात.). २. उजेड या अर्थी

निंदाव्यंजक उद्‌गार. [सं.उदय] (वा.) **उदव करणे, उदव लावणे–** (उप.) उजेड पाडणे; पराक्रम करणे; महत्कृत्य करणे.

उदवणे पहा : **उदव करणे**

उदवणे, उदविणे उक्रि. उदाच्या धुराने सुगंधित करणे; ऊद जाळणे; उदाचा वास लावणे, धुरी देणे (केस, ताईत, पाणी वगैरेंना) : 'लहानपणी मंगलदिवशी न्हाऊन केस उदवीत मी उभी राहायची.' – ययाती २७२.

उदवात पहा : **उदबत्ती** (गो.)

उदश्रु–श्रू वि. रडणारा; रडका. [सं. उद्+अश्रु]

उदसणे सक्रि. उदास, ओसाड करणे : 'त्याने असे का सगळे उदसून टाकले ?'– डोह ८०.

उदळणे अक्रि. उसळणे; उधळणे : 'जैसी खळाळिचेया उदका । सरिसीं उदळे चंद्रिका ।'– राज्ञा १५.४६५.

उदंड वि. क्रिवि. पुष्कळ; भरपूर; अनेक; असंख्य; फार (संख्या, परिमाणवाचक) : 'तयाच्या ठायीं उदंड । अज्ञान असे वितंड ।' – ज्ञा १२. ६९२. [सं. उद्+ दंड]

उदंत पु. १. इत्यंभूत वार्ता; साद्यंत वृत्तांत, हकीगत : 'आईकिजे सर्व उदंत कानीं ।' –सारुह ६.८. [सं.]

उदंत पु. १. शुद्ध अंत :करणाचा मनुष्य. २. उद्योग करून पोट भरणारा माणूस. [सं.]

उदंबर पु. उंबर; औंदुबर : 'वाढितां उदंबरे सरिसें । पूरकांसी ।।' – ऋ ८२. [सं. उंदुबर]

उदंमुळ वि. उन्मत्त. (गो.)

उदा वि. निळसर; उदी रंगाचा. (ना.)

उदाणी, उदाणे स्त्री. न. ऊद जाळण्याचे भांडे; धूपदाणी; ऊददाणी.

उदाणू, उदानू वि. (नंदभाषा) तीन; व्यापारी भाषेतील सांकेतिक संख्यावाचक शब्द : 'मुळु उदानु अंगुळु ऐसी । नंदभाषा सांगितली त्यासी ।'– भावि ४२.४५.

उदाणे न. भर, बहर : ' जें विचारांचे उदाणें' –ज्ञा. ८.१४१.

उदात्त वि. १. उच्च; श्रेष्ठ (मनाची अवस्था); मोठा; दाता; उदार. २. स्पष्ट, व्यक्त (स्वर); तीव्र, तीक्ष्ण (आघात); उंच; मोठा कर्कश; (आवाज); वैदिक संस्कृतच्या तीन आघातांपैकी सर्वांत उंच आघात.

उदात्त स्वर पु. (भाषा.) तीव्र, उंच स्वर. वैदिक भाषेच्या संदर्भातच हा शब्द वापरतात. वैदिक भाषेतील आघातव्यवस्था.

उदात्तीकरण न. १. मन क्षुद्र विचारांच्या पलीकडे फार वर जाणे; मन उच्च पातळीवर जाणे; सामान्य विचारांना उच्च स्वरूप देणे; भावना उच्च, उन्नत पातळीवर जाणे; भावनांचे एक प्रकारे परिष्करण होणे. २. माणसांच्या शृंगार, वात्सल्य इ. मूलभूत भावनांचे, सहज प्रवृत्तींचे शोधन करून त्यांचा सर्जनशील कामासाठी उपयोग करणे. [सं.]

उदान पु. १. पाच प्राणवायूंपैकी एक वायू. हा कंठातून मस्तकात चढतो : 'उर्ध्वमुखें कंठाकडे फुगारा । जो धरी पोटांत वारा । त्या प्राणाचिया प्रकारा । उदान नामें जाणावें ।।'– यथादी १७.१००२. २. मृत्युसमयीचा श्वास, धाप; ऊर्ध्व.[सं.] (वा.) **उदान लागणे–** फार खाल्ल्यामुळे, रोगामुळे श्वासोच्छ्‌वास मोकळेपणाने करता न येणे; दम लागणे; श्वास कोंडणे.

उदानका पु. पैसा. (नंदभाषा)

उदार वि. १. मोठ्या मनाचा; कनवाळू; थोर मनाचा; धर्मात्मा : 'जियें उदारें ज्ञानमकरंदें ।'– ज्ञा १.१८. २. मोकळा; धीट; प्रशस्त; उघड्या मनाचा. संकुचित, कुढा, कृपण, कंजूष, अरुंद यांच्या उलट. (माणूस, भाषण, स्वभाव, होडी, जागा, गाडी, खोली वगैरे). ३. सढळ; खर्चिक; दानशील. चिक्कू, कृपण याच्या उलट. [सं.]

उदारकर्ण वि. १. कर्णासारखा उदार; दानशूर; मोठा दाता. २. (उप.) कृपण व कंजूष (मनुष्य).

उदार धोरण खुल्या दिलाचे, प्रतिपक्षावर अधिक विश्वास ठेवण्याचे, मोठ्या मनाचे धोरण : 'लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचे धोरण रिपन साहेबांच्या उदार धोरणाच्या अगदीं उलट झालें आहे.'– लोटिकेले ३.४०.

उदार पक्ष (राज्य.) व्यापक विचारांच्या लोकांचे (लिबरल) मंडळ; प्रागतिक पक्ष.

उदारमतवाद पु. (समाज.) १. प्रगती व सुधारणा यांना अनुकूल असे राजकीय व सामाजिक विचार मांडणारी सरणी, मत. २. प्रतिपक्षीयांच्या विचारांचा आदर करणारी विचारसरणी. ३. जे सुख किंवा सवलती स्वत:ला हव्या त्या इतरांनाही मिळाल्या पाहिजेत असे मानणे. अन्याय किंवा रुढीविरुद्ध जाणे. ४. कोणत्याही प्रकारची विषमता असू नये व मतमतांतरबद्दल व्यापक दृष्टी असावी असे प्रतिपादणारे मत; प्रागतिकता. [सं.]

उदारमतवादी वि. (राज्य.) राजकीय व सामाजिक विचारांच्या बाबतीत पुरोगामी व सुधारक; इतरांच्या मतांबद्दल आदर व सहिष्णुता असणारा; विचाराने व वर्तनाने उदार; नेमस्त; मवाळ : 'सर्व प्रकारची चौकशी करण्याकरितां लॉर्ड डरहॅम या उदारमतवादी मुत्सद्याची रवानगी करण्यात आली.'– वस्व ६४. [सं.]

उदारलक्षण वि. १. उठावदार; रुबाबदार; मर्दानी (चेहरा, लक्षणे). २. भाग्यशाली; मोठेपणाची (लक्षणे, चिन्हे).

उदार शिक्षण न. उदारपणाचे शिक्षण; ज्यामुळे मनाचा विशेष विकास होतो व बुद्धी व्यापक होते असे शिक्षण.

उदाराचे पोते न. दुसऱ्याची मालमत्ता चैनीने व सढळ हाताने खर्च करणारा मनुष्य; हलवायच्या घरावर तुळशीपत्र ठेवणारा.

उदारांग वि. (उप.) प्रशस्त शरीराचा; तुंदिलतनू; लठ्ठ; भव्य शरीराचा.

उदारीव न. उदारपणा.

उदावर्त पु. आतड्याचा एक रोग; पोटातील आतड्यांमध्ये अडथळा झाल्यामुळे होणाऱ्या वेदना, रोग. [सं.]

उदावादा पु. पूर्णत्व; प्रकटपणा : 'तैशा चहूंभुजीं उदावादा । सगुण देखोनि गोविंदा ।'– एभा ११.१४७५.

क्रिवि. सढळपणे; उघडउघड : 'म्हणौनि इंद्रिये तेचि संपदा । वेचितांहीं उदावादा ।'– ज्ञा १३.३०६. [सं. उदयवादित्व]

उदास वि. १. उद्विग्न; दु :खी; खिन्न; आकर्षण नसलेला; निरुत्साही; नाराज; कष्टी : 'झाला कंठस्फोट आळवितां । उदास आतां न करावें ।'–

तुगा ७०९. २. बेपर्वा; निष्काळजी; बेफिकीर; तटस्थ : 'तरि जो या देहावरी । उदासु ऐसिया परी ।'– ज्ञान १३.५९४. ३. नि:स्पृह; उपेक्षाबुद्धी; निरपेक्ष. ४. विरक्त; नि:संग; निर्विकार : 'केवळ पापीहि प्रस्तावले । उदासपंथ देखोनिया ।'– सप्र १२.१४. ५. व्यर्थ; फुकट : 'तुका म्हणे माझी पुरवावी आस । विनति उदास करूं नये ।।'– तुगा ८२८. ६. ओसाड; निस्तेज; निरानंद; भयप्रद; भयाण जागा, (गाव, घर. ७. निष्क्रिय.

पु. गोसाव्यांचा एक पंथ. पहा : **उदासी**[सं.] (वा.) **उदास करणे–** उदासीनता स्वीकारणे; अंगाबाहेर टाकणे : '...उदास न करितां सदरहू ऐवजाची तरतूद करून द्यावी.'– ऐलेसं ४१८७. **उदास जाबसाल करणे किंवा जाबसाल उदास करणे–** शुष्क उत्तर देणे : '...आपले तर्फेनें उदास जाबसाल करावा, पैका येकंदर देऊं नये.'– ऐसंसाखं ७.१९.

उदासणे अक्रि. उद्विग्न; उदास, खिन्न होणे : 'खेडींपाडीं भलताच लुटितो कुणब्याचा जीव उदासला.'– अफला ६८. (वा.) **उदासता करणे–** उदासीनता करणे; अंगाबाहेर टाकणे : '...त्याजमुळे आपण उदासता केली आहे.'– पेद ११.४६.

उदासन पु. उदासीनता; बेपर्वाई : 'जेतुके कष्ट मज भोगले । जे इजिप्तांतु साहिले ।। तेया होउनि अदिक जाहाले । उदासन तुझें ।।'– ख्रिपु १.१४.११२.

उदासनी स्त्री. उदासपणा : 'चटपटी लागली उदासनी मना ।'– दावि २३६.

उदासमातगा वि. बेफिकिर; बेदरकार; उदासीन; अनास्थेखोर :'विचारे करून पाहता येथील कारभार उदासमातगा आहे.'– पेद २०.१३२.

उदासवचन न. खिन्न मनाने केलेले भाषण : 'उदासवचनें ऐकोनि सत्वरी । अश्रुपात नेत्रीं वाहती ।।'

उदासवाणा वि. खिन्न झालेला.

उदासस्थिति–ती स्त्री. निष्काळजीपणाची वृत्ती; बेफिकिरी; खिन्नता.

उदासिनीकरण न. (रसा.) एखाद्या द्रवातील अम्लता किंवा अल्कता नाहीशी करण्याची क्रिया. [सं.]

उदासी पु. १. गोसाव्यांचा पंथ; या पंथातील गोसावी, बैरागी. २. शिखांचा एक प्रमुख पंथ; त्याचा अनुयायी; नानकपुत्र असेही या पंथाचे नाव आहे. याचे चार भेद आहेत–बाबाहसन, फूल, गोंदा व अल्मस्त. सर्वांची एक सभा असून तिला बडा आखाडा असे नाव आहे. हे लोक ब्रह्मचर्य पाळतात.

उदासी स्त्री. उदासपणा; नाराजी : 'मघाच्या पाहुण्याचा चेहरा पाहून त्याच्यात जी एक उदासी आली होती ती पार नाहीशी झाली होती.'– बावि बु २२४.

वि. निराश; खिन्न; उदासीन; निष्काळजी; बेफिकीर. पहा : **उदास** : 'तप करिती अरण्यवासी । त्यासी करितोसी उदासी ।।'– गुच २.१३६.

उदासीन वि. १. विरक्त; वीतरागी : 'उदासीन जो तापसी ब्रह्मच्यारी ।।'– राम ५०. २. खिन्न; दु :खी. ३. निष्काळजी; बेपर्वा : 'तंव नोहावें यागादिकीं । उदासीन ।।'– ज्ञा १८.१५२. ४. तटस्थ; नि: पक्षपाती; ज्याला कोणी शत्रू किंवा मित्रही नाही असा; मध्यवर्ती; मध्यस्थ: 'तये देहबुद्धीचें लक्षण । सुहृददुर्हृद उदासीन । त्रिविध त्रिगुण करी मन । देहाभिमान उपजवी ।।'– एरुस्व १३.५१. [सं.]

उदासीन जाती (वन.) एका विशिष्ट प्रकारच्या स्थलाबद्दल व पादपसमुदायाबद्दल विशेष आस्था (निष्ठा) न दर्शवणारी जाती.

उदासीनता स्त्री. १. वैराग्य; विरक्ती : 'उदासीनता तत्त्वता सार आहे ।।'– राम ५७. २. बेपर्वाई.

उदासीन वायू (रसा.) कोणत्याही रासायनिक प्रक्रियेत क्रियाशील नसलेला वायू. [सं.]

उदाहरण न. १. दाखला; दृष्टांत; नियम, विधान इ. स्पष्ट करणारी किंवा पटवणारी गोष्ट :'अक्षरें तिसऱ्या पादीं । उदाहरण शेवटीं ।' – वृत्तदर्पण ११. २. नमुना; कित्ता. ३. (ग.) गणितातील नियमाप्रमाणे सोडवण्याचा प्रश्न; (सामा.) प्रश्न. [सं.]

उदाहरणीकरण न. (तत्त्व.) सामान्य विधान एखाद्या विशिष्टाला लागू करून दाखविण्याची क्रिया. [सं.]

उदाहृत वि. उदाहरण देऊन सिद्ध केलेले, स्पष्ट केलेले, सांगितलेले.[सं.]

उदाळणे अक्रि. उसळणे; उडणे; उडवणे; वर येणे. पहा : **उधळणे** : 'जैसी खळाळीचिया उदका । सरसीं उदाळे चंद्रिका ।'– ज्ञा. १५.४९८. [सं. उद्+दल्]

उदित वि. १. उगवलेला, उदय पावलेला; वर आलेला (ग्रह, तारा इ.) : 'नाना उदितें दिवाकरें ।'– ज्ञा १७.१७८. २. फुगलेला; मोठा झालेला. ३. (नशीब) उघडलेला; उत्कर्ष पावलेला; अनुकूल (दैव, भाग्य) : 'कोण्या काळें होईल नेणों भाग्य उदित वो ।' –तुगा ११७. ४. (मनोविकार) उत्पन्न झालेला; उठलेला; प्रबल झालेला :'परि साचोकारें उदितें ।प्रेमभावें ।।'– ज्ञा १०.११५. ५. काही कृती करायला निघालेला; सज्ज; उद्युक्त; तयार; तत्पर : 'युद्धा येईल विराटदळ । म्हणोनि योद्धे उदित सकळ ।'– मुविराट ६.४४. ६. सांगितलेले; बोललेले (भाषण) : 'घालविलें मज रायें मानुनिया मदुदितें हितें अहितें ।'–मोवन १.२०. ७. जागा झालेला. [सं.]

उदितकार्य न. आकस्मिक उद्भवलेले अंगावर पडलेले कार्य.

उदितकाळ पु. भाग्याचा काळ; उत्कर्ष; भरभराट; पैसा इत्यादींच्या दृष्टीने चांगला काळ; उत्कर्षाचा काळ. [सं.]

उदित ग्रह (ज्यो.) १. जेव्हा ग्रह आपल्याला दिसतो तेव्हा तो ग्रह उदित आहे असे समजतात. २. फलज्योतिष्यात एखाद्या स्थानात आरंभी एखादा ग्रह असल्यास त्या स्थानात तो उदित आहे असे म्हटले जाते.

उदिते न. ज्योत; तेज : 'तेणें विझौनि जाये उदितें । अग्निचें जेव्हां ।।'– राज्ञा ८.२११.

उदिदिन न. (शाप.) एक रासायनिक द्रव्य. यापासून रंग काढतात.

उदिन न. (शाप.) उज्ज व कर्ब यांचा संयुक्त पदार्थ.

उदिपणे अक्रि. १. उगवणे; उदयाला येणे; निघणे; उत्पन्न होणे : 'सूर्यापासूनि प्रभा उदिपे । ते प्रभाचि सूर्य केवि म्हणिपे ।'– स्वादि १४.१.५. २. पेटणे; प्रकाशणे : 'मग इंधनिं आगि उदिपे ।'– राज्ञा ११.६८२. [सं. उद्+दीप्]

उदिमदार पु. व्यावसायिक; उदमी; व्यापारी : 'तों सन्निधीं येऊनि उदिमदार'– दावि ४२९.

उदिमी पु. व्यापारी. पहा : **उदमी** : 'वेदशास्त्रसंपन्न झाला । त्यावरि पोट भरूं लागला । तरी तो उदिमी थोर झाला ।'– एभा ११.५४८. [सं. उद्यम] वि. व्यापारासंबंधी, धंद्यासंबंधी.

उदी वि. उदासारखा; पिंगट; तपकिरी : 'तेथील खडक चमत्कारिक उदी रंगाचा असे.'– पाव्ह ४१.
स्त्री. १. उदाची राख. पिराजवळ जाळलेल्या उदाची राख प्रसाद म्हणून घेतात : 'वानुनि प्रताप श्रद्धाउदी देऊं ।' – दावि ३५३. २. उदाच्या राखेची शपथ (मुसलमान लोक घेतात). ३. अंगारा. ४. उदी रंगाचे वस्त्र. [फा. ऊद] (वा.) **उदीवर हात ठेवणे–** उदीची शपथ घेणे; उदीला स्पर्श करून शपथ घेणे : 'तुमचा विश्वास साहेबाचे ठायी आहे. त्याची उदीवर हात आम्ही ठेवितो.' – ऐलेपाम्युप्र ७३.

उदीचि–ची स्त्री. उत्तरदिशा : 'उदीची प्रतीची तथा मुख्य प्राची । दिसे दक्षिणेमाजि विश्रांति ज्याची. ' [सं.]

उदीचीन, उदीच्य वि. उत्तरेकडील. [सं.]

उदीम पु. १. कामधंदा; व्यापार; व्यवहार; देवघेव; उद्योग : 'तुम्ही काहिं उदीम न करा.'– पंच १.३५. २. (व्यापक) शेतीचे उत्पन्न, पीक; बागाईत; मळा. ३. उपद्व्याप; भानगड. (व.) ४. (सामा.) व्यवहार ; काम; योजना : 'मग रामासि म्हणे नारद । हा उदीम जाहला फलद । जंबुद्वीपाचा तुटला कंद । भूपाळांचा ।।'– कथा २.१४.३७.[सं. उद्यम] (वा.) **उदीम करणे**– १. व्यापार, उद्योगधंदा करणे. २. (ल.) व्यापारात खोट, नुकसान येणे; व्यापारात फसणे.

उदीमधंदा–व्यवसाय–व्यापार, उदीमपादीम पु. धंदा; व्यवहार.

उदीमपट्टी स्त्री. व्यापारावरील सरकारी कर.

उदीमी पु. व्यापारी : 'हे टाकूनि उदिम्या तोंडावरी ।'– दावि २६२.
वि. व्यापारधंद्यासंबंधी (जिन्नस, माल, व्यवहार इ.).

उदीय स्त्री. सकाळ; पहाट.

उदीयां क्रिवि. सकाळी; उजाडताना :'ते उदीयां उठी : पालवा पीळा घे :'– दृपा ५०.

उदीसर वि. उदी, तपकिरी रंगाचे.

उदुलहुकुम पु. आज्ञाभंग; बंडखोरी; हुकमाची अवज्ञा : 'निर्मलकरास ताकीद जाहालिया तो उदुलहुकुम करणार नाही.'– पुणे अखबार भाग १.११२. [फा.]

उदुंबर पु. औदुंबर; उंबर; एक वृक्ष. [सं.]

उदुंबरमशक पु. अव. उंबरातील किडे.
वि. या किड्यांप्रमाणे गर्दी असलेले; थवे असलेले, बुजबुजलेले; भरलेले.

उदे न. पाण्यातील एक जनावर. पहा : **ऊद** (राजा.)

उदेउदे उद्गा. उदोउदो करणे; अतिशय स्तुती करणे; प्रस्थ माजविणे; जयजयकार करणे. पहा : **उदो, उदव** [सं. उदय]

उदेग पु. उद्योग; खटपट : 'पुढेहि दिनप्रतीनें राजश्री प्रतिनिधी ये गोष्टीचा उदेग करितात.'– पेद १०.८३. [सं. उद्योग]

उदेग पहा : **उद्वेग** : 'राजिक देविक उदेग चिंता । अन्न वस्त्र देहममता ।।'– दास ११.३.५.

उदेजणे अक्रि. १. उदय पावणे; उगवणे : 'जसा अनेक होळियां दिनेश हो उदेजुनी । प्रकाशनी पदार्थ ही अपार रश्मिच्या गर्णी ।'– हस्तामलक ९. (शिवरामकृत). २. उत्पन्न होणे : 'अरिष्टें उदजियेती काळें ।'– मुआदि २६.९८. [सं. उदय]

उदेणे अक्रि. १. उगवणे; उदय पावणे : 'जो उदेला गांवेंसीं खाये । दोहीतें यया ।।'– ज्ञा १५.४७३. २. उत्पन्न होणे; बाहेर निघणे : 'हाणीतसे फडफडां ध्वनि हो उदेला ।'– नल ९०. ३. नशीब फळफळणे; उत्कर्ष पावणे : 'अघटितघटणेनें दैव किंवा उदेले ।'– सारुह २.११२. [सं. उद्+इ]

उदेती स्त्री. उगवती; पूर्व दिशा. (गो.)

उदेल–ला उदाचे तेल; उदाचा अर्क.

उदेला क्रिवि उदयाला; उद्या : 'गोष्टी चालत्या उदेला रंगाचा समारंभ करण्याचा.'– शादवे २५.

उदेव पहा : **उदय** : 'सूर्य उदेवो करी तेथौनि ।'– ख्रिपु १.१.८५. (गो.)

उदेवणे अक्रि. उदय पावणे. पहा : **उगवणे** (गो.) [सं. उदय]

उदेसलिफ पु. भुईकोहळा. [फा.]

उदै क्रिवि. उद्या : 'उदै करील अयोध्याप्रवेशु ।'– कृमुरा ७३.९०.[सं. उदय]

उदैजणे अक्रि. उगवणे; उदय पावणे. पहा : **उदेजणे** : 'उदैजणें केतूचें जैसें ।'– ज्ञा १६.३१९. [सं. उदय]

उदैणे अक्रि. १. उदयाला येणे; उगवणे; 'तंवं उदैला दिनकरू ।'– दाव ३१६. २. उत्पन्न होणे : 'कांईं सांघांल उदैलें । तें जाणवेना ।।'– शिव ११५. ३. जागा होणे.

उदो पु. १. उदय : 'तवं उदो जाला दीनकरू ।'– उषा २८.१२. २. प्रादुर्भाव; उत्पत्ती. ३. विजय; उदयोस्तु, जागी हो असा शब्द; आनंदाची आरोळी. पहा : **उदव, उदे उदे** : 'नाहीं जाळीत भणदीं । उदो म्हणोनि आनंदी ।'–तुगा १८१६. ४. जयजयकार : 'उदो बोला उदो. सद्गुरू माउलीचा वो.'– श्रीयो २.१८६. ५. उत्साह; उल्हास : 'मन उदो नाही.'– गस्तो १०६.[सं. उदय] (वा.) **उदो उदो करणे–** टिमकी वाजवणे; खुशामत करणे; मोठेपणा देणे; स्तुती करणे.

उदो पु. नाश : 'सुकृताचा उदो केला । गोंधळ घाला इंद्रियें ।।'–तुगा ४०९. गोंधळ घालायच्या वेळी दिवटी पाजळून तेल वगैरे जाळतात व उदो उदो म्हणतात. या क्रियेला उद्देशून पेटवणे, जाळणे, नाश करणे असा अर्थ झाला असावा.[सं. उदय] (वा.) **उदो करणे–** जाळून टाकणे; नाश करणे.

उद्गत वि. १. उगवलेला; उत्पन्न झालेला; निघालेला; उद्भूत. २. वर गेलेला, चढलेला. ३. बाहेर आलेले ; (ल) पाठ असलेले : 'कर्मकांड तरी जाणे । मुखोद्गत पुराणें ।।'– ज्ञा १३.८२९.

उद्गदणे अक्रि. उफाळणे; खवळणे; उसळणे; आवाज करणे. [सं. उद्+गद्]

उद्गम पु. १. उगम; मूळ; प्रारंभ; प्रादुर्भाव; जन्म; झरा (लक्षणेने व शब्दशः– नदी, चाल, भांडण, रूढी, भाषा इत्यादींचा). २. वर जाणे, चढणे, उडणे. [सं. उद्+गम्=जाणे] ३. बाहेर जाणे. (देशाच्या).

उद्‌गमन न. १. (तत्त्व.) विशेष गोष्टींवरून सामान्य सिद्धांत काढणे. २. (समाज.) समारंभपूर्वक एखाद्या प्रतिष्ठित पदावर–जागेवर प्रतिष्ठापना. [सं.]

उद्‌गमन पद्धती (तत्त्व.) प्रयोग, अनुभव वा प्रयोगजन्य पुरावा यावरून सर्वसामान्य सिद्धांत काढण्याची पद्धती.

उद्‌गम प्रमाणपत्र (अर्थ.) निर्यातक देशाच्या सीमाशुल्क अधिकाऱ्याने तो माल कोणत्या देशातून निर्यात होत आहे हे दाखविण्याकरिता सही करून दिलेला लेख, प्रमाणपत्र.

उद्गाता पु. १. यज्ञातील सामगान करणारा ऋत्विज : ‘उद्गाता कौत्समुनी पिंगळ अध्वर्यु त्या मखी होता ।’ – मुआदि ७४. २. नवीन विचार प्रथम सांगणारा; प्रवर्तक. [सं. उद्+गै= गाणे]

उद्‌गामी वि. वर जाणारा, चढणारा, निघणारा, अनुमानशक्तीचा एक भेद; दुसरा भेद अवगामी. [सं.]

उद्‌गार पु. १. उच्चार; बोलणे; तोंडातून निघालेला ध्वनी, शब्द; बोधवचन : ‘मियां घाले तेणें उद्‌गारें । लागति गर्जों ।।’– राज्ञा १०.१०९. २. विकारप्रदर्शन. उदा. क्रोधोद्गार, आनंदोद्गार, आश्चर्योद्गार वगैरे; अहाहा, वाहवा इ. तोंडातून निघणारे विकारांचे ध्वनी. ३. तोंडातून असंकल्पित असा निघालेला ध्वनी, उच्चार; सहज, चुकून तोंडावाटे निघालेला विशिष्ट गोष्टींचा बोध करून देणारा शब्द. ४. ढेकर; ओकारी; वमन. [सं. उत्+गॄ]

उद्‌गारणे अक्रि. १. उच्चारणे; बोलणे. २. आवेशाने, जोराने बोलणे; क्रोधाने बोलणे, शब्द करणे; विकारवश होऊन उद्गार काढणे.

उद्‌गारवाचक वि. भावना व्यक्त करणारा.

उद्‌गारवाचक चिन्ह लेखनात उद्‌गारवाचक शब्द किंवा विधान दाखविण्यासाठी त्याच्या शेवटी लिहिण्यात येणारे (!) हे चिन्ह.

उद्‌गारवाची वि. मनातील निरनिराळे भाव व्यक्त करण्याकरिता उच्चारलेली (अव्यये); केवलप्रयोगी (अव्यये). उदा. अहाहा, अबब, अरेरे वगैरे.

उद्गिरण न. सुरुंग लावून खडक वगैरे फोडणे. [सं.]

उद्गीरण न. वमन; ओक; ओकारी. [सं. उद्‌गिरण]

उद्गीर्ण वि. ओकलेले; तोंडातून बाहेर पडलेले. [सं. उद्‌गीर्ण]

उद्‌घाट पु. वरील मार्ग : ‘एक मध्यमेचेनि उद्‌घाटे । लंघुनि तिन्ही पीठे ।’ वछा १५०.

उद्‌घाटण, उद्‌घाटन न. १. एखादी वस्तू, मूर्ती, संस्था सर्वांसाठी समारंभपूर्वक खुली करणे. (क्रि. होणे, करणे.) २. उघडणे; खोलणे; उलगडणे (कपाट, झाकण, तसबीर इ.). ३. फोडणे; उघडकीला आणणे; प्रसिद्ध करणे. उदा. मर्मोद्‌घाटन, गुह्योद्‌घाटन ४. स्पष्ट करणे; विवरण करणे; चर्चा करणे. [सं. उद्+घट्]

उद्‌घाटित वि. १. उघडलेला; उघड केलेला; उलगडून दाखवलेला; उद्‌घाटन केलेला. २. स्पष्ट केलेला; विवेचिलेला. [सं.]

उद्‌घृष्टता स्त्री. (संगीत.) नीरस उद्‌घोष करणे. [सं. उद्+घृष्ट]

उद्‌घोष पु. १. घोकणे; पुन :पुन्हा म्हणणे (स्मरणात राहण्याकरिता, पाठ करण्याकरिता). २. (ल.) तीच तीच गोष्ट पुन :पुन्हा सांगणे; एकाच विषयावर एकसारखे बोलत राहणे. ३. लोकवार्ता; वदंता; लोकोक्ती; बातमी. ४. दवंडी; जाहीर करणे; गर्जना. ५. घोष; धोसरा; उत्कंठा. [सं.]

उद्घोषणा स्त्री. (शाव्य.) राज्याच्या प्रमुखाने जाहीर केलेली गोष्ट, निवेदन. [सं.]

उद्दंड पहा : **उदंड** : ‘तेयाचां ठायि उद्दंड । अज्ञान असे उघड ।’– राज्ञा १३.६९०.

उद्दंड वि. अतिशय तापट; क्रूर : ‘मानसिंग होताही मोठा उद्दंड... एका ज्योतिषाशी भांडण होऊन त्याने त्याला गोळी घातली.’– चंद ६२.

उद्दाम वि. १. धीट; धारिष्टवान; बेदरकार; दांडगा; साहसी. २. उर्मट; गर्विष्ठ; उन्मत्त; मस्त; बेफाम. ३. जोराचा; मजबूत; टवटवीत; जोमदार (अंकुर, कलिका, पुष्प वगैरे). ४. मोठा; ठसठशीत; ठळक (दागिना, रत्न वगैरे). ५. अतिशय गहिरा; तजेलदार; चकचकीत (रंग). ६. उग्र; तीव्र (वास). ७. मोठा; पहाडी; भरदार; गंभीर; सुस्वर (आवाज, ध्वनी). ८. भयानक : ‘त्या उद्‌दाम मानवी घटनेचे स्वरूप...’–विजी ११.[सं. उद्+दम्]

उद्दामपणा पु. माजोरीपणा; दांडगेपणा; उन्मत्तपणा : ‘पण आमच्या मतें तें निर्भिड आहे. असे म्हणण्यापेक्षा ते उद्दामपणाचें आहे... असे म्हणणे अधिक योग्य...होईल.’–लोटिकेले ३.३५४.

उद्दित वि. उदित; उल्हसित; तेजस्वी; शोभिवंत : ‘हरुषें निर्भर उद्दित । सुप्रसन्नवदनु ।’– दास १.२.९. [सं. उदित]

उद्दिष्ट वि. १. योजलेले; ध्येय; संकल्पिलेले; मनात ठरवलेले; विचार करून ठाम बनवलेले; अभिप्रेत. २. विवक्षित; निर्दिष्ट; उल्लेखित; दिग्दर्शित; वर्णन केलेले. [सं. उत्+दिश्]

उद्दिष्ट न. (संगीत.) इच्छित स्वरांच्या प्रस्तारातील अमुक स्वरूपाच्या स्वररचनेचा प्रकार कितवा हे सांगणे. [सं. उत्+दिश्]

उद्दीपक वि. १. पेटविणारे; चेतना देणारे; प्रवर्तक; प्रोत्साहन देणारे; जागृत करणारे; मनोवृत्ती उचंबळविणारे; स्फुरण देणारे. २. (वै.) उत्तेजक (द्रव्य, औषध इ.). [सं. उत्+दीप्]

उद्दीपणे अक्रि. चेतना होणे; प्रकट होणे; प्रवर्तक होणे; वाढत जाणे; प्रकाशणे : ‘कां जागृती जंव जंव उद्दीपे ।’– ज्ञा १८.११०४.

उद्दीपन न. १. प्रज्वलन; चेतविणे; पेटविणे. २. प्रकाशन; प्रकाश; उजेड. ३. (ल.) प्रवर्तन करणे; जागृत करणे (क्रोध, लोभ इ. विकार). ४. (ल.) ज्यामुळे चेतना, जागृती होते असा उत्तेजक पदार्थ. उदा. क्रोधोद्दीपन, कामोद्दीनप, हर्षोद्दीपन इ. ५. (वै.) हालचाल करणे, विचार करणे इत्यादी कार्यासाठी मिळणारी प्रेरणा, चेतना. [सं.]

उद्दीपनविभाव पु. (सास.) काव्यनाटकादिकांतील नायकनायिकांच्या निरनिराळ्या कृती, त्याचप्रमाणे देशकालपरिस्थिती हे रसनिष्पत्तीसाठी उद्दीपनविभाव समजले जातात. रसाचे उद्दीपन यामुळे होते. [सं.]

उद्दीपित पहा : **उद्दीपक**

उद्दीप्त वि. पेटलेला; भडकलेला. [सं.]

उद्देश पु. १. प्रयोजन; हेतु; इच्छा; मनातील कार्य; अभिप्राय; आशय; मतलब : ‘ऐसा योगयुक्तीचा उद्देशु ।’– ज्ञा ५.६१. २. दिग्दर्शन; वर्णन ‘उद्देशें एक दोनी । जायिजती बोलोनी ।’ – ज्ञा १.१०४. ३. उद्देशून :

'म्हणौनि मागां भाव जैसे । आपुले सांगितलें तुवां उद्देशें ।'– ज्ञा १०.१८८. [सं. उद्+ दिश्]

उद्देशकारण न. (न्याय.) हेतू; प्रयोजन; मतलब; न्यायशास्त्रातील कारणांतील एक प्रकार :'प्रक्षालन हें (साबणाचें) उद्देशकारण होय.'– न्यायप ५८.

उद्देशणे उक्रि. मनात योजणे; विचार करून ठरविणे; संकल्प करणे. २. नाव घेऊन किंवा उल्लेख करून उच्चारणे, बोलणे. ३. प्रयोजन, हेतू असणे; बेत असणे; ठरवणे. [सं. उद्देश]

उद्देशपत्रक न. एखाद्या संस्थेची उद्दिष्टे विशद करणारी पुस्तिका. [सं.]

उद्देशी अनुक्रिया (मानस.) उद्दिष्टसिद्धीकरिता सुरुवातीला केलेली प्राथमिक अनुक्रिया.
ऐच्छिक वर्तन करताना होणारा कंपप्रकार.

उद्देश्य न. १. संकल्पित कार्य, बेत, मनातील हेतू. २. ज्याविषयी संकल्प करायचा ते. ३. (व्या.) वाक्याचा एक भाग; वाक्यात ज्या अर्थाला उद्देशून विधान केलेले असते किंवा ज्याविषयी वक्ता बोलतो ते. कर्तरि प्रयोगात कर्ता, कर्मणि प्रयोगात कर्म. वाक्याचा दुसरा भाग विधेय होय. [सं.]

उद्देश्यवाचक वि. (व्या.) कर्तृबोधक, उद्देश, हेतू दाखवणारा (शब्द). [सं.]

उद्देश्यवाद पु. विशिष्ट कार्य विशिष्ट हेतूकरिता घडले आहे असा वाद; हेतुवाद.

उद्देश्यविधेयभाव पु. कर्तृपद आणि क्रियापद यांमधील संबंध. [सं.]

उद्देश्यविस्तार पु. कर्तृपदाची विशेषणे किंवा तत्संबद्ध शब्द वगैरे : 'उद्देश्यविस्तार व विधेयविस्तार हे पाठ मुलांना फार मनोरंजक वाटतात.' – अध्यापन ९७. [सं.]

उद्धट वि. १. उर्मट; दांडगा; असभ्य; बेपर्वा; अविनयशील : 'पहिलेच श्रीमदें उद्धट । त्यावरी मांडिले कपट ।'– एभा १.३४६. २. उद्भट; पाणीदार; बलवान : 'अतिरथि उद्धटवीर । पाठीसीं चालती कृष्णकुमर ।'– हरि ३३. ११८. [सं. उद्धत]

उद्धटाई स्त्री. धिटाईची, बेपवाईची वागणूक; दांडगेपणा; बेपर्वाई; मग्रुरी.

उद्धटित अंगहार (नृत्य.) उजवा हात उद्वेष्टित करून मग अपविद्ध करणे, मग उजवा पाय निकुट्टित करून हीच सर्व क्रिया डाव्या हाताने व पायाने करणे. मग उरोमंडल हात करून नितंब, करिहस्त व कटिच्छिन्न ही क्रमाने करणे. [सं.]

उद्धड न. मस्तकविरहित धड. (वा.) **उद्धड करणे–** ठार करणे. [सं. उत्+प्रा.धड]

उद्धत वि. १. मस्त; गर्विष्ठ; उर्मट; उद्धट : 'उद्धत त्या जाती । द्रव्यें रंगल्या उद्धती ।' – तुगा ३११८. २. साहसी; धीट : 'हे संग्रामीं अति उद्धत ।' – ज्ञा १.१९४. [सं.]
न. उपमर्द : 'सख्याचें उद्धत । सखा साहे निवांत ।' –ज्ञा ११.५७४.

उद्धरगत पहा : **उद्धारगत.**

उद्धरण, उद्धरणी न. स्त्री. १. बाहेर काढणे; वर काढणे (खाली पडलेला पदार्थ.). २. उपटून, निखळून काढणे (वृक्ष इ.). ३. अग्निहोत्र्याने कुंडात पुरून ठेवलेला अग्नी बाहेर काढणे; सकाळ–संध्याकाळ कुंडातील अग्नी प्रज्वलित करणे. ४. सुटका करणे; बचाव करणे; अधोगतीपासून सोडवणे; संरक्षण करणे. ५. शापापासून बचाव करणे; (उःशाप देऊन) उद्धार करणे; पुन्हा योग्यतेला चढविणे; मुक्ती देणे; मोक्ष. ६. देऊळ वगैरेची दुरुस्ती करणे. चालू करणे; पुनरुज्जीवित करणे; पुनरुद्धार करणे (वृत्ती, धर्म, हक्क, मालमत्ता इत्यादींचा) : 'तव अधिक शक्त उद्धरणीं ।मी' – स्वासा [सं. उद् + हृ]

उद्धरणे उक्रि. १. सोडविणे; सुटका करणे; वर काढणे; मुक्त करणे : 'उन्नतगजेंद्रउद्धरण । गर्भसंरक्षण परीक्षितीचें ।।'– एभा २.३०५. २. वैभवाच्या स्थितीला नेणे; स्वर्गादी उत्कृष्ट लोकी पोहोचणे; मोक्ष देणे; मुक्त करणे : 'राम उद्धरूनि गौतमजाया ।'३. (विपरीत लक्षणा) शिव्या देणे (वडील माणसांना). (वा.) **एखाद्याचे पितर उद्धरणे** – वाडवडिलांना, पितरांना शिव्या देणे. [सं. उद्धरण]

उद्धरता पु. उद्धार करणारा. [सं. उद्धर्तृ]

उद्धराम्ल न. (शाप.) एक प्रकारचे अम्ल –घटक उज्ज व हर.

उद्धर्ता, उद्धारक वि. सुटका करणारा; मुक्त करणारा. [सं.]

उद्धव पु. उत्साह; आनंद : 'निजतत्त्व कथुनि ब्रह्मादि सुरासि विपुल उद्धव दे ।'– विमाहा ३.३९. [सं. उद् +हु]

उद्धवणे सक्रि. प्रज्वलित करणे : 'अनुतापु वैश्वानरा । उद्धवतु इंद्रिए जोहरा । आंतु कवण वांचे ।।'– ऋ ५६. [सं. उद् + धू]

उद्धळण न. फासणे; चोपडणे; माखणे; उडवणे; उधळणे : 'भस्म उद्धळण लक्ष्मीचा भोग । शंकर श्रीरंग उभयरूपीं ।।'– तुगा २०५०. [सं. उद् + धूळ्]

उद्धाट पु. १. घर्षण. २. (ल.) घोष :'तैं कळिमळांचीं मळगटें । नामोद्धाटें नासती ।।' – एभा ४.२५३. [सं. उद + हन्–हत]

उद्धाटन न. १. पहा **: उद्धाटण, उद्धाटन**.२. (सभा इत्यादींना) औपचारिक सुरुवात करणे. [सं.]

उद्धाटन न. (भाषा.) तोंड उघडून हवेच्या निःसारणाचा मार्ग मोकळा करण्याची कृती ; हवेला बाहेर जाण्याची वाट.

उद्धाटन समारंभ सभा, संमेलन इ. सुरू होण्यापूर्वी, नवीन इमारत, पूल इ. वापरण्यास सुरुवात करण्यापूर्वी प्रतिष्ठित पाहुण्यांच्या हस्ते करण्यात येणारा औपचारिक समारंभ.

उद्धात वि. फाकलेला; पसरलेला : 'उद्धातया रंगाचा हीरा ते मानकुलाचि ।'– भाए ६४५. [सं. उद् + हा= सोडणे]

उद्धार पु. पहा **: उद्धरण**. १. वर, बाहेर काढणे. २. मुक्ती; मोक्ष; सुटका; सोडवणूक; हीन स्थितीतून वर आणणे; गर्भवास चुकवणे. ३. पुनरुज्जीवन; पुनर्जन्म. ४. आलापन (राग, रागिणी वगैरे) : 'रागोद्धार करितां प्रत्यक्ष । दीप लागले लक्षानुलक्ष ।' – शनि २२८. ५.वेचा; अवतरण (एखाद्या ग्रंथातील).[सं. उद्+हृ किंवा धृ] (वा.) **उद्धार करणे** – (उप.) शिव्या देणे; पितर उद्धरणे.

उद्धार उत्खनन (पुरा.) पुरातन वस्तू सुरक्षित रीतीने बाहेर काढण्यासाठी केलेले पद्धतशीर प्रयत्न.

उद्धारक वि. १. वर काढणारा; उद्धार करणारा; उद्धर्ता. २. (सामाजिक)

जुन्या मताचा; दुर्धारक. सुधारक या संज्ञेविरुद्ध. [सं.]

उद्धार करणे सक्रि. १. हीन, पतित अवस्थेतून वर काढणे; सुधारणा करणे. २. मोक्ष देणे.

उद्धारकर्ता वि. उद्धार करणारा. [सं. उद्धार+कर्तृ]

उद्धारकोष्टक न. (ग्रंथ.) वर्गीकरणामध्ये अवतरण या अर्थी येणारे चिन्ह.

उद्धारगत स्त्री. १. उद्धार चांगली स्थिती प्राप्त होणे. २. मुक्ती मिळणे; सुटका होणे. [सं. उद्धार +गति]

उद्धारण, उद्धारणे पहा : **उद्धरण, उद्धरणे.**

उद्धावन टाकी पाण्याच्या जोराने जागा धुऊन काढण्याची सोय असलेली, पाणी साठविण्याची टाकी. सामान्यत: संडासात अशा टाक्या असतात.

उद्धूलन न. १. उधळणे; इतस्तत; फेकणे; पसरणे (माती, राख, भस्म, गुलाल, बुक्का इ.). २. (ल.) उधळपट्टी करणे; बेसुमार खर्चणे. [सं. उद्+धूल्]

उद्धृत वि. १ सुटका केलेला; मुक्त केलेला; रक्षिलेला; वर चढवलेला; उत्कर्ष केलेला. पहा :**उद्धरण**. २. अवतरण; अवतरून, उतरून घेतलेले (वाक्य वगैरे). [सं.]

उद्ध्वस्त पहा : उध्वस्त 'शत्रूची धावपट्टी उद्ध्वस्त करण्याची फार गरज होती.' –आभ ३६४.

उद्बंध पु. (स्था.) (घुमटांचे दोन डेरे एकत्र जुळल्याने होणाऱ्या) जंघाकोनावरील पट्टी.

उद्बंध, उद्बंधन पु. न. टांगून ठेवणे; लोंबकळत ठेवणे. [सं. उद्+बंध्]

उद्बीज वि. एकदम उत्पन्न झालेले, आलेले (टोळ, टोळधाड, मुंग्यांचा थवा, कृमीकीटक वगैरे).

न. एकदम होणारा, दिसू लागणारा घोळका; पुंज (मुंग्या, ढेकूण इत्यादींचा). [सं. उद्भिज्ज]

उद्बुद्ध वि. १. माहिती करून दिलेला; जाणीव असलेला; ज्ञान झालेला. २. जागृत; उज्जीवित; चेतना दिलेला; उत्तेजित. ३. ताकीद दिलेला; पूर्वसूचित; समजावणी मिळालेला. [सं.]

उद्बोध, उद्बोधन् पु. न. १. शिकवण; शिक्षण; समजावणी. २. सूचना; ताकीद. ३. जागृती; निजून उठणे; चेतना :'निखिळ उद्‌बोधांचेचि आपणपें घडे ।' – ज्ञा ९.९६. ४. (विशेषत: उद्बोध) ज्ञान; माहिती; समज; जाणीव. [सं. उद्+बुध्]

उद्बोधक वि. १. ज्यापासून बोध घ्यावा असे; शिकवण देणारे; ज्ञान देणारे. २. सूचक; द्योतक; गमक; ज्ञापक. उदा. शरण आल्याचे – दाती धरलेले तृण; अनर्थाचे – उल्कापात वगैरे; राजत्वाचे. छत्र, ध्वज वगैरे; ताप आल्याचे – अंग ऊन होणे वगैरे; मृत्यूजवळ आल्याचे – वृद्धत्व, अशक्तता इत्यादी ही त्या त्या स्थितीची उद्‌बोधक लक्षणे होत. ३. उत्तेजक; मादक; दाहक, अम्ल (जिभेचे), सौंदर्य (इच्छेचे, कामाचे) यावरून (सामा.) प्रवर्तक, उद्दीपक, उत्तेजक, चैतन्यदायक. [सं. उद्+बुध्]

उद्बोधकारक वि. शिकवणारे, जागृत करणारे (वाङ्मय, कलाकृती इ.)

उद्बोधणे अक्रि. जागृत होणे :'साच ज्ञान उद्‌बोधें । कोवळें जें ।।' – ज्ञा १८.१४३६.

उद्बोधन न. १. (तत्त्व.) उद्‌बोधित करण्याची प्रक्रिया; युरोपमधील १८ व्या शतकातील एक तात्त्विक मतप्रवाह. या मतप्रवाहाने पारंपारिक तत्त्वे आणि मूल्ये यांच्याकडे संशयवादी दृष्टिकोनातून पाहण्याचा पायंडा पाडला, व्यक्तिवादाकडे लोकांचा कल झुकविला आणि सार्वजनिक मानवी उत्कर्ष, अनुभवप्रधान वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब आणि अनिर्बंध बुद्धिप्रामाण्यावर अढळ श्रद्धा यांवर भर दिला. २. (शिक्षण) प्राप्त ज्ञानाची उजळणी व त्यात अद्ययावत ज्ञानाची भर. ३. स्वत : चे विचार भोवतालच्या परिस्थितीला जुळतील असे त्यांचे आधुनिकीकरण. ४. आग्रहाने उपदेश करणे; मन वळवणे; हितोपदेश करणे. [सं.]

उद्भट वि. १. शूर; धाडसी; बलवान; धारिष्टवान; धैर्याचा : 'राजकुमर वीर उद्‌भट ।' – मुआदि ३१.२९. २. प्रचंड; अफाट; मोठा; विस्तृत :'आंसडोनि बळ उद्‌भटें । मधें उघडिला तडतडाटें ।' – मुसभा ७.५५. ३. श्रेष्ठ; उत्कृष्ट; थोर; प्रख्यात :'जे स्वगुणी उद्‌भट । घेऊनि सत्व चोखट ।' – ज्ञा १४.२१८. ४. कठिण; कठोर; खडतर : 'पुराणीं उपदेश साधन उद्‌भट । आम्हां सोपी वाट वैकुंठींची ।।' – तुगा २११९. ५. उन्मत्त. पहा : **उद्धट** [सं.]

उद्भव–उद्भाव पु. १. उत्पत्ती; प्रादुर्भाव; प्रारंभ; जन्म : 'भुवनोद्भवारंभस्तंभ । भवध्वंस ।।' – ज्ञा १८.६. २. प्रकट होणे; बाहेर पडणे. ३. हेतू. [सं. उद्+भू]

उद्भवणे अक्रि. १. उत्पन्न होणे; प्रारंभ होणे; निर्माण होणे; जन्म पावणे. २. प्रकट होणे. (क्वचित सकर्मक प्रयोग). [सं.उद्+भू]

उद्भावणे, उद्भाविणे सक्रि. १.उत्पन्न करणे; अस्तित्वात आणणे; जन्माला घालणे. २. प्रकट करणे; उघड करणे. [सं. उद्+भू]

उद्भावन न. १. विचार; बोलणे; सांगणे. २. उत्पत्ती; जन्म; उत्पादन. ३. प्रकट करणे; उपस्थित करणे; प्रदर्शन. [सं. उद्+भू]

उद्भावन न. अनवधान; असावधान; अनास्था. [सं.]

उद्भासन न. १. (भौ.) उजेडात ठेवणे; उघड्यावर ठेवणे. २. (भूशा.) खडकाचा उघडा पडलेला भाग. [सं.]

उद्भिज, उद्भिज्ज, उद्भिद न. वृक्ष, वनस्पती इ. सृष्टी :'जैसी मही हे उद्‌भिजें ।' – ज्ञा ६.४४.

वि. जमिनीत उगवणारे; जमिनीतून वर येणारे; अंकुर फुटणारे; बाहेर पडणारे (वृक्ष, वनस्पती इ.). [सं. उद्+भिद्]

उद्भिज कटिबंध पृथ्वीच्या ज्या भागात वनस्पती वाढतात तो प्रदेश.

उद्भिज कोटी वनस्पतिवर्ग. प्राणिवर्गाच्या उलट :'सेंद्रिय रसायनशास्त्रात उद्भिज्ज व प्राणिज या सेंद्रियकोटींतील यच्चयावत पदार्थांचा समावेश होतो.' – सेंपू प्रस्तावना १.

उद्भिज्ज पु. (वन.) निसर्गातील वायू, पाणी, खनिजे यांचे शोषण करणारे व सूर्यापासून अन्न बनवण्यास लागणाऱ्या उर्जेचा वापर करणारे वनस्पतीतील हरितद्रव्ययुक्त, स्वावलंबी, सजीव घटक. [सं.]

उद्भूत वि. १. उत्पन्न झालेला; जन्मलेला. २. प्रकट झालेला; निघालेला; बाहेर पडलेला; आविर्भूत. [सं.]

उद्भेद पु. १. फुटून बाहेर पडण्याची क्रिया (जमिनीतून अंकुर येतात त्याप्रमाणे). २. विकसन; उमलणे; फुलणे; दृश्य होणे. [सं. उद्+भिद्]

उद्भ्रंश पु. लोकभाषेतील शब्द संस्कृतमध्ये उचलण्याची प्रक्रिया – मभामू १०.

उद्भ्रांत वि. संभ्रमित; बावरलेला; गोंधळलेला; गडबडलेला. मनस्ताप पावलेला; विव्हळ. [सं. उद्+भ्रम्]

उद्यत वि. १. तयार; तत्पर; उत्सुक; उद्युक्त; सिद्ध :'जे जाहले असती उद्यत झुंजावया ।' – ज्ञा १.२१९. २. उगवलेला; वर आलेला (सूर्य वगैरे). [सं.]

उद्यतदंड, उद्यतबाहू वि. हात वर केलेला; हात उगारलेला; कडक; शिस्तीचा; कठोर (राजा, न्यायाधीश). [सं.]

उद्यत्कार वि. प्रकाश देणारा :'उद्यत्कारुं सूर्य जैसा ।' – अमृ ६.३.

उद्यम पु. उद्योग; उद्योगधंदा; व्यापार. पहा :**उदीम** :'जैसें भाग्याचिया भडसें । उद्यमाचेनि मिसें ।' – ज्ञा ६.३५४. [सं.]

उद्यमशील वि. उद्योगी; मेहनती; परिश्रम करणारा; कष्टाळू; उत्साही.

उद्यमी वि. उद्योगी; नेहमी कामात असलेला; मेहनती; कष्टाळू. [सं.]

उद्या क्रिवि. उदयीक; दुसऱ्या दिवशी. [सं. उद्+इ]

उद्याकडे क्रिवि. उद्या; उद्यापर्यंत :'म्हातारेबुवा, बादशहाचा एक सरदार आपल्या लष्करासह आज-उद्यांकडे ह्या बाजूनें जाणार असल्याचे सेनापतीसाहेबांना खबर लागली आहे.' – स्वप १९०.

उद्याचा आदितवार कधी न येणारा दिवस = एखादी गोष्ट करायचे मनात नसले म्हणजे उद्याच्या आदितवारी करू असे उत्तर देणे.

उद्याणी स्त्री. मांडणी :'हे नवमाध्यायीं उद्याणी । केली होती ।।' – राज्ञा १६.६०.

उद्यान न. बाग; बगीचा; उपवन :'कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें ।।' – ज्ञा १.२८. [सं.]

उद्यानकुंज पु. बागेतील एकांत असलेली जागा. [सं.]

उद्यानबंगला पु. खेड्यातील घर; बागेतील बंगला.

उद्यानभोजन न. वनभोजन :'तथापि चार सहा महिन्यांतून एखादे वेळेस तरी त्यांना शिष्टसंप्रदायाप्रमाणे उद्यानभोजन, खाना, चहापार्टी वगैरे द्यावी लागत असेच.' – नपुक २६.

उद्यानविद्या स्त्री. फलोद्यानासंबंधीचे शास्त्र.

उद्यानविज्ञान न. (वन.) फलोद्यानांची रचना करण्याचे शास्त्र. फळझाडे, फुलझाडे व इतर शोभिवंत झाडे यांची कलात्मक रचना करून बागा, उपवने, वाटिका, इ. तयार करण्याची विद्या. [सं.]

उद्यानोपाहार पु. पाहुण्यांना बागेत दिलेले भोजन.

उद्यापन न. १. आरंभलेले व्रत संपल्यावर त्या व्रताची सांगता; त्यासंबंधी विधी, कर्म. २. धर्मशाळा, सरोवर, अश्वत्थ इत्यादिकांचा विधिपूर्वक उपयोग करायच्या पूर्वी करण्याचा विधी. ३. (ल.) गाशा गुंडाळणे; हानी; आपत्ती; अरिष्ट; संकट; कार्यनाश. [सं.]

उद्यापित वि. योग्य विधीने विसर्जन केलेला; विधिपूर्वक उपयोगात आणलेला (तळे, धर्मशाळा वगैरे). [सं.]

उद्युक्त वि. १. तयार; सिद्ध; सज्ज; प्रवृत्त. २. गढलेला; गुंतलेला. [सं. उद्+युज्=जोडणे]

उद्युत्कार वि. उदय, प्रकाश करणारा. पहा : **उद्योतकर** [सं. उद्+दयुत् = प्रकाशणे]

उद्योग पु. १. कारखानदारी. २. काम; धंदा; नोकरी; रोजगार. ३. कार्य; व्यवसाय. ४. खटपट; प्रयत्न; मेहनत; श्रम. ५. (अर्थ.) विशिष्ट वस्तूंचे उत्पादन करणारी एक संस्था वा अशा अनेक संस्थांचा समूह. [सं. उद्+युज् = जोडणे – योग] (वा.) **उद्योग चालवणे, उद्योग करणे –** काम हाती घेणे; कामधंदा चालवणे, सुरू करणे.

उद्योगधंदा पु. चरितार्थासाठी करायचे (नोकरी सोडून इतर) काम.

उद्योगपति–ती पु. निरनिराळ्या उद्योगधंद्यांचे किंवा उद्योगसमूहांचे मालक, धनी. उद्योगात वा कारखानदारीत फार मोठी गुंतवणूक केलेले व त्यांची मालकी असलेले कारखानदार :'उद्योगपती हा पूर्णपणे स्वतंत्र असत नाही.' – कराअ. [सं.]

उद्योगवेळ, उद्योगवेळा पु. स्त्री. दिनमानाचे आठ भाग धरून पाडलेला एक भाग. हा पावणेचार घटिकांचा असतो.

उद्योगी वि. १. नेहमी कामात गुंतलेला, गर्क असलेला. २. मेहनती; कष्टाळू. ३. ज्याला कामधंदा आहे असा. आळशी याच्या उलट. ४. (उप.) उपद्व्यापी; नसते लचांड उपस्थित करणारा. जसे :– 'उद्योगी बाळ'. [सं.]

उद्योजक पु. उद्योगक्षेत्रात नवीन उपक्रम सुरू करणारा, प्रयोगशील कारखानदार. [सं. उद्+युज्]

उद्योतकर, उद्योतकार वि. पु. उदयकर्ता; प्रकाशक; दीपक :'वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्योतकारु सूर्य जैसा ।।' – अमृ ६.३. [सं. उद्योत+कृ]

उद्र पु. ऊद; पाणमांजर. [सं.]

उद्रस वि. बेचव; नीरस; शुष्क; शिळे; वाळलेले. [सं. उद्+रस]

उद्राण न. मुक्ती; मोक्ष. पहा : **उद्धरण** :'पोवाडा गात्याला उद्राण । ऐकत्याला घडो पुण्य ।' – ऐपो ६३. [सं. उद्धरण]

उद्रिक्त वि. अतिशय समृद्ध असलेले; रगड; वाजवीपेक्षा जास्त; गडगंज. [सं. उद्+रिच्]

उद्रेक उद्रेक् पु. १. उसळून वर येणे; स्फोट; आवेग. २. वृद्धी; वैपुल्य; अतिरेक. ३. वेग; वेदना; यातना; कळ; मुरडा (पोटातील विकारामुळे मलमूत्रविसर्जनापूर्वी होणारा). ४. आकस्मिक प्रेरणा; लहर; उमाळा (पोटातून येणे या बरोबर प्रयोग). [सं.]

उद्वर्तन न. १. सुगंधी द्रव्ये लावून स्वच्छ करणे; उटणे लावणे (देवमूर्ती, शरीर इत्यादींना); प्रक्षालन. उदा. करोद्वर्तन :'कितिएक गोपस्त्रिया । विलेपन करित होतिया । उद्वर्तनादि क्रिया । संपादितां ।' रास १.२१४. २. कामावरून हाकून देणे; उच्चाटण. ३. सुटका; ताटातूट; फाटाफूट :'राजश्रीचे आईसाहेबापासून उद्वर्तन जाले.' – पुरंदभा १.२०२. [सं.]

उद्वर्तन ऊरू (नृत्य) नृत्यात सूचीपाद करून मांडी वर उचलणे.

उद्वर्तनफलक पु. तार किंवा सूत ओढण्याची पट्टी, जंत्री.

उद्वर्ध पु. (वै.) १. अधिक प्रमाणात झालेली वाढ (एखादा अवयव, हाड इ.ची). २. मूळ वस्तूपासून उद्भवलेली वाढ. एका पदार्थापासून दुसरी गोष्ट सरळ उगवणे. जसे :– झाडाची फांदी. [सं.]

उद्वस, उद्वसु, उद्वसे, उद्वस्त वि. १. ओस; शून्य; उजाड; निर्जन; ओसाड;

उद्‌ध्वस्त; रिकामा; उदास :'ययापरी उद्वस्त समस्त । पांढरी पडली ।' – गीता २.२२७१; 'नाना उद्वसें जे वनें ।' – दास ८.५.८. २. अस्ताव्यस्त; अव्यवस्थित; घोटाळ्याचा; गोंधळ झालेला (व्यवहार, काम) (राजा.). ३. व्यर्थ; फुकट :'नातरी पाहावया दिवसु । वातीचा कीजे सोसु । तेव्हढाही उद्वसु । उद्यमु पडे ॥' – अमृ ६.२९.

उद्वस्कंध पु. सप्तस्कंधातील सूर्यमंडळापासून चंद्रमंडळापर्यंत ज्याची मर्यादा असा तिसरा स्कंध. [सं.]

उद्वहन यंत्र (सामान, माणसे इत्यादींना) एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर चढवणारे किंवा खाली आणणारे यंत्रचलित साधन; लिफ्ट.

उद्वार्चन, उद्वार्जन पहा : **उद्वर्तन**

उद्वासन न. १. मूर्तीच्या ठिकाणी प्राणप्रतिष्ठा केलेल्या देवतेचे विसर्जन, उत्थापन :'एवं पूजेचे उद्वासन ।' – एभा ३.८४३. २. काढून टाकणे (अधिकारापासून); उच्चाटन. [सं. उद्+वस्]

उद्वाह पु. विवाह; लग्न. [सं.]

उद्वाहक पु. विजेचा पाळणा; लिफ्ट. [सं.]

उद्विग्न वि. उदास; खिन्न; अस्वस्थ; दुःख – संकट – भयग्रस्त; काळजीने व्याप्त; चिंताक्रांत; विषण्ण; व्यग्र; त्रस्त; वीट आलेला. [सं. उद्+विज्]

उद्‌वृत्त वि. धर्मबाह्य, अशास्त्र वर्तन करणारा; बहकलेला; उच्छृंखल; चैनी; स्वैरवर्तनाचा; निसवलेला; अवगलेला. [सं. उद्+वृत्त]

उद्वृत्त, उद्वृत्तशंकु पहा : **उन्मंडलशंकु**

उद्वेग पु. उद्विग्नपणा; खेद; अस्वस्थता; खिन्नता; कंटाळा; काळजी, भीती, दुःख यांपासून त्रास :'विसरू कामाचा तुका म्हणे झाला । उद्वेग राहिला जावें यावें ॥' – तुगा ७५. [सं. उद्+विज्]

उद्वेगणे अक्रि. उद्विग्न होणे; खिन्न होणे; अस्वस्थ होणे :'मज हांसतील ते संत । जिहीं देखिलेति मूर्तिमंत । म्हणोनि उद्वेगलें चित्त । अहाच भक्त ऐसा दिसे ॥' – तुगा ७१६. [सं. उद्+विज्]

उद्वेप पु. उपद्‌व्याप :'देहींचा सोडोनि खटाटोप । शिवें धरिला दारूण कोप । केला मल्लयुद्ध उद्वेप । जाज्वल्यमान ।' – कथा ७.८.५.

उधई स्त्री. पांढरी मुंगी; वाळवी. या मुंग्या जमिनीत वारुळे तयार करून किंवा भिंती–तुळ्यांवर घरे करून राहतात :'उधयानीं खादलें शरीर । वरू ते उगवले तरुवर । तेव्हां अस्थिमय प्राण साचार । यास्तव न मरे सर्वथा ॥' – सवि १०.११६.

उधट, उधंट पहा : **उद्धट** :'उधटेआं देवां जगझंपू ।' – शिव १५४; 'ज्या सासुरां वर्तति गे उधंटा ।' – सारुह ७.१२८.

उधड पु. ठेका; मक्ता. (व.) [सं. उद्+धृत्]

उधड–डा वि. उक्ता; बिनहिशोबी; अंदाजाने :'जमादारास लागवड खर्चाबद्दल दरमहा १ रुपयाप्रमाणे उधड देण्यांत यावा.' – (बडोदे) पहिलवान कुस्ती नियम ८.

उधडणे उक्रि. १. उसवणे; उकलणे; फोडणे. २. (साल, काठ वगैरे) फाडणे; चिंधड्या, चिरफाळ्या करणे :'मधें उधडिला तडतडाटें ।' – मुसभा ७.५५. ३. (ल.) धुडकावणे; हाकलणे; उच्चाटन करणे :'उधडिला सिंह कोल्ह्यांनीं ।' – संग्रामगीते ८१.४. (चांभारी) मेलेल्या जनावरांचे कातडे काढणे. (व.)[सं. उद्+धृ]

उधडमाप न. अंदाजी वजन, माप, हिशेब; उक्ते माप.

उधणी, उधवणी स्त्री. गवाक्ष; धारे; धुराडे; झडप :'उधणी म्हणजे उडवीचे पाखे' – आआशे ३७८. [सं. उद्+धू]

उधणे अक्रि. वर येणे; प्रकट होणे :'नेंदिजे चि संशृती । माथा उधों ।' – राज्ञा १४.४९.

उधम न. गडबड; कल्ला; दंगा : 'त्याने … वेश्यागृहात घुसून खूप उधम केला.' – अहिल्या १०.

उधमणे अक्रि. उकळी येणे; बुडबुडे येणे. [सं. उद्+ध्मा]

उधर क्रिवि. सरसकट; उघड. (खा.)

उधरण न. भेट; आहेर; नजराणा :'उधरण रंगी आणि द्राक्ष फळें बहुता प्रकारें । रामापुढें ठेविताती सकळिक पक्वानें सारें ।' – बगाथा ६२९. [सं. उद्+हृ]

उधरणे अक्रि. १. ओकणे; ओकारी येणे. [सं. उद्+हृ]

उधरणे सक्रि. उद्धार करणे :'जना उधरी नाथ लोकत्रयाचा ।' – राम २५. [सं. उद्+हृ]

उधरागती स्त्री. उद्धारगती; मोक्ष; मुक्ती :'नरदेही येऊन सकळ । उधरागती पावले केवळ । येथे संशयाचें मूळ । खंडोन गेलें ॥' – दास १.१०.२०. [सं. उद्धार+गति]

उधर्ता वि. उद्धारकर्ता :'भूतें भूत धर्ताचि धर्ता अधर्ता ।' – राक १.१. [सं. उद्‌धृ]

उधल वि. वण असलेले. पहा : **उधेल**

उधवटा वि. कठीण. पहा : **उधट** :'देव्हूडियां । वेणिआं उकलैलियां । उधवटां गांठीं सूटलियां ॥' – शिव ७१६. [सं. उद्‌धत]

उधवणी पहा : **उधणी** :'उधवणीचें जेवीं तोंड । उभळी धुंवाचे उभड ।' – ज्ञा १६.२९४.

उधवणे अक्रि. पेटणे.

उधवणे, उधविणे अक्रि. १. उसळणे; उधळणे; वर येणे, जाणे, होणे, करणे :'नातरी वडवानळु सांदुकला । प्रलयवातें पोखला । सागर शोषूनि उधवला । अंबरासी ॥' – ज्ञा १.९०. २. वाढणे :'मग तो न सांवरे जैसा उधवला ।' –ज्ञा ३.२०४. ३.उगवणे; उद्भवणे :'तैसिया सर्वांगीं उधवती अणियां । रोमाचियां ॥' –ज्ञा ६.२६४. ४. वर जाणे; उठणे; पसरणे :'सांगें भुवनत्रयाची काजळी । जे गगनामाजि उधवली ।' – ज्ञा ४.१७५. ५. उभे करणे; उचलून ठेवणे (जातण, पाटी इ.); नीट ठेवणे. पहा : **उदवणे** [सं. उद्+धू]

उधवी स्त्री. १. धुराडे :'उधविचें तोंड । उगलीत घूमाचे उभड ।' – राज्ञा १६.२९२. २. आगीटी.

उधसणे सक्रि. उकरून काढणे; उसकटणे; उसकणे.
अक्रि. वर येणे; उसळणे :'सर्वांचे दुबळेपण उधसून वर आले.' – उपेअं १९.

उधळ स्त्री. अवास्तव खर्च; बेसुमार खर्च; उधळमाधळ; उधळपट्टी. [सं. उद्+धूल]

उधळखोर, उधळपट्ट्या, उधळपांड्या, उधळमाणक्या, उधळमाथळ्या, उधळवाढ्या वि. उधळपट्टी करणारा; अवास्तव

खर्चिक; अति खर्च करणारा; उधळ्या; बेसुमार, बेदाद, शक्तीबाहेर, निष्कारण खर्च करणारा :'ह्या गुणांचा योग्य उपयोग करण्यासारखा रोजगार नसल्यामुळे त्या (अस्पृश्यजाती) बेलगामी, उधळमाणक्या, स्वाभिमानशून्य झाल्या आहेत.' – गांगा १२०.

उधळमाणकी, माधळ स्त्री. उधळणे, वर फेकणे, उडविणे.

उधळठक (चुकीने). पहा : **उजळठक**

उधळण, उधळणी न. स्त्री. १. अवास्तव खर्च. २. उधळणे, वर फेकणे, टाकणे; उडविणे :'विभूतीचें उधळण शितिकंठ नीळा ।' – शंकराची आरती. [सं. उद्+धूलन]

उधळणे सक्रि. १. वर फेकणे; उडवणे; पसरणे (धूळ, गुलाल, राख वगैरे). २. वारवणे; वारा घालणे. ३. (ल.) पळवून लावणे; दाणादाण करणे; दशदिशा करणे; हाकून लावणे; पिटाळून देणे (सैन्य, गर्दी वगैरे). ४. अतिशय खर्च करणे; उधळपट्टी करणे :'लग्नात पैसा उधळताना त्यांनी कुठंच कसूर केली नाही.' – एल्गार ५३. ५. (सामा.) नाहीसे होणे, जाणे :'अहो या लोहाचा जिनस परिसेसीं जरी मिळे । तयाच्या संसर्गे अखिल मग लोहत्व उधळे ।' – सारुह ५.६२. ६. (सभा इ.) मोडून टाकणे; बंद पाडणे; विस्कटून टाकणे. ७. दळलेल्या धान्याचे जात्याला चिकटलेले कण झाडून टाकणे.

अक्रि. १. दशदिशा पळणे (सैन्य, समाज वगैरे) ; 'शिकारीला गेलेले स्त्रीसैन्य उधळलेले दिसते.' – बाय ४.२. २. अनावर होणे; बुजून पळणे (भ्यालेला घोडा, बैल वगैरे). ३. उनाडणे; भटकणे; फिरणे (मूल वगैरेंनी). ४. आवेशाने एखादी क्रिया करणे (मारणे, शिव्या देणे वगैरे). ५. जोराने बाहेर पडणे; बळावणे (एखादा रोग). ६. बुडणे; अजिबात नाश होणे (पीक वगैरे). ७. पळून जाणे; नाहीसे होणे (एखादे कूळ, भाडेकरी वगैरे).[सं. उद्+धूल] (वा.) **उधळा घालणे** – १. उड्या मारणे; हैदोस घालणे; दांडगाई मांडणे. २. पळवून लावणे (मंत्राने, जादूने वगैरे). [सं. उद्+धूल्]

उधळपट्टी स्त्री. १. मनस्वी, फाजील, प्रमाणाबाहेर खर्च; निष्कारण व्यय.

उधळभवानी, मावशी स्त्री. खर्चिक स्त्री; उधळी.

उधळमाख स्त्री.उधळपट्टी; उधळमाधळ :'आम्ही पैशाची अशी उधळमाख करतो.' – विविध १८.८.३६, (१५).

उधळमाधळ स्त्री. उधळ; उधळपट्टी; नको त्या ठिकाणी खर्च; आटोपशीरपणा नसणे :'कथात तसली उधळमाधळ करून वाचकाला दिपविण्याची संधी ...' – शेलूक (प्र.) १.

उधळवाफ स्त्री. १. ओल कमी झाल्यामुळे पेरण्यास अयोग्य अशी जमिनीची स्थिती; किंचित कोरडेपणा. २. पेरणीचा हंगाम गेल्यानंतरचा काळ. ऐनवाफ, घातवाफ यांच्या उलट.

उधळवावली क्रिवि. आल्या पायी परत; मागल्या पायी माघारे :'उधळवावलीं जावें कीं ...' – पैठणच १४३.

उधळा पु. १. भुरळ; मोह :'हा रजोगुणाचा उधळा । पडे ज्ञानियाचां डोळा ।' – उगी ७३८. २. मंतरलेली राख; भस्म; धुरळा. पहा : **उधळण** :'कनककमळांचां कचोळा । कीजे परागाचा उधळा ।।' – शिव ७८१.

उधळा, उधळ्या वि. पुष्कळ खर्च करणारा; उधळपट्टी करणारा. पहा : **उडव्या** : 'धर्म करी त्याला उधळ म्हणती । न केल्या बोलती पोटपोशा ।।'

उधळाउधळ पहा : **उधळणे १,३**

उधा वि. उधळ्या.

उधाइणे न. प्रकट होणे. पहा :**उधवणे** :'म्हणौनि आळविला तंव बोखटा । उधाइला हा ।।' – राज्ञा ११.४४७. [सं. उद्+धृ]

उधाण, उधान न. १. अमावस्या–पौर्णिमेला येणारी मोठी भरती; पूर्ण भरती :'भरलें रतिसागरीं विषय उधान । करूं कुठवर करीं अपिधान ।।' – प्रला १३९. २. (सामा.) भर; ऊत :'बादशहाचा हा गळेकापू प्रकार पाहून माझ्या देहांतल्या एकूण एक धमन्यांतील रक्त सारखे उधाण पावत आहे.' – स्वप ७६. ३. पशूंच्या ठिकाणी दिसून येणारे कामोद्दीपन. ४. तारुण्याचा भर. ५. भरभराट; उत्कर्ष वगैरे. [सं. उत्थान] (वा.) **उधाण येणे** – भरती येणे; उचंबळून येणे : 'उत्साहाला उधाण यावं तर त्याच वेळी .....' – किरि ४३.

उधाणी स्त्री. वाद; चर्चा :'भेटीसरसीचि उधाणी प्रवर्तली ।' – लर २०. [सं. उद्+वाणी]

उधाणे अक्रि. बहरणे; प्रफुल्ल होणे; उत्कर्ष पावणे; विकसणे; बहर येणे : 'जेथ पद्मे प्रेमा मोददती । आनंदमकरंदे उधाती ।।' – ज्ञाप्र ४१२.

उधानणे अक्रि. १. तारुण्याच्या भरात येणे. २. भरती येणे.

उधानाचे पाणी पौर्णिमा–अमावास्येस येणारे मोठ्या भरतीचे पाणी.

उधाय अक्रि. ओसंडणे :'घवघवीत दैवी चहुकडे उधाय ।'– ऋ.

उधार पु. १. पतीवर किंवा खात्यावर जिन्नस आणणे; आणलेला जिन्नस :'मज उधार न घालावा संनिधानाचा ।' – भाए १४५. २. ऋण; कर्ज; पतीवर आणलेल्या मालाबद्दलचे येणे–देणे :'याचा धरी नियत इंदु उधार साचा.' – सारुह ८.१३१. ३. बिनव्याजी कर्ज; उसनी आणलेली रक्कम; वस्तू.

वि. अवकाशाचा; वायद्याचा; विलंबाचा :'संसार म्हणजे सवेंच स्वार । नाहीं मरणास उधार ।।' – दास ३.९.१.

क्रिवि. पतीवर, जबाबदारीवर (देणे, घेणे, आणणे, नेणे).[सं. उद् + आ + हृ; किंवा उद् + धृ] (वा.) **उधार बोलणे –** वर वर बोलणे :'काहीं कल्पिसी संदेहो । उधार बोलणें कृत्रिम स्नेहो ।।'– मुरंशु १२९.

उधार पु. (प्र.) उद्धार. अवतरण; उतरून घेतेलेला मजकूर; सारांशरूपाने घेतलेला लेख :'सूर्याजी भोसले यांचे तहनाम्याचा दाखला आहे त्यांत पहिले यांचे तहनाम्याचा उधार आहे.' – मइसा ७.२२३. [सं. उद्धार]

उधारणे अक्रि. कोरून काढणे.

उधारपट पु. पतीवर माल घेतलेल्या गिऱ्हाइकांची नोंद; उधारीची यादी.

उधारपट्टा पु. (अर्थ.) परतफेडीच्या बोलीने वस्तू, सेवा इ. पुरवणे.

उधारपाधार पु. पतीवर माल देणे, घेणे; उधारीचा व्यवहार.[उधारचे द्वि.]

उधार समाकलन पद्धति स्त्री. (वा.) उधार घेण्याची पद्धत.

उधारा वि. उताणा; तोंड वर केलेला.

उधारा पु. उतारा. (गो.)

उधारी स्त्री. काही मुदतीने पैसे देऊ करून माल नेणे; उधार व्यवहार; उधार; उचल; उचापत; ऋण; देणे.

उधावणे उक्रि. उद्भवणे; वाढणे; जोर येणे. पहा : **उधवणे** : 'अधिकांचि

विरोहज्वरुं । उधावतु दिसे ।।' – शिव ८३२. [सं. उद्+धू]

उधासणे अक्रि. उफाळणे; क्षुब्ध होणे. पहा : **उधसणे** : 'बेडकानें उडी मारल्यामुळे सागराचे पाणी उधासेल काय?' – स्यूत २३८.

उधाळा पु. १. उधळणे; डोळ्यात काही उधळून गेले असता होणारी स्थिति; उधळणे; धुंदी : 'मज कैसा पडला मोहाचा उधाळा ।।' – उगी ३८८. २. भुकटी; रक्षा; भस्म : 'घाली रूपाचा उधाळा ।' – उगी ३६२. [सं. उद्‌धूल]

उधाळी स्त्री. उडी. (क्रि. मारणे.)

उधांग न. उसंत; अवकाश. (व.)

उधी स्त्री. १. निर्णय. २. वाढ : 'तैसी तेथ सत्त्वशुद्धी । आगळें ज्ञानासि उधी ।' –राज्ञा १४.२२०.

उधृता वि. वर धरलेली.

उधेल वि. खवले, वण असलेला.

उधोपानस्य पु. कोठीवाला : 'कारकून उधोपानस्या आणोन ।' – रामदासी २.३२.

उध्वस्त वि. समूळ नष्ट केलेला; अस्ताव्यस्त; उधळलेला; इकडेतिकडे करून टाकलेला; नाश केलेला. [सं.]

उनउनीत वि. गरमागरम : 'तो पदार्थ त्याला उनउनीत खायला मिळेल की नाही ....' – पाषाण २४५.

उनखुन स्त्री. मनोमन संकेत : 'कही उनखुन चुकली ।' – लीचपू २९.

उनत वि. सज्ज : 'दोन्ही अरणी उनत जालिया ।' – लीचपू ४६०.

उननी न. आधण आलेले पाणी. (व.)[सं. उष्ण + वन – वणी]

उनवणी न. उष्णोदक.

उनंत वि. थोर; मोठा : 'जुंझा लागौनी उनंत ।' – उषा ८२७.[सं. उन्नत]

उना, उनी अक्रि. आला–आली. (खा.)[हिं. आना]

उनाइनें ऐकून. (भिल्ली.).

उनाड वि. १. अनिर्बंध; भटक्या; खोड्या काढणारा; कामधाम न करणारा; उडाणटप्पू; मोकळा; सुटलेला; स्वैर (मनुष्य, मूल). २. जंगली; रानटी (बैल, वनस्पती वगैरे). ३. स्वैर, व्यभिचारी. (को.)

क्रिवि. १. स्वैरतेने, अनिर्बंधपणे, स्वच्छंदपणे (भटकणे). २. आपोआप, न लावता (उगवणे). [सं. उद्+नट्, नाट्]

उनाडकी स्त्री. उनाडटप्पूपणा; खोडकरपणा.

उनाडघेवडा वि. उनाड : 'उनाडघेवडी सगळ्या गावात हिंडते.' – आआशे २३२.

उनाडचाळा पु. स्वैरवर्तन; खोडकरपणा; व्रात्यपणा; उनाडकी.

उनाडझाड न. रानटी, जंगली झाड; तण.

उनाडणे अक्रि. स्वैरपणाने फिरणे, भटकणे; खोड्या करीत फिरणे; उनाडक्या करीत राहणे.

उनाडबाहुला वि. भटक्या, उनाडक्या करीत फिरणारा; स्वैर; स्वच्छंदी.

उनाडभाजी स्त्री. जंगली माठ.

उनाडमैना स्त्री. स्वैरिणी स्त्री; चवचाल बाई.

उनारणे सक्रि. पेरणे; इकडेतिकडे फेकणे : 'ती मोती उनारत गेली.' – जसा ३१८.

उनारणे अक्रि. भाजलेल्या कणसांतील दाणे चोळून काढणे. (व.)

उनारी पेरण्याच्या वेळी गव्हाचे किंवा ज्वारीचे दाणे चाड्यात एका विवक्षित क्रमाने सोडण्याची क्रिया. [व.]

उनिदिया, उनीदा वि. जागृत : 'उनीदेयाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें ।' – राज्ञा १२.६४. पहा : **उन्निद्रा** [स. उन्निद्र]

उनी वि. लोकरी; गरम : 'शंकरच्या अंगावरील लालभडक उनी ब्लॅकेट व्यवस्थित केलं.' – माणूस ३४७. [सं. ऊर्ण]

उनीद वि. ज्याची झोप उडाली आहे असा. पहा : **उनिदिया**

उनून वि. गरम; उनउनीत; पुष्कळ ऊन; खूप तापलेले. पहा : **उन्हून**

उने न. १. खोटेपण : 'जरि न करी तरि या बोलाचें उनें असे.' – पर २.१.२. २. उणेपण : 'तुझेया मोक्षपदा कारणें । मानूनि चहु मुक्तीचें उनें.' – ऋम ६९१.

उनैदा स्त्री. निद्रानाश : 'बाबासि उनैदा होइल.' – अली ८३.

उन्चह जे काही.

उन्नत वि. उन्मत्त; उद्धत; मग्रूर : 'तमाम अमीर राजे रजवाडे जाट यांनी मुलूख आटोपून अति उन्नत जाले.' – ऐसंसाखं ७.४३.

उन्नत वि. उंच; उच्च; श्रेष्ठ; वर आलेला; भरभराटीला आलेला; उठावदार. [सं. उद्+नम्]

उन्नत, उन्नतांश न. पु. १. (ज्यो.) खस्थ पदार्थांचे क्षितिजापासून होणारे कोनात्मक अंतर. २. समुद्रसपाटीपासूनची उंची.

उन्नति–ती स्त्री. १. उंची. २. श्रेष्ठपणा; मोठेपणा; अधिकार. ३. उत्साह : 'कां परिसु जालिया हातीं । लोहालागीं सर्व संपत्ति । वेंचितां ये उन्नती ।' – ज्ञा १८.६००. ४. उदय : 'दिवसाचिये उन्नती । भानु जैसा ।।' – ज्ञा १७.१३३. ५. वृद्धी; प्रगती; विकास; उत्कर्ष; आधिक्य : 'ते कथेची संगति । भावाची संपत्ति । रसाची उन्नति । म्हणिपेल पुढा ।।' – ज्ञा ४.२११. ६. पहा : (ज्यो.) : **उन्नतांश.** ७. उद्धटपणा. [सं. उद्+नम्–नति]

उन्नत्र न. उज्ज व नत्र यांचे संयुक्त द्रव्य.

उन्नद्ध वि. गर्वाने फुगलेला : 'वक्रदंत जरासंध । शाल्वपौंड्रक उन्नद्ध ।।' – एरुस्व ५.३७. [सं. उद्+नह्]

उन्नयन न. १. वर नेणे; उचलणे; दूर नेणे; लांबविणे. २. वर येणे; मोठेपणा देणे : 'वास्तवाच्या उन्नयनाला जागा नाही.' – पासंग ७८. ३. (सास) उदात्तीकरण. [सं.]

उन्नयनकोन पु. (ग.) क्षितिजसमांतर रेषेवर पडणाऱ्या लंबरेषेने तिच्याशी केलेला कोन.

उन्नाद पु. वाढ.

उन्नायी पु. (स्था.) वर नेणारा, चढवणारा विजेचा पाळणा; लिफ्ट.

उन्नाव, उन्नाह पु. वृद्धी; वाढ; भरती : 'काय प्रलयांबूचा उन्नाहो । वोघु मानी ।।' – ज्ञा १८.४१३. [सं. उद्+नी]

उन्निद्र वि. जागा : 'उन्निद्रेयाचे पहुडणें ।' – ज्ञा १२.६४.

उन्निद्रा स्त्री. जागृती. [सं. उद्+निद्रा]

उन्निद्रित वि. जागृत : 'उन्निद्रितें एके निद्रितें ।' – ज्ञा ११.१२८.

उन्फा पु. रोजचा शिधा; भत्ता; रोजमुरा :'तितक्यांस चार मिष्टान्न उन्फे चालविले.' – चित्रगुप्त. [फा. उल्फा]

उन्मज्जन न. पाण्यातून वर येणे. [सं.]

उन्मत्त वि. १. गर्विष्ठ; उद्धट; अतिशय उर्मट; मस्त; माजलेला; दांडगा; रागीट :'ऐसें होय तया उन्मत्ता ।' – ज्ञा ३.११५. २. धुंदी असलेला; नशा चढलेला; झिंगलेला; शुद्धी गेलेला (मद्य इ. च्या सेवनाने).[सं.]

उन्मत्तकरण (नृत्य.) उजव्या पायाची बोटे आकुंचित करून तो टाचेवर उभा करणे; हंसपक्ष हात फिरवून उताणे करून व बाहू पसरून ठेवणे.

उन्मत्तद्रव्य न. मद्यादी मादक पदार्थ :'कां उन्मत्तद्रव्य सेविलें । तेणें अनेक भासों लागलें ।।' – दास १०.६.१५. [सं.]

उन्मत्तभैरव पु. एक मात्रा, रसायन.

उन्मत्तवायु–यू पु. भ्रम; उन्मादवायू; वेड; बडबड; एक वातविकार; वेडाची लहर, झटका. [सं.]

उन्मन वि. १. लीन; ऐहिक विचारापलीकडे गेलेला; परमेश्वरचिंतनात निमग्न; उन्मनी अवस्थेत असलेला :'तुका म्हणे मन उन्मन जों होय । तोंवरि हे सोय विधि पाळीं ।' – तुगा २७६८. २. देहभान हरपलेला. [सं.]

उन्मनस्क वि. खिन्न; अस्वस्थ. [सं.]

उन्मनावस्था स्त्री. (तत्त्व.) मनाची उच्चतम आध्यात्मिक अवस्था; तन्मयावस्था; काव्योन्माद. काहींच्या मते ईश्वरी साक्षात्कारामुळे मनाची होणारी अवस्था, स्थिती. [सं.]

उन्मनी स्त्री. जागृती, स्वप्न, सुषुप्ती आणि तुरीया याहून पलीकडील पाचवी अवस्था; मनाचा लय झालेली स्थिती; मनाच्या पलीकडे नेणारी (अवस्था); समाधीची (अवस्था). ह्या अवस्थेत वृत्ती मायेच्या उपाधीपासून मुक्त होऊन ब्रह्माच्या ठिकाणी लीन होते. परमेश्वराच्या ठिकाणी लय, तंद्री :'उन्मनी ते निवृत्ति जाण । जेथें विरे जाणपण । विज्ञान तें ।।' – दास ७.४.५०. [सं. उद्+मनस्]

उन्मळण न. उपटून पडणे; उन्मूलन :'अंगवायो सुटला तेणें द्रुमां । मार्गी उन्मळणें जालीं ।' – कृमुरा १४.१. [सं. उद्+मूलन]

उन्मळणे उक्रि. १. उपटणे; समूळ उच्छेद करणे :'गळा बांधूनियां उखळासी दावें । उन्मळीं त्या भावें विमळार्जून ।' – तुगा २०. २. भडभडून येणे; कळमळणे; मळमळणे. [सं. उन्मूलन] (वा.) **उन्मळून जाणे –** (संकट, दु:ख इत्यादींनी) खचणे.

उन्मळणे अक्रि. उमलणे; उघडणे; विकासणे; फुलणे. पहा : **उन्मिळणे** :'तियें उन्मळितां मावळे । नवलावो ।।' – अमृ ७.१८४. [सं. उन्मीलन]

उन्मळित वि. उघडलेले; विकासलेले :'पाहिलें ताटस्थ उन्मळित लोचन ।' – तुगा ११७. [सं. उद्+मीलित]

उन्मंडल न. विवक्षित स्थलींच्या मध्यान्ह रेखापाताच्या क्षितिजाला त्या स्थलाचे उन्मंडल म्हणतात; दिनमान मोजण्याकरिता दक्षिणोत्तर कल्पिलेले वृत्तविशेष.

उन्मंडलशंकु–कू पु. सकाळी सहा वाजता सूर्याच्या उन्नतांशाची भुजज्या. [सं.]

उन्माद पु. १. गर्व; ताठरपणा; उद्धटपणा; माज (विद्या, संपत्ती इत्यादीयोगे). २. धुंदी; बेशुद्धी; उत्कट मनोविकार; कैफ (मादक पदार्थांमुळे येणारा). ३. भ्रम; वेड; वातविकार. [सं. उद्+मद्]

उन्माद पु. १. गर्भाशयाचा आजार. २. (मानस.) भावनांच्या अनावर प्रक्षोभामुळे होणारा मानसिक विकार; वेडाचा झटका. [सं.]

उन्मादक वि. १. कैफ आणणारे; गुंगी आणणारे; मादक. २. वासना चाळवणारे. [सं.]

उन्मादणे अक्रि. उसळणे; वर येणे; वाढणे :'रांधवणी चुलीपुढे । पऱ्हे उन्मादती खातवडे ।' – ज्ञा १३.५६३. २. उन्माद येणे; माजणे; मस्ती येणे. [सं. उन्माद]

उन्मादवायु–यू पु. भ्रम; वेड. पहा :**उन्मत्तवायु–यू** [सं.]

उन्मान न. १. वजन करण्याची क्रिया; वजन करणे. २. वजन; भार (वस्तूचे). ३. वजन करण्याचे प्रमाण; माप–वजने (किलो, ग्राम इ.). ४. वजन करण्याचे साधन (तराजू, काटा). [सं. उद्+मा]

उन्मार्ग पु. चुकीचा रस्ता; वाईट वाट. [सं.]

उन्मार्गी वि. बहकलेला; वाईट मार्गाने जाणारा.

उन्मिळणे अक्रि. विकासणे; उघडणे; फुलणे. [सं. उन्मीलन]

उन्मीलन न. १. उघडणे; उमलणे; विकासणे; फुलणे :'जेथ उन्मीलन होत आहे दिठी ।' – ज्ञा ११.१४१. २. प्रगट करणे; दाखविणे; व्यक्त करणे; अनाच्छादित करणे :'जगदुन्मीलनाविरल । केलिप्रिय ।।' – ज्ञा १८.४. ३. ग्रहण सुटणे. ४. डोळ्यांची उघडझाप; लुकलुक.

उन्मीलित वि. १. उन्मीलन झाले आहे असे; विकासलेले, फुललेले (फूल). २. उघडलेले (डोळे). ३. सुटलेले (ग्रहण). [सं.]

उन्मुक्त वि. मोक्ष मिळालेला; स्वतंत्र; निर्बंधरहित. [सं.]

उन्मुक्तपणे क्रिवि. मोकळेपणाने; स्वैरपणाने.

उन्मुक्ति–क्ती स्त्री. मोकळीक; करातून, कायदेशीर आरोपातून, शिक्षेतून किंवा नोकरीतून मिळालेली सूट. [सं.]

उन्मुख वि. सज्ज; तत्पर; प्रवृत्त झालेला; तयार झालेला. उदा. मरणोन्मुख, विषयोन्मुख. [सं. उद्+मुख]

उन्मूलन न. नायनाट; समूळ उपटून टाकणे; निर्मूलन; उच्छेद; नाश. [सं.]

उन्मूलित वि. उपटलेले; नाश केलेले. [सं.]

उन्मूळणे सक्रि. मुळासकट उपटून टाकणे :'जे संसारातें उन्मूळी ।' – ज्ञा १३.१७२. [सं. उद्+मूल]

उन्मेख, उन्मेष पु. १. डोळ्यांची उघडझाप; उघडण्याची क्रिया; निमेष (मिटणे) याच्या उलट. २. उघडणे; फुलणे; विकासणे (डोळे, फूल वगैरे). ३. बुद्धीचा विकास; ज्ञानप्राप्ती; ज्ञानसंपादन :'तऱ्ही उन्मेखाचिये पेठे । गुणा अवंकणी भरीन बुद्धीचि साटे ।' – ऋ १४; 'मग नवी विरूढी फुटेल । उन्मेषाची ।।' – ज्ञा २.७९. ४. ज्ञान; बुद्धी; प्रकाश; जागृती :'जयाचेनि विवेककिरणसंगें । उन्मेखसूर्यकांतु फुणगे ।' – ज्ञा १६.८. ५. तेज; चमक. ६. प्रकटपणा; उघडपणा :'जें किरीटीं तुज निकें । तें पूस पां उन्मेखें । मनाचेनि ।।' – ज्ञा २.२८६. ७. (ल.) प्रतिमेचे धुमारे; किरणशलाका. [सं. उन्मेष]

उन्मेखून क्रिवि. मुद्दाम; आवर्जून; निश्चयाने; दाटून; बुद्ध्या; जाणूनबुजून. [सं. उन्मेष]

उन्मेखे क्रिवि. स्पष्टपणे; उघडपणे; आवर्जून :'आतां असोत ही वाक्यें । सिंधु केंवी उपसूं नखें । हें सांगितलें उन्मेखें । तुज प्रती ।।' – कथा १.१४.८९.

उन्मोचन न. (अर्थ.) अर्थव्यवहारातील एखाद्या देयभारातून वा दायित्वातून मुक्त करणे.

उन्ह न. उन्ह; सूर्यप्रकाश; पहा : **ऊन** :'उन्हाचेनि मिषें तोंडें । आगीचि गिळी ।।' – ज्ञा १७.१४१. [सं. उष्ण] (वा.) **उन्हात ठेवणे –** उन्हात तापत ठेवणे. **उन्हातील पाला होणे –** कोमेजणे; म्लान होणे; जीव सुकणे :'जाहला उन्हांतील पाला ।' – संग्रामगीते ११८. **उन्हात घर बांधणे –** मुलाची आगळीक करणाऱ्याला शिक्षा देण्यासाठी गमतीने वापरतात :'बांधू हं! त्याचं उन्हामध्ये घर । बाळ माझं खेळकर ।' – माजू.

उन्हउन्हीत वि. उनून; ऊन; गरम.

उन्हणे अक्रि. उन्हात तापणे; ऊन होणे; उन्हात ठेवणे, उन्हं देणे या रूपातच क्वचित हे क्रियापद आढळते. [सं. उष्ण]

उन्हतिन्ह वि. ऊनऊन :'उन्हतिन्ह जेउं सुदूले ।' – लीचपू ३७.

उन्हन, उन्हून वि. कढत; वाफ येत असलेला; उनून :'मेक्सिको येथील लोकांच्या देवता मांसभक्षक असल्यामुळे तेथील लोक उन्हन उन्हन ताजें मांस आणि रक्त त्यांच्या तोंडात कोंबतात.' – आगर ३.१५. [सं. उष्ण]

उन्हवण न.ऊन पाणी. पहा : **उन्हवणी** :'आंतु घालितां हात पोळे । तेणे उन्हवणें घर न जळे ।' – एभा १०.४८४.

उन्हवणी, उन्हाणी स्त्री. १. ऊन पाणी :'कुंथावयाची आवडी ओवा । उन्हवणी रडवी बाळें ।।'– तुगा ३२५७. २. सूर्यप्रकाशात तापवलेले पाणी :'मोहरिया वाटुनि उन्हाणियासि दिधलिया तुं मरसिल ।' – पंच ३.१८. २. उष्णता. [सं. उष्ण+वन = पाणी]

उन्हसाण न. गरमपणा. (गो.)

उन्हळ स्त्री. उन्हाने लाकडात पडलेली भेग.

उन्हाचा कढ सूर्याची प्रखर उष्णता.

उन्हाटणे अक्रि. उन्हाने करपणे; सुकून जाणे (फळे वगैरे).

उन्हातान्हाचा क्रिवि. भर दोन प्रहरी; मध्यान्ही; ऊन कडक असताना. [उन्हचे द्वि.]

उन्हारी स्त्री. रब्बी; वसंत ऋतूतील पीक; वसंत हंगाम :'जलद आलियापुढें उन्हारीची जोतपात होईल. नाहींतर उन्हारी पडेल.' – पेद २९.२५.

उन्हाळ ऊस, वांगी उन्हाळ्यात होणारी ऊस–वांगी वगैरे पिके.

उन्हाळणे अक्रि. १. उन्हापासून त्रास होणे. २. ऊन लागून तडकणे (लाकूड). ३. उन्हाळे लागणे; उन्हापासून एक विकार होणे. [सं. उष्णकाल]

उन्हाळपावसाळ क्रिवि. उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात; बारमाही; सबंध वर्षभर.

उन्हाळभावई, उन्हाळभावळी, उन्हाळभावी स्त्री. वैशाख वद्य अमावस्या. (व.)

उन्हाळमैत्री स्त्री. उन्हाळ्यापुरती, चालत्या काळापुरती मैत्री; हंगामी मित्रत्व. (व.)

उन्हाळसावली स्त्री. १. उन्हाळ्यात राहण्याकरिता बांधलेले घर; उन्हाळी बंगला; बाराद्वारी. २. (थट्टेने) छप्पर; झोपडी. ३. उष्णतेपासून बचाव; आसरा.

उन्हाळा पु. १. ज्या दिवसांत ऊन कडक असते ते दिवस; फाल्गुनापासून ज्येष्ठापर्यंतचे चार महिने. २. उष्मा; उकाडा. ३. वारंवार मूत्र विसर्जन करावे अशी भावना व जळजळ होणे; शारीरिक पीडा; उष्णतेचा विकार. (क्रि. लागणे). ४. आईबापावाचून उघडे पडणे; निराश्रितपणा; पोरकेपणा. ५. नाहीसे होणे; नाश पावणे; अभाव; करपणे; जळणे; खराब होणे (शेत, बाग, मळा वगैरे) :'प्रीतीचा उन्हाळा राया ।' – संग्रामगीते ८१.[सं. उष्णकाल] (वा.) **उन्हाळा करणे –** नाश करणे; उजाड करणे :'मी म्हणतें नुसते दागिने नेले असते तरी बरें. पण घराचा उन्हाळा केला.' – नामदेव नाटक ७६. **उन्हाळे पाहणे –** १. वयाने जास्त असणे. २. जास्त अनुभव असणे.

उन्हाळी स्त्री. १. हवेतील उष्णता; उन्हाळ्यातील उष्णता; उकाडा. २. एक मूत्रविकार; उन्हाळे. (क्रि. लागणे, होणे). ३. एक वनस्पती; रानटी तीळ. हिची फुले लाल व पांढऱ्या रंगाची असून शेंगा चपट्या व पाने लहान व लांबट असतात. काडाचा सर्पणासाठी उपयोग होतो. शिवाय व्रण, खोकला, विष, दमा, अर्श, ज्वर, वायू वगैरेचा नाश करण्याचे गुण यामध्ये आहेत.

उन्हाळी पड (कृषि.) उन्हाळ्यात पीक न घेता जमीन तशीच ठेवणे.

उन्हाळीपावसाळी स्त्री. खेळातील दोन पक्षांपैकी कोणी डावाला सुरुवात करायची हे ठरविण्यासाठी खापरी किंवा पैसा याला एका बाजूने थुंकी लावून तो वर फेकतात. त्या खापरीची किंवा पैशाची कोरडी बाजू ती उन्हाळी व थुंकी लागलेली ओली बाजू ती पावसाळी. त्यापैकी एकाने कोणतीतरी बाजू मागायची व मागितलेली बाजू वर आल्यास त्याने प्रथम खेळायचे असते. पहा : **ओली सुकी**

उन्हाळीभात न. वायंगणे भात.

उन्हाळू न. उन्हाळ्यातील पीक. (माळवी)

उन्हाळे पु. अव. उष्णतेचा, लघ्वीचा विकार; उन्हाळी :'मुरडा हागवण उन्हाळे ।' – दास ३.६.३०.

उन्हाळे, उन्हेरे न. उष्ण पाण्याचा झरा. [सं. उष्ण+आलय]

उन्हीत वि. पहा : **उनउनीत** (गो.)

उन्हू देणे सक्रि. तापू देणे.

उन्हून वि. गरम. पहा : **उन्हन**

उन्हेत न. सूर्याची उष्णता; ऊन. (गो.)

उन्हेरी कारंजे अत्युष्ण पाण्याचा व वाफेचा फवाऱ्यासारखा झरा.

उन्हेरे पहा : **उन्हाळे**

उन्होटी स्त्री. उबारा.

उप अ. एक उपसर्ग. हा पुढील अर्थी योजतात. १. अनुगमन. उदा. उपदेश, उपालंभ. २. अधिकपणा. उदा. उपपरार्ध. ३. हीनपणा, गौणत्व. उदा. उपस्त्री, उपपत्नी, उपपुराण. . दुय्यम; गौण. उदा.

उपसचिव, उपायुक्त. ५. कमी प्रतीचा, तीव्रतेचा, गुणाचा. हा आम्लात किंवा त्या रसायनात (प्राणवायूचा) कमीपणा आहे असे दाखवतो. उदा. नत्रस अम्लापेक्षा उपनत्रस अम्ल हे कमी अम्लजन असते. ६. समीपता; सान्निध्य. उदा. उपकंठ, उपनदी, उपांत्य. ७. पहिलेपणा. उदा. उपक्रम. ८. दाक्षिण्य; आदर. उदा. उपचर्या. ९. साम्य. उदा. उपधातू, उपव्याघ्र. १०. शेवट; नाश. उदा. उपरती. ११. विकार. उदा. उपलेप. १२. स्वीकार. उदा. उपगम, उपाकर्म. १३. व्यापणे. उदा. – उपहास. १४. समूहत्व; संमेलन; संकलन. उदा. उपार्जन. १५. शक्ती. १६. अध्ययन; अध्यापन. उदा. उपाध्याय. १७. उद्योग. १८. कडे; वर; खाली. उदा. उपनयन. १९. निरर्थक, स्वार्थी म्हणूनही कधी हा उपसर्ग लागतो. अप या उपसर्गाचे काही अर्थ याचेही आहेत.

उपअपराध पु. क्षुल्लक अपराध.

उपकणा–था पु. नावेचा आतील कणा.

उपकथा पु. १. आडकथा. २. चातुर्याची गोष्ट, कुळकथा.

उपकथानक न. मूळ कथानकाला पूरक असणारी कथा.

उपकर पु. १. विशेष कामाकरिता बसवलेला कर, पट्टी. २. अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर विशेष उत्पन्नाचे साधन म्हणून सरकारने बसवलेला कर. ३. दुय्यम कर; करावर घेतलेला कर :'जमीन महसुलावर उपकर बसविणे .....' – अम १८६. [सं.]

उपकरण न. १. साधन; हत्यार; एखाद्या कामासाठी वापरले जाणारे, विशिष्ट प्रकारे बनवलेले यंत्र. २. साहित्य; सामग्री; परिवार; घटकावयव; घटकद्रव्य :'हे यज्ञोपकरण सकळ ।' – ज्ञा ३.१२८. ३. देवाच्या पूजेची भांडी (घंटा, ताम्हन, धूपार्ती इ.) :'आणि उपकरतीं आपुलीं । उपकरणें आथि जेतुलीं ।' – ज्ञा १३.४०७. ४. (अव.) पंचाग तयार करताना केलेली निरनिराळी गणिते, फले (तिथिशुद्धी, अब्दप इ.). ५. राजभूषणे; राजचिन्हे (छत्र, चामर इ.). ६. शास्त्रीय प्रयोगसाहित्य. [सं. उप+कृ]

उपकरणसामग्री स्त्री. अनुष्ठानास अगर देवपूजेस लागणारे साहित्य किंवा भांडी :'माता निरोपी कैकेयीतें । उपकरणसामग्री लागेल येथें । सिद्ध करूनि ते देई ।।' – रावि ३.९८. [सं.]

उपकरणे अक्रि. १. उपकार करणे; उपयोगी पडणे; कामास येणे :'आपुला अथवा परावा । ठायी उपकरसी पांडवा ।' – ज्ञा १८.१३५९. २. सेवा करणे. [सं. उप+कृ]

उपकर्ता वि. उपकार, कल्याण करणारा; मदत करणारा; उत्कर्ष करणारा; उपयोगी पडणारा; उपकारकर्ता; भरभराटीस आणणारा. [सं. उप+कृ]

उपकंठ क्रिवि. गळ्यापर्यंत; आकंठ (खाणे, वर जीव येणे). शअ. जवळ; शेजारी :'तरी अस्तुगिरीचिया उपकंठीं । रिगालिया रविबिंबापाठीं ।' – ज्ञा १२.३५. [सं.]

उपकंडिका स्त्री. छेदकाचा पोटभाग. [सं.]

उपकंस पु. (ग.) लहान कंस; कंसातील कंस. [सं.]

उपकार पु. १. निरपेक्ष मदत; साहाय्य :'जयां उपकार होते केले ।' – ज्ञा १.१८३. २. कृपा; दया; आभार; मेहेरबानी. ३. हित; कल्याण; फायदा; अडचणीच्या, संकटाच्या प्रसंगी दुसऱ्याच्या उपयोगी पडणे. [सं. उप+कृ] (वा.) **उपकार ठेवणे** – उपकाराची फेड न करणे. **उपकार बाळगणे, उपकार न विसरणे, उपकार स्मरणे –** उपकाराबद्दल कृतज्ञ असणे :'तेल आणुनि द्यावें घरा । तुमच्या उपकारा न विसरूं।' **उपकारांनी बांधणे –** दुसऱ्यास ऋणी करून ठेवणे. **उपकारांनी मारणे –** १. अतिशय उपकार; न फिटणारे उपकार करणे. २. उपकार करून एखाद्यास वश करून घेणे; मिंधा करून ठेवणे.

उपकारक वि. १. साहाय्यकारी; अनुकूल; मदत करणारा. २. हितकारक; कल्याणप्रद (औषध, क्रिया इ.). [सं. उप+कृ.]

उपकारी वि. १. दुसऱ्याचा फायदा, बरे करणारा; उपकार करणारा; उपकारक; उपकार करण्याचा स्वभाव असलेला; परोपकारी. २. आभारी; कृतज्ञ. ३. साहाय्यक; साहाय्यकारी; हातभार लावणारा.

उपकार्य वि. ज्याला मदत करायची, ज्यावर उपकार करायचा असा.

उपकालवा पु. मुख्य कालव्याचे पाणी आजूबाजूच्या भागांत पोचवण्यासाठी काढलेला पाट.

उपकुल न. मुख्य गटाशी संबंधित परंतु काही बाबतीत वेगळा असणारा गट. [सं.]

उपकृत वि. मदत, उपकार केलेले; ज्यावर कृपा, दया केली आहे असा; ऋणी; आभारी. [सं.]

उपकृति–ती स्त्री. उपकार, हित, कल्याण.

उपकेशगच्छ पु. जैन धर्मातील एक संप्रदाय. असे एकंदर गच्छ (संप्रदाय) ८४ आहेत. श्रीमालच्या उहडाने ओस नगरी स्थापली तेव्हापासून त्या ठिकाणच्या जैन समाजाला उपकेश हे नाव पडले. ओसवाल जैन या गच्छाचे आहेत. [सं.]

उपकेंद्र न. १. एका मोठ्या केंद्राच्या आधीन काम करणारे दुसरे केंन्द्र, साहाय्यक केंद्र. २. (विद्युत.) जिथे निरनिराळ्या वीजनिर्मिती केंद्राकडून आलेली वीज ग्रहण केली जाते व तिचा दाब कमी करून ती अन्य ठिकाणी वितरीत केली जाते असे केंद्र. [सं.]

उपक्रम पु. १. आरंभ; सुरुवात; हाती घेतलेले नवे काम :'प्रकृति परिहार उपक्रमी ।' – ज्ञा १०.२८. उपक्रमाच्या उलट उपसंहार (शेवट) :'उपक्रमोपसंहारौ' – गीर २१. २. प्रवेश; शिरकाव (एखाद्या विषयात); प्राथमिक अवस्था; सूतोवाच. ३. ओघ; संदर्भ :'उपक्रमें वदे । तुका वर्मासी तें भेदे ।।' – तुगा ३५१५. ४. उद्योग करणे; उपाय करणे; चालविणे. ५. नव्याने हाती घेतलेले काम, व्यवहार; चालू केलेले काम. ६. उपाय किंवा प्रयत्न करणे. [सं. उप+क्रम् = जाणे]

उपक्रमणिका स्त्री. (ग.) संख्या, घटना एकामागून एक येण्याची, घडण्याची स्थिती; उपश्रेढी. [सं.]

उपक्रमणे उक्रि. उपक्रम, आरंभ करणे; हाती घेणे :'ऐसैसां अफाटीं कर्मीं । समारंभु उपक्रमीं ।।' – ज्ञा १४.२३४. [सं. उपक्रम]

उपक्रमशीलता स्त्री. १. स्वत:हून एखादी नवीन गोष्ट करण्याची वृत्ती. २. पुढाकार घेण्याची क्षमता. ३. कामे स्वीकारण्याची वृत्ती.[सं.]

उपक्रमक्षमता पहा : **उपक्रमशीलता**

उपक्रमा स्त्री. योजना.

उपक्रमात्मक प्रवेश (नाट्य.) ज्या विषयावर नाटक आधारित आहे तो विषय सूचित करणारा प्रवेश.

उपक्रमी, उपक्रामक पु. प्रवर्तक, अनिश्चिती स्वीकारणारा संयोजक.

उपक्रांत वि. आरंभलेले; उपक्रमलेले; चालू; सुरू. [सं.]

उपखणे अक्रि १. शेवट होणे; नाश पावणे; क्षय पावणे : 'पैं जगीं जीवनासारिखें । वस्तू अंग वरी उपखें । परी जातें जीवित राखे । तृणाचेंही ।।'– ज्ञा १६.१५६. २. व्यर्थ होणे : 'परी जहालीही वृष्टि उपखे ।'–ज्ञा ११.९५. ३. खर्चणे : 'आणि आपण जालिये जोडी । उपखों नेदी कवडी ।'– ज्ञा १८.६५३. ४. उपेक्षा करणे : 'निलेख उपखी देहाते.'– इप्र ८५. [सं. उप+क्षि–क्षय्]

उपखणे अक्रि. उगेच बसणे. [सं.उप + क्षि–क्षय्]

उपखर्च पु. किरकोळ, बारीकसारीक, अवांतर खर्च.

उपखंड पु. (कायदा.) कायद्यातील कलमाचा पोटभाग; कराराच्या, दस्तऐवजाच्या एखाद्या भागाचा पोटविभाग. [सं.]

उपखा स्त्री. १. उपेक्षा; कमीपणा; उणीव : 'गृहीं उपखा न पडी ।'– उगी ३५०. २. खंड; खळ : 'तव माझिया श्रवणसुखा । मध्येंचि पडेल कीं उपखा ।।'– स्वादि १२.२.६८. [सं. उपेक्षा]

उपखा पु. १. श्रम; 'तेथ चंद्रासि काय किरीटी । उपखा पडे ।' – ज्ञा ९.११५. २. क्षय; नाश; खर्च : 'किंबहुना इया भाखा । द्वैताचा जेथ उपखा ।।'– अमृ २.५४
वि. व्यर्थ; निरर्थक.

उपखा पु. सहवास; वस्ती; अधिवास : 'पडिला चारि देहाचा उपखा । चुकला परमार्थसुखा ।।'– ऋ ८.

उपखाडी स्त्री. (भूशा.) समुद्रकिनाऱ्याच्या आत पाणी घुसून तयार झालेली छोटी खाडी.

उपगण पु. उपवर्ग; पोटवर्ग; गौण प्रकार; भाग. [सं.]

उपगणे अक्रि. कंटाळणे. पहा : **उबगणे**

उपगत वि. मिळालेले; लब्ध; प्राप्त; सफल : 'तेथें कष्ट केले बहुत । न होयचि काय उपगत ।।'–गुच ४५.४४.

उपगळा पु. मानेजवळचा भाग.

उपगळिये स्त्री. मांडीवर मान; कड : 'गोसावी पहुडले असती । उपगळिये घेऊन उठविले.'– लीच १.६.

उपगुरु–रू पु. गुरूस मदत करणारा; त्याच्या हाताखालचा; दुय्यम शिक्षक; मालचाट्या. [सं.]

उपगृह न. (स्था.) दुय्यम घर; मुख्य घराजवळ बांधलेली जागा, घर.

उपग्रह पु. (ज्यो.) मोठ्या ग्रहाभोवती फिरणारा लहान ग्रह; गौण ग्रह; दुय्यम ग्रह. उदा. चंद्र, राहू, केतू. [सं.]

उपग्रह पु. अग्निबाणाच्या साहाय्याने अवकाशात सोडलेला यंत्रसंच. [सं.]

उपग्रहपेशी स्त्री. (वै.) गुणसूत्राच्या मूळ आकारापासून बाजूला काढलेला खंडांश. [सं.]

उपघात पु. दुर्दैवाचा फेरा; दैवदुर्विलास; संकट; आपत्ती; अपघात. [सं. उप + हन् = घात]

उपचडा पु. उमाळा; आवेग : ' उपचडे सुटती तिजला बहू ।'

उपचय पु. (वन.) पिष्ट, प्रथिन, मेद इत्यादी पदार्थ किंवा प्राकल (कोशिकेतील सजीव पदार्थ), काष्ठ, तूलीर (कौशिकावरण) इत्यादी बनवण्याची विधायक प्रक्रिया. [सं.]

उपचय पु. १. साठा; संचय; गोळा करणे. २. वाढ; वृद्धी. [सं. उप + चि]

उपचयस्थान न. (ज्यो.) कुंडलीतील ३, ६,१०,११ ही स्थाने. उन्नतीस कारणीभूत असणारी स्थाने म्हणून यांना महत्त्व आहे. [सं.]

उपचार पु. श्रम खटपट; उपाय; प्रयत्न : 'मग नानाहेतुप्रकारें । यथोचितें उपचारें ।'–ज्ञा ४.७१. [सं. उप +चर्]

उपचार पु. पूजेतील प्रकार. पहा : **षोडशोपचार** : 'देवांगण मिरवणियां । अंगोपचार पुरवणियां ।'– ज्ञा १७.२०३. [सं. उप + चर्]

उपचार पु. १. चिकित्सा पद्धतीतील प्रकार. पहा : **सप्तोपचार** २. वैद्यकीय चिकित्सा; औषधी योजना; इलाज; उपाय : 'तें उपचारा– वेया । रसु पाहे । देतु वैद्यनाथु ।'–ऋ २२. [सं. उप+ चर्]

उपचार पु. १. गौरव; आदरसत्कार; आतिथ्य; संभावना; सेवा : 'उपचार करोनि मग राजाला ।'– दावि ३९२. २. रुढी; रिवाज; चाल. उदा. लोकोपचार, शिष्टोपचार : 'मरों टेंकला विप्र पुत्रोपचारें । हरीचें वदे नाम लोकोपचारें ।'– नामसुधा ५९. [सं. उप + चर्]

उपचार पु. शब्दाचा वाच्यार्थापासून दूरान्वय; उपमा रूपक इ. वापरणे; लाक्षणिक भाषण; आलंकारिक भाषण. [सं. उप + चर्]

उपचार पु. सामग्री; साधने; साहित्य : 'कां वसंतीं बरवा आरामु । आरामींहीं प्रियसंगमु । संगमीं आगमु । उपचारांचा ।।' – ज्ञा १८.३४५.

उपचारणे सक्रि. उपचार करणे : 'तो तुवां उपचारिलों ।'–विसिंपू २.२२.

उपचारपद्धति–ती स्त्री. रोगावर उपचार करणाऱ्या ॲलोपथी, होमियोपथी, आयुर्वेद यांसारख्या निरनिराळ्या पद्धती; विशिष्ट उपचारशास्त्र. [सं.]

उपचारबोल पु. निरर्थक भाषण; औपचारिक, तोंडदेखले बोलणे; शिष्टाचार म्हणून वरवरचे, मनापासून नसलेले भाषण : 'उपचारबोल हा कायसा वृथा ।'– दावि २८६.

उपचारभरण न. साधनसामग्री : 'हेचि यज्ञोपचारभरण । अज्ञान घृत ।।'– ज्ञा ९.२४०. [सं.]

उपचारहोडे वि. क्षणिक.

उपचित वि. गोळा केलेले;एकत्र केलेले; जमवलेले; ढीग घातलेले; संगृहीत; संकलित. [सं. उप + चि]

उपज पु.स्त्री १. उत्पन्न; निपज; पैदास; नफा; फायदा; प्राप्ती. २. उत्पत्ती; जन्म; मूळ; उगम (निपजबरोबर बहुदा प्रयोग).३. (संगीत) आपल्या कल्पनाशक्तीने नवीनच घेतलेली तान. ४. शास्त्रादी व्यवहारात आपल्या बुद्धीने शंका, समाधान इत्यादी काढणे; नवीन कल्पना; शोध; संशोधन. [सं. उत् +पद्.]

उपजणे अक्रि. १. उत्पन्न होणे; जन्मणे; उद्भवणे : 'ऐसा उपजे नित्य सद्भावो । तोही आपणपांचि ।।'– ज्ञा ६.३९. २. पासून निघणे; मिळणे; प्राप्त होणे : 'श्रीरामभजनीं बैसली प्रीत । तेजोमय शरीर दिसत । तेणें इंद्रासि भय उपजलें बहुत । म्हणे पद निश्चित घेईल हा ।।'–संवि २.१८२. पहा : **उपज**

उपजत वि. जन्मत:, जन्मापासून असणारा; सहज; जातीचा; निसर्गत: प्राप्त (गुण, दोष, शरीरप्रकृती वगैरे). उदा. उपजत बुद्धी -दुर्गुम- खोड- स्वभाव.
क्रिवि. १. जन्मत:; जन्मापासून; उदा. उपजत आंधळा- रोगी-मुका- शहाणा-लंगडा वगैरे : 'मांजर... यांचें भय मुलांमध्यें जसें स्वाभाविक उपजत असतें.'- नीति २६४.

उपजत खोड जन्मल्यापासून असलेला दुर्गुण (शारीरिक, मानसिक).

उपजत गुण स्वाभाविक, अंगाचा, जातीचा धर्म; जन्मापासूनचा गुण.

उपजत बागी मूळचाच, जातीचाच घोड्यावर बसण्यात पटाईत.

उपजत बुद्धि-द्धी जन्मत:च काही गोष्टी करण्याची प्राणिमात्रांची प्रेरणा; न शिकवता केवळ प्रेरणेने करता येणाऱ्या गोष्टी : ' जी उपजतबुद्धी असते तिला अनुसरून त्यांची दिनचर्या असते.'- लोटिव्या २५८.

उपजत रांगणे १. उपजल्यापासून रांगणे. २. एखाद्या वस्तूची एकदम भारी किंमत सांगणे.

उपजत स्वभाव अंगस्वभाव; जन्मत: असलेले गुणधर्म- स्वभाव; स्वाभाविक प्रवृत्ती.

उपजनिपज स्त्री. १. जन्म आणि वाढ; उदय आणि प्रगती (व्यक्तीसंबधी). २. आरंभ आणि शेवट; उत्पत्ती आणि लय (एखाद्या गोष्टीचा). ३. (संगीत) तानेचा एक प्रकार.

उपजयोग्यता स्त्री. (कृषि.) जमिनीची उत्पादनक्षमता.

उपजरणे अक्रि. अंग धरणे; पुष्ट होणे; भरास येणे. [सं. उप + जृ]

उपजरा पु. पुष्टी : '... घोडी उपजऱ्यास येत नाहींत.'- आदि महा ११४. [सं. उप + जृ]

उपजविणे सक्रि. पिकवणे; उत्पन्न करणे; जन्म देणे : 'वीर्यदानें उपजविता । अन्नदानें प्रतिपाळिता । संकटीं प्राणरक्षिता । तिघे पिते बोलिजेती ।।'- मुआदि १५.१५४.

उपजंघा पु. घोड्याच्या पायाचा रोग.-अश्वप २.३८. [सं.]

उपजा पहा **: उबजा**

उपजाऊ वि. सुपीक; पिकाऊ : 'त्या (मुलखात) उपजाऊ जमिनीचे वैविध्य आहे.'- आआ ८६.

उपजाणीव स्त्री. सुप्त मनात असलेली जाणीव.

उपजाति-ती स्त्री. (साहित्य.) इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा या दोन वृत्तांच्या मिश्रणाने झालेले एक वृत्त. याच्या प्रत्येक चरणात अकरा अक्षरे असून यती पदान्ती असतो. उदा. 'हा बाण गेला वरती मण्याला । धरून पृथ्वीवर आणण्याला ।' [सं.]

उपजाति-ती स्त्री. पोटजाती; उपवर्ग; पोटवर्ग. [सं.]

उपजापक वि. चुगल्या करणारा; मागे निंदा करणारा; लावालावी करणारा. [सं. उप + जल्प्]

उपजारीस येणे अक्रि. भरास येणे.

उपजीवक, उपजीवी वि. १. (एखाद्यावर) उपजीविका करणारा; पोट भरणारा; अवलंबून असणारा : 'आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।'- ज्ञा १८.१८०१. २. निर्वाहाचे साधन असलेले : 'ते दैवी सुखसंभवी । तेथ दैवगुणें येकोपजीवीं ।'- ज्ञा १६.६७. [सं. उप+जीव्]

उपजीवन, उपजीविका न. स्त्री १. निर्वाह; पोषण ; उदरनिर्वाह. २. जगण्याचे साधन; पोट भरण्याच्या उपाय. (अन्न आणि भक्ष्य.) ३. आश्रय; आधार; रक्षण; पालन; धारण (शरीराचे.). ४. रक्षणाचे साधन. (शक्ती, अन्न इ.). [सं. उप+जीव]

उपजीविका स्त्री. १. निर्वाहाचे साधन. २. प्राप्ती; लाभ : 'आमच्या मनसाबीयाची उपजीविकाहि हेच ।'- पेद ३.५५. ३. जगणे; पोट भरणे; निर्वाह. [सं.]

उपजीव्य न. निर्वाहाचे साधन; आश्रय; पोषक द्रव्य; जीवन; जीवाचा आधार. [सं.]

उपजीव्य विरोध १. आश्रयदात्याशी विरोध; पालनकर्त्यांशी वैर. २. उपजीविकेचे साधन सुटणे.

उपट स्त्री. १. अन्नाची रेलचेल; समृद्धी. २. वीट; शिसारी; आकंठतृप्ती. (क्रि. घेणे.) [सं. उत्+पत्](वा.) **उपट घेणे, उपट जेवणे-** ओ येई तो खाणे; अधाशीपणे खाणे.

उपट स्त्री. १. पुनरुत्थान; उठाव; वर डोके काढणे : 'उपट खाल्ली पतीच्या दैवानें ।।'- मसाप १.१.२. २. उसळी, उशी (चेंडूची). [सं. उत्+पत्] (वा.) **उपट खाणे-** १. उलटणे (रोग इ.); जोरावणे; उलटून पुन्हा हल्ला करणे (शत्रूने). २. चेंडू उडणे; उशी येणे.

उपट पु. आघात.

उपट स्त्री. दोन्ही हातांत धरलेल्या सोट्यांचा मार, आघात, हल्ला. (क्रि. खाणे, घालणे) : 'तों वजिराचें सामान थोडकें, त्यास यांची उपट सोसेनाशी झाली ।।'- भाव ४९.

उपट वि. वाकडातिकडा, अडचणीचा.

उपटआसन न. अर्धासन; गरुडासन; एक गुढगा उभा व एक गुढगा पाडून बसणे; उपट बसणे. [सं. उत् + पत् + आसन]

उपटखुंटा पु. उपटजात्याचा खुंटा.

उपटजाते न. कोठेही हलविता -नेता येण्यासारखे जाते; जमिनीत कायम न पुरलेले जाते.

उपटणी स्त्री. उपटणे; वेचणे; वर काढणे. (शेण, तृण, केस इ.).

उपटणे सक्रि. १. उपटून काढणे; मुळासकट वर काढणे. २. (एखाद्यापासून द्रव्य वगैरे) कपटाने, युक्तीने काढणे; लाटणे; लुबाडणे : 'माझी खुशामत करून तुला पैसा उपटणे असेल.'- विवि ८.२. ४०. ३. हिसकून घेणे; लांबवणे; चोरणे; न कळत घेणे; पळवणे. ४. आपटून मारणे; तुटून पडणे; हल्ला करणे; कोसळणे : 'जें पाखिरू एकु चांचुवाडां । धरौनि उपटिलें ।।'- शिव ८६७. [सं. उत्पाटन]
अक्रि. १. (खिळा, खुंटी, झाड वगैरे भिंतीतून) बाहेर येणे; वस्तू खेचून बाहेर काढणे किंवा वेगळे करणे. २. प्रकट होणे; उजेडात येणे; अचानक येणे; दिसू लागणे; (अंमल) सुरू होणे : 'अरे बापरे ! घातवार, व्यतिपात, संक्रांत, क्रिंकांत, मरी आई, बारावा बृहस्पती, साडेसाती सारी एकदम उपटली !'-भाव ८९. ३. उत्पन्न होणे; प्रादुर्भाव होणे (एखादी साथ वगैरेचा); पुन्हा उद्भवणे (रोग). ४. उडणे; आपटून वर येणे : 'आपणचि चेंडु सुटे । मग आपणयां उपटे ।।'- अमृ ९.५७.

५. एखाद्यावर तुटून पडणे; रागावणे : 'रथें रथूं दाटी गजें गजां उपटी ।'– शिव ८८१. ६. अचानक घडणे; उद्‌भवणे : 'आत्याचे प्रकरण उपटले.'– कलंदर ३५०. [सं. उत्+पत्]

उपटणे सक्रि. टाकी लावणे. (तंजा.) [सं. उत् + पट]

उपटसरी, उपटसळी, उपटसुरी, उपटसुळी स्त्री. एक वेल; उपळसरी; अनंतमूळ; श्यामा. (को.)

उपटसुंभ, उपटसुंभा, उपटसुंबा, उपटसुंब्या वि. १. उडाणटप्पू; कामधंदा नसलेला. २. तात्पुरता; उपरी. ३. हक्क नसता अधिकाराच्या जागेवर आलेला; तोतया; अधिकार नसताना लुडबुडणारा; बेकायदेशीरपणे अधिकारावर आलेला; आगंतुक; संबंध नसलेला : 'जडजंबाळ तथाकथित विचारवंत आणि उपटसुंभ प्राध्यापक.'– छांदसी ११. ४. (उप.) अविवाहित; ब्रह्मचारी.

उपटसूळ वि. १. आकस्मिक; क्रम सोडून असा : 'मध्येंच उपटसुळासारखें कांहीं निर्माण झालेलें नाहीं.'– गीर १६८. २. विघातक; तापदायक; मध्ये लुडबुड करणारा; भांडखोर; उडाणटप्पू; ढवळाढवळ करणारा. ३. उपटसुंभ; अलबत्या–गलबत्या : 'मरतेवेळीं एखाद्या उपटसुळास विनाकारण आपली दौलतही त्यास देतां येणार नाहीं.'– लोटिकेले ४.२७. (वा.) **उपटसूळ खांद्यावर घेणे–** मूर्खपणाने भानगडी, त्रास, लचांडे पाठीमागे लावून घेणे; नसते झेंगट मागे लावून घेणे.

उपटा, उपाटा पु. १.उचल; दुसऱ्यास फसवून पैसे उपटणे; लबाडीने कर्ज उभारणे; ठकबाजी करून पैसा काढणे. (क्रि. मारणे.) २. लुबाडणे; लांबवणे; उचलेगिरी करणे; पळवणे. (क्रि. देणे.)

उपटाउपट, उपटाउपटी स्त्री. १. युक्तीने, कौशल्याने, जबरीने अथवा फसवेगिरीने द्रव्य इ. काढणे; लुबाडण्याचा धंदा; उपटण्याचा व्यापार. [उपटचे द्वि.]

उपटी स्त्री. प्रहार; आघात; घाव : 'कोपे इंद्रु आला हातुपीटीं । तो खांडेयाचा उपटीं ।'– शिव ४५२.

उपटीव वि. उपटून काढलेले (तोडून किंवा कापून न काढता काढलेले पीक, केस वगैरे); उन्मळून पडलेले; उपटलेले (झाड).

उपटून खांद्यावर घेणे पहा : **उपटसूळ**

उपटून जेवणे, उपटून खाणे आधाशीपणे खाणे; ओ येईतो खाणे.

उपट्ट क्रिवि. काठापर्यंत भरलेला. (गो.)

उपट्या वि. फसव्या; लुबाडणारा; फसवणारा; खिसेकापू; उचल्या; भामटा; अट्टलसोदा.

उपट्या भुईमूग ज्याचे झाड उपटले असताना झाडाबरोबर उपटून आलेल्या शेंगा वेचता येतात अशा जातीचा भुईमूग; घुंगऱ्या भुईमूग; दाणे तांबड्या रंगाचे असून, त्याचा तेलाचा उतारा अधिक असतो.

उपड स्त्री. अडचण; नड; उणीव; कमताई : 'आंतील आंत खायास व पाणी पायच्या माणसांस उपड आहे, असें असोन कडव्या माणसांवांचून होतच नाही म्हणऊन लिहितां' – मइसा १०.१५६.

उपडणे सक्रि. पहा : **उपटणे** १. उपटणे : 'आरेरे टाकौनि घोडा । भणती यांचिआं जटै उपडा ।' – शिव १४१. २. आपटून मारणे : 'मग उपडिला खडकीं । हंसु जैसा ।।' –ज्ञा १८.७९८.
अक्रि. बाहेर, वर येणे; खेचून बाहेर काढणे; उन्मळून पडणे; मुळासकट उपटून पडणे; नष्ट होणे : 'उत्तम अधमीं संचरती । ऐसे वर्णावर्णा मिसळती । तेथ समूळ उपडती । जातिधर्म ।।'– ज्ञा १.२५०. [सं. उत्+ पत्]

उपडथवी–थावी स्त्री. पाण्यातील भोवरा; लाटा एकमेकींवर उलथून पडणे; खळबळ : 'कीं बुडतां भवार्णवी । वीर एतां उघडथवी । तेवीचि काकुळती दावी । कृपावंतापुढें ।।' – ऋ १०१; 'संसाराचेया डोहाआंतु उपडथावीं असे जावों पाहातु ।'– उगी १०४.

उपडवणे प्रयोजक सक्रि. पहा : **उपडणे** : 'एकां उपडविलें । समूलांतें ।।' – राज्ञा १३.२२६.

उपडहंडी, उपडहांडी स्त्री. १. पाणी गार करण्याकरिता फडके बांधून उलटे टांगलेले भांडे. (ना.) २. पहा : **उकडहंडी**

उपडा, उपडी वि. तोंड खाली केलेला; पालथा; अधोमुख. उताणा याच्या उलट. उलटी (गो. कु.) : 'होडी केव्हा उपडी होईल....' – कलंदर ६३.

उपडा तांब्या स्त्री. रजस्वला, विटाळशी असल्याचे द्योतक.

उपडी मांडी स्त्री. लिहिण्याकरिता मांडी दुमडून घातलेली बैठक.

उपडी सरणे (लहान मुलाचे) पालथे होऊन पोटावर सरपटणे.

उपणणी स्त्री. धान्यातील भुसा, टरफले काढण्याकरिता धान्य वारवणे; वाऱ्याने उडविणे; वरून खाली ओतणे; उफणणे. [सं. उद् + पवन]

उपणणे अक्रि. १. मनात येणे : 'परसनाएकासि ऐसें उपनले जे श्रीप्रभुचेया दरसिनासि जावों' – लीच ३.५९. २. उत्पन्न होणे : 'निगालेआं चैतन्यनाथां । अंतौरां उपणलीं अवस्था ।'– शिव ७४३. [सं. उत्पन्न]

उपणणे उक्रि. १. टरफल; भुसा वगैरे काढण्यासाठी धान्य वारवणे; उंचावरून टोपलीने हळूहळू ओतणे (सुपाने पाखडणे, उधळणे. झडपणे किंवा पटकणे नव्हे) : 'कीं भूस बीज एकवट । उपणितां राहे घनवट ।' – ज्ञा २.१३०. २. क्षुद्र, तुच्छ लेखणे; कस्पटाप्रमाणे मानणे. ३. विवरण, फोड करून सांगणे : 'हे कथा उपणितां तुज नारे । जाण कीं अखमसेतुजनारे ।।' – वामनविराट ६.८५. [सं. उत्+पू–पवन]

उपणवटी, उपणवाटी, पाटी स्त्री. उथळ बुरडी, पाटी (धान्य उपणण्याकरिता घेतात ती).

उपणा पु. १. संधि–वातविकाराने हातापायांना विकृती झाली असता शेकण्याकरिता वाफवलेला निरगुडी वगैरे वनस्पतींचा पाला; नारळाचा कीस वगैरेंची पेंड (क्रि. शिजवणे, करणे, लावणे, बांधणे.) २. बरोबर न शिजलेला भात (हेटाळणी करता वापरतात.) [सं. उत्+पू किंवा उत्+ पर्ण]

उपणी, उंपणी स्त्री. पेरणी. [सं. वप]

उपणे न. वारवलेले, उपणलेले धान्य; उपणून साफ केलेले.

उपणे, उंपणे उक्रि. पेरणे. [सं. वपन]

उपतप्त वि. तापलेला; तापविलेला. [सं. उप+तप]

उपतरणे (प्र.) पहा : **उबदरणे**

उपतलविभाजन न. (तत्त्व.) मुख्य अथवा गौण घटकांचे त्यांच्या उपघटकात केलेले विभाजन. [सं.]

उपताप पु. त्रास; दगदग; परपीडा; जिकीर चिंता; कष्ट : 'जिहिं परोपतापु घडे । परावा जीउ रगडे ।'– राज्ञा १६.३२५. [सं.]

उपतिष्ठणे अक्रि. १. मनात बिंबणे; परिणामकारक होणे; वजन पडणे (उपदेशाचे); संस्कार होणे. २. उपस्थित होणे, समोर येणे; हजर असणे; प्रकट होणे : 'इंद्रादि देवता घरीं पुरवती वस्तुजात ।। उपतिष्ठीत न चिंततां ऋद्धिसिद्ध ।।' ३. उभे राहणे (पाप इ.); प्राप्त, साध्य होणे; फळास येणे; सत्कृत्याचे अथवा दुष्कृत्याचे फळ प्राप्त होणे : 'तुका म्हणे साधन सुलभ गोमटें । परि उपतिष्ठे पूर्वपुण्यें ।' – तुगा २२७७. ४. मान्य होणे; रुचणे : 'बहुत परिश्रम केला, परंतु उपतिष्ठला नाही.' – होकै ३९. [सं. उप+स्था– तिष्ठ]

उपतिष्ठित वि. मनात भरलेला; बिंबलेला; ठसलेला; रुचलेला; संस्कार, परिणाम झालेला (उपदेश, बोलणे, शिक्षा). [सं.]

उपत्रळ वि. पुरून उरणारा (एखाद्या पदार्थाचा भाग).

उपदंश पु. गर्मीचा विकार; गुह्येंद्रियाचा रोग; एक गुप्तरोग. [सं.]

उपदंशी वि. ज्याला उपदंश झाला आहे असा.

उपदान न. केलेल्या सेवेबद्दल बक्षिसादाखल दिलेली रक्कम. कर्मचाऱ्यांना केलेल्या सेवेबद्दल एकमुठीने देण्यात येणारी रक्कम. [सं.]

उपदाने न. अव. हिंदुधर्मीय मृताच्या वर्षश्राद्धाला दान करावयाच्या वस्तू. उदा. आमान्न, उदकुंभ, वस्त्र, छत्र, उपानह, कमंडलू, यष्टी, लोहदंड, दीप, तांबूल, चंदन, माला, तिल, सिद्धस्थाली, ऊर्णावस्त्र, व्यजन, धेनू ही उपदाने और्ध्वदेहिक कर्मात द्यायची असतात. [सं.]

उपदिष्ट वि. १. शिकवलेले; सांगितलेले; उपदेशलेले (कर्म, मंत्र इ.) २. ज्याला उपदेश दिला आहे किंवा शिकविले आहे तो (शिष्य इ.) न. शिकवलेले ज्ञान; उपदेश दिलेला मंत्र.

उपदेव पु. मुख्य देवतांहून इतर गंधर्व, विद्याधर, अप्सरा इत्यादी देवता; किरकोळ, गौण देवता. [सं.]

उपदेश पु. १ शिक्षण; ज्ञान; शिकवण; पाठ; बोध; कसे वागावे यासंबंधी हिताचे सांगणे; मोठ्यांनी लहानांना, ज्ञानी माणसांनी अज्ञानी माणसांना, गुरूने शिष्याला केलेले मार्गदर्शन : 'अधिकार तैसा करूं उपदेश ।'– तुगा. २. सल्लामसलत; युक्ती; सूचना; निर्देश. ३. गुरुमंत्र; मंत्रदान. सामा. शब्द मंत्रोपदेश, हितोपदेश, गुरूपदेश इ. [सं. उपं+दिश्]

उपदेशक पु. १. धर्मप्रचारक. २. नीतीची शिकवणूक देणारी व्यक्ती. [सं.]

उपदेशक, उपदेष्टा वि. १. उपदेश करणारा; शिकविणारा; हितबोध करणारा; मंत्र देणारा, सांगणारा; सल्लामसलत देणारा (शिक्षक, गुरू, मित्र). २.ख्रिस्तीधर्माचा उपदेश करणारा; उपदेशिका : 'त्यांना दिसून आलें कीं हा परदेशीय उपदेशक जें सांगतो तें आपल्या पवित्र ग्रंथामध्ये सांपडतें.'– ज्ञानोदय ७.५.१९१८. [सं. उप+दिश्]

उपदेशणे उक्रि. १. ज्ञान, बोध, देणे; मंत्र शिकवणे, सांगणे : 'जेणें उपदेशिला रघुनाथ । तो बृहद्वासिष्ठ श्रेष्ठ ग्रंथ' – हरि १.१००. २. (सामा.) माहिती, ओळख करून देणे; पढवणे : 'केवळ जें वेदांत ज्ञान । रामासि उपदेशिला ब्रह्मानंदन ।' ३. सल्लामसलत देणे; सूचना करणे; कानउघाडणी करणे.

उपदेशपाठ पु. धार्मिक उपदेश, प्रवचन. [सं.]

उपदेशशास्त्र न. धर्मविषयक प्रवचन कसे करावे यासंबंधीचे शास्त्र.

उपदेशी वि. १. शिकवलेला; पढवलेला. २. सल्ला दिलेला; हिताहित सांगितलेला. ३. मंत्र सांगितलेला; उपदेश घेतलेला : 'संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । येरा अभ्यागासी ज्ञान नाहीं ।।'– तुगा ३३४९.

उपदेष्टणे सक्रि. सांगणे; उपदेश करणे : 'जे मी आपणांस विश्वासाने सांगेन किंवा उपदेष्टीन त्याचा आपण अपमान करावयाचे नाहीत.'– पेद ४२.४५ [सं. उप+दिश्]

उपदेष्टा पु. पहा : **उपदेशक**

उपद्रव पु. १. पीडा; त्रास; जाच; छळ : 'त्रिविध मुख्य आधवे । उपद्रवांचे मेळावे ।' – ज्ञा १३.३४४. २. बाधा (पिशाच्चादिक); संचार. ३. (कायदा) अपकार; नुकसान; घाण; अडथळा. ४. रोग; शरीरदोष. ५. जखम : 'तेही एथ उपद्रव केला.' – लीच १.४४. (व.) ६. उंदरांचा त्रास. ७.(ल.) उंदीर.[सं. उप+दृ] (वा.) **उपद्रव करणे–** त्रास देणे; नुकसान होईल असे करणे : 'खानाने पंढरपूरच्या देवस्थानाला उपद्रव केला.'– श्रीयो १.२०४.

उपद्रवणे सक्रि. १. त्रास देणे; पीडा देणे : 'आणि अभिचारिकीं तिहीं । उपद्रवीती जेतुलें काहीं ।'– राज्ञा १६.३९८. २. खून करणे; ठार करणे : 'आमचे पीते वाटे चोरीं उपद्रवीले.'– लीच १.४२.

उपद्रवमूल्य न. दुसऱ्याला त्रास देऊन किंवा कामात कटकटी निर्माण करून लाभ पदरात पाडून घेण्यासाठी स्वत:चे महत्त्व वाढविणे : 'या रीतीने उपद्रव्यमूल्य वाढवावे, असा हा खेळ आहे.'– मटा २२.६.८३.

उपद्रवशामक वि. पीडा, त्रास, वेदना नाहीशा करणारा; उपद्रव थांबवणारा. [सं.]

उपद्रवी, उपद्रवीक वि. १. भूत बाधेने पछाडलेला; पिशाच्चबाधेसंबंधी (पीडा, रोग). २. रोगकारक (अन्न); अपथ्य; शरीरात बिघाड करणारे; न पचणारे. ३. त्रासदायक; पीडाकारक; कंटाळवाणा. ४. अनर्थकारक; भयोत्पादक; संकटे उत्पन्न करणारी (सत्ता, व्यवस्था, राज्यपद्धती, कारभार). ५. ज्यास पिशाच्चबाधा झाली आहे असा. [सं. उपद्रव]

उपद्रवी जीव उपद्रव देणारा; त्रासदायक प्राणी (ढेकूण, पिसवा वगैरे).

उपद्रष्टा पु. १. यज्ञादी कर्मांमध्ये न्यूनाधिक काही कर्म होईल ते पाहून जिथल्या तिथे यथास्थित करण्यासाठी म्हणून असलेला व्यवस्था पाहणारा ऋत्विज. २. (सामा.) व्यवस्थापक; चौकसनीस. [सं.]

उपद्रुत वि. उपद्रव पावलेला; ग्रहण लागलेला. [सं.]

उपद्वीप न. १. द्वीपकल्प; बेटासारखा भाग. २. आकाराने लहान बेट. ३. पुराणांतील सात मुख्य द्वीपांखेरीज इतर सप्तद्वीपांविरहित सांगितलेली द्वीपे. [सं.]

उपद्व्याप पु. १. अतिशय त्रास; कष्ट; परिश्रमपूर्वक प्रयत्न; खटपट; रक्ताचे पाणी करणे. २. पीडा; जिकीर; त्रास; छळ (क्रि. देणे.). ३. व्याप; खटाटोप; पसारा; सिद्धता; तयारी (धंदा, समारंभ, कारभार इत्यादीची). ४. रिकामा उद्योग; नको ते करणे; दुसऱ्याला त्रास होईल असे कृत्य; भानगड : 'मिशनऱ्यांच्या उपद्व्यापामुळे तो समाज खवळला.'– निअ २७८; उलाढाल; उचापत.

उपद्व्यापी वि. १. मेहनती; कष्टाळू; अतिशय काम करणारा; फार खटपटी. २. व्रात्य; खोडकर; त्रासदायक; उचापत्या; भानगड्या.

उपधातु-तू पु. १. तांबे, सोने, रूपे इत्यादी मुख्य सात धातूंखेरीज इतर धातू- स्वर्णमाक्षिक, तारमाक्षिक, मोरचूत, कासे, पितळ, शेंदूरी, शिलाजित. २. अश्मीभूत, प्रस्तरीभूत पदार्थ; खनिज द्रव्य. ३. शरीरातील मुख्य धातूशिवाय बाहेर पडणारे सात धातू- दूध, रज, वसा, घाम, वात, केस, ओजस. [सं.]

उपधान न. १.अर्पण करणे; देणे; नेणे. २. (सामा.) उपाधी, सान्निध्य यायोगे एका व्यक्तीचे गुणधर्म दुसऱ्या व्यक्तीला प्राप्त होणे; गुणधर्मांची देवघेव; एखाद्याचे स्वभावगुणधर्म यांची छाया दुसऱ्यावर पडणे; गुणपरावर्तन. [सं. उप+धा]

उपधान्य न. तांदूळ, गहू इ. मुख्य धान्ये सोडून इतर किरकोळ व कमी महत्त्वाचे धान्य; गौणधान्य. (अठरा उपधान्ये.)

उपधायक वि. देणारा; उपधान करणारा; पोचवणारा. उदा- गुणोपधायक, फलोपधायक, हितोपधायक. [सं.]

उपध्मानीय पु. अर्धविसर्गपूर्वक पकार आणि फकार; प आणि फ. यापूर्वी येणारा विसर्ग. [सं. उप+ध्मा]

उपध्रुवप्रदेशीय वि. ध्रुवप्रदेशाशेजारचा.

उपध्वनि-नी पु. प्रतिध्वनी; मुख्य आवाजामागून निघणारा बारीक आवाज; प्रतिशब्द ; पडसाद. [सं.]

उपनगर न. शहरालगतची स्वयंपूर्ण वसाहत, आसपासचा भाग. [सं.]

उपनणे अक्रि. पहा : **उपणणे** १. उपजणे; जन्माला येणे; उत्पन्न होणे : 'तंव कृपा उपनली जगन्नाथा । तें परिएसा पां ।'- ऋ ३६. २. झडप घालणे; पडणे : 'जेयांवरी दृष्टी उपनली । चैतन्यनाथाची ।।'- शिव ५८३. [सं. उद्+पद्]

उपनणे सक्रि. (कृषि.) वारवणे. पहा : **उपणणे**

उपनयन न. विधिपूर्वक विद्याग्रहणासाठी मुलाला गुरुजवळ नेणे; व्रतबंध; प्रथम यज्ञोपवीत धारण करण्याचा विधी; मौंजीबंधन; जानवे घालणे; मुंज. त्रैवर्णिकांस आठव्या वर्षी वेदाधिकारास योग्य करण्यासाठी हा संस्कार करतात. सोळा संस्कारांपैकी एक : 'या उपरी उपनयन । गुरुद्वारां गायत्री ग्रहण ।'- एभा १७.२७१. [सं. उप+नी]

उपनाणे न. उपचलन; जे नाणे कायदेशीर किमतीपेक्षा कमी असते, वाटेल त्याला टंकसाळीतून पाडून मिळत नाही, दुसऱ्या नाण्याच्या अमुक पटीने किंवा हिश्शाने मानले जाते व देवघेवीत विशिष्ट मर्यादेपर्यंतच कायदेशीर रीतीने वापरता येते असे नाणे. ज्यातील धातूची किंमत किमतीपेक्षा कमी आहे असे नाणे. [सं. उप+नाणक]

उपनाम, नाव न. कुळाचे नाव; आडनाव; टोपणनाव; गोत्रनाम. [सं.]

उपनामक वि. उपनावाचा; टोपणनावाचा; आडनावाचा. उदा. वैशंपायनोपनामक; पंडितोपनामक, एतदुपनामक. [सं.]

उपनाव न. अधिकार; पदवी : '.... राजश्री फत्तेसिंग भोसले याजवर कृपाळु होऊन सरंजाम, त्यास, उपनाव सेनापती सेवकास दिल्ही.'- पेद १२.४.

उपनाह न. १.पोटीस. २. मलम; औषध. [सं.]

उपनिधि-धी पु. ठेव; दुसऱ्याजवळ विश्वासाने ठेवलेली वस्तू, संपत्ती; अनामत वस्तू. [सं.]

उपनिवेशन न. वसाहतीकरण; निवसन.

उपनिषद् न. १. गुरुचरणाजवळ बसून मिळवलेले ज्ञान; गूढज्ञान. २. वेदांच्या ब्राह्मण ग्रंथांना जोडून असणारा वेदांतपर भाग; वेदसारांश असणारा ग्रंथ; वेदज्ञानकाण्डात्मक भाग. एकंदर १०८ उपनिषदे मानतात. त्यापैकी पुढील दहा उपनिषदे मुख्य आहेत- ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तैतिरेय, ऐतरेय, छांदोग्य व बृहदारण्यक : 'अतिगुह्यज्ञान परात्पर । जे उपनिषदांचे भांडार ।'- एभा १३.७१२. [सं. उप+नि+सद्]

उपनीत वि. व्रतबंध, मुंज झालेला; वेदाधिकारी. [सं.]

उपनेत्र पु. चष्मा. दृष्टिदोष दूर करण्यासाठी काच किंवा गार यांचा उपयोग करून हा तयार करतात. चाळिशी; डोळ्यांची आरशी : 'जे न देखती नेत्र । तें देखती उपनेत्र ।'- यथा ४.३३२. [सं.]

उपन्यसनीय वि. प्रतिपाद्य; पुढे मांडायचा, विचार करायचा, (विषय, मुद्दा वगैरे). [सं. उप+न्यस्]

उपन्यस्त वि. १. पुढे मांडलेला; दाखवलेला; उघड केलेला; प्रतिपाद्य. २. जवळ ठेवलेला. [सं.]

उपन्यास पु. १. वस्तू, मुद्दा व्यवस्थित रीतीने पुढे ठेवणे, मांडणे; विशद करणे; प्रतिपादन; स्पष्टीकरण करणे; समोरासमोर ठेवणे. २. प्रस्तावना करणे; विषयप्रवेश करणे; आरंभ; सुरुवात; उपक्रम : 'या वादाचा आज येथें उपन्यास करण्याचे कारण इतकेंच कीं ...' - लोटिकेले ४.८३. ३. सान्निध्य; निकटता; जवळ असणे. [सं.]

उपपति-ती पु. यार; जार; धगड; सग्या; राखा; पतीखेरीज दुसरा उपभोक्ता; व्यभिचारिणीशी संबंध असलेला पुरुष. [सं.]

उपपत्ति-त्ती स्त्री. १. पुरावा; कार्यकारणभाव; उगम; तत्त्वनिर्णय; विषयसिद्धता; सिद्धतेची प्रमाणे; युक्तिवाद : 'अंगाचिया अनुपपत्ति । आटलिया उपपत्ति ।'- अमृ ५.५५. २. सिद्धांत; तत्त्वांचे प्रतिपादन; विशदीकरण; मीमांसा; विवेचन; शिस्तवार मांडणी; योग्य समजूत : 'शिस्तवार जी मांडणी करितात तिला उपपत्ति किंवा उपपादन असें म्हणतात.'- गीर २३. ३. सिद्ध केलेली गोष्ट; सप्रमाण, संयुक्तिक सिद्धी. ४. (ग.) उदाहरण सोडविण्याच्या रीतीने स्पष्टीकरण. ५. (भूमिती) प्रमेयसिद्धता. ६. साधने; सामग्री; साहित्य (निर्वाह, कारभार इत्यादीचे). ७. युक्ती; कल्पना : 'उपपत्ती शार्ङ्गी दाविता जाहला ।।' - ज्ञा ११.७०४.[सं. उप+पद्] (वा.) **उपपत्ती येणे-** पटणे; मान्य होणे; प्रतीती; अनुभव : 'मज नये हे उपपत्ती । याचिलागीं ।।'- ज्ञा २.४९. **उपपत्ती लावणे-** योग्य खुलासा करणे; कार्यकारण संगती लावून दाखविणे.

उपपत्नी स्त्री. रखेली; अंगवस्त्र; पत्नीखेरीज दुसरी उपभोग्य स्त्री. [सं.]

उपपद न. १. गौणपद (सामासिक शब्दातील.) पहा : **उपपद समास, उपशब्द** २. कोणत्याही विद्येमध्ये किंवा कलेमध्ये प्रावीण्यदर्शक संज्ञा. बी. ए., एम. ए., काव्यतीर्थ, पुराणरत्न इ. ३. पदवी; बिरुद; बहुमानदर्शक किंवा पराक्रम; विशेष कृत्यदर्शक उपनाम; टोपणनाव. जसे - विक्रमादित्य, आहवमल्ल इ. : 'विलियम जो विजयी या उपपदाने

प्रसिद्ध आहे....' –निमा ५५२. ४. इंग्रजीत नामापाठीमागे लागणारे पद. उदा. ए, ॲन, दि. [सं.]

उपपद तत्पुरुष (व्या.) दुसरे पद धातुसाधित असलेला तत्पुरुष समास.

उपपदधारी वि. पदवीधर : 'चालू असणारा शिक्षणक्रम किंवा त्यातून तयार झालेले उपपदधारी लोक यांपैकी कोणीहि अद्याप आपल्या गुणांनी विशेष लोकमान्य झालेले आमच्या ऐकिवांत नाहीं.'– लोटिकेले २.२३३.

उपपदार्थ पु. एक पदार्थ तयार करीत असताना त्याच्या काही अवशेषांतून जो दुसरा पदार्थ निर्माण होतो तो.

उपपन्न वि. १. सिद्ध केलेले; स्पष्ट केलेले; ज्यांची उपपत्ती आहे असे. २. साधनांनी युक्त; समृद्ध; संपन्न; श्रीमंत; सधन. [सं.]

उपपर्ण न. पानाच्या देठांशी फुटणारा दोन पानांचा अंकुर.

उपपातक न. दुय्यम, तिय्यम प्रतीचे पातक; गोवध, कन्याविक्रय, नास्तिक्य इत्यादी पापे. ही एकंदर ४९ आहेत. [सं.]

उपपातालीय वि. (भूशा.) मध्यम खोली असलेल्या ठिकाणी ज्यांची निर्मिती झाली आहे असे (अग्निज खडक). [सं.]

उपपात्र न. पाणी पिण्याचे लहान भांडे. पंचपात्री, फुलपात्र, पेला इत्यादी.

उपपादक वि. सांगणारा; दाखवणारा; सिद्ध करणारा; उघड करून देणारा; स्पष्ट दर्शवणारा. [सं.]

उपपादणे उक्रि. १. उल्लेखणे; मांडणे; विवरण करून सांगणे; स्पष्ट करणे; विवेचन करणे; शिकवणे : 'भक्ति ज्ञान विरक्ति । जिथे शास्त्रें उपपादिति । तिथे बोलावि महति । यथार्थवादें ।।'. २. सिद्ध करणे; स्थापित करणे. [सं. उपपादन]

उपपादन न. १. मांडणी; उल्लेख; विवेचन; प्रतिपादन; उपपत्ती : 'शिस्तवार जी मांडणी करितात तिला उपपत्ति किंवा उपपादन म्हणतात.' – गीर २३. २. सप्रमाण सिद्धता; स्थापना. [सं.]

उपपादित वि. १. उपपादिलेले; सांगितलेले; विवेचन केलेले; स्पष्टीकरण केलेले. २. सिद्ध केलेले. ३. स्थापित (सिद्धान्त). [सं.]

उपपाद्य वि. सांगायचा; मांडायचा; स्पष्ट करायचा; विवेचन करायचा (विषय, मुद्दा); सिद्ध करण्याची (गोष्ट). [सं.]

उपपुर पु. उपनगर; शहराबाहेरची लहान वस्ती : 'भवतिं उपपुरें । गुढ्या गोपुरें ।' – आसु १३. [सं.]

उपप्लव पु. १. हाणामार; लुटालूट; जाळपोळ (शत्रू, लुटारू वगैरेंकडून होणारी). २. जुलूम; जबरदस्ती; अन्याय (जुलमी राजा, निर्दय माणूस यांजकडून). ३. (सामा.) पीडा; उपद्रव; त्रास; संकट; अरिष्ट : 'यांचे घरावर (आम्ही) उपप्लव (करणार) तेव्हा यांनी (परस्पर) पुण्यास लिहून उत्तरे आणलीच असतील.' – होकै ४६.

उपबर्व्ह स्त्री. (प्र.) उपबर्ह. उशी : 'बाहू हे उपबर्व्ह काय करणें उंशा अम्हां सद्‌गुणा ।।' – निमा–सुभद्राचंपु ४.२०.[सं. उपबर्ह = उशी]

उपबल न. पाठबळ : 'उपबल त्यास हिंमतबहाद्दर अनुपगीर गोसावी याचें आहे.' – मशियांका ४२८. [सं.]

उपबंध पु. १. तरतूद. २. अट; कलम; शर्त. ३. करारातील मुख्य अट.

उपबाधक वि. पीडाकारक : 'याचि कारणे उपबाधका । होती तुज अनेका ।।' –गुच ३.२०. [सं. उप+बाध्]

उपबाधा स्त्री. पीडा; दु :ख. [सं.]

उपभुक्त वि. १. उपभोग घेतलेले; वापरलेले; आस्वाद घेतलेले. २. अनुभवलेले; उमजलेले; स्वत:ला माहीत असलेले. [सं. उप+भुज्]

उपभोक्ता वि. १. उपभोग घेणारा; वापरणारा; मालकी हक्क गाजवणारा. २. अनुभव घेणारा; स्वत:च्या अनुभवाने जाणणारा. ३. ग्राहक. [सं.]

उपभोक्ता पु. (अर्थ.) गरजांच्या समाधानासाठी वस्तूंचा, सेवांचा विनियोग करणारी, उपभोग घेणारी व्यक्ती. [सं.]

उपभोक्ताधिक्य न. उपभोक्त्याला (त्याने) दिलेल्या वस्तूंपासून मिळणाऱ्या संतोषापेक्षा घेतलेल्या वस्तूंपासून मिळणाऱ्या संतोषाचा अधिकपणा.

उपभोक्त्याचे भाटक न. (अर्थ.) उपभोक्त्याला मिळणारे भाडे, खंड.

उपभोग पु. १. आस्वाद; विलास; सुख भोगण्याची क्रिया; उपयोग; भोग; भोगवटा. २. अनुभव; स्वत: अनुभवाने मिळवलेले ज्ञान (सुखदु : खाचे). ३. रतिसुख; संभोग. ४. (अर्थ.) मालाचा खप, उठाव; गरजांच्या समाधानासाठी वस्तूंचा, सेवांचा केलेला विनियोग : 'उत्पादन व उपभोग यामंध्ये मोठी खिंड पाडता कामा नये.' – साको (उ) १९. [सं. उपभुज]

उपभोगणे उक्रि. १. आस्वाद घेणे; वापरणे; उपयोग करणे; उपभोग घेणे. २. अनुभव घेणे; पडताळून पहाणे; अनुभवणे. ३. रतिसुख देणे; संग करणे; संभोगणे. [सं. उपभोग]

उपभोगप्रदर्शन न. उपभोगाच्या दिखाऊपणावर, आकर्षकतेवर भर देणे.

उपभोगी वि. उपभोग घेतलेले; आस्वाद घेतलेले; अनुभवलेले. [सं.]

उपभोग्य वि. १. उपभोगायचे; वापरायचे; उपभोग करायचे. २. अनुभव घ्यायचे; उपभोगास योग्य असे. ३. ज्याचा उपभोग घेता येतो असा; जीवनाला आवश्यक : 'आता उपभोग्य वस्तू पुष्कळ व त्यांचे उत्पादनही पुष्कळ.' – धरागा ३३७. ४. उपयोगात आणून संपणारा; ज्याचा वापर दैनंदिन आयुष्यात करता येतो असा (माल). [सं.]

उपभोजन न. अल्पाहार; उदक घेणे. [सं.]

उपमणे, उपमिणे सक्रि. उपमा देणे; तुलना करणे; सारखेपणा दाखवणे : 'तैसें ज्ञान हें उपमिजे । ज्ञानेंसींचि ।।' – ज्ञा ४.१८०; 'त्यासीं उच्चै:श्रव उपमणें ।।'– वेसीस्व ८.११२.

अक्रि. सारखे असणे, दिसणे; जुळणे; बरोबरी करणे. [सं. उप+मा]

उपमणे, उपमिणे अक्रि. उडणे; अंतरिक्षात वर जाणे : 'तेथे होमधूम्र प्रगटला । तो गगनमार्गेसीं उपमला । जणउ (जाणो) निघाला । महादेवासी ।।' 'अंतरिक्षीं वीज लवें तैशी गगनीं उपमिलीं ।।' – वसा २४.

उपमरडणे अक्रि. बदलणे; पालटणे : 'लोणार तीर्थि घागरि भरीलि । गुढघेयावरि धरिती : आणि वासना उपमरडली.' – लीचउ १७७.

उपमर्द पु. १. मानखंडना; अपमान; इज्जत घेणे. २. (व्यापक) बेमुर्वत. कृत्य; अविचारी आचरण. [सं. उप + मृद्]

उपमर्दणे अक्रि. नाश पावणे; चुरडला जाणे : 'तैसा माझेनि प्रसादें । जीवकणु जयाचा उपमर्दे ।' – ज्ञा १८.१२७२.

सक्रि. १. अंग चेपणे, रगडणे. २. तुडवणे; पिळणे; त्रास देणे; पीडा करणे. ३. अपमान करणे; इज्जत, अब्रू घेणे. [सं. उप+मृद्]

उपमर्दन न. १. अंग चोळणे, रगडणे, दाबणे. २. तुडवणे; पिळणे; त्रास देणे; पीडा करणे; जुलूम करणे. [सं. उप+मृद्]

उपमा पु. तिखटमिठाचा सांजा; उपीट.

उपमा स्त्री. साहित्यशास्त्रातील एक अर्थालंकार.

उपमातणे न. उपमा देणे; सादृश्य दाखवणे : 'भणओनि उपमातु कमठ । जगामाजी ।।' –शिव ३९१. [सं. उप+मा]

उपमाता स्त्री. १. दाई; अंगावर पाजणारी बाई; धात्री : 'अडचण असल्यास मूल पाजण्यास उपमाता ठेवावी.' – बालरोग चिकित्सा ४. २. संगोपन करणारी दुसरी बाई. ३. सावत्र आई; मानलेली आई; पालनकर्ती. [सं.]

उपमान न. १. ज्याच्याशी तुलना करायची ते; दृष्टांत, उदाहरणादाखल घेतलेली वस्तू. तोंडाला चंद्राची उपमा देतात तेथे चंद्र हे उपमान असते. २. अनुमानाचा एक प्रकार, सादृश्य अनुमान.

उपमानगम्य वि. सादृश्याने प्रतीत होणारी, समजणारी; तुलनेने समजणारी.

उपमानव पु. मानव सदृश प्राणी.

उपमानवी वि. नीतिमत्ता, बुद्धी याबाबतीत सामान्य लोकांपेक्षा खालच्या पातळीवर असणारा (माणूस, व्यक्ती). [सं.]

उपमानित्र न. (यंत्र.) प्रमाण दाखवणारे यंत्र. [सं.]

उपमानोपमेयभाव पु. उपमान आणि उपमेय यांचा परस्पर संबंध; दोन तुल्यवस्तूमधील परस्पर संबंध. [सं.]

उपमाला स्त्री. (ग्रं.) समान विषयावर एकामागून एक अशी प्रकाशकाने प्रसिद्ध केलेली पुस्तके. या सर्वांना समान ग्रंथनाम किंवा प्रत्येक प्रकाशनाला वेगळे नाव असून सर्व प्रकाशने मिळून एक नाव दिले जाते.

उपमिणे अक्रि. उपमा देणे, तुलना करणे.

उपमित वि. उपमा, दृष्टान्त; उदाहरण दिलेले; तुलना केलेले.

उपमिति–ती स्त्री. १. तुलनेने प्राप्त झालेले ज्ञान; दृष्टांताने झालेली सिद्धी. २. सारखेपणा; सादृश्य. ३. प्रतिकृती; प्रतिमा; सारखी वस्तू. [सं.]

उपमीजणे उक्रि. उपमा देणे; तुलना करणे : 'क्षीरसागराचा पाटु । जमुने जलां होतां गोटु । तरी उपमीजतां दानवशिरसाटु । नारदें आळंगिता ।।' – शिव ६१. [सं. उप+मा=मोजणे]

उपमेय न. ज्याचे साम्य, तुलना वगैरे दाखवायचे ते; उपमानाची उपमा ज्यास द्यायची ते; तोंडाची चंद्राशी तुलना करताना तोंड उपमेय. [सं.]

उपमेयोपमा स्त्री. एक अर्थालंकार.

उपयुक्त वि. उपयोगी; कामाचे; वापरण्यालायक; सहायक; सोयीचे; लाभाचे; उपकारक. [सं. उप+युज्]

उपयुक्तता स्त्री. (तत्त्व.) वस्तूचा उपयोग हाच तिच्या श्रेष्ठतेचा एकमेव निकष मानणारे मत. हितकारिता, उपकारत्व; उपयोगिता. [सं.]

उपयुक्ततावाद पु. (तत्त्व.) जे उपयुक्त तेच नैतिक असे प्रतिपादणारा वाद; कोणत्याही कृतीची खरी किंमत तिच्या उपयुक्ततेवर असते असे समजणारी विचारसरणी. [सं.]

उपयुक्ततावादी वि. वस्तूंचा उपयोग हेच तिचे एकमेव मूल्य मानणारा.

उपयोग पु. १. वापर; उपयुक्तता; योजना; साहाय्यकता; उपकारकता; मदत : 'तो काइसेया नांव योगु । तेयाचा कवण उपयोगु ।'– ज्ञा ५.१७६. २. गरज; जरुरी; प्रयोजन; सापेक्षता. [सं.]

उपयोगणे, उपयोजणे उक्रि. उपयोग करणे; वापरणे : 'तेंच योग्य प्रकारें उपयोगिल्याने पाटलिपुत्रांतहि त्यास उपयोगी पडलें.' – चंद्रगुप्त १८३. [सं. उपयोग]

उपयोगी वि. १. साहायक; उपयुक्त. २. जरुरीचे; गरजेचे. [सं.]

उपयोजक वि. १. (तत्त्व.) उपयोग करून घेणारा; उपयोगात आणणारा. २. शास्त्रनियमांचा प्रत्यक्षात वापर करणारा. [सं.]

उपयोजन न. नियम, कायदे यांची अंमलबजावणी, व्यवहारात उपयोग.

उपयोजित वि. प्रत्यक्ष किंवा व्यावहारिक उपयोगाशी संबंधित असलेले. उदा. उपयोजित गणित.

उपयोजित शब्दसंग्रह नेहमी वापरात असणाऱ्या शब्दांचा संग्रह.

उपर पु. १. बोलबाला; कीर्ती; जोरा; वरचष्मा; शह; दबाव; सरशी; जय : 'राजश्री पंतप्रधान याचा उपर दाखऊन माणसें घेऊन जावी हे गोष्ट काये आहे?' - पेद २३.३०६. २. आक्षेप : 'ती ही गोष्ट एकीकडे राहून हाच उपर लिहिला ते पक्षीं दैवाची गोष्ट ।' – ऐलेसं ४६६५.

उपर पु. १. वजन, छाप, श्रेष्ठत्व ठेवणे; वर्चस्व; वरचढपणा : 'जयाचेनि सावायें । जीव ब्रह्मउपर लाहे ।।' – अमृ २.१६. २. (नाविक) उत्तर दिशा.

क्रिवि. १. नंतर; मागाहून; तदुत्तर; उपरांत : 'त्यजिल गुरुभजन कसें हें आयकिल्याहिं उपर माणूस ।' – मोवन १०.६७. २. काठापर्यंत. ३. उत्तर दिशेला.

शअ. १. वर; वरची बाजू; ऊर्ध्व; उंच : 'मी तळु उपरु म्हणता ।' – ज्ञा १३.४१७. २. आणखी; पलीकडे; अधिक; पेक्षा : 'उपरमला भीष्म, विदुर कृष्णहि कथितां अशाहि उपर मला ।।' – मोउद्योग ९.६७. ३. नंतर. उदा. याउपर, त्याउपर वगैरे : 'सरैल उपरा प्रतिरात्रि दिनु । सकलै दिशां उजुबाडु होउनु ।' – ख्रिपु. २.४४.१९४. (वा.) **उपरांत असणे** – (सोंगटी) तिफाशी सोंगट्यांच्या खेळात सोंगटी लागल्यापुरते दान पडून वर उरणाऱ्या दानामध्ये मारता येण्यासारखी दुसऱ्या बाजूची सोंगटी बसलेली असणे. ही दाने सर्व दसप्यादापासून पुढे येतात. **उपर करणे** – उपराळा; मदत करणे : 'जाटाचा उपर सिखानी बहुत केला.' – पेदभा २९.५५. **उपर करून दाखविणे** – श्रेष्ठता प्रस्थापित करणे : 'त्याचा उपर करून दाखवाव....' – पेद २०.६१. **उपर ठेवणे, उबर ठेवणे** – १. वरचष्मा राखणे. २. आस्था, अगत्य राखणे : '..गुपचूप याजकडील हरयेक कामाविसी उपर ठेवीत जाणे' – होइसापखं १.१४७. **उपर येणे** – १. किनाऱ्याकडे. २. उत्तर दिशेकडे : 'सुवर्णदुर्गानजीक फिरंगी याची १७ गलबते पाणी भरावयास लागली होती, पाणी भरून उपर आली.' – पेद १६.१३.

उपरकाठी स्त्री. अनवाणी चालताना एखाद्या लहान काठीवर पाय पडला असता तिचे टोक चटकन उडून पायाच्या तळाला आघात करते. त्यामुळे विषारासारखे होणारे मोठे दुखणे.

उपरखणी स्त्री. घराची माडी, मजला.

उपरगुढी वर, उंच उभारलेली गुढी : 'फडफडिती उपरगुढिआं । फूजितीं वाघवडाइआं ।।' – शिव ५२७.

उपरचा वारा (नाविक) उत्तरेकडून येणारा वारा. [उपर = उत्तर]

उपरछक्का पु. तिफाशी सोंगट्यांच्या खेळातील एक संज्ञा. सोंगटी लागायला पुरेसे दान असून अधिक सहा पडले तर त्याला म्हणतात. उदा. १६,१७,१८ इत्यादींतील सहा.

उपरछडी स्त्री. (विशेषत: पाण्यात) हवेत मारलेली कोलांटी उडी; खाली डोके वर पाय करून मारलेली उडी.

उपरटपका, उपरटप्पा, उपरठपका पु. दुसऱ्यावर उपकार केले असताना आभाराऐवजी मिळालेला दोष, निंदा, दूषण वगैरे; अयोग्य, अस्थानी, दोषारोपण.

उपरटप्पी, उपरटप्प्याचा वि. पोकळ; वायफळ; अर्थहीन व रसहीन (भाषण, गप्पा, वादविवाद).

उपरडकवळ स्त्री. उत्कर्षयुक्त आलिंगन : 'ना तरि घेताएं । उपरडकवळीं । मकरध्वजू ।' – शिव ५९७.

उपरणा, उपरणे पु. न. एकेरी पांघरावयाचे उपवस्त्र; अंगावर घेण्याचे वस्त्र; उत्तरीय. [सं. उपावरण] (वा.) **उपरणे झाडून निघणे** – १. मोकळे होणे, एखाद्या गोष्टीपासून संबंध तोडणे. २. रागाने निघून जाणे. **उपरणे झटकून मोकळे होणे** – संबंध तोडून टाकणे.

उपरत वि. पराङ्मुख; परावृत्त; बाजूला झालेला (रणापासून, भांडणापासून) : 'धांवुनि कर्ण म्हणे रे दावुं नये पृष्ठ संगरोपरतें ।' – मोद्रोण १२.३३. [सं. उप+रम्]

उपरतणे अक्रि. थांबणे; शांत होणे; स्थिर होणे : 'तया सुखासी दृष्टांत । देतां सरलें वस्तुजात । उपरतलें चित्त । ठाईंचा ठाईं ।।' – स्वादि १.२.५६. [सं. उप+रम्]

उपरतविणे, उपरतवणे अक्रि. आतले उघड करून दाखविणे; उफराटे फिरविणे; घडी उघडी करून दाखविणे; उलगडणे; उकलून दाखवणे : 'यालागीं त्याग संन्यास । पुसावेयाचें घेउनि मीस । उपरतविलें दूस । गीतेंचे तें ।।' – राज्ञा १८.८२. [सं. उत्+परा+वृत्त–वर्त]

उपरता वि. क्रिवि. १. वरचा; वरला; वरील : 'आणीकही शाखा उपरता । जिया सनकादिकनामें विख्याता ।' – ज्ञा १५.२०५. २. उलट; उफराटे; विपरीत : 'तें विसरलासि हें उपरतें । संहारूं आदरिलें ।।' – ज्ञा. ११.३८४. [सं. उपरित:]

उपरति–ती स्त्री. १. विरक्ती; वैराग्य; विषयापासून निवृत्ती; सुखाविषयी उदासीनता : 'उपरति होऊनि चित्ता । निरवधि तल्लीनता । निरंतर ।।' – ज्ञा २.१७३. २. थांबणे; बंद होणे; शांत होणे; खळ; खंड; उपरम. [सं. उप+रम्]

उपरत्न न. मुख्य नऊ महारत्नांशिवाय इतर काही कमी प्रभावी रत्ने, उदा. तोरमल, स्फटिक, काचमणी, भीष्ममणी, मुक्ता–ज्योतिरस, राजवर्त, राजमय, ब्रम्हमय, जलकांत, हंसगर्भ, विभवकर, सौभाग्यकर, विषहर, श्रीकांत, हंसमाली, कौस्तुभ, चिंतामणी, राजमणी, धूलीमरकत, भुजगेशमणी, खंज, सीमंतमणी, स्पर्शमणी, तित्तिर, शिला, कर्पूराश्मा, शक्तिचूर्णक, नीलकंठ, गरुड, परीस, केदार, स्यमंतकमणी,केयूर इत्यादी २५ मुख्य उपरत्ने व १०० किरकोळ रत्ने आहेत. एकंदर ८४ रत्नांपैकी ९ महारत्ने व बाकीची ७५ उपरत्ने समजतात. [सं.]

उपरदवडा पु. १. वाजवीपेक्षा जास्त मागणी; फाजील हाव. २. वरचढपणा; वरचष्मा; वर्चस्व : 'उगिच गाल फुगवून रूसावें, आला दिवस उपरदवडा ।' – प्रला १६२. ३.अधिकार; सत्ता; प्रभुत्व. (क्रि. करणे, घेणे, चढवणे, चालवणे, होणे, चढणे, चालणे.) ४. वाजवीपेक्षा जास्त मोबदला, मागणी; थोडे देऊन फार काढण्याची प्रवृत्ती. आवळा देऊन कोहळा काढणे. (क्रि. करणे). ५. एखाद्याचे बरे करू गेल्यास त्यात यश न येऊन याने माझे वाईट केले असा दोष (ठपका) येणे.

उपरदुवा, उपरपगडा, उपरपव, उपरपंजा पु. तिफाशी सोंगट्यांच्या खेळात मेलेली सोंगटी लावण्यापुरते दानावर उरणारे दान. उदा. – पवबारांमधील पव किंवा पगडा, दसदोवारामधील दोन किंवा दुवा, पंधरा, सोळा किंवा सतरामधील पंजा म्हणजे पाच किंवा सहा इत्यादी; दुवा, पगडा, पव, पंजा ही खेळातील दोन, एक, एक, पाच ही दाने.

उपरप्यादी स्त्री. बुद्धिबळात एका प्याद्याने शत्रूच्या राजाला शह देऊन लागलीच दुसऱ्या प्याद्याने प्यादेमात करणे. पहा : **प्यादी**

उपरबाहेरचा वारा (नाविक) वायव्य दिशेकडून येणारा वारा.

उपरम पु. १. थांबणे; बंद होणे; शेवट; विश्रांती; विराम : 'कासया जयो उपरमु ।' – गीता १.२३४२. २. शांती; विरक्ती; वैराग्य : 'केले होती वृथा श्रम । चित्ता उपरम न होतां ।।' – तुगा ३३१६. ३. आनंद; संतोष : 'ऐसा ज्याच्या नामाचा महिमा । वर्णितां देव पावलें उपरमा ।।' – हरि १६.८. [सं.]

उपरमणे अक्रि. १. थांबणे; शांत होणे; बंद होणे; स्थिर होणे. २. रममाण होणे; आनंद पावणे; संतुष्ट होणे; उपक्रीडणे; प्रफुल्लित, ताजातवाना होणे : 'उपरमोनि पाहे सुंदरी । तंव अंगीं आदळला श्रीहरी ।।' – एरूस्व ७.६३. ३. विसावणे; विरमणे : 'शिव आणि श्रीधर । त्यांचे भक्तीस उपरमति तत्पर ।।' ४. मरणे; मृत्यू पावणे. ५. लय पावणे : 'आप तेजी उपरमे ।' तसा ६३८. [सं. उप+रम्]

उपरमाडी स्त्री. घराचा वरचा मजला, माडी; उपरखण; माडीवरची माडी : 'पहाया वैदर्भी मग उपरमाडीवरि चढे ।' – सारुह ७.८४.

उपरवळ्या, उपरवाळ्या क्रिवि. १. वरून; उंच ठिकाणाहून; उंचावरून. २. वर; उंच; डोक्यावर. सं. [उपरि+वलर्नें] (वा.) **उपरवळ्या अंबट मागणे** – कारणाशिवाय दुसऱ्याच्या भानगडीत पडणे; खांद्यावर उपटसूळ घेणे; विकत श्राद्ध घेणे.

उपरवाया क्रिवि. कारणाशिवाय; जरुरीशिवाय.[सं. उपरि+वि+इ.] (वा.) **उपरवाया अंबट घेणे** – कारणाशिवाय भांडणे.

उपरवाळा पहा : **उपरवळ्या**

उपरसाल स्त्री. बाहेरची साल, कातडी, चामडी.

उपरसाळ स्त्री. एक प्रकारचे भात. [सं उपरि + शालि]

उपरसाळी, उपरसीळी स्त्री. एक औषधी वेल; गोपी, शामा, शारिवा; अनंता. पहा : **उपळंसरी**

उपरंडणे उक्रि. पालथे करणे; उपडणे; उपडे करणे. पहा : **उपरांडणे**

उपरा वि. (त्या ठिकाणाशी) संबंध नसलेला; परका; घर नसलेला; अपरिचित : 'आपण उपरा म्हणून दुसऱ्या गावात जगणार.'–फकिरा ६६.

उपरा पु. बहार; मोसम; बहर. (राजा.)

उपराउपरी क्रिवि. तातडीने; एकामागून लगेच दुसरे अशा प्रकारे; झटपट; लागलीच; ताबडतोब; तडक : 'सिंहनाद केला वीरीं । उपराउपरी धाविन्नले ।।' – एरुस्व ८.२०.

उपराग, उपरागिणी पु. स्त्री. गौण राग, रागिणी : 'राग उपराग भार्यासहित । सामगान एक करिती ।' –एवि ३६.६९.

उपराग पु. ग्रहण : 'चंद्रासि लागति कळा उपराग येतो ।'– नळ ५.[सं.]

उपराज्यपाल पु. केंद्रशासित प्रदेशाच्या कारभारावर देखरेख करण्यासाठी केंद्रसरकारने नेमलेला दुय्यम राज्यपाल. [सं.]

उपराट, उपराठ वि. उलटे : 'ना उपराठिं ज्ञानपदें । तेचि अज्ञान ।।' – राज्ञा १३.८४८. [सं. विपरीत]

उपराठणे पहा : **उफराठणे** : 'उपराठतां गेलीं प्राणें ।'–गीता २.१२६०.

उपराठा पहा : **उफराटा** : 'तो उपराठा गमे ।' – गीता १२.१३७.

उपराम पु. १. थांबणे; बंद होणे; विराम; विश्राम. पहा : **उपरम** २. संतोष; आनंद. ३. वैराग्य. [सं.]

उपराष्ट्रपति–ती पु. भारतीय संविधानाप्रमाणे राष्ट्रपतींच्या खालोखालचा, प्रसंगी त्यांची जागा घेऊ शकणारा पदाधिकारी; राज्यसभेचा पदसिद्ध सभापती. [सं.]

उपराळ वि. अधिक; फाजील; वाजवीपेक्षा जास्त.

उपराळ स्त्री. ओहळाखालची स्मशानभूमी.

उपराळणे अक्रि. भरून वाहणे (भांडे, नदी). उदा. उपराळून येणे, भरणे, चालणे.

उपराळा पु. १. खोटा आरोप; निंदानालस्ती; आळ; खोटी सबब. २. कुरापत; आगळीक; निमित्त (कज्जा, युद्ध इत्यादींना). ३.तक्रार [गो.]

उपराळा पु. १. दोन्ही बाजूंना सारखे ओझे करण्याकरिता जनावराच्या पाठीवरील एका बाजूला घातलेले (लाकडे इत्यादींचे) वजन. २. वाजवीपेक्षा अधिक सामग्री, संग्रह (माळ, द्रव्य वगैरेचा); राखून ठेवलेला जिन्नस; खर्च भागवून उरलेला माल, द्रव्य, पदार्थ इत्यादी; जरूर लागल्यास उपयोग करता येईल अशी तरतूद (दारूगोळा, सैन्य इ.). ३. ठरावीक वजनापेक्षा अधिक असलेला माल. ४. वर्चस्व; वरचढपणा (वादात, भांडणात). ५. विकत घेतलेल्या मालावर ठरलेल्या वजनापेक्षा थोडा अधिक मिळणारा माल (गुळाची ढेप, लाकडाचा गठ्ठा इत्यादींचे अधिक वजन भरते ते वाणी काही न आकारता देत असत). ६. जनावराच्या ओझ्यावर टाकलेले किरकोळ जिन्नस (काटक्या इ.); किरकोळ भरती. ७. भरपाई; वजावट; मोबदला. (क्रि. करणे.) : 'कच्च्या गड्यास कांहीं टोल्यांचा किंवा वद्यांचा उपराळा द्यावा.' – कुबडी चेंडू (बडोदे) १७. ८. एखादा जिन्नस वजन करताना दुसऱ्या पारड्यात घातलेले वजन, दडपण. ९. (ल.) आटापीट; खटाटोप : 'ब्रह्मसूत्राची भार–दोरी गळां । मंत्रोपदेश भिक्षेचा सोहळा । लेहण्यावाचण्याचा उपराळा । पोट भरावयाकारणें ।।' – स्वादि ३.३.१०.

उपराळा पु. साहाय्य; मदत; कुमक : 'आणि स्वामीसही परम असाध्य होऊन त्याचा उपराळा ताम्राकडून होणार ।' – मराआ.

उपराळे करणे सक्रि. धाड आणणे, घालणे : ' .... आणि घर वगैरे जिंदगीवर उपराळे केले.' – पेद ४४.१४.

उपरांडणे उक्रि. पालथे करणे; सांडणे; पाडणे; उलथून पाडणे (गाडा, गलबत इत्यादी).

उपरांत, उपरांतिक क्रिवि. १. नंतर; मागाहून : 'तो मजकूर वाचल्याच्या उपरांतहि त्याची वरील रंगेल वृत्ति जर तशीच कायम राहिली तर या गोष्टीबद्दल त्याची मोठी तारीफ करणें रास्त होईल.' – निमा ६२४. शअ. शिवाय; आणखी; वर : 'बस्स! उपरांत नाहीं. अगदीं हरा शिवा!' – भा ४. [सं. उपरि]

उपरि शअ. पहा : **उपर, उपरी.** १. वरती; वरच्या बाजूस : 'उपरि सकंटक साचे परंतु सांचे जयांत सुरसाचे ।' – नळ ३५. २. वर. ३. यानंतर; यावर; अधिक; याशिवाय; जास्त; पुढील. विशेषत: एतत् किंवा तत् लागून प्रयोग. उदा. एतदुपरि; तदुपरि.
वि. उत्तर; पुढील : 'यज्ञवैभव खंडाच्या उपरिभागांत आरंभीचे अध्याय एक ते बारा पर्यंत ब्रह्मगीता.' – गीर ४. [सं.]

उपरिचिठ्ठी स्त्री. १. निरनिराळ्या विषयांचे कागदपत्र एकत्र पाठवावयाचे असतील तर त्यातील विषयांची साधारण कल्पना येण्यासाठी त्यांचा निर्देश करणारे त्याच्यावर लावलेले एक छोटे टिपण. २. (अर्थ.) विमेदाराला विमापत्राचा, ते तयार होत असतानाच्या काळात लाभ मिळावा म्हणून दिलेली तात्पुरती विमाचिठ्ठी.

उपरितन वि. वरचा. [सं.]

उपरिनामित, उपरिनिर्दिष्ट वि. वर उल्लेखिलेला. [सं.]

उपरिनिवासी वि. अन्य वनस्पतीच्या आधारा ने वाढणारी. (वनस्पती)

उपरिपत्र न. मुख्य मजकुराबरोबर पाठवले जाणारे स्पष्टीकरणात्मक, परिचयात्मक पत्र. [सं.]

उपरिभूमि–मी स्त्री. १. उंचावर असलेली जागा, जमीन (माडीवरील, डोंगरावरील). २. वरची खोली. [सं.]

उपरी वि. १. गावात जमीन, वतन नाही असा; मिरासदार नसणारा; तात्पुरता राहणारा; स्वत :ची मालकी नाही अशा जागी राहणारा. २. (ल.) उडाणटप्पू; संबंध नसलेला : 'एखादा उपरी पोर धरून आणून स्वर्गाचे दरवाजे मोकळे करून घेतल्याचे सुख मानून घ्यावयाचें' – लोटिकेले ४.१८. ३. खंडाने, मोलाने जमीन करणारा; खंडेकरी; खेडूत. थलकरी याच्या उलट. ४. वरिष्ठ; वरचा : 'चित्त्यास शिकारीचे सवईसाठीं उपरी अधिकाऱ्याच्या परवानगीनें नेणें.'–चिमा (बडोदे) २८.
क्रिवि. नंतर; पुढे; वर. पहा : **उपरि** : 'उपरी बोले रामललना ।' – रावि २०.१३९. (पत्रांतून) आशीर्वाद उपरी, विनंती उपरी इ.

उपरी पु. स्त्री.ओटा : 'मग गोसावी उपरीयेवरि पहुडू स्वीकारीला.' – लीच १.४. माडी : 'मग ते सप्तखणांची उपरी । तेथें ठेविली राये कुमरी ।।' – कथा १.६.३५.

उपरुद्ध वि. अडथळा केलेला; प्रतिबंध केलेला; अडवलेला.[सं. उप+रुध्]

उपरू वि. उपरी; श्रेष्ठ : 'तो गोडिया घे उपरू ब्रह्मविद्येतें ।'–उगी ७९५.

उपरे क्रिवि. आधिक्याने; श्रेष्ठत्वात : 'एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें । परि इंद्रही सरी न लाहे उपरें ।' – ज्ञा ९.४५२.

उपरे न. (कासार व्यय.) जोडाच्या भांड्याचा वरचा भाग. [सं. उपरि]

उपरोध पु. १. व्याजोक्तीचे छद्मी भाषण; मर्मी लागेल असे भाषण; टोचून

बोलणे; आडून, घालूनपाडून बोलणे : 'उपरोधु जी सन्मुख । तुजसीं करूं।' – ज्ञा ११.५४३. २. प्रतिबंध; अडथळा; अडचण; जुलूम; त्रास : 'हेंही उपरोधें करणें । तरी आर्तभय हरणें ।' – ज्ञा १३.२८९. ३. भीड; संकोच; भीती; शंका; चोरी : 'तुका म्हणे अहो रखुमाईच्या वरा । उपरोध कां धरा माझा आतां ।' – तुगा १२४३. ४. आग्रह; हट्ट : 'बालक स्तनपानीं उपरोधु करी ।' – ज्ञा ११.७९. [सं.]

उपरोधिक, उपरोधी वि. छद्मी; व्याजोक्तीचे; निंदागर्भ; उपरोधपूर्ण; वरमण्यासारखे (भाषण, लेख). [सं.औपचारिक]

उपरोधिक वि. उपरी अधिक; यापेक्षा अधिक : 'पुढेहि सर्व प्रकारे आश्रा आपलाच आहे. उपरोधिक ल्याहावेसें नाही.' – पेदभा २९.२३७.

उपर्जन, उपर्जना स्त्री. जमिनीची, संपत्तीची, मालमत्तेची वाढ; उत्कर्ष; भरभराट : 'पंच विषयवासना । अनुक्रमें वर्ते नाना । तेथें स्थूल देह उपर्जना । कारण होय ।' – सिंस १.१५६. (को.)[सं. उप+अर्जव]

उपल पु. दगड; रत्न; उत्पल. [सं.]

उपल पु. झरा; झिरपा; उमाळा.

उपलखणे सक्रि. कळणे, जाणवणे : 'आपुले आपणेयां उपलखति ना ।' लीचउ १९१.

उपलग वि. उपयोगी. [सं.]

उपलगू वि. उपरी; तात्पुरता : 'अलीकडे उपलगुं खोत पांचसात झाले नेहमी खोत वतनदार नाहीं.' – आठइति ६६. [सं. उप+लग्]

उपलट न. १. घाई; गडबड : 'आजपर्यंत अशीं लग्नं झालेलीं असतील पण तीं इतक्या उपलटानं झालेली नाहींत.' – झांकली मूठ ६०. २. उपद्व्याप; भानगड.

उपलप्रक्षेप पु. १. दगडमार; धोंडमार. २. (ल.) प्रतिपक्षावर मुद्दे किंवा प्रमेयांचा भडिमार करून त्यास गोंधळून टाकणे; काही बऱ्यावाईट युक्त्यांनी खंडन करणे. ३. आपला पराभव होत असताना प्रतिपक्षावर जोरजोराने तुटून पडून, असंबद्ध भाषणे करून आपला पराभव लपविण्याचा प्रयत्न करणे. ४. खोटा आरोप करणे; आळ घालणे; अपशब्द बोलणे. [सं.]

उपलब्ध वि. सापडलेले; मिळालेले; प्राप्त; अर्जित; मिळण्याजोगा; मिळण्यासारखा. [सं.]

उपलब्धता स्त्री. (अर्थ.) वस्तू किंवा पदार्थ मिळण्याची शक्यता; वस्तू मिळण्याजोग्या असणे. [सं.]

उपलब्धि–ब्धी स्त्री. १. प्राप्ती; अर्जन; हस्तगत होणे; स्वाधीन होणे. २. ज्ञान; जाणकारी; गोचरता; इंद्रियापासून मिळालेले ज्ञान; माणसाच्या स्वाधीन असलेले ज्ञान. ३. अस्तित्व; प्रत्यक्षता. [सं.]

उपलभणे, उपलंभणे अक्रि. प्राप्त होणे; मिळणे : 'परी देहाचें मोटकें उभें । आणि चेतना तेथ उपलभे ।' – ज्ञा १५.३७३. [सं. उप+लभ्]

उपलभ्य, उपलभ्यमान वि. १. उपलब्ध असलेले; प्राप्त होण्यासारखे; जिवंत; हयात; ज्ञात; चालू. २. साठणारे; लाभणारे; प्राप्त होणारे; फायद्या–नफ्यासारखे मिळणारे. [सं.]

उपलवण न. मिष्ट, रुचकर पदार्थ; पक्वान्न : 'नवरसांची उपलवण ।' – विपू १.१६. [सं.]

उपलवणी स्त्री. विस्तार; वर्णन : 'म्हणोनि इया वाहणी केली म्यां उपलवणी ।' – ज्ञा १३.८५३.

उपलवणे, उपलविणे उक्रि. १. प्रसार, विस्तार करणे : 'मौक्तिकांचिआं वेलीं फुललियां । कीं क्षीरसागरां लहरी उपलवलियां ।' – शिव ५९२. २. विवेचन; विस्तार; व्याख्यान, वर्णन करणे : 'हेचि आनिभ्रांति । प्रमेय उपलवूं पुढती । परी तूं प्रतीती । याची घे पां ।।' – ज्ञा १४.८६. ३. फुलणे; उकलणे; फुलवणे; विकास करणे : 'जैसी चंद्रमयाची घडी उपलविती ।।' – ज्ञा ११.२२३. ४. उघड करणे; व्यक्त करणे : 'तेथें जाणो कोटी सूर्य घडीं । उपलविली चोखडी । तैसी तेजपरवडी । श्यामांग चतुर्भुज ।' – स्वादि १०.३.१३. ५. प्रसन्न होणे : 'तेणें हरिखें आतां उपलवला । निरूपील ।।' – ज्ञा ६.४८८. [सं. उत्+प्लु]

उपलक्षण न. १. (सास.) लक्षणा; अंशावरून संपूर्णांचा, व्यक्तीवरून वर्गाचा व वर्गावरून जातीचा निर्देश करणे. २. दृष्टान्तपर भाषण; तुलना : 'तें दीपाचें उपलक्षण । निर्वातींचिया ।।' – ज्ञा ६.३५८. ३. तात्पुरता संबंधाच्या आधारे ओळख, निर्देश. उदा. 'कावळा बसला आहे ते घर.'

उपलक्षणात्मक वि. औपचारिक; दिग्दर्शक; निमित्तमात्र; लाक्षणिक. प्रत्यक्ष कृती न करता हेतू उघड करण्याइतकीच कृती करण्यापुरता : 'उपलक्षणात्मक सत्याग्रह करणारांची मुक्तता करण्यास हरकत नाही.' – केले ८.१२.४१. [सं.]

उपलक्षणे उक्रि. मनात धरून, हेतू–उद्देश धरून बोलणे; रोख ठेवून बोलणे; अर्थ असणे.

उपलक्षित वि. अप्रत्यक्षपणे सुचवलेला; रूपकाने किंवा उपलक्षणाने सांगितलेला. वक्रोक्तीने सांगितलेले, संकल्पित. [सं.]

उपलक्ष्य वि. अनुमेय; संकल्पित; गर्भितार्थ काढण्याजोगे; गृहीत मानण्यासारखे. [सं.]

उपला, उपली पु. शेणी, गोवरी. (हिं.) [सं.]

उपला पु. नवा पाक्षिक वायदा. पहा : **उपेता**

उपलाण, उपलाणा, उपलाणी, उपलाणू वि. खोगीर, जीन न घातलेला (घोडा) : 'कीं जीव नृपाचे वारु उपलाणें ।' – ज्ञा १८.४६४; 'जैसे वारू उपलाणी । वश्य करी अश्वसाहणी ।' – एभा २०.२१६. [सं. उत्+पर्याण = घोड्याचा साज, खोगीर] (वा.) **उपलाण बसणे –** खोगीर; जीनाखेरीज घोड्यावर बसणे : 'एक उपलाणी बैसले । पायबंद सोडूं विसरले । तेणें गुंतोनि खालीं पडिलें । पायबंद बसती पाठीवरी ।।' – जै ७६.६०.

उपलाणणे उपलवणे; खाली उडी मारणे. [सं. अत्प्लवन्]

उपलाणी क्रिवि. वरवर : 'पंत उपलाणी हसत म्हणाले.' – फकिरा १४६.

उपलाणी वि. १. उपरा; बाहेरचा; थोडा वेळ राहणारा; वाटेल तेव्हा वाटेल त्या गावी जाणारा : 'जे फिरस्ते नेमलेल्या गावी वहिवाटीप्रमाणे न येता वाटेल तेथे भटकतात, त्यांना आपण उपलाणी म्हणू.' – गांगा ८१. २. बिनआधारी. (व.)

उपलाणे, उपलाने न. बिनीचे घोडदळ; घोडेस्वार; बिनी. पहा : **हुलसार, हुलस्वार.** : 'धाडुनी इंद्रियांचे उपलाणें । विषयाचे घाली

घालणें । होठेशी ब्रम्हचर्यातें जिणें । पाचारूनि ।।' – ज्ञाप्र ७३७. [सं. उत्+पर्याण = खोगीर]

उपलाशे वि. उपरी; पूर्ण लाभ न मिळणारे. (गो.)

उपलिप्त वि. लेप केलेला; लावलेला; फासलेला; माखलेला; सारवलेला; लपेटलेला. [सं. उप+लिप्]

उपलेप, उपलेपन पु. न. १. चोळणे; माखणे; लावणे; फासणे; लेप करणे. २. लेप; गिलावा; गिलाव्याचा पदार्थ.

उपवक्ता पु. मुख्य वक्त्यानंतर बोलणारा वक्ता. [सं.]

उपवड, उपवढ स्त्री. जाग; जागृती : 'नाना उपवढ होतां खेंवो । नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो ।' – ज्ञा १५.२६४.

उपवढणे अक्रि. जागे होणे : 'नोहे हर्षशोकांसि कारण । उपवढलिया जाण । जिया परी ।।' – ज्ञा १५.२९४. [का. उप्पवडिसु]

उपवणे अक्रि. तरंगणे; पोहणे : 'एयाचें आसन अंतरक्ष उपवत असे.' – लीच २.१६.

उपवणे अक्रि. नाहीसा होणे; गुप्त होणे. (व.) [सं. उत्+प्लु=उडणे]

उपवधू वि. विवाहयोग्य (तरुण) : 'जस्टीस शहांचा एखादा मुलगा उपवधू असेल.' – दौ ११.

उपवन न. उद्यान; बगीचा. २.(ल.) रमणीय स्थान. [सं.]

उपवर वि. १. लग्नास योग्य वयाची; विवाहास योग्य (मुलगी) : 'उपवर परी उपायचि नाहीं ।' – रामदासी २.१३६. २. विवाहाचा सामान्य काल अतिक्रमून विवाह न होता राहिलेली. (मुलगी). ३. ऋतुप्राप्त झालेली : 'पैठणांत पत्नी जाली उपवर ।' – रामदासी २.७४. ४. संभोगक्षम : 'राधिकेचा मानस जाणून उपवर झाला सखा ।' – पला २. [सं. उप+वृ]

उपवर्ण पु. ध्वनिविचारात एकाच ध्वनीच्या परिस्थितीनुसार होणाऱ्या वेगवेगळ्या रूपांपैकी प्रत्येक. [सं.]

उपवर्धी वि. वाढणारा; वृद्धिजनक; भर पडून वाढणारा. [सं.]

उपवस्त्र न. १. मुख्य पोषाखावर घ्यायचे वस्त्र; उपरणे; पांघरायचे वस्त्र. २. (ल.) रखेली; राख; अंगवस्त्र.[सं. उप+वस्=आच्छादन करणे]

उपवाणिज्यदूत पु. परराष्ट्रात राहणाऱ्या आपल्या प्रजाजनांचे हित पाहण्यासाठी एखाद्या राष्ट्राने नेमलेल्या अधिकाऱ्याचा मदतनीस.

उपवंश पु. (समाज.) दोन निरनिराळ्या वंशांच्या संकरांतून निर्माण झालेली एक नवी शाखा; वंशाचा एक पोटविभाग. [सं.]

उपवारा पु. उकाडा; उबारा : 'रंगमाहालीं होतो उपवारा । कोणी प्रियकर आणवा राजेंद्राचा थारा ।' – पला ४.२६.

उपवास पु. (यज्ञभूमीजवळ, यज्ञारंभाच्या पूर्वीच्या दिवशी सायंकाळी जाऊन व्रतस्थ राहणे हा मूळ अर्थ यावरून) संबंध दिवस (अहोरात्र) भोजन न करणे; उपोषण; लंघन; अन्ननिवृत्ती; भोजनाभाव; निरशन. अर्ध्या दिवसाच्या निरशनालाही हा शब्द लावतात. उदा. सोमवार – शनवारचा उपवास. [सं. उप+वस्]

उपवासी वि. १. उपास केलेला; उपोषण केलेला. २. भोजन न केलेला; उपाशी राहिलेला. (वा.) **उपवासी मरणे** – भुकेने व्याकूळ होणे; भुकेने आसन्नमरण होणे : 'वाटे जातां घडी घडी । पाहे पोह्यांची गाठोडी । मनांत म्हणें घरीं बाळें रोकडीं । उपवासी मरतील ।।' – हरि २९.६१. [सं. उपवास]

उपविद्या स्त्री. ब्रह्म ज्ञानविरहित इतर भौतिक विद्या, ज्ञान; भौतिक शास्त्र; ईश्वर, धर्मशास्त्र या विरहित; व्यावहारिक ज्ञान. [सं.]

उपविधि–धी पु. (कायदा) १. पोटकायदा; मुख्य कायद्याला जोडून असणारे नियम. २. स्थानिक प्राधिकरणाने केलेली नियमावली.[सं.]

उपविष न. विषाचा एक गौण प्रकार. रुईचा चीक, त्रिधारी निवडुंगाचा चीक, कळलावी, कन्हेर, गुंज, अफू, धोतरा या सात उपविषाच्या जाती होत. [सं.]

उपविष्ट वि. (सामा.) १.बसलेला; स्थापन झालेला; आलेला; दाखल झालेला. २. जवळ, शेजारी बसलेला. [सं. उप+विश्]

उपवीख न. विषावरील उतारा : 'महात्मेनि वीख घेतले । मग तेयासि लोके उपवीख केले.' – लीचउ ३३.

उपवीत न. त्रैवर्णिकाने वापरावयाचे यज्ञोपवीत; जानवे. [सं. उप+वे = विणणे].

उपवृक्कि स्त्री. प्राण्याच्या शरीरातील नलिकारहित ग्रंथीतून निघणारा, रुधिराभिसरण व स्नायूंचे चलन वलन यांवर परिणाम करणारा स्राव.

उपवेद पु. मुख्य चार वेदाशिवाय इतर गौण वेद. जसे : – ऋग्वेदाचा आयुर्वेद (काहींच्या मते अथर्ववेदाचा); यजुर्वेदाचा धनुर्वेद; सामवेदाचा गांधर्ववेद; अथर्ववेदाचा स्थापत्यवेद, शिल्पशास्त्र. [सं.]

उपवेश, उपवेशन पु. १. (सामा.) बसणे; बसलेपणाची स्थिती. २. जवळ बसणे. [सं.]

उपवेसन न. अन्नत्याग : 'म्हणौनि मी उपवेसनी बैसला ।' – पंचो २४.२२.

उपव्यवसाय पु. मुख्य व्यवसायाव्यतिरिक्त असलेला इतर दुय्यम व्यवसाय; जोड व्यवसाय. [सं.]

उपव्याधि–धी स्त्री. (वै.) प्रमुख आजाराबरोबर उत्पन्न झालेले इतर विकार; एखाद्या मोठ्या रोगाने शरीर कमकुवत झाल्यामुळे होणारे आनुषंगिक विकार. [सं.]

उपशब्द पु. शब्दाचा अर्थ विशद, विस्तृत करण्याकरिता तत्सदृश किंवा त्याच अर्थी जो दुसरा शब्द, प्रतिशब्द जोडतात तो. उदा. पोथी–पुस्तक, लाकूड– फाटा, गवत–काडी, भाकरी–बिकरी वगैरे. [सं.]

उपशम पु. १. उतरणे; कमी होणे. २. मंदावणे; ओसरणे; शांत होणे. ३. घट; सूट. [सं. उप+शम्]

उपशम, उपशांति–ती पु. स्त्री. १. शांती; निग्रह; लय; शेवट : 'जितया मान मोडिली । उपशमाची ।।' – ज्ञा ३.२५२. २. विराम; थांबणे : 'मागेन उपशम व्याधीचा ।' –गुच २.२१३; 'मायेशीं होय उपशांति । केवळ उरे ज्ञाप्ति ।' ३. नाश : 'आपणावर येणाऱ्या संकटांचा उपशम केवळ स्वतंत्रतेनें होत नाहीं ...' – इंमू ३१०. [सं. उप+शम्]

उपशमणे अक्रि. शांत करणे; नाहीसे होणे : 'जो शरीरभावातें उपशमी । तो अधियज्ञु एथ गा मी ।' – ज्ञा ८.३७. [सं. उप+शम्]

उपशमन न. १. शांती; उतार; कमी होणे; उपशम. पहा : **उपशम** : 'दावितसे स्फोटकासी । म्हणे उपशमन केवी होय ।' – गुच ५०.५५. २. उतार पाडणारे, शांत करणारे औषध; उतारा; इलाज;

तोडगा : ‘महादेव तमोगुण । त्या तमांसि उपशमन । तुझीये चरणींचे रज जाण ।।’ – एरुस्व ४.५३. [सं.]

उपशामक वि. वेदना कमी करणारा; दाह शांत करणारा; मानसिक त्रास कमी करणारा. [सं. उपशम]

उपशास्त्र न. न्यायमीमांसादी षट्शास्त्राहून इतर दुय्यम दर्जाची गायन, वैद्यक वगैरे शास्त्रे किंवा त्यावरील प्रत्येक ग्रंथ. [सं.]

उपशांत वि. शांत झालेला; थंड झालेला : ‘तया स्वांत: करणाजता । सकळकामोपशांता ।’ – ज्ञा ६.८१. [सं.]

उपशांति–ती पहा : **उपशम** [सं.]

उपशिक्षक पु. १. शिक्षकाने आपल्या साहाय्याकरिता, शिक्षणाचे काम करण्याकरिता अगर विद्यार्थ्यांवर नजर ठेवण्याकरिता हाताशी घेतलेला वरच्या वर्गातील हुशार विद्यार्थी; उपगुरू; मालचाट्या. २. दुय्यम शिक्षक; सहायक शिक्षक. [सं.]

उपशीर्ष न. अर्थसंकल्पातील दुय्यम शीर्ष; पोटशीर्ष; पोटसदर. [सं.]

उपशीर्षक न. १. (ग्रंथ.) ग्रंथाच्या मुख्य नावाव्यतिरिक्त त्यातील विषयाचे स्पष्टीकरण देणारे नाव. २. दुय्यम, पोटमथळा.

उपशीर्षदंड पु. (स्था.) दरवाजा व खिडकी यांच्यावरचे आडवे लाकूड.

उपश्रुत स्त्री.वर्तमान; बातमी; बोलवा : ‘...... त्यांची पूर्णाहुती अर्थानिशी प्राणानिशी होणार याप्रमाणें उपश्रुत निघाली, ती लिहीली आहे.’ – ऐलेसं ७९३०.

उपश्रुति–ती स्त्री. १.परोक्ष किंवा भवितव्यातील गोष्टीविषयी प्रश्न पाहण्याकरिता रात्री चांभार, परीट इ. च्या घराजवळ जाऊन उभे राहिले असता आतून साहजिक निघालेला बरावाईट शब्द. असा शब्द आपल्या गोष्टींवर प्रकाश पाडतो अशी मानण्याची पद्धती, पडताळा. २. आपल्या प्रस्तुत गोष्टीसंबंधी एखाद्या अप्रस्तुत व्यक्तीच्या मुखातून सहज निघणारा बरावाईट शब्द आपल्याकडे लावून घेणे. ३. सांगोवांगी, कर्णोपकर्णी आलेली देशांतराची अनिष्ट बातमी (भविष्यकालीन किंवा वर्तमानकालीन वाईट गोष्टीची). ४. जनवार्ता; वदंता; भुमका. [सं. उप+श्रु = ऐकणे]

उपश्लिष्ट वि. शेजारी ठेवलेला; जवळ असलेला; संसर्ग असलेला; चिकटलेला; उपश्लेष असलेला. [सं. उप+श्लिष्]

उपश्लेष पु. सान्निध्य; जवळ असण्याची स्थिती; जवळपणा.

उपष्टंभ पु. पाया; आधार; निमित्त; आश्रय. [सं. उप+स्तंभ्]

उपष्टंभक वि. आधार, धीर देणारा; आश्रय देणारा; साहाय्य करणारा; सावरणारा; हात देणारा. [सं.]

उपष्टीव क्रिवि. विनाकारण; बिनआधारी. (व.)

उपसण, उपसणी, उपसणे, उपसा, उपसाभर क्रिवि. उपसाउपसी वगैरे वर्णव्यत्यासाने उपसण इत्यादी शब्दापासून हे शब्द साधले आहेत. पहा : **उसपणे**

उपसपंप पु. द्रवपदार्थ बाहेर उपसून काढणारे उपकरण (डब्यातले घासलेट, विहिरीतील पाणी इ.) : ‘डब्यातील घासलेट उपसण्याचा पंप, विहिरीतून पाणी वर खेचण्याचा पंप हे सर्व उपसपंप होत.’ – विप्र १५३.

उपसभापति–ती पु. सभापतीच्या अनुपस्थितीत सभापतीचे काम पाहणारी व्यक्ती. [सं.]

उपसमीप क्रिवि. जवळ; सन्निध; शेजारी : ‘चित्त जो उपसमीपचि वासी । राघवीं करील तो उपवासी ।’. [सं.]

उपसरण न. जवळ येणे; शेजारी येणे; पुढे सरणे. [सं. उप+सृ]

उपसरणे न. क्रि. च्या जवळ किंवा पुढे जाणे.

उपसर्ग पु. १. उपद्रव; त्रास; पीडा; विघ्न; उपाधी : ‘तेथें दैत्यीं उपसर्ग केला लोकां । रचिली द्वारका तुका म्हणे ।’ – तुगा ९९. २. दुश्चिन्ह; अनिष्टसूचक गोष्ट (उत्पात, उल्कापात इ.). [सं. उप+सृज्]

उपसर्ग पु. १. (व्या.) शब्दांच्या मागे लागणारे अव्यय; उपपद. उदा. अति, अनु, उप, परा, प्रति, सम् इत्यादी. [सं.]

उपसर्पण न. जवळ येणे; जाणे; सान्निध्य; आगमन : ‘धनालागी नीचसेवन । उपसर्पण हीनाचे ।।’ – एरुस्व १३.३१. [सं. उप+सृप्]

उपसवे क्रिवि. जवळ; सन्निध : ‘आपण बैसे उपसवें नेटी’ – नव १६.४०.

उपसळा वि. खोडकर; त्रासदायक; उपद्रव देणारे; वाईट वर्तनाचे (मूल वगैरे). [सं. उप+शल्य]

उपसळी पु. १. उपसर्ग; त्रास; उपद्रव; उद्वेग (उंदीर, मांजर, कुत्रा वगैरेपासून होणारा). २. कटकट; त्रास (मुले वगैरेंचा); छळवाद; सतावणी. (क्रि. आणणे, देणे). [सं. उप+शल्य]

उपसंजाति स्त्री. (विधी.) उपस्थिती, हजर होणे.

उपसंपादक पु. वृत्तपत्राच्या संपादकीय विभागात काम करणारा कर्मचारी; संपादनाची जबाबदारी उचलणारा संपादकाहून कनिष्ठ दर्जाचा सहायक. उदा. – संपादक, कार्यकारी संपादक, सहसंपादक, उपसंपादक, सहायक संपादक इ. [सं.]

उपसंहरणे अक्रि. शांत होणे; ओसरणे; लोपणे; नाश पावणे; संपणे : ‘तो घोष तरी उपसंहरला ।।’ – ज्ञा १.१६१. [सं. उप+सम्+हृ]

उपसंहार पु. १. संकोच; एकत्रीकरण; गुंडाळणे; आटपणे; आवरणे : ‘प्रपंचाचा उपसंहार होय तेथें आत्यंतिक।’ २. सारांश; शेवट; समाप्ती. ३. ग्रंथाचा अखेरचा भाग; शेवटचे शब्द; सिंहावलोकन : ‘ग्रंथाचे तात्पर्य काढणे असल्यास (एकंदर) सात गोष्टी साधनभूत असून ... पैकीं उपक्रमोपसंहारौ म्हणजे ग्रंथाचा आरंभ आणि शेवट या पहिल्या दोन गोष्टी होत.’ – गीर २१. [सं.]

उपसंहार पु. पारिपत्य; नाश : ‘त्यांचा उपसंहार करोन मग कूच करणार.’ – ऐलेसं ६४२९.

उपसंहृत वि. १. गुंडाळलेला; एकत्र केलेला. २. समाप्त केलेला; शेवट केलेला. [सं. उप+सम्+हृ]

उपसा पु. १. बाहेर काढणे; पाणी वर काढण्याची क्रिया : ‘विहिरींच्या पाण्याचा उपसा चार मोटा अखंड करीत होत्या.’ – श्रीयो ३.१४१. २. (पाणी, धान्य, पैसा इत्यादींच्या संचयातून) बाहेर काढण्याची क्रिया. [सं उत्सृप]

उपसागर पु. समुद्राचा जमिनीत शिरलेला मोठा व रुंद भाग; तीन बाजूंनी जमिनीने वेढलेला लहान समुद्र. उदा. बंगालचा उपसागर.

उपसाण, उबसाण स्त्री. कुबट वास; कुजकी घाण. (क्रि. येणे, पडणे). (को.) [क. उब्बे = वाफ, उष्णता]

उपसातुपसी स्त्री. १. वर्दळीवर येऊन आवेशाने म्यानातून तलवारी बाहेर

काढणे; वर्दळीवर येणे; हमरीतुमरी. २. रिकामे करणे; बाहेर काढणे. [उपसणेचे द्वि.]

उपसाभर स्त्री. घरातील कष्टाची कामे : 'मी .... येथील संसाराची उपसाभर करीन.' – माआ ५१.

उपसामग्री, उपसाहित्य स्त्री. न. किरकोळ उपकरणे; सामान; साहित्य; सामग्री; द्रव्य वगैरे : 'करावया बैसला हवन । तेथे उपसामग्री आणून । जगन्माता देत असे ।।'; स्वयंपाकातील उपसाहित्य म्हणजे मीठ, मिरची,हिंग इत्यादी साहित्य. [सं.]

उपसामी वि. साधू; विरक्त : 'येरू उपसामीयांचा रावो ।।' – उषा १४३५. [सं. उपशमी]

उपसारणिक (ग.) दोन मापांतील किंवा दोन सटांतील कनिष्ठ भाग.

उपसारा पु. १. वाटेल तिकडे संचार; मोकळे, स्वैर वावरणे. २. प्रशस्त जागा; मोकळी जागा. [सं. उप+सृ=सर]

उपसारा पु. १. घरातील किरकोळ सामान, अडगळ वगैरे; प्रवासाची सामग्री, जिनसा : 'गवत, लाकूडफाटे यास उपसाऱ्यास जागा करू.' – पेठे दप्तर १.८. २. किरकोळ कामे; बारीकसारीक कामे; अडकामे.

उपसारिणी स्त्री. मुख्य वाहिनीला जोडलेल्या नळ्या (उपवाहिन्या).

उपसावणे, उपसाहणे उक्रि. सोसणे; सहन करणे; पोटात घालणे; क्षमा करणे : 'परि जाणतां उपसाहावे । बोलांचे पाणिपद निहाळावें ।।' – शिव ३६५. [सं. उप+सह्]

उपसाह पु. सहन करण्याची क्रिया.

उपसाहित्य न. लागलागवड; अवांतर किरकोळ लागणारे सामान : '... त्याचे उपसाहित्य देखील द्यावे लागते.' – पेद १७.४. [सं.]

उपसिद्धांत पु. एक गोष्ट केल्याने आपोआप सिद्ध होणारी दुसरी गोष्ट : '(भूमितीमधील) एखादा उपसिद्धान्त सोडविण्यास वेळ लागला तर ....' – कुंडली ६९. [सं.]

उपसिलिक वि. ज्यामध्ये मध्यम प्रमाणात सिलिका आहे असा (खडक).

उपसूचक पु. सभेपुढे आणलेल्या ठरावामध्ये काही फेरफार सुचवणारा; उपसूचना मांडणारा; किरकोळ सूचना करणारा. [सं.]

उपसूचना स्त्री. सभेमध्ये चर्चा चाललेल्या विषयावरील मूळ ठरावात दुरुस्ती, फेरफार किंवा तहकुबीसंबंधी मांडलेला प्रस्ताव. [सं]

उपसूत्र न. (ग्रंथ.) ग्रंथालयातील वर्गीकरण आणि तालिकीकरणाचे पोटनियम.

उपसृष्टि–ष्टी स्त्री. (प्राणिवर्ग, वनस्पतिवर्ग यांची) उपकोटी. [सं.]

उपसेचन न. तोंडी लावणे; तोंडी लावण्याचे साधन; पक्वान्न रुचकर करणारी वस्तू (चटणी, मसाला वगैरे) : 'उपसेचन म्हणिजे साधन । तें तोंडीं लावितां अन्न गिळे ।।' – यथादी ११.४१८. [सं. उप+सिच्]

उपस्कर पु. १. एखादे कार्य पूर्ण करण्याकरिता लागणारे साहित्य, वस्तू, पदार्थ; साधन; बाब; अवश्य नसलेली पण उपयोगी अगर शोभा, सौंदर्य वाढवणारी वस्तू. २. तोंडी लावण्याचा पदार्थ; मसाला; मिसळण; व्यंजन. ३. गृहकृत्यास उपयोगी पडणारी कोणतीही वस्तू (सूप, केरसुणी, मुसळ इ.); साधन; साहित्य. [सं.]

उपस्कारपत्र न. (ग्रंथ.) ग्रंथालयात वाचनसाहित्य (ग्रंथ, हस्तलिखिते इत्यादी) आल्यानंतर त्यावर काही संस्कार, प्रक्रिया कराव्या लागतात. उदा. शिक्के मारणे, पाने कापणे, सूचिलेखन, वर्गीकरण इत्यादी. या सर्वांची नोंद ठेवायचे प्रक्रियापत्र.

उपस्तरण न.(याज्ञिक) स्रुव्यात किंवा हवन करायच्या पात्रात होमद्रव्य घेण्यापूर्वी त्या पात्रात दर्वीने तूप घालणे. [सं.]

उपस्त्री स्त्री. रखेली; राख; अंगवस्त्र. [सं.]

उपस्त्रीत्व न. (समाज.) एखाद्या पुरुषाजवळ लग्नाशिवाय स्त्रीने राहणे, संबंध ठेवणे. [सं.]

उपस्थ पु. न. १. स्त्री किंवा पुरुष यांचे जननेंद्रिय; लिंग; योनी; मैथुनेंद्रिय; पंचकर्मेंद्रियांपैकी एक. २. रथामध्ये सारथ्याने बसायची जागा; गाडीवान बसण्याची जागा.
वि. जवळचा; शेजारचा. [सं. उप+स्था]

उपस्थनिग्रह पु. संभोग, मैथुन न करणे; विषयोपभोगापासून अलिप्तता; ब्रह्मचर्य; विषयनिवृत्ती; असिधाराव्रत. [सं.]

उपस्थान न. १. प्रार्थनेचा एक प्रकार; गूढार्थक मंत्राने उपासना, प्रार्थना. २. असे गूढ मंत्र, स्तोत्र. ३. उभे राहून हात जोडून, मंत्र पठण करून देवतांची स्तुती करणे. [सं.]

उपस्थान न. १. उठणे; वर येणे; उद्भवणे; उत्पन्न होणे. २. घडून येणे; घडणे (कर्म, व्यवहार इत्यादी). [सं.]

उपस्थापक पु. सामुग्रीप्रमुख.

उपस्थापन न. १. उपस्थित करणे; जवळ आणणे; उभे करणे; घडवून आणणे; उत्पन्न करणे; बनाव बनवणे. २. पूजा; सेवा. [सं.]

उपस्थापित वि. घडलेले; झालेले; स्थापन केलेले. [सं.]

उपस्थित वि. १. उद्भवलेला; उत्पन्न केलेला; प्राप्त झालेला; पोचलेला; घडलेला (प्रसंग, गोष्ट, कर्म इ.) : 'आमच्या देशांत हजारों सभा दरवर्षी उपस्थित होतात ....' – निमा २७५. २. ज्ञात; माहीत असलेला; हयात; ताजा असलेला; मलिन न झालेला; रूढ; चालू (अभ्यास, विधी). ३. प्रत्यक्ष असलेला, आलेला; हजर.[सं. उप+स्था] (वा.) **उपस्थित होणे** – हजर असणे, येणे (सभा इत्यादीला). निर्माण होणे; उद्‌भवणे (प्रश्न इ.) **उपस्थित करणे** – निर्माण करणे; काढणे (प्रश्न इ.).

उपस्थिति रोजी हजेरीबद्दल दिलेला रोजगार.

उपस्थिति–ती स्त्री. १. जवळ असणे; हाताशी असणे; ताजे असणे; स्मरणात असणे; तयार असणे; ताजेपणा; नवेपणा; स्मरण (विद्येचे, अभ्यासाचे, शास्त्राचे) : 'वाचलेल्या ग्रंथांची उपस्थिति चांगली राहण्यास त्याचा (ग्रंथसंग्रहांचा) किती उपयोग आहे हेंही सर्वांच्या सहज लक्षांत येणार आहे.' – निमा ५१५. २. विद्यमानता; अस्तित्व; उपस्थितपणा; हजर असणे; उत्पन्न होणे; चालू असणे (प्रसंग, कार्य वगैरे). ३. मनात येणे; स्मरण होणे. [सं. उप+स्था]

उपस्नातक पु. विद्यापीठाच्या पदवीसाठी अभ्यास करणारी व्यक्ती; पदवीपरीक्षेच्या आधीची परीक्षा उत्तीर्ण झालेली व्यक्ती. [सं.]

उपहत वि. १. मारलेला; इजा, जखम झालेला; नष्ट केलेला; उद्ध्वस्त; ताडित. २. निस्तेज; हतवीर्य; पीडित; दुःखी : 'जैसा राजकुमरु पदच्युतु । सर्वथा होय उपहतु ।' – ज्ञा १.२७०. [सं. उप+हन्]

उपहति–ती, उपहंति–ती स्त्री. १. निस्तेजता; अपमान; अनादर; मानहानी : 'जैसी भातारेंहीन वनिता । उपहती पावे सर्वथा ।' – ज्ञा २.१९९. २. नाश; खालावलेली, कष्टप्रद स्थिती.

उपहमीदार पु. (अर्थ.) १. भाग, रोखे यांच्या विक्रीची हमी घेणाऱ्याचा दुय्यम अधिकारी. २. गलबताचा वगैरे विमा उतरवणाऱ्या हमीदाराचा दुय्यम अधिकारी.

उपहसित वि. ज्याचे हसे, उपहास, थट्टा फजिती झाली आहे असा; अपमानित; छी: थू: झालेला. [सं. उप+हस्]

उपहसित न. नाक फुगणे, कुटिल दृष्टी, स्पष्ट शब्द व मान हलणे यांनी युक्त असे हसणे; उपहासपूर्ण हास्य; निर्भर्त्सनायुक्त हास्य. [सं.]

उपहार पु. १. फराळाचे सामान; फराळ; भक्ष्य : 'मीचि होईन सुआरु । वोगरीन उपहारु ।' –ज्ञा १३.४२१. २. देणगी; नजराणा; बक्षीस; भेट; आहेर : 'वस्त्रें अलंकार सुमनें । नाना उपहार बलिदानें ।' – एरुस्व ६.८४. [सं. उप+आहार]

उपहारगृह पहा : **उपाहारगृह**

उपहारणे उक्रि. अर्पण करणे; देणे : 'तेंचि भस्म ईश्वरासि । उपहारावे तुम्ही हर्षी ।' – गुच ४०.८१.

उपहारसूचिपत्र (न.)भेट म्हणून आलेल्या वाचनसाहित्याची यादी.

उपहास पु. १. थट्टा; चेष्टा; फजिती; हसे; थू; निंदा; अपमान; निर्भर्त्सना : 'विरोधु वादुबळु । प्राणितापढाळु । उपहासु चाळु । वर्मस्पर्शु ।।' – ज्ञा १३.२७१. २. उपहास होतो अशी स्थिती; उपहासक्षम अवस्था, योग्यता. [सं. उप+हस्]

उपहासक वि. उपहास, थट्टा करणारा; निंदा करणारा. [सं. उप+हस्]

उपहासणे अक्रि. थट्टा, चेष्टा, निंदा, फजिती इ. करणे; हसणे; अनादर, अपमान करणे. [सं. उपहास]

उपहासास्पद वि. थट्टेचा विषय झालेला; थट्टेला पात्र. [सं.]

उपहासिका स्त्री. विनोदी कविता; व्यंगोक्तिपूर्ण कविता; कुचेष्टा, टवाळी करणारी कविता. [सं. उपहास]

उपहास्य वि. थट्टा करण्यास योग्य, पात्र; चेष्टा करण्यालायक; उपहासास्पद; निंद्य; तिरस्कार्य; त्याज्य.

न. थट्टा (उपहास अप.) : 'उपहास्य केले समर्थांचें ।' – रामदासी २.३.[सं.]

उपहास्यता स्त्री. १. (उपहास या अर्थी चुकीने) थट्टा; चेष्टा. २. (वास्तविक अर्थ) उपहासार्हता; निंदास्पदता. [सं.]

उपहित वि. १. जवळ असलेले; जवळ ठेवलेले (पदार्थ, भक्ष्य इ.) : 'जैसें कां उपहिता (अंबोण) म्हैसी खाय ।' – ज्ञा १७.१५४. २. संसर्गयुक्त; आरोपित : 'तैसें उपाधी उपहित । थोकोनि ठाके जेथ ।'– ज्ञा १५.५११. ३. उपाधियुक्त; उपाधिबद्ध. सामा. शब्द – मायोपहित (चैतन्य), घटोपहित (आकाश) : 'आणि कुटस्थु जो अक्षरु । दाविला पुरुषप्रकारु । तेणें उपहिताही आकारु । चैतन्या केला ।।' – ज्ञा १६.४३. [सं. उप+धा=ठेवणे]

उपहुड पु. जागृती; उदय : 'ऐसा उदयाचळिचा उपरवाळां । उपहुडु जाला चंद्रमंडळा । जैसी रासी जाली गगनाचा खळा । चाकोरा पीकांची ।' – नरुस्व ४९१.

उपहुडणे, उपहोडणे अक्रि. झोपेतून जागे होणे; उठणे : 'पाहातेआं पाहारा दधिमंथनीं । गौळनी गातीं श्रीचक्रपाणीं । तो ध्वनि आयकौनि श्रवणी । देओ उपहौडले ।।' – वछा ३१

[क. पवडिसु = आडवे होणे].

उपळ पु. पाषाण; दगड. पहा : **उपल** : 'जडा उपळा अवचटे । लागती श्रीचरणेशीं झटें ।' – ज्ञाप्र ४०५. [सं. उत्पल]

उपळ, उपळी, उपळण पहा : **उपळणे, उपळजमीन** स्त्री. फार पाऊस पडल्याने जागोजाग झरे फुटून पाणी बाहेर येण्यासारखी होणारी जमिनीची अवस्था. पहा : **उपळणे; उपळजमीन**

पु. १. असे जमिनीतून बाहेर येणारे झरे. २. (ल.) घोणस किंवा फुरसे चावल्यामुळे रक्त वाहू लागते ती अवस्था. ३. (व्यापक) (स्त्रियांस) विटाळ अतिशय होण्याची अवस्था; धुपणी. ४. जोराने वर येणे; उफाळणे; उत्पन्न होणे; जोर करणे (दमा, खोकला, ताप, दुखणे, रोग इ.). [सं. उद्+प्लु]

उपळजमीन स्त्री. पावसाचे पाणी अतिशय जिरल्यामुळे जिला पाझर फुटले आहेत अशी जमीन.

उपळण न. तोडगा; मंत्रतंत्र; 'मग रामभाऊकडे जाऊन उपळण टाका. त्याचा हटकून गुण येतो.' – खेस्व १७१.

उपळणे अक्रि. १. पाणी जिरून साचल्यामुळे (जमिनीतून) पाझर फुटणे; उपळी होणे. २. शरीराच्या छिद्रातून किंवा हिरड्यांतून वगैरे रक्त वाहू लागणे. ३. जमीन भिजून सैल झाल्यामुळे वर उपटून येणे; उफळणे; उपटले जाणे (झाड वगैरे).

उपळवट, उपळवटा स्त्री. १. पाणी फार जिरल्यामुळे पाझर फुटलेली जमीन; उपळ जमीन; भिजलेली, मुरलेली जमीन. २. (ल.) (विशेषत: उपळवट) चंगळ; गडगंज; समृद्धी. (क्रि. करणे, येणे, होणे).

वि. १.उपळ असणारी; ओलाव्याची; मुरलेली (जमीन). २. नेहमी पाझर असलेली (जमीन).

उपळवणी न. १. जमिनीतून वाहणाऱ्या पाझराचे उपळीचे पाणी. २. (ल.) संपत्ती, मान; सन्मान; सुख इ. (क्षणिकत्व दर्शविण्यासाठी).

उपळसरी, उपरसाळ स्त्री. आयुर्वेदातील औषधी. पहा : **अनंतमूळ** श्यामा; दुद्रोळी; उपरसाळ (चुकीने) आस्वली. हिच्या दोन जाती आहेत – एक पांढरी व दुसरी काळी. वेल काळसर तांबूस रंगाचा असून पाने तरवारीच्या आकाराची, अर्धबोट रुंद व तीन अंगुळे लांब असतात. ही रक्तशोधक आहे. हिला उपटसुटी, लहान कावळी, शेत कावळी, शेंबवेल अशीही नावे आहेत.

उपळी स्त्री. झरा; पाझर : 'धगीने शरीराला घामाच्या उपळी लागायच्या.' – इंधन २०. पहा : **उपळ** [सं. उत्+प्लु]

उपळी स्त्री. गाडीच्या साटीच्या दोन्ही बाजूंना समांतर असणाऱ्या सहा पट्ट्यांपैकी प्रत्येक. (खा.)

उपळी स्त्री. पाषाणमय जमीन; दगडी जमीन. पहा : **उपळ** :'असो हे सोमकांत उपळीं । जेवि द्रविजे चंद्रकळी ।'–ऋ २४. [सं. उत्पल]

उपज्ञा स्त्री. मूळचे ज्ञान; उपजत बुद्धी; आद्यज्ञान. [सं.]

उपंगळीए क्रिवि. पाठकुळी; मानेच्या मागील बाजूस; पाठीवर : 'मग

उपंगळिए घेऊन गांवातु नेलें.' – वृद्धाचार १९.

उपंढर पु. १. दंभ; ढोंग : 'ना ते आनुरागेवीण । उपंढर श्रीचरणध्यान ।' – ज्ञाप्र ४११. २. दंभस्फोट; ढोंगाची उघडकी; अव्यवस्था : 'लोकांपासीं भावार्थ कैचा । आपण जगवावा तयाचा । सेवट उपंढर कोणाचा । पडोचि नये ।।' – दास १९.८.२३.

उपंढर वि. उघडे : 'झाकिले तरि उपंढर पडे । दुर्गंधी सुटे जिकडेतिकडे ।।' – दास १५.९.३९.

उपंढर वि. पांढरा; निस्तेज; फिका : 'तोहि उपंढरू ऐसा । मज वाटतुसे ।।' – ऋ ८६. [सं. उद्+पंडुर=पांढरा]

उपाइणे अक्रि. १. आरंभ होणे; आरंभणे; उत्पादणे; घालणे; जवळ येणे : 'आता उत्तरखंड उपाइलें । ग्रंथाचें ऐका ।।' – ज्ञा १०.४०. २. उत्पन्न होणे; मिळणे; प्राप्त होणे : 'तेचि आमुचे देणें उपाइलें ।' – ज्ञा १०.१३२. ३. विस्तार करणे, पावणे : 'तेंचि येक वेगळालें । येथ चिन्हीं अळंकारलें । सांगिजैल उपाइलें । भेदलेपणें ।।' – ज्ञा १८.६९५. वि. आवडते; उत्कृष्ट. [सं. उप+इ= जवळ जाणे.]

उपाइ येणे १. घोडा वगैरे जनावराने पुढील पाय उभारून मागील पायांवर उभे राहणे. २. क्रोधावेशाने दुसऱ्यावर चालून जाणे; निकरावर येणे.

उपाइल वि. १. सविस्तर. : 'सांघिजैल उपायिलें । भेदलेपणे ।।' – ज्ञा १८.६९२. २. विस्तृत. [क. उप्पक.]

उपाइले वि. १. उत्कृष्ट; आवडते : 'तैसें आत्मसुख उपाइलें । जयासि आपणपेंचि फावलें ।' – ज्ञा ५.१०८. २. प्रशस्त; मोठे.

उपाकरण, उपाकर्म न. १. प्रतिवर्षी यज्ञोपवीत धारण करण्याचा विधी; श्रावणी. २. वेदाध्ययनास आरंभ करतेवेळी करायचे कर्म; वेदाध्ययनास आरंभ. ३. साधन; उपक्रम; उपाय : 'त्यांत त्यांचें उपाकरण हें असें कीं त्यायोगानें भाऊरावांची एकेक कळा ग्रासली जात असे.' – भाकोच. [सं.]

उपाख्यान न. गोष्टीत गोष्ट; आख्यानांतर्गत उपकथा; दृष्टांतकथा; मोठी गोष्ट सांगताना मध्येच प्रसंगाने सांगायची लहान गोष्ट. [सं.]

उपाग्रसर पु. (ग.) प्रमाणात असलेल्या दोन संख्यांपैकी (युग्मापैकी) दुसरी संख्या; पहिलीस अग्रसर म्हणतात.

उपाट क्रिवि. तोंडोतोंड; सांडेपर्यंत; वाहण्यासारखे भरलेले पाण्याचे भांडे, संपत्ती. पहा : **उपट १** [सं. उत्+पत्]

उपाटणे अक्रि. अचानक येणे : 'पन गावात कदी नाय ते कालच पोलिस उपाटले.' – शेलूक १०.

उपाड न. १. उचल; उचापत; उधार : 'वर्षप्रतिपदेनिमित्त व्यापारी वार होणाऱ्या उपाडाची रीतसर बिलें तयार होऊन .....' – ऐरापु २.४७. (बडोदे) २. खप; विक्री; उठाव (मालाचा) : 'कमी उपाड झाल्यास त्याजबद्दल सरकारांतून नुकसान मिळणार नाही अशी शर्त ठेवावी.' – स्वारीनियम (बडोदे) ९६. [सं.उद्+पत्]

उपाडा पु. उच्छेद; पराभव; पाडाव : 'आवडी नावडीचा उपाडा । करूनि निधडा भोजनीं ।।' – एभा ११.९३६. [सं. उत्+पद्]

उपाणे न. उखाणा; कोडे.

उपात्त वि. गृहीत; मिळविलेला; धरलेला; स्वीकृत; स्वीकारलेले.[सं.]

उपादान न. १. ग्रहण; स्वीकार; घेणे; कबूल करणे; मान्य करणे; मान्यता; मंजुरी. २. प्राप्ती; संपादन : 'एथ अविद्यानाशु हें स्थळ । तेणें मोक्षोपादान फळ ।' – ज्ञा १८.१२४३. ३. साक्षात् कारण; समवायीकारण. पहा : **उपादानकारण** (जसे घटास माती) : 'येर आत्मतत्त्व उदासीन । ते ना हेतु ना उपादान ।' – ज्ञा १८.३०६.[सं.]

उपादानकारण (तत्त्व.) समवायीकारण; घटक द्रव्य : 'कार्याचे उत्पत्तीस ज्या जड द्रव्याची आवश्कता असते त्यास उपादान कारण म्हणतात. पुस्तकांचे कागद, शाई, दोरा हे; मेजाचे लाकूड खिळे हे, उपादान कारण होय.' – न्यायप २६. [सं.]

उपादान द्रव्य न. (तत्त्व.) उपादान कारण; ज्या कारणाचे कार्य बनते असे द्रव्य. [सं.]

उपादानलक्षणा स्त्री. ज्या लक्षणेने वाक्यार्थाचा अन्वयबोध व्हावा म्हणून शब्दांच्या मुख्यार्थासह त्या मुख्यार्थाने सूचित केलेला इतर अर्थ ग्रहण करतात तिला उपादान लक्षणा म्हणतात. : 'शोकीं बुडवूं पाहे स्वावासा पर असा परावासा ।' (स्वावासा= आपल्या घरातील मनुष्यास) – मोभीष्म ३.४८; 'तो चमत्कार पाहण्यास पाचशे गाडी लोटली होती.' येथे गाडी या शब्दात त्यातील मनुष्ये अंतर्भूत होतात. [सं.]

उपादेय वि. स्वीकार करण्यास योग्य; मान्य करण्यालायक; स्वीकारार्ह; ग्रहणार्ह; ग्रहण करण्यास योग्य : 'सर्वज्ञही जे होती । हेयोपादेयही जाणती ।' – ज्ञा ३.२३३.

उपाध स्त्री. संकट; त्रास; पीडा; दु :ख. पहा : **उपाधि** : 'जाणतियां पाठीं लागता उपाध । नेणता तो सिद्ध भोजनासी' – तुगा ३५६. [सं. उपाधि]

उपाधपण, उपाध्यपण, उपाधीक, उपाद्धीक न. स्त्री. १. उपाध्यायाची वृत्ती; काम; पौरोहित्य; जोसकी; भिक्षुकी. २. उपाध्यायाला मिळणारी बिदागी, वेतन, प्राप्ती, दक्षिणा. [सं. उपाध्याय]

उपाधपेठ, उपाधपेठी वि. १. उपाध्यायास लग्न, मुंज वगैरे प्रसंगी देतात तसे (सणंग, पागोटे वगैरे). २. हलक्या प्रतीचे; कमी किमतीचे; अगदी साधे; क्षुल्लक; टाकाऊ.

उपाधवंत वि. स्थूल; उपाधियुक्त. [सं. उपाधिवत्]

उपाधि–धी स्त्री. पदवी; किताब; टोपणनाव; अन्वर्थक नाव; विशेषण (आवडीने किंवा उपहासाने दिलेले). [सं.]

उपाधि–धी स्त्री. नाराजी : 'विष्णूस्वामिसी एसणी उपाधि काइसी.' – लीच १.३४. [सं.]

उपाधि–धी पु. स्त्री. १. पदार्थाच्या स्वरूपात, प्रकृतिधर्मात बदल घडवून आणणारे द्रव्य, वस्तू. उदा. रंगद्रव्याने पाण्यास रंगीत स्वरूप येते. येथे रंगद्रव्य हा उपाधी होय. २. एखाद्या पदार्थापासून विशेष कार्य निर्माण होण्यास कारणीभूत असे काही एक; (सामा.) कारण, उत्पादक, प्रवर्तक, परिणामकारक, कार्यकारक गोष्ट. उदा. अग्नीपासून धूर होतो त्याला आर्द्रेंधनसंयोग उपाधी असे म्हणतात. ३. प्रसंग; कारण; निमित्त; प्रयोजन. ४. विशेष गुणधर्म; गुणविशेष. ५. (वेदांत) जग; माया; बाह्यपाश; संग : 'करिती नावडतेया त्याग । उपाधीचा ।।' – ज्ञा १७.३६२. ६. प्रपंच; संसार : 'जीवु तैसा उपाधि । आवडे लोकां ।।'

– ज्ञा ४.२१. ७.विकार; विचार. ८. त्रास; अडथळा; उपसर्ग; उपद्रव; अडचण; आपत्ती; संकट; भानगड; लिगाड : 'रायाच्या मनीं नव्हतें, पडूं नये उपाधीला ।' – ऐपो ४१०. [सं.]

उपाधि–धी स्त्री. चळवळ; खटपट : 'उपाधीसी विस्तारावे । उपाधींत न सांपडावें ।' – दास ११.५.९. [सं.]

उपाधि–धी स्त्री. (तत्त्व.) कारणघटक; साध्याच्या व्यापक असूनही साधनाचा अव्यापक असणारा धर्म; जातिभिन्नधर्म. [सं.]

उपाधि–धी स्त्री. निकाल; पारिपत्य : 'कमलधीखान व कित्येक मोंगल याचे आप्त दिल्लीकडून बोलावून येकदा उपाधी बरे प्रकारे करावी या विचारात आहेत.' – पेद १०.२३.

उपाधिक न.उपाध्येपण; उपाध्येपणाची वृत्ती किंवा वतन : 'त्यावरून कलहवृद्धि होऊन उपाधिक तुम्ही अमानत ठेवले ते येक वर्ष अमानतच राहिले.' – पेठेदभा २.३.

उपाधिनिरास पु. उपाधी नाहीशी करणे; विकार नाहीसा होणे. [सं.]

उपाधिस्थूळ वि. ऐश्वर्ययुक्त :'परमाणुभव देव ते उपाधिस्थूळ ।' – लीचपू ३७५.

उपाधीक वि. (प्र.) औपाधिक. उपाधी असलेले; उपाधीसंबंधी. [सं.उपाधि]

उपाध्यक्ष पु. अध्यक्षास मदत करणारी किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याचे काम पार पाडणारी व्यक्ती. [सं.]

उपाध्यक्ष पु. (राज्य.) (भारताच्या राज्यघटनेप्रमाणे) विधानसभेने आपल्या सदस्यांपैकी निवडून दिलेली व अध्यक्षांच्या अनुपस्थितीत विधानसभेचे संचालन करणारी व्यक्ती.

उपाध्या, उपाध्याय पु. पुरोहित; भटजी; भिक्षुक; धार्मिक कृत्य चालविणारा; तीर्थक्षेत्राची स्थळी यात्रा व इतर धर्मकृत्ये यथासांग घडविणारा. जसे : – कुलोपाध्याय, ग्रामोपाध्याय, तीर्थो–पाध्याय : 'सांगे उपाध्या संध्यावंदन ।' – दावि २१. २.(ल.) भामट्या. ३. वेदादी विद्या शिकविणारा; गुरू.[सं. उपाध्याय] (वा.) **(एखाद्या वस्तूस) उपाध्या भेटणे** – वस्तू चोरीला जाणे. **उपाध्याचे सणंग, उपाध्याचे पागोटे** – पहा : **उपाधपेठ**

उपाध्येपणा पु. भिक्षुकी; उपाध्यायाची वृत्ती. पहा : **उपाधपण**

उपानयन न. घोड्यावर स्वार बसला असता घोड्याने पुढचे दोन्ही पाय वर करणे ही खोडी. [सं.]

उपानह पु. पादत्राण; पायतण; जोडा : 'जे कां हृदए उपानहौ सदैवीं । मैळविजति ।।' – ऋ ३५. [सं.]

उपापणे क्रि. पहा : **उपणणे**

उपाय पु. १. युक्ती; आजार, अडचण, त्रास इ.दूर करण्यासाठी केलेली योजना; इलाज; तजवीज; उपयुक्तक्रिया विनियोग : 'तूंतें करूनि पुढें । जे उपायें घेतली दवडे । तयां ठाकसी बहुवें पाडे । मागांचि तूं ।।' – ज्ञा १७.१२. २. साम, दाम, दंड, भेद यांपैकी प्रत्येक; एखादी गोष्ट मिळविण्याचा मार्ग.

उपायचतुष्टय न. साम, दाम, दंड, भेद हे राजनीतीतील चार उपाय. [सं.]

उपायन न. १. देणगी; भेट; नजराणा; आहेर; उपहार : 'समर्पिलि उपायनें । राया कृष्णजीतें ।।' – रास १.११९. २. वायन; वाण. [सं.]

उपाययोजना करणे सक्रि. तजवीज करणे; एखादी गोष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने पावले उचलणे; सुरळीत व्हावी म्हणून काळजी घेणे.

उपायी वि. उपाय योजणारा; युक्त्या काढण्यात तरबेज; कल्पक बुद्धीचा; युक्तिबाज; प्रयत्न करणारा. [सं. उपाय]

उपायी क्रिवि. १. पुढील पाय उचलणे : 'उडी मारून त्याजवर बसते वेळी तो उपायी (दोन पायांवर) उभा राहील.' – अश्वप २२६. २. निकरावर येणे : 'चिनी सरकार विशेष उपायीं न येता सामोपचारानें, शिस्तीने झगडत आहे.' – के १६.४.३०.

उपायोज पु. (यंत्र.) मूळ यंत्राला जोडता येणारे भाग. उदा. यंत्रे, हत्यारे, मापक, दर्शक इ.

उपार पु. उपाहार; उतारा; देवादिकांना किंवा भूतपिशाचादिकांना तांदूळ, साखर वगैरे अर्पण केलेले पदार्थ. [सं.उप + आहार]

उपारुण किरण अवरक्त किरण. या किरणांच्या उपयोगाने पुरातात्त्विक वस्तूंच्या अस्पष्ट बारकाव्याचे स्पष्ट ज्ञान होऊ शकते.

उपार्जणे, उपार्जिणे सक्रि. १. मिळवणे, संपादन करणे : 'जेणें प्रकृतीचें भोगिजे । उपार्जिलें ।।' – ज्ञा ८.३३. २. आर्जव करणे; खुशामत करणे. [सं. उप+अर्ज्]

उपार्जन न. संपादन; मिळविणे; प्राप्त करून घेणे : 'जया राज्य द्रव्य करणे उपार्जना । वश दंभमाना इच्छे जाले ।।' – तुगा १०६५. एका गोष्टीची भर दुसऱ्या गोष्टीत करणे. [सं. उप+अर्ज्]

उपार्जनपट पु. वृत्तिपत्र; इनामपत्र.

उपार्जना स्त्री. १. आर्जव, खुशामत; खुषमस्करी; याचना; नीचसेवा. २. मिळविणे; संपादन करणे. [सं. उप+अर्ज्]

उपार्जना स्त्री. द्रव्यार्जन : 'उपार्जनेचा शीणु नेणे बाळु ।' – विसिं १८.१३३.

उपार्जना करणे (वा.) द्रव्यखंडणी किंवा खर्चाला देणे : 'येणें करून सुज्जाअतदौला व पातशहा व रोहिले तुमची उपार्जना करीतील.' – ऐसंसाखं ७.४५.

उपार्जित वि. १. संपादलेले; मिळवलेले : 'उत्पन्न झालेले उपार्जित गुण.' – नीतिशास्त्रप्रवेश ३२१. २. जमा झालेले; देय असलेले (उत्पन्न, पैसा इ.). सामा. शब्द – पूर्वोपार्जित, आत्मोपार्जित.

उपालिंग न. अनिष्ट दृश्य; भेसूर आकृती : 'रुक्मिणीची पाहुनी सर्वांगे । जरी देवांची बरव सोंगे । तरी तिथें हातातोंडाचीं उपालिंगे । विवसिये सारखीं ।।' – रुस्व १९७. [सं.]

उपाव पु. युक्ती; इलाज. पहा : **उपाय** : 'येविषई असे उपावो ।' – विसिंपू २.४८.; 'आतां हें न चलें कांहीं । उपाव सांगतां देही ।।' – ब गाथा ६१३. [सं. उपाय]

उपाव जाणे अक्रि. उधळून जाणे; उपाई जाणे : 'नाथाजी लोणार यासी जखमा लागून घोडी बोर उपाव गेली.' – ऐलेसं ८१९०.

उपावणे अक्रि. १. पायांच्या टाचा वर करून अंगठ्यावर भार देऊन उभे राहणे; पायाच्या बोटांवर उभे राहणे. २. मागल्या पायावर उभे राहणे (घोड्याने). पहा : **उपाई – यी येणे.**

उपाशी,उपाशीपोटी, उपाशेपोटी, उपाशीतापाशी, उपाशीवनवाशी वि. क्रिवि. न जेवलेला; रिकाम्या पोटी; अन्नविरहित; न जेवता; न खाता; अनशवे पोटी: 'हिंदुस्थानची स्थिति कशी आहे हें उपाशीपोटीं आम्हास जितकें समजतें तितकें .. समजणें कठीण आहे.' – लोटिकेले २.३९९. [सं. उप+वस्]

उपास पहा : **उपवास** (वा.) **उपासाची चूल करणे** – जेवणाचा स्वयंपाक झाल्यावर निराहाराचे पदार्थ शिजवण्यासाठी सारवून चूल सोवळी करणे. **उपास पडणे** – वेळेवर जेवायला, खायला न मिळणे.

उपासअनास, उपासतापास पु. १. उपवासादी व्रतनियम; कडक व्रत. २. (ल.) देहदंडन; कष्ट. [उपास द्वि.] (वा.) **उपासीतापासी बसणे** – काही न खाता राहणे; जिवाचे हाल करून घेणे. **उपासतापास करणे** – काहीही न खाता कडक व्रते इ. करणे.

उपासक पु. उपासना, पूजा करणारा; भक्त; सेवेकरी. [सं.]

उपासकबंधुत्व न. उपासकांमधील बंधुभाव : 'त्यांच्यामध्ये उपासकबंधुत्वाची बुद्धी जागृत होते.' – लोटिकेले १.४८७.

उपासकर, उपासकरी पु. उपास करणारा.

उपासणे सक्रि. उपासना, आराधना करणे; प्रार्थणे; पूजा करणे; सेवा करणे; भक्ती करणे : 'आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे । यातें उपासा मग आपैसे । पुरती काम ।।' – ज्ञा ३.८८. [सं. उप+आस्]

उपासतान स्त्री. १. उपास आणि तहान. २. (ल.) कष्ट; देहदंडन. (वा.) **उपासतान काढणे** – अन्नपाण्याशिवाय काळजीने, कष्टाने, दुःखाने दिवस काढणे. **उपासतान पाहणे** – एखाद्याची काळजी वाहणे; त्याच्या अन्नपाण्याची तजवीज करणे.

उपासन न. उपासना; पूजा; पूजन; अर्चन; आराधना; होमहवन इत्यादी. पहा : **उपासना** : 'मग उपासन जिहीं आणिलें । योगाग्नीचें ।।' – ज्ञा ४.१२२. [सं.]

उपासना स्त्री. १. भक्ती; पूजा; अर्चा; सेवा; आराधना : 'मुख्य उपासनालक्षण । नाना कवित्वलक्षण । नाना चातुर्यलक्षण । बोलिले असे ।' – दास १.१.१०. २. सेवा; नेमधर्म (गुरुमंत्र जपण्याचा इ.). सामा. शब्द – ज्ञानोपासना, कर्मोपासना. ३. उपास्यदैवत : 'उपासना तेथ उभी आहे ।' – रामदासी २.७९. [सं. उप+आस्]

उपासनाकांड न. वेदाच्या तीन कांडांपैकी ज्यामध्ये उपासना सांगितली आहे तो भाग; यजुर्वेद. [सं.]

उपासनानिरूपण कृत कर्माचे अखेरीला जे देवतेला समर्पण करतात ते.

उपासनामार्ग ईश्वरप्राप्तीसाठी चिंतन, ध्यान इत्यादींचे आचरण : 'उपासना मार्गाने जाणाऱ्या भक्तांना भक्तिमार्गी म्हणतात.' – टिसू ३८.

उपासनायंत्र ग्रह व देवता यांची उपासनेसाठी धातूवर किंवा कागदावर काढलेली विशिष्ट आकृती : 'नातरी उपासनायंत्र । तैसें दिसे सैन्यसूत्र । भीमकी मध्यपीठ पवित्र । कृष्णक्षेत्र निजबीज ।।' – एरुस्व ६.५५.

उपासपारणी धरणी पारणी; उपाशीपोटी.

उपासपारणे न. उपास करणे व सोडणे; उपासतापास. (क्रि. करणे, धरणे, मांडणे, लागणे.).

उपासमर, उपासमार, उपासमारा स्त्री. पु. १. पुरेसे अन्नपाणी न मिळणे; अन्नावाचून मरणे किंवा मारणे; अन्नान्नदशा. २. अर्धपोटी ठेवणे; कंजूषपणा करणे; एखाद्याला कोणतीही वस्तू पुरेशी न देणे.

उपासमाजगा, उपासमाजरू वि. पहा : **उपासमातगा.** उपासमार होत असूनही कामधंदा न करणारा; अन्नान्नदशा असूनही माजलेला. (माण.व.)

उपासमातगा वि. अविचारी; प्रत्यक्ष घरात खायला नसल्यामुळे उपासाची पाळी आली असली तरी वरून उद्दामपणाची वागणूक करणारा; कुवत नसताना मुजोरी करणारा; वरून खोटा दिमाख दाखवणारा : 'विचारें करून पाहतां येथील कारभार उपासमातगा आहे.' – पेद २०.१३८.

उपासंग पु. बाण ठेवण्याचा भाता; तूणीर; शरधी : 'या सैन्याबरोबर ..... उपासंग .. इ. साधनें होतीं.' – हिंलद २२. [सं.]

उपासित वि. ज्याची पूजा, भक्ती, अर्चा इ. केले आहे असा; सेवा केली आहे असा; आदरिलेला; पूजिलेला. [सं.]

उपासी मरणे अक्रि. भुकेमुळे व्याकूळ होणे; खायला प्यायला न मिळून मृतप्राय होणे.

उपास्ति–स्ती स्त्री. १. उपासना; भक्ती; पूजा; अर्चा; सेवा; आराधना : 'तैसीं दोनही मतें । सूचितीं एका कारणातें । परी उपास्ति ते योग्यते आधीन असे ।।' – ज्ञा ३.४०. [सं. उप+आस्]

उपास्य न. ज्याची उपासना करायची ती देवता; आराध्य दैवत. वि. पूजा करण्यास योग्य; पूजनीय. [सं.]

उपास्यदैवत न. १. उपासनेची देवता; आराध्यदैवत. २. (ल.) पूज्य व्यक्ती.

उपाहान पहा : **उपानह**

उपाहार पु. १. फराळ; जेवणातील मुख्य पदार्थाशिवाय इतर पदार्थ; अल्पाहार. २.फराळ करणे. [सं. उप+आहार]

उपाहारगृह न. ज्या ठिकाणी खाण्याच्या वस्तू, चहा, कॉपी इ. पेये विकत मिळतात व बसून खाता येतात असे दुकान; हॉटेल. [सं.]

उपाहारयान न. आगगाडीतील चहा, खाद्यपदार्थ मिळण्याचा डबा. [सं.]

उपाहूत वि. ज्याला आव्हान दिले आहे असा.

उपाळा पु. १. उमाळा; उपळी; आवेग; क्षोभ; उकळी : 'फुटली शरिरांत ह्या काम उपाळा । कर शांत नृपाळा ।' – प्रला १२७. २. अश्रू; पाणी. पहा : **उपळ** : 'आम्हांस टाकुन जाशी नृपाळा । पशुपक्षांच्या नेत्रीं उपाळा ।' – प्रला २५९. [सं. उत्+प्लु]

उपाळिंग न. गौण शरीरावयव : 'तरि तियें हातातोंडाची उपाळिंगे । विवसीये सारिखी ।' – रुस्व १९७.
वि. हाताची बोटे झडलेला : ' सासार्जुन तो उपाळिंगु' – लीचउ १४५.

उपाळी स्त्री. उपहास; थट्टा; निंदा; चेष्टा; टवाळी; मस्करी.

उपांग १. गौण अंग; भाग; लहान अवयव; भेद; प्रकार; शाखा; मोठ्या कार्याला सहायभूत असलेले लहान कार्य; आनुषंगिक विधि : 'मोहरी पांवे मृदंग । डफडीं सनया उपांग । मिरवत जातसे श्रीरंग । नंदयशोदेसहित

पै ।।' – हरि ११.२२२. २. साधन, साहित्य, सामग्री यापैकी गौण वस्तू; (संगीत), साथ; उपसाहित्य : कां गीत रहातां उपांगा । वोहटु पडे ।।' – ज्ञा. १८.१०९३. ३. उपशास्त्र; मुख्य शास्त्राची, विद्येची पुरवणी, जसे : – वेदांचे उपांग, पुराण, न्याय, मीमांसा व धर्मशास्त्र. ४. जोडलेला, अनुबंधी (भाग); अंगभूत, आनुषंगिक (भाग). ५. शरीरावर किंवा अवयवावर वाढलेला गौण किंवा कमी प्रतीचा अवयव. उदा. केस, खवला, काटा इ. [सं.]

उपांगभूत वि. आनुषंगिक, जोडून असलेला; घटकावयव असलेला.

उपांगराग पु. (संगीत) मूळचा जो राग असेल त्याच्या स्वरांमध्ये थोडा बदल करून तयार होणारा त्या रागाचा पोटभेद. [सं.]

उपांगललिता स्त्री. आश्विन शुद्ध पंचमीला (ललितापंचमीला) पुजायची एक देवता : 'बाळंभट तिमाजीपंत यांचे घरास आले तो त्याचे घरौ उपांग – ललिता होती.' – ऐसंसाखं ४.६८.

उपांगवियोग पु. एखाद्या वस्तूचे भाग निरनिराळे करणे, मोकळे करणे, उलगडणे; पृथक्करण. [सं.]

उपांत पु. १. शीव; किनारा; काठ; कड; शेवट. २. डोळ्याचा कोपरा; अपांग. [सं.]

उपांत, उपांतिक वि. जवळचा; शेजारचा; शेवटाजवळील; काठावरचा. [सं.]

उपांतराल न. १. मुख्य किंवा मोठ्या अवकाशातील खंड; अंतराळाचा एक भाग. २. (शिक्षण.) मोठ्या सुट्टीशिवाय असणारी अल्पकालीन छोटी सुट्टी. [सं.]

उपांतिम, उपांत्य वि. शेवटचे असेल त्याच्या जवळचे; अखेरीच्या अलीकडचे; उपांत्य (वर्ण, स्वर) : 'अंतिम तो अंतिम, तो उपांतिम होऊ शकत नाहीं.' – लोटिकेले ३.२४८. [सं.]

उपांशु–शू क्रिवि. हळू; हलक्या आवाजात; शब्द बाहेर न उमटता. [सं.]

उपिकणे अक्रि. अविकणे; पिकून अधिक होणे; वाजवीपेक्षा अधिक पक्व होणे. [सं. उत्+पच्]

उपिट, उप्पिट्टु न. १. फोडणीचे लाह्याचे पीठ. २. तिखटमिठाचा सांजा. [क. उप्पु=मीठ+इट्टु=पीठ]

उपिठणे अक्रि. आर्द्रता कमी झाल्यामुळे किंवा सारखे भाजले न गेल्यामुळे भाकरी वगैरेस भेगा पडणे; पिठुळणे. [सं. उत्+पिष्ट]

उपीठ वि. उपिठलेली (भाकरी, खापरपोळी इ.) [सं. उत्+पिष्ट]

उपीत घेणे, उपीत पिणे अक्रि. १. उच्छृंखळपणे, अविचाराने वागणे. २. अतिशय घाईत असणे. [सं. उत्+पत्]

उपीवणे अक्रि. गुप्त होणे; नाहीसे होणे. (व.) [सं. उत्+पत्]

उपेखणे पहा : **उपेक्षणे** : 'तरि कैसें तिये वरि स्वामियान । उपेखुनु बोलिलें ।' – खिपु २.३६.३७. २. (सक्रि.) दुर्लक्षित करणे, हयगय करणे, चालढकल करणे.

उपेखा पु. उपेक्षा; हयगय : 'परि उपेखया जाति वायाणी । तुजवीण देवा ।।' – राज्ञा १०.१४५. [सं. उपेक्षा]

उपेग पु. १. उपयोग; प्रयोजन; जरुरी; गरज; फळ : 'एथ एकचि उपेगा जाये । परमामृत ।।' – ज्ञा २.६७. २. उपकार.

उपेगा, उपेगी वि. उपयोगी, कामाचा : 'ये‍ऱ्हवीं परादिका चौघी । जीव मोक्षाच्या उपेगीं ।' – अमृ ३.२. (वा.) **उपेगा येणे, उपेगा जाणे –** उपयोगी पडणे : 'येथें येतां न भागा त्वरित हरजगा तीर्थ आले उपेगा ।' – ब ६८७.

उपेड वि. जेथून दूरवरचे दृश्य दिसेल अशी उंचावर असलेली; उंचाड; उंचवट (जमीन). (राजा.)[सं. उत्+पीठ]

उपेणे न. १. वस्ती; वास; विश्रांतिस्थान; राहण्याची जागा; : 'नाना रुची केली उपेणी । कीं पाचि प्रभेची वाणी ।' – ऋ ८३; 'स्वर्गा करौनि उपेणें । मागिजे सुखाचें केणें ।' – शिव. ८५८. २. जवळ जाणे, येणे : 'उपेणें करितां कुसुमाकारां । झाडे वेधेति शृंगारा । तेथ कोकिळांचे पांति दर्दुरा । केवि लाभे ।।' – ऋ ५२. [सं. उप+इ]

उपेत वि. जवळ गेलेला. [सं. उप+इत]

उपेता पु. पाक्षिक वायदा : 'प्रामिसरी नोट आज एकदा ९५८६ रू. पर्यंत गडगडली. उपेता उर्फ नवा पाक्षिक वायदा तर ९५८२ पर्यंत पडला.' – के २७.१.३८.

उपेय वि. उपायाने प्राप्त करून घेण्यासारखी; साध्य (गोष्ट) : 'म्हणौनि उपेयही हातीं । जालया उपायस्थिती ।' – ज्ञा १८.१२४५.

उपेक्षक वि. उपेक्षा, अव्हेर; दुर्लक्ष, टाळाटाळी करणारा.

उपेक्षणीय, उपेक्ष्य वि. उपेक्षा करण्यास योग्य; कानाडोळा करण्यासारखा; लक्ष न देण्यासारखा. [सं.]

उपेक्षणे उक्रि. १. उपेक्षा करणे; दुर्लक्ष करणे; हेळसांड करणे; अव्हेर करणे : 'जेवीं नव्हे या बुद्धी उपेक्षिला ।' – ज्ञा १०.१६१. २.खिजगणतीत नसणे; त्याग करणे; सोडणे : 'उपेक्षू नको गूणवंता अनंता । रघूनायका मागणें हेचि आतां ।' – राक. [सं. उप+ईक्ष्]

उपेक्षा स्त्री. १. अनास्था; हयगय; दुर्लक्ष; अनादर; अव्हेर : 'किंवा उपेक्षेवरी । वाळुनि सांडिले ।।' – ज्ञा १८.१५४२. २. चालढकल; कानाडोळा; डोळेझाक (गुन्ह्याकडे, दोषांकडे). ३. त्याग; सोडणे. [सं. उप+ईक्ष्]

उपेक्षित वि. दुर्लक्षित; उपेक्षा केलेला; वाईट वागणूक देण्यात आलेला; अव्हेरलेला; त्याग केलेला. [सं.]

उपेंद्र पु. इंद्राचा धाकटा भाऊ; विष्णू : 'उपेक्षिसी तूं मज कां उपेंद्रा ।' – सारुह १.९. [सं.]

उपेंद्र न. उत्पन्न : 'येथील प्रासादाचें वास्तुशांतीचें उपेंद्र आम्ही गुंजवणेकर पुरोहित यांनी शके १५८५ मध्यें घेतलें आहे.' – ऐसंसा १.३०.

उपेंद्रवज्रा स्त्री. एक समचरण वृत.

उपैणे न. वसति; मुक्काम :'माझेया आग्रहकारणें । जाणदृष्टी केलें उपैणें ।' – रुम ६७८.

उपैणे अक्रि. प्रयाण करणे; नाहीसे होणे. [क. पयन]

उपोत्पादन पु. एका मुख्य वस्तूचे उत्पादन करीत असता वाया जाणाऱ्या वस्तूपासून जी दुसरी वस्तू निर्माण होते ती; उपफल; आडउत्पन्न. [सं.]

उपोद्घात पु. १. आरंभ; सुरुवात; प्रस्तावना. २. परिचय; विषयप्रवेश. ३. (न्याय.) ग्रंथातील प्रतिपाद्य विषयाला अनुरूप असे ग्रंथ–प्रकरण

नाम; अवतरणप्राय ग्रंथांश. ४. उदाहरण; दृष्टांत; खुलासा. ५. पृथक्करण; विवरण; स्पष्टीकरण; तत्त्वशोधन. [सं.]

उपोद्‌बलक वि. सबळ; दुजोरा देणारा : 'ढेऱ्यांच्या प्रतिपादनाला हा उपोद्‌बलक पुरावा आहे.' – लोक्षि (प्र) १६.

उपोद्बलन न. मंजूर करणे, मंजुरी.

उपोषण न. उपास; उपवास; निराहार; निरशन. [सं. उप+वस्]

उपोषणमंडळ न. (ख्रि.) पुनरुत्थानाच्या सणाच्यापूर्वी करायचे चाळीस दिवसांचे उपोषण; लेन्ट या सॅक्सन शब्दाचा पर्याय. लॅन्ट म्हणजे वसंत. हे उपवास वसंतात येतात म्हणून यांना वसंतोपवास असेही म्हणतात : 'उपोषणमंडळाचा आरंभ ॲशवेन्स्डे (राखेचा बुधवार) या दिवशी होतो.' – उमं ५.

उपोषित वि.१. उपवास केलेला. २. उपाशी. [सं. उप+उषित]

उपौढणे अक्रि. जागा होणे; उठणे : 'तो ध्वनी आइकोनि श्रवणिं । देओ उपौढले ।' – वह ३११.

उप्तरणे अक्रि. फुगणे; सुजणे; उतणे. पहा : **उबतरणे** (व.)

उप्पट स्त्री. चपराक; थप्पड : 'माझ्या एका हाताची उप्पट खाऊन दाखवा.' – आआशे १८१.

उप्परमाडी स्त्री. दुसरा वरचा मजला; दुमजली घर; पहा : **उपरमाडी** : 'ईश्वर त्याची मस्ती मोडी, आता कैसीं उप्परमाडी ।' – अमृत ५२.

उप्पीठ न. आंबट सांजा; उपमा; तिखटमिठाचा सांजा. (तंजा.)

उप्पुपिंडी पहा : **उप्पीठ** [तेलुगु].

उप्रांतिक क्रिवि. यानंतर; यापुढे : 'उप्रांतिक तीर्थरूपांसमागमें स्वार होऊन आपले भेटीस राजपुरीं येऊन विदित जाले पाहिजे.' – पेद ३.९५. [सं. उपर+अंतिक]

उफका, उफखा पु. नाश. पहा : **उपखा**

उफका स्त्री. उपेक्षा : 'उफकेन जो रिगे । तो नागवला' – ज्ञा १३.५८२.

उफखणे, उफगणे अक्रि. रिकामा होणे; रिक्त होणे; संकोच पावणे : 'आणि फुंके भाता फुगे । रेचलिया सर्वेचि उफगे ।' – ज्ञा १३.६६५. पहा : **उपखणे** [सं. उप+क्षि]

उफणणे अक्रि. उतणे : 'सिरेवर बिबवा घातला. गुण तरी आला नाही. परंतु उफहून दुःख अधिक जाले.' – नाग १.२६७.

उफट वि. १. निस्तेज; फिकट; फिक्का (रक्तनाशामुळे). २. रोगट; आजारी. [सं. उत्+स्फट = तुरटी]

उफटणे, उफडणे, उफंडणे अक्रि. (आजारामुळे किंवा काळजीने) फिके पडणे; निस्तेज होणे; पांढरे पडणे.

उफणणे उक्रि. उपणणे; तूस वगैरे वेगळे करण्यासाठी घडवंचीवरून धान्य हळूहळू खाली ओतणे; वारवणे; वाऱ्याने भूस उडवणे; पाखडणे. [सं. उत्+पवन]

उफणणे अक्रि. १. जोराने वर येणे; वाढणे (पीक, झाड, मूल वगैरे). २. उतणे; अंगावर उठणे (पुरळ, फोड, बिबा, शेर, ज्वर, वस्तरा इ. उठणे, उतणे). ३. कुजणे; नासणे (फळे वगैरे); आंबणे; फुटणे (दूध वगैरे). ४. फुगणे; ताठणे (गर्वाने). ५. उपटणे; तोडणे : 'नमोजी स्वच्छंदा सकल भवबंधा उफणिता ।।' – वामन (व्याधाख्यान) २३. पहा : **उपणणे** [सं. उत्पन्न]

उफर, उफरा पु. बाज; बार; बहर; पीक (वृक्ष, लता, शेत इत्यादींना येणारा). (राजा. कु.)[सं.उत्+भृ]

उफर, उफरा पु. उपणणे; वारवणे. [सं. उपरि]

उफरणे उक्रि. उपणणे; वारवणे; वाढवणे. (राजा. कु.)

उफराटणे, उफरांडणे अक्रि. १ उलटे होणे; उलटे करणे; अंग, तोंड विरुद्ध दिशेला फिरणे; उरफाटे होणे; उलट बाजूला जाणे; विपरीत होणे. २. डोळे चढले जाणे, फिरणे (मृत्यूपूर्वी किंवा बेशुद्धीने). डोळे या शब्दाबरोबर किंवा नुसता प्रयोग.

सक्रि. उफराटा, उलटासुलटा करणे; वरचे अंग खाली व खालचे वर असे करणे. (धक्का इत्यादीने). [सं. उत्+परावृत्]

उफराटा वि. क्रिवि. १.उलटा; विपरीत; जगावेगळा; परावृत्त; मागे; विरुद्ध : 'अहा कटकटा हें वोखटें । इये मृत्युलोकींचे उफराटें ।' – ज्ञा ९.५१५. २. (ल.) चुकीचा. ३. उलट; प्रत्युत्तरदर्शक : 'बरवेपणें मोठी । होतें लक्ष्मीचें पोटीं । कृष्ण देखोनियां दृष्टी । तेही उफराटी लाजली ।।' – एरुस्व १.७३. [सं. उत्+परावृत्]

उफराटसुफराट वि. उलटा सुलटा; वरील बाजू खाली व खालील बाजू वर असा ; आतील बाजू बाहेर व बाहेरील बाजू आत असा; पुढील बाजू मागे व मागील बाजू पुढे असा; व्यस्त; व्युत्क्रम [सं. उत्+परावृत्त्; सु+परावृत्त्]

उफराटा न्याय विचित्र, विपरीत न्याय; अन्याय.

उफराटी गंगा १. उलट दिशेने वाहणारी गंगा. संसाररहाटी, माया यास उपमा देतात : 'उफराटीगंगा पाहतां मिळणें । सकळांस तेथें ।।' – दास ११.७.११. २. योग्य, तर्कोचित घटनेच्या विरुद्ध विपरीत गोष्ट होणे.

उफराटी दुनिया उलटे जग; अव्यवस्था; बेबंदशाही; अनिर्बंधता; अन्यायाचरण; विपरीत स्थिती.

उफराटी बाहुली अगदी डोळ्यांजवळ धरल्याशिवाय दिसत नाही अशी दृष्टी; अधुदृष्टी; मंददृष्टी; दूरचे दिसत नाही अशी नजर.

उफराटे भांडण कृतघ्नतेचे भांडण; उपकार विसरून केलेले भांडण; अन्यायाचे भांडण; उपकार, प्रेम करणाऱ्याशी वितुष्ट.

उफराटे शहाणपण मूर्खपणा.

उफराट्या, उलट्याकाळजाचा वि. निष्ठुर; निर्दय; कृतघ्न; अति धाडसी; अविचारी (मनुष्य).

उफलणे अक्रि. १. फुलणे; विकासणे; उमलणे : 'फट्टदिशी त्याचे भाग्य उफलायचे.' – माजी ७१. २.(ल.) उघडणे; विस्तीर्ण होणे; उलणे. ३. पाझर फुटणे; द्रव येणे (हृदयाला). ४. उदयाला येणे; उघडणे; अनुकूल होणे (दैव). [सं.उत्+फल्]

उफळणे अक्रि. १. वर उडणे; जोराने जाणे; उसळणे; वर जाणे : 'जो अंबरीं उफळता खुर लागलाहे ।' – नळ ३१. २. नांगरणे; फाळाने उकरली जाणे (जमीन). पहा : **उपळणे** [सं. उत्+फल्]

उफा स्त्री. अफवा; वदंता; ऐकीव बातमी; आवई. (व.)[फा. अफवा]

उफाट वि. १. स्पष्ट; फटफटीत : 'त्याची सून अगदीं उफाट गोरी आहे हो.' – खेस्व ६०. २. वाजवीपेक्षा जास्त. [सं.उत्+स्पष्ट]

उफाट, उफाड, उफाडा पु.१. जोर; वेग; शीघ्रगती : 'उफाड जोड करीतु । पांचविशें धारे वावडतु ।' – शिव ५३४; 'ते व्याधीचिया उफाडा । देतां सत्कथा काढा ।।' – एभा १०.१५. २. उत्साह. [क. उबटे] [सं. उत्+फल्]

उफाट्टे वि. पहा : **उफराटा** (गो.)
पु. जोर; आवेग.

उफाडणे अक्रि. त्वेषाने वर येणे; उडणे; उफळणे :'व्याघ्र निज छायेसि उफाडे ।।' – विसिंपू ७.४६.

उफाडाचे (बल) जोराचे; आवेगाचे; शक्तीचे : 'खान जानवाचे व खासियाचे उफाडाचे बल कललेच आहे.' – पुरंदभा १.२१०.

उफाड्याचा वि.१. लवकर वाढणारा; जोराचा. २. भरदार; सुदृढ बांध्याचा; दणकट; फार सशक्त (वृक्ष, मनुष्य, पीक, मूळ इ.) :'कशी उफाड्याची पोर आहे ती.' – मोर ११.

उफाड्याची जमीन, शेत लवकर व जोरदार पीक येणारे शेत.

उफाड्याचे हाड सशक्त, जोराने वाढणारे शरीर.

उफाड्याने वाढणे, वाढीला येणे अक्रि. लवकर, जोराने वाढणे.

उफाणणे अक्रि. सुजणे. पहा : **उफणणे**

उफाणा, उफान पु. न. १. उकळी; कढ; ऊत. (क्रि. येणे.) २. उतू जाणे; कढ वर येणे. (क्रि. जाणे.)
वि. उधळ्या. [सं. उत् + पर्वन्]

उफाणेगिरी, उफानगिरी स्त्री. १. चंगळ; चैन; समृद्धी; गडगंज. २.(ल.) उधळपट्टी; उधळेपणा; एखादी गोष्ट वाजवीपेक्षा जास्त असणे; ऊत येणे.

उफार पु. १. उपाहार; फराळ. (गो.). २. नैवेद्याचे अन्न :'टांके चौदा उपभोगासी उफारासी.' – म. शिला १.६. [सं. उप+आहार]

उफारशेट्या पु. कृतघ्न; उपकारकर्त्यावर उलटणारा, मित्रावर उलटणारा मनुष्य.

उफाल पहा : **उफाळ** :'बेहडे यांस उफाल ऐवज राहील तो तुम्ही रदकर्जी घेत जाणें.' – समारो ३.१६४.

उफालग वि.फालतू; जरूर नसलेला.

उफावणे अक्रि. वर येणे :'ईश्वरकृपेनें तो पाषाण कमरेपासून सुटला त्याचे योगानें वर उफावला.' –स्त्रीच २.११३. [सं. उत्+ स्फाल्]

उफाळ, उफाळा पु. १. उकळी; ऊत; उत्साह; जोर; आवेश. पहा :**उफाड** :'पुण्याच्या पुण्यप्रदेशांत उफाळ्याला आलेला तो एरंड ..' – इंप ८९. २. एकदम वर येणे; जोराने उठणे; जोराने बाहेर येणे; उसळी; ऊत (पाणी वगैरेंना). (क्रि. निघणे, येणे) :'नंदाचे मूल काळें । त्यांसि नेलें काळें । कोण्हीयेका काळे । चालिलें उफाळें ।।' – दावि २४१. ३. शिल्लक; वाढ.

उफाळ, उफाळा वि. अधिक; वाजवीपेक्षा जास्त; पुरून उरलेले; शिलकी ठेवलेले. [सं. उत्+फल्]

उफाळणे अक्रि. पहा : **उफळणे** १. उकळी येणे; ऊत येणे. २. वर येणे; वर चढणे (जाळ वगैरे) :'केला जरि पोत बळेंचि खालें । ज्वाला तरी ते वरती उफाळे ।' – वामन. ३. उसळणे; वर उडणे (पाणी वगैरे) :'कोठें गुप्त कोठें प्रगटे । जैसे जीवन उफाळे आटे ।' – दास ९.८.२७. ४. गर्वाने फुगणे, ताठणे. ५. फार वाढणे; वाजवीपेक्षा जास्त होणे. ६. नांगरणे; उकरणे. ७. उधळणे; धावणे :'जैसा सिंह उफाळला हिमगिरीच्या गव्हरापासुनी ।' – आसी ६३. ८. जोर करणे; चाळवणे :'पावसाळा आला की त्यांचा दमा उफाळतो.' – आपा ६०. ९. भडकणे; संतापणे :'रामसिंगाला पाहताच राजे उफाळले.' – श्रीयो १.४८४.

उफाळणे पहा : **उपणणे**

उफिटणे पहा : **उपिठणे**

उफेणणे, उफिणणे अक्रि. अधिक होणे; कुजणे; नासणे; अविकणे (फळ वगैरे) पहा : **उफणणे** [को.]

उफेवणे, उफेणे अक्रि. वर येणे (पाण्यातून); पृष्ठभागावर येणे; तरंगणे; उसळणे. पहा : **उफणणे.** [गो.कु. राजा.]

उबग पु. १.वांती; ओकारी; उमळ. २. (ल.) उमाळा; दु:खाचा आवेग; दयेचा पाझर; कीव. [सं. उत्+पच्]

उबग पु. कंटाळा; त्रास; वीट; उद्वेग :'भागलिया आला उबग सहज । न धरितां काज आलें मनीं ।' – तुगा १८५५. [क.उब्बेग]

उबगट पहा : **उबट**

उबगणे अक्रि. गुदमरणे; दरदरून घाम येणे; गदमदणे; उष्णता व गर्दी यामुळे घाबरणे; गदगदणे. [क.उब्बे=उष्णता, वाफ]

उबगणे अक्रि. कंटाळणे; त्रासणे; वीट येणे; ओकारी येणे :'एथ अर्जुन म्हणे कट कटा । उबगिलों मागिल्या संकटा ।' – ज्ञा ११.४५२. उक्रि. १. उपेक्षा करणे; तिरस्कार करणे; हयगय,आबाळ, हेळसांड करणे :'उणे किमपि भाविका उबगशील तूं देव कां ।' – केका २०. २. टाकणे; त्याग करणे :'मग उबगून विषयांसी ।' – पांप्र ५.२७१.

उबगवटु पु. कंटाळा; त्रास.

उबगवाणा वि. तिटकारा येईल असा; कंटाळवाणा; दु:खदायक.

उबजणे पहा : **उमजणे**

उबजणे पहा : **उभरणे** (व.)

उबजणे अक्रि. (क्व.) भातावर आधण घालून त्याचे उबजे करणे. पहा : **उबजा**

उबजणे अक्रि. तापणे. [सं. उत् + तप]

उबजरणे अक्रि. क्षीण झालेली शक्ती पुन्हा येणे; तजेला येणे; पुनरुज्जीवन होणे; नवीन उत्साह धारण करणे; टवटवीत होणे (प्राणी, वनस्पती). [सं. उत्+जृ]

उबजरा पु. टवटवी; ताकद; उत्साह परत येणे. (क्रि. येणे, आणणे.). (वा.) **उबजऱ्यास येणे** पुनरुज्जीवन होणे :'त्येच्यात बघा, लहान पोरगं उबजऱ्याला इना. दिवसंदिवस खंगत चाललंय तें.' – बाब ३.

उबजळणे अक्रि. कंटाळणे; त्रासणे; वीट येणे :'उबजळली बाळा । गेली सवतीच्या माहेरां ।' [सं. उत्+ज्वल्]

उबजळा पु. कंटाळा; त्रास; वीट; कंटाळणे; डोके उठणे; त्रासणे. (क्रि. देणे,आणणे, लावणे, लागणे.).

उबजा पु. उकड्या तांदूळ; भातावर आधण घालून ते भात खापरात भाजून

निववून कांडलेला तांदूळ. [क. उब्बे=उष्णता, वाफ]

उबजे न. उबजे करण्यासाठी आधणाचे पाणी घालून ठेवलेले भात.

उबट वि. १.किंचित उष्ण; कोंबट. २. घाण; दुर्गंधी येणारा (अर्धवट कुजल्यामुळे धान्य वगैरे पदार्थ). ३. चांगले जून होण्यापूर्वी पिकवल्यामुळे नासलेले (फळ वगैरे). [क. उब्बे=उष्णता]

उबटणे अक्रि. १.नासणे; कुजणे; बुरसणे व त्यामुळे दुर्गंधीयुक्त होणे (फळे वगैरे). २. जून होण्यापूर्वी पिकवल्यामुळे खराब होणे. ३. पिकण्यापूर्वी नासणे (फळ वगैरे); उबट होणे. [क. उब्बे]

उबटाण, उबठाण, उबसाण स्त्री. १. कुजलेल्या वस्तूंची दुर्गंधी. २. ओलसर, उष्ण व बंद जागेला येणारी दुर्गंधी.

उबड वि. अमाप; भरपूर :'अधर्माचे उबड पीक । धर्म रंक त्या गावीं ।' – तुगा १.७९२.

उबडण न. निर्माण होणे; उगम; आरंभ. [सं. उद्भवन]

उबडणे अक्रि. १. उद्भवणे; उत्पन्न होणे :'कीं उबडला देखौनि सोच्यु । काळवंडैला ।।' – ऋ ४०७. २. प्रकाशणे :'जयाचे उजियेडें । तारागण उबडें ।' – ज्ञा १३.९२७. [सं. उद्भवन]

उबडणे सक्रि. उपडे करणे; पालथे करणे; सांडणे :'यशोदा मायबाई । कृष्णाला या सांग कांहीं । गवळ्याच्या राधिकेचं । टाके उबडूनि दहीं ।।' – वलो. [सं. उत्पतन]

उबडणे उक्रि. नाश करणे; नाश पावणे; नाहीसे करणे; घालविणे.

उबडणे अक्रि. विरमणे; घालवणे; नाश होणे, करणे :'दोरीचे अज्ञान तरी गेलें । सर्पबुद्धीसि ही उबडले । परी भयकंपादि राहिले । संस्कारें भले दृढ असती ।।' – रंयोवा ९.२३६.

उबडहांडी पहा : **उपडहंडी १** (ना.)

उबडा वि. उपडा; पालथा; अधोमुख :'तैसें विषयांचेनि कोडे । जेणें परत्रा केलें उबडें ।' – ज्ञा १६.४५२.

उबणे अक्रि. १. उकाडा होणे; तापणे; गरम असणे, होणे; उष्णता पावणे. २. गुदमरणे; गदमदणे; कोंडल्यासारखे वाटणे; खतखतणे. ३. (ल.) त्रासणे; अस्वस्थ होणे. ४. उष्णता व ओलसरपणा यामुळे खराब होणे; कुजणे; नासणे (फळे वगैरे). ५. कुबटणे; उबटणे; बुरसणे (धान्य वगैरे); उबेने विकृत होणे. ६. पिकणे; पुवळणे (गळू वगैरे). ७. निर्णय न घेता तसेच ठेवणे.[का. उब्बे] (वा.) **उबत ठेवणे** – पिकण्यासाठी उबेत ठेवणे; वाफवून देणे (तंबाखू, गळू वगैरेंना).

उबणे अक्रि.थांबणे; ओसरणे; उघडणे (पाऊस वगैरे). (को.) (प्र.) पहा : **उभणे**

उबदरणे अक्रि. १. गुदमरणे; गदमदणे. २. (ल.) त्रास, हाल सोसणे. ३.(गळू वगैरे) पिकणे. ४. ऊब येणे. [क. उब्बे]

उबदार वि. गरम; उष्ण; ऊब असलेले, उष्णता उत्पन्न करणारे (कापड वगैरे). [का. उब्बे]

उबदारणे अक्रि. सुकू लागणे; गरम होणे :'माळावर वाळू पडलेले गवत सूर्याच्या पहिल्या किरणांनी उबदारले.' – बन २.

उबदारी स्त्री. भरभराट :'जो जो आबाकडून पैसा घेऊन गेला ..... तो कधीच उबदारीला आला नव्हता.' – मिरास २४४.

उबर,उबार पु. अब्रू; प्रतिष्ठा; लौकिक; कीर्ती; वजन; उबार :' .... राजश्री साहेब व सरकारकून तुमचा उबर राहणार नाहींत, म्हणोन दबावीत.' – पुरंदभा ३.१३७.

उबर,उबार पु. आधार; दम; सामर्थ्य; हिंमत; अवसान; बाकी :'सेरीकर बहुत जबून जाले आहेत. कांहीं उबर राहिला नाही.' – पेद ३१.१३; 'खासगीच्या महालांत उपद्रव दिला म्हणजे उबार राहणार नाही.' – पेद २०.४३.

उबरणे अक्रि (खरूज, जखम, गळू वगैरेतून) पाणी बाहेर येणे; उतणे, पुरळ बाहेर पडणे; चिघळणे; वाहणे; पिकणे; वाहायला लागणे; पूर्ण फूलणे (देवी, गोवर इ.); दाठरणे.

उबरणे अक्रि. आकाराला येणे; वाढणे; वर व्यवस्थित दिसू लागणे (मुडी इ.). [सं. उद्+भृ-भर]

उबरा पु. ओढ्याच्या किंवा नदीच्या काठी पाण्यासाठी खणलेला झरा. (को.) [सं. उद्+भृ]

उबरा वि. जो पदार्थ खाल्ला असताना अंगावरील जखमेत पू वाढतो, जखम उबरते असा (पावटा, भोपळा वगैरे पदार्थ). (राजा.)

उबलक, उबलख, उबलंग वि. क्रिवि. १. असंख्य; मुबलक; फार समृद्ध. २. बेहिशेबी, बेअंदाजी; मोघम. ३. अनिश्चितपणे; मोघमपणे. ४. (सौदा, किंमत इ.) पक्का न ठरवता.

उबलणे अक्रि. अस्वस्थ होणे; गलबलणे :'तिचा जीव उबलून आला.' – पेरणी ५१.

उबली स्त्री. दरवाजावर असलेली छावणी; दरवाजातील कोनाडा; वस्तू ठेवण्यासाठी दरवाजावर मारलेली फळी; दारूस्ती. (कु.) [सं. उंबर]

उबले न. दाराची चौकट; दरवाजा. (कु.)[सं. उंबर]

उबवण न. आंबे वगैरेंची आढी घालण्याकरिता वापरण्यात येणारे गवत. (कु.) [का. उब्बे]

उबवण स्त्री. (पशु.) अंड्यांना, त्यांची लवकर वाढ व्हावी म्हणून उष्णता–उब देणे; बॅक्टेरिया, इतर रोगबीजे, गर्भ इत्यादींची उबवणपात्रात वाढ करण्यासाठी त्यांना उष्णता पुरवणे.

उबवणपात्र न. (पशु.) अंडी, बॅक्टेरिया इत्यादींची वाढ करण्यासाठी वापरले जाणारे विशिष्ट प्रकारचे पात्र.

उबवणी केंद्र मोठ्या प्रमाणावर कृत्रिम रीतीने अंडी उबवण्याचे केंद्र.

उबवणे, उबविणे, उबावणे सक्रि. १. ऊब देणे; उष्णता देणे. २. गुदमरविणे; गदमदविणे. ३. उष्णता देऊन पिकवणे (आंबे आढीत घालून वगैरे). ४. उष्णता देऊन वाढविणे (अंडी वगैरे). ५. पिकविणे (गळू वगैरे).

अक्रि. पहा : **उबणे** [का. उब्बे]

उबवणे क्रि. सतावणे; त्रासविणे; उबगविणे.

उबवरा वि. पुरेशी ऊब न जिरल्यामुळे चिवट, चबचबीत झालेला (भात, खिचडी). [का. उब्बे]

उबवले न. अतिशय उष्मा होत असलेली, हवा येत नाही अशी बंद जागा. [का. उब्बल]

उबशी वि. दमेकरी. (गो.)

उबस स्त्री. दमा. (गो.)[क. उब्बस = दमा]

उबसळ स्त्री. भांड्यांना झिलई देण्याचे गोल रंध्यासारखे हत्यार.

उबसाण स्त्री. उबट किंवा कुजट घाण; उबटाण.

उबळ स्त्री. आवेग; खोकल्याची उसळी; ढास :'प्रत्येक खोकल्याची उबळ येण्यापूर्वी मुलास सूचना होऊन तें आईकडे पळते.' – गृहवैद्य ४४. [क. उब्बळ]

उबळणे अक्रि. १. अतिशय उष्णतेमुळे (फळ वगैरे) कुजणे, नासणे. २. गर्भ नासणे, गर्भपात होणे. [क. उब्बे]

उबा स्त्री. उष्णता; ऊब. पहा : **ऊन** :'तेवीचि वन्हित्व आंगी । आणि उबे उबगणे आगी ।' – ज्ञा १८.२२०. [का. उब्बे]

उबागळी स्त्री. समृद्धी; रेलचेल; आधिक्य. (व.)

उबागी कु. ताठा; गर्व :'तुम्हां चढलासे उबागी । हरिदास गाय रंगीं ।।' – बगाथा ६११. पहा : **उबगणे** [क. उब्बु = सुजणे, फुगणे]

उबाणा पु. खटाटोप; परिश्रम :'कामाचा उबाणा फार झाला.' – जनाबाई (नित्यपाठ) २. (व.) [क. उब्बण]

उबार स्त्री. (जमाखर्च) रोजखर्ड्यावर पूर्वदिवशी निघालेली शिल्लक दुसऱ्या दिवशी जमा धरतात ती; हातातील शिल्लक.
वि. १. फाजील; जास्त; अधिक. (व.)२. बाकी; उधारी. ३. हातातील शिलकेसंबंधी.

उबार वि. उंच. (गो.)[सं. उपरि]

उबार पु. १. विश्वास :'स्वामीनीं आज्ञापत्रीं लेखन केलें होते कीं, याजपासीं बोलावयास कोन्हाचा उबार न धरणें.' – पेद २६.२०६. २. पर्वा; किंमत:'मज्यालसीचाही उबार राहिला नाही.' – आंपव्य ३३.

उबार अब्रू; प्रतिष्ठा.

उबारडेंग वि. ऐतोबा; फुकट्या; आयतोबा; ऐतखाऊ; उनाड; भटक्या. (ना.) [सं. उद् + भृ]

उबारणे सक्रि. १. उबवणे (अंडी वगैरे). २. पिकविणे; अढी लावणे (फळे वगैरेंची).
अक्रि. १. उष्णता व आर्द्रता यांच्या योगाने नासणे; कुजणे (फळे किंवा इतर पदार्थ). २. उष्मा होणे; गदमदणे :'ग्रीष्मकाळ दाखवी उष्णा । उबारोनि माझिया प्राणा । कासावीस करीतसे ।।' – मुआदि ४८.७५. ३. खरूज; जखम, पुटकुळ्या वगैरेंतून पू वाहणे; फोड इ. टरटरून फुगणे. [क. उब्बे]

उबारणे उक्रि. पहा : **उभारणे**. १. आकारात आणणे; तयार करणे (वाफा वगैरे). (राजा. कु.) २. अस्ताव्यस्त करणे (केस किंवा काही वस्तू). (राजा. कु.) ३. (प्र.) उभारणे; शिवायच्या कपड्याचे भाग एकत्र करून दोरा घालणे. [सं. उद्+भृ]

उबारा पु. १. उष्णता; ऊब; उष्मा; उन्हाळा; उकाडा :'तंव येरीकडे धनुर्धरा । आसनाचा उबारा ।' – ज्ञा ६.२२१. २. (ल.) संपत्ती; द्रव्य; मालमत्ता. ३. (ल.) पराक्रम; तेज :'तो माझेआं भुजांचा उबारा । कांई साहिल ।।' – शिव ८९३. ४. (सामा.) पहा : **ऊब**. ५. (ल.) आश्रय :'मातें तुझाचि उबारा ।' – रामदासी २.१७२. [सं. उष्मतर]

उबारा पु. आधिक्य; समृद्धी :'जैसा कस्तूरियेचा निकरा । तेथें परिमळाचा उबारा ।' – विसिंपू ७.१०६. [सं. उद्+भृ]

उबारा स्त्री. रोजगुदस्त हातची शिल्लक.
वि. १. जास्तीची, आवश्यकतेहून अधिकची असलेली. २. उधारी; येणे रक्कम.

उबारी स्त्री. उंचवटा. (गो.)[सं. उपरि]

उबाल, उबाळा, उंबाळ न. पु. पसारा; विस्तार; फोफावणे; अतिशय दाट माजणे (तण, झाडझुडूप) :'महामोहाचे उंबाळ ।' – भाए ३०७. [क. उब्बर = आधिक्य, फुगणे, माजणे]

उबावणे अक्रि. १. उकाडा होणे; उष्मा होणे; गदमदणे. २. उष्णतेने किंवा उबेने नासणे, कुजणे (फळे वगैरे). [क. उब्बे]

उबाळ पु. स्त्री. १. उन्हाळा. (गो.) २. आकाशाची अभ्राच्छादित स्थिती. पहा : **उबाळा** [क. उब्बे]

उबाळ स्त्री. ढास. पहा : **खोकल्याची उबळ**

उबाळणे अक्रि. १. उकळणे; शिजणे. २. उष्णतेने नासणे, कुजणे (फळे वगैरे). [क. उब्बे]

उबाळा पु. १. हवेतील उष्णता; उष्मा; गर्मी. २. उन्हाळा. [क. उब्बे]

उबाळा पु. १.पाण्याचा कढ, ऊत, उकळी. (क्रि. येणे). २. उमाळा; आवेग (सुख,दु:ख, करुणा इ.) (क्रि. येणे) ३. जाळ, ज्वाळा उठणे, उसळणे (विस्तवाची)(व.) : 'उठती वन्हीचे उबाळे ।' – दास १६.६.८. [क. उब्बु = वर उडणे, फुगणे]

उबाळा पु. १. भांड्याच्या बुडाला आकार देण्याचे हत्यार. हे जमिनीत उभे पुरून त्याच्या माथ्यावर भांडे ठेवून हातोड्याने ठोकतात. २. (सोनारी धंदा) आंगठी, जोडवे वगैरेंना वाटोळा आकार देण्याचे हत्यार. (को.)

उबाळी स्त्री. अंगठी, जोडवे यांना गोल आकार देण्यासाठी ज्या दांड्यावर ठोकतात, तो दांडा.

उबाळू न. उन्हाळ्यात उष्णतेमुळे होणारे गळू, बेंड.

उबीन स्त्री. (सोनारी धंदा) चांदी.

उबीर पु. बांधकामाकरिता किंवा गिलाव्याकरिता केलेला चिखल. (गो.) [सं. उद्+भृ]

उबूर पु. पार करणे; तरून जाणे. [फा.]

उबेजणे, उबेणे अक्रि. उबणे; उकडू लागणे :'अथवा पक्वानें भुकेलिं । गंगेसि तृशा उपजलि । काइ चंद्रकळा उबेजली । व्यजनाते इच्छिल ।।' – रास ५.८०८. [क. उब्बे]

उबेणे वि. उत्स्फूर्त :'शास्त्राधारू की उबेणे?' – लीचपू २१०.

उबो वि. १. उभा. (गो.) २. (ल.) उभे गंध लावणारा (वैष्णव). [सं. ऊर्ध्व]

उब्या पु. विस्तव; जाळ. (व.) [क. उब्बे]

उब्हत स्त्री. वैभव; मोठेपणा; थोरवी. [फा.]

उब्हतमंझिलत वि. वैभवसंपन्न. [फा.]

उभ वि उभय; दोघे. [सं. उभय]

उभ स्त्री. उभारणी; उत्पत्ती. [सं. ऊर्ध्व किंवा सं. उद्भव]

उभउभ्या क्रिवि. उभाउभी; ताबडतोब; तत्काळ :'अविश्वासें कवळिल्या

चित्ता । अभिमानें म्हणे मी साता । तेव्हा उभउभ्या पळे अस्तिकता । देखे नास्तिकता सर्वत्र ।।' – एभा २३.३१०. [उभचे द्वि.]

उभक न. बैल किंवा रेडा ज्याभोवती फिरतो ते रहाटगाडग्याचे उभे लाकूड. (को.) [स. ऊर्ध्व+काष्ठ]

उभकुडी स्त्री. पांढरी माती पाण्यात कालवून तिने भिंतीला दिलेले सारवण.

उभगात न. खाटेच्या चौकटीची जी दोन उभी गाते (लाकडे) त्यापैकी प्रत्येक. याच्या उलट आडगात.

उभजणे अक्रि. कंटाळणे; त्रासणे; खेद पावणे :'तैं सुविद्यता तोखे । उभजेहीना ।।' – ज्ञा १४.३२९. [क. उब्बकिसु] [सं. उद्+भज्]

उभट, उभंड वि. १. उभा. २. उंच; उंचवट (भांडे, पगडी); रुंदीच्या मानाने उंची अधिक असणारा (चेहरा, भांडे इ.). ३. उभ्या अंगाचा; उंचेला; उभ्या ठेवणीचा. ४. उभड; वर; स्पष्ट; जाहीर :'उभंड निंदा धरिली मुखीं ।' – दावि १६४.

उभड, उभडा, उभंड पु. १. उमाळा; उसळी; उबळ; ढास; गहिवर; आवेग :'त्याचेनि दु:खे उभड आला ।' – मुवन ८.८१. २. खालून वर उसळणारा प्रवाह (पाणी, रक्त इत्यादीचा); झरा; लोट; पूर :'जैसा प्रळयांबूचा उभडु ।' – ज्ञा १६.१३८; 'पहिलिया संकल्पजळाचा उभडा ।' – ज्ञा ७.६९.

उभडणे अक्रि. १. उत्पन्न होणे; प्रादुर्भाव होणे. २. उमाळा; पूर येणे; उसळी येणे; वाढणे :'देहीं शीतकळा उभडे । कां उष्णता अत्यंत चढे ।' – एभा २८.५९९.

उभणी, उभनी स्त्री. उभार; उभारणी; प्रसंग; हकीगत; बनाव :'तऱ्हीं आइकतु रसाळ । उभणी ते ।' – शिव ७६०; 'तेयां भीतरी उभनी गोमटी ।' – शिव ५६९.

उभणे उक्रि. १. उभारणे. उभारले जाणे; रचणे; रचले जाणे; तयार होणे; करणे :'तेव्हेंळी मायाभूमिकेचेनि पसारे । उभिली लिंगदेहांचीं धवळारें ।' – शिव. ९३. [सं. उद्+भवन्]

उभणे अक्रि. थांबणे; ओसरणे (पाऊस वगैरे); बंद पडणे; खळणे.

उभय वि. १. दोघे; दोन; द्वय; दुक्कल; जोडी; जुळे.याचा उत्तरपदाशी समास होतो. उदा. उभयब्राम्हण (दोन जे ब्राम्हण); दोन स्वामी ज्याचे तो उभयस्वामिक, उभयसत्ताक इ. २. ज्या वर्गात दोन गोष्टी असतात किंवा दोनच व्यक्ती, पदार्थ इत्यादीसंबंधी विधान असते तेथे त्या दोनही अभिप्रेत असता वापरायचा शब्द :'एका उभएगंगातीर तैसें । तांबा जाळीं जळत दिसे ।' – सव ४४४.

उभयकुल न. विवाहसंबंधाने जोडलेली दोन्ही कुले; माहेर व सासर.

उभयखुरी, उभयमुखी वि. गाय विताना वासरू बाहेर पडतेवेळी दोन्ही बाजूंना दोन (गाईचे व वासराचे) खूर किंवा तोंडे दिसतात म्हणून त्या स्थितीत असलेली (गाय) :'तंव पुढें देखे कामधेनु । उभयखुरी प्रसवतां अर्धक्षणु । राहिला तेथें ।।' – कथा ३.६.८३.

उभयगामी वि. दोन्ही दिशांकडे, बाजूंकडे जाणारा.

उभयचर वि. जलस्थलवासी; पाण्यात व जमिनीवर किंवा हवेत राहणारा (प्राणी). [सं.]

उभयत: क्रिवि. दोहीकडे; दोन्ही बाजूंनी; दोहोंकडून. [सं.]

उभयत: पाशरज्जू (ल.) दोन्ही बाजूंनी येणारी अडचण; इकडे नई इकडे वई अशी स्थिती; शृंगापत्ती. (सामा.) पेच; पंचाईत.

उभयता सना. दोघेजण; दोन्ही; उभय; द्वय. [सं. उभयत:]

उभयतोमुख वि. दोन्ही दिशांनी पाहणारा; द्विमुखी; दोन दर्शनी बाजू असलेला; दुतोंड्या. [सं.]

उभयतोमुखी स्त्री. १. पहा : **उभयखुरी.** २. दोन प्रवाहांनी वाहणारी नदी, झरा. [सं.]

उभयतोवाही–वाहिनी वि. दोन प्रवाहांनी वाहणारा (प्रवाह, नदी).[सं.]

उभयत्र क्रिवि. दोन्ही बाजूंनी; दोन्ही ठिकाणी; दोन्हीकडे; इकडे आणि तिकडे. [सं.]

उभयदर्शी वि. दोन्ही बाजू पाहणारा, लक्षात घेणारा, दोन्ही बाजूंचा विचार करणारा. [सं.]

उभयद्वारे न. शरीराची मलमूत्रोत्सर्गाची दोन गुह्यद्वारे.

उभयधर्मी वि. दोन्ही प्रकारचे गुणधर्म एकाच ठिकाणी असणारा.[सं.]

उभयनिष्ठ वि. दोन्ही बाजूंविषयी प्रेम, अगत्य असणारा; दोन्ही पक्षांना सांभाळणारा.

उभयपण न. द्वैत; द्वयत्व.

उभयपराङ्मुख वि. दोहोंपैकी कोणतीही गोष्ट न स्वीकारणारा; दुराग्रही; हट्टी. [सं.]

उभयपक्ष पु. दोन्ही बाजू, पक्ष, तट.
क्रिवि. दोहोकडे; दोहीकडे; इह आणि परलोक :'तयांसी लाभे प्रत्यक्ष । महा आनंद उभयपक्ष ।' – गुच ५१.६५.

उभयपक्षीसमान वि. १. दोन्ही बाजूंनी, दोन्ही दृष्टींनी सारखा; दोहो बाजूंना चालण्यासारखा; दोन्ही बाजूसंबंधी अगत्य बाळगणारा. २. नि:पक्षपाती; पूर्वग्रहविरहित; नि:स्पृह; निर्विकल्प. ३. दुतोंड्या; वेळ पाहून वागणारा; दोन्ही डगरीवर हात ठेवणारा; सव्यसाची.

उभयलिंगी पु. स्त्री–पुरुष दोन्ही लिंगी प्राणी, वनस्पती; स्त्रीकेसर – पुंकेसरयुक्त पुष्प; विरुद्धगुणयुक्त पुरुष.
वि. १. ज्या प्राण्यांत, वनस्पतीत, जातीत स्त्री व पुरुष जननेंद्रिये एकाच शरीरात असतात असे (प्राणी, वनस्पती). २. हिजडा; षंढ.

उभयलोक पु. स्वर्गलोक व मृत्युलोक; इहपर लोक :'जेणें करितां उभयलोक । संतुष्ट होती ।।' – दास ११.३.२.

उभयविकल्प पु. दोन पर्याय (हा अथवा तो).

उभयविध वि. १. दोन प्रकारचा, दोन तऱ्हांचा, दोन स्वभावांचा वगैरे. २. (ल.) स्त्री – पुरुषयुक्त. पहा : **उभयलिंगी** ३. सकर्मक व अकर्मक दोन्ही जातींचे (क्रियापद). ४. दुतोंड्या; आत–बाहेर वेगळे असणारा; दोन्ही डगरींवर हात ठेवणारा; एकनिष्ठ नसणारा. [सं.]

उभयशौच न. मन व शरीर या दोहोंची शुद्धी :'गृहस्थें व्हावया निष्पाप । ठाके तो करावा जपतप । उभयशौचांचे स्वरूप । अति साटोप करावें ।।' – एभा १८.३१८. [सं.]

उभयसाधारण, उभयसामान्य पहा : **उभयपक्षी समान**

उभयस्वामिक, उभयसत्ताक वि. दोन धनी असलेला; दोघांच्या सत्तेखाली असलेला. [सं.]

उभयग्र पहा : **एकस्पर्शरेषा गाठबिंदु**

उभयान्वयी वि. १. दोघांना जोडणारा; दोन्ही बाजूंचा; उभयपक्षनिष्ठ; दोन्ही पक्षांशी संबंध ठेवणारा; दुतोंड्या :'उत्तर हिंदुस्थानातले उपद्व्यापी ... संस्थानिक, कर्नल हस्करासारखे त्यांचे हस्तक व प्रो. रशब्रुक वुल्यम्ससारखे उभयान्वयी स्वार्थसाधक त्यांचे स्तोम माजणार कसें?' – केसासं २.१९३. [सं.]

उभयान्वयी अव्यय (व्या.) दोन शब्द किंवा वाक्ये जोडणारा शब्द. उदा. आणि, व, जर, तर, परंतु इ.

उभयान्वित वि. १. दोन्ही बाजूंनी जोडलेला; दोन्ही बाजूंशी संबंध असलेला. २. पहा : **उभयान्वयी अव्यय** [सं.]

उभयार्थ वि. १. दोन अर्थ होतात असा; द्व्यर्थी; दोन तऱ्हांनी लावता येईल असे :'हे बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी ।' – नळ १२२. २. (ल.) अनिश्चितार्थ; संशयितार्थ; दुटप्पी; दुरोखी (वचन, भाषण). [सं.]

उभयालंकार पु. (सास.) मिश्र अलंकार; शब्दालंकार आणि अर्थालंकार यांचे मिश्रण :'शृंगार, शृंगालय केसरी हो । सांगा अनंगा नटकेसरी हो। कासे विकासे पट केसरी हो । श्रीशंकली पंकजकेसरी हो ।।' – वामन. [सं.]

उभयां क्रिवि. उभाउभी; उभा असतानाच, उभ्याउभ्या :'एकां उभयांचि प्राण गेले ।' – ज्ञा १.१३५. (वा.) **उभयां घालणे** – उभ्याने अंग टाकणे :'तैसेचि आपणयातें उभयां घातलें.' – लीचउ २१६.

उभरण पहा : **उभवण**

उभरणी पहा : **उभणी, उभारणी,उभवणी.**

उभरणे उक्रि. १. उफणणे; पाखडणे; वारवणे. २. उतणे (बिब्बा वगैरे). (व.) ३. (धान्य, वाळू वगैरे) ओतणे; रिकामे करणे. [सं.]

उभरंग पु. फिक्का, फिकट रंग; अस्पष्ट, विटलेला रंग.
वि. फिकट रंगाचे; विटलेले; विटलेल्या रंगाचे (वस्त्र).

उभरा वि. फिक्का; फिकट; विटलेला.

उभरा चाप (स्था.) बाहेरच्या बाजूने गोलाकार व उंच असलेली कमान.

उभराभरी, उभराउभरी स्त्री. (भरीवर भर) गर्दी; दाटी; लांबलचक यादी; रांग; पंक्ती :'आतां काय करूं या वरि । रिगैन परमेश्वरांचा मंधिरीं । दोषांची उच्चारीन उभराभरि ।सासर्दोती फुडां ।।' – ख्रिपु २.३७.६४. (वा.) **उभराभर करणे –** उभारणे; गोळा करणे :'मीं गावां जाइन : उभराभरि करिन. ' – लीचउ २५६.

उभरिणे सक्रि. उभे करणे; थांबवणे.

उभला, उभले पु. उंबरठा; उंबरा; दारवंठा :'वाणसियेचें उभलें । कोण न रिगे ।।' – ज्ञा १३.७०१. पहा : **उंबरा**

उभवट स्त्री. उभारणी; बांधा; ठेवण :'म्हणे धाकटी उभवट माझी नवी तरणी माती ।' – पला ७६.

उभवण न. पाऊस निवारण करण्याचे साधन; छत्री, इरले .

उभवण स्त्री. उभारणे; उभे करणे.

उभवण, उभवीण स्त्री. (विणकाम) ताणा; उभेदोरे.

उभवणी स्त्री. १. उभारणी; उठावणी; रचना; स्थापना; बांधणी. पहा : **उभणी** :'जेवीं का नटाची रावोराणी । दोघें खेळती लटिकेपणीं । तेवीं प्रकृतिपुरुषउगवणी । मिथ्यापणी जो जाणे ।।' – एभा १९.२७. २. (ल.) (दारिद्र्य, आजार वगैरे पासून) मुक्तता; ऊर्जितावस्था; वर डोके काढणे; उठणे; उठवणे; पायावर उभे करणे. ३. धंदा, व्यापार वगैरेंची स्थापना, उभारणी. ४. पसारा; ज्याची उभारी केली आहे ती वस्तू, गोष्ट :'असो हे उभवणी मायामय । जेणे रचिली ।।' – विसिंपू ४.७९.

उभवणे, उभविणे सक्रि. १. उभारणे; उभे करणे; रचणे; स्थापन करणे :'गगनावरी उभवावें । घडें केवीं ।।' – ज्ञा १०.१२; 'मठ मंडप उभविले ।' – मुआदि २७.५२. २. थांबविणे; उभे करून ठेवणे. ३. पाऊस थांबेपर्यंत आश्रय घेणे; थांबणे; पर्जन्य टाळणे. ४. उपयोगानंतर उभे करणे, जागेवर ठेवणे (जाते वगैरे). ५. विस्कटणे; उभे करणे; विखुरणे (केस वगैरे). [सं. ऊर्ध्व+भू – भवन]

उभवणे अक्रि. १. उभे राहणे; उभे करणे; ताठ, सरळ होणे; स्थापित होणे; रचले जाणे :'वाळूवाळूत कुणीतरी उभवून ठेवल्यासारखे घोळके ....' – गणूराया १. २.(ल.) आजारातून उठणे; गरिबीतून किंवा अज्ञात स्थितीतून वर येणे; स्वतःच्या पायावर उभे राहणे. ३. बंद होणे; थांबणे (पाऊस). [सं. ऊर्ध्व]

उभविता वि. उभवणी, उभारणी करणारा :'यांचा प्रभु तोचि उभविला तनया ।' – मोमंभा २.२६. दारिद्र्यापासून, आजारापासून सोडविणारा; ऊर्जितावस्थेस आणणारा.

उभसिंग वि. उभ्या शिंगाचे :'चवरियांचे पाडे उभसिंग :' – रुस्व ७४५.

उभस्वना स्त्री. निर्भर्त्सना; चारचौघांत फटफजिती; उपहास. (को.) [सं. उद्+भर्त्सन]

उभळ स्त्री. कोंड्यातून सुपाने पाखडून वेगळी काढलेली कणी. [सं. उद्+भल्ल्]

उभळ, उभळी स्त्री. १. खोकल्याची ढास. पहा : **उबळ** :'उभळीचा उजगारा । उबगु सेजारिल्या घरा ।।' – एभा ९.२७०. [क. उम्मलु]. २. तीव्र उत्कंठा; उत्सुकता; उतावळी.

उभळण स्त्री. उबळ.

उभळणे अक्रि. १. सुपाने कोंडा वगैरेतून कणी वेगळी करणे; पाखडणे. २. नवीन जात्यात थोडे दळून ते चालू करणे व ते कसे चालते ते पाहणे; जात्यातील घास काढून टाकणे. [सं. उद्+भल्ल्]

उभळणे अक्रि. उकळणे (मद्य वगैरे). [क. उब्बे]

उभळणे अक्रि. उत्कंठित, अधीर, उतावीळ होणे. (राजा.)

उभळा वि. उभारलेला.

उभंड पहा : **उभट, उभड**

उभा वि. १. ताठ; खडा; आडवा नसलेला; न वाकलेला; न बसलेला. २. सरळ दिशेत असलेला; लांबीच्या अनुषंगाने सरळ रेषेत असणारा (रस्ता). याच्या उलट आडवा (रस्ता). ३. चालू; सुरू असलेला (धंदा वगैरे). ४. न कापलेले; शेतात उभे असलेले (पीक वगैरे). ५. तयार; उत्सुक; पुढे आलेला सिद्ध. ६.सतत; अढळ; जागृत; पक्का; तीव्र (द्वेष, दावा वगैरे). ७. संपूर्ण; सर्व; अथपासून इतिपर्यंत (संवत्सर, साल, वर्ष वगैरे). ८. सारखा चालू असलेला; खळ न पडणारा; फार वेळ टिकणारा; अविरत (पाऊस, वारा वगैरे). ९. सरळ धारा पडत आहेत

असा (पाऊस). १०. थेट समोरून येणारा, तोंडावर येणारा; विरुद्ध दिशेकडून येणारा (वारा वगैरे). ११. गती नसलेला; थांबलेला; स्थिर. [सं. ऊर्ध्व] (वा.) **उभा करणे** – पुन्हा सुरुवात करणे, नव्याने आरंभ करणे (काम, धंदा वगैरे). **उभा खाणे** – फायलावर घेणे; हजेरी घेणे :'तातुल्याच्या हाताला गावतो तर मला उभा खाता.' – पक्षिणी १०. **उभा जाळणे** – अत्यंत हाल करणे; अतिशय त्रास देणे; छळणे. **उभा ठाकणे** – १. उत्पन्न होणे; समोर येणे :'संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला ।।' – दास १२.९.२४. २. (एखादे काम करायला) तयार होणे :'थोडासा प्रतिकार झाला तरी त्यांचे सहर्ष स्वागत करून मारामारीला उभं ठाकणं ...' – एल्गार ७. **उभा ठेवणे** – पहा : **उभा करणे. उभा नासणे** – सर्व नाश होणे; तात्काळ नासणे :'जे शब्दी वदोनी उभा । संसारनासी ।।' – दास १.२.९. **उभा धरणे** – निर्बंधात ठेवणे; कडक शिस्तीत वागविणे; जाचणूक करणे; त्रास देणे; (धनकोने रिणकोस, मुलाने आईस वगैरे). **उभा राहणे** – १. मिळणे; प्राप्त होणे; लाभणे (फायदा, नफा वगैरे); परत मिळविणे; वसूल होणे; संपादन करणे. २. घडणे; जवळ येणे; निकट येणे (एखादी गोष्ट किंवा कृत्य); प्राप्त होणे; आवश्यक होणे. ३. साहाय्य करण्यास पुढे येणे; तयार होणे; सिद्ध होणे :'बहुत जन वास पाहे । वेळेसी तत्काळ उभा राहे ।' – दास १९.४.११. ४. एखाद्या संकटातून वर येणे; नशीब काढणे. ५. पोटात गोळा उभा राहणे; संकट येणे; उपस्थित होणे. ६. आड येणे; अडचण, प्रतिबंध होणे; पुढे येणे. ७. उत्पन्न होणे; मिळणे; प्राप्त होणे (किंमत वगैरे) :'या मालाचे रुपये पाच हजार उभे राहिले की, माझे वडील भाग्योदय मानतील.' – विवि १०.५.१९७. ८. अनुकूल होणे :'उभे राहिलें भाग्य बिभीषणाचे ।' – राक १.७१. ९. थांबून राहणे. १०. निवडणुकीत उमेदवार म्हणून नाव देणे.

उभाईत वि. दोघांच्या मालकीचा. पहा : **उभागत** (को.)[सं. उभयता]

उभाउभी क्रिवि. त्वरेने; घाईघाईने; लवकर; तात्काळ; झटपट; वेगाने: 'उभाउभी फळ । अंगी मंत्राचिया बळ ।।' – तुगा २४७२. [उभाचे द्वि.]

उभा करणे सक्रि. १. थांबविणे; थांबवून ठेवणे; गती बंद करणे; स्तब्ध करणे. २. बंद करणे; तात्पुरता थांबविणे; काही काळ थोपविणे (धंदा, काम वगैरे). ३. रचणे; उभारणे; तयार करणे. ४. (बायकी) धुताना लांब वस्त्र एका पदरापासून दुसऱ्या पदरापर्यंत सारखे करून घेणे. ५. उत्पन्न करणे; आणणे :'शिवाजी महाराजांच्या नेत्रातून देखील अश्रू उभे केले.' – इंप १०६. ६. आडवी पडलेली वस्तू लंब रेषेत काटकोनात ठेवणे. ७. गोळा करणे; मिळविणे.

उभा झडपा, सूळ सरळ लंब रेषेत असलेला डोंगराचा कडा, सुळका.

उभा खो खो एक भारतीय खेळ.

उभागत वि. समाईक; वाटण्या न केलेले; दोन मालकांचे (शेतातील उभे पीक इ.) पहा : **उभाईत**

उभा छेद (शाप.) एखादी वस्तू उभी (ओळंब्यात) वरपासून खालपर्यंत कापली असताना दिसणारे दृश्य.

उभाट, उभाड वि. उंच; उंच बांध्याचा (मनुष्य वगैरे); सरळ, वर वाढणारे. व पसरणारे (झाड वगैरे) :'महाभूतांचे एकावट । सैरा वेंटाळु उभाट ।' – राज्ञा १३.४६.

उभाट्या पहा : **उभेट्या**

उभाड, उभाडांग, उभाड्याचा, उभाटा वि. वयाच्या मानाने अधिक उंच; उफाड्याचा; विशेष वाढ झालेला; जोमदार; चांगला तयार, सशक्त (मुलगा, झाड इ.).

उभा दावा हाडवैर; अक्षय, कायमचे वैर.

उभा दांडा १. उभा, सरळ खांब. २.(ल.) सरळ व्यवहार; सरळ वर्तन; युक्तीचे, कुशलतेचे वर्तन.

उभा दोरा धावदोरा; कच्ची शिवण.

उभा नाहणे अक्रि. सर्वांगावरून ओघळणे; पाझरणे; निथळणे (घाम, रक्त वगैरे).

उभा पाऊस मोठा, सरळ धारांनी पडणारा पाऊस; न खळणारा पाऊस.

उभा पाहारा १. खडा पाहारा; अत्यंत काळजीपूर्वक, डोळ्यांत तेल घालून केलेली राखण. २. सारखे उभे राहणे; बसायला फुरसत न मिळणे; एकसारखे कष्ट; विश्रांतीचा अभाव :'दिवसभऱ्याच्या उभ्या पहाऱ्यात अंग भरून येऊन रात्रीं मेलं केव्हां एकदा आडवी होईन असं होऊन गेलं, – नाट्यछटा (फाटक) २. ३.(ल.) एकसारखी केलेली चाकरी, सेवा; एखाद्या आजाऱ्याची एकसारखी केलेली शुश्रूषा.

उभा बाजार १. या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्व बाजार; सगळी बाजारपेठ. २. भरबाजार; बाजाराचा मध्यभाग, चव्हाटा.

उभा मार्ग १. राजरस्ता; सार्वजनिक रस्ता; रहदारीचा रस्ता; मोठा रस्ता; हमरस्ता. २. या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्व, सगळा रस्ता. ३. सरळ रस्ता; आडवा नसलेला, वाकडातिकडा नसलेला रस्ता. ४. (ल.) सरळ प्रामाणिक वर्तन, व्यवहार. (वा.) **उभ्या मार्गाने जाणे, येणे** – सरळ मार्गाने, न थांबता जाणे; वाकडेतिकडे न जाणे.

उभा माल तयार झालेले पण न कापलेले शेतातील पीक.

उभार स्त्री.१. उंची; उभट, उंचट, उभ्या आकाराचा; डौल (पात्र, पागोटे इ.चा). २. उभारणी; रचना :'ब्रम्हांड पिंडउभार । पिंडब्रम्हांड संव्हार ।' –दास १२५.१४. ३. बायकांच्या चोळीचे पुढील दोन तुकडे.
पु. १. उत्साह. २. गर्व; ताठा.
वि. १. उंच, वर आलेले, भरलेले :'उभार छाती तरतरित । सुरूप गुणाने अशी जी कांता ती पाणी करते झरझरित ।' – प्रला १६८. २. आडवे नसलेले; सरळ; उंचवट (पात्र, पागोटे इ.). [सं. उद्+भृ]

उभार पु. १. उबार; ऊर; पुरेसा होऊन अधिक राहिलेला; अवशिष्ट पदार्थ. २. घोड्याच्या तोबऱ्यातील घोड्याने खाऊन उरलेले दाणे; चारण्याच्या दाण्यातून पुढे दुसऱ्या वेळी चारण्यासाठी काढून ठेवतात ते दाणे. पहा : **उबार**

उभार पु. उभा धागा.

उभारक पु. (यंत्र.) यंत्रसामग्री व तत्सम बांधकामाची उभारणी करणारी व्यक्ती, यंत्र इ.

उभारणी स्त्री. १. मांडणी; रचना; बांधणी; पसारा; विस्तार. पहा : **उभवणी**. २. उभे राहण्याची क्रिया.

उभारणी स्त्री. घटना; हकीगत; प्रसंग इ.

उभारणी स्त्री. उसाचा रस कढविताना त्याला येणारी उकळी.[सं. उद्+भृ]

(वा.) **उभारणीस येणे –** तयार होण्यापर्यंत पोचणे; सिद्ध होण्याच्या अवस्थेस येणे.

उभारणी स्त्री. तयारी; इच्छा :'आपल्या मुखचर्येवरून तर आपली देण्याची उभारणी दिसते.' – मंजु ३१.

उभारणी कारागीर (स्था.) इमारतीचे बांधकाम करणारा, उभारणी करणारा मजूर, कारागीर.

उभारणी मोगर (यंत्र.) ठोकून गड्डू करण्यासाठी वापरात येणारा हातोडा.

उभारणी यंत्र (यंत्र.) ठोकून गड्डू करण्याचे यांत्रिक साधन.

उभारणे उक्रि. १. उभे करणे; रचणे; स्थापन करणे; सरळ लंबरेषेत बसविणे :'परि महाभूतांचे दळवाडें । उभारी भलें ।।' – ज्ञा ५.७८. २. चालू करणे; सुरू करणे; गती देणे (धंदा, काम वगैरे); स्थापना करणे :'लॉर्ड रेडिंग यांनीं लष्करी कोर्टे उभारण्याची चुकी केली.' – के १०.६.३०. ३. वर आणणे; ऊर्जितावस्थेस आणणे; पुढे आणणे (व्यापार, धंदा). ४. प्रवृत्त करणे; पुढे करणे. ५. वर उचलणे; उंची वाढविणे (ठेंगण्या वस्तूची किंवा इमारतीची). ६. उत्पन्न करणे; कल्पिणे; मनाशी बांधणे (तर्क, कल्पना, पद्धती वगैरे) :'म्हणुनि तर्क उभारिती कामिनी ।'. ७. एखादे शिवायचे वस्त्र तुकडे जोडून व धावदोरा घालून एकत्र करणे; कच्चे काम करणे; एखादा सांगाडा तात्पुरता रचणे. अक्रि. १. उठणे; उभे राहणे; ताठ, खडा, सरळ होणे :'पालवितो करीं उभारूनि बाहे । कृपावंता पाहे मजकडे ।'. २. उभे राहणे; सरळ होणे (केस वगैरे). ३. वर येणे; उठणे; उत्पन्न होणे; बाहेर पडणे (पुळी, गळू वगैरे) :'तो तसा गिळितसा न उभारे ।' – गजेंद्र मोक्ष (रघुनाथ पंडित) ३७.

उभारणे सक्रि. (अर्थ.) १. एखादी कंपनी, संस्था, उपक्रम सुरू करणे. २. नवीन कंपनीसाठी लागणारे भांडवल उभारण्यासाठी कर्जरोखे किंवा भाग विक्रीस काढणे.

उभारत क्रिवि. १. समायिक मालमत्ता, भांडवल, मालकीची वस्तू वगैरेंचे निरनिराळे मालकीचे विशिष्ट भाग प्रत्यक्ष न पाहता एकत्रित रीतीने. २. अनिर्णित; विचार चालू असताना; शेवटास गेले नसताना; निकालात न निघता. ३. सामान्यत; विशिष्ट व्यक्तीस उद्देशून नसलेले; सर्वसाधारण (भाषण). ४. पक्का ठरलेला नसताना (पगार वगैरे); दोन्ही बाजूंनी निश्चितपणे मान्य केलेली नसताना (किंमत, अट वगैरे); नक्की न तोलता; अमोज; अमाप (धान्य वगैरे). पहा : **उभाईत**

उभारतपणा पु. नि:पक्षपातीपणा; नि:स्पृहता.

उभारा पु. १. उभारणी; रचना; विस्तार; मांडणी :'तरी सत्यचि गा धनुर्धरा । सर्व कर्मांचा उभारा ।' – ज्ञा १८.३०४. २. स्थिती; अस्तित्व :'शीत उष्ण पर्जन्यधारा । अंगी न लागती अंबरा । तेवी साधूचा उभारा । द्वंद्व संभारानिर्द्वंद्व ।।' – एभा ११.९४७. ३ शरीराची ठेवण, बांधा :'अंगे सर्वांग सुकुमार । मनोहर उभारा ।' – एरुस्व १५.५०. ४. पोकळ अवसान; उठावणी; आकार; डौल :'तुका म्हणे उभाऱ्यानें । खरे कोण मानितसे ।' – तुगा ३१८६. ५. फैलाव; दरवळणे; पसरणे; प्रसार; विस्तार :'जैसा कस्तुरीचा निकरा । तेथे परिमळाचा उभारा । तैसा ज्ञानाने शिष्यवरा । जन्मलासि तूं ।।'. ६. चालू स्थिती; अस्तित्व :'ऐश्वर्येसी ईश्वरा । जियेचे आंग संसारा । आपलाही उभारा । आपणचि जो ।।' – अमृ १.२९. [सं. उद्+भृ]

उभारा पु. १. इच्छा; मनोविकाराची प्रवृत्ती; उमाळा :'वनि व्याघ्र वृकादिक सारे हिंसेचा त्यजति उभारा ।' – देप ८८.४. २. उसाचा रस कढविताना त्याला येणारी उकळी, ऊत. (क्रि. येणे) :'रसास उभारा येतो म्हणजे … रस उतू जाऊ लागतो.' – कृषि ४७२. (वा.) **उभारा धरणे** – पुढाकार घेणे; उद्युक्त होणे :'परित्राणाय साधूच्या उभारा, धरीं निवठाया सर्व भूमिभारा ।' – कृष्णजन्म (देवनाथ) ३. [सं. उद्+भृ]

उभारा, उभाळा पु. नालबंदाची ऐरण, ठोकळा.

उभारी स्त्री. बैलगाडीत भरती जास्त व्हावी म्हणून उभी लावलेली काठी; खुंटाच्या खाचरात कापूस वगैरे भरण्याच्या वेळी खाचराच्या टोकावर भोवताली दोन हात लांबीची लावण्यात येणारी उभी दांडकी. (व.) [सं. उद्+भृ – भर]

उभारी स्त्री. उमेद; इच्छा; निश्चय; टणकपणा :'त्यांची सारी उभारी, सारा करारीपणा लोळागोळा होऊन पडला होता.' – विभूत २१.

उभारी स्त्री. उत्साह; नेट; जोर; तरतरी; हुशारी. (क्रि. धरणे.) :'अरि भारी भारी अवघड उभारी धरितसे ।' – द्रौपदी (किंकर) ४३. (वा.) **उभारी धरणे –** पुढे येणे; प्रगती करणे :'रॉय यांच्यासारखा नेता लाभूनसुद्धा ज्यांना भारतात उभारी धरता आली नाही …' आआ १०७.

उभारू पु. आजार, गरिबीचे दिवस इ संपणे.

उभा लगाम कमानदार लगाम.

उभावणे पहा : **उभणे, उभविणे** :'नीलांकुरोद्रेक मध्यें उभावे ।' – मुद्गलार्या भाषांतर (हरिराज) ८७.

उभावे न. उभारलेली रचना; मांडव; उभे राहणे :'गगनावरि उभावें । घडे केवि ।।' – राज्ञा १०.१२.

उभा शिवार न. कापलेले, उभे पीक. (वा.) **उभा शिवार टाकून जाणे, पळणे –** परचक्र वगैरे आले असताना पीक काढून न घेता, काही बरोबर न घेता पळून जाणे.

उभास पहा : **उभासणे**

उभासणे अक्रि. भास होणे; दिसणे :'भूपाळ जो मम मनोमुकुरीं उभासे ।' – दस्व २०८. [सं. उद्+भास]

उभा सूळ पहा : **उभा खडपा, उभा कडा**

उभासोट वि. क्रिवि. अगदी सरळ उभा; उभाच्या उभा.

उभा होणे अक्रि. थांबणे; तात्पुरता बंद होणे; विश्रांती घेणे.

उभाळ पु. १. हुंदका :'येती दु:खाचे भरूनि उभाळ ।' – ऐपो ४७०. २. मनोविकाराची उसळी.

भाळ ज्वाळा. (व.) पहा : **उबाळा**

उभाळा पहा : **उभड** :'दु:खाचे डोंगर उभाळा सुटला.' – ऐपं ३३६.

उभांग (उभाङ्ग) वि. उंचट; सामान्यापेक्षा अधिक उंच असलेला; उंचेला; उभार; अंगापिंडाने चांगला.

उभिणे अक्रि. उभारणे :'गुढीया उभिलीया' – लीचपू १७.

उभी क्रिवि. उभ्या उभ्या; घाईने :'मनादिकें व्यापारु । सांडितीं उभीं ।।' – ज्ञा. १८.७३७.

उभीउभी पहा : **उभाउभी** :'चिमणगावच्या ठाण्यांत नेऊन उभीउभी सेंभर

रुपये घेतले.' - पेद २०.७७.

उभी कुडी उंच, सडपातळ बांधा; उभी ठेवण.

उभी चतुर्थी, उभी चौथ वद्य पक्षातील चतुर्थी; संकष्ट चतुर्थी. या दिवशी सकाळपासून चंद्र उगवेपर्यंत उभे राहण्याचे काहींचे व्रत असते.

उभी चाकरी त्रासदायक, जिकिरीची चाकरी, सेवा.

उभी दुपार भर दोन प्रहर; ऐन दुपारची वेळ; ऐन मध्यान्ह.

उभी धाव सरळ, वर डोंगरावर चढणे :'उभी धांव घ्यावी गिरी तो चढावा ।' - दावि १४५.

उभी पट्टी नेहमीच्या ठरावीक वसुलाखेरीज अधिक वसूल करण्याकरिता बसविलेली पट्टी किंवा कर.

उभी पेट,पेठ या टोकापासून त्या टोकापर्यंतचे सर्व शहर, बाजार. पहा : **उभा बाजार**

उभीया क्रिवि. उभ्याने; उभे राहून :'भुतानंदा : उभीया पुरीया रवा :' - लीचउ १९.

उभी रास १. मोजमाप न करता, न विभागता, जशीच्या तशीच ठेवलेली धान्याची रास. शेतातून आणलेले धान्य प्रथम नुसते ढीग करून ठेवलेले असते त्याला म्हणतात. २. (ल.) सर्व मालमत्ता, संपत्ती, जिंदगी.

उभी विळी ज्या विळीचे पाते मोडता येत नाही किंवा मिटता येत नाही अशी विळी.

उभी संघटना स्त्री. (अर्थ.) एकाच क्षेत्रातील एकाहून एक वरच्या संस्थांची किंवा खात्यांची संघटना.

उभे न. १. उभारणी; मांडणी :'म्हणोनि समभागें शुभाशुभें । मिळोनि अनुष्ठानाचें उभें ।' - ज्ञा १८.२४७. २. नुसते गुंडाळून घेण्यासाठी स्त्रिया वापरतात ते वस्त्र.

उभेकडी वि. वरून खाली अशा प्रकारे एका ओळीत असलेला: 'धनगरणीनीं उभेकडी सारवणे घातली.' - बनगर ८९.

उभे काम जरूरीचे, अगत्याचे, निकडीचे काम.

उभे कुंकू वैष्णव स्त्रिया लावतात त्या पद्धतीचे, उभ्या गंधासारखे (बदामी आकाराचे) लावलेले कुंकू.

उभे **कुंड** (चांभारी धंदा) चामडे भिजत ठेवण्याकरिता लागणारे रांजणाच्या आकाराचे खापराचे कुंड.

उभे खाणे सक्रि. सर्व-समूळ नाहीसे करणे :'लोह उभें खाय माती । तें परिसाचिये संगती । सोनें जालया पुढतीं । न शिविजे मळें ।।' - ज्ञा १८.१४०८. (वा.) **उभे नेसणे, उभे घेणे, उभे लावून घेणे, उभे लावणे** - वस्त्र बदलण्यापूर्वी दुसरे एखादे जुने वस्त्र अंगाभोवती गुंडाळणे; स्नान करण्याकरिता लहानसे वस्त्र नेसणे. आडवे नेसणे. याच्या उलट. या दोन वाक्प्रचारांचे अर्थ कोकण व देश या प्रांतात परस्परविरुद्ध आहेत. कोकण प्रांतात आडवे नेसणे याचा अर्थ व्यवस्थितपणाने व पद्धतीरपणाने नेसणे असा होतो; तर देशावर, आडवे नेसणे याचा अर्थ आड लावून घेणे, तात्पुरते किंवा लहान वस्त्र नेसणे असा होतो.

उभेटा पहा : **उभंट, उभट**

उभेट्या क्रिवि. उभ्याने. (गो.)

उभेणे अक्रि. १. उभे राहणे :'उठोनि उभेला सन्मुखी ।' - दावि ४०१. २. उभारणे :'रामराज्याची उभेली गुढी ।' - दावि १६७.

उभेदीघ वि.उंच नीच :'मोटे धाटे : उभेदीघ : भीक्षा का मागत असां :' - लीचपू ६.

उभे दुखणे आंथरूणाला न खिळविणारे, साधे दुखणे; किरकोळ दुखणे.

उभे दोन प्रहर पहा : **उभी दुपार** :'आपल्या झोपड्यांवर उभ्या दोन प्रहरी चांगलें ऊन पडतें.' - पाव्ह २७.

उभे धावेने क्रिवि. दौडता दौडता; विसावा न घेता :'केवळ उभे धावेने चार महाल आलियाने शत्रुचें पारपत्य जाहलें ऐसे नाहीं.' - मइसा ८.१७९.

उभेपण न. १. उभे असलेली स्थिती. २. (ल) जिवंतपणा :'आतां उभयां उभेपण नाहीं जयाचें । या पडिलिया गहन कवन तयाचें ।' - ज्ञा ८.६३.

उभे पळणे उभ्या उभ्या न थांबता एक सारखे पळत जाणे.

उभे पीक शेतात तयार झालेले पण न कापलेले पीक :'या जागेत उभी पिके असून ...'- डुकराची शिकार (बडोदे) २०.

उभे फुटून झाडाला वर जाणाऱ्या फांद्या येऊन.

उभेया क्रिवि. (ल.) जिवंतपणी :'उभेयां उभेपण नाहि जेयाचे । पडिलेयां गहन कवण तेयाचे ।।' - राज्ञा ८.६२.

उभे वर्ष साद्यंत, आरंभापासून शेवटपर्यंतचे वर्ष .

उभे वारे १. गडबड, गोंधळ. २. उदासीनता. (क्रि. सुटणे).

उभे वैर पहा: **उभा दावा**

उभे सुकणे १. झाड उभ्या स्थितीत असतानाच वाळणे. २.सर्व शरीर दुःखाने, काळजीने कृश होणे, वाळणे :'लेंकूरूंवाचेनि दुःखें । जेवि माउली उभी सुकें ।' - ऋ ४६.

उभे सैर उभ्या उभ्या; उभ्याने :'नादाचेनि घर्घरीं । बैसलीं वीरांचीं दांतेरीं । किरकिरोनि वाली कुंजरीं । उभे सैरीं उसांडला ।।' - भारा बाल २०.४८.

उभौ वि.दोन; दोघे :'कां उभौ येकलीं वर्णितां ।।' - दावि २५७.[सं.]

उभ्या घाईने १. क्रिवि. उतावीळपणाने; अतिशय घाई; उत्कंठेने (हाक मारणे, ओरडणे). (क्रि. करणे) २. मोठ्या कळकळीने; आग्रहाने; जोराने (धावणे, विनवणे इ.)

उभ्या जन्मात सबंध आयुष्यात; कारकीर्दीत : 'धृतराष्ट्राने ही करामत उभ्या जन्मात एकदाच केली' - भा ३९.

उभ्याने क्रिवि. मग्रूरीने; अविनयाने.

उभ्या पायाने अतिशय तत्परतेने : 'शंकरजी व परशुराम हे दोन महत्त्वाकांक्षी ब्राह्मण नेहमी बाईसाहेबांच्या तैनातीत उभ्या पायाने असतात.' - स्वप १३१.

उभ्या मालाची पाहणी शेतातील पिकाचा अंदाज.

उमकळणे सक्रि. अधांतरी ठेवणे; लोंबकळत ठेवणे, टांगणे. (गो.) [सं. उत्+कलन=धरणे]

उमका,उमरखा स्त्री. उत्कट इच्छा; प्रवृत्ती; आवेग : 'शिवाय विकत घेण्याची उमका अन् पैसा साऱ्यांच्याच पालकांजवळ नसे.' - सांज ९०. [सं. उद्+मनीषा]

उमग पु. १. आढळ; शोध (लपलेली, हरवलेली गोष्ट); ठावठिकाणाचे ज्ञान, माहिती. (क्रि. पडणे, पाडणे). :'कुंतीचा भाउ मग स्थिर राहे घेत आप्तलाभा उमग ।' - मोकृष्ण ४९.६. २. समज; समजूत.

पहा : **उमज** [सं. उद्+मज्ज]

उमग पडणे १. ज्ञान होणे; पूर्णपणे लक्षात येणे :'आले कुठून आणि जातात कोठे याचा उमग लोकांना पडेपर्यंत ....' - उअं २०. २. सवड होणे; निकाल होणे :'तेव्हां नागमंगली राहून कर्जवाम पट्टणांतून अतिसंकटें काढून आणून चार दिवस त्यास खर्चाचा उमग पडे ऐसे करूं.' - पेद २८.२५५.

उमगणे, उमंगणे उक्रि. १. आढळणे; दिसणे; सापडणे; शोध लागणे. २. शोधणे; धुंडाळणे; ओळखणे; समजणे : 'काळातें दमणार मी उमगितें धुंडोनिया बाळ जी ।।'- आपू ९.

अक्रि. उघडकीला येणे; जाहीर होणे; गुप्त न राहणे; उलगडा होणे; प्रकाशात येणे. [सं. उद्+मज्ज्]

उमगा वि. उमगायची (गोष्ट); गुपित; गुप्त (गोष्ट). [कर्ना.]

उमग्या वि.उमगून, शोधून काढणारा; माग, तपास लावणारा; धुंडाळणारा.

उमच स्त्री. उपकारांची परतफेड; कृतज्ञता; प्रत्युपकार. [सं. उद्+मज्जन]

उमचणे उक्रि. उपकारातून बाहेर पडणे; मोकळे होणे; सुटणे; उपकाराची फेड करणे; उसने फेडणे :'आणि दान जया द्यावें । तयातें ऐसेंया पाहावें । जया घेतलें नुमचवे । कायसेंनही । - ज्ञा १७.२७८.

उमचळणे अक्रि. उमळणे; उन्मळणे; लवंडणे; उपटून येणे; उलथून पडणे (झाड वगैरे). उमचळून पडणे असा सामान्यत: प्रयोग.

उमज पहा : **उमट** :'त्यास आम्ही मराठे-उमज गुप्त काये जाणो?'- पेठेदभा २.२.

उमज पु. १. समज; समजूत; बोध; ज्ञान; माहिती; उमग :'तुम्ही बहु भले मला उमज होय ऐसे कथा ।' - केका १००. २. आकलनशक्ती; शहाणपणा; अक्कल :'कासवीचे परी पाहें दृष्टीं मज । विज्ञानी उमज दावुनियां ।।' - तुगा १०८०. (क्रि. दाखविणे, पडणे, देणे.) [सं. उद्+मज्ज्] (वा.) **उमज पडणे** - पूर्णपणे लक्षात येणे.

उमज पहिली नांगरणी. नांगरणीचे जे उमज, दुरो, तास, अडास हे चार प्रकार त्यापैकी पहिला प्रकार. [कु.]

उमजणे उक्रि. १. समजणे; लक्षात येणे; समजूत पटणे; माहीत होणे :'असें उमजता भले न गुरुभाव तो टाकिती ।' - केका ९७. उमजणे व समजणे यामधील फरक समजणे- केवळ सामान्य ज्ञान होणे, उमजणे पूर्णपणे समजणे, आतील रहस्य माहीत होणे. २.आजारातून उठणे; टवटवीत होणे. ३. जागृत होणे; सावध होणे :'जयां दोघांमाजि येखादें । विपाये उमजलें होय निदें ।।' - अमृ १.१४. ४. मापाचा उतार पाहाणे. (गो.) [सं. उद्+मज्ज्]

उमजसमज स्त्री. वरवर, सामान्य समजूत, ज्ञान.

उमजीक वि. १.तत्काल उमजणारा. २. (ल.) बुद्धिवान; हुशार; चलाख; तीक्ष्ण, तीव्र बुद्धीचा.

उमजून सांगणे नीट खोलून, खुलासेवार सांगणे :'यैसे त्यांस उमजून सांगितले तेव्हा मग पावणसें रु. मात्र प्राप्त जाले.' - चंचूद १३७.

उमट पु. १. आढळ; शोध; थांग; प्रकटता; प्रसिद्धी; परिस्फुटता (क्रि. पडणे) :'... आजी कांहीं उमट तो पडला नाही. तथापि आम्ही सावधपणे आहों.'- ऐलेसं ८९३. २. स्पष्ट; ठळक; प्रामुख्याने पुढे येणे, दिसणे (अज्ञात गोष्ट). ३. निश्चित; पूर्ण कल्पना; ज्ञान; समज. (क्रि. पडणे, होणे.). ४. उबळ; मळमळ; उबक; आवेग. [सं. उन्मृष्ट]

उमट खाणे अक्रि. पहा : **उमटणे** :'कलघटगीकडे किंवा मिश्रीकोटाकडे येण्याच्या शत्रूच्या आवाया आहेत त्यात जिकडे उमट खातील तिकडे आम्हीहि जाऊं.' - ऐलेसं १६७२.

उमटणे, उमंटणे अक्रि. १.दिसणे; आढळणे; प्रकट होणे; जाहीर होणे; उघडकीला येणे :'हा राजकुमरु उमंटला ।' - उभा ४८.४२. २. स्पष्ट होणे; बाहेर पडणे; स्वच्छ होणे; पूर्ण होणे; लक्षात येणे (ध्वनी, आवाज वगैरे) :'शब्द ना उमटती पुढती.' - संग्रामगीते ७२. ३. वर येणे; उठून दिसणे, स्पष्ट होणे :'तैसें अवयेवु उमटलें । वालिपें आडौनि ।' - शिव ७२०. ४. उत्पन्न, उद्भूत होणे; उद्भवणे :'ऐसी वाट पाहे कांही निरोप कां मूळ । काहो कळकळ तुम्हां उमटेचिना ।' - तुगा ४५२. ५. (ठसा, चित्र, प्रतिबिंब इ.) उठणे; स्पष्ट दिसणे; स्वच्छ, अंकित होणे :'जेथ हें संसारचित्र उमटे ।' - ज्ञा ५.१५६. ६. बाहेर पडणे, येणे :'वरुणावती बाहेर सप्त योजन, द्वार केलें उमटावया ।।' - पांप्र १०.१४७. ७. उपटणे; उपटून काढणे. (गो.) [सं. उन्मथ्]

उमटरेखक पु. १. समुद्गर्ता. २. चित्रे वा अक्षरे काढणारा.

उमटरेखन न. उठावकाम; नक्षीचे उठावकाम; उठावचित्र.

उमटा पु. आवड; नाद (किंचित तिरस्कारव्यंजक). (व.) [सं. उद्+मन्]

उमडणे अक्रि. जोर होणे :'वेदना उमडून येऊन तो खाली कोसळला.' - मुखवटे १३६.

उमडणे अक्रि. उपजणे; आढळणे; प्रकट होणे; जाहीर होणे; दिसू लागणे; उत्पन्न होणे :'विपायें घुणाक्षर उमडे ।' - राज्ञा १७.२९९.

उमण पहा : **ओमण** (गो.)

उमणणे अक्रि. मापणे; मोजणे. पहा : **उमाणणे** [सं. उद्+मा]

उमत स्त्री. उमेद :'आता एक उमत हाय तंवरका घसासा राबू.' - रैत ७.

उमतणे उक्रि. ओतणे. (माण.) [सं. उद्+मथ्]

उमती स्त्री. उमेदी; ज्वानी; तारुण्य :'छान छबेली सुरत फाकडी पुढी उमतीमधे येणारू ।' - पला ४.४०. [सं. उद्+मद्]

उमथणे अक्रि. उलटणे; लोटणे :'काळ लोहाचा डोंगरू उमथला.' - जांस्व २६१.

उमथा वि. पालथा; उपडा. (गो.)

उमदगी स्त्री. मोठेपणा; थोरवी; मातब्बरी; संपन्नता. [फा.]

उमदणे अक्रि. डबडबणे; भिजणे :'ते स्वेदे उमदली दिसे ।'- सव ३६६.

उमदळणे अक्रि. वांती होणे; उमळणे; उलटून पडणे; मळमळणे; कालवाकालव होणे; ढवळणे : 'अति झाले, कोठे तरी उमदळून पडलेच पाहिजे, अशा मनाच्या स्थितीत मी होते.' - पलको ५८१ [सं. उद्+मूलन]

उमदा वि. १. थोर; उदार; श्रेष्ठ; शूर; पराक्रमी; विश्वासू; मोठ्या मनाचा. २. भव्य; सुंदर; देखणा; पाणीदार (माणूस, वस्तू). [फा.]

उमदा पु. जागरण; व्याप; श्रम. (व.)[सं. उद्+मद्]

उमन स्त्री. पहिली नांगरणी. पहा : **उमज**. (कु.)

उमन पु. उखाणा. [सं. उद्+मन्]

उमप, उमाप वि. पुष्कळ; अगाध; अतिशय; खूप; अमूप; अगणित :'डाहाळिया जाती उमपा ।' – ज्ञा १५.१४४. [सं.उद्+मा]

उमपणे उक्रि. वर येणे; उडणे :'मग ते निघाली तेथोन । तत्काळ उमपली गगन ।।' – कथा १.६.१५९. [सं. उद्+मा]

उमर पहा : **उंबर**

उमर, उम्मर स्त्री. वय; आयुष्य :'विसां आंत उम्मर, नरम कंबर, पितांबर पैठणचे नेसल्ये ।' – प्रला २२९. [फा. उम्र]

उमरजी मर्जी.

उमरठ, उमरठा पु. दाराच्या चौकटीची खालची बाजू; उंबरठा. पहा : **उंबरा** [सं. उंबर]

उमरडणे अक्रि. बदलणे; नाहीसा होणे :'तंववरि वासना उमरडली तरि काइ.' – लीचउ ९६१.

उमरडणे क्रि. १. दहन करणे. २. वाकविणे. [क. मुरुण्टु]

उमरडणे सक्रि. १.ओलांडणे; उल्लंघन करणे; त्याग करणे : 'स्वर्गाची आडवंगी । उमरडोनि ।।' – ज्ञा १३.१६२. [सं. उद्+ मृद्]

उमरदराज पु. चिरंजीव; पुत्र; मुलगा. [फा.]

उमरा पु. उंबरठा. पहा : **उंबरा** [सं. उंबर]

उमरा पु. अमरावतीकडील आखूड धाग्याचा कापूस.

उमराव पु. सरदार; मानकरी; श्रेष्ठजन; अमीर; खासा :'राजेबहादर रंगराव होळकर स्वतां आदि उमराव.' – ऐपो २६७. [फा. अमीर अव.]

उमरावजादा, उमरावजादी पु. स्त्री. सरदाराचा मुलगा, मुलगी.

उमरावसभा स्त्री. ब्रिटिश पार्लमेंटचे वरिष्ठ सभागृह.

उमलणे अक्रि. १. विकासणे; फुलणे :'तें उमललें अष्टदळ । ठेऊं वरी ।।' – ज्ञा १५.६. [क. मलर] २. भेग पडणे; फुटणे; उकलणे. ३. सैल होणे; विरघळणे (कपड्यावरचा मळ, चुन्याची कळी, मातीचे ढेकूळ वगैरे). ४. फुगणे; लाही होण्याजोगे फुगणे (भिजत घातलेले धान्य वगैरे). ५. प्रफुल्लित होणे; उल्हासयुक्त होणे (मन वगैरे). ६. प्रकट होणे; उत्पन्न होणे :'परी एकी केधवां गेली । शाखा कोडी केधवां जाली । हें नेणवे जेवीं उमललीं । आषाढ अभ्रें ।।' –ज्ञा १५.१२५. उक्रि. १. उचलणे; उखळणे (वाकवून घट्ट बसविलेले खिळ्याचे टोक वगैरे). २. सुटे करणे; उघडणे; खोलणे (कोयंड्याची मिळविलेली दोन टोके वगैरे). ३. क्षार लावून तापवून सांधणे, एकत्र करणे; डाग देणे (सोन्याच्या दागिन्यांची टोके). ४. सोलणे; मोकळे करणे; काढून टाकणे (धान्य भिजवून त्याची साले वगैरे). [सं. उद्+मील्]

उमला पहा : **उंबला** :'उमले व डोंगळे यांचे विष जालीम असते.' – प्राणिमो ११८.

उमला पु. झाडावरील लाल मुंगी किंवा मुंगळा.

उमली लागणे वाजवीपेक्षा अधिक भिजून कुजायला लागणे :'...पिकास उमली लागोन पिकें बुडालीं.' – ऐलेसं ८३४२. पहा : **उमले**

उमले न. १. आधण घालून भिजत ठेवलेले भात, जोंधळे वगैरे (लाह्या वगैरे करण्याकरिता). २. सपीट, रवा वगैरे काढण्याकरिता भिजत ठेवलेले गहू. (व.)[सं. उद्+मील्]

उमले न. मळमळ. [सं. उद्+मल्]

उमष, उमस पु. १. श्वास; दम; उमास. २.उसंत; विसावा; विश्रांती; अवकाश; स्वस्थता; स्वास्थ्य :'सत्व उर्मी अंत:करणासही । उमस घेवो नेदी ।' – ज्ञाप्र १३५; '... ८० हजार फौजेचा मेळ असता उमष (इंग्रजानें) खाऊ दिला नाहीं.' – इसहोकै ११.

उमस पु. १. स्फूर्ती; उद्भव; विस्तार :'वाग्देवतेची स्तुति । वाचाचि जाहली वदती । तेथें द्वैताचिये संपत्ती । उमस चित्तीं उमसेना ।।' – एभा १.२८. २. स्फुरण; उद्‌भव; प्रादुर्भाव. [सं. उद्+मिष्]

उमस स्त्री. मळमळ.

उमस पु. उमज; समज; जाणीव :'म्हणोनि आत्मा आत्मलाभें । नांदऊनि शब्द शोभे । येईल ऐसा न लभे । उमसु घेवों ।।'– अमृ ६.९४.

उमसणे उक्रि. १. गर्भधारणा होणे. २. उल्लंघणे

उमसणे उक्रि. १. सांगणे; उघड करणे; प्रकट करणे :'जीवु जावो परि नुमसे । ठेविला ठावो ।।' – ज्ञा १३.२०३. २. प्रकट होणे; दिसणे; माहीत होणे : 'एवं द्वैतासीं उमसों । नेदुनि ऐक्यांसि विसकुसों ।' – अमृ २.६९.

उमसणे सक्रि. आवरणे. [का. मुसुकु]

उमळ स्त्री.१.मळमळ; ओकारी वाटणे :'आता एक दोन दिवसात त्यांना विशेषच खोकल्याच्या उमळी येतात.' – पलको ४५५. २. उबळ. पहा : **उमाळा** [सं.उद्+मूल]

उमळ, उमळट स्त्री. पहा : **उपळ** १. पावसाचे पाणी जिरून जमिनीतून झरे वाहू लागण्याची स्थिती. २. फुरसे, घोणस वगैरे चावले असताना अंगातून रक्त वाहू लागण्याची स्थिती. ३. अकाली गर्भस्राव होणे. ४. उष्णता व आर्द्रता यामुळे फळे कुजून त्यातून रस वाहायला लागण्याची स्थिती. ५. मऊ होणे (कळीचा चुना, मातीचे ढेकूळ इ.).[सं. उद्+मूल्] (वा.) **उमळ पडणे, उमळट पडणे** – अतिशय पाऊस पडल्यामुळे पीक कुजायला लागणे.

उमळणे अक्रि. आळ घेणे; हट्ट करणे :'उमळतें अर्ध्या रातीं मागे बाई चंद्र हातीं ।' – वलो ८८. (व.)

उमळणे अक्रि. उत्पन्न होणे; फुलणे; उमलणे; बहरणे (कळी वगैरे). [सं. उद्+मील्]

उमळणे अक्रि. धुणे; खळबळणे (वस्त्रे, भांडी वगैरे). (कु.गो.) [सं. उद्+मल्]

उमळणे अक्रि. १.पोटातील कोवळ्या गर्भाला उष्ण विकृती झाल्यामुळे तो स्रवणे, बाहेर पडणे. २. उलथणे; उपटून येणे :'इया उमळती दाढा । दांतांसहित ।।' – ज्ञा १३.५६५. ३.पाझरणे :'त्याच्या श्रमलेल्या शरीरातून घाम नुसता उमळत होता.' – वर्षा १२९. ४. भरून येणे :'मन अकारण उमळते.' – अधांतर ३५. [सं. उद्+ मूल्]

उमळवटी स्त्री. ओकारी; कंटाळा :'पहिल्या पहिल्यांदा तांदूळ किती घ्यायचे, डाळ किती घ्यायची, तिखटमीठ किती घालायचं वगैरे माहिती विचारून मी आईला उमळवटी आणली.' – वत्सला १३९. [सं. उद्+मल्]

उमळशीक स्त्री. उत्कंठा; आतुरता; औत्सुक्य. (गो.)

उमळा वि. बुळबुळीत; पचपचीत; गिळगिळीत; लिबलिबीत; बेचव (पातळसर अन्न, ज्यातून रस पाघळत आहे असे फळ वगैरे). (राजा.)

उमळावण स्त्री. मळमळ; पोटात ढवळण्याची क्रिया; तोंडाला ओकारीपूर्वी पाणी सुटते ती स्थिती. (क्रि. येणे.). (राजा.)

उमळी वि. स्वतंत्र; निर्वेध.

उमंडणे अक्रि. उमटणे; भास होणे; उत्पन्न होणे; सापडणे. पहा : **उमटणे** :'मृगजळ येथ उमंडे । तेथे असे पां कोरडे ।' – अमृ ६.३४.

उमा पु. मुका; चुंबन. (गो.)[क. उम्मु=चुंबन]

उमा वि. खेडवळ; अडाणी; साधा; भोळा; अशिक्षित.

उमाइणे अक्रि. कोमेजणे; म्लान होणे :'....आणि गौराइसें आली : कोमाइली : उमाइली : ऐसीं गोसावी देखीलीं :' – लीच ३.४७.

उमाठ,उमेठ वि. उंच; उंचवट; वर आलेली; फुगलेली (जमीन).

उमाठा पु. १. उंचवटा; उंच जागा; डोंगराचा माथा. २. द्वार; उंबरठा :'एक श्रवणाच्या राजबिदीस आले । तेथून हरिरूप निर्धारिलें । एक कीर्तनाच्या उमाठीं ठाकलें । प्रेमें हरिरूप विलोकिती ।।' – हरि २३.२२६. ३. (ल.) प्रसिद्दी; (विशेषत:) कुप्रसिद्धी; बोभाटा; बभ्रा; एखादी गोष्ट उघडकीला येणे. (क्रि. पडणे, होणे). (वा.) **उमाठ्यास येणे** – स्पष्ट ठळक दिसू लागणे. उघडकीस येणे.

उमाड स्त्री. तुफान; वादळ; खवळणे; क्षुब्धपणा (समुद्राचा). (को.) [सं. उद्+मद्–उन्माद]

उमाडणे अक्रि. उसळणे; फडफडणे :'तेथ ध्वजू ऐसा आवडे । संत हृदयेरथी जवं उमाडें ।' – ज्ञाप्र ४१३.

उमाडा पु. पहा : **उमाळा, उबळ**. १. मळमळ; खळबळ (पोटातील); पोटात ढवळणे. २. जोराची उकळी; ऊत; उडणे (पाणी). ३. (ल.) हुंदका; आवेग; उमाळा (दुःख इ. विकारांचा). [सं. उद्+मद्]

उमाणणे, उमानणे उक्रि. १. मोजणे; मापणे :'हा संसारु उमाणितें माप । कां अष्टांगसामग्रीचें द्वीप ।' – ज्ञा ६.४६३. २. (ल.) हिशोब देणे; झाडा देणे. ३.ताडून पाहणे; तुलना करणे :'तयांची उमाणितां कीर्ति । उणीव दिसे आपाडे ।' – मुआदि ११.९३. ४.(ल.) अटकळ करणे; अजमास करणे :'करीं गिरी धरूनि उमाणिली । महेंद्रमहिमा ।।' –ज्ञा १०.२८९. [सं. उद्+मान]

उमाणणे सक्रि. लपविणे. [का. माजु]

उमाणा पु. १. माप :'उमाणा घेऊनि परेशीं । सुरवाडिजे ।।' – ज्ञा १८.५२२. २. तुलना; बरोबरी :'चंद्रासि घे उमाणे । रसरंगी भुलवणे ।' – ज्ञा १३.११५८. [सं. उद्+मा–मान]

उमाणा, उमाणे, उमान, उमाना पु. न. १. उखाणा; हुमाणा; कोडे; कूट प्रश्न :'पुरुषेवाचुनी जाली । आपणा आपण व्याली । पोटीचे घेऊनि गेली । उमाणें माझें ।।' – दावि ५०२.

उमाणी, उमाणे स्त्री. न. माप; मोजणी; झडती; अटकळ; अनुमान :'कर्ता कर्तव्या घे उमाणे ।' – ज्ञा १८.५००.[सं. उद्+मद]

उमाना पु. पहा : **उमाणा**

उमाप वि. अगणित; अतिशय :'दानाचं पुण्य आणि तुमचे श्रम दोन्हींच्या बळावर उमाप धान्य मिळेल.'– गणगोत १९२. [सं. उद्+मा]

उमापणे पहा : **उमाणणे**

उमास, उमासा पु. १. मळमळ; पोटातील खळबळ; पोटात ढवळणे; कालवणे. (क्रि. येणे.). २. उमाळा; आवेग; उकळी; लाट (हर्ष, शोक वगैरेचा) :'अभिमानाचे अळेपिळे । महत्त्व उमासे येती बळे ।' – एभा ८.२१२. ३. उद्भवण्याची स्थिती, तयारी (वादळ, रोग, गळू वगैरेची); घुमसणे; पिकणे; तयार होणे. ४. खोकल्याची उबळ. ५. जंत झाल्यामुळे होणारा अन्नद्वेष. (क्रि. येणे.) [सं.उद्+मथ्]

उमास, उमासा पु. १. श्वास; उच्छ्वास; सुस्कारा; उसासा. (क्रि. टाकणे) : 'अपरिमित तियेला येति तेणे उमासे ।' – सारुह ३.६३. २. विश्रांती; उसंत; दम; विसावा :'सैन्य पळाले दशदिशा । म्हणती त्राहें त्राहें जगदिशा । भीमें आकांत मांडिला कैसा । पळतां उमासा घेऊ नेदी ।।' – जै १३.६३. ३. घेरी; बेशुद्धी :'उमासा येऊनि पडिला वनीं । परी दृष्टीसि कोठे न दिसे पाणी ।।' – महिपती कथासारामृत २४.१९०. [सं. उद्+मिष्] (वा.) **उमज, उमाज खाणे** – विश्रांती घेणे; दम टाकणे.

उमाह पु. महापूर :'काइ प्रळयांबुचा उमाहो ।' – राज्ञा १८.४१०.

उमाळ वि. क्रिवि. अतिशय; अमोघ; अगणित; काठोकाठ; अलोट :'याजवर मागून उमाळ गोळ्या पडूं लागल्या.' – भाब १३८.

उमाळणे अक्रि. (हृदय) भरून येणे :'मी उमाळून म्हणालो, चल घरी.' – वासू.

उमाळा, उमाळी पु. स्त्री. १. मळमळ; पोटातील खळखळ; कळमळ; उमळ. २. हुंदका; उकळी; आवेग; उसळी; लहर (राग, प्रेम, दु :ख, शोक वगैरे विकारांची) :'उमाळा आल्यासारखा त्यानं चेहरा केला.' – रथ २२७. ३. तीव्र इच्छा, उत्कंठा :'देहे खंगतां सर्व जाळी उमाळी ।' – दावि १७८. ४. उकळी; कढ; ऊत (पाणी, दूध वगैरे पदार्थाचा). ५. सुटका; सोडवणूक; मुक्तता; मोकळीक (एखादा धंदा, कार्य वगैरेतून). (क्रि. पडणे). ६. लोट; गर्दी; हल्ला; उठाव :'तो देखौनि यादवांचा उमाळा । एरी सिंहनादु दीन्हला ।।' – शिव १०४१. ७. उद्भव; जोर; श्रेष्ठत्व; प्रभाव :'जेयांचा देखौनि उमाळा । पळे महामोहाचा पाळा ।' – शिव. ३८४.[सं. उद्+मूल] (वा.) **उमाळा पडणे** – अतिशय पाऊस झाल्यामुळे पिके कुजायला लागणे. पहा : **उमळ पडणे. उमाळी पडणे, उमाळी येणे, उमाळीस पडणे, उमाळीस येणे, उमाळ्या पडणे, उमाळ्या येणे, उमाळ्यास पडणे, उमाळ्यास येणे** – उघडकीला येणे; माहीत होणे; दिसणे; आढळणे; बभ्रा होणे.

उमाळा वि. ओंगळ; मळका; घाणेरडा. [सं. उद्+मल्]

उमाळा पु. ज्वाला; झोत; लोळ; तरंग (आग, वीज वगैरेचा) :'कोटी रविशशी तेज उमाळा ।।' – दावि ३३५. [क. उम्मळ=उष्णता]

उमेठ न. पहा : **उमेठा** :'भूतांचीं उमेठें धडाडिता ।' – राज्ञा ७.१७७.

उमेठा पु. १. समुदाय; गट; जमाव; मेळावा :'उमेठेयां देवां निचनवा । आठाइतेआं देवां बंबाळु दीवा ।।' – शिव १५३.
वि. १. सामुदायिक; एकगट. २. अतिशय; पुष्कळ :'किंबहुना सात्विकां आठां । चाचरू मांडतां उमेठा ।' – ज्ञा १८.१६०७.[सं.उद्+मित्]

उमेद स्त्री. १. आशा; धीर; भरवसा; खात्री; विश्वास. २. आकांक्षा; हिंमत; उत्साह; धैर्य; हौस; अवसान; ईर्षा :'अब्दालीचीं बोलावणीं बहुत उमेद लावून गेलीं.' – ऐलेसं १.३४. ३. तारुण्य; ज्वानी; वय : 'आबाजी आपले उमेदीत आलियावरी त. ।।म ।। देखमुखी करावयास आले.' – मइसा १७.५[फा. उमीद] (वा.) **उमेदीस येणे** – १. वयात येणे; पणात येणे (स्त्री वगैरे). २. जोमात, भरभराटीस येणे (कार्य वगैरे). ३. बहर येणे (झाडाला वगैरे).

उमेदगी स्त्री. उमेदवारी :'हे उमेदगीची व रसायतीची कोण वजे (तऱ्हा) ते दर्याप्त करावी.' –ऐलेसं ७.३५७. [फा. उमीद]

उमेदणी, उमेदनी स्त्री. मळणी झाल्यावरची खळ्यातील कामे (वारवणी, वाळवणी, मापणी, साठवणी वगैरे). (को.) [सं. उद्+मथ्; किंवा उद् + मर्दन]

उमेदवार वि. पु. १. धीट; आशापूर्ण; हिंमतवान; निश्चयी; धीराचा. २. वयात आलेला; तरुण; पूर्ण वाढ झालेला (मनुष्य, पशू, झाड वगैरे) :'गडी पहला उमेदवार ।' – मोर ९. ३. इच्छुक; गरजू; पदान्वेषी :' तुम्ही इकडील लक्ष्यांत राहून कल्याणचे उमेद्वार असावें,' – मइसा ८.४. अर्जदार; नोकरी मिळण्याकरिता खटपट करणारा; निवडणुकीला उभा राहणारा. ५. काम शिकण्यासाठी राहिलेला; शिकाऊ; कच्चा (नोकर). ६. परीक्षा देण्यास आलेला. ७. नवशिक्या. ८. विवाहेच्छुक तरुणतरुणी. [फा. उमीदवार]

उमेदवार-प्रशिक्षण व्यवसायात शिरू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास व्यवसायाच्या ठिकाणी दिले जाणारे शिक्षण.

उमेदवारी स्त्री. १. (राज्य.) उमेदवार म्हणून निवडणुकीला उभा राहणे. २. शिकाऊ म्हणून किंवा हंगामी काम करणे.

उमेदवारी स्त्री. १. आशावादीपणा; आकांक्षा; खात्री; निश्चय; दृढता; हिंमत; विश्वास :'त्यांची उमेदवारी पेशवे सर करूं सहजांत.' – ऐपो २७७. २. तारुण्य; ज्वानी; पूर्ण वाढ; जोम; जोर :'हे आपले उमेद्वारीला आल्यानंतर त्यांचे लग्न केलें.' – मदरु १.११. ३. कच्ची, पसंतीच्या अटीची नोकरी; शिकाऊ नोकरी; उमेदवार बनून राहणे. [फा. उमीदवार]

उमेदवारी लेख उमेदवारीसंबंधी अटी, नियम इत्यादी ज्यात नमूद केले आहेत असा लेख.

उमेदी स्त्री. ज्वानीचा, मनोविकाराचा भर :'शृंगार घालितां उमेदी चढे ग । खेळतां गंजिफा येते रडे ग ।।' – प्रला १४६. पहा : **उमेद**

उमेराघामेरा वि. घामाने थबथबलेला, भरलेला, डवडवलेला, डबडबलेला; घाबराघुबरा; घामाघूम. [घामेराचे द्वि.]

उमेरा चक्री भोवरा मुलींचा एक खेळ.

उमेळा वि. ओंगळ; मळका; घाणेरडा.(ना.) [सं. उद्+मल्]

उमैठ वि. १. रसाळ. २. भडक :'उमैठा बोलीं सांघैन तरी । जाणतां कोपावें ना ।' – रुस्व ७४. [सं. उन्मिष्ट]

उमोप वि. अतिशय; पुष्कळ; अगणित; अमोज. पहा : **उमाप** : 'तुझेचि करुणार्णवा मन धरी उमोप द्रवा ।' – केका २०.

उम्दगी स्त्री. थोरवी; मातब्बरी; श्रेष्ठपण. पहा : **उमदगी** :'जमियतच्या सर्दारास दोनी सर्कारच्या बुजुर्गी व उम्दगीवर प्रतेष्टतेचे व इज्जतीचे रस्म अमलात येतील.' – पेअ ५८. [फा.]

उम्द पु. आधार.

उम्दा वि. १. थोर; विश्वासू; उत्कृष्ट. पहा : **उमदा** :'दोन उम्दे मनुष्य दिली दोस्ती जाहीर करावयास रवाना करीत आहों.' – पेअ ६५. २. भारी; उंची; किंमतवान; बहुमोल :'तलफ चुकऊन पोशाख दिधला खूप उम्दा भर्जरी ।' – पला ८९. [फा.]

उम्दान वि. उत्तम; फक्कड. [फा. उम्दा]

उम्देतुल्मुल्क पु. दौलतीचा (राज्याचा) खांब. विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांना दिल्लीच्या बादशहानें ही पदवी दिली होती. [फा.]

उम्मस वि. हूड; आडदांड. (ना.)

उम्मस पु. उसंत; विश्रांती. पहा : **उमासा** :'स स सपना सारिखा परी नाहीं कीं उम्मस ।' – दावि २१४.

उम्मीदवार आशा, अपेक्षा बाळगणारा; शिकाऊ; उमेद असलेला. पहा : **उमेदवार**.

उम्याराघाम्यारा पहा : **उमेराघामेरा** :'जाते दर्शनाला झाले उम्यारीघाम्यारी ।' – जसा ४४१.

उम्हळ, उम्हळणे, उम्हास, उम्हाळा पहा : **उमळ, उमळणे, उमाळ** :'हल्लीच्या तापाचीं मुख्य लक्षणे ... वांत्या व उम्हांसे .. हीं होत.' – लोटिकेले १.५७५; 'विरह दु:खाचे कितीदा उम्हाळे ।' – टिक ५९.

उम्हाट पहा : **उमाटा**

उयला पु. पावट्याचा सोलाणा. (को.)

उयशी स्त्री. (प्र.) उशी; डोक्याखाली ठेवण्याची गिर्दी :'सीतेला वनवास । बाळ दोन्ही डाव्या कुशीं । केली गोट्याची उयशी । लागे झोप रोज कशी ।।' – वलो ११०. (व.)

उर स्त्री. हौस. [क. उर = उतावळेपणा]

उरउरीत क्रिवि. उरलेला; वेगवेगळेपणाने; अलग :'सांगायासी लोकां । उरउरीत उरला तुका ।।' – तुगा ३८०७. [सं.उर्वरित]

उरउळी स्त्री. १. रोवळी (तांदूळ धुण्याची); दुरडी (कु.) २. तेल घालण्याचे नरसाळे. [क. उरळि–वाटोळे भांडे]

उरक, उरका पु. काम त्वरित करण्याचे सामर्थ्य, कौशल्य, उत्साह; आटोप; आवरशक्ती.[क. उर=उतावळेपणा] (वा.) **कामाचा उरक पडणे** – संपविण्याची जबाबदारी अंगावर येणे, पडणे.

उरक पु. आटोप; जोर; उत्कर्ष; जोम; उत्साह; उल्हास :'भीतरिं अवस्था व्यापिलें। उरकें वागेंद्रिय कोंदलें ।।' – ऋ ४३.[क. उर्कु=पराक्रम]

उरकडणे सक्रि . पुरे करणे; उलगडणे :'याप्रमाणे या प्रांतीचा कार्यभाग उरकडीला ....' – पेद १५.४.

उरकणे सक्रि. १. पुरे करणे; पार पाडणे; संपविणे; शेवटाला जाणे. २. भानगडीत पडणे; ढवळाढवळ करणे.
अक्रि. १. आटपणे; संपणे; शेवट होणे; नाहीसे होणे. २. (ल.) मरणे. ३. आटोक्यात येणे; पसंतीला येणे; यथायोग्य होणे; सोपे होणे.

उरकता वि. लवकर संपणारा.

उरकता मार्ग, उरकता रस्ता, उरकती वाट लवकर संपणारी वाट (सरळ, छाया असलेली, जवळची, सोपी म्हणून).

उरकमणे सक्रि. स्वच्छ करणे; घासूनपूसून काढणे; निर्मळ करणे (भांड्यांचे खरकटे, कपड्याची घाण वगैरे).
अक्रि. विलग होणे; सुटणे; निघून येणे (भांड्याला, वस्त्राला लागलेली खरवड, कपच्या, घाण, मळ वगैरे).

उरकाउरक स्त्री. घाईघाईने, गर्दीने काम संपवण्याची, आवरण्याची क्रिया; आटपाआटप; आवराआवर. [उरकचे द्वि.]

उरकुडा पु. पहा : **उकिरडा** (व.)

उरग पु. सर्प; साप; नाग :'तरी सरोवर तरंगीं । सांडिलें आकाश मेघीं । कां चंदनाचे उरगीं । उद्यान जैसें ।।' –ज्ञा १७.२२५. [सं.]

उरगळी वि. ज्यांच्या डोळ्यावर, उरावर व गळ्यावर मण्यासारखे चिन्ह आहे असा (घोडा). हे घोड्याचे अशुभ लक्षण होय.

उरगुडे–ढे न. खेड्यातले देऊळ :'जेणें कैलासदुर्गा पाडिलें । सत्यलोकीं ठाणें घातलें । सोनकानें उरगुढें घेतले । वैकुंठीचें ।।' – शिव. १६०. [का. उरु =गाव+गुडि= देऊळ]

उरच्छद पहा : **उरस्त्राण**

उरजणे अक्रि. बलवान होणे; बलिष्ठ होणे; सुस्थितीत येणे; उत्कर्ष होणे. [सं. ऊर्ज्]

उरजा स्त्री. जोपासना; निगा; काळजी; सुव्यवस्था. (क्रि. राखणे.)

उरण पु. मेंढा; बकरा :'तैं उमजसील न उरे व्याघ्ररवे वीर्य लेशहि उरणीं ।' – मोकर्ण २८.८३. [सं.]

उरण, उरणी स्त्री.एक वृक्ष, वेल :'केळी कल्हार निंबुणी । मालती मोगरे उरणी ।।' – कथा २.१५.१४२.

उरणे अक्रि. १. शिल्लक, बाकी राहणे; मागे राहणे; पुरून राहणे; अवशिष्ट राहणे; जास्त होणे :'तेथें लोक कैंचे उरती ।' – उषा १७६७. २.शक्य होणे; परवडणे; पुरवणे :'ज्या इंद्रियास जो भोग । तो तो करी येथासांग । ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ।।' – दास १७.५.२८.[सं. उत्+पृ]

उरता स्त्री. बाकी; शिल्लक; अवशिष्ट; अंश. (क्रि. राहणे, देणे, राखणे, ठेवणे, धरणे, बाळगणे.)

उरता स्त्री. अरुता (अप.) १. भीड; मुरवत; आक्षेप. २. खोळंबा होणे; उणीव भासणे. ३. अरुता; सबब :'त्यांच्याकडून तो माल न आल्यामुळें येणाऱ्याची उरता न सांगतां बाजारांत जसा भाव असेल त्याप्रमाणें घेऊन द्यावा लागतो.' – मुंव्या २५१. (वा.) **उरता ठेवणे** – भीड ठेवणे; पर्वा करणे. **उरता धरणे –** खोळंबून राहणे; वाट पाहणे. **उरता न धरणे** – मान न राखणे; भीड न धरणे; वाट न पाहणे.

उरता स्त्री. अपेक्षा; वांछा; इच्छा :'त्यास आपले अभयेपत्राकरिता । उरता धरली आहे.' – पेद.

उरता करणे सक्रि. बाकी ठेवणे; अंशतः फेड करणे.

उरदाणा पु. घोड्याच्या तोबऱ्यातील शिल्लक राहिलेला हरभरा, घास.

उरध न. हृदय; मन :'पाण्यामधी मासा । त्याच्या उरधी सांगड ।' – जसा २०१. [सं. हृदय]

उरपणे, उरवणे, उरंबणे, उरमणे अक्रि. उरी फुटणे; उरी भरणे; अति श्रम केल्यामुळे छातीत दु:ख उत्पन्न होणे (घोडा, बैल वगैरेंच्या)

उरपतणे अक्रि. परतणे :'भाकरी उरपतीत सरू म्हणाली ...' – पधों १६३.

उरफाटणे, उरफाटफारफाट, उरफाटसुरफाट, उरफाटा, उरफाटासुरफाटा पहा : **उफराटा**

उरफी वि. जाणलेली; ज्ञात.

उरफोड स्त्री. अतिशय श्रम; अतिशय कष्ट. पहा : **उरस्फोट, उरस्फोड** [सं. उरस्+स्फुट्]

उरबंद पु. गोरबंद; घोड्याच्या गळ्यात बांधण्यासाठी खोगिराला लावलेला पट्टा.

उरम न. एक पक्वान्न. हे मऊ व नरम असते.

उरमटणे अक्रि. उर्मट, मगरूर होणे; अरेरावी दाखवणे; दिमाख मिरवणे.

उरमटाई, उरमठाई स्त्री. अरेरावी; उर्मटपणा; मगरुरी; बेपर्वाई; उद्धटपणा.

उरमरडणे अक्रि. भरीला पडणे; गर्विष्ठ होणे : 'जरी भलते गोष्टीस त्याणी उरमडून गोष्ट सांगितली तरी पारपत्य करतील.'– पेद ६.१४१.

उरमाल पहा : **रूमाल** (को. गो.)

उरमोडा पु. जनावरास होणारा एक रोग, याने जनावर छातीत आखडते. [सं. उरस् + मोटन]

उरला सुरला, उरसुरा, उरलापुरला वि. अवशिष्ट राहिलेला; शिल्लक; शेष. [उरणेचे द्वि.]

उरवई स्त्री. शिल्लक; बाकी; अवशेष; पुरून उरलेली गोष्ट. [सं. उर्वरित]

उरवणे अक्रि. घोडा इ. अतिशय मेहनत पडल्यामुळे उरी फुटणे.

उरवणे, उरविणे उक्रि. बाकी ठेवणे, राहू देणे; शिल्लक ठेवणे; मागे टाकणे; बाकी राखणे; राखून ठेवणे :'तन्हि कुरुपांडवयुद्धारंभसमय यश तिचें न तें उर्वी ।।' – मोकर्ण ८.१५. [सं. उर्वरित]

उरवळी, उरोळी स्त्री. रोवळी; तांदूळ वगैरे धान्य, कडधान्य धुण्याकरता बांबूचे किंवा धातूचे केलेले सच्छिद्र पात्र; दुरडी. [क. उरळि = वाटोळे भांडे]

उरवी स्त्री. पृथ्वी. [सं. उर्वी]

उरशी स्त्री. वयात आलेली स्त्री; तरुणी. [सं. उरस्]

उरसिज न. स्तन; उरोज; वक्षोज; पयोधर :'येईल बहूपचारें वंध्योरसिजासि काय ओलावा ।' [सं.]

उरस्त्राण न. छातीवर चढविण्याचे चिलखत. [सं.]

उरस्फोट, उरस्फोड स्त्री. १.अतिशय श्रम, कष्ट; जिवापाड मेहनत; अत्यंत नेटाचा प्रयत्न; रक्त आटवणे; आतडी तोडणे (एखादा विषय फोडून सांगताना); माथेफोड. २.अत्यंत कळकळीची विनंती :'पदरीं धरिसी । किति करिसी उरस्फोड ।' [सं. उरस्+स्फोट] (वा.) **उरस्फोट करून घेणे, उरस्फोड करून घेणे, उरस्फोड करणे –** जीव तोडून सांगणे; जिवापाड मेहनत करणे.

उरळणे पहा : **उराळणे**

उरंग वि. १. विटलेल्या, हीन रंगाचा. २. शिळा; नावडीचा :'ते आवडी कां उरंगु । आतां जाली ।' – उगी १४०. [सं. उद्+रंग]

उरंगणे अक्रि. विटणे; हीनरंग होणे :'उरंगे ना साडेपन्हर सोनें ।'–दाव २९.

उरंडा पु. वरवंडा; ढीग :'पाथरांचे उरंडे यापरी । जाहाले येरुसालेआंतु ।' – ख्रिपु २.४२.१३२. [सं. वरंड]

उर:सर पु. उराने सरपटणारा प्राणी; सर्प; नाग; साप.

उर:स्थल न. वक्ष:स्थल; वक्षप्रदेश; छाती. [सं.]

उर:क्षत पु. छातीत होणारा एक रोग; एक प्रकारचा क्षयरोग. यामुळे छातीत व कुशीत पीडा होते. [सं.]

उरा पु. नदीच्या पात्रातील कमी पाणी असलेली किंवा उघडी पडलेली जमीन, उतार; भाट [सं.उर्वरित]

उराउरी क्रिवि. १. छातीला छाती लावून; अतिशय प्रेमाने. २. झटपट; झटकन; झडकर; एकदम; ताबडतोब; तत्काल :'चांग तें उराउरी मागों ।' – ज्ञा ११.५४९. [ऊरचे द्वि.]

उराक, उऱ्हाक स्त्री. स्वाद नसलेली दारू. (गो.) [पोर्तु. उऱ्हाक]

उराचा तख्ता पु. भरदार छाती.

उराचा पांजरा, उराचा पिंजरा क्षीणतेमुळे छातीवरील सर्व हाडे दिसणे; छातीचा सापळा.

उराची शिंप, शिंपी (निंदाव्यंजक) खोल छाती; छातीचा खळगा.

उराझुरा वि. एकलकोंडा; अलग राहणारा; दूरदूर असणारा; मनमोकळा न वागणारा; कुढा; आतल्या गाठीचा. (क्रि. वागणे). [उरणेचे द्वि.]

उराटी, उराठी स्त्री. (घोड्याच्या) उराला बांधायचा खोगिराचा बंद, गाठ; बांडगे याच्या उलट. [सं. उरस्+अठी=गाठ]

उराटी, उराठी स्त्री. उंच, उभी चढण.

उराटी, उराठी स्त्री. १. एक सर्पविशेष. २. एका जातीचा साप चावला असता येणारी रक्ताची गुळणी; झेंडू. [सं. उरस्]

उराड न.१. अतिशय वर आलेली छाती. २.ऊर यालाच हीनार्थक शब्द; छाताड. ३. छातीवर येणारे वजन किंवा दाब. (क्रि. लागणे.) (वा.) **उराड काढून चालणे** – छाती पुढे करून गर्वाने चालणे. ४. जनावरांच्या छातीचे हाड.

उराडी स्त्री. १. भरलेली, प्रशस्त छाती; रुंद, विशाल उरोभाग. २. (खाटीक) उराचे हाड; जनावरांचे ऊर.[सं. उरस्] (वा.) **उराडी धरणे** इ. वाक्प्रचार **ऊर** शब्दापुढे पाहावे.

उरावरचा गोहो, धगड १. ज्या व्यक्ती अगर वस्तूविषयी एखाद्याला सतत भीती वाटते ती वस्तू; उरावरील दडपण; धोंड. २. नवरा; जार.

उरावरचा दगड जबाबदारी; भार.

उरावरचा हात पु.वरील अधिकारी.

उरासा पु. पडसे; सर्दी. पहा : **उरूसा, उरोसा** :'हातामधी फूल धरलं, उराशानं नाक भरलं.' – बगाणी १३९. (खा.)

उराळणे, उराळ होणे अक्रि. १. गाडीत मागे अतिशय भार झाल्यामुळे जू बैलांच्या मानेवरून वर उचलले जाणे,तरंगणे. २. गाडीत मागे फार भार होणे. पहा : **उलाड**

उराळा पु. खांबाशिवाय तयार केलेला मंडप. [सं. ऊर्ध्व+आलय]

उरिण वि. कर्ज नसलेला; ऋणमुक्त :'देउनि मज उरिणें । जालिं आजि ।।' – राज्ञा १६.३३.

उरी स्त्री. तूट; उणीव :'ज्याच्या अनुभवाभीतरीं । नाही अनुमानासी उरी ।' – एभा १९.३३.

उरी स्त्री. बाकी; अवशेष; शिल्लक; शेष :'जंव भरली आथी उरी । बळाची ते ।।' – ज्ञा १८.४२६. [सं. उर्वरित]

उरी स्त्री. आश्रय; ठाव; थारा; ठिकाण; जागा :'तैसे तातलीये लोही । तुषारां उरी नाहीं ।' – ज्ञाप्र ७०२.

उरी स्त्री. १. भीड; मर्यादा; मुरवत :'आपणांस जें मानेना । तेथें कदापि राहावेना । उरी तोडून जावेना । कोणीएकें ।' – दास १२.२.१४. २. अवसान; टिकाव; धडगत; स्थिती :'एरिकेच्या निजघायीं । यादवांसि उरी नाहीं । दुधड तोडूनियां पाही । पडती ठायीं परस्परें ।।' – एभा ३०.१४९. ३. इच्छा; हेतू. [म. उरणे]

उरु स्त्री. जंघा; मांडी. [सं. ऊरू]

उरु वि.विशाल; मोठा; थोर. [सं.]

उरुक उत्कर्ष : 'मोतियांचे झुळंबुके : तेजाचेनि उरुक ।' – शिव ४२४.

उरुज पु. उन्नती; बढती; महत्त्व. (माळवी.)

उरुद्रोणी पु. घोड्याचा एक रोग. याने घोड्याच्या दोन्ही पायात सूज येते.

उरुके न. वेलीचा अंकुर; धुमारा; वेल.

उरुये वि. श्रेष्ठ :'ना तरि धेनु श्वान । एक उरुयें, एक हीन ।' – ज्ञा ५.९३.

उरुळी, स्त्री. रोवळी.

उरूफ वि. उर्फ; उपनावाचा; टोपणनावाचा.[अर. उर्फ]

उरूबरू, उरूबुरू क्रिवि. समोरासमोर; समक्ष; प्रत्यक्ष. स्त्री. उपस्थिती; हजेरी; समक्षता. [फा. रूबरू]

उरूस पु. १. पिराचा उत्सव; पुण्यतिथी; जत्रा. २.लग्नातील मेजवानी. [अर. उर्स]

उरेबकसोटा पु. (मल्लविद्या) कुस्तीतील एक डाव. [हिं.]

उरोगामी पु. सरपटणारा प्राणी; अशा प्राण्यांचा वर्ग. [सं.]

उरोग्रह पु. एका रोगाचे नाव; स्तन ताठरणे. [सं.]

उरोज पु. स्तन; स्त्रीचा स्तन. [सं.]

उरोटा पु. १.बाकी उरलेले; अवशिष्ट; शिल्लक. २. विहिरीजवळचे पाण्याचे टाके.

उरोटा पुरोटा पु. कमी पडेल ते पुरे करणे. [म. उरणे]

उरोध पु. व्याजोक्ती; उलट अर्थी बोलणे; उपरोध. [सं. उपरोध]

उरोमुरो वि. उरले सुरलेले. न. लांबविणे; चोरणे; खाणे; चापणे. [म. उरणे+मुरणे]

उरोरोग पु. छातीचा एक रोग. [सं.]

उरोळी स्त्री. १. वरंबा; शेताच्या सीमा दाखविणारे सीमेवरील ढीग. २. रोवळी.

उर्जा स्त्री. १. टवटवी; तजेला; निगा (क्रि. ठेवणे, राखणे.) २. पाणी; वाफ; वीज आदींची शक्ती, जोर. [सं. ऊर्जस्]

उर्जित वि. भरभराटीचा; मोठा, उन्नत, बलिष्ठ, विकसित. [सं.]

उर्जित करणे सन्मान करणे; सत्कार उन्नती.

उर्जी पु. शेतीसंबंधी खर्च; मशागतीचा खर्च. [क.]
उर्ण कातीण :'उर्णाचिया गळा बांधियेली घेरी.' – मुक्ता ४. [सं.]
उर्णनाभिका स्त्री. कोळी (कीटक). नाभीतून तंतू काढणारा (कीटक).
उर्णपट पु. बुरणूस; लोकरीचे वस्त्र. [सं. उर्णापट]
उर्णा स्त्री. लोकर. [सं. उर्णा]
उर्ता स्त्री. काळजी. [क.]
उर्दाबेगनी स्त्री. जनानखान्यातील सशस्त्र अंगरक्षक स्त्री; दासी; सेविका. [तु. उर्दू+बेगम]
उर्दू स्त्री. १.सैन्याचा तळ. २. भाषाविशेष; हिंदुस्थानी भाषा. ३. बाजार.
उर्द्ध वि. सरळ; उभा. [सं. ऊर्ध्व]
उर्धपथ ईश्वराचा मार्ग :'जे उर्धपथुनि लोटले । कृपेपासौनि सुटले । ते माया भुलौनी लाविले । प्रवृत्ति मार्गी ।' – ज्ञाप्र २५०.
उर्फ उपनाव; टोपण नाव; सर्वपरिचित नाव. [अर. ऊर्फ]
उर्फाटा वि. उलटा; पहा : **उफराटा**
उर्बुद (रोग) पु. शरीरावर उत्पन्न होणारी गाठ, गळू, आवाळू (कर्करोग).
उर्मट वि. उद्धट; अरेराव; आडदांड.
उर्मटपणा पु. उद्धटपणा; मस्तवालपणा. [सं. उन्मत्त]
उर्मी स्त्री. १.लाट; लहर. २. उमाळा; मनोविकारांची उसळी.[सं. ऊर्मि]
उऱ्या करणे १. वल्गना करणे. उड्या मारणे, २. भलत्याच मागण्या करणे.
उर्वरित वि. उरलेले; अवशिष्ट; बाकी; मागे टाकलेले. [सं.]
उर्वी, उर्वीमंडळ स्त्री. न. पृथ्वी; धरित्री; जमीन. [सं.]
उऱ्हाई स्त्री. पडसे (ना.)
उल लघुत्वदर्शक प्रत्यय. उदा. कोयती– कोयतुल. (गो.)
उल–ळ पु. कांदा; पातीचा कांदा. (कों.)
उलकटणें सक्रि. १. उलथणे; उलटापालट करणे; उलगडणे; उचकटणे; विस्कटणे. २. उकळणे; मोकळे करणे. ३.संपविणे. [सं. उत्+कल्]
उलखणें अक्रि. १. झिजल्यामुळे सोन्याच्या दागिन्याची लाख दिसू लागणे. २. लाख निघून जाणे; सांधा निखळणे. [सं. उद्+लाक्षा]
उलगडणें सक्रि. १. मोकळे करणे; सोडविणे. २. एखाद्या वस्तूचे भाग वेगवेगळे करणे. ३. उघडणे. ४. संपविणे; पार पाडणे. अक्रि. १. सुटणे; मोकळे होणे. २. मोडणे; भाग वेगळे होणे; ३. बंधन सुटणे; विस्कटणे ५. एखादा मौसम संपणे. [सं. उद्+लग्]
उलगडा पु. १.सोडवणूक; खुलासा. २. निकाल; निर्णय; व्यवस्था. ३. मुक्तता; फेड. [सं. उद्+लग्]
उलगणे अक्रि. संपणे; बंद होणे; थांबणे.
सक्रि. खलास करणे; नेणे; संपविणे; आटोपणे; पुरे करणे.
उलगवाडी स्त्री. समाप्ती; शेवट; अंत. [म. उलग]
उलगाउलग स्त्री. निरवानिरव; आवराआवर.
उलगाड वि. उजाड; पीक उपटल्यामुळे उजाड.
उलगिडा पु. गावचे नोकर.
उलगी पु. चाकर. [का. ऊलिग]
उलघाल स्त्री. १. अस्वस्थता. २. भानगडीचा व्यवहार. [म. उलगडणे+घालणे]

उलझा पु. १. अनिर्णित गोष्ट, वांधा, गुंता. २. निर्णय लावणे. [व.]
उलझा अपरोक्ष, पाठीमागे.
उलट पु. स्त्री. १. परतणे; प्रत्यागमन. २. ओसर; आहोटी; ज्वार–भाटी. ३. डोके वर काढणे; पुनरुज्जीवन; उचल खाणे. ४. पुन्हा येणे; पुनरुद्भव. ५. माघार; विन्मुखता; भंग (वचन). ६. त्याग; विमुखता. ७. ओकारी; वांती. ८. फेड; परत करणे; मोबदला देणे.
वि. विरुद्ध; उफराटे; प्रतिकूल. क्रिवि. मागे; परत; विरुद्ध [सं. उद्+दे लट्]
उलट वि. उफराटे; व्यस्त.
उलट अपील पु. न. (विधि.) प्रतिपक्षाच्या अपिलाविरुद्ध अपील. [म. उलट+इं. अपील]
उलट अहेर पु. मिळालेल्या अहेराबद्दल परत अहेर करणे.
उलट इन्साफ पु. फेरनिवाडा.
उलट उत्तर न. प्रत्युत्तर; जबाब; प्रतिभाषण
उलटकर वि. उलटण्यासारखा; डळमळीत; अस्थिर; कच्चा आधार असलेला. (दगड, लाकूड इ.).
उलट कारवाई स्त्री. (विधि.) विरुद्ध न्यायालयीन कार्य. [म. उलट+सं. कार्यवाही]
उलट घेणे हरकत घेणे; प्रतिकार करणे.
उलट ढाल स्त्री. १. सैन्याचा रोख विरुद्ध दिशेला वळविणे. २. विरुद्ध पक्षास मिळणे; फितूर होणे; वचनभंग करणे.
उलटणी स्त्री. एखादी क्रिया परत करणे, पुन्हा करणे; फेरतपासणी; फेरमोजणी; उजळणी इ. [सं. उद्+दे. लट्)
उलटणी स्त्री. १. कलाटणी; उलटणे; दिशा बदलणे. २. (ल.) टोमणा; खोचक उत्तर देणे.
उलटणे सक्रि. १. पालथे करणे; उपडे करणे. २. (वस्त्र इ.) आतील बाजू बाहेर करणे. ३. उजळणी करणे; केलेलीच क्रिया पुन्हा करणे. ४. तडीस नेणे.
अक्रि. १.पालथे होणे; विरुद्ध दिशेस फिरणे, जाणे; मागे फिरणे. २. पुन्हा उचल खाणे; पुन्हा सुरू–चालू होणे. ३. संपणे; मागे पडणे; निघून जाणे (वय, मोसम, हंगाम).
उलटणे; उलटवणे अक्रि.सक्रि. प्रत्यावर्तन होणे – करणे.
उलट तपासणी स्त्री. (विधि.) विरुद्ध पक्षाच्या वकिलाने प्रश्न विचारणे. [म. उलट+तपासणी]
उलटपुलट स्त्री. फिरवाफिरव करण्याची क्रिया.
उलटबाजी स्त्री. प्रतिकार; विरोध.
उलटभेट स्त्री. परतभेट; भेटीस येऊन गेलेल्याकडे आपण भेटीस जाणे.
उलटमान पु. सन्मानिताने सन्मान करणाऱ्याचा सन्मान करणे.
उलटलढाई स्त्री. फेर हल्ला; फेर उठावणी.
उलटवारा पु. विरुद्ध दिशेकडून येणारा वारा.
उलटहुकूम पु. १. पहिल्या हुकुमावरून दिलेला तोच हुकूम. २. पहिला हुकूम रद्द करून दिलेला हुकूम.

उलटहुंडा पु. वधूपित्याने वराकडून मुलीबद्दल घ्यावयाचे द्रव्य.

उलटा वि. विपरीत; परिवर्तित; पालथा; आतील बाहेर, इकडील तिकडे, वरची खाली, खालची वर, मागची पुढे, पुढची मागे इ. बाजू बदललेला. [का. उरुळु]

क्रिवि. विरुद्ध; परत.

उलटामोल पु. तोड उत्तर; किल्ली.

उलटापहारा पु. विपरीत काळ; फिरलेला काळ.

उलटापालट स्त्री. १. अव्यवस्था; फेर रचना. २. उत्पात. ३. मोठ्या प्रमाणावर झालेला किंवा केलेला फेरबदल.

उलटापालटा वि. बाजू बदललेला. (आतील बाहेर, बाहेरील आत, वरची खाली, खालची वर, इकडची तिकडे, तिकडची इकडे इ.); वेडावाकडा.

उलटी स्त्री. १. वांती; ओकारी. २. विरुद्ध स्थिती किंवा गती; उफराटा प्रकार. ३. उलटी उडी; कोलांटी. ४.(ल.) वचन मोडणे; विपरीत वागणे.

उलटी अंबारी स्त्री. भिक्षेची झोळी. (वा.) **उलट्या अंबारीत बसणे**– भिकेस लागणे.

उलटी दुनिया स्त्री. सार्वत्रिक बेबंदशाही; गोंधळ; विरुद्ध न्याय.

उलटी पूजा स्त्री. अपमान; उपहास.

उलटी बाहुली स्त्री. दूरचे न दिसण्याचा दोष.

उलटी शिवी स्त्री. शिवीबद्दल प्रतिशिवी; अपशब्दास अपशब्द.

उलटीसुलटी (हजामत) स्त्री. खरडपट्टी; अपशब्दांनी केलेली संभावना.

उलटी सूज स्त्री. शरीराच्या खालच्या बाजूकडून वर वाढत जाणारी सूज.

उलटून क्रिवि. १. प्रत्युत्तरादाखल; परत; विरुद्ध बाजूने. २. अपमान करून. ३. अवमर्यादा करून. ४. उर्मटपणे.

उलटे दान न.परतभेट; परत दिलेली देणगी किंवा बक्षीस.

उलटे शहाणपण न. गैरवाजवी सल्ला.

उलडू पु. उगव.

उलणे अक्रि. १. फाकणे; आतील दाबाने फाटणे; दुभंगणे; उतटणे. २. उचंबळून येणे; सदगदित होणे. [सं. उत्+लू]

उलंडणे उक्रि. १. लवंडणे; सांडणे; उघडे करणे. २. उपटून येणे; उलटून येणे. ३. भरून वाहणे; तुडुंब भरणे. ४. निजणे; आडवे होणे; खाली पडणे. ५. टाकून देणे; त्यजणे. ६. उचंबळणे. ७. उल्लंघणे. [सं. उत् + लुंठ्]

उलंडा वि. (नाविक) कलंथा; (चाक फिरविण्यासाठी) मुठीचा दांडा. [सं. उत् + लुंठ् .]

उलंडी स्त्री. (नाविक) होडी स्थिर राहावी, उलटू नये म्हणून तिच्या एका अंगाला जो लाकडाचा सांगाडा बांधून पाण्यात टाकलेला असतो तो.

उलथ पु.स्त्री. शेवटचा भाग; गावाचे किंवा टेकडीचे दूरचे टोक. [सं. उद्+स्थळ]

उलथ वि.१. स्पष्ट; 'जाग्रती उलथ नव्हे स्वप्न । साक्षात्कारचि तो परिपूर्ण ।' – दावि १८६. २.उत्तर; जबाब; टोमणा.

उलथणी स्त्री. कलाटणी.

उलथणे अक्रि. दुभंगणे; फाटणे. [सं. उत्+तल]

उलथणे न. कलथा; सराटा. [सं. उत्+तल]

उलथणे सक्रि. १. उलटणे; उलटे, उताणे करणे. २. आतली बाजू बाहेर व बाहेरची आत करणे. ३. खालीवर करणे; हुडकणे; चाळविणे. ४. उठणे; लोटणे. ५. पुन्हा करणे. ६. उरकणे; व्यवस्था लावणे.

अक्रि. १. उलटे होणे. २. परतणे; पुन्हा देणे. ३. (ल.) आकस्मिक मरणे. ४. समूहाने येणे. (वा.) **उलथे जाणे** – मरणे. [सं. उत्+तल]

उलथा वि. १. उताणा; तोंड वर असलेला.

पु. १. कलथा; सराटा; उलथणे. २. प्रतिपक्षी; विरुद्ध बाजूचा मनुष्य. ३.(ल.) ठसा. ४. उखळीच्या तळाशी असलेले धान्य वर काढण्याची क्रिया. ५. जबाब; उत्तर. ६. उलट गोष्ट. [सं. उत्+तल्]

उलथा पसा पु. उताणी ओंजळ. (भिक्षेसाठी).

उलथी स्त्री. उलटण्याची क्रिया; उलटी.

उलपा–फा, उलपो पु.शिधा.(राजा.) [फा .]

उलफा शिधा (कोरडा).

उलफुली स्त्री. टाकळ्यासारखे एक झाड, याची भाजी करतात. (गो.)

उलबण उपशम.

उलमत वि. उन्मत्त. [सं. उन्मत्त]

उलमा पु. विद्वान पंडित. [अर. उलमा]

उलमी स्त्री. एक प्रकारची होडी. (को.)

उलव स्त्री. चाहूल, हालचाल, जाग. [कर्ना.]

उलवण न. (वस्त्रो.) कापड विणल्यानंतर फणीत राहिलेले धागे, दोरे.

उलवणे, उलैणे, उलौणे बोलणे. (गो.)

उलसमार स्त्री. जेवणानंतर येणारा आळस. (गो.)

उलसा, उलिसा, उलुसा वि. अल्प; थोडा; किंचित्; इवला. एवढासा, लहानसा. [सं. अल्पीयस्]

उला पु. वैल, अवेल (चुलीचा). (व.)

उलागीर वि. १. प्रवासी; उपऱ्या. २. आगंतुक. ३. अचानक येणारे भूत. ४. अनावश्यक; फाजील. [सं. उद्+लग्]

उलाघाल, उलाढाल स्त्री. १. अस्वस्थता. २. भानगड; खटपट. ३. खळबळ; क्रांती. [सं. उद्+घात्]

उलाढाल स्त्री. (पैशाची) देवघेव; देवाण–घेवाण; व्यवहार.

उलाघाल्या, उलाढाल्या (उलाघाल्या, उलाढाल्या) वि. चळवळ्या; खटपट्या; नसत्या उठाठेवी करणारा. [सं. उद्–घात]

उलाट पु. १. वांती; २. कोलांटी. [सं. उद्+लट्]

उलाटयंत्र न. तोफ.

उलाड वि. उलार; (मागील भागातील वजनामुळे) उलटण्यासारखी (गाडी). [सं. उद्+लुट्]

उलाल, उलाळ (उलाल्) पु. मोठा आवाज.

वि. उंच; वर. [सं. उद्+लल्]

उलाळ न. उडी. [सं. उद्+लुट्]

उलाळणे अक्रि. उड्या मारणे. [सं. उद्+लुट्]
उलांडणे सक्रि. १. ओलांडणे; उल्लंघणे; सांडणे; पालथे होणे.
उलिंग–गे न. नियमित काम; सेवा; चाकरी. [क. उळीग]
उलिंगवाडी स्त्री. चोरी; वाटमारी; चोरांची वस्ती.
उलिंगी पु. चाकर; सेवक; नोकर. [उग का.]
उलु–लू–क पु. घुबड; दिवाभीत. [सं.]
उलूखल न. उखळ. [सं.]
उलुब्ध १. हिम्मत. २. मोठया हिमतीचा.
उलेढाले न. द्रव्य प्राप्तीसाठी केलेले बरे–वाईट उद्योग; संसारातील दगदग.
उलेमा पु. इस्लामी आचार्य. [अर. उलमा]
उल्का स्त्री. १. तुटणारा तारा. २. पेटलेली चुडी; कोलीत. [सं.]
उल्कापात पु. १. तारे तुटणे. २. (ल.) अनर्थ.
उल्कासम, उल्कासंबंधी वि. निखळलेल्या ताऱ्याप्रमाणे.
उल्फा भोजन न. लग्नानंतरचे भोजन :– ‘लग्नानंतर उल्फा भोजनाचे निमंत्रण येते.’ – ऐरापुविवि १९१.
उल्ब न. गर्भावरील खोळ, वेष्टण. [सं.]
उल्बण न. १. त्रिदोषांचा प्रकोप. २. आपत्ती; मोठे संकट, दुःख; आकांत. [सं.]
उल्मुक न. कोलीत; मशाल. [सं.]
उल्लळा उठावा, उसळी : ‘आढाउ उठावले उल्लाळे घालत.’ – शिव ९५.
उल्लंघणे उक्रि. ओलांडणे; पलीकडे जाणे. २. मर्यादाभंग करणे.
उल्लंघन न. १. ओलांडणे; पलीकडे जाणे. २. आज्ञा किंवा नियम मोडणे; मर्यादातिक्रम. [सं.]
उल्लंघित वि. ओलांडिलेले; अतिक्रांत. [सं.]
उल्लसणे अक्रि. प्रकाशणे; शोभणे; उद्दीपित होणे; उघड होणे; प्रकट होणे. [सं.]
उल्लसित १. प्रफुल्लित; आनंदित. २. सतेज; सुशोभित.
उल्लळणे सक्रि. १. माखणे; लेप करणे. २. वर्तुळाकार फिरणे. [सं. उद्+लालय्]
उल्लाट वि. उग्र.
उल्लास पु. १. आनंद; उत्साह. २. सुस्वभाव; प्रसन्नता. ३. हौस; आवड. [सं.]
उल्लासणे अक्रि. आनंदित होणे. [सं. उत्+लस्]
उल्लासी वि. उत्साही; प्रसन्न. [सं.]
उल्लाळ पु. १. (आनंदाने) उडी २.उसळी; उमाळा. ३. उत्साह; हर्ष. [सं. उत्+लाल्]
उल्लाळणे पहा **: उल्लळण**
उल्लिखित वि. उल्लेखिलेले. [सं.]
उल्लिंग वि. नागडा; नंगा; विवस्त्र. [सं.]
उल्लू न. घुबड.
वि. १. मूर्ख; मंद; अविचारी. २. धुंद; वेडा. ३. अधीर. (वा.) **उल्लू बनणे–** वेडा, अधीर होणे.
उल्लूपणा पु. अविचार.
उल्लेख पु. नावाऐवजी एखादे अचूक विशेषण किंवा उपाधी योजणे.(उदा. कृष्णाऐवजी वासुदेव). [सं.]
उल्लेख पु. १. निर्देश; उच्चार; (लेखनात) निर्देश किंवा समावेश करणे. लिहून व्यक्त करणे.
२. न. दिग्दर्शन; प्रस्ताव.
उल्लेख पु. एक अर्थालंकार, व्याख्या : – एकच वस्तू निरनिराळ्या दृष्टीने निरनिराळी दर्शविणे यास उल्लेख म्हणावे. [सं.]
उल्लेखपत्र न. रेकॉर्ड.
उल्हाटणे उक्रि. सक्रि. नष्ट करणे.
अक्रि. उलटणे :‘ना तरी भेडा उल्हाटे । विवसीजरीं ।’ – ज्ञा ७.९१.
उल्हा, उल्हाणे पु.न. वैल, अवेल. (व.)
उल्हाट शक्ति स्त्री. कुंडलिनी नाडी. [सं.]
उल्हाणा देणे टोमणा देणे; दोष देणे.
उल्हास, उल्हासणे, उल्हासी पहा : **उल्लास, उल्लासणे, उल्लासी** [सं.उत्+लस्, लष्]
उल्हाळ पहा : **उल्लाळ**
उवगा पु. वेळू; बांबू.
उवणे उक्रि. उद्भवणे; उगवणे.
उवले वि. प्रसन्न; शुद्ध.
उवस पु. दमा. (गो.)
उवळ वि.१.पीळ उकललेली (दोरी). २. स्पष्ट : ‘मावळवितु विश्वाभासु । उवळ ।।’ – ज्ञा १६.१ [सं. उद्+वल्]
उवळणें अक्रि. पीळ उकलणे; सैल होणे. [सं. उद्+वल्]
उवळणें अक्रि. १. पिकण्यापूर्वी नासणे. २. पाझर फुटणे. ३.विषारी सर्पदंशाने शरीराच्या छिद्रातून रक्त वाहणे. ४. नीट न बडविलेला बैल पुन्हा वीर्ययुक्त होणे.
उवळा वि. १. पाडाला येण्यापूर्वीच उष्णतेमुळे पिकलेले (फळ); स्वादहीन; लिबलिबीत. २. निरुत्साही; मंद.
उवळा–उंवळा वि. पुरेसा पीळ नसलेला. (दोर, दोरखंड). (राजा.)
उवाइणे– उवायिणे अक्रि. १. प्रसन्न होणे. २. शांत होणे.
सक्रि. १. खुलासा करणे; विवेचन करणे; विस्ताराने सांगणे. २. उभारणे; तयार करणे. [सं. उप+आ+हित]
उवाइला–उवायिला पु. अभिप्राय; हेतू; आशय वि. विस्तीर्ण; मोठा; प्रशस्त.
उवाड पु. उत्साह.
उवाय पु. १. सुख; आनंद. २. विकास; उसळी; उत्कर्ष. ३. सामर्थ्य.
उवार पु. पूर (गो.)
उवाव पु. १. हर्ष; उत्साह. २. उत्कर्ष; भर; उसळी; विकास. ३. सामर्थ्य. ४. अवकाश; वाव.
उवावी पु. अवकाश; वाव; प्रसार; उत्कर्ष; आटोप.

उवाहणे क्रि. प्रकटणे.

उवीळ पीळ सैल झाला आहे अशी (दोरी). [सं. उद्+वल्]

उवेड–ढ वि. उलगडा, खुलासा करणारा.

उवेडा–ढा पु. १. वेढा उठविणे : 'जै अमरावतीचे आला धाडा । तै म्यां एकलेनि केला उवेडा ।' –ज्ञा ११.३८७; 'न करिता रे उवेढा । केवी जाऊं पाहसी पुढां ।' – एरुस्व ८.२८. २. उलगडा; मोकळीक. ३. परचक्र, पराभव.

उवेर–री स्त्री. उरलेला भाग; शेष. [सं. उर्वरित]

उवेला वि. उवांनी युक्त; उवा असलेला (माणूस, डोके).

उवेळे, ओवळे, वापरलेले वस्त्र : 'पोरु आपुलें उवेळें एथ वाओं आला ।' –लीचपू ३०४.

क्रि.वि. आडवेळेला [का.]

उशागति स्त्री. १. पलंगाची अथवा अंथरुणाची उशाकडील बाजू. २. क्षेत्राची वरची बाजू. [सं. उच्छीर्ष+गत]

उशाळ पु. उसाच्या मळ्यातील आठ इसमांवरील मुख्य. (कर्ना.)

उशिटणें उक्रि. उष्टे होणे किंवा करणे. [सं. उच्छिष्ट]

उशि (सि)टा वि. उष्टा; उपभुक्त; वापरलेला. [सं. उच्छिष्ट]

उशिणी स्त्री. उसनवारी; उधारी.

उशिना वेगाने; अधिक जोर लावून : 'उशिना घाइं जूझावे ।' – राज्ञा २.१९०

उशिरा क्रिवि. विलंबाने; उचित काल निघून गेल्यावर; दिरंगाईने.

उशी,उशिशी स्त्री. डोक्याखाली द्यावयाची लहान गादी. [सं. उच्छीर्ष]

उशी स्त्री. उसळी; उडी. [सं. उत्+सृ]

उशीपायती १. सदैव सन्निध असणे. २.(ल.) सेवा करणे; संरक्षण करणे. ३. ला त्रास देणे; मध्ये येणे.

उशीर पु. १. अतिकाल; दीर्घ काल; २. दिरंगाई; खोळंबा; विलंब. ३. अवधी; अवकाश. [सं. उत्+चिर]

उशीर पु. सुगंधी मुळे असलेले गवत; वाळा.

उश्रम, उश्रमा पु.१. उसासा; दम. २. विश्रांती; विसावा.३. राग; रुसवा; गाऱ्हाणे. (व.)[सं. उत्+श्रम्]

उश्रमा स्त्री. १. पृच्छा; प्रत्युत्तर : 'त्यावर बाबांनी (महादजी शिंदे यांनी) उश्रमा केली की..' – मरिउ २.४५. २. याचना; मागणी : 'उश्रमा न करी कवणापुढे' – दावि ४५६.

उश्रामा पु. कृतज्ञता; केलेल्या उपकाराची आठवण. [सं. उत्+स्मृ]

उश्राप पु. पहा. **उःशाप** [सं. उश्शाप]

उश्वास पु. उसासा; बाहेर टाकलेला श्वास. [सं. उत्+श्वास]

उष:काल पु. पहाट; सूर्योदयापूर्वीचा दोन घटकांचा कालावधी. [सं.]

उष:पान न. मलशुद्धीसाठी पहाटे उठल्याबरोबर पाणी पिणे. [सं.]

उषा स्त्री. प्रभात; उष:काल; (प्रभातकालचा) संधिप्रकाश. [सं. उषस्]

उष्टणे सक्रि. उचकटणे; उपटणे; अलग करणे.

उष्टर पु. उंट.

उष्टरखाना पु. उंटाचा तबेला; उंटांचे खाते.

उष्टवण, उष्टावण न. १. लहान मुलांच्या प्रथम अन्नप्राशनाचा विधी. २. उष्टे खाणे. [सं. उच्छिष्ट+वृत्]

उष्टवणी न. ज्याने उष्टी खरकटी भांडी धुतली ते पाणी.[म. उष्टे पाणी]

उष्टा वि. १. खालेल्ल्या अन्नातील उरलेला भाग. २. खरकट्या हाता–तोंडाचा. ३. टाकलेला; सोडलेला. ४. वापरलेला; अशुद्ध; भ्रष्ट; विटाळलेला.

उष्टाउपास पु. धड जेवणही नाही व धड निरशनही नाही.

उष्टा नवरा पु. बिजवर.

उष्टामाष्टा वि. पानात उरलेला.

उष्टावणे, उष्टाविणे उक्रि. १. उष्टे करणे; स्वाद पाहण्यासाठी खाणे. २. विटाळणे.

उष्टावळ स्त्री. पंगत जेवून उठल्यावर जे उष्टे राहते ते; उष्टे अन्न; उष्टे खरकटे. : 'जेविले जे संत मागे उष्टावळी । अवघ्या पत्रावळी करुनी झाडा ।।' – तुगा २०३०.

उष्टा विटाळ पु. उष्ट्या अन्नाचा किवा माणसाचा विटाळ. (स्पर्शदोष).

उष्टी कल्पना दुसऱ्याची कल्पना.

उष्टी पत्रावळ स्त्री. दुसऱ्याने उपभोगलेली स्त्री.

उष्टी हळद स्त्री. हिंदूंच्या लग्नातील एक विधी. यात वधूच्या अंगास लावून उरलेली हळद वराच्या अंगास लावतात.

उष्टे न. १. ज्यात भोजन केले ते पात्र. २. जेवणानंतर पात्रात उरलेले अन्न. [सं. उच्छिष्ट]

उष्टे खरकटे न. उष्टावळ. (वा.) **उष्टे खरकटे करणे** – भोजनानंतर स्वयंपाकाची, भोजनाची भांडी व जागा स्वच्छ करणे.

उष्टे खळी स्त्री. उष्ट्या पत्रावळी टाकण्याची जागा.

उष्टेवारो उकिरडा. (गो.)

उष्ट्र पु. उंट. [सं.]

उष्ट्रलगुडन्याय पु. उंटाला मारावयाची काठी; ज्याचे त्याच्याच हातून शासन.

उष्ट्रसेना स्त्री. सांडणीस्वारांचे पथक.

उष्ट्रासन न. एक योगासन.

उष्ट्री वि. उंटाची; उंटासंबंधी. [सं. उष्ट्र]

उष्ण वि. १. तापलेले, ऊन. २. रागीट; तापट; उतावळा. ३. शरीरात उष्णता उत्पन्न करणारा.

न. १. गरम हवा. २. शरीरातील उष्णता. [सं.]

उष्णकटिबंध पु. पृथ्वीच्या गोलावरील कर्कवृत्त व मकरवृत्त यांच्या मधला प्रदेश.

उष्णकाल पु. उन्हाळा.

उष्णवीर्य वि. शरीरात उष्णता उत्पन्न करणारे (औषध.).

उष्णता स्त्री. उष्णपणा; ऊन; गरमपणा.

उष्णताद्रव पु. द्रवरूप उष्णता.

उष्णताधारणशक्ति–क्ती (शाप.) उष्णता टिकून राहण्याची शक्ती.

उष्णतापरिमाण न. (शाप.) उष्णतेचे माप.

उष्णतापारण न. (शाप.) तारेने, नळीने उष्णता वाहून नेणे, पार नेणे.

उष्णतामान, उष्णमान न. (शाप.) १. एखाद्या पदार्थाच्या अंगी असलेली उष्णता; एखाद्या प्रदेशातील हवेची उष्णता; तापमान; उष्णतेची तीव्रता. २. सरासरी उष्णता; सरासरी उष्णता दर्शविणारे माप.

उष्णतामापक न. (शाप.) पदार्थातील उष्णता मोजण्याचे, यंत्र. [सं.]

उष्णतामापन (शाप.) पदार्थातील उष्णता मोजण्याची क्रिया. [सं.]

उष्णतायंत्र न. (शाप.) उष्णतेने चालणारे इंजिन. [सं.]

उष्णतारोधक वि. (शाप.) उष्णता वाढण्यास प्रतिबंध करणारा; उष्णताप्रतिरोधक.

उष्णतालेख पु. (शाप.) कमीअधिक होणाऱ्या उष्णतामानाची नोंद करणारा आलेख. [सं.]

उष्णतावहन न. (शाप.) एका परमाणूची उष्णता त्याच्या अतिनिकट परमाणूस मिळण्याची क्रिया; उष्णतेचे संक्रमण. [सं.]

उष्णताविसर्जन न. (शाप.) उष्ण पदार्थातून उष्णता बाहेर पडण्याची क्रिया. [सं.]

उष्णताविस्तृति–ती स्त्री. (शाप.) उष्णता सर्वत्र पसरण्याची क्रिया.

उष्णतोत्पादक वि. (शाप.) उष्णता उत्पन्न करणारा. [सं.]

उष्णदर्शक वि. (शाप.) उष्णता दाखवणारा. [सं. उष्ण+दृश्]

उष्णमापक न. (शाप.) उष्णतेची तीव्रता मोजण्याचे.यंत्र [सं.]

उष्णमाळी पु. सूर्य.

उष्णवात पु. उष्णतेमुळे होणारा वातविकार.

उष्णवायू पु. १. उष्णतेने पोटात गुबारा धरणे. २. आंबट, करपट ढेकरा येणे. [सं.]

उष्णवास पु. पंचाग्निसाधन :'उष्णवास जळवास । शीतवास अरण्यवास ।।'– दास ४.१. १२. [सं.]

उष्णवीर्य वि. शरीरात उष्णता उत्पन्न करणारे, उष्ण परिणामकारक (औषध). [सं.]

उष्णावणे अक्रि. तापणे; गरम होणे : 'ऐसेंचि बोलतां उष्णावले.'– दावि ४०८. [सं. उष्ण]

उष्णांक पु. (शाप.) १. एक किलोग्राम पाणी ०° पासून १° पर्यंत तापविण्यासाठी लागणारी उष्णता; उष्णतेचा एकक; कॅलरी. २. उष्णता मोजण्याचा घटक; प्रत्येक अन्नपदार्थात शरीराला उष्णता पुरविण्याची असलेली विशिष्ट शक्ती. [सं.]

उष्णांशु पु. ज्याचे किरण उष्ण आहेत असा; सूर्य. [सं.]

उष्णिका स्त्री. पाणी किंवा इतर पदार्थ गरम करण्याचे उपकरण. [सं.]

उष्णीष न. पागोटे; शिरोवेष्टण; रुमाल; मंदिल : 'मेघाचे उष्णीष ती आपल्या शिरोभागी धारण करील.'– डाली ८०. [सं.]

उष्णोदक न. तापलेले पाणी; ऊन पाणी; गरम पाणी. [सं.]

उष्णोपचार पु. (शाप.) १. धातूंना किंवा मिश्रधातूंना अपेक्षित परिणाम साधण्यासाठी ठरावीक प्रमाणात उष्णता देणे. २. एखाद्या रोगावर करायचे गरम वाफारा, शेक यासारखे उपचार.

उष्मज वि. उष्म्यापासून उत्पन्न झालेला (जंतू, प्राणिवर्ग). [सं.]

उष्मा पु.स्त्री. १. उष्ण; उष्णता : 'कां कस्तुरीसगट परिमळ । उष्मेसगट अनळ ।।' – अमृ १.४२. २. उकाडा; दाह; गरमी. [सं.]

उष्माघात पु. सूर्यकिरणांची प्रखर तिरीप लागून येणारा भयंकर ताप; तीव्र उन्हाचा चटका लागून होणारा आजार. [सं.]

उष्मामिती स्त्री. (वै.) आहार्य द्रव्यातून मिळणारे उष्मांक मोजण्याचे शास्त्र. [सं.]

उष्मालाट स्त्री. असाधारण उष्ण हवामानाचा बसणारा फटका.

उष्मांक पहा : **उष्णांक**

उस उद्गा. हाय; दुःखोद्गार; एकाएकी दुःख झाल्यामुळे किंवा कळ वगैरे निघाल्यामुळे निघणारा उद्गार. (क्रि. म्हणणे, करणे.). [ध्व.]

उसउस, उसउसो अस्वस्थता, गडबड, धांदल. (गो.)

उसकटणी स्त्री. उसकटाउसकट; उचकाउचक.

उसकटणे सक्रि. १. अव्यवस्थित करणे; इकडेतिकडे टाकणे; विस्कटणे; उचकटणे (व्यवस्थित रचलेल्या वस्तू); अस्ताव्यस्त करणे; बिघडवणे (घडी वगैरे.). २. उलगडणे (भाग); मोकळे करणे (एखादे यंत्र, घड्याळ वगैरे). ३. (विंचरलेले केस, गवताची गंजी) विस्कटणे; इकडेतिकडे पसरणे. [सं. उत्+ शकल]

उसकटाउसकट स्त्री. अव्यवस्था; घडामोड; बिघाड; मोडतोड. पहा : **उसकटणे**

उसकणे सक्रि. विसकटणे; अव्यवस्थित करणे : 'जैसा उदक कुंभ साचार येथे । तो मळ उसके जेथे तेथें ।'– नव १२.९. [सं. उत्+ध्वक्= जाणे, हलणे]

उसकी स्त्री. उचकी. (गो.)

उसण, उसणावळ स्त्री. कमरेत किंवा पाठीत उठणारी कळ, लचक, तिडीक. (क्रि. भरणे, निघणे, चालणे.) (वा.) **उसण उतरणे**– १. मंत्र वगैरे टाकून पाठीत भरलेली लचक उतरणे. २. (ल.) एखाद्याचा दिमाख उतरणे; ऐट उतरणे, जिरवणे.

उसण, उसणवार, उसणवारी, उसणा, उसणे, उसणेवाण पहा : **उसना**, : 'मुष्टिभर पोहे उसणे आणूनि । विप्रा हातीं देतसे ।'– हरि २९.४९; 'तुझ्या पुत्राचा नंदन । त्यासी मारिले जैसा मत्कुण । तुजलागीं सांगतां न घेसी उसन् । तरी मग आजा कायसा ।।'– जै ८७.४६.

उसणा विरुद्ध, उलटा : 'मोरोपंत रोजकीर्द घालीत नाहीत त्यास ते चित्तावरच घेत नाहीत. सारा जाबसाल उसणा करितात.'– ऐलेसं. ३५५१.

उसणणे अक्रि. बरळणे : 'तैसे देवाचां गुणीं विसंवतां । मि बियाळ बोले उसणतां ।'– रुस्व ३७.

उसणाघाई, उसिणाघायी, उसिणेघाई क्रिवि. घावला घाव किंवा माऱ्यास मारा देऊन; समोरासमोर; उसने न ठेवता : 'निष्कपटा होआवे । उसिणा घाई झुंजावे ।' – ज्ञा २.१९०; 'उसणें घाई वीर सकळ । हाणताती परस्परें ।'– हरि २४.१४.

उसणूण उठणे, उसणावणे अक्रि. झोपेतून ओरडत उठणे. (माण. व.)

उसणे पारणे फेडणे उट्टे काढणे; सूड उगवणे : 'केल्या गोष्टीचा शेवट

उसने पारणें फेडलें तरच आम्ही समदु:खी....'– ऐलेसं ३६२.

उसती स्त्री. उशी. (व.) [सं. उत्+शीर्ष]

उसनवट, उसनवारी स्त्री. उधारी; कर्ज; ऋण.
वि. उसनवार; उसना दिला– घेतलेला; कर्जाऊ; उधार.

उसनवट, उसनवार, उसनवारी वि. क्रिवि.उधारीने; परत बोलीने; कर्जाऊ; भाड्याने (आणणे, देणे, घेणे वगैरे).

उसनवार वि. (ग्रंथ) ग्रंथालयातून बाहेर दिले जाणारे (वाचनसाहित्य).

उसनवारी वि. क्रिवि. उधारीने; परत बोलीने; कर्जाऊ; भाड्याने (आणणे, देणे, घेणे इ.).

उसना वि. १. परत देण्याच्या बोलीने आणलेला (पदार्थ, वस्तू) : 'म्हणे ऊसनें आणिलें मेळऊनि'– कचेसुदा. ४. २.कर्जाऊ; उधार (व्यवहार, व्यापार). ३. (ल.) उदासीन; लक्ष, मन लावून काम न करणारा; उपरा; चुकार; हलगर्जी (नोकर, नातेवाईक वगैरे). ४. हलगर्जीचे; बेफिकीरीचे (काम). ५. वरवर; दिखाऊपणाचे; मायावी (भाषण) : 'पण हा उसना दम दहा पावलंसुद्धा टिकेना.'– एल्गार १९. (वा.) **उसनी गोष्ट सांगणे –** आपल्याला जी गोष्ट करता येणे शक्य आहे, ती दुसऱ्याला करायला सांगणे.

उसने न. सूड; बदला : 'उसनें संभाजीचें घ्यावें'– ऐपो १८. (वा.) **उसने घेणे, उसने उगवणे, उसने फेडणे** – सूड घेणे, बदला घेणे, परत करणे; फेड करणे.

उसनेपासने वि. उधार; कर्जाऊ; मागून आणलेले; परत बोलीचे; उसनवार. [उसनेचे द्वि.]

उसने वाण १. कोणी जे काही केले असेल त्याचा मोबदला देणे; प्रत्युपकार; परत भेट; परत फेड. २. सूड; बदला.

उसपण, उसपणी, उसपा स्त्री. १. काढून टाकणे; बाहेर काढणे; उपसणी; उपसा (होडीतील, डबक्यातील) पाणी, भांड्यातील दूध, तूप, तेल वगैरे. २. कोरडे, रिकामे करणे (बादली, चमचा, पळी, टोपली, हात वगैरेच्या साहाय्याने). ३. बाहेर काढणे; वर काढणे; मोकळे करणे; उघडे करणे; म्यानातून तरवार, गवसणीतून, आच्छादनातून वस्तू वगैरे)[सं. उत्+सृप] (वा.) **अंगावर उसपणे**– रागावून, टाकून बोलणे, धावून जाणे. **कामधंदा उसपणे**– कामधंदा उरकणे, पार पाडणे, संपवणे. **शिंग उर्सींणे** – शिंगे उगारणे, शिंगे उगारून मारायला धावणे.

उसपणे सक्रि. उपसाउपस करणे; काढून टाकणे; बाहेर काढणे (भांडे वगैरेतून वस्तू इ.) : 'एका कणालागि उंदिरु । असिका उसपे डोंगरु ।'– राज्ञा १८.६०४.

उसपाउसपी स्त्री. एकदम जोराने बाहेर काढण्याची क्रिया (पाणी, म्यानांतून तरवार वगैरे). [सं. उत्+सृप्]

उसपाभर क्रिवि. १. निष्कारण किंवा व्यर्थ वरचेवर बाहेर काढणे व पुन्हा भरणे. २. (ल.) उठाठेव; रिकामी दगदग; त्रास.

उसबकी स्त्री. रस्सा करण्याचा एक प्रकारचा मसाला.

उसबु स्त्री. वाळू : 'लाज्या लाह्या कीं लेप्या लालु । कानुडे तयासी वदती आरळु । सिकता वाळु उस्क्या उसबु वालु । नदीतीर खड्या म्हणणे कीं ।।' – दावि ५४. [का.]

उसमटणे अक्रि. गुदमरणे. पहा : **घुसमटणे** (गो.)

उसर, उसरा, उसरी स्त्री. १. वाळलेली भाजी; सुकवलेली भाजी (आळू, मेथी, गाजरे इ.); सुकलेल्या आंब्याच्या फोडी; वाळलेल्या पालेभाजीला पळवा म्हणतात. २. (ल.) खंगलेले, सुकलेले, कृश, वाळलेले शरीर : 'तत्सुख हे मत्सुख तनु होतचि होती तदाधिनें उसरी ।' – मोआदि ३५.४. (वा.) **उसर करणे –** वाळवणे; कृश करणे; निगा न राखून, त्रास देऊन किंवा छळ करून (जनावर, मनुष्य यास) कृश करणे; हयगय करणे.

उसरत, उसरपत स्त्री. निवांतपणा; उसंत; विश्रांती; रिकामपण; फुरसत: 'तारामती भावे काम करीं । उसरत नाहीं दिवसरातीं ।'; 'ऐसा करितां येरझारा । उसरपत नाहीं भवसागरा । माजीं बुचकळ्या देत असे ।।' (गो.) [सं. उत्+सृ]

उसरमा पहा : **उश्रमा** : 'उसरमा मनीचा वदतां नये ।'– विठ्ठलकृत रसमंजरी ५०.

उसरा वि. वाळलेला; कृश. [सं. उपर]

उसराण न. उसाचे शेत; ऊस लावण्याची जमीन.

उसरी पहा : **उशिरा**

उसरे न. सुकलेले वांगे.

उसल पु. श्वास. [का. उसलु= श्वास]

उसल, उंसल स्त्री. उसाची जमीन; उसाचे शेत. [सं. इक्षु+आलय]

उसलणे अक्रि. जोराने वर येणे : 'समुद्रजल उसलत । आकाश वेऱ्ही ।।'– राज्ञा १.१५५.

उसवण पहा : **उसण**

उसवणी स्त्री. शिवण काढून टाकणे; टाके उलगडणे, उसवणे.

उसवणे, उसविणे उक्रि. १. शिवण काढून टाकणे; टाके उलगडणे; दोरा काढणे; उघडणे (शिवण्याच्या उलट क्रिया.) २. घरावरील शिवलेले गवत काढून टाकणे.(को.) [सं. उस् + सिव् = शिवणे]

उसवणे अक्रि. सूज उतरणे, ओसरणे. (राजा.) [सं. उत्+सिव्= सुजणे]

उसवसी स्त्री. उशी : 'गादी मिळंल, झालंच तर दोन उसवस्या मिळत्याल.'– पेरणी ६४.

उसवा पु. नदीच्या पुलाबरोबर वाहून आलेली लाकडे, गवत इ. जेथे लागतात ते ठिकाण. [सं. उद् + सु]

उसवास पहा : **उच्छ्वास** : 'कित्येक भटजींनी फक्त आपल्या उपयोगाकरिता त्या हौदाच्या उसवासानजीक एक लहानसा चोरहौद बांधून...– जोफु १२१.

उससणे अक्रि. १.उसासा टाकणे; श्वास टाकणे : 'मग उससौनि किरीटी । वास पाहिली ।।'– राज्ञा ११.२४९. २. वाढणे; उत्पन्न होणे; जिवंत होणे; जीवन पावणे; प्रकट होणे : 'तंव आयुष्यनदी उससे । दिहाचि दिहा ।।'– ज्ञा १७.१३२.

उससा पु. उच्छ्वास; सुस्कारा; उसासा : 'वागर्था पडत मिठी ।

उससाचिंया ।।'– ज्ञा १८.१६०६. [सं. उत् +श्वस.]

उससी पहा : **उसवशी** : 'करूनि असिधारांची उससी ।'– ज्ञाप्र ७७०.

उसळ स्त्री. मसाले घालून कडधान्याचा केलेला खाद्यपदार्थ, केलेले तोंडी लावणे. [क. उसळि=उसळ]

उसळणी स्त्री. पहा : **उसळी** [सं. उत्+शल्]

उसळणे उक्रि. उसळ करणे.

उसळणे अक्रि. १. वर उडणे (तुषार, लाटा, कण); वर जाणे : 'जैसीं प्रळयाचेनि समीरे । वृक्षपर्णे उसळती ।।' – मुवन १०.१०६. २.वर उडी मारणे; उंच जाणे : 'स्वरथावरूनि बाणाघातें उसळोनि पावती पतन ।'– मोउद्योग १३.११२. ३. क्रोधाने अंगावर धावून जाणे; फार रागावणे; उखडणे : 'हाक देओनि उसळला ।'– शिव १०६७ . ४. जोराने जलद वाढणे (मूल, शेत, झाड वगैरे); एकदम वर येणे (पाण्यातून, गर्दीतून). ६. वर उसळी घेणे; आपटला असताना जमिनीवरून वर उडणे (चेंडू वगैरेंनी). ७. निघणे; उत्पन्न होणे; वाहणे : 'हालविशी कर्णयुगुलें तेथूनि जो कां वारा उसळे ।।'– गुच १.२. [सं. उत्+ शल्=वर उडणे]

उसळपा पु. १. सरपणाचा ओंडा; फोडलेले जळाऊ लाकूड. (राजा.) २. (सामा.) ओंडा; ओंडका. [सं. उत्+सृप्]

उसळवट वि. झरे, पाझर असलेली जमीन; उसळीची जमीन. [सं. उत्+शाल्+वत्]

उसळवाटी क्रिवि. उसळून सळसळ आवाज करीत : 'काई सांगौ या परौती । उदके उसळवाटीं कढती ।।'– शिव ७४९. [सं. उत् + शल्+वत्]

उसळी स्त्री. १. पाण्याचे तुषार, तरंग, लाटा वगैरे हवेत उडणे. २. उडी; उशी (पाण्यातून वगैरे). (क्रि. खाणे, मारणे.). ३. (ल.) बंधनातून जोराने बाहेर पडण्याची क्रिया. ४. (ल.) क्रोधाची लहर; रागाचा आवेश; प्रेम वगैरे विकारांची लाट; आवेग. ५. जोराने वर येण्याची किंवा उडण्याची क्रिया. (क्रि. खाणे.). पहा : **उसळणे, उसाळी** [सं. उत+शल्]

उसळी चिन्ह (भूशा.) अवसादी खडकांच्या अध:प्रतलावर उमटणाऱ्या खुणांपैकी एक. एखादी परकी वस्तू. उदा. दगडगोटा, हाड, प्राण्यांचे कवच, शंखशिंपला आदी पाण्याच्या हालचालींमुळे तेथे साठलेल्या अवसादावर उसळी मारून वर येतात, त्यांची खूण तेथे उमटते. वर साठणाऱ्या दुसऱ्या थराच्या खालच्या बाजूसही त्याचा छाप उमटतो. त्याला 'उसळी चिन्ह' असे म्हणतात.

उसळून पडणे संतापून हल्ला करणे : 'सुधारकांवर ते वारंवार उसळून पडले आहेत.'– केका ८.

उसळ्या पु. जाळण्याचे लाकूड; सरपण.

उसंग स्त्री. (प्र.) उत्संग, मांडी : 'जननीयां घेतला उसंगा'– उषा ७.६३. [सं. उत्संग]

उसंडी स्त्री. उसळी; जोराची उडी : '(मासा) वर उसंडी मारीत नाही– मोठा बेरकी दिसतोय्.'– एकाको ५५.

उसंत, उसंध, उसंधी स्त्री. १. विसावा; विश्रांती; आराम. (क्रि. खाणे, येणे.) : 'म्हणौनि व्यापारा हातीं । उसंत दिहा ना राती ।'– ज्ञा १४.२४१. २. फुरसत; स्वस्थता; रिकामा वेळ : 'कदा उसंत नाही'– ज्ञाप्र १४२. [सं. विश्रांत, उत्=सन्धि]

उसंतणे उक्रि. १. आक्रमण करणे; उल्लंघन करणे; पलीकडे जाणे : 'चाले झडझडा उसंतूनी वाट । पाहे पाळतूनी उभा तोचि नीट वो ।'– तुगा ११२. २. दूर करणे; संपवणे : 'परि नोसंतितां विवसी । भेटी नाहीं निधीसी ।'– ज्ञा १७.३११. ३. थांबणे; बंद होणे : 'आंग मोडामोडी । कार्यजातां अनावडी । नुसंति परिवडी । जांभैयांची ।।'– राज्ञा १४.१७९. ४. विसावा घेणे. ५. आश्रय करणे : 'भार्या म्हणे प्राणेश्वरा । उसंतूं नको शोकसागरा । मी सांगेन त्या विचारा । अत्यादरे अनुष्ठी ।।' – मुआदि ३८.२२. ६. शेवटास नेणे; पुरे करणे. निस्तरणे : 'तुका म्हणे आपुलालें । उसंतिलें ज्यांणीं तें ।।'– तुगा १२०८. [सं. विश्रांत]

उसंबणे अक्रि. आवेगाने स्फुंदणे; हुंदके देणे; हुंदके देऊन रडणे. [सं. उत्+स्फुंदन]

उसातले वाड १. उसाचा शेंडा. २. (ल.) हुषार, होतकरू मुलगा.

उसाबर, उसाभर स्त्री. १. धंदा; काम; मेहनत; कष्ट. २. भानगड; उठाठेव; संबंध : 'त्यांना या उसाभरीचा वीट आला होता असे नव्हे.'– व्यंमाक १००. ३. खटाटोप; व्यवस्था : 'हितं तुज्या उसाभरीला सोनाबाई ऱ्हावू दे.'– रैत ९६. (वा.) **उसाभर करणे–** काळजी घेणे; व्यवस्था ठेवणे; लक्ष देणे : 'दिवसभर उसाभर करावी लागती त्येंची.'– भुज ३२.(माण.)

उसार–रा पु. रिकामी, मोकळी जागा (गलबत, घर यांमध्ये).

उसाली स्त्री. १. उसळी. २. उशी. ३. झेप : 'मुझफरखाल हरकोठे उसाली खाऊन जातील तर जाऊ न द्यावे '– पेद १८.१९१.

उसास पहा : **उच्छ्वास**

उसासणे अक्रि. १. उसासा टाकणे; दम घेणे : 'मग देओ भणे हो हो कां उसाससी; राहे राहे का पळिसी ।'– शिव १०६८. २. उसळणे; वर येणे : 'सागरी लहरी उसासे । उसासली ते सेंवचि नासे ।' – एभा २८.२८६. ३. उमटणे; उन्नत होणे; ज्वानीस येणे; फुलणे; भरणे (स्त्रीचे स्तन) : 'संगीन कुच भरदार सजिव सजदार गुलगेंद उसासले ।'– प्रला ११३. ४. टाकणे; त्याग करणे : 'लक्ष्मी उसासिली ।'– भाए १११. [सं. उत्+श्वस्]

उसासणे अक्रि. टोचणे; मारणे; भोसकणे : 'कां हो मज उसासिले ?'– एउगी १११.

उसासणे अक्रि. उल्हसित, आनंदित होणे : 'जे दुष्कृतीं चित्त उसासे ।'– राज्ञा १४.२४८.

उसासा पु. १. दीर्घ श्वास; सुस्कारा. २. विसावा; विश्रांती : 'पाठीं व्याघ्रादि तामसा । योनी तो अळुमाळु ऐसा । देहाधाराचा उसासा । आधी जोही ।।'– ज्ञा १६.४१५. ३. पाण्याच्या नळात हवा येण्याकरिता ठेवलेले उंच छिद्र. पहा : **उच्छ्वास**[सं. उत्+श्वस] (वा.) **उसासा टाकणे–** दीर्घ श्वास सोडणे.

उसासा असासा पु. जोराचा सुस्कारा, श्वास (क्रि. टाकणे.). [उसासाचे द्वि.]

उसासी स्त्री. उशी. [सं. उत्+शीर्ष]

उसाळ पहा : **उसाळा** : 'अपरोक्षज्ञानाचेनि उसाळे ।'–दास ५.३.४८.

उसाळणे सक्रि. हर्षविणे; आनंदित करणे. [सं. उत्+शल्]

उसाळा पु. उल्हास; उत्साह; आवेग; जोर; उमाळा. 'तेथें ऋषिकुळ सकळ नाचती निर्मळ उछायाचेनि उसाळे.'– दास ५.३.४८. [सं. उत्+शल्]

उसाळी स्त्री. उडी. पहा : **उसळी** : 'रोधिले चित्त घे उसाळी । कथा संपता अवलोकीं ।'– मुआदि १३.१७.

उसां क्रिवि. उशाला : 'मौनेंच येऊनि मोक्षदानी । सत्यभामेचे शिर उचलूनी । उसां आपुली मांडी देऊनी । चक्रपाणि बैसला ।।'– हरि २६.११३. स्त्री. उशी; उसे; उशाला घ्यायची वस्तू. (कु.) [सं. उत्+शीर्ष]

उसिटणे सक्रि. उष्टे करणे : 'ऐसा उपाधि उसिटिलें । काइ वानूं ।।'– राज्ञा १८.२१.

उसिटे पहा : **उष्टे** : 'उसिटे लाहावेयाचे सायासु । तेथ सेवेची कवणी आसु ।' – दाव २५३.

उसित जाणे अक्रि श्वास, ठसका लागणे. पहा : **असूत** (क्रि. जाणे.) : 'उचकी लागली उसित गेला । पीत्त उसळलें उलाट जाला ।'– दास २.६.३३. [सं. उत्+सिक्थ]

उसिसी स्त्री. उशी : 'चंपक परागाची उसिसी । तेथ भीमकी बैसविली कैसी । नवल भूतली चंद्रिका जैसी । मृगी कुंकुमाची ।।'– रुस्व ४५७.

उसीगा मांडी : 'सातां पाताळांचा उसीगां : आरेरे पारिकेन्हो रिगां ।'– शिव १००३.

उसीर, उसीरू पहा : **उशीर** .'आता न लावावा उसीर.'– वेसीस्वा ३.५.

उसीसे न.उसे : 'मांडी उसीसे करूनि श्रीमुख अवलोकीत देह त्येजीलें ।'– लीच १.२५.

उसीसे न. उसासा; श्वास; दमा: 'कीं संसाराचेनि त्रसे । जे करौनि होते उसीसें ।'– ऋ ६०. [सं. उत्+श्वस्]

उसुलवार वि. जोराने वाढणारा; वर येणारा; वाढाळू (झाड, मूल वगैरे). (को.) [सं. उत्+शल्]

उसू वि. सैल; फट राहिलेला; घट्ट न बसलेला; शिथिल; पोकळ (खुंटी, दादरा, दार वगैरे.). (को.)[सं. उत्+सिव्-स्यूत]

उसूपणे सक्रि. उपसणे : 'कव्हणी एकू : केशवनायकाचिये घरीचा बाऱ्हीवां उसूपे'– लीच ४.५६.

उसूल पु. वसूल; जमा; उत्पन्न. [फा. वुसूल्]

उसूळ पु. उकळी : 'च्याला उसूळ आला बग.' – खळाळ ७७.

उसे न. १. बिछान्याची डोक्याकडची बाजू. पहा : **उशागत.** २. उशी; गिरदी; निजताना डोक्याखाली घेतलेला आधार. [सं. उत्+शीर्ष] (वा.) **मांडीचे उसे करणे–** आपल्या संरक्षणासंबंधी सर्वस्वी एखाद्यावर विश्वास ठेवणे.

उसे, उसेपोट न. बेंबीखालचा पोटाचा भाग.

उसेती स्त्री. (नाविक.) भरतीची वेळ.

उस्करणे उक्रि. (प्र.) उस्तरणे. विस्कटणे; विस्कळीत करणे; अस्ताव्यस्त करणे; विखरणे : 'वीण रेसभरही उस्करली नाहीं.'– झांकली मूठ (हडप) १९. [सं. उत्+ शकल]

उस्कलणे सक्रि. हाकलून, हाकून देणे : 'चुलतभावाला उस्कलून लावा म्हंता ?'– रैत ५.

उस्कारा, उस्कारासस्कारा पु. उसासा; सुस्कारा; जोराचा श्वास; दम. (क्रि. टाकणे.) [सं. उत्+श्वास]

उस्क्या स्त्री. वाळू; रेती. पहा : **उसबु**: 'लाज्या लाह्या कीं लेप्या लालु । कानुडे तयासी वदतु आरळु । सिकता वाळु उस्क्या उसबु वाळु । नदीतीर खड्या म्हणणे कीं ।।' – दावि ५४. [क. उसुकु=वाळू]

उस्तभविणे सक्रि. भर देणे; उठविणे; उद्युक्त करणे; प्रवृत्त करणे : 'दादोसी महदायिसां उस्तभवीले : द्वारावतीए जावे ऐसे' – लीच ३.५२. [सं. उत+स्तभ्]

उस्तर पु. उष्ट्र; उंट. [सं. उष्ट्र]

उस्तरखाना पु. उष्ट्रखाना; उंटखाते; उंटाची पागा.

उस्तरणे सक्रि. १. घरावरील कौले, गवत वगैरे आच्छादन काढणे; छपरावरील ओमन वगैरे काढणे. २. विस्कटणे; उलगडणे; उघडे करणे. ३. उसवणे; वीण काढून टाकणे; दोरा काढणे. ४. नासधूस करणे; मोकळे; अलग करणे; भाग वेगळे वेगळे करणे. [सं. उत्+स्तृ]

उस्तरपलाण–णा–णे न. उंटावरील खोगीर, आसन. [सं. उष्ट्र+ पल्याण]

उस्तराउस्तर स्त्री. मोठ्या प्रमाणावर व सर्वत्र उस्तरण्याची क्रिया; उलगडणे; उस्कटणे; मोकळे करणे; उघडे करणे वगैरे. पहा: **उलथापालथ, उस्तरणे** [सं. उत्+स्तृ]

उस्तरे न. ठसका; उशीत. पहा : **असूत, असूद.** (क्रि.जाणे.)(गो.)

उस्तवार वि. रीतसर; व्यवस्थित : 'खानाची व चिरंजीवाची भेटी होऊन उस्तवार स्नेह व करारमदार व्हावा.'– ईएमपी १७२.

उस्तवारी स्त्री. १. डागडुजी; दुरुस्ती; व्यवस्था; मजबुती; पुनर्घटना : 'लोकांचे कर्जाचा मार्ग होऊन आपली उस्तवारी होईल.'– मइसा १३.९७. २. उपचार; तैनात; शुश्रूषा : 'जखमींची वगैरे पथ्यपाण्याची उस्तवारी बरीच आहे.' – ज्ञा ११.६०७१. ३. मशागत; लागवड (शेत, जमीन वगैरेची) : 'जमिनीची नीट उस्तवारी ठेविल्यास ती सुधारते.'– शे ३.२. ४. उठाठेव; चौकशी. (माण.) [फा. उस्तुवारी]

उस्तळणे अक्रि. उचंबळणे; आवेशात येणे : 'स्वातंत्र्यप्राप्तीच्या योजना तो अगदी उस्तळून सांगत असतो.'– माजी १९९.

उस्ताद, उस्तादगिरी, उस्तादी पहा : **वस्ताद** [हिं. गु.]

उस्तावर करणे पहा : **उस्तवारी करणे** : 'मी तिची उस्तावर करत्येय तोच गणूभावजी नि आतेसासूबाई आल्या.'– पडघ १२४.

उस्ते न. पहाटेचा किंवा सकाळचा संधिप्रकाश; झुंजुमुंजू.(कों.)[सं. उषा]

उस्फवणे सक्रि. उचकवणे; फितवणे : 'तो आपल्याविरुद्ध उस्फवतो'– अगतिका ७०.

उस्मर पु. उल्लेख: 'याचा उस्मर मराठी वाङ्मयात दिसत नाही.' – स्त्रिकावा ९. [सं. स्मृ]

उस्मरणे अक्रि. १. सुस्कारा टाकणे; श्वास टाकणे. २. हुंदके देणे; स्फुंदणे. ३. धापा टाकणे. ४. दु:ख, खेद व्यक्त करणे.

उस्मरणे, उस्मारणे उक्रि. १. आठवणे; आठवण करणे; स्मरण करणे; पुन:पुन्हा पुढे आणणे. २. उल्लेख करणे; सांगणे; दिग्दर्शित करणे. [सं. उत्+स्मृ-स्मरति]

उस्तरा पु. १. विश्रांती; दम; श्रमानंतरचा विसावा. (क्रि. घेणे.). २. दीर्घ श्वास सोडणे; सुस्कारा टाकणे. (क्रि. टाकणे.).

उस्मस्थड न. बागाईत जमिनीशेजारची पडीत जमीन.(गो.)

उस्मारा, उस्रमा पु. १. उपकाराचे किंवा अपकाराचे स्मरण, आठवण, जाणीव, दिग्दर्शन. उदा. उस्मारा टाकणे, उस्रमा करणे. २. (सामा.) उल्लेख; कथन; दिग्दर्शन. [सं. उत्+स्मृ]

उस्रा स्त्री. गाय : 'राखिता कळप या वनि उस्रा' – वामन विराट ८.४८.

उस्राप पहा : **उ: शाप** (कु.)

उस्वास, उस्वासा पहा : **उश्वास,** उस्वास: 'श्वास उस्वास कोंडला । तेणें प्राणी जाजावला ।।' – दास ३.१.३९.

उहरवणे अक्रि. उद्धार करणे; पलीकडे नेणे : 'एकिं पाखाण वाऊनि उहरविलि । समुद्रीं कटकें ।।'– राज्ञा १०३५.

उहीपुहा स्त्री. वाटाघाट; साधकबाधक विचार; चर्चा : 'हे उहीपुही जे ऐसी ।' – राज्ञा ६.८९.

उहू, उह पु. १. व्यूह; विभू; कट; युक्ती; बेत; तर्क; कल्पना (क्रि. रचणे.) २. परिस्थितीप्रमाणे मूळ सामान्य रीतीच्या वाक्यात विशेषानुरोधाने केलेला फरक; हेतू कायम ठेवून शास्त्रवचनात जरूर तो बदल करणे. (उदा. एकवचनाच्या ठिकाणी अनेकवचन, पुल्लिंगाच्या ठिकाणी स्त्रीलिंग, अमुक शब्दाबद्दल विष्णू इ. नाव. यज्ञोपवीत धारण करावें हें सामान्यवचन, येथे दोन यज्ञोपवीते धारण करावी असा उहू केला पाहिजे.). ३. प्रथम उल्लेख; प्रस्ताव; प्रस्तावना; परिस्फोट; विषयाची मांडणी. (क्रि. काढणे.) [सं. ऊह्]

उहू स्त्री.१. सून. २. धाकटी भावजय. (खा.)[सं. वधू]

उळ न. फूल : 'उठणें की पडणें । कुचभाराचें कोण जाणे । फांकणें की सुकणे । जाउळा (जातीपुष्प)चें ।।' – अमृ ४.८. [सं. पुष्प]

उळउळी, उरउळी स्त्री. अव. पिसा; पिसवा. (गो.)[क हुळु]

उळउळीत वि. किंचित तापलेले; कोंबट. (गो.) [क. उळगु=जाळणे]

उळकंबणे, उळकुंबणे पहा : **ओळकंबा**

उळकंबा, उळकुंबा पु. झोका; हेलकावा.

उळगवणे सक्रि. देवविणे : 'श्रीकरी ताडपत्रिका उळगविली ।'– श्रीकृच ५५.५८. [का. ओलगिसु.].

उळगाऊ, उळगी वि. उळिगाकरिता योग्य; आहेर किंवा इतर देणगी देण्यासारखे (वस्त्र वगैरे.). [क. उळ= उंची वस्त्र]

उळगी, उळिगी स्त्री. १. एखाद्या कामाचे ओझे, भार; एखाद्याचे उपकार फेडण्याचे ओझे. २. बिगार : 'तरी कर्मप्रवृत्तीहीलागीं । तया आयासु नाहीं आंगीं । जे प्रवृत्तीचेही उळिगीं । लोकुचि आथी ।।'– ज्ञा १८.४५८. [का. ऊळिग =सेवा]

उळपात स्त्री. १. कांद्याची पात. [क. उळिळ् =कंद, कांदा]

उळमळणे अक्रि. लटपटणे : 'भोवळ आल्यामुळे ती उळमळू लागली.'– धाधो ३८४.

उळवई, उळवयी स्त्री.गाडीच्या चाकांच्या तुंब्यातील (ज्यात कणा असतो ते) लोखंडी कडे, वसवी, आवण. [कर्ता.]

उळंबणे उक्रि. अवलंबणे; मिळवणे; आश्रय करणे; आधार घेणे; प्राप्त होणे : 'भगवंताचिये भक्ति । स्वर्गसुखातें उळंबिती ।।'– रास १.६३२. [सं. अवलंब]

उळंबळणे अक्रि. काठोकाठ भरून वाहणे; तुडूंब भरणे (भांडे, नदीचे पात्र वगैरे). [सं. उत्+लंब]

उळा पु. हवळा; हुळा; भाजलेला ओला हरभरा : 'तैसा बरवा उळेया जोगा चणा : असे ' – लीचउ १३. [क. उळगु= जाळणे.]

उळाक वि. वात्रट; उडाणटप्पू : 'उळाक मनाच्या पाडीनं वैरण सगळी तुडवून टाकली हुती.' – गोता ३४.

उळिग स्त्री. भोवरा : 'आठहि पाहार जैसें पायां । उळिग घापे ।।' – ज्ञा १७.२०२. [क. उळ्लु=वाटोळे फिरणे, गुंडाळणे]

उळिग, उळीग स्त्री. १. सेवा; चाकरी. पहा : **उळगी** : 'उळिग मी करीन। आंघोळीचें ।।' – ज्ञा १३.४२०. २. काम; व्यवसाय; धंदा : 'चतुर्वर्णा घातली । सिनानीं उळिगे ।।' – ज्ञा १८.८१०. ३. बिगार; पडलेले काम. ४. उपकाराचे ओझे. (क्रि. वारणे) : 'तरी कर्मप्रवृत्तीहीलागीं । तया आयासु नाहीं आंगीं । जे प्रवृत्तीचेही उळिगी । लोकुचि आथी ।।' – ज्ञा १८.४५८. [क. उळिग सेवा, काम]

उळिग, उळीग स्त्री. सण; श्राद्धपक्ष इ. नैमित्तिक विशेष.(चि.)

उळी स्त्री. (सुतारी धंदा) किकरे; पटाशी. (व.)[क. उळि]

उळी वि. पातीचा (कांदा) : 'आवो उळीचा कांदा उळीचा कांदा होय म्हणे ।' – गोप्र ७३.

उळोगार पु. ओघळ. (गो.)

उळ्ळा पु. एक प्रकारचे गवत. (कर्ना.)

उक्षण न. नांगरणी. (गो.) [सं. उत्+खन्]

उक्षण न. सिंचन; औक्षण. पहा : **अवोक्षण** [सं. उक्ष्=शिंपडणे]

उक्षतरण न. आक्सफोर्ड शहर : 'वर्तमानकाळीं उक्षतरण नगरीं वास करणाऱ्या महावैदिकाची माहिती ....' – निमा ४२४.

उक्षित वि. सिंचित; भिजवलेले; ओले केलेले : 'स्वपरक्षतजोक्षित ते जेविं वसंतीं पलाशतरु फुलले ।' – मोभीष्म २.९. [सं. उक्ष्=शिंपडणे]

उक्षी त्री. एक औषधी वनस्पती. ही झाडे डोंगराळ जमिनीत होतात. याच्या फळाचे चूर्ण पत्री, जायफळ इ. पदार्थाच्या चूर्णाबरोबर पंडुरोगावर देतात.

उं स्त्री. एक कृमी (केसातील).

उंका वि. १. उघडा; नागडा; हीन. (को.) २. मोकळा; सुटा.

उंकी स्त्री. पाजणी; मागावर विणण्याकरिता खळ देऊन तयार केलेले उभे धागे. [क. उंकी, उंके]

उंगणे अक्रि. आंघोळ करणे : 'आनें उंगीनें रामाभोक्ति केतली.आणि अंग धुवून रामाची सेवा करी.' – भिल्ली भाषा २७. (भिल्ली)[सं. अवगाह]

उंगली स्त्री. (हाताचे किंवा पायाचे) बोट [हिं.] (वा.) **उंगली चालवणे –** (शरीरावरून) हात फिरवणे; अंगुली स्पर्शाने स्त्री वश होते का हे पाहणे : 'उंगली चालवून पहायची. पोरगी फितली तर फितली'– वासू ३२.

उंच वि. १. जमिनीपासून किंवा उभे राहण्याच्या स्थानापासून आकाशात पुष्कळ अंतरावर असणारा, पोचणारा; उन्नत; उत्तुंग; उच्च. २. श्रेष्ठ (गुण,पदवी, किंमत यामध्ये); वरिष्ठ पदवीचा, योग्यतेचा (चतुरस्रता, थोरपण वगैरे संबंधाने); सन्मान्य: 'चातुर्येवीण उंच पदवी ।' – दास १४.६.७. पहा : **उंचा, उंची**. ३. (संगीत.) वर चढणारा (तान, स्वर); ऊर्ध्वगामी; तीव्र; वरपर्यंत गेलेला. ४. फारच उभट चढणीचा. ५. खोल (विहीर, खाच, चर वगैरे). (राजा.)६. फार मौल्यवान; किंमतवान : 'कष्ट करितां सेत पिकें। उंच वस्त्र तत्काळ विकें।' – दास १२.७.२५. [सं. उच्च] (वा.) **उंच टाचा करून वागणे** – अमंगल, अपवित्र पदार्थांवर पाऊल पडून नये म्हणून चवड्यावर चालणे; (ल.) गर्वाने वागणे; तोऱ्यात असणे.

उंच क्रिवि. फार वर; हवेत; उंचावर. [सं. उच्च]

उंचकपाळ्या वि. नशीबवान (उंच कपाळ भाग्याचे निदर्शक असते या कल्पनेवरून).

उंचखाल क्रिवि. उंचसखल; वरखाली; खाचखळग्यामध्ये; खाचखळग्याची.

वि. विषम; नतोन्नत; खालीवर असणारी (जमीन).

उंचट वि. १. उंच; चढावाची (जमीन); उभट; चढणीचा. २. किंचित उंच; वाढलेला. [सं. उच्च +वत्]

उंच दरवाजा पुढील मोठा दरवाजा : 'उठल्या अवाई उंच दरवाजा लाविला ।' – ऐपो ६८.

उंचदर्पण पु. सूर्यकांत; सूर्य : 'उंच दर्पणीं अग्नी निघतो ।' – दास १६.५.१९.

उंच नाक न. प्रतिष्ठा; मान्यता; प्रौढी : 'उंच नाकेश्वशुरागारी । वागे न ऐसें करावें ।।' – जै १७.६५. (वा.) **उंच नाक करून –** १. प्रतिष्ठेने; मान्यतेने. २. निर्लज्जपणाने; बेशरमपणाने.

उंचनीच क्रिवि. १. खालीवर असे; खडबडीत; उंचसखल. २. लहानथोर; श्रेष्ठकनिष्ठ; गरीब श्रीमंत : 'उंच नीच काहीं नेणें भगवंत ।' – तुगा ३६९१.

उंचपट न. चढण असलेला रस्ता; चढणीवरील जागा.

वि. किंचित वर; थोडे उंचावर.

उंचपडे, उंचवडे वि. वर असणारे, महत्त्वाचे : 'याहीपासून उंचवडें । गुढले फळाचेनि बुडे ।' – ज्ञा १५.१९६.

उंचपुरा वि. उंचापुरा

उंचलो वि. वरचा. (गो)[सं. उच्च]

उंचवट वि. १. किंचित उंच. २. थोडा चढ असलेला; उंचावर असलेला. याच्या उलट बसकट. [सं. उच्च + वर्ती]

उंचवटा, उंचवळा पु. उंच भाग; टेकाड; उंचाड; टेंब. २. अंगावरील, एखाद्या वस्तूवरील उंच भाग; टेंगूळ. ३. सपाट पृष्ठभागावरचा थोडा उंच भाग; ओटा : 'तो उंचवटा देखिला । तितल नीट.' – ऋ ७२.

उंचवणे उक्रि. उंच असणे.

उंचशिरा वि. ज्याचे शिर उंच आहे असा; उंच बांधणीचा; चांगला उंच : 'चौथा मजला उंचशिरा करी बहार आकासीं ।' – प्रला ९५.

उंचश्रवा पु. इंद्राचा घोडा : 'उंचश्रवा न सवरेची' – उषा १६७९.

उंचसखल वि. खडबडीत

उंचस्कंध कुऱ्हाड (पुरा.) ताम्रपाषाणयुगातील सिंधू संस्कृतीच्या काळी वापरात असलेली, पूर्वभारतात सापडणारी, दगडी किंवा तांब्याची उंचस्कंध (उभा खांदा) असलेली कुऱ्हाड.

उंचा वि. १. उच्च प्रकारचा; महत्त्वाचा; अधिक योग्यतेचा; नामी; गुणाने श्रेष्ठ असा : 'नीचिये कुळीचा उंचा वंद्य होय ।' – तुगा २४२०. २. अधिक मौल्यवान; किंमतवान. [सं. उच्च]

उंचाड न. उंचवट्याची जागा; लहान टेकडी; चढणाची जागा; टेंब; टेकाड. वि. उंच; उन्नत; तुंग; भव्य. पहा : **उंचवट** [सं. उच्च]

उंचापुरा वि. उंच व सुदृढ; भव्य; धिप्पाड; पूर्ण वाढलेला : 'जी उंचीपुरी व धट्टीकट्टी जवानमाणसे असत तीच युद्धात उतरत.' – आआ ३२. [सं. उच्च+पूर्ण]

उंचाफेर पु. घोड्याची एक प्रकारची चाल – अश्वप १९४.

उंचावणी स्त्री.१. उठावणी : ' करोनि शब्दांची उंचावणी । मग लंचु खंडिला तिसा नाणी ।' – ख्रिपु २.४५.३३. २. (ल.) गौरव; मोठेपणा. [सं. उच्चय]

उंचावणे अक्रि. १. उंच होणे; वाढणे : 'एथ उंचावे तेणें नाम । नैमित्तिक होय ।।' – ज्ञा १८.११४. २. वक्षःस्थल उन्नत होणे. ३. उंच जाणे, उडणे; भरारी मारणे. ४. (ल.) सुस्थिती प्राप्त होणे; उत्कर्ष होणे. ५. फुगून जाणे : 'तेवी प्रिय वस्तु पाये । आणि सुखें जो उंचावे ।' – ज्ञा १३.८०६.

सक्रि. १. चढविणे; वर उचलणे; उठवणे; उंची वाढवणे; वर करणे : 'शेष धावला तत्क्षणा । उंचावूनि फणा ।' – कृष्णाचा पाळणा १०. २. मोठेपणा आणणे : 'आम्हां मानवातें उंचवीती मातें ।' – टिक १३५.

उंची स्त्री. १.पदार्थाच्या खालच्या भागापासून वरच्या भागापर्यंतच्या व्याप्तीचे प्रमाण, माप; तळापासून शेंड्यापर्यंतचे प्रमाण. २. (विहीर वगैरेची) खोली. (राजा.)

वि. अधिक चांगला; सरस; श्रेष्ठ; जास्त किमतीचा. 'महाराष्ट्रांत ही एकच उंची संस्था होती.' – केले १.२९८. [सं. उच्च]

उंची शअ. वर; उंचीवर; शेंड्यावर; कळसावर; उपरि. उदा. पर्जन्यकाळीं मीठ चुलीउंची ठेवावें म्हणजे पाघळत नाही.' (राजा.) [सं. उच्च]

उंची देणे सक्रि. हरभऱ्याच्या झाडावर चढवणें; हुरळावयास लावणे;

चढविणे; गर्वाने फुगविणे; भर देणे . (व.)

उंचीव स्त्री. उंची; उंचपणा : 'उंचिवे जैसा प्रचंड ताळ.' – मुसभा ८.३८. [सं. उच्च]

उंचून क्रिवि. वरून; उंचावरून; शेंड्यावरून; डोक्यावरून. (क्रि. वाढणे, टाकणे.).

उंचेला वि. उंच; उंच नसलेला; उंचसर; वर आलेला; उन्नत; उत्तुंग; उंचसा. [सं. उच्च]

उंचोडा वि. उंच : 'जेवि मार्ग मिरवे उंचोडा ।' – ऋम ७६३.

उंछवृत्ति–त्ती स्त्री. शेत कापून नेल्यावर राहिलेले दाणे टिपून त्यावर निर्वाह करणे; रस्ता, बाजार इ. ठिकाणी पडलेले धान्याचे कण वेचून त्यावर निर्वाह करणे : 'ऐक त्यांचे जीविकावर्तन । शिल कां उंछवृत्ती जाण ।' – एभा १७.४१४.

पु. अशा प्रकारे निर्वाह करणारा, उंछवृत्तीने राहणारा तपस्वी.[सं.]

उंट पु. १. पाठीवर एक किंवा दोन मदारी असलेला, लांब व उभट मानेचा, सपाट पायांचा, रवंथ करणारा, चतुष्पाद, सस्तन, पाळीव पशू. ओझे वाहाणे इत्यादी कामासाठी उपयोगी. वाळवंटाच्या प्रदेशात उंटाशिवाय दुसरे कोणतेही जनावर वाहतुकीला उपयोगी नसते. २. बुद्धिबळाच्या खेळातील एक मोहरे. याची गती सर्व बाजूंनी तिरपी असते व तिची मर्यादा पगाच्या अखेरपर्यंत असते.[सं. उष्ट्र] (वा.) **उंटावरचा शहाणा –** मूर्खपणाची मसलत देणारा. (रांजणात रेडकाचे डोके अडकले असताना एका उंटावर बसून जाणाऱ्याने आत येण्याकरिता घराची भिंत पाडण्यास सांगून नंतर रेडकाची मान कापून मग रांजण फोडावा असा सल्ला दिला, या गोष्टीवरून) : 'तिसरे एक उंटावरील असे विचारतात ...' – लोटिकेले ४.४१. **उंटावरून शेळ्या हाकणे** – बसल्या जागेवरून न उठता दुसऱ्याकडून काम करून घेणे; अतिशय आळस किंवा हलगर्जीपणा करणे. **उंटावर बसून दक्षिण दिशेस जाणे –** एक अपशकुन; दुश्चिन्ह . **उंटभर सुया कबूल करणे –** काहीतरी भलतीच व जी बहुधा करायची नाही अशी गोष्ट कबूल करणे; एखाद्याची समजूत करण्याकरिता वेळेपुरती अशक्य अटही मान्य करणे : 'यांनी उंटभर सुया कबूल करून शेवटी ... हा तंटा कसातरी मिटला.' – प्रति आत्म ४८८.

उंट कलावर बसणे – अदमास न लागणे. उंट केंव्हा पुढचे पाय आधी दुमडून खाली बसतो तर केव्हा मागचे पाय दुमडून बसतो. ही अनिश्चितता असल्यामुळे वर बसणाऱ्याला अनपेक्षितपणे धक्के खावे लागतात. या अर्थी हा वाक्प्रचार रूढ झाला : '.. एवंच कोण्या कलावर उंट बसेल कळेना.' – होकै १०३.

उंटअळी स्त्री.एक प्रकारची अळी. एका ठिकाणाहून दुसरीकडे जाताना या अळीचा वर उचलेला मधला भाग उंटासारखा दिसतो.

उंटप्रवेश पु. १. उंटाने केलेला प्रवेश. २. (ल.) चंचुप्रवेश; थोडासा शिरकाव : 'हिंदुस्थानांत कापडाच्या धंद्यात गिरण्यांचा उंटप्रवेश होण्यापूर्वी कसब या दृष्टीनें हा धंदा पराकोटीस पोचला होता. ' – के १५.८.४१.

उंटमान्या वि. उंटासारखी ज्याची मान आहे असा; विशोभित; उंटाड.

उंटवान पु. उंट हाकणारा; सारवान.

उंटाचे बोथे न. शिकवलेले उंटाचे पिल्लू.

उंटाड वि. न शोभण्यासारखी उंची असलेला; उंटासारखा उंच. [सं. उष्ट्राढ्य]

उंड पु. पोटात उठणारा वायूचा गोळा.

उंड स्त्री. उंडीण वृक्ष. याच्या फळातील बियांचे तेल काढतात.

उंडकी लागणे सक्रि. गोळी मध्ये येणे; (शेती) पाभरीचे बेर (भोक) माती लागून बंद होणे आणि त्यामुळे खाली धान्य न पडणे.

उंडगणे अक्रि. उनाडणे; भटकणे : 'आस्ट्रेलियांत पुष्कळदां पुरुष घरांत चुल्लिकाराधन करीत असून, बायका रस्त्यांतून बाजारहाट करीत उंडगत आहेत असा चमत्कार दृष्टीस पडतो.' – महाराष्ट्र २६.६.१९३०. [क. उडिग= फटिंग]

उंडगळ, उंडगा, उडगा वि. निरुद्योगी; कामचुकार; उडाणटप्पू; भटक्या (मुलगा) : 'शक्यतर उंडगा मासा मारण्याचा मी प्रयत्न करी.' – माआ ३३३. [क. उंडिग]

उंडगा, उंडगादगड पु. १. ओबडधोबड, खडबडीत धोंडा; ठोकळा; आडा. २. दांडगा, उद्धट मुलगा. [क. उंडिग]

उंडगेपणा पु. काम न करता भटकत राहणे; उनाडपणा.

उंडगे मासे ज्यांना पिले झाली नाहीत असे मासे.

उंडण, उंडणी स्त्री. कीड; आळी : 'उंडणी लंघू न शके भिंतीसी ।' – एभा ५.९३.

उंडण, उंडणी स्त्री. उंडी; उंडीचे झाड. हे झाड कोकणात होते. याची पाने सुरंगीच्या पानांसारखी मोठी, गुळगुळीत, स्वच्छ असून पत्रावळी करता येण्यासारखी असतात. फूल पांढरे, सुवासिक असते. फळे सुपारीएवढी. बियांचे तेल जाळायच्या उपयोगी पडते. त्यास उंडेल म्हणतात. हे खरजेवर औषधी आहे. [सं. पुन्नाग]

उंडरणे अक्रि. माजणे; मातणे; उन्माद येणे.(व.) [क. उंडिग]

उंडल स्त्री. उंड; उंडणीचे झाड व तिचे फळ. पहा : **उंडण**

उंडलीण स्त्री. उंडीण.

उंडलेल न. उंडीच्या बियांचे तेल; उंडेल.

उंडवळ वि. कामचुकार. पहा : **उंडगळ**

उंडळ स्त्री. उंडी; एक झाड व त्या झाडाचे फळ.

उंडा पु. १. भिजवलेल्या पिठाचा गोळा (भाकरी, पोळी करण्यासाठी तयार केलेला). २. उडीद व तांदूळ यांच्या पिठाचे गोळे करून शिजवून एक खाद्यपदार्थ तयार करतात तो : 'खाजी करंजी, घ्याजी दाजी, आग्रह करिती, साखरमांडा, उंडा भर पुरणाचा धोंडा।' – अमृत ७३. ३. गोळा : 'तोचि दधी भाताचा उंडा वामकरी ।' – दाव ३८५. ४. लाडू; गुंडाळे (उंडी=लाडू). (कर्ना.) ५. आळवाच्या पानांच्या वड्या करण्याकरिता पानांस पीठ लावून ती गुंडाळून त्यांचे किंवा कळण्याचे लांबटगोल आकाराचे गोळे करतात ते. नंतर ते शिजवून, कापून, तळून वड्या करतात.

उंडारकी स्त्री. उनाडकी : 'धाकटा भाऊ गावात उंडारक्या करायचा.' – एस्पुडा ४९.

उंडारणी स्त्री. १. माज; मस्ती; गर्व; ताठा; ऐट; अभिमान; खुमखुमी. २. स्वैर वर्तन. ३. उनाडकी; उणगणे; खेळणे.

उंडारणे अक्रि. १. माजणे; मस्तीला येणे; उद्धट होणे. २. स्वैर वर्तन

करणे : 'छिनाल छबकड्या उंडारतात.' – इंप ६२. ३. उनाडकी करणे; उडाणटप्पू बनणे. [क. उंडिग]

उंडी स्त्री. उंडा याचं लघुत्ववाचक. पहा : **उंडा**. १. गोळा; घास : 'जैसी थापे लोणियाची उंडी ।' – ज्ञा ११.४५७. २. भाताची मूद; पिंड; घास : 'ना तरी भस्माग्निच्या तोंडी । न पुरे भाताची उंडी ।' – ज्ञाप्र ७०३. ३. बळी; नैवेद्य : 'नवसियां देती उंडी । बाळकांची ।।' – ज्ञा १७.९७. ४. खीर करण्यासाठी तांदूळ इत्यादिकांच्या पिठाच्या केलेल्या गोळ्या. ५. आमिष; पिठाची गोळी : 'उंडीस देखोनि मासा भुलला । गिळितां कंठी गळ टोचला ।' – मवि २.१६०. (वा.) **उंडी उकळणे, उंड्या उकळणे** – भिक्षा मागणे; आगंतुकी करणे (दुसऱ्यावर अवलंबून असणाऱ्याबद्दल वापरतात).

उंडी स्त्री. उंडीण झाड व त्यांचे फळ; ज्याच्या बियांपासून जाळायचे किंवा खरजेवर लावायचे तेल काढतात असे कोकणात होणारे एक झाड : 'गावात उंड्या गोळा करून अर्धेलीच्या करारावर गाळण्याचा त्यांचा मुख्य व्यवसाय होता.' – एल्गार ३६. पहा : **उंडण** (कों.)

उंडीण पहा : **उंडण**

उंडीबकाल वि. भोजनभाऊ. (राजा.)

उंडूगाडा पु. भरीव चाकाचा गाडा. (व.)

उंडेकार वि. पाव करणारा, विकणारा. (गो.) [क. उंडे]

उंडेल न. उंडिणीच्या फळातील बियांचे तेल. याचा जळणाकडे व गुरांच्या अंगावर माशा बसू नयेत म्हणून उपयोग करतात. (कों.)

उंदरनळी स्त्री. मेटाच्या वरच्या बाजूला असणाऱ्या नळ्यांपैकी प्रत्येक नळी; गुडघ्याच्या सांध्याच्या वरच्या बाजूला असलेली नळी. (माण.)

उंदरी–उंदिरी स्त्री. उंदराची मादी.

उंदरी स्त्री. डोक्यावरील केस गळून पडतात असा रोग; चाई; कातरी. मनुष्येतर प्राण्यालाही हा रोग होतो. (लोकर गळून पडते).

उंदऱ्या स्त्री. अव. १. विशाखा नक्षत्र. २. त्यात पडणारा पाऊस. विशाखा नक्षत्राजवळ सूर्य असताना पडणाऱ्या पावसामुळे उंदीर, साप वगैरे विषारी प्राणी व वनस्पती उत्पन्न होतात अशी समजूत आहे.

उंदऱ्यामांजऱ्या स्त्री. १. विशाखा व अनुराधा ही दोन नक्षत्रे. २. त्या नक्षत्रात पडणारा पाऊस; विशाखा नक्षत्रांतील पावसामुळे जे विनाशक प्राणी, वनस्पती उत्पन्न होतात ते अनुराधा नक्षत्रातील पावसामुळे नाहीसे होतात.

उंदीर पु. घरात, शेतात, मालाच्या कोठारात बिळे करून राहणारा, कुरतडणाऱ्या प्राण्यांच्या जातीतील साधारण मुठीएवढा प्राणी; आखू; मूषक हा पिकांची, धान्याची वगैरे नासाडी करतो. प्राचीन भारतीय ग्रंथकारांनी उल्लेखिलेल्या उंदरांच्या जाती – सालन, पुत्रक, कृष्ण, हंसिर, चुछुंदर, अलस, कषायदंत, कलिंग, अजित, कपिल, कोकिल इ.; घरगुती, रानटी व पिकाच्या हंगामाच्या वेळी उत्पन्न होणारे असे उंदराचे तीन प्रकार आधुनिक प्राणिशास्त्रज्ञांनी केलेले आहेत. (वा.) **उंदीरतोंडी करणे –** उंदराप्रमाणे ठिकठिकाणी कुरतडून भोसके पाडून टाकणे. **डोंगर खणून, पोखरून उंदीर काढणे –** मोठे प्रयास करून फार थोडी कार्यनिष्पत्ती होणे; अचाट परिश्रमाचे अल्प फळ.

उंदीरकानी स्त्री. लहान वेल. हिची फुले गुलाबी रंगाची असून पाने उंदराच्या कानासारखी असतात. ही वेल फार उष्ण असून चीक पाचक असतो. सर्पदंशांवर व पुरुषत्व प्राप्त होण्यासाठी फारच गुणकारी असते. उंदराच्या विषावर या वनस्पतीचा रस पोटात घेतात.

उंदीरखाद स्त्री.१. उंदरांचा शेतास उपद्रव : 'कीडखाद टोळखाद व उंदीरखाद आसमानी सुलतानी जाहाली असतां व स्वारीमुळे नुकसानी जाहाली असतां चौकसी करून मजुरा घ्यावयाची चाल आहे.' – हकिकत तर्फ नाते तालुके रायगड (मसाप २.१८३). २. एक सरकारी कर. सरकारी कोठारातील धान्य उंदीर खात असत म्हणून ते नुकसान भरून काढण्याकरिता हा कर बसवितात.

उंदीरखुरी, उंदीरनखी, उंदीरगेळ स्त्री. १. जनावरांच्या खुरांच्या वर पाठीमागच्या बाजूला पुढे आलेला मांसल भाग. २. (काही ठिकाणी) खुरांची दोन गेळे.

उंदीरबिब्बी कर्नाटकात गणेशचतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी येणारा कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीतील सण. या दिवशी गोड कडबोळी तळून नैवेद्य दाखवतात व तो दुसऱ्या दिवशी पहाटे शेताच्या सीमेवर नेऊन ठेवतात. उंदरांनी शेताची नासाडी करू नये म्हणून हा सण पाळतात.

उंदीर मांजर न. मुलींचा एक खेळ.

उंदीरवासा पु. घरातील भिंतीचा वरील भाग आतील बाजूस उतरता असल्यास छप्पर व वासा यामध्ये उंदराला फिरायला जागा राहाते म्हणून तेथे असणाऱ्या वाशास हा शब्द लावतात. ही जागा बहुधा उंदरांचा त्रास वाचविण्यासाठी चुन्याने भरून काढतात.

उंदीरसांध उंदरांना वावरण्यास असलेली मोकळी जागा.

उंब पु. एक मोठा वृक्ष.

उंबई पहा : **ओंबी** (ना.)

उंबत्रा पु. उंबरा; उंबरठा; दाराच्या चौकटीचे खालचे किंवा वरचे लाकूड. [सं. उंबर]

उंबर पु. १. एक वृक्ष. याला अंजिरासारखी फळे येतात. हिरव्या फळांची भाजी करतात. याचे लाकूड चिवट असते. सालीचा रस औषधी असतो. २. उंबरवडा; वायनासाठी भोक न पाडता केलेला वडा.
न. १. उंबराचे फळ. २. एक पक्वान्न. पिकलेले केळे तांदळाच्या पिठात कुस्करून आत साखर घालून त्याच्या गोळ्या करून त्या भज्याप्रमाणे तुपात तळतात. ३. फणसाचे गरे कुस्करून त्यात तांदळाचे पीठ भिजवून ते पुरीप्रमाणे थापून तेलात अथवा तुपात तळतात : 'पुरिया उंबरवाणे तळिती ।' – वसा ८. [सं. उदुंबर]

उंबर स्त्री. उमर; वय : 'एवढी उंबर झाली भेट दिली नाही कोणाला ।' – ऐपो १८. [फा. उम्र]

उंबर वि. दमट; ओलसर; पावसाळ्यात बहुतेक पाणी साचणारी, पाणथळ (जमीन). अशा जमिनीत पावसाळी पीक होत नाही, उन्हाळी पीक मात्र होते. (राजा.)[क. उब्बे]

उंबरघाट पु. (उंबरा हाच कोणी घाट यावरून) पुढील दाराच्या चौकटीचे खालचे लाकूड. (वा.) **उंबरघाट ओलांडणे, सुटणे –** (उप.) घरातून बाहेर पडणे. घरातून क्वचित बाहेर पडणाऱ्या व्यक्तीला योजतात.

उंबरठा, उंबरडा पु. १. घराच्या पुढच्या दाराच्या चौकटीचे खालचे लाकूड; उंबरा. २. उंबऱ्याच्या आसपासचा प्रदेश. ३. (ल.) घर.[सं. उंबर+स्था]

(वा.) **उंबरठा चढणे** – शिरणे; प्रवेश करणे. **उंबरठा न चढणे** – मुळीच न जाणे; प्रवेश न करणे; जाण्याचे बंद करणे.

उंबरपट्टी स्त्री. घरपट्टी.

उंबरवट पु. उंबरा; घराच्या दाराच्या चौकटीचे खालचे लाकूड : 'ते राजद्वार नमस्करोनि । देखे उंबर वटु ।' – ऋ ६०.

उंबरा, उंमरा पु. १. दाराच्या चौकटीचे खालचे लाकूड, दगड इ. २. (ल.) घर; वस्ती. [सं. उंबर] (वा.) **उंबरा चढणे** – घरात जाणे. पहा : **उंबरठा चढणे. उंबऱ्याची साल काढणे, उंबऱ्याची माती राहून न देणे, उंबरा झिजविणे** – एखाद्याच्या घरी एकसारख्या येरझारा घालणे ; वरचेवर जाणे.

उंबराचे फूल (ल.) (उंबराचे फूल अदृश्य असल्यावरून) दुष्प्राप्य, दुर्मिळ वस्तू; क्वचित भेटणारा मनुष्य : 'आतांशा अगदीं उंबराचंच फूल झालं आहे.' – सागोप्र ३.१.

उंबरेड पु. उंबरठा. (व.)

उंबऱ्या वि. उंबरासारखा लाल रंगाचा (घोडा).

उंबला, ओंबील पु. (झाडावर वगैरे आढळणारा) १. तांबडा मुंगळा, मुंगी. २. वाळवी.

उंबले न. पोहे किंवा लाह्या करण्यासाठी आधण घालून ठेवलेले भात. [क. उब्बे]

उंबळ –ळी न. पावसाळ्यात जमिनीतून झरे वाहू लागणे. (गो.)

उंबळणे सक्रि. १. साबण वगैरे लावून (घरीच) कपडे धुणे. २. सुपाने विशिष्ट प्रकारे हालवून कण्या व पीठ किंवा कोंडा वेगळा करणे. पहा : **उभळणे.** (गो.)[क. उब्बळ=कोंडा]

उंबळणे सक्रि. (सोनारी) सोन्याचे बारीक तुकडे करून ते एकमेकांवर ठेवून त्या तुकड्यांना मोरचूद वगैरे लावून ते शेगडीत तापवून त्याचा आकार न बदलता ते एकजीव होतील असे करणे.

उंबळा पु. उचला, तात्पुरता, आटोपशीर संसार. (कर.)

उंबळे वि. धुतलेले, खळबळलेले (वस्त्र). (गो.)

उंबारणे अक्रि. ढगाळणे : 'आभाळ अजून उंबारलेले होते.' – जांदि ६८.

उंबाळा पु.पेरू. (को.)

उंबी स्त्री. धान्याचे (गहू वगैरेचे) ओले कणीस; ओंबी. [सं. उंबी]

उंबील पहा : **उंबला**

उंबूर पु. बाजरीचा हुरडा; निंबूर; लिंबूर. (व.) [सं. उंबी = हुरडा]

उंवला पु. हरभरे, पावटे वगैरेचा सोलाणा. (राजा.) [सं. उद्+वल्]

उंवाळ्ळला वि. १. ओवारलेला. २. (ल.) वाईट स्वभावाचा, कोणास नको असलेला. (गो.)

उंशील, उशेल न. उसाचा फड; उसाचे शेत; उसाची लागवड. (राजा.) [सं. इक्षु]

उंहू उद्गा. नव्हे, नाही, नको या अर्थी; नकारार्थी अव्यय : 'उपसी परि गांभीर्ये आपण न उहूं म्हणोनि त्या विटवी.' – मोसभा ५.८६.

उःशाप, उश्शाप, उश्राप, उच्छाप पु. शापनिवृत्ती; शापमोचन; शापाची तीव्रता कमी करणारे वचन, वर. [सं. उत्+शप्]

ऊ

['ऊ' वर्णाने सुरू होणारे काही शब्द येथे न आढळल्यास 'उ' वर्णाखाली पाहावेत.]

ऊ १. मराठी वर्णमालेतील सहावा वर्ण; मराठी स्वरमालेतील सहावा स्वर. स्थानपरत्वे ऱ्हस्व किंवा दीर्घ. उदा. भूशिर, मूर्ती इत्यादींमध्ये ऱ्हस्व; तू, शूर इत्यादींमध्ये दीर्घ. २. शंकर – चंद्रवाचक शब्द.

ऊ स्त्री. एक माप (८उवा=१ यव).

ऊ सना. (तृतीय पुरुषी एकवचनी.) तो, ती, ते : 'बाद ऊ अवलाद व अहफाद त्यासी करणे.' – मईसा १५.३६४. [फा. ऊ= तो]

ऊ स्त्री. केसांत किंवा मलीन वस्त्रात उत्पन्न होणारा व चावणारा एक लहानसा सहा पायांचा व काट्याची सोंड असलेला किडा. [सं. यूका]

ऊ टिचणे (वा.) ऊ मारणे.

ऊख पु. ऊस. [सं. इक्षु]

ऊचवड पहा : **उंचवट** : 'जे अवसरा पैलीकडे । ब्रह्मस्वरूप ऊचवडें ।' – ज्ञाप्र ५३५.

ऊचा पहा : **उंच** : 'देवता एकी उचा : एकी निचा.' – चक्रसूत्र ४५.

ऊचा चौफेर घोड्याची एक चाल.

ऊट स्त्री. १. गाडीच्या चाकाला गतिरोध करण्यासाठी आडवा लावलेला दगड; ठेपा; टेका; आधार (क्रि. देणे). पहा : **उटी.** २. चाकाला येणारा अडथळा (दगड, उंचवटा, बांध यांचा). (क्रि. लागणे). (वा.) **ऊट उतरणे** – १. ताठा, गर्व नाहीसा करणे; नम्र करणे; वठणीला आणणे. २. भिकेला लावणे; धुळीला मिळवणे; नाश पावणे. ३. (संकट, अपमान इत्यादींच्या) उताराला लागणे.

ऊठ, ऊड पु. जोंधळ्यावरील एक रोग.

ऊठउठी पहा : **उठाउठी** : 'एक म्हणती ऊठउठी । चाल घेऊं हरीची भेटी । घालूं हरिचरणी दृढ मिठी । प्रेम पोटीं न समाये ।' – हरि १६.१८८.

ऊठना उबड पुरून उरण्याइतका जिनसांचा पुरवठा. (क्रि. होणे). (व.)

ऊठपाय क्रिवि. १.एका पायावर तयार (जायला, करायला); सदा उभा. २. (ल.) उठल्याबसल्या; उठल्यासुटल्या; सदानकदा; सारखे तेच; फिरून फिरून.

ऊठबशी, ऊठबस, ऊठाबशी स्त्री. १. उठणे व बसणे; वारंवार उठण्याबसण्याची क्रिया; शाळेतील शिक्षेचा एक प्रकार; २.(तालीम) व्यायामाचा एक प्रकार; बैठका मारणे. (क्रि. काढणे). पहा : **ऊठबैस**

ऊठबैस स्त्री. १. अस्थिरता; चंचलता. २. वावर; जाणे येणे. ३. मान देणे. ४. तब्बेत सांभाळणे. (क्रि. करणे). पहा : **ऊठबशी**

ऊठसूट क्रिवि. परतपरत; नेहमीनेहमी; जेव्हाकेव्हा : 'ऊठसूट माझी उलटतपासणी करायला लागलीस.' – ऑक्टो १२७.

ऊठी स्त्री. बाकी; उचल; उचापत.

ऊड स्त्री. भिंतीतील लहान खिडकीच्या आतील भिंतीच्या रुंदीपर्यंतचा उतरता व पसरट होत जाणारा भाग (जास्त उजेड येण्यासाठी

ठेवलेला). (को.)

ऊड स्त्री. माया; कपट; दगा; धोका : 'प्रभु सूड घेइल पुढती अति ऊड करिन ।' – आप ६२. [सं. कूट]

ऊणखूण स्त्री. १. वर्म; रहस्य; गुपित; न कळणारी गोष्ट. पहा : **उणखूण** : 'हे जिव्हारांची ऊणखूण । तुज संपूर्ण सांगितली ।' – एभा ११.१५६०. २.प्रचीती; वाटाघाट; खात्री पटवणें; चर्चा : 'रिघोनि सद्‌गुरूस शरण । काढून शुद्ध निरूपण । याची करिसी ऊणखूण । प्रत्यक्ष आतां ।' – दास ६.१०.५२. ३. कमीअधिकपणा.

ऊत पु. पहा : **उतणे.** १. पदार्थ कढू लागला म्हणजे त्यातील पाण्याचा अंश, फेस वगैरे वाफेच्या जोराने वर उचलला जाण्याची क्रिया; उधाण; उकळी : 'भीमाचें यश लाजवि सुरभिक्षीराचियांहि ऊताते ।' – मोकर्ण ३८.२६. २. (ल.) फणफणाट; झणका; ताठा; डौल; उन्माद. (क्रि. येणे, जिरणे, जिरवणे.). ३. उत्कर्ष; भरभराट; मर्यादेबाहेरची स्थिती; अतिशयपणा (तारुण्याचा, संपत्तीचा, चिलटांचा इ.). ४. उसळी; आतून वर येणे : 'यमुनेच्या डोहावरी आला ऊत । काळ्या कृतांत धुधुकारें ।' – तुगा ५१. ५. (ल.) समुद्राची भरती : 'ये धर्मचमू भासे क्षुब्धाब्धीच्या उतासमा, राया ।' – मोभीष्म ९.१४. ६. उचंबळलेली मनोवृत्ती; गहिवर; आवेग. [सं. उत्] (वा.) **ऊत मारणे** – चेव नाहीसा करणे, मोडणे; फुगवटा (दुधावर आलेला) पाणी घालून नाहीसा करणे. **ऊत येणे –** अति होणे; अतिशयितता; परमोत्कर्ष; आत न मावण्याइतके पुष्कळ वाढणे : 'रूसी-जपानी युद्धाचे वेळी जपानातल्या आबालवृद्धांच्या देशाभिमानाला खरोखरीच ऊत आलेला दिसला.' – के

ऊतककर पु. (वन.) खोड, फांद्या व मुळे यांतील वाहक घटकांच्या सान्निध्यात असणारा आणि सतत नवीन वाहक घटक बनविणारा कोशिकांचा समूह.

ऊतमात पु. उन्माद; माज; उद्धटपणा; बेफिकिरी; रागीटपणाचे कृत्य; धुंदी; उर्मटपणा. (क्रि. करणे, मांडणे, उतरणे, जिरणे, जिरवणे.).

ऊति–ती स्त्री. (वै.) एक किंवा अनेक प्रकारच्या पेशी, त्यातील आंतरपेशीय पदार्थांसह एकत्रित होऊन संरचनात्मक शारीरवस्तू तयार करतात. हा शरीररचनेतील प्रमुख घटक आहे. हा वनस्पती किंवा प्राणी यांच्या शरीरबांधणीचे कार्य करतो. [सं.]

ऊतिजनन न. (वै.) ऊतींची उत्पत्ती होणे आणि त्या वेगळ्या ओळखता येणे या क्रिया. [सं.]

ऊतिमृत्यु–त्यू पु. (कृषि.) झाडांच्या पेशी कवकजन्य किंवा सूक्ष्मजंतूंच्यामुळे होणाऱ्या रोगाने मरणे. [सं.]

ऊतिशास्त्र न. (वै.) प्राण्यांच्या आणि वनस्पतींच्या ऊतींच्या अतिशय सूक्ष्म भागांचा अभ्यास करणारे शास्त्र, सूक्ष्मशरीररचनाशास्त्र.[सं.]

ऊद पु. विस्तवावर टाकला असता सुवास देणारा एका वृक्षाचा सुगंधी चीक (धूपासाठी जाळतात तो).ऊदाचे प्रकार १. भीमसेनी. २. जनार्दनी. ३. लोहबंदी. ४. कवड्या.

ऊद पु. एक वृक्ष विशेष. [अर.]

ऊद पु. मांजराच्या जातीचा एक प्राणी.

ऊदकाडी, ऊदबत्ती स्त्री. १. ऊदाने माखलेली काडी. पहा : **उदबत्ती** २. (उप.) बोंबील. (बोंबिल भाजत असता घाण सुटते म्हणून).

ऊदफूल न. उदाचे फूल. मडक्यात ऊद जाळतात व त्याच्या धुरापासून घनीकरण क्रियेने हे तयार करतात.

ऊदाइन न. (शाप.) बेंझाईन : एक जंतूनाशक औषध.

ऊदान पु. मरण; तीव्र ज्वर; सन्निपात : 'ऊदानाच्या सुकाळीं बडबड जवळीं ।' – गस्तो ५०.

ऊदाम्ल न. (रसा.) हे आम्ल शक्तिमान आहे. हे पोटात गेले असता मूत्रमार्गाच्या अंतस्त्वचेतील श्लेष्ममय पदार्थाला रोगबीजरहित करून उत्तेजित करते.

ऊदिन न. (शाप.) बेंझिन. दगडी कोळशाच्या डांबरात सापडणारे द्रव्य.

ऊदिल अल्कहल न. (रसा.) हा जाई, मोगरा इत्यादींच्या अत्तरात सापडतो. याला सौम्य सुगंध येतो. भानिल कर्बिनल.

ऊदिल प्रायोज्जित वर्णहीन सुंगधी द्रव्य; कडू बदामाचे तेल.

ऊन न. लोकर : 'दुलया उनाच्या, शालनामाच्या संजापदार.' – प्रसुतिकृत्यादर्श १. [सं. ऊर्णा]

ऊन वि. कमी; उणे; अपुरे; थोडे; न्यून. उदा. एकोन, पाऊण. [सं.]

ऊन, ऊन्ह न. सूर्याचा ताप; तेज; किरणांचा प्रकाश; ओघ; ओपाळी : 'सभ्य जनीं हित पृच्छक, सोसार्तहि कोण गा । नये ऊनीं ।' – मोसमा ४.१०८.
वि. गरम; कढत; उष्ण.[सं. उष्ण] (वा.) **ऊन खाणे** – उनात बसणे. **ऊन तावणे –** सूर्यकिरण जास्त प्रखर होणे. **ऊनतहान म्हणणे, ऊनतहान पाडणे, ऊनतहान मानणे –** (नकारार्थी प्रयोग) काही संकटांची वगैरे पर्वा न करता कामाला लागणे; काही सबबी न सांगता ताबडतोब निघणे.

ऊन ऊन आग वि. १. जळजळीत; कडक; होरपळण्यासारखे; चटका बसण्यासारखे. २. (ल.) ताजे; गरम; उष्ण; नवे कोरे; नुकतेच केलेले.

ऊनपाऊस पु. १. ऊन आणि पाऊस; नागवा पाऊस; सूर्याचे ऊन पडले असताना पडणारा पाऊस. २. (ल.) सुखदु:खाचा, हर्षामर्षाचा चक्रनेमिक्रम; चांगल्या वाईट दिवसांचे रहाटगाडगे.

ऊनपारखा वि. आयुष्यातील अडचणींचा अनुभव नसणारा; नाजूक; श्रीमंतीत लोळणारा.

ऊनवारा पु. झळई; अहळी; ऊन, दाह करणारा वारा. (वा.) **ऊनवारा लागणे, ऊनवारा सोसणे** १. (नकारार्थी प्रयोग) संसारातील अडीअडचणींना पारखा असणे. २. (होकारार्थी प्रयोग) सर्व संकटांना तयार असणे; सर्व प्रकारची परिस्थिती सहन करणे. **ऊन उतरणे, ऊन परतणे** – ऊन कमी होणे.

ऊनव्यापक विभाजन दोष (तत्त्व.) अव्यापक विभाजन दोष; विभाजन प्रक्रियेचा एक दोष; आवश्यक असणारा पोटविभाग विभाजनाच्या प्रकियेत गाळल्यामुळे उत्पन्न होणारा दोष. उदा. त्रिकोणांची समभुज आणि समद्विभुज त्रिकोणात केलेली विभागणी.

ऊनाशाही वि. माळव्यातील ऊना या गावी तयार होणारी (तलवार).

ऊनित वि. उणे, कमी असणे. पहा : **ऊन**

ऊनोक्ति–क्ती स्त्री. १. अर्थाच्या रास्त वजनापेक्षा कमी वजनाचे शब्द वापरणे. २. हीनतादर्शक, लघुतादर्शक शब्दयोजना : 'मोठ्या गोष्टीला लहान स्वरूप देणे हे ऊनोक्तीचे लक्षण आहे.' – हास्य ३२. [सं.]

ऊन्य न. (ग.) वजाबाकीमध्ये वजा करायची संख्या. [सं.]

ऊपाळणे सक्रि. उपाळणे; उपटणे : 'किती ये ऊपाळती लाग वेगे.' – राक २५. [सं. उत्पाटन]

ऊब स्त्री. १. निर्वातस्थळी, कोंदटपणामुळे उद्भवणारी उष्णता; गरमपणा. २. शिजणाऱ्या पदार्थापासून निघणारी वाफ. ३. विस्तवाची अथवा तापलेल्या पदार्थाची उष्णता, धग : 'तेवींचि वन्हित्व आंगी । आणि उबे उबगणे आगी ।' – ज्ञा १८.२२०. ४. प्राण्यांच्या अंगची उष्णता. ५. उष्ण हवा; गरमी, उकाडा. ६. (ल.) विद्या, संपत्ती इत्यादीचा गर्व, ताठा त्यामुळे अंगी असलेला आत्मविश्वास, धमक, भरवसा. ७. सुख; साधन; आधार. (वा.) **ऊब जिंकणे –** भीड किंवा दरारा चेपणे; भीती नाहीशी होणे; परिचय, स्नेह होणे. **ऊब जिरवणे –** रग उतरविणे; नांगी तोडणे; हड्डी नरम करणे. [क.उब्बे=उष्णता, वाफ]

ऊर पु. न.१. पोटावरचा आणि गळ्याखालचा पुढल्या अंगाचा भाग; छाती : 'किंवा व्याघ्र व्याघ्रा भेदी प्रखरें शिलीमुखें उर गा ।' – मोभीष्म ९.२४. २. (स्त्रियांचे) स्तन; वक्षःस्थल : 'तों तों तिचा ऊर भरींव दिसोनि येतो.' – नळ ७०.[सं. उरस्](वा.) **ऊर उलणे** – अतिशय दुःख होणे : 'परतेल काय ऐकुनि हें साध्वींचीं उरेचि उलतिल कीं ।' – मोवन १२.९८. **ऊर काढून चालणे** – ऐटीत चालणे; बेमुर्वत वागणे. **ऊर दडपणे –** भय, लाज, मत्सर वगैरेंनी धैर्य नाहीसे होणे; उत्साह नष्ट होणे; भीती वाटणे. **ऊर दबणे, ऊर बसणे –** गांगरून जाणे; भयचकित होणे. पहा : **ऊर उलणे, ऊर दाटणे, ऊर भरणे–** (दुःख, प्रीती यामुळे) गहिवरून येणे; छाती भरून येणे; बांध बसणे. **ऊर पिकणे** – १. कफ दाटणे व त्यामुळे घसा बंद होणे; अतिश्रमाने छातीला ताण बसणे. २. (ल.) त्रास, छळ होणे. **ऊर पिकवणे –** त्रास देणे : 'पदोपदीं येऊनिं शीकवीला । तथापि तेणे उर पीकवीला ।।' – सारुह २.१४. **ऊर फाटणे** – कल्पनातीत दुःख होणे. पहा : **ऊर उलणे, ऊर दबणे :** 'फाटे उर शोकाने बहु निंद्य क्षत्रधर्म त्या वाटे ।।' – मोअश्व ५.३९. **ऊर फुटेपर्यंत काम करणे –** सहन होणार नाही इतके श्रम करणे. **ऊर फुटणे –** १. दुःख असह्य होणे. २. (स्त्रियांना उद्देशून) स्तनांचा उद्गम होण्याच्या वयाला येणे. ३. हृदयविकार होणे; छाती फुटून निकामी होणे (घोडा). ४. शोकाने, काळजीने व्याकूळ होणे; दुःख असह्य होणे; उरी फुटणे. ५. हिंमत चालणे, होणे.(व.) **ऊर फोडणे, ऊर फोडून काम करणे** – १. अतिशय श्रम करणे. २. आहाराबाहेर काम करून गळाटणे; मेट्यास येणे. **ऊर बडवणे –** छातीवर हात मारून शोक करणे; दुःखशोक प्रदर्शनार्थ छातीवर हात मारणे. **ऊरस्फोड करणे, ऊर फोडणे –** अतिशय श्रम करणे. **ऊरापोटी करणे, उरापोटी धरणे, उरापोटावर उचलणे –** १. अतिशय श्रम करून काम करणे, चालविणे, उचलणे. पहा : **ऊर फोडणे** : 'अहो! उरापोटीं करीन कसें तरी झालं ।' – एकच प्याला. २. प्रेमाने वागवणे; छातीशी धरणे; घट्ट मिठी मारणे. **ऊराला हात लावणे** – सत्यता, आत्मविश्वास, निश्चय, धमक दाखवण्यासाठी छातीला हात लावणे. **ऊरावर घालणे –** (शिवी) मनात नसताना नाइलाजाने एखाद्याला देणे, देणे भाग पडणे : 'गोणीभर होन ब्राह्मणांच्या उरावर घातले.' – नामदेव नाटक १०५. **ऊरावर असणे** – एखाद्यावर अधिकार चालवणे – सत्ता असणे; एखाद्याच्या डोक्यावर असणे. **ऊरावर घेणे –** १. अतिशय कठीण काम पार पाडण्यासाठी अंगावर घेणे, स्वीकारणे. २. (ल). (शिवी–स्त्रियांच्या बाबतीत) संभोग देणे, **उरावर धोंडा ठेवणे. –** १. (ल.) स्वतःचे मनोविकार दाबून धरणे; मन घट्ट करणे; भावना दडपणे. २. एखाद्याला अतिशय कठीण काम करायला सांगणे; (पूर्वी मोगलाइत सरकारी वसूल करण्यासाठी शेतकऱ्यांच्या उरावर धोंडा ठेवीत असत यावरून) सक्ती करणे : 'कोणी तुमच्या उरावर धोंड ठेवली होती?' – नाकु ३.१५. **ऊरावर बसणे –** १. छातीवर बसणे; बोकांडी बसणे. २. (ल.) टाळता न येणारे काम अंगावर येऊन पडणे, त्यामुळे असहाय्यता येणे. ३. मागे लागून निकडीने काम करून घेणे. ४. पुरुषाने एखाद्या स्त्रीवर बलात्कार करणे; स्त्रीसंभोग करणे. **ऊरावर हात ठेवणे, ऊरावर हात लावणे, सांगणे, ऊरावर हात ठेवून किंवा लावून बोलणे –** शपथपूर्वक वचन देणे; एखाद्याबद्दल खात्रीने सांगणे. **ऊराशी धरणे –** १. आलिंगन देणे. २. नम्रपणाने प्रार्थणे. ३. काही झाले तरी (हाती घेतलेले काम) शेवटाला नेण्याचा निश्चय करणे. ४. स्वीकारणे; पत्करणे; आपले म्हणणे न सोडणे. **ऊरावर शेगडी –** अतिशय दुःख, विवंचना; त्रास. **ऊराशी बाळगणे** – (इच्छा) मनात ठेवणे; एखादी इच्छा किंवा ध्येय डोळ्यांसमोर ठेवणे. **ऊरास लावणे, ऊरी पोटी धरणे** – दादा – बाबा करणे; मन वळविणे. पहा : **ऊराशी धरणे. ऊरावर डोंगर घेणे, ऊराउरी डोंगर घेणे –** कठीण काम स्वीकारणे; अतिशय दगदग करणे; न पेलणारी जबाबदारी स्वीकारणे. **ऊरावर डोंगर, ऊरी डोंगर पुरी काट्या घेणे –** (छातीवर पर्वत घेणे व नदीच्या पुरातून काटेकुटे ओढून काढणे) पोटासाठी अगदी दगदगीचे काबाडकष्ट करून सर्व तऱ्हेचे उपाय करून पाहणे. **ऊरीपोटी करणे** – अतिशय श्रम करणे. पहा : **ऊरापोटी करणे. ऊरी फुटणे –** पहा : **ऊर फुटणे** : 'इतका अभ्यास करून उरीं फुटायचं आहे कां काय?' – गी. **ऊरी भरणे** – १.दमणे : 'उरीं भरली ऊरपोट । केली चळवळ झाली घाबरी ।।' – पला २. २. स्त्रियांच्या स्तनांचा उद्गम होणे; ऊर भरणे.

ऊर पु. ऊत; और; नदीचा पूर. [सं. पृ–पुर्]

ऊर स्त्री. १. उरलेले, जास्त झालेले काम, पदार्थ, गोष्ट; बाकी; शिल्लक; शेष. २. तूट; उणीव; उरता. [सं. उर्वरित]

ऊर पहा : **उर** : 'ऊरीं आदललेयां मरण ।' – ज्ञा ८.६८.

ऊरछिद्र न. (यंत्र.) भात्यामध्ये हवा खेचण्यासाठी ठेवलेले छिद्र.

ऊरतूट स्त्री. (उराशी धरण्यात, मिठी मारण्यात अडथळा, प्रतिबंध, व्यत्यय यावरून) वियोग; विरह. (क्रि. करणे, होणे).

ऊरदुखी स्त्री. १. उरातील दु:ख. २. (ल.) मत्सर; हेवा.

ऊर न पूर उरणे न पुरणे, प्रसंगी न पुरण्यासारखे किंवा पुरून न उरण्यासारखे सामान, सामग्री; उणीव, तूट, कमतरता.

ऊर पाकीट (शिवण.) छातीवरचा खिसा.

ऊरपुटी क्रिवि. पाठीकडे हात वळवून : 'बांधौनि ऊरपुटी मागधु पाडिला.' – गस्तो. [सं. उरस्+पट]

ऊरपूर स्त्री. १. शिल्लक; शेष; पुरून उरलेले : 'ऊरपूर म्हणून, वल्लभभाईचा विनोद सदा सज्ज असतो.' – स्वामी ४३. २. पुरुन उरण्याइतकीं सामग्री; भरपूर समृद्धी; आधिक्य.

ऊरफोड स्त्री. उरस्फोड; अतिशय दगदगीचे व संकटमय काम; परिश्रम; श्रम; उद्योग.
वि. असे श्रम पडणारे, फार मेहनतीचे (काम).

ऊरभेट स्त्री. छातीला छाती लावणे; मिठी मारून भेटणे.

ऊरसूर स्त्री. शिल्लक; बाकी; अवशेष.
वि. शिलकी; उरलेले; राहिलेले. [ऊरचे द्वि.]

ऊरु–रू पु. स्त्री. गुडघ्याचा वरचा भाग; मांडी : 'तरि ऊरू या जघनासी । जडोनि घालीं ।।' – ज्ञा ६.१९२. [सं.]

ऊरूकर्म न. (नृत्य.) मांड्यांनी केलेला अभिनय, नृत्यामध्ये ऊरुकर्मे पाच आहेत – स्तंभन, कंपन, वलन, विवर्तन, उद्वर्तन. [सं.]

ऊरुमूल, ऊरुमूलसंधी १. मांडीचा कमरेशी संलग्न असलेला भाग. २. जांघ; वंक्षण; कटिसंधी; आडसंधी.

ऊरुस्तंभ पु. एक वातरोग; वाताने खालचे अंग जाणे; पुष्कळ दिवसांचा मांड्याचा पक्षाघात. [सं.]

ऊरू,ऊर न. ग्रामनामवाचक सामासिक शब्दातील अंत्यभाग म्हणून येते. उदा. देव +ऊर=देवूर, चंद्र +ऊर = चांदूर. [सं. पुर]

ऊरूबरू क्रिवि. समक्ष; समोर. पहा : **ऊरूबुरू** [फा. रूबरू]

ऊर्ज पु. हिंमत; शक्ती; ताकद; तेज. [सं. ऊर्जस्]

ऊर्जस्वल वि. तेजस्वी; भरभराटीला आलेला : 'जगीं जें जें ऊर्जस्वल नियत त्या त्या अवनती ....' – श्रीकृ. [सं.]

ऊर्जा स्त्री. (शाप.) शरीर, यंत्र किंवा वस्तू यांच्यामध्ये असलेली शक्ती. तिचे उपयोजन झाल्यास कार्य घडून येते. [सं.]

ऊर्जा स्त्री. १. पूजा; व्यवस्था : 'हे गोष्टीने देवास ऊर्जा सांगसंपादन नाही यासस्तव मोईन वाढवून दिल्ही असे.' – पेद ३१.६५. २. उस्तवारी; संरक्षण. पहा : **उरजा** [सं. उर्जस्]

ऊर्जा अपक्षेपण न. (शाप.) ऊर्जेचे निस्सरण. उदा. गरम वस्तू हळूहळू गार होणे. [सं.]

ऊर्जा अक्षय्यता स्त्री.(भौ.) ऊर्जेचे सुयोग्य संकलन आणि समायोजित वापर.

ऊर्जादायी प्रक्रिया स्त्री. (शाप.) ऊर्जा निर्माण करणारी, रासायनिक बदल घडवून आणणारी क्रिया. उदा. श्वसन.

ऊर्जानिर्मिति–ती, ऊर्जामुक्ति–क्ती स्त्री. (शाप.) विश्लेषणात्मक किवा विध्वंसक प्रक्रियेने पदार्थातील ऊर्जा अलग करण्याची प्रक्रिया. उदा. ज्वलन, श्वसन इ. [सं.]

ऊर्जाशीर्ष न. (भौ.) शक्ती निर्माण करणारा मुख्य भाग.

ऊर्जा समाकलन न. (शाप.) शक्ती एकत्र करणे, गोळा करणे.

ऊर्जित न. उत्कर्षाचा काळ; यशाचा काळ; चढती कळा; बढती; भरभराट; कल्याण.
वि. शक्तिमान; चढता; उत्कर्षाचा. [सं.]

ऊर्जित कळा, ऊर्जित काळ भरभराटीचे दिवस; अभ्युदयाचा काळ.

ऊर्जितावस्थेला येणे क्रि.उत्कर्ष होणे.

ऊर्ण न. लोकर; तंतू; धागा. [सं.]

ऊर्णतंत पु. कोळ्याच्या (किड्याच्या) जाळ्याचा धागा : 'हस्त (हत्ती) बांधीजे उर्णतंते । लोभें मृत्य भ्रमरांते.' – दास २.१०.१५.

ऊर्णतंतु – तू पु. लोकरीचा धागा. [सं. उर्णातन्तु]

ऊर्णन न. १. (भू.)मृदा व मृदेतील कलील एकत्र येऊन त्याचे गोळे होण्याची प्रक्रिया. २. चिकणमाती अथवा मृदूकणांचे खाऱ्या पाण्यात तयार होणारे निक्षेप.

ऊर्णनाभी पु. कोळी, किडा. यांच्या शरीरातून लोकरीसारखा धागा निघतो. पहा : **उर्णनाभी** : 'ऊर्णनाभीचा तंतूसूत्री । जरि उचलिजेल धरित्री ।।' [सं.]

ऊर्णा स्त्री.१. लोकर (मेंढी, ससा, उंट इत्यादींचे केस). २. लोकरीचे कापड (शाल, घोंगडी). ३. दोन भुवयांमधील नाकाच्या मुळाशी असलेले केस. या ठिकाणी भोवरा असणे हे सार्वभौमत्वाचे लक्षण समजतात. [सं.]

ऊर्णाफलक पु. (शिक्षण.) लोकरी कापडाचा केलेला फळा. हा काही माहिती लावून ठेवण्यास उपयोगी पडतो.

ऊर्ता स्त्री. वाट पाहणे; थांबणे. पहा : **अरुता** (व.)

ऊर्ध, ऊर्ध्व क्रिवि. वरती; उंच; वर.
वि. १. वरील; उंचावरचा; उत्तम (गती) : 'तैसे मध्य ऊर्ध अध। हे जे गुणभेद ।' – राज्ञा १४.२७६. २. (ग.) उभा; लंब. [सं. ऊर्ध्व]

ऊर्धगति–ती स्त्री. १.वर चढणे; उंच उडणे, जाणे; आकाशात भराऱ्या मारणे. २. मुक्ती; मोक्ष : 'विचारें ऊर्ध्व चढती । तयासीच ऊर्ध्वगति ।।' – दास १७.३.२२. [सं. ऊर्ध्वगति]

ऊर्धमुख वि. वर तोंड करून पाहणारा.
क्रिवि. वर तोंड करून : 'ऊर्धमुखें भेद तुटतो.' – दास २०.३.२२. [सं. ऊर्ध्वमुख]

ऊर्ध्व पु. १. मरणापूर्वी लागलेला श्वास; घरघर. 'बाळ्याला ऊर्ध्व लागून तो अगदी मृत्युपंथाला लागला होता.'– स्फुगो. १.२६. २. एक रोग; श्वास; दमा; छाती भरून येणे. **उर्ध्व लागणे** शेवटची घरघर लागणे : ३. खस्वस्तिक.
क्रिवि. वरती; उंच; वर.
वि. वरील; उंचावरचा. [सं.]

ऊर्ध्वखनन न. (भूशा.) खजिनपदार्थाच्या खालच्या बाजूने वरती खणण्यास सुरवात करणे. [सं.]

ऊर्ध्वगोल पृष्ठ (भूशा.) टेकडीची उंच कड; उंच गोलाकार पृष्ठ.

ऊर्ध्वदृष्टि-ष्टी वि. वर किंवा आकाशाकडे, वरच्या दिशेकडे नजर लावलेला (माणूस); वरडोळ्या; दूर दृष्टीचा; उदात्त हेतूचा; गर्विष्ठ; महत्त्वाकांक्षी; थोर मनाचा.

स्त्री. १. आकाशाकडे असलेली नजर. २. (ल.) कपट; महत्त्वाकांक्षा; अभिमान; उच्च हेतू. [सं.]

ऊर्ध्वदेह पु. मरणोत्तर आत्म्याला प्राप्त होणारा देह.

ऊर्ध्वदेहिक न. उत्तरक्रिया. पहा: **और्ध्वदेहिक**

ऊर्ध्वनाडी वर जाणारी नाडी; सुषुम्ना. पहा : **इडा** [सं.]

ऊर्ध्वपंथ पु. वरचा मार्ग; वरची दिशा; स्वर्गाला किंवा आकाशात जाण्याचा रस्ता. [सं.]

ऊर्ध्वपातन न. पाणी अथवा इतर द्रवपदार्थ यास उष्णता देऊन वाफ करणे व त्या वाफेचे पुन्हा द्रवात रूपांतर करणे.

ऊर्ध्वपान न.(सांकेतिक) दारू पिणे अथवा मादक पदार्थ सेवन करणे. [सं.]

ऊर्ध्वपुंड्र पु. कपाळी लावलेला चंदनाचा उभा टिळा; उभे गंध : 'ऊर्ध्वपुंड्र भाळ । कंठीं शोभे माळ । कापिजे कळिकाळ । तया भेणे ।।' - तुगा २२१४. [सं.]

ऊर्ध्वबाहू पु.सतत वर हात ठेवणाऱ्या बैराग्यांचा एक पंथ. [सं.]

ऊर्ध्वमस्तक न. डोक्यावरची कवटी. [सं.]

ऊर्ध्वमंडल न. (नृत्य) दोन्ही हात वर करून वाटोळे फिरणे. [सं.]

ऊर्ध्वमुख वि. वर जाणारा.

ऊर्ध्वमुख शवाधान (पुरा.) प्रेत उताणे पुरण्याची पद्धत.

ऊर्ध्वमुखी गोम (घोड्याच्या अंगावरील) गोमेसारखा केसांच्या अग्रांचा वर वळवलेला झुबका. हा अशुभकारक समजतात.

ऊर्ध्वमूळ वि. वर मुळे असलेला; उलटा.

न. १.देह; शरीर. २.प्रपंच; जगत. [सं. उर्ध्वमूल्]

ऊर्ध्वरेखा, ऊर्ध्वरेषा स्त्री. १. तळहातावरील किंवा तळपायावरील वर जाणारी सरळ रेघ. २. (ग.) लंब रेषा; उभी रेषा.

ऊर्ध्वरेतस्क, ऊर्ध्वरेता पु. हनुमान, भीष्म इ. चिरब्रह्मचारी.

वि. नैष्ठिक, आजन्म ब्रह्मचारी; ज्यांचा कधीही वीर्यपात होत नाही असा : 'तेथ वसति सनकादिक। ऊर्ध्वरेते देख महायोगी ।' - एभा २४.२१७; ' तो राघवप्रिय विरक्त । ऊर्ध्वरेतस्क वज्रदेही ।।' [सं.]

ऊर्ध्वलोक पु. १.स्वर्ग; इंद्रलोक. २.स्वर्गातील अनेक लोक (चंद्रलोक, ब्रह्मलोक इ.)

ऊर्ध्ववाट स्त्री. स्वर्गाची वाट; ऊर्ध्व पंथ : 'प्राणांशीं दुजायींच्या दाउन ऊर्ध्ववाट माघारे फिरती ।' - ऐपो २६९.

ऊर्ध्ववात, ऊर्ध्ववायू पु. उचकी, ढेकर किंवा घरघर.

ऊर्ध्वसंख्य बाहू (नृत्य.) पाहणाऱ्याच्या मुखाआड न येता, लोंबत सोडलेले बाहू वर नेणे. [सं.]

ऊर्ध्वसीमा स्त्री. (शाप.) वरची (जास्तीत जास्त) मर्यादा. उदा. पर्वताची उंची, रासायनिक विक्रियेचे तापमान इ. [सं.]

ऊर्ध्वस्कंध पु. (शिंपी.) काखेच्या समपातळीत कण्यापासून तसेच खांद्यावरून काखेच्या पुढील दुबेळक्यापर्यंत घेतलेले माप. [सं.]

ऊर्ध्वस्वस्तिक पहा : **खस्वस्तिक**

ऊर्ध्वाधर वि. खस्वस्तिक व अध:स्वस्तिक यांच्याकडे टोके असलेला; लंब, सरळ रेषेत उभा. [सं.]

ऊर्ध्वासन न. (योग.) चौऱ्याऐंशी आसनांपैकी ताठ उभे राहणे हे एक आसन. [सं.]

ऊर्ध्वी पहा : **ऊर्ध्वनाडी**; सुषुम्ना नाडी. : 'मग ऊर्ध्वीचिया रिगानिगा । पुढती तेचि शक्ति पै गा ।' - ज्ञा १८.३३७. [सं. ऊर्ध्व]

ऊर्फ वि. मुख्य नावाऐवजी वापरण्यात येणारे व्यवहारातले नाव दर्शवताना वापरण्यात येणारे उभयान्वयी अव्यय. प्रसिद्ध नावाचा; सामान्यतः दुसऱ्या नावाचा; टोपण नावाचा; अथवा; म्हणजे. उदा. बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस. पहा : **उर्फ** [फा.]

ऊर्मि-र्मी स्त्री. १. लाट; उसळी; तीव्र भावना; उकळी; तरंग; लहर (पाण्याची) : 'तुका म्हणे गंगासागरसंगमीं । अवघ्या झाल्या ऊर्मी एकमय ।' - तुगा ४०१६. २. वेग; प्रवाह. ३. (ल.) आकस्मिक उत्कंठा; इच्छा; आवेग; वृत्ती (मनाची) : 'किं क्रोधऊर्मी दारुण । सद्विवेकें आवरिजे ।' [सं. ऊर्मि]

ऊर्मिका स्त्री. (लहरींप्रमाणे चमकणारी) अंगठी: 'उद्योत तो उत्कट ऊर्मिकांचा'- सारुह ८.१५२. [सं.ऊर्मि= लाट]

ऊर्मी स्त्री. गुर्मी : 'संस्थानिकाने ऊर्मी धरून भेटीस न आला तेव्हा पारपत्य करावेसे जाले.' - पेद २०.७०.

ऊर्वी पहा : **उर्वी**

ऊलगुलान न. सर्वक्षेत्रांत एकाच वेळी उठाव करणे.

ऊला वि. पहिली.

ऊवजा पु. देवळातील पुजारी : 'बसवण ऊवजा'- पळसशिला १.१

ऊषर स्त्री. खाजण; खारी जमीन. [सं.]

ऊषरा स्त्री. (वन.) १.वनस्पतींची वाढ होण्यास आवश्यक त्या परिस्थितीच्या अभावी नापीक राहिलेली जमीन. २.बीज न बनवणारे (फूल). उदा. लागवडीतील केळ, अळू. इ.

ऊष्मवर्ण, ऊष्मा पु. श,ष,स या अक्षरांना ही संज्ञा त्यांच्या उच्चारावरून लावतात. हे ऊष्म म्हणजे उष्णता उत्पन्न करणारे अथवा प्रखर उच्चाराचे. कोणी ऊष्मवर्णात 'ह' चा ही समावेश करतात. [सं.]

ऊष्माप्रसरणगुणांक पु. (भौ.) उष्णतेमुळे वस्तूच्या आकारमानात होणाऱ्या वाढीचे प्रमाण सांगणारा गुणांक.

ऊष्मारोधी काच (शाप.) अधिक तापमानात टिकू शकेल अशी काच.

ऊष्मालाट स्त्री. एखाद्या प्रदेशात अपवादात्मक रीतीने अनेक दिवस वाढत राहिलेले तापमान.

ऊष्मा वाहकता (भौ.) उष्माअभिसरणाची क्षमता.

ऊष्मांतरण न. उष्णता एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणे, पोचवणे. [सं.]

ऊस पु. १. साखर, काकवी, खडीसाखर, गूळ इ. ज्याच्या रसापासून तयार होतात अशी गवताच्या वर्गातील एक वनस्पती. २.उसाचा फड; उभे पीक (वा.) **ऊस खतविणे** – उसाला खत घालणे. **ऊस सोजळणे, ऊस साळणे** – उसाची पाने, पाती सोलणे. **ऊस रंगणे** – उसाचा गाभा लाल पडणे; उसावरील एक रोग. ३. **उसापोटी काऊस** = सूर्यापोटी शनैश्चर; जन्मदात्यास त्रासदायक. (व.)

ऊस स्त्री. एक प्रकारची खारी माती. [सं. ऊषर]

ऊसदार न. पुढील दार; त्याच्या आसपासची जागा; शेजारचा प्रदेश. परसदार याच्या उलट.

ऊह, ऊहू पु. १. तर्क; अजमास; अंदाज; तर्कज्ञान; कार्यकारण संबंध : 'नांदीश्राद्धात बाईसाहेबांचा ऊह कसा आणावा असा प्रश्न केला.' – माप्र ५७. २. परिस्थितीनुरूप केलेला बदल (शास्त्रवचनात वगैरे). पहा : **उहू १.** ३.उपक्रम; ऊहापोह; सूतोवाच : '... टिपूचे मसलतीचा ऊह निघताच लिहिण्यात आलें...' – ऐलेसं ४११६. ४. वाटाघाटी : 'राजेश्री त्रिंबकराव नारायण यांस समागमे न्यावे असा ऊहू जाला आहे.' – ऐलेपाम्सु प्र ८०. (वा.) **ऊह चाळणे, ऊहू चाळणे** – प्रतिपादन करणे : 'अर्थी असत्याचा बडिवारू। सद्भावें केला जो सद्गुरू। त्यासि मिथ्या नास्तिक विचारू। एकांती नरू ऊहू चाळी ।' – एभा २३.२२७. **ऊहू करणे** – उपक्रमास सुरूवात करणे. '...सविस्तर जाल्या जाबसालाचे ऊहू करूं ...' – पुरंदभा ३.४९.

ऊहापोह ऊहापोही पु. स्त्री. वाटाघाट; साधकबाधक विचार; शहानिशा; विचारपूर्वक करायची योजना; काळजीपूर्वक चर्चा, विवरण : 'त्या तत्त्वांचा पूर्ण ऊहापोह करून आमच्या ऋषींनी मागेच निर्णय केला आहे.' – लोटिकेले ४.१२५. [सं.]

ऊहू वाटाघाटी; उहापोह : 'राजेश्री त्रिंबकराव नारायण यांस समागमे न्यावे असा ऊहू जाला आहे.' – ऐलेपाम्युप्र.८०.

ऊळ स्त्री. कांद्याचे रोप; पातीच्या कांद्याची गड्डी. [क. उळ्ळि]

ऊं

ऊं उद्गा. १.(प्रश्नार्थी) काय; असे कसे. २. नको या अर्थाचा सौम्य असंमतिदर्शक अनुनासिक ध्वनी. ३. (अवमानार्थी) थू; हट्; वा, शू : 'ऊं! तो काय मूर्ख आहे.' – मृ २०.४. असे; अँ; बेसावधपणापुळे गोष्ट घडल्यानंतर ती स्पष्ट ध्यानात आली असताना निघणारा उद्गार. ५.धिक्कारदर्शक, तुच्छतादर्शक उद्गार. त्यात विशेष काय, या अर्थी.

ऊंट पु. पहा : **उंट**

वि. (ल.) लांबटांग्या; बारीकमान्या उंच व किरकोळ (माणूस).

ऊंधा वि. उलटा; विरुद्ध. (खा.)

ऊंहूं उद्गा. (ध्वनि.) छे; नव्हे; नको (असंमतिदर्शक).

ऋ

ऋ मराठी वर्णमालेतील सातवा, वैदिक व संस्कृत भाषेत आढळणारा, नंतरच्या अवस्थांत नष्ट झालेला 'र' या व्यंजनाशी मिळता स्वर.

ऋक् पु. चार वेदांपैकी पहिला वेद; ऋग्वेद : 'म्हणोनि ऋग्यजु:सामु। हे तीन्ही म्हणे मी आत्मारामु।' –ज्ञा ९.२७७. [सं.]

ऋक् स्त्री. ऋग्वेदातील ऋचा, मंत्र; सूक्तातील एक भाग; वेदातील छंदोबद्ध रचना. [सं.]

ऋख न. नक्षत्र : 'चांदीं ऋखै जैसिं। दिनोदइं।।' – राज्ञा १५.२८२.

ऋखी पु. ऋषी : 'ऋखीं पळो लागले.' – श्रीकृच १६.

ऋग्वेद पु. चार वेदांपैकी पहिला वेद. ऋग्वेदाची एकंदर सूक्ते १०२८ असून एकंदर ऋचा १०५८० व अक्षरसंख्या ४३२००० आहे. चारी वेदात ऋग्वेद मोठा आहे. ऋग्वेद हा हौत्रवेद असून यज्ञातील होता नामक ऋत्विजाने यातील मंत्र म्हणायचे असतात. [सं.]

ऋग्वेदी पु. ऋग्वेदाला अनुसरणारी ब्राम्हण वर्गातील एक शाखा. [सं.]

ऋचा स्त्री. १. ऋग्वेदसूक्तातील एक मंत्र, श्लोक : 'बोलती निषेधनियमे जिया ऋचा यजु:सामें।'– ज्ञा १५.१६६. २. वेदांतील मंत्र : 'ऋचा श्रुति स्मृति। अधेय स्वर्ग स्तबक जाती।' – दास १२.५.४. ३. (संगीत.) यज्ञसमारंभप्रसंगी निमंत्रित देवता – इंद्र, वरुण, अग्नी वगैरेंना यज्ञाचा नैवेद्य अर्पण केल्यानंतर त्यांचे मनोरंजन करण्यासाठी गाऊन म्हणता याव्यात अशा रचना. [सं.]

ऋजु–जू वि.१. सरळ; प्रत्यक्ष; उजू. २.(ल.) प्रामाणिक; निष्कपटी; साधा; अकृत्रिम; सच्चा. [सं.]

ऋण न. १. कर्ज; देणे; रीण; परत द्यायच्या बोलीने (सव्याज किंवा तसेच) घेतलेले द्रव्य इ. २. (ल.) उपकार; अपरिहार्य कर्तव्य; पहा : **ऋणत्रय** : 'ऋण फेडावया अवतार केला। अविनाश आला आकारासी।' – तुगा १०.[सं.](वा.) **ऋण करणे** – कर्ज काढणे; कर्ज करणे. **ऋण काढणे** – पहा : **कर्ज काढणे. ऋण फिटणे** – कर्जमुक्त होणे; उपकाराची फेड होणे : 'मेलों रणांत म्हणजे तुमचे याचेहि सर्व ऋण फिटलें।' – मोभीष्म ११.७४. **ऋण फेडणे** – कर्जाची सर्व रक्कम परत करणे; उपकारकर्त्याच्या उपकारांतून मुक्त होणे.

ऋण न. १. (ग.) बाद किंवा वजा करायचा अंक, रक्कम. २. वजाबाकीचे चिन्ह; उणे चिन्ह; उणी संख्या; वजा करायची संख्या. ३.(भौ.) विजेचा एक प्रकार; अपसारक विद्युत; धनविद्युतच्या उलट ऋणविद्युत; जवळ असलेल्या दोन पदार्थांपैकी एकावर ऋणवीज असेल तर दुसऱ्यावर धनवीज उत्पन्न होते. [सं.]

ऋण अग्र न. (विद्युत.) विद्युतघटामधील ऋण विद्युतभारित अग्र.

ऋणकरी वि. १. कर्ज देणारा; सावकार; उत्तमर्ण. २. कर्ज घेणारा; देणेदार; ऋणको; अधमर्ण. ३. ज्यापासून काही उपयोग नाही पण ज्याला उगीच पोसावे लागते असा, कुचकामाचा माणूस; आळशी, आइतखाऊ अशाला निंदेने म्हणतात. ४. ज्याच्याकडून आपल्याला नेहमी मदत होते व जो सारखा आपल्यावर कृपा करीत असतो अशा माणसाला कृतज्ञतादर्शक बुद्धीने म्हणतात. ५. (ल.) एखाद्या गोष्टीबद्दल हटून बसणारा; हट्टी; आग्रही; घेतल्यावाचून न जाणारा. [सं. ऋण+कृ]

ऋणको पु. कर्ज असलेला; कूळ; अधमर्ण; रीणकरी. [सं. ऋण]
ऋणकोन पु. (भूमिती.) घड्याळाचा काटा फिरतो त्या दिशेच्या विरुद्ध बाजूला होणारा कोन.
ऋणग्रस्त वि. कर्जबाजारी, कर्जात बुडालेला. [सं.]
ऋणग्रस्तता स्त्री. कर्जात बुडणे, रुतणे; कर्जबाजारीपणा. [सं.]
ऋणघातकी वि. अवसानघातकी; ऐन वेळेवर माघार घेणारा. (ना.)
ऋणचित्र न. कॅमेऱ्याच्या छायापट्टीवर मिळणारे चित्र.
ऋणचिन्ह न. (शाप.) उणे चिन्ह (–). पहा : **ऋण** २. [सं.]
ऋणत्रय न. देवऋण, पितृऋण, ऋषिऋण. ही तीन ऋणे. [सं.]
ऋणत्वरण न. (भौ.) विरुद्ध दिशेने होणारी वेगवृद्धी.
ऋणन न. (ग्रंथा.) बाहेर दिलेले वाचनसाहित्य कुणाच्या नावावर आहे त्याची ग्रंथालयात केलेली नोंद.
ऋणनिर्देश पु. आभारप्रदर्शन.
ऋणपत्र न. १. (अर्थ.) कर्जरोखा; सार्वजनिक कर्जाचा रोखा. शासनाच्या माध्यमाने किंवा कंपनीने जारी केलेले दीर्घ मुदतीचे व ठरावीक व्याजाचे रोखे, बंधपत्र इ. [सं.]
ऋणपत्र न. (ग्रं.) देवघेव नोंदवही; वाचकाला घरी वाचायला दिलेल्या पुस्तकाची ज्यात त्याच्या स्वाक्षरीसह नोंद करतात ते पत्र.
ऋणपत्रधारक पु. कर्जरोखा बाळगणारा, धारण करणारा. [सं.]
ऋणपत्रनिधि–धी पु. कर्जरोख्याच्या विक्रीतून जमा झालेली रक्कम.
ऋणपत्रव्याज न. कर्जरोख्यावर मिळणारे व्याज.
ऋणपद न. (ग.) वजा करायची राशी, पद. पहा : **ऋण** २. [सं.]
ऋणपरिवर्तन न. (अर्थ.) रोखीत रूपांतरित करायच्या रोख्यांच्या मोबदल्यात कमी व्याजदराने नवीन शासकीय कर्जरोखे जारी करणे.
ऋणबद्ध वि. कर्जाने बांधला गेलेला; ऋणग्रस्त. [सं.]
ऋणबंध, बंधन पु. न. कर्जाचे बंधन; कर्जाचा जाच. [सं.]
ऋणमार्जन गृह न. जेथे बँकांचे कर्ज निकालात काढतात ते कार्यालय.
ऋणमुक्ति–क्ती स्त्री. कर्जाची फेड; कर्जाचे निवारण; कर्ज देऊन टाकणे. [सं.]
ऋणमोचन, ऋणमोक्ष, ऋणशोधन पहा : **ऋणमुक्ति**
ऋणमोचित वि. १. ऋणमुक्त. २. (कायदा) धनकोने कर्ज फेडले असता जो धनकोचा नोकर होतो तो. [सं.]
ऋणरोखा पु. १. शासनातर्फे किंवा एखाद्या कंपनीतर्फे जारी करण्यात आलेले ठरावीक व्याजाचे दीर्घकालीन बंधपत्र, कर्जरोखा.
ऋणलेख पु. (अर्थ.) कर्ज घेतल्याची मान्यता देणारा स्मरणलेख. [सं.]
ऋणलेखा पु. कर्जाच्या देण्याघेण्यासंबंधीच्या व्यवहाराचे लेखी हिशेब.
ऋणवई – वै वि. ऋणी; ज्याने कर्ज घेतले आहे असा.
ऋणवईपणा पु. ऋणीपणा : ‘निळा म्हणे ऋणवईपणा । होतसां नारायणा उत्तीर्ण ।’ – निगा १९०.
ऋणविचरण न. (शाप.) गतिमान पदार्थाची घड्याळाच्या काट्याच्या विरुद्ध दिशेने फिरण्याची क्रिया.
ऋणविद्युत स्त्री. विजेचा एक प्रकार. पहा : **ऋण** [सं.]
ऋणविमोचन न. कर्जमुक्ती; कर्जाच्या जबाबदारीतून मोकळे होणे.
ऋणवैपण ऋणीपणा : ‘ते ऋणवैपण देखोनि आगीं । मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागीं ।’ – ज्ञा ८.१३१.
ऋणव्यवस्थापन न. (अर्थ.) कर्जाच्या व्यवहाराचे नियमन, प्रशासन.
ऋणसमायोजन न. (मानस.) विकीरक उद्दीपकाकडे दुर्लक्ष करण्याची सवय करणे; अकारण समायोजन.
ऋणसंख्या स्त्री. शून्याखालची संख्या.
ऋणसेवा स्त्री. (अर्थ.) दीर्घ मुदतीच्या कर्जावर दरवर्षी द्यावी लागणारी कर्जफेडीची रक्कम व कर्जनिवारणनिधीत करायचा भरणा. [सं.]
ऋणहर्ता वि. ऋण फेडणारा; परमेश्वराचे एक विशेषण. (ख्रिस्ती वाङ्मयात.) प्रयोग. [सं.]
ऋणाईत, ऋणाईतस्वरूपी, ऋणायतस्वरूपी, ऋणायीतस्वरूपी पु. १. (सामा.) ऋणकरी. २. काही उपयोग नसताना पोसावा लागणारा ऋणकरी : ‘उगीच ऋणायतस्वरूप्यासारखे डोक्याला हात टेकून चारचौघे येथे येतात तेथे बसू नका.’ – मोर ४. ३. घेणेदार; कर्जदार : ‘एक म्हणे हा माझा ऋणावित । भला सांपडला येथ ।’ – एभा २३.५२१.
ऋणादान न. १. सावकारीचा धंदा; पैसे उसने देण्याचा व्यवसाय. २. कर्जवसुली. ३. कर्जफेड. [सं.]
ऋणानुबंध पु. १. चालू सुखदुःखाचा पूर्वजन्माशी ऋणसंबंध; इष्टानिष्ट फल देणारा पूर्वसंबंध; प्राक्तन; योगायोग; ईश्वरी सूत्र. २. स्नेहसंबंध; घरोबा; मैत्री : ‘मजपासुनिया सुखदुःखाशा मुळीच वर्जावी । सरला ऋणानुबंधचि ईशस्मरणींच वेळ योजावी ।।’ – वनवासी फूलटिक
ऋणानुबंधी वि. स्नेही; मित्र; घसट असलेला; लागाबांधा असलेला.
ऋणिया वि. १. कर्जदार; देणेकरी; ऋणको : ‘परी मेचु ये होईजेल । ऋणिया तुज ।।’ – ज्ञा १८.३०१. २. धनको; सावकार : ‘जैसा समर्थु आणि ऋणिया । मार्गों आला बाइणिया । न लोटे तैसा प्राणिया । पडे तो भोगु ।।’ – ज्ञा १८.२५२. [सं. ऋण]
ऋणी वि. १. ऋणासंबंधी. २. देणेदार; ऋणको : ‘आमुचा तू ऋणी ठायींचाचि देवा । मागावया ठेवा आलों दारा ।।’ – तुगा १२१९. ३.(ल.) उपकारबद्ध; उपकृत : ‘त्याचे आपण ऋणी नाही काय?’ – लोटिकेले ४.१४४. (वा.) **ऋणी असणे –** उपकार आठवणे; कृतज्ञ असणे.
ऋत न. १. (तत्त्व.) ऋग्वेदातून आलेला शब्द; वैश्विक किंवा विश्वव्यापी संरचनेचा नियम; संपूर्ण विश्वाच्या मुळाशी असलेला चित्तत्त्वाचा अधिकार. २. सत्य; खरेपणा. [सं.]
ऋतु–तु–तू पु. १. निसर्गातील वातावरण (उन, वारा, पाऊस इ.) यामुळे निर्माण होणारा विशिष्ट मोसम. भारतीय कालगणनेनुसार वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत व शिशिर असे सहा ऋतु; निसर्गाधारे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे तीन ऋतु. २. स्त्रियांचा मासिक विटाळ. ३. हंगाम, मोसम. ४. सहा ही संख्या.
ऋतुकाल पु. १. गर्भधारणेचा काळ. हा रजोदर्शनापासून १६ दिवसांचा काळ : ‘नेमिले जाण । स्वदारागमन ऋतुकाळीं ।’ – एभा २१.१९६. २. ऋतुपरत्वे येणारा काल; ऋतू चालू असलेली वेळ; हंगाम; मोसम : ‘ऋतुकाळें फळे येती पूर्ण । त्यांसि दृष्टिभेटी हाटी जाण ।’ – एभा २३.९८. [सं.]
ऋतुगण पु. ऋतूंचा समुदाय; सारे ऋतू. [सं.]

ऋतुचक्रनिष्ठ पुराणकथा स्त्री. ऋतूंच्या अस्तित्वावर आधारित लोककथा.

ऋतुचर्या स्त्री. निरनिराळ्या ऋतूंतील राहणी. [सं.]

ऋतुत्रय न. तीन ऋतु; उन्हाळा, पावसाळा, हिवाळा : 'पै ऋतुत्रय आकाशें। धरूनियाहि जैसें ।।' – ज्ञा १४.२९१. [सं.]

ऋतुदर्शन न. रजोदर्शन; स्त्रियांना प्रथम प्राप्त होणारा ऋतु; विटाळ; नहाण; ऋतुप्राप्ती. [सं.]

ऋतुदान न. स्त्रीसमागम : 'अर्धरात्रीनंतर भार्येस ऋतुदान करावे.' – सुसु १७. [सं.]

ऋतुपति–ती पु. ऋतूंचा राजा; श्रेष्ठ ऋतू; वसंतऋतू : 'जैसें ऋतुपतीचे द्वार। वनश्री निरंतर।' – ज्ञा ३.१००. [सं.]

ऋतुपर्याय पु. ऋतूंचे परिवर्तन; अनुक्रम; ऋतूंचे पुन्हा पुन्हा येणे; ऋतूंत बदल. [सं.]

ऋतुप्राप्ति–प्ती स्त्री. रजोदर्शन, ऋतू प्राप्त होणे; नहाण येणे : 'मुख्य मुख्य स्मृती आणि सूत्रें या ग्रंथातून मुलींचा लग्नाचा काळ आठ वर्षापासून ऋतुप्राप्तीपर्यंत सांगितला आहे.' – लोटिकेले ४.११५.

ऋतुमती स्त्री. १. विटाळशी; प्रथम ऋतू प्राप्त झालेली कन्या; न्हाणोली. २. विटाळ प्राप्त झाल्यापासून १६ दिवसांपर्यंत गर्भसंभव होण्यास किंवा गर्भधारणेला योग्य स्त्री : 'व्रत व श्राद्ध सांग होऊन ऋतुमतीची इच्छाही पूर्ण होईल.' – सुसु १७. [सं.]

ऋतुशांति–ती, ऋतुशांत स्त्री. प्रथम रजोदर्शनसमयी अनिष्ट मासादिकांचे दूषित फलनाशार्थ करायची शांती; गर्भाधानविधी : 'कारण पुढे शुक्राचा अस्त आहे. म्हणून कुटुंबाची ऋतुशांति करून घ्या.' – कफा ९.

ऋतुस्तर पु. (भूशा.) वाच्यार्थाने एका वर्षात साठणारा अवसाद. परंतु अलीकडे 'हिमनदीतील बर्फ वितळून तयार होणाऱ्या सरोवरातील अवसाद' असा त्याचा मर्यादित अर्थ होतो. ऋतुमानाप्रमाणे अवसादांमध्ये बदल होऊन उन्हाळ्यात भरडकणी व हिवाळ्यात सूक्ष्मकणी अवसाद साठतात.

ऋतुस्तर कालगणना (पुरा.) हिमयुगकालाच्या शेवटी प्रत्येक हिवाळ्यात गर्द मातट पाण्याचे थर बसत असत. या थरांवरून त्या कालाचे अनुमान करण्याची पद्धत.

ऋतुस्नात वि. १. विटाळशीपणानंतर स्नान करून शुद्ध झालेली. २. (चुकीने) ऋतुमती; रजस्वला. ३. संभोगयोग्य; उपभोग्य : 'कां शुनी जैशी ऋतुस्नात। तिसीं भोगूं येती श्वान बहुत.' – एभा १०.५२२.

ऋतुस्नान न. पाळी संपल्यावर चौथ्या दिवशी करायचे स्नान.

ऋतुस्रावचक्र न. (वै.) एका मासिक पाळीनंतर दुसऱ्या मासिक पाळीची सुरुवात होईपर्यंतच्या काळात होणाऱ्या शारीरिक बदलांचे चक्र. सामान्यत: हा चांद्रमासकाल (२८ दिवस) असतो.

ऋतूद्भव, ऋतूद्भावक वि.आर्तवजनक; ऋतु प्राप्त करून देणारे (औषध वगैरे). [सं.]

ऋतू संपादणे ऋतुदान करणे; संभोगणे : 'दिवस पांचवा ऋतु संपादुन मग जा गुणराशी' – पला ९२.

ऋत्विज पु. यज्ञयाग, होमहवन इ. कर्म करणारा, त्यात भाग घेणारा.

ऋद्धि–द्धी स्त्री. १.ऐश्वर्य; संपत्ती; भरभराट; योगाने मिळवलेली समृद्धी; लक्ष्मी : 'कीं तपोबळें ऋद्धी। पातलिया भ्रंशे बुद्धी।' – ज्ञा १.१८८. २. ऐश्वर्याचा, भरभराटीचा काळ. [सं.]

ऋद्धिसिद्धि–द्धी स्त्री. १. गणपतीच्या दोन दासी, परिचारिका; सामान्यत: ऋद्धी. पहा : **रूद्धिसिद्धि.** २. ऋद्धी आणि सिद्धी (अष्टमहासिद्धी); संपत्ती आणि यश. [सं.]

ऋषभ पु. १. बैल; पोळ; वसू. २. (संगीत.) (शुद्ध) सात स्वरांपैकी दुसरा स्वर; सा, रे, ग पैकी रे हा स्वर. पहा : **स्वरसप्तक**
वि. श्रेष्ठ : 'व्यथा न देती पुरुषा हे जया पुरुषर्षभा ।।' – गीता २.१५. [सं.]

ऋषि–षी पु. १. मुनी, तपस्वी. २. धर्मशास्त्र जाणणारा, रचणारा, महात्मा. ३. देवमाणूस; सात्त्विक माणूस; धर्मपरायण व्यक्ती.

ऋषिऋण न. मनुष्यप्राण्याला असलेल्या ऋणत्रयापैकी एक ऋण. ऋषितर्पण व वेदाध्ययन यांनी ऋषिऋण फिटते. [सं.]

ऋषिधान्य न. मुख्य अठराधान्ये खेरीज करून सावे, वरी, देवभात वगैरे किरकोळ धान्य.

ऋषिपंचमी स्त्री. भाद्रपद शुद्ध पंचमी. या दिवशी अरुंधतीसह सप्तऋषींची पूजा करतात. हे व्रत सर्व स्त्रियांनी, विटाळशी असताना चुकून घरात काही वस्तूला स्पर्श झाल्यास तो दोष नाहीसा होण्यासाठी करायचे असते. या दिवशी स्त्रियांनी बैलांच्या कष्टाने तयार झालेला कोणताही पदार्थ खायचा नसतो. [सं.]

ऋषिमार्ग पु. शास्त्रविहित आचार, वर्तन; शुद्ध, सात्त्विक वर्तन; लाभ होत असताही निषिद्ध, अन्याय्य कर्म सर्वथा न करणे. [सं.]

ऋषिमार्गी वि. शुद्ध वर्तन ठेवणारा; ऋषिमार्गाने जाणारा.

ऋषियज्ञ पु. पंचमहायज्ञांपैकी एक यज्ञ; ब्रह्मयज्ञ. इतर यज्ञांमध्ये प्रत्यक्ष अवदान किंवा बलिदान असते परंतु या यज्ञात ऋषिप्रीत्यर्थ वेदाध्ययन करणे हेच हवन होय. [सं.]

ऋषिसंख्या, ऋषिसंख्याक वि. सात ही संख्या. सात ऋषींवरून ही संज्ञा पडली आहे : 'खदिरवृक्षांचे शास्त्रसंख्याक। पळसाचे ऋषिसंख्याक। ऐसियापरि सम्यक्। यज्ञक्रिया अवलंबीली ।।' – जै ९२.४९.

ऋषेश्वराचा कारभार पु. दिरंगाईचा, सावकाशीचा, अव्यवस्थित चालणारा कारभार.

ऋष्टि–ष्टी स्त्री. लढाईचे एक शस्त्र; तलवार किंवा भाला. [सं.]

ऋक्ष पु. अस्वल; रीस. [सं.]

ऋक्ष न. तारकापुंज; नक्षत्र. [सं.]

ॠ

मराठी अक्षरमालेतील आठवा वर्ण. ऋ, ऌ, (ॡ) या स्वरांनी आरंभ होणारे शब्द मराठीत नाहीत.

ॡ

मराठी अक्षरमालेतील नववा वर्ण. वैदिक व संस्कृत या भाषांत केवळ 'क्लृप्ति' या शब्दात आढळणारा, नंतरच्या अवस्थांत नष्ट झालेला 'ल' या व्यंजनाचा मिळता स्वर. ॡ (दीर्घ) असा वर्ण मुळात नाही – शब्ददिठी शब्दमिठी, मा. गो. वैद्य